**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी- ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक –५३</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>दिनांक –१८.२.२०२१</u>** **<u>वेळ –दुपारी २.०० वाजता</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे फेब्रूवारी-२०२१ ची मासिक मा.महापालिका सभा गुरुवार दिनांक १८/२/२०२१ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर

२) मा.केशव हनुमंत घोळवे उपमहापौर

३) मा.कुंदन अंबादास गायकवाड

४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे

५) मा.अश्विनी संतोष जाधव

६) मा.सारीका शिवाजी सस्ते

७) मा.राहुल गुलाब जाधव

८) मा.वसंत प्रभाकर बोराटे

९) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे

१०) मा.बुर्डे सुवर्णा विकास

११) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

१२) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

१३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१४) मा.गायकवाड निर्मला मनोज

१५) मा.सागर बाळासाहेब गवळी

१६) मा.गोफणे अनुराधा  देविदास

१७) मा.अजित दामोदर गव्हाणे

१८) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

१९) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२०) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२१) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२२) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२३) मा.फुगे भिमाबाई पोपट

२४) मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२५) मा.सावळे सिमा रविंद्र

२६) मा.लोंढे नम्रता योगेश

२७) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२८) मा.लांडे विक्रांत विलास

२९) मा.गीता सुशिल मंचरकर

३०) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३१) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३२) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३३) मा.अनुराधा गणपत गोरखे

३४) मा.मंगला अशोक कदम

३५) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३६) मा.अश्विनी भिमा बोबडे

३७) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३८) मा.संजय बबन नेवाळे

३९) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४०) मा.भालेकर प्रविण महादेव

४१) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४२) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४३) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४४) मा.घोलप कमल अनिल

४५) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४६) मा.चिखले सचिन तुकाराम

४७) मा.वैशाली जालिंदर काळभोर

४८) मा.प्रमोद कुटे

४९) मा.राजू मिसाळ

५०) मा.शैलजा अविनाश मोरे

५१) मा.बाबर शर्मिला राजू

५२) मा.अमित राजेंद्र गावडे

५३) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५४) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५५) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५६) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

५७) मा.ढाके नामदेव जनार्दन

५८) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

५९) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

६०) मा.भोईर सुरेश शिवाजी

६१) मा.अपर्णा निलेश डोके

६२) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६३) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६४) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

६५) मा.जयश्री वसंत गावडे

६६) मा.कोमल दिपक मेवानी

६७) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

६८) मा.सुलक्षणा राजू धर

६९) मा.शाम गणपतराव लांडे

७०) मा.सुजाता सुनिल पालांडे

७१) मा.योगेश मंगलसेन बहल

७२) मा.कदम निकीता अर्जुन

७३) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७४) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

७५) मा.नढे विनोद जयवंत

७६) मा.पाडाळे निता विलास

७७) मा.काळे उषा दिलीप

७८) मा.कोकणे संतोष अंकुश

७९) मा.पवार मनिषा प्रमोद

८०) मा.बारणे अर्चना तानाजी

८१) मा.अभिषेक गोविंद बारणे

८२) मा.बारणे झामाई बाळासाहेब

८३) मा.बारणे माया संतोष

८४) मा.निलेश हिरामण बारणे

८५) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

८६) मा.दर्शले रेखा राजेश

८७) मा.कलाटे राहुल तानाजी

८८) मा.ममता विनायक गायकवाड

८९) मा.कामठे तुषार गजानन

९०) मा.चोंधे आरती सुरेश

९१) मा.कस्पटे संदिप अरुण

९२) मा.बाबाहेब (बाबा)त्रिभुवन

९३) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९४) मा.सुनिता हेमंत तापकीर

९५) मा.चंद्रकांत बारकु नखाते

९६) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९७) मा.कुटे निर्मला संजय

९८) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

९९) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१००) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०१) मा.मुंढे उषा अंकुश

१०२) मा.कदम शशिकांत गणपत

१०३) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१०४) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१०५) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१०६) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

१०७) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१०८) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

१०९) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

११०) मा.नवनाथ दत्तू जगताप

१११) मा.संतोष बबन कांबळे

११२) मा.सोनवणे शारदा हिरेन

११३) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

११४) मा. संजय मल्हारराव वाबळे

११५) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

११६) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

११७) मा.अॅड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.राजेश पाटील-आयुक्त, मा.विकास ढाकणे-अतिरिक्त आयुक्त (१), मा.अजित पवार-अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त (३), मा.राजन पाटील- शहर अभियंता, मा.डॉ.रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.कोळंबे-मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.चारठाणकर, मा.चितळे, मा.दुरगुडे, मा.खोत- उपआयुक्त, मा.डॉ.साळवे-अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे- अधिष्ठता वायसीएमएच,

मा.गायकवाड- जनतासंपर्क अधिकारी, मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

मा.महापौर- उपस्थित मा.नगरसेवक, मा.नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य,मा.आयुक्त,अधिकारी वर्ग,पत्रकार,नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.अॅड.मोरेश्वर शेडगे– मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सीरम इन्स्टिटयुट मध्ये लागलेल्या आगीमध्ये ५ जणांचे निधन, उत्तराखंडमध्ये हिमकडा कोसळून झालेल्या अपघातामध्ये १७० नागरीकांचे निधन तसेच पी.बी.सावंत- सुप्रीम कोर्टाचे माजी न्यायमुर्ती यांचे निधन, इलाहीजमादार – प्रसिध्द गझलकार यांचे निधन, राघवेंद्र कडकोळ–प्रसिध्द नाट्य चित्रपट अभिनेते यांचे निधन, राजीव कपुर–हिंदी चित्रपट सृष्टीतील जेष्ठ अभिनेते यांचे निधन, सागर तोडकरी– पठाणकोट मध्ये उस्मानाबाद जिल्हयातील जवान शहीद, वा.ना.अभ्यंकर–ज्ञानप्रबोधिनी निगडी केंद्राचे संस्थापक यांचे निधन, ह.भ.प.निवृत्ती मारुती इंगवले–पिंपळेनिलख मधील सामाजिक कार्यकर्ते यांचे निधन, सोनम म्हस्के–मोशी यांचे निधन, ह.भ.प. श्री.जगन्नाथ गोपाळ हरपुडे-चिंचवडगांव यांचे निधन, लक्ष्मीबाई दत्तात्रय जांभुळकर यांचे निधन, रमेश सदाशिव रणवरे यांचे निधन, डॉ.गुलाबराव लांडगे यांचे निधन, कै.सुंदराबाई केशव जाधवयांचे निधन, कै.किसन दगडु जाधव यांचे निधन झाले असल्याने त्यांना आजच्या सभेत श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

मा.रवि लांडगे - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

मा.महापौर - श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

-------

मा.सचिन चिखले - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आमचे सर्वाचे आदरनीय प्राधिकरण येथील ज्येष्ठ आणि सामाजीक कार्यकर्ते, ज्ञानप्रबोधिनी शाळेचे संस्थापक आदरनीय भाऊ अभ्यंकर गुरुजी यांचे काल अल्पश: आजारान दु:खद निधन झाल. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने

त्याचप्रमाणे सभागृहातील सर्व नगरसेवकांच्या वतीने मी त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि थांबतो.

मा. ॲड.मोरेश्वर शेडगे– मा.महापौर साहेब,ज्ञानप्रबोधनीचे अभ्यंकर यांचे निधन झालेल आहे आणि या सर्व मान्यवरांना आपण श्रध्दांजली वाहीलेली आहे माझी विनंती आहे की आपण ही सभा आज दु.२.३० पर्यंत तहकूब करणेत यावी अशी मी सूचना मांडतो.

मा.रवि लांडगे - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

मा.महापौर - सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेता ही सभा आज दि. १८/२/२०२१ दु.२.३० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

------

(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी- ४११ ०१८</u>**
**<u>मा.महापालिका सभा</u>**
**<u>कार्यपत्रिका क्रमांक –५३</u>**
**<u>सभावृत्तांत</u>**
**<u>(दि.१८/२/२०२१ (दु.२.००) ची तहकूब सभा)</u>**

**<u>दिनांक –१८.२.२०२१</u>** **<u>वेळ –दुपारी २.३० वाजता</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.१८/२/२०२१ दुपारी २.०० ची तहकूब मा.महापालिका सभा गुरुवार दिनांक १८/२/२०२१ रोजी दुपारी २.३० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर
२) मा.कुंदन अंबादास गायकवाड
३) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
४) मा.अश्विनी संतोष जाधव
५) मा.सारीका शिवाजी सस्ते
६) मा.राहुल गुलाब जाधव
७) मा.वसंत प्रभाकर बोराटे
८) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे
९) मा.बुर्डे सुवर्णा विकास
१०) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
११) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
१२) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन
१३) मा.गायकवाड निर्मला मनोज
१४) मा.सागर बाळासाहेब गवळी

१५) मा.गोफणे अनुराधा  देविदास

१६) मा.बारसे प्रियांका प्रविण

१७) मा.अजित दामोदर गव्हाणे

१८) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

१९) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२०) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२१) मा.सावळे सिमा रविंद्र

२२) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२३) मा.लांडे विक्रांत विलास

२४) मा.गीता सुशिल मंचरकर

२५) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२६) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

२७) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

२८) मा.अनुराधा गणपत गोरखे

२९) मा.मंगला अशोक कदम

३०) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३१) मा.अश्विनी भिमा बोबडे

३२) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३३) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३४) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३५) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३६) मा.घोलप कमल अनिल

३७) मा.उत्तम प्रकाश केंदळे

३८) मा.चिखले सचिन तुकाराम

३९) मा.वैशाली जालिंदर काळभोर

४०) मा.प्रमोद कुटे

४१) मा.राजू मिसाळ

४२) मा.शैलजा अविनाश मोरे

४३) मा.बाबर शर्मिला राजू

४४) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४५) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

४६) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

४७) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४८) मा.ढाके नामदेव जनार्दन

४९) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

५०) मा.भोईर सुरेश शिवाजी

५१) मा.अपर्णा निलेश डोके

५२) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

५३) मा.गावडे राजेंद्र तानाजी

५४) मा.जयश्री वसंत गावडे

५५) मा.कोमल दिपक मेवानी

५६) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

५७) मा.सुलक्षणा राजू धर

५८) मा.शाम गणपतराव लांडे

५९) मा.सुजाता सुनिल पालांडे

६०) मा.योगेश मंगलसेन बहल

६१) मा.कदम निकीता अर्जुन

६२) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६३) मा.नढे विनोद जयवंत

६४) मा.काळे उषा दिलीप

६५) मा.बारणे अर्चना तानाजी

६६) मा.बारणे माया संतोष

६७) मा.निलेश हिरामण बारणे

६८) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

६९) मा.दर्शले रेखा राजेश

७०) मा.कलाटे राहुल तानाजी

७१) मा.कलाटे मयूर पांडुरंग

७२) मा.ममता विनायक गायकवाड

७३) मा.कामठे तुषार गजानन

७४) मा.चोंधे आरती सुरेश

७५) मा.कस्पटे संदिप अरुण

७६) मा.चंद्रकांत बारकु नखाते

७७) मा.कुटे निर्मला संजय

७८) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

७९) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

८०) मा.आंगोळकर सागर सुनिल

८१) मा.मुंढे उषा अंकुश

८२) मा.कदम शशिकांत गणपत

८३) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

८४) मा.आशा धायगुडे-शेंडगे

८५) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

८६) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

८७) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

८८) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

८९) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

९०) मा.नवनाथ दत्तू जगताप

९१) मा.संतोष बबन कांबळे

९२) मा.सोनवणे शारदा हिरेन

९३) मा. संजय मल्हारराव वाबळे

९४) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

९५) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.राजेश पाटील-आयुक्त, मा.विकास ढाकणे-अतिरिक्त आयुक्त (१), मा.अजित पवार-अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त (३), मा.राजन पाटील- शहर अभियंता, मा.डॉ.रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.कोळंबे-मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.चारठाणकर, मा.चितळे, मा.दुरगुडे, मा.खोत- उपआयुक्त, मा.डॉ.साळवे-अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे- अधिष्ठता वायसीएमएच, मा.गायकवाड- जनतासंपर्क अधिकारी, मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

मा.महापौर- उपस्थित मा.नगरसेवक, मा.नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य,मा.आयुक्त,अधिकारी वर्ग,पत्रकार,नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

(नवनिर्वाचितआयुक्त मा.राजेश पाटील, अति.आयुक्त मा.विकास ढाकणे यांचा मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती-स्थायी समिती, मा.पक्षनेते, मा.विरोधी पक्षनेते, मा.सर्व पक्षाचे गटनेते यांचे हास्ते सत्कार करणेत आला.त्यानंतर मा.आयुक्त व मा.अति.आयुक्त यांनी त्यांचा परिचय करुन दिला.)

मा.आयुक्त (मा.राजेश पाटील) -सन्मा.महापौर महोदया, उपमहापौर महोदय, पक्षनेते, विरोधी पक्षनेते, सदस्यगण, पत्रकार बंधु गण आणि उपस्थित या महानगरपालिकेच्या क्षेत्रामधील नागरीक या सर्वाचे मी स्वागत करतो आणि आज माझ्ा स्वागत केल्याबद्दल सन्मा.महापौर महोदया आणि सर्व सन्मा.सदस्यांना मी धन्यवाद देतो. मी राजेश पाटील, भारतीय प्रशासन सेवेच्या २००५ च्या बॅचचा मी अधिकारी. पुणे विदयापीठामधून संख्याशास्त्र विषयामध्ये मी पदव्यूत्तर शिक्षण घेतलेल आहे. त्यानंतर भारतीय वायू सेना, भारतीय संख्यिकी सेवा आणि त्यानंतर भारतीय प्रशासकीय सेवा असा माझा प्रवास आहे. गेले पंधरा वर्षे मी ओरीसा राज्यामध्ये काम करत होतो. या दरम्यान जवळ जवळ साडेआठ वर्षे मी जिल्हाधिकारी म्हणून तीन जिल्हयामध्ये काम केलेलं आहे. त्यापुर्वी प्रांत आणि इतर पद मी भूषवलेली आहेत. गेली तीन वर्षे मी हेडक्वॉर्टरमध्ये वेगवेगळया विभागांमध्ये काम केलेल आहे. डेप्युटेशननंतर महाराष्ट्रात ही माझी पहीली नियुक्ती आहे. आपल्या सर्वाबरोबर काम करण्याची मला संधी मिळालेली आहे. मी स्वत:ला खुप भाग्यवान समजतो की पिंपरी चिंचवड सारख्या एका दैदिप्यमान अशा महानगरपालिकेमध्ये काम करण्याची संधी मला सरकारने दिलेली आहे. या महापालिकेत आपण ऑलरेडी एक वेगळा

दर्जा मेन्टेन ठेवलेला आहे. त्याच्यामध्ये माझ्या कार्यदक्षतेनी आणि माझ्या कामानी, आपल्या सगळयांच्या सहकार्याने तसेच पुढे चालू ठेवण्याचा मी प्रयत्न करीन, धन्यवाद.

मा.अति.आयुक्त (विकास ढाकणे) - सन्मा.महापौर महोदया, उपमहापौर महोदय, पक्षनेते, विरोधी पक्षनेते, सदस्यगण, पत्रकार बंधु गण. सर्वप्रथम मी महापौर महोदयांचे आभार मानतो की त्यांनी आणि सर्व नगरसेवक सदस्यांनी माझे स्वागत केले. मी माझा परिचय करुन देतो- माझ नाव विकास ढाकणे मी भारतीय रेल्वे सेवेतून महाराष्ट्र शासनामध्ये डेप्युटेशनवर आलो आहे. यापुर्वी मी राज्यशासनामध्ये मा. उदयोग मंत्री महोदय यांच्याकडे विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून काम केलेले आहे. त्यापुर्वी दिल्लीला केंद्रीय मंत्रालयामध्ये उपसचिव दर्जाच्या पोस्टवर मा.केंद्रीय मंत्र्यांच्या सोबत काम करण्याची संधी मला मिळाली. त्यापुर्वी मी भारतीय रेल्वे सेवेमध्ये सहा.आयुक्त तसेच विभागीय आयुक्त लेव्हलला मुंबई, सोलापुर तसेच पुण्यातही काम केलेले आहे. माझ्या साठी ही खुप मोठी सेवेची संधी आहे. माझ शिक्षण हे पुण्यामध्ये कृषि महाविदयालयामध्ये झालेलं आहे मी बीएससी ॲग्रीकल्चर केलेलं आहे. तसेच रेल्वे एकॉनॉमीक्स आणि एलएलबी देखील पुण्यातून केलेलं आहे. भारतामध्ये खुप वेगाने विकसीत असलेल्या या पीसीएमसी मध्ये मला सरकारने सेवेची संधी दिली आहे तरी मा.महापौर महोदया तसेच मा.आयुक्त साहेब आणि आपल्या सर्वासोबत सकारात्मक दिशेने कार्य करुन जसा मा.आयुक्त साहेबांचा मानस आहे की या शहराला अंतरराष्ट्रीय दर्जाच शहर बनवायच आहे त्या दिशेनी काम करण्यास मी कटिबध्द आहे. पुन्हा एकदा सर्वांचे आभार मानतो, धन्यवाद.

मा.महापौर - सभेच्या पुढील कामकाजाला सुरवात करावी.

## <u>नियुक्त्या</u>

नगरसचिव- विषय क्रमांक १) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या कलम ३१अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाव्दारे करणे.

मा.नगरसचिव– विषय क्रमांक १- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मा.स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाव्दारे करणे करीता सदर कलमा

अन्वये महानगरपालिका अधिनियमान्वये गठीत करण्यात येणा-या समित्यांमध्ये महानगरपालिकेतील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना व गटांना खात्रीपुर्वक पुरेसे प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून समित्यांवर बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याची तरतूद करण्यात आली. तसेच रिक्त होणा-या जागांवर निवृत्त झालेला मा.सदस्य ज्या मान्यताप्राप्त पक्षाचा, नोंदणीकृत पक्षाचा गटाचा आघाडीचा किंवा फ्रंटचा आहे त्याच मान्यताप्राप्त पक्षाच्या/नोंदणीकृत पक्षाच्या/गटाच्या/आघाडीच्या किंवा फ्रंटच्या मा.सदस्यास नामनिर्देशित करावयाचे असून विद्यमान मा.स्थायी समितीचे दिनांक १ मार्च २०२१ रोजी दुपारी निवृत्त होणारे सदस्यांची नांवे पुढीलप्रमाणे-१) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे२) मा.चोंधे आरती सुरेश ३) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे ४) मा.लांडगे राजेंद्र किसनराव ५) मा.पंकज दत्तात्रय भालेकर६)मा.कलाटे मयूर पांडूरंग७) मा.कलाटे राहूल तानाजी ८) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब याप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी– ४,पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी– २,पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिवसेना- १, पिंपरी चिंचवड अपक्ष आघाडी २०१७- १या पक्षियबलाप्रमाणे नियुक्त्या करणे करीता.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी गटनेते तथा सभागृहनेता मा.ढाके नामदेव जर्नादन यांनी त्यांच्या पक्षाचे ४ सदस्यांची नांवे बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी मा.महापौरांकडे द्यावीत. (बंद लखोटा देणेत आला.)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी गटनेते तथा विरोधी पक्षनेता मा.राजू मिसाळ यांनी त्यांच्या पक्षाच्या २ सदस्यांची नावे बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी महापौरांकडे द्यावीत. (बंद लखोटा देणेत आला.)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिवसेना गटनेते मा.राहुल तानाजी कलाटे यांनी त्यांच्या पक्षाच्या १ सदस्यांचे नाव बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी महापौरांकडे द्यावे. (बंद लखोटा देणेत आला.)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी चिंचवड अपक्ष आघाडी २०१७ गटनेते मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे यांनी त्यांच्या पक्षाच्या १ सदस्यांचे नाव बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी महापौरांकडे द्यावे. (मा.कैलास उर्फ मा.बाबा भालचंद्र बारणे गटनेता, अपक्ष आघाडी-२०१७ हे सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांचे तर्फे मा.पाडाळे निता विकास नगरसदस्या, अपक्ष आघाडी-२०१७ यांनी गटनेता, अपक्ष आघाडी-२०१७ यांच्या वतीने एका सदस्यांचे नावाचा बंद लखोटा मा.महापौर यांचेकडे सादर केला.)

त्यानंतर –

मा.महापौर यांनी बंद लखोटे सर्वांसमक्ष उघडले आणि त्यामध्ये असणारी नांवे श्री.किरण गायकवाड, माहिती व जनसंर्पक अधिकारी, माहिती व जनसंपर्क कार्यालय यांनी सभागृहात वाचून दाखविली ती पुढीलप्रमाणे-
१) मा. ॲड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे - पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी २) मा.लांडगे रवि लक्ष्मण - पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी ३) मा.भोईर सुरेश शिवाजी - पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी ४) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे - पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी ५) मा.यादव मीनल विशाल- पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिवसेना ६) मा.भालेकर प्रवीण महादेव - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ७) मा.बनसोडे राजू विश्वनाथ - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ८) पिंपरी चिंचवड महानगरपालिका अपक्ष आघाडी-२०१७ च्या तौलनिक संख्याबळाच्या आधारावर ....... (पिंपरी चिंचवड अपक्ष आघाडी- २०१७ चे वतीने मा.महापौर यांचेकडे मा.पाडाळे निता विलास यांनी दिलेला बंद लखोटा मा.महापौर यांनी उघडल्यानंतर श्री.किरण गायकवाड यांनी मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे गटनेता अपक्ष आघाडी-२०१७ यांनी त्यांचे लेटरहेडवर दिलेले नावा बाबतचा मजकुर वाचण्यास सुरुवात केली असता श्री.राहुल तानाजी कलाटे नगरसदस्य पिंपरी चिंचवड महानगरपालिका, गटनेता शिवसेना व मा.नवनाथ दत्तू जगताप, नगरसदस्य अपक्ष आघाडी-२०१७ यांनी त्यास विरोध दर्शविला व सदर नावाचे वाचन करण्यास प्रतिबंध केला व यावेळी सभागृहात गोंधळाची स्थिती निर्माण झाली.)

(सभागृहात गोंधळ)

मा.राहुल कलाटे - मा.महापौर साहेब, अपक्ष पक्षांचे गटनेत्यांनी नावाचा बंद लिफाफा दिला पाहीजे त्यामुळे किरण गायकवाड आपण ते नाव वाचू नये.

(सभागृहात गोंधळ)

मा.राहुल कलाटे - मा.महापौर साहेब, गटनेते यांचे मार्फतच नावाचा बंद लिफाफा दिला पाहीजे परंतु अपक्ष आघाडीचे गटनेते सभागृहात नाहीत त्यांबाबतीत नियमावली सांगावी.

मा.महापौर - नगरसचविव यांनी नियमावली सांगावी.

मा.नगरसचिव - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब (अपक्ष आघाडी) यांच्या रिक्त जागेवर नामनिर्देशन बाबत सन्मा.सदस्यांनी आक्षेप उपस्थित केलेला आहे त्या अनुषंगाने मा.महापौर मॅडम यांनी नियम सांगणेकामी निर्देश दिलेले आहेत ते मी वाचून दाखवतो.रिक्त

होणा-या जागेच्या बाबतीमध्ये नगरसचिवास विभागाकडील पत्र क्र. नस/४/कावि/६९/२०२१ दि.१०/२/२०२१ अन्वये मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्षनेता, मा.गटनेता, शिवसेना, मा.गटनेता अपक्ष आघाडी-२०१७ यांना याबाबत कळवणेत आलेल आहे. त्याच्या सोबत शासनाचे परिपत्रक क्रमांक-संकीर्ण २०१०/प्र.क्र.८५/नवि-३२ दिनांक ६ जुलै २०१० ची प्रत देखील जोडण्यात आलेली आहे.

मी आताच विषय वाचलेनंतर मा.सभागृहाच्या निदर्शनास आणून दिलेल आहे की या नेमणुका महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे तसेच शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०१०/प्र.क्र.८५/नवि-३२ दिनांक ६ जुलै २०१० च्या शासन परिपत्रका प्रमाणे करावयच्या आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या ३१ अ मध्ये जी तरतूद आहे ती तरतूद मी सन्मा.सदस्यांच्या निदर्शनास आणूण देत आहे.(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये नमुद तरतूदीचे वाचन केले.)

३१ अ) प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन समित्यांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करणे-

(१)कोणत्याही समितीवरील पालिका सदस्याची नियुक्ती ही त्याने धारण केलेल्या कोणत्याही पदाच्या आधारे असेल अशी ज्याबाबतीत या अधिनियमाद्वारे तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, पुढील समित्यांच्या बाबतीत या अधिनियमात अथवा तदन्वये केलेल्या नियमात किंवा उपविधीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेद्वारे या समित्यांवर केली जाणारी पालिका सदस्यांची नियुक्ती ही, पोट कलम (२) च्या तरतूदीनुसार पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करुन करण्यात येईल- मग ही नियुक्ती नियमित पदावरील असो किंवा नैमितिक रिक्त पदावरील असो-

समित्यांची नावे आहेत त्यामध्ये अ) स्थायी समिती ब) परिवहन समिती क) कलम ३० अन्वये नियुक्त केलेली कोणतीही विशेष समिती ड) कलम ३१ अन्वये नियुक्त केलेली कोणतीही तदर्थ समिती.

(२)समितीवर पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करताना, महानगरपालिका, मान्यताप्राप्त पक्षांचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेईल आणि सभागृह नेता, विरोधी पक्षनेता व अशा प्रत्येक पक्षाचा किंवा गटाचा नेता यांच्याशी विचारविनिमय करुन शक्यतोवर, महानगरपालिकेतील अशा पक्षांच्या किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करील.

(परंतु मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांचे तौलिनक संख्याबळ हे, प्रथमत: पालिका सदस्यांच्या एकूण

संख्येला त्या समितीच्या सदस्यांच्या एकूण संख्याबळाने भागून परिगणित करण्यात येईल व तदनंतर या भागाकाराच्या संख्येने मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघडी किंवा फ्रंट यांच्या पालिका सदस्यांच्या संख्येस भागण्यात येईल. अशा प्रकारे आलेली संख्या ही त्या त्या मान्यताप्राप्त पक्षांचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे तौलनिक संख्याबळ असेल.अशाप्रकारे निश्चित केलेल्या तौलनिक संख्याबळाची संपूर्ण संख्या प्रथम विचारात घेऊन, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला जागा वाटून देण्यात येतील. अशा रीतीने जागा वाटून दिल्यानंतर, एक किंवा अधिक जागा वाटून दयावयाच्या राहून गेल्यास, त्या जागा, तौलनिक संख्याबळातील सर्वातमोठया अपूर्णांक संख्येपासून सुरुवात करुन तौलनिक संख्याबळातील अपूर्णांक संख्येच्या उतरत्या क्रमाने, त्या सर्व जागा वाटून दिल्या जाईपर्यंत, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला प्रत्येकी एक याप्रमाणे वाटून देण्यात येतील.)

परंतु आणखी असे की महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम, १९८६ (१९८७ चा महा.२०) मध्ये काहीही अंतर्भूत असलेतरी, या अधिनियमान्वये मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट यांचे तौलनिक संख्याबळ निश्चित करण्याच्या प्रयोजनाकरिता, निवडणूक निकालांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून एक महीन्याच्या कालावधीच्या आत, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट अथवा कोणत्याही पक्षाचे किंवा गटाचे नसलेले निर्वाचित पालिका सदस्य यांना एकत्र येऊन आघाडी किंवा वा फ्रंट तयार करता येईल आणि अशा आघाडीची किंवा फ्रंटची नोंदणी झाल्यावर, अशा आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यांना उक्त अधिनियमाच्या तरतूदी जणू काही ही आघाडी किंवा फ्रंट निवडणुकीपूर्वीच नोंदणीकृत असल्याप्रमाणे लागू होतील.

३१(३) मध्ये महत्वाची तरतूद आहे. अशा पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशित करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्भवल्यास, त्याबाबतीत महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील.

आपण जे म्हटले होते की नामनिर्देशन पत्र कुणी दयायच तर मी सुरवातीलाच सांगीतल की ३१ (२) मध्ये समितीवर पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करताना, महानगरपालिका, म्हणजे याच्यामध्ये काही आक्षेप निर्माण झाल्यास त्याबाबतीत मा.महापालिका सभेने निर्णय घेणं अपेक्षीत आहे.

मा.नामदेव ढाके - मा.महापौर साहेब, या संदर्भामध्ये गटनेत्यांच पत्र दिलेल आहे व त्यांच्या गटातल्या सदस्यांनी सांगीतलेल आहे की त्यांची तब्येत बरोबर

नसल्यामुळे त्यांच्या सहीच पत्र याठिकाणी दिलेलं आहे. आताच नगरसचिव यांनी नियम वाचून दाखवलेला आहे त्याप्रमाणे नियुक्ती करावी.

(सभागृहात गोंधळ)

मा.महापौर- अपक्षाच पाकीट फोडा आणि ते पत्र वाचा.

मा.किरण गायकवाड - सन्मा.महापौर, सन्मा.सभागृह, पिंपरी चिंचवड महानगरपालिका अपक्ष आघाडी-२०१७.......

(सभागृहात गोंधळ)

मा.महापौर - सर्वांनी खाली बसून घ्यावे.सभागृहाचा नियम कोणीही मोडु नये. किरण ते पत्र वाचा. खाली बसून घ्या, किरण हे पत्र वाचून दाखवा.

(सभागृहात गोंधळ)

मा.महापौर - सर्वानी खाली बसून घ्यावे, सुरक्षा, सुरक्षा, मागे सरका,मागे सरका ज्यांना गोंधळ करायचा त्यांनी सभागृहाबाहेर जावे. सदर विषयावर मतदान घेणेत यावे. बसून घ्यावे, सर्वानी बसुन घ्या, बसून घ्या हे पत्र मी वाचते आपण बसुन घ्या.

(सभागृहात गोंधळ)

मा.महापौर- पिंपरी चिंचवड महानगरपालिका अपक्ष आघाडी-२०१७ च्या तौलनिक संख्याबळावर महानगरपालिका स्थायी समितीच्या सदस्यपदावर नियुक्त करावयाच्या ०१ पालिका सदस्याचे नाव...... मंजूर, मंजूर.

(सभागृहात गोंधळ)

मा.महापौर- सर्वानी खाली बसून घ्यावे. हा विषय मंजूर करणेत येत आहे.

(सर्वांचे अभिनंदन)

(सभागृहात गोंधळ)

ठराव क्रमांक -६०२ विषय क्रमांक- १

दिनांक - १८/२/२०२१ विभाग- मा.नगरसचिव

<u>स्थायी समिती सदस्य</u>

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळांच्या प्रमाणात १) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे२) मा.लांडगे रवि लक्ष्मण३) मा.भोईर सुरेश शिवाजी ४) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे ५)

मा.यादव मीनल विशाल ६) मा.भालेकर प्रवीण महादेव७) मा.बनसोडे राजू विश्वनाथ८) मा.पाडाळे निता विलास या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात येत आहे.

(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

-----

मा.महापौर - स्थायी समितीवर निवडून आलेल्या सदस्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

ही सभा सोमवार दि. २२/२/२०२१ रोजी दुपारी २.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

(गोंधळाच्या परिस्थितीत मा.महापौर यांनी सभा तहकूब केली.)

-----

(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी- ४११ ०१८**
**मा.महापालिका सभा**
**कार्यपत्रिका क्रमांक –५३**
**सभावृत्तांत**
**(दि.१८/२/२०२१ (दु.२.०० व २.३०) ची तहकूब सभा)**

**दिनांक –२२.२.२०२१** **वेळ –दुपारी २.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.१८/२/२०२१ दुपारी २.३० ची तहकूब मा.महापालिका सभा सोमवार दिनांक २२/२/२०२१ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर
२) मा.केशव हनुमंत घोळवे उपमहापौर
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.सारीका शिवाजी सस्ते
५) मा.राहुल गुलाब जाधव
६) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे
७) मा.बुर्डे सुवर्णा विकास
८) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
९) मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१०) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन
११) मा.गायकवाड निर्मला मनोज
१२) मा.गोफणे अनुराधा देविदास
१३) मा.बारसे प्रियांका प्रविण
१४) मा.अजित दामोदर गव्हाणे

१५) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

१६) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

१७) मा.फुगे भिमाबाई पोपट

१८) मा.सावळे सिमा रविंद्र

१९) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२०) मा.लांडे विक्रांत विलास

२१) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२२) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

२३) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

२४) मा.मंगला अशोक कदम

२५) मा.तुषार रघुनाथ हिंगे

२६) मा.अश्विनी भिमा बोबडे

२७) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

२८) मा.भालेकर प्रविण महादेव

२९) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३०) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३१) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३२) मा.घोलप कमल अनिल

३३) मा.चिखले सचिन तुकाराम

३४) मा.वैशाली जालिंदर काळभोर

३५) मा.राजू मिसाळ

३६) मा.शैलजा अविनाश मोरे

३७) मा.बाबर शर्मिला राजू

३८) मा.अमित राजेंद्र गावडे

३९) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

४०) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४१) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

४२) मा.अपर्णा निलेश डोके

४३) मा.आश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४४) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

४५) मा.कोमल दिपक मेवानी

४६) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४७) मा.सुलक्षणा राजू धर

४८) मा.शाम गणपतराव लांडे

४९) मा.सुजाता सुनिल पालांडे

५०) मा.योगेश मंगलसेन बहल

५१) मा.कदम निकीता अर्जुन

५२) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

५३) मा.पाडाळे निता विलास

५४) मा.काळे उषा दिलीप

५५) मा.बारणे अर्चना तानाजी

५६) मा.अभिषेक गोविंद बारणे

५७) मा.बारणे माया संतोष

५८) मा.निलेश हिरामण बारणे

५९) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

६०) मा.कलाटे राहुल तानाजी

६१) मा.ममता विनायक गायकवाड

६२) मा.कामठे तुषार गजानन

६३) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

६४) मा.सविता बाळकृष्ण खुळे

६५) मा.सुनिता हेमंत तापकीर

६६) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

६७) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

६८) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

६९) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

७०) मा.आशा धायगुडे-शेंडगे

७१) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

७२) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

७३) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

७४) मा.नवनाथ दत्तू जगताप

७५) मा.संतोष बबन कांबळे

७६) मा.सोनवणे शारदा हिरेन

७७) मा. भाऊसाहेब सोपानरावभोईर

७८) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

याशिवाय मा.विकास ढाकणे- मा.अतिरीक्त आयुक्त (१), मा.अजित पवार- अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त(३), मा.डॉ.वाबळे- अधिष्ठता वायसीएमएच, मा.जरांडे- सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

मा.महापौर- उपस्थित मा.नगरसेवक, मा.नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य,मा.आयुक्त,अधिकारी वर्ग,पत्रकार,नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.नामदेव ढाके - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.महापौर साहेब, मी आपल्याला विनंती करतो की आजची सभा मंगळवार दि.९/३/२०२१ रोजी दुपारी २.०० पर्यंत तहकूब करावी अशी सूचना मी मांडतो.

मा.विकास डोळस - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

मा.महापौर - सन्मा.सदस्यांच्या भावना विचारात घेवून आजची सभा मंगळवार दि.९/३/२०२१ रोजी दु.२.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

-----

(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी- ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक –५३</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दि.१८/२/२०२१ (दु.२.०० व २.३०) व दि.२२/२/२०२१ ची तहकूब सभा)</u>**

**<u>दिनांक –९.३.२०२१</u>** **<u>वेळ –दुपारी २.०० वाजता</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२२/२/२०२१ दुपारी २.०० ची तहकूब मा.महापालिका सभा मंगळवार दिनांक ९/३/२०२१ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर

२) मा.कुंदन अंबादास गायकवाड

३) मा.साधना अंकुश मळेकर

४) मा.राहुल गुलाब जाधव

५) मा.वसंत प्रभाकर बोराटे

६) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे

७) मा.बुर्डे सुवर्णा विकास

८) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

९) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

१०) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

११) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१२) मा.गायकवाड निर्मला मनोज

१३) मा.सागर बाळासाहेब गवळी

१४) मा.गोफणे अनुराधा  देविदास

१५) मा.बारसे प्रियांका प्रविण

१६) मा.अजित दामोदर गव्हाणे

१७) मा.लांडगे रवि लक्ष्मण

१८) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

१९) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२०) मा.फुगे भिमाबाई पोपट

२१) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२२) मा.सावळे सिमा रविंद्र

२३) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२४) मा.लांडे विक्रांत विलास

२५) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२६) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

२७) मा.अनुराधा गणपत गोरखे

२८) मा.केशव हनुमंत घोळवे

२९) मा.मंगला अशोक कदम

३०) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३१) मा.अश्विनी भिमा बोबडे

३२) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३३) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३४) मा.भालेकर प्रविण महादेव

३५) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३६) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३७) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३८) मा.उत्तम प्रकाश केंदळे

३९) मा.पवळे सुमनताई मधुकर

४०) मा.चिखले सचिन तुकाराम

४१) मा.यादव मीनल विशाल

४२) मा.वैशाली जालिंदर काळभोर

४३) मा.राजू मिसाळ

४४) मा.शैलजा अविनाश मोरे

४५) मा.बाबर शर्मिला राजू

४६) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४७) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

४८) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

४९) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

५०) मा.ढाके नामदेव जनार्दन

५१) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

५२) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

५३) मा.भोईर सुरेश शिवाजी

५४) मा.अपर्णा निलेश डोके

५५) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

५६) मा.गावडे राजेंद्र तानाजी

५७) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

५८) मा.जयश्री वसंत गावडे

५९) मा.कोमल दिपक मेवानी

६०) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

६१) मा.सुलक्षणा राजू धर

६२) मा.शाम गणपतराव लांडे

६३) मा.सुजाता सुनिल पालांडे

६४) मा.योगेश मंगलसेन बहल

६५) मा.कदम निकीता अर्जुन

६६) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

६७) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६८)  मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

६९)  मा.पाडाळे निता विलास

७०)  मा.काळे उषा दिलीप

७१)  मा.पवार मनिषा प्रमोद

७२)  मा.बारणे अर्चना तानाजी

७३)  मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

७४)  मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

७५)  मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

७६)  मा.बारणे माया संतोष

७७)  मा.निलेश हिरामण बारणे

७८)  मा.वाघमारे अश्विनी विक्रम

७९)  मा.दर्शले रेखा राजेश

८०)  मा.कलाटे राहुल तानाजी

८१)  मा.ममता विनायक गायकवाड

८२)  मा.कामठे तुषार गजानन

८३)  मा.चोंधे आरती सुरेश

८४)  मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

८५)  मा.सविता बाळकृष्ण खुळे

८६)  मा.सुनिता हेमंत तापकीर

८७)  मा.चंद्रकांत बारकु नखाते

८८)  मा.कुटे निर्मला संजय

८९)  मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

९०)  मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

९१)  मा.आंगोळकर सागर सुनिल

९२)  मा.मुंढे उषा अंकुश

९३)  मा.कदम शशिकांत गणपत

९४)  मा.लोखंडे चंदा राजू

९५) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

९६) मा.आशा धायगुडे-शेंडगे

९७) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

९८) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

९९) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

१००) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

१०१) मा.नवनाथ दत्तू जगताप

१०२) मा.संतोष बबन कांबळे

१०३) मा.सोनवणे शारदा हिरेन

१०४) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१०५) मा. भाऊसाहेब सोपानरावभोईर

१०६) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१०७) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.राजेश पाटील-आयुक्त, मा.विकास ढाकणे- मा.अतिरीक्त आयुक्त (१), मा.अजित पवार-अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त (३), मा.राजन पाटील- शहर अभियंता, मा.डॉ.रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.इंगळे, मा.चारठाणकर, मा.चितळे, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत- उपआयुक्त, मा.तांबे- सह शहर अभियंता, मा.लडकत-प्र.सह शहर अभियंता, मा.बोदडे, मा.आगळे-सहा.आयुक्त, मा.गायकवाड-प्र.मुख्य उदयान अधिक्षक, मा.डॉ.साळवे-अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे- अधिष्ठता वायसीएमएच, मा.कुलकर्णी, मा.भोसले-कार्यकारी अभियंता, मा.गायकवाड- जनतासंपर्क अधिकारी, मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी, मा.डॉ.गोफणे-आरोग्य अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

मा.महापौर- उपस्थित मा.नगरसेवक, मा.नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य,मा.आयुक्त,अधिकारी वर्ग,पत्रकार,नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.ज्ञानदेव थोरात - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह.अनंत तरे – शिवसेनेचे माजी आमदार यांचे निधन, नंदकुमार सिंह चौहान – भाजपाचे

जेष्ठ नेते आणि मध्यप्रदेशामधील खासदार यांचे निधन, श्रीकांत मोघे – जेष्ठ नाट्य व चित्रपट अभिनेते यांचे निधन, कौशल्या शिरसाठ, प्रकाश शामराव पाठक, **विश्वनाथ लक्ष्मण मेमाने- (प्रभाग क्र.१२)** यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली वाहणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

मा.अंबरनाथ कांबळे - मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन देतो.

मा.महापौर- श्रध्दांजली वाहण्यासाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.नगरसचिव- विषय क्रमांक २)** मा.बारणे माया संतोष यांनी मा.शिक्षण समिती सदस्यपदाचा राजीनामा दिला असून मा.शिक्षण समिती सदस्यत्वाची एक जागा रिकामी झाली असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३१ अ आणि पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ चे.संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र. ६९ मध्ये निर्देशकेल्याप्रमाणे सदर रिकाम्या जागेवर नियुक्ती करणे.

**मा.नगरसचिव-** विषय क्रमांक २- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २३ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मा.शिक्षण समिती सदस्य पदाचा राजीनामा दिला असल्याने मा.शिक्षण समिती सदस्यत्वाची एक जागा रिकामी झाली असल्याने सदर रिकाम्या जागेवर नियुक्ती करणे. मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाव्दारे करणे करीता सदर कलमा अन्वये महानगरपालिका अधिनियमान्वये गठीत करण्यात येणा-या समित्यांमध्ये महानगरपालिकेतील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना व गटांना खात्रीपुर्वक पुरेसे प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून समित्यांवर बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याची तरतूद करण्यात आली. तसेच रिक्त होणा-या जागांवर राजीनामा दिलेले मा.सदस्य ज्या मान्यताप्राप्त पक्षाचा, नोंदणीकृत पक्षाचा गटाचा आघाडीचा किंवा फ्रंटचा आहे त्याच मान्यताप्राप्त पक्षाच्या/नोंदणीकृत पक्षाच्या/गटाच्या/आघाडीच्या किंवा फ्रंटच्या मा.सदस्यास नामनिर्देशित करावयाचे आहेत.१) मा. बारणे माया संतोष पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टीचे गटनेते तथा सभागृहनेता मा.नामदेव ढाके यांनी त्यांच्या पक्षाचे १ सदस्यांचे नांव बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी मा.महापौरांकडे द्यावेत. (बंद लखोटा देणेत आला.)

मा.महापौर यांनी बंद लखोटा सर्वांसमक्ष उघडला आणि त्यामध्ये असणारे नांव श्री.किरण गायकवाड, यांनी सभागृहात वाचून दाखविले ते पुढीलप्रमाणे- १) मा.तुषार रघुनाथ हिंगे पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी.

ठराव क्रमांक -६०३ विषय क्रमांक – २
दिनांक –९/३/२०२१ विभाग – मा.आयुक्त

मा.बारणे माया संतोष यांनी शिक्षण समिती सदस्य पदाचा राजीनामा दिला असल्याने मा.शिक्षण समिती सदस्यत्वाची एक जागा रिकामी झाली असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१अआणि पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ.चे संचालन करण्या विषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६९मध्ये निर्देश केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृतपक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सदर रिकाम्या जागेवर सभागृहनेता / विरोधी पक्षनेता /पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचार विनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्या बळाच्या प्रमाणात १) मा.तुषार रघुनाथ हिंगे या पालिका सदस्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समिती सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्यात येत आहे.

(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

(नियुक्त समिती सदस्यांचा पुस्तक व फुल देवून सन्मान करणेत आला.)

**मा.राजू मिसाळ** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. अभिनंदनाचा एक ठराव मांडण्यासाठी मी इथे उभा आहे. महाराष्ट्र शासनाच्या नुकत्याच झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये पिंपरी ते निगडी कॉरिडॉर क्र. १ ए या उन्नत मेट्रो मार्गिकेस मा. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री, पुणे जिल्हा यांच्या पुढाकाराने मंजुरी देण्यात आलेली आहे. त्याबद्दल मा. मुख्यमंत्री उध्दवजी ठाकरे व मा. अजितदादा पवार व सर्व मंत्रीमंडळाचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे व पुर्ण महाविकास आघाडीचे अभिनंदन करण्यात येत आहे. त्याच प्रमाणे सोमवार ८ मार्च रोजी राज्याचे वित्तमंत्री मा. अजितदादा पवार साहेब यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पात खालील लोकहिताच्या योजना नव्याने सुरु करण्यात आलेल्या आहेत त्याबद्दलही मा.मुख्यमंत्री उध्दवजी ठाकरे साहेब व मा. अजितदादा पवार साहेब व सर्व मंत्रीमंडळाचे व पुर्ण महाविकास आघाडीचे

हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे. त्यामध्ये जे निर्णय घेण्यात आले त्यामध्ये- १) महापालिका, नगरपरीषदा व नगरपंचायतीमधील दर्जेदार आरोग्य सुविधेसाठी ५ वर्षात ५ हजार कोटी उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. त्यापैकी या वर्षासाठी ८०० कोटी रुपये देणार आहेत. त्याबद्दलही मा. मुख्यमंत्री उध्दवजी ठाकरे साहेबांच व मा. अजितदादा पवार साहेबांच व सर्व मंत्रीमंडळाचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे.२) जिल्हा रुग्णालयामध्ये व वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये पोस्ट कोविड काऊन्सिलींग व ट्रिटमेंट सेंटर सुरु करण्यात येणार आहे. ३) पुण्याबाहेरून अंदाजे २६ हजार कोटी रुपयांचा १७० किलोमीटर लांबीच्या चक्राकार मार्गाची (रिंग रोड) उभारणी तसेच पुणे – नाशिक या मध्यम अतिजलद रेल्वे मार्गाचे कामास मान्यता प्रस्तावित लांबी २३५ किलोमीटर, गती २०० किलोमीटर प्रतितास अपेक्षित खर्च २६ हजार ३९ कोटी रुपयेला मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सर्वात महत्वाच म्हणजे काल महीलादिन होता, महीला दिना निमीत्त एक चांगला निर्णय या मंत्रिमंडळाने महाविकास आघाडीने घेतलेला आहे. राजमाता जिजाऊ गृहस्वामिनी योजने अंतर्गत गृहखरेदीची नोंदणी कुटूंबातील महिलेच्या नावावर झाल्यास मुद्रांक शुल्काच्या प्रचलित दरामध्ये सवलत देण्यात आलेली आहे. या अशा सर्व महत्वाच्या निर्णयाबद्दल मी आज पुर्ण महाविकास आघाडीचे तसेच या महाराष्ट्रचे मुख्यमंत्री आदरनीय उध्दवजी ठाकरे साहेब, तसेच उपमुख्यमंत्री अजीतदादा पवार साहेब या सर्व मंत्रिमंडळाच मी अभिनंदन करतो.

मा.प्रविण भालेकर - मा.महापौर साहेब, आताच याठिकाणी विरोधी पक्षनेते राजू मिसाळ यांनी मांडलेल्या विषयाला मी अनुमोदन देतो.

मा.एकनाथ पवार - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. माझे मित्र राजू मिसाळ यांनी आघाडी सरकारच्या कालच्या बजेटच्या संदर्भामधला या सभागृहात अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला. मी खरतर राजू मिसाळ साहेब आपण ज्या महापालिकेमध्ये काम करतो मला असं वाटतय की राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये गेल्या दोन आठवडे विधानसभेमधल अधिवेशनाच आपण सगळ कामकाज लाईव्ह बघतो. खरच गेल्या वर्षे सव्वा वर्षाच्या काळामध्ये या राज्यामध्ये खरच जनतेच सरकार आहे की नाही अशा पध्दतीची परिस्थिती आहे आणि आपण एखादी दुसरी घोषणा केली त्याच्याबद्दलची या सभागृहामध्ये आम्ही आमच्या सरकारच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडतो अशा पध्दतीची टिमकी खरतर आपण वाजवतो. या राज्यामधील जनता आज आपल्याकड आशेचा किरण म्हणून बघते. गेल्या वर्ष सव्वा वर्षाचा काळ या राज्यामध्ये आघडी सरकारच नाहीतर बिघाडी सरकारच राज्य या राज्यामध्ये काम करतय. आघाडी सरकारचा

ज्यावेळेस तुम्ही अभिनंदनाचा प्रस्ताव मांडता त्याचा निषेध करण्याचा नैतिक अधिकार मला आहे लक्षात ठेवा.

(सभागृहात गोंधळ)

मा.महापौर - सर्वांनी खाली बसावे, प्रश्नोत्तराचा तास चालू होत आहे.

मा.नगरसचिव- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. प्रश्नोत्तरे- मा.तुषार गजानन कामठे, नगरसदस्य यांना विचारावयाचे प्रश्न.

मा.तुषार कामठे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मा.महापौर साहेब आपले मनापासून धन्यवाद. आपण प्रश्नोत्तरचा तास या महासभेसमोर व या जनतेपुढे आणला त्याबद्दल मनापासून धन्यवाद. आज हे प्रश्नोत्तरे घेण्यामागे उध्दिष्ठ म्हणजे ठेकेदारानी महापालिकेची चालवलेली लूट व त्याला काही सन्मा.सदस्य यांचा असलेला पाठिंबा. आज दोन महीने झाले मी महापलिकेला पाच प्रश्न दिले होते. तुम्ही पण पहात असाल की या पाच प्रश्नांचे उत्तर त्यांनी एकदम अत्यल्प दिलेल आहे. एका लाईनीमध्ये एक उत्तर दिलेलं आहे. वायसीएममध्ये दररोज किती ऑक्सिजन वापरला जातो असा माझा पहीला प्रश्न होता. वायसीएममधील जे संबंधित अधिकारी असतील त्यांनी आयुक्त साहेब आपल्या सहीने उत्तर दिलेलं आहे. त्याच्यामध्ये आपण सांगीतल की दिवसाला ३.५ केएल म्हणजेच साडेतीन हजार लीटर ऑक्सिजन युज करतो. हा ऑक्सिजन आहे सहा महीन्याचा म्हणजेच २०२० ते जानेवारी २०२१ पर्यंत. या विषयांची माहीती घेत असताना आयुक्त साहेब २०२० ते २१ मध्ये जेव्हा कोव्हीडच संकट आपल्या शहरामध्ये होतं आणि आपण वायसीएममध्ये फक्त कोव्हीडचे पेशंट ऍडमीट केले होते. वायसीएममध्ये २०२० ते २१ मध्ये २०५६६ पेशंट आपले होते. म्हणजे डेली ७० ते ८० रुग्ण हे आयसीयूमध्ये असतात. ८० रुग्णांना साडेतीन हजार लीटर ऑक्सिजन दिला जातो हे आपल्या महापालिकेच्या रेकॉर्डनुसार मी आपल्याला सांगतो. हे माझ्या मनाचे आकडे नाहीत. जेव्हा आपण वायसीएममध्ये कोव्हीड सेंटर चालू केलं त्याच पध्दतीने जम्बो कोव्हीड असेल किंवा ऍटोक्लस्टर असेल इथेही आपले पेशंट होते. ज्या वर्षामध्ये ८० पेशंटला साडेतीन हजार लीटर ऑक्सिजन लागतो तोच ऑक्सिजन ऍटो क्लस्टरमध्ये १८० पेशंटला १२०० ली. व जम्बोमध्ये ३८० पेशंटला २९०० ली. मग वायसीएममधला ऑक्सिजन जातो कुठे. या वायसीएममधुन जे उत्तर दिल आहे ते हास्यास्पद आहे. ही जी निवीदा होती ती जुलै-२००७ मध्ये आपण प्रसिध्द केली. त्याच ऍग्रीमेंट केल सप्टेंबर- २००७ मध्ये व प्लान्ट आणला २००९ मध्ये. आज

त्या प्लान्टची तपासणी केली असता ऑक्सिजनच पाईपलाईनच काम काढण्याच उध्दिष्ठ शेवटच्या सत्ताधा-यांना काय होतं माहीत नाही मला. तेव्हा संदेश गॅस एजन्सी ही एजन्सी आपल्याला गॅस सप्लाय करत होती तेव्हा महापालिकेला बील येत होत २४ लाख ते २७ लाख. ही गॅस पाईपलाईन लागू करण्याच उध्दिष्ठ होत की महापालिकेची बचत होईल, वायसीएममध्ये पेशंटला ऑक्सिजन दिला जाईल अशा पध्दतीच नियोजन तेव्हा केल होतं.पण २००५ ते २००९ मध्ये ऑक्सिजनची किमंत येत होती २५ ते ३० लाखाच्या आसपास. जेव्हा गॅस पाईपलाईन चालू केली २००९ ते २०१४ जस बँकेमध्ये पंचवार्षीकला पैसे डबल होतात तस इथ झालय, २५ लाखाचे ७५ लाख आणि २०१४ ते २०२० याच बील झालय आडीच कोटी रुपये. म्हणजे किती महापालिकेची लुट करायची हे ठेकेदारांना चांगल माहीती आहे. आज मी आपल्याला सांगू इच्छितो की,२०२० ते २१ मध्ये पेशंट होते फक्त २२ हजार त्याच बील दिल आपल्याला २ कोटी २७ लाख ५४ हजार २३९ रु. २०१९-२० मध्ये पेशंटची संख्या होती २८ हजार त्याच बील दिल १ कोटी ६७ लाख रु. म्हणजे पेशंट वाढल्यावर ऑक्सिजन कमी लागतो का की कमी असल्यावर जास्त लागतो काहीच समजायला मार्ग नाही. आयुक्त साहेब, आपण गांभीर्यांने लक्ष दयाव हा खुप महत्वाचा विषय आहे. या विषयाला अनुषंगून मी आपल्याला सांगू इच्छितो की गॅब कंपनीला महापालिकेनी ऑक्सिजन पुरवठा व मेन्टेनन्सच काम दिलेलं आहे. ऑगष्ठ महीन्यामध्ये पेशंट वाढले होते तेव्हा आपल्या वायसीएममध्ये ऑक्सिजन सप्लाय झाला नाही म्हणून दहा लोकांना जीव गमवावा लागला होता. तो गमवला नाही त्या गॅपनी त्यांची हत्या केली होती. गॅब कंपनीला जेव्हा आपण निवीदा प्रसिध्द केली तेव्हा वायसीएममधुन जी गॅब पाईपलाईन आहे त्यातुन फक्त गॅस हा वायसीएमच्या पेशंटला देणं बंधनकारक होतं. पण या गॅब कंपनीने ज्याचा साईडचा पत्ता आहे सर्व्हे नं. १७२/१७४ ऑक्सिजन प्लॉन्ट, यशवंतराव चव्हाण हॉस्पिटल, संततुकारामनगर. त्यांच हेडऑफिस आहे ५१/४३२ संततुकारामनगर बीहॅण्ड डी.वाय.पाटील. हे बील गॅब कंपनीच आहे, त्यांनी सप्लाय केला आपल्या वायसीएममधुन.जेव्हा ही दहा लोक दगावली त्या दिवशी त्या व्यक्तीनी ८ लाख ८४ हजार ८७६ रुपयाचा ऑक्सिजन स्टार हॉस्पिटलला विकलेला आहे. जेव्हा आक्सिजनची कमतरता होती, आपल्याला ऑक्सिजन भेटत नव्हता तेव्हा या गॅब कंपनीने गॅस विकून आपल्या येथील लोकांचा जीव घेतलेला आहे त्या गॅब कंपनीवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल व्हावा ही मा.महापौर आपल्याला विनंती आहे. अशा ठेकेदारांना पोसण्याच काम महापालिकेमध्ये केल जातय आणि हे आज नाहीतर गेली चौदा वर्षे चालल आहे. रामाचा वनवास संपला होता बारा वर्षात आपला वनवास अजून चालू आहे. या गॅब कंपनीला मुदतवाढ दया म्हणून आतापासून लोक आयुक्तांच्या इथे हेलपाटे मारतात. असे लोकप्रतिनिधी आपल्या

या शहराला भेटलेत हे आमच्या शहराच नशिब म्हणायच की दुर्भाग्य म्हणायच.म्हणजे हे हास्यास्पद उत्तर आपल्या महापालिकेचे संबंधित लोक देत आहेत. याच्यामध्ये माझा दुसरा प्रश्न असा होता की मुळ निविदेमध्ये काय दराने ऑक्सिजन खरेदी केला आणि आता काय दराने खरेदी केला जातो. त्याच्यामध्ये जेव्हा निवीदा प्रसिध्द झाली त्या निवीदेनुसार दर होता २६/- प्रती क्यु.मी. सेकण्ड लोएस्ट जी कंपनी होती तीचा होता ३०/- रु. प्रति क्यु.मी. २००७ मध्ये जेव्हा ही निवीदा प्रसिध्द केली तेव्हा त्याची मुदत होती की चार महीन्यामध्ये प्लान्ट उभा केला पाहीजे. पण हे गॅब वाले महापालिकेचे जावाई आहेत. त्या व्यक्तीनी २००९ साली हा प्लान्ट चालू केला आणि सहा महीन्यामध्ये त्यांनी त्यांच्याच लेटरहेडवर किमंत वाढवून दया अशी मागणी केली. त्याच्यामध्ये कोणाचीही संमती न घेता आपण ही किमंत वाढवून दिली. मग एल-२ ला च काम दयायच होततर याला का दिल आपण. जेव्हा चार महीन्याची मुदत होती त्याला तुम्ही दिड वर्षे लावले. त्याच्यावर पेनॉल्टी पण लावली नाही. किती पाठीशी घालायच, किती हितसंबंध कोणाचे त्याच्यामध्ये दडले आहेत हे या सभागृहाला माहीती आहे. महापालिकेत काम केली आम्ही नाही म्हणत नाहीत. प्रत्येक कोणना कोण आहेत, साडू आहेत, जावाई आहेत, काका आहेत, मामा आहेत मला त्या खोलामध्ये जायच नाही. पण तुम्ही किती लोकांना पाठीशी घालणार. आज २००९ पासून आपण ३०/- ने रेट देतो. जेव्हा कोव्हीडचे दिवस होते तेव्हा जम्बो कोव्हीडमध्ये २४/- रु. क्यु.मी.ने घेतला. कोल्हापूरमध्ये आज पण १४.७५ पै.ने ऑक्सिजन दिला जातो. मग यांनी काय केलय २००९ पासून ३०/- ने रेट देतात आणि या दहा वर्षात १४ कोटी रुपये तुम्ही त्याच बील काढल आहे. किती लोकांना आपण ऑक्सिजन दिला आहे. एवढा ऑक्सिजन लागतो का आणि आपल प्रशासन एका लाईनीमध्ये उत्तर देतय दोन दोन महीने मागणी करुन. आम्ही वायसीएमपेक्षाना आमच्या गोठयामध्ये जनावर आहेत त्यांच्याकड जास्त लक्ष देतो. त्यांची जास्त काळजी आम्ही घेतो. तुम्ही लोक माणसांच्यानावाखाली पैशांची लुट चालवण्याच काम या महापालिकेत चालू आहे. याच्यामध्ये प्रश्न नं.३ असा होता की.मुळनिविदेमध्येकितीवर्षासाठीठेका कालावधी होता आणि तो संपलेनंतर पुन्हा निविदा काढली होती का, काढली नसल्यास त्याची कारणे सांगा. तर आयुक्त साहेब आपल उत्तर एकदम हास्यास्पद आहे ते आयुक्त साहेब ऐका. मुख्य निविदेमध्ये ठेका कालावधी नमूद नाही. कुठलाही कालावधी नमुद नसताना आज चौदा वर्षे या कंपनीला आज चौदा वर्षे आपण का काम देतो. काय हितसंबंध आहे आपला त्याच्याशी, का निवीदा आपण काढल्या नाहीत. अशा पध्दतीने महापालिकेची लुट होत असेल आणि ती आमच्यापुढ होत असेलतर ते कदापि सहन होणार नाही. आयुक्त साहेब आपण जातीने या विषयामध्ये लक्ष दयावे. माझा चौथा प्रश्न होता की ऑक्सिजनची गाडी खाली घेताना तो

पाहणेसाठी कोणत्या अधिका-याची नेमणूक केली आहे. त्याची शैक्षणिक पात्रता काय आहे. उत्तर अस दिल आहे की ऑक्सिजनची गाडी प्लांटमध्ये खाली करताना पाहणेसाठी स्वतंत्र अधिका-याची नेमणूक केलेली नाही. तथापि गॅस टँकरचे वजन करणे व तसा दाखला देण्याची जबाबदारी वायसीएम रुग्णालयातील भांडार विभागाकडे सोपविण्यात आली आहे. आपल्याकडे एवढी सक्षम लोक नाहीत का. ऑक्सिजनची गाडी खाली होतानाही पाहीला आपले लोक नसतात का महापालिकेकडे पैसे नाहीत. आयुक्त साहेब, आपण याच्यामध्ये जातीने लक्ष दया. तीथ फक्त गॅब कंपनीचा माणूस बसतो जे आम्हांला सांगीतल भांडार विभागामध्ये नोंद केली जाते. तीथ नोंद केली जाते फक्त ऑक्सिजन आलेली. ऑक्सिजनचा किती पुरवठा झाला याची नोंद आपल्याकडे नाही. महापालिकेनी दिलेला अहवाल माझ्याकडे आहे. हे भांडार विभागामध्ये आपण जमा केलेल सिट. किती गाडया येतात याची फक्त नोंद आहे. या गाडयामधुन ऑक्सिजन जातो कुठ याची नोंद नाही. किती ऑक्सिजन जातो याची नोंद नाही. जेव्हा दहा लोक दगावली तेव्हा मी स्वत: तीथ पीपीपीकीट घालून गेलो होतो तेव्हा संबंधित गॅब कंपनीचे लोक मला भेटले. त्यांच्या आता एवढया हिम्मत वाढल्यात की लगेच हाम साथ साथ हैं. लगेच चालू होती त्यांची ऑफर. अशा लोकांना आपण काम देता. आज आपल्या महापालिकेच्या वायसीएमला दिवसाला ऑक्सिजनची गाडी येते व ती खाली होते आपल्या टँकमध्ये आपण बील देतो खाली केलेल्या ऑक्सिजनच आणि सिलेंडरमध्ये तोच ऑक्सिजन घेवून तो प्रायव्हेटला विकला जातो व त्याची बीलही आपल्याला देतो अशा लोकांना अजून मुदतवाढ दयायची आणि अशा लोकांसाठी आपण हाट्ट पकडायचा हे एकदम चुकीच काम आहे याची दखल तुम्ही घेतली पाहीजे. गॅब कंपनीला महापालिकेचा ऑक्सिजन विकण्याचा अधिकार नाही, त्यांनी ऑक्सिजन विकलाय माझ्या शहरातील दहा लोकांचा जीव घेतलाय त्याच्यावर तुम्ही गुन्हा दाखल केलाच पाहीजे. माझा पाचवा प्रश्न होता की प्रत्यक्ष वापरण्यात येणा-या ऑक्सिजनचे रेकॉर्ड कसे ठेवले जाते. याच उत्तर भांडार विभागाने दिलेलं आहे की प्रत्यक्ष वापरण्यात येणा-या ऑक्सिजनचे रेकॉर्ड भांडार विभागाकडील दैनंदिन साठा नोंद रजिस्टर क्र.११६ मध्ये ठेवली जाते. म्हणजे फक्त गाडी आल्याची नोंद तो किती दिला जातो, काय दिला जातो, कसा दिला जातो याचा काही ताळमेळ आपल्या जवळ नाही याला जबाबदार कोण. आयुक्त साहेब तुम्ही सुध्दा या उत्तरावर सही देता.एका वाक्यात उत्तर दिलेले आहेत. तुम्ही लक्ष दया हे प्रशासन एकदम गेंडयाची कातडयाच आहे. अशा लोकांना आपण पाठीशी घालतो. गॅब कंपनीवर तुम्ही गुन्हा दाखल केलाच पाहीजे, त्याना ब्लॅक लीस्टमध्ये टाकल पाहीजे. आयुक्त साहेब, गॅब कंपनीच्या कामगारांची यादी मागवा त्यांच क्वॉलीफिकेशन काय आहे ते लक्षात येईल, कुठल्या लोकांना आपण काम देतो. पुर्व आपले लोंढे साहेब पाहत होते ऑक्सिजन किती आला किती गेला

ते. त्यांच काही बहुतेक जमल नसेल साठलोट त्यांच्याशी किंवा तो विषय त्यांनी मान्य केला नसेल किंवा मागणी जास्त केली असेल म्हणून त्याला तीथून काढून टाकल. गॅब कंपनीचेच लोक आज आपल मस्टर आपली जी पुस्तीका आहे ते त्याच्यामध्ये नोंद करतात. अशा पध्दतीने महापालिकेच कामकाज चालत असेलतर सामान्य जनतेनी कुणाला पाहून मतदान दयायच कुणला इथ निवडून दयायच. जुन्यानी केल असेल, आमच्याकडून ते होणार नाही हे लक्षात ठेवा. निवीदेमध्ये नसताना सुध्दा दहा दहा वर्षे तुम्ही टेंडर देताना हे चुकीचे काम जी चालली होतीना ते खपवून घेतली जाणार नाहीत. आयुक्त साहेब आज आपण यावर खुलासा केला पाहीजे. तुम्ही या गॅब कंपनीच काय करणार हा तुमचाच खुलासा आम्हांला पाहीजे. ज्याला मेन्टेनंन्सच काम दिलं तो म्हणतो ऑक्सिजनच काय करु प्रेशर कमी झाला. ६०० रु. फुटानी पाईपलाईनचे पैसे दिले आहेत आम्ही, ते पण कुठली निवीदा न काढता. साडेपाचशे रेट होता तु मागणी केली सहाशे दया, सहाशेनी आपण दिलेत, ते आपले जावाई आहेतना.अशा पध्दतीने महापालिकेची काम होत असतीलतर आणि त्याला आपण लोक खतपाणी घालत असूतर हे कितपत योग्य आहे. आयुक्त साहेब आपण मला खुलासा दयायचा आहे व मला पुन्हा याच विषयावर बोलायच आहे. मला खुलासा पाहीजे मग मी पुढच्या प्रश्नावर बोलायच आहे.

मा.नामदेव ढाके - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. याठिकाणी वायसीएमचे प्रश्न तुषार कामठे यांनी दिलेले आहेत. सन्मा.सदस्यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी एका ओळीत उत्तर दिलेली आहेत. त्यांनी सांगीतल २००७ ला काय झाल, २००९ ला काय झालं नंतर दहा वर्षात किती बील झालं. या संदर्भात सविस्तर खुलासा मा.महापौर साहेब, आपण आयुक्तांना दयायला लावावा अशी माझी विनंती आहे त्यानंतर त्यांच्या भूमीका ते मांडतील. तरी आपण आयुक्तांना खुलासा करण्याच सांगाव.

मा.महापौर - आयुक्त साहेब, कामठे साहेबांनी जे काही प्रश्न विचारलेले आहेत त्याचा अगोदर खुलासा करावा. सभागृहात गोंधळ करु नका खुलासा देण्यात येत आहे सर्वांनी खाली बसावे.

(सभागृहात गोंधळ)

मा.वैशाली घोडेकर -मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका.मा.महापौर खरच हे आरोप सत्य असतीलतर मी नक्कीच अभिनंदन करेल. पण मला एवढ म्हणायच आहे की तुम्ही जे एवढे मोठे आरोप करता की दहा लोक दगावली, दहा

लोक दगावून तुम्ही इथे शांत कसे काय. अजून चौकशीचे आदेश का देण्यात आले नाहीत. आमच्याकडन काही चुका झाल्या म्हणून तुम्हांला सत्ता मिळाली. गेल्या चार वर्षे झोपले होतात. ही गॅब एजन्सी २००६ पासून २०१९ पर्यंत चालू आहे मग ते तुम्हांला आजच दिसल का. एवढी वर्षे तुमच्या हातात सत्ता आहे मग तुम्ही झोपला होतात का. त्याचवेळेस तुम्ही का नाही रेटसच काढल, त्याचवेळेस तुम्ही का नाही केलं. मा.महापौर साहेब, खरच गंभीर आरोप आहे, माझ म्हणण असे आहे की जे दहा लोक गॅस मिळाला नाही म्हणून दगावली त्याची चौकशी झाली पाहीजे. मा.महापौर साहेब, माझही हॅस्पिटल आहे माझ्याही इथे गॅस सिलेंडर आहे. गॅस संपला तो व्यवस्थित चालतो की नाही ही जबाबदारी कुणाची आहे. त्या दहा लोकांची अजूनपर्यंत चौकशी का नाही लावली. आणि जर हे दहा लोक दगावली असतीलतर सत्ताधारी काय झोपा काढतात का. माझ्या हॉस्पिटलमधला गॅस संपलातर ती जबाबदारी माझी आहे. हा गंभीर आरोप आहे याची चौकशी झाली पाहीजे. या दहा लोकांची जबाबदारी कोणावर याचा खुलासा दिला पाहीजे.

मा.अंबरनाथ कांबळे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका.वायसीएमचा विषय आता माझे मित्र तुषार कामठे यांनी काढला, मी सर्व नगरसेवकांना सांगु इच्छितो की विषय निघाला की आपण इथ एकमेकाच्या विरुध्द बोलण्याचा प्रयत्न करतो. ९ ऑगष्टला माझी आई मी वायसीएमला ऍडमीट केली होती. वायसीएम क्र.२ मध्ये होती, माझी आई आयसीयूमध्ये होती शेजारी एक ताराबाई शिंदे नावाची माझ्या आईसारखीच महीला ऍडमीट होती. एकूण तीथ बारा पेशंट होते. त्या बारा पेशंटवर उपचार करताना आधुनमधुन मी माझी आई तीथ असल्यामुळे जायचो. ती शिंदेआई मला सारखी म्हणायची बाळा तू कुठून आला. ती पण आपल्या पिंपरी चिंचवड महापालिकेचीच माता होती. वायसीएमची आज इतकी बेकार परिस्थिती आहे की आपले तीथ डॉक्टर किती आहेत, शिंदेआईचा मुलगा मला भेटला आणि म्हणाला की तुम्ही कोण आहेत हो. तुम्हांला आतमध्ये सोडतात आणि आम्हांला सोडत नाहीत. मी म्हणालो मी नगरसेवक आहे म्हणून मला सोडतात. त्यांनी खाली एका डॉक्टरला विचारल की माझ्या आईची तब्येत कशी काय आहे तर त्या डॉक्टरांनी सांगीतल की तुमची आई बरी आहे एकदम व्यवस्थित आहे. मी सकाळी सात वाजता जायचो तर त्याची आई वारलेली होती आणि परत त्यांनी बारा वाजता विचारल की माझी आई कशी आहे मी त्या डॉक्टरच नाव घेत नाही आणि त्या डॉक्टरानी त्याला उत्तर दिल की तुमची आई एकदम व्यवस्थित आहे. तरी या वायसीएमची एवढी बेकार परिस्थिती आहे. वायसीएमची खरेदी कशी

होती, वायसीएमची परिस्थिती काय आहे, आयसीयूची परिस्थिती काय आहे हे पहा आणि माझी एक विनंती आहे सभागृहाला आयुक्तांना आणि महापौर साहेब तुम्हांला की आपण जस शिक्षणमंडळावर नऊ सदस्य घेतोना तसे सर्वपक्षीय नऊ सदस्य तीथ निवडा म्हणजे आपल्याला कळेल की किती डॉक्टर काम करतात, आपण किती त्या वायसीएमला सुविधा देतो. मी विनंती करतो की सर्वपक्षीय नऊ सदस्य निवडा वायसीएमवर म्हणजे आपल्याला कळेल की आपल्या वायसीएमला किती बजेट लागत. खरेदी खरच होती का ते डॉक्टर येतात का, ते उपचार करतात का. मला बोलण्यास दिल्याबद्दल माई तुमच आभार मानतो.

मा.मंगला कदम - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका.मी तुषारच अभिनंदन करेल, मागे पण एकदा तुषारच अभिनंदन केल होतं. त्यांनी आता जे जे खुलासे केलेत म्हणजे आम्ही खरच विरोधात गेलो ते बरं झाल तुम्ही काय काम करता हे चार वर्षात आम्हांला कळाल. कारण २००७ पासून ती गॅब कंपनी त्या वायसीएम मध्ये काम करते आणि हे करत असताना त्यांनी हे डिटेल्स दिले आहेत याची जबाबदारी कुणाची आहे. मा.महापौर तुम्ही जर तुमच्या वॉर्डातल एखाद काम सांगीतलतर तुम्ही तुमच्या हाता खालच्या अधिका-यांना बोलावून घेता मग काय तुम्ही लिहून देता, तुम्ही सही करता, नाही. मग स्थापत्य विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी तुमच काम किती कोटीच आहे किती लाखाच आहे ते काढायच काम त्याच आहे त्याच इस्टीमेट करायच काम त्याच आहे त्या कामामध्ये काय काय गोष्टी करायच काम त्यांच आहे तुमच नाही. तुम्ही फक्त ऑर्डर देता मग हे काम करत असतानी जी कोण कंपनी अशी आहे की त्यांनी असं सांगीतल सिलेंडरचा रेट इतका, ठिक आहेना पुर्वीचे जे कोण असतील त्यांच्यावर पण तुम्ही कारवाई करा. कुणीच म्हणणार नाही कुणावर कारवाई करु नका म्हणून. मी शंभर टक्के अस सांगणार सगळयावर कारवाइ करा. ही कारवाई करत असताना त्यांनी एवढा मोठा गौप्यस्फोट केला आहे की दहा लोक गेले. तुषारजी तुम्ही दहा लोक गेले त्यावेळेला आम्हांला जरी सांगीतल असतंतर अंदोलनाला तुमच्या बरोबर मी आले असते. तुम्ही तीथ पीपी कीट घालून गेले, मी विकतच पीपी कीट घालून तीथे आले असते. पण इतक्या दिवस झाल्यानंतर तुम्ही आजपर्यंत गप्प का बसले हे फार मोठ प्रश्नचिन्ह आहे. ठिक आहे कधी कधी माणसाकडून दुर्लक्षीतपणा केला जातो म्हणून ते गप्प बसले असतील. पण मा.महापौर साहेब त्यांनी लेखी प्रश्नोत्तर मागीतली म्हणजे याच्या आदि सुध्दा त्यांनी खुप फॉलोअप घेतलेला असणार आहे. आयुक्त साहेब तुमची सही या महापालिकेमध्ये कुणीही करु शकतं, सावध राहा.नवीन आहात. सर्व्हेअर अति.आयुक्तांची सही करु शकतोतर तुमची सही का नाही करु शकणार. मी पुराव्यानिशी बोलते म्हणून तुम्ही सावध राहा. परंतु हा मोठा जर का घोटाळा असेलतर याच्यामध्ये जेवढे डॉक्टर्स असतील यांना

घरी पाठवा. यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करा आणि त्यांच्या म्हणण्याप्रमाणे जर खरोखर त्याच्यामध्ये कुठली कंपनी सामील असेलतर त्यांनापण घ्या. मनुष्यवधाचा गुन्हयाची त्यांनी मागणी केलेली आहे. आम्ही विरोधात आहेत पण सत्ताधा-यामध्ये तुषार आहे मी त्यांच्या बरोबर आहे. आता अंबरनाथनी सांगीतल ती बाई सकाळी गेलेली असताना बारा वाजता सांगतात तरी सगळ आलबेल. म्हणजे या वायसीएममध्ये चाललय काय. कोणाच संगनमत आहे. आजपर्यंत आम्ही कोणत्याही अधिका-यांना दोष दिलेला नाही. आम्ही जर गप्प बसलोतर आम्ही त्यात सामील आहे असा अर्थ होईल. आम्हांला अजीबात सत्ताधा-यांनी काढलेल्या विषयाला माझा पुर्णपणे पाठींबा आहे. याची सगळी चौकशी झाली पाहीजे. याच्यावर नुसते नऊ लोक घेवून चालणार नाही अंबरनाथजी हे लक्षात घ्या. या नऊ लोकांना सुध्दा कोण गुंडाळून ठेवेल. तुम्ही आता चार वर्षे झाल काम करतात काय झाल. आज वायसीएममध्ये पेशंट आलेला असेलतर त्याची जबाबदारी कोणाची आहे. वायसीएममध्ये आत पेशंट नेऊन सोडल्यानंतर त्याची जबाबदारी कोणाची आहे, मंगला कदमची आहे का. याच्यावर पुढच्या ज्या गोष्टी अवलंबून असतील त्या जबाबदारीला कारण कोण आणि खाडाखोड करणारे अधिकारी यांना काय करणार ते सांगा. किमान माझ स्वत:च मी मंगला कदम आहे आणि माझी जर दोन ठिकाणी सही केलीतर चालणार आहे का. मा.महापौर मी तुमची सही केलीतर चालेल का. हे अधिका-यामध्ये सगळ असं चालू आहे. विरोधकानाही सांगेल की अभिनंदनाचा ठराव करताना .... विधान सभेमध्ये एक जण बोलत असताना कधीही दुसरा बोलत नाही. प्रत्येकाला मत मांडायचा अधिकार आहे. तुम्ही बोलताना आम्ही बोललो नाहीत, आम्ही बोलताना तुम्ही बोलल नाही पाहीजे. तुम्हांला काय मत मांडायच आहे ते मांडा परंतु ज्यावेळेला अशी परिस्थिती येते, चांगल काम केल त्याचही मांडायच नाही. अभिनंदनाचा ठराव होता पुर्वीपासूनची मेट्रोची आम्ही मागणी केली. आम्ही सत्तेत असताना सुध्दा आम्ही सांगत होतो खेळण्याची मेट्रो आम्हांला नकोय. आमची तर मागणी निगडीपर्यंत होतीच होती परंतु गव्हूंजे पर्यंत होती. शहर वाढलेल आहे आणि शहर वाढल्यानंतर इन्टरनॅशनल लेव्हलच क्रिकेट मैदान तीकड झालेल असेलतर गव्हूंजे पर्यंत सुध्दा झाली पाहीजे. आज ना उदया तो भाग सुध्दा आपल्याकडे येणार आहे. मग गव्हूंजेपर्यंत का नको आज पुन्हा तो भाग सुध्दा आपलयाकडे येणार आहे. पुढचा सेकंण्ड टप्पा गव्हूंजेचा असावा अशी सुध्दा मागणी केलेली आहे. ज्यावेळेला तुम्ही नवीन सभागृहात आला होता त्यावेळेला प्रत्येकाच्या वाक्यामध्ये प्रत्येक नेत्यांच नाव होतं. प्रत्येकजण टाळया वाजवायचे कधीही आम्ही त्याला विरोध केला नाही. आम्ही कधीही म्हणल नाही की तुम्ही यांच नाव का घेता त्यांच नाव का घेता. प्रत्येक व्यक्तीला स्वत:च्या नेत्यांचा आदर असतो.

तुम्ही नाव घेतलतर आम्ही तुम्हांला कधी विरोध नाही केला. आज तुषारनी जर विषय काढलातर मंगलाताईना वाईट वाटायच काही कारण नाही. मंगलाताईनी चांगल्या कामाला सपोर्टतर केलाच पाहीजे. मा.महापौर आयुक्ताना सरळ आदेश दया की हे चाललय काय जर हे अस चालत असेलतर ऑक्सिजनमध्ये जर एवढी हेराफेरी चालत असेलतर, ते जावाई होते का स्टार हॉस्पिटलवाले कोरोनाच्या काळामध्ये त्यांना ऑक्सिजन  दिला. सकाळी संध्याकाळी पहाटे ते सिलेंडर बदलले. कोणासाठी दिले, का दिले आज का विषय आला हा मग त्या दिवशीच का नाही बोलले गेले. कोरोनाच्या काळामध्ये कुणीतरी आपल्यातीलच लोकांनी म्हणल असेल की तीथ सिलेंडर दया म्हणून पेशंटला ऑक्सिजन मिळत नाही म्हणून शेवटी ते सुध्दा कुठेतरी पिंपरी चिंचवडचेच असतील, म्हणून आम्ही गप्प बसतो दरवेळेला.कुठल्याही शाळेतील मुल कुठल्याही शाळेत शिकतात परंतु आम्ही अंस म्हणत नाहीत, पण शाळा चांगली आहेना आम्हांला ऍडमीशन मिळाल नाहीतरी हरकत नाही परंतु आमची शाळा ही टिकली पाहीजे, कारण पिंपरी चिंचवडमधील मुल त्या शाळेत शिकतात. तसे कुठलही हॉस्पिटल असू देत. कोरोनाच्या काळामधे भ्रष्टाचाराच तर काही विचारुच नका. सगळयाकडे पुस्तकची पुस्तक आहेत. आणि म्हणून मा.महापौर साहेब, यांनी जर थेट खुलासा केलेला असेलतर यांच्याकड रायटींगमध्ये असेलतर या कंपनीच सगळ बघीतल गेल पाहीजे. आडीच आडीच कोटी, पाच-पाच कोटी आहो आमचे पिंपरी चिंचवडचे करदाते आहेत की ज्यांच्या कोरोनामध्ये नोक-या गेल्यात, दोन टाईम जेवायला मिळत नाही आणि ही कुणाची बील आणि कुणाची पोट भरतात आणि कशासाठी भरतात. पाच-पाच कोटीची बील डोळे झाकूण देता. आयुक्तांचे आदेश होते कोणत्याही पध्दतीने बील रिलीज करु नका,  कोणताही धोरणात्मक निर्णय घेवू नका म्हणून तरी सुध्दा दिले. हा महापालिकेचा पैसा आहे हा स्वत: कुणी खीशातून आणलेला नाही उलटा पगार म्हणून सगळे अधिकारी घरी घेवून जातात अधिकारी साहेब. माई, तुम्हांला मानधन एवढूसच आहे मोहरीच्या दाण्याइतकं. अधिका-यांना पगार किती आहे आकडे बघा. तुम्ही गेल्या का कधी फॉरेन टूरला, नाही गेल्या. मला माहीती आहे माई तुम्ही माईच आहात. तुमच्या नावात माई आहे. तुम्ही शहराची काळजी करता म्हणून तुम्ही नाही गेलात. आमच्या अधिका-यांचे किती टुर झाले आहेत ते काढा. त्यांना कुणी काका मामा म्हणणारे नाही का. ते गेले परंतु तुमच्यातली माणुसकी ही जगाला दिसलीना की तुम्ही नाही गेल्या, हेच नातं सभागृहामधल आणि शहरामधल हे जे तुम्ही आम्ही जपतो तर हे जपल गेल पाहीजे. लोकांचा कररुपी आलेला पैसा कसा खिरापतीसारखा वाटतात. हे बघा आकडेच आकडे आणि याची टोटल मारा. शहरातील करदात्यांचे पैसे म्हणजे काय चिंचोके आहेत का. आमच्या शहरातील माणसाना याच्यातून काय मिळालं. कोणत्याही दवाखान्यात जा पैशे मागतात, वायसीएमसुध्दा. आख्ख वायसीएम

सुध्दा फ्री करा. कोरोनाचे इंजेक्शन रेमीडेसिव्हर दोनच मिळणार चार बाहेरुन आणा ही कुठली पध्दत. परवाचा ऍटोक्लस्टरचा किस्सा आहे, पेशंटच्या नावासकट सांगेल. मग मी शेवटी वायसीएमला फोन लावला. असं असेलतर आमचा पेशंट वायसीएममध्ये दया पेशंटची परिस्थिती गरीब आहे आम्ही पुढची चार इंजेक्शन पण देवू शकत नाहीत आणि पहीले दोन पण देवू शकत नाहीत. मी सांगीतल पहीले दोन देवून घ्या मग बघु बरे वाटते का ते मग त्याच्या पुढची परिस्थिती काय आहे ते बघु या. बोगस रिपोर्ट, बोगस डॉक्टर. या सगळया गोष्टीला काय म्हणायच. खरच अंस वाटल मनामध्ये कि आपण सत्तेमध्ये नाहीना लोकांना एकदा कळून तरी चुकलय की सत्ताधा-यांच काय काय चाललं आहे ते. अशा प्रकारे शहरामध्ये काम चालल असेलतर करदाते कधीही माफ करणार नाहीत. करदात्यांचा कोणी विचार केला का, करदात्यांना कोणी असं म्हणले का वर्षाचा टॅक्स आम्हांला देवू नका म्हणून. केला का असा ठराव का कुणी अधिका-यांनी एखादया नगरसेवकाला पेज लिहून दिल की तुम्ही मागणी करा असा चांगला ठराव आम्ही नाही देणार.उपसूचना अधिका-यांकडनच येतात मग असं चांगल काम का शहरासाठी केल गेल नाही. हे जर कोरानाच्या कालावधीमधला एक वर्षाचा टॅक्स नागरीकांचा माफ केलाना तर लोक माई अक्षरश: तुम्हांला डोक्यावर घेतील. मी मांडते ठराव की कोरोनाच्या काळातील घेवू नका एक वर्षाचा टॅक्स. तुषार सारखा राजकारणात येवून चार वर्षे झाले आहेत अशा मुलांनी हे कढलना आणि तुम्ही गप्प बसता हे विशेष आहे. माझ्या महीला भगीनी पुढे बसलेल्या आहेत किती विशेष आहे. ताटातला वाटीत, वाटीतल ताटात ताटातल चमच्यात, चमच्यातल घशात अशी परिस्थिती चालू झाली आहे. मला माहीती आहे आता त्याच बोलणार आहेत.आयुक्त साहेब अशी परिस्थिती आहे तुम्ही सकाळी उठल्या पासून शहरात फिरा, कुठे काय चालल आहे ते बघा. सध्याच्या कोरानाच्या परिस्थितीत कुठ काय चालल आहे ते पण बघा. कोरोना आजही आपल्यावर एकदम झडप घालून आहे. आजची परिस्थिती कोरोनाच्या बाबतीत वाईट आहे, पिंपरी चिंचवडचा आकडा कधी झपकनी वाढेल. त्याच्यामध्ये खरोखरचे रिपोर्ट देतात का ते पण बघा. आयुक्त साहेब कोरोनाच्या बाबतीत थोडीशी तुम्ही कडक भूमीका घ्या. हे तर चाललच आहे याच्यावर तुम्हांला कारवाया कराव्याच लागतील. परंतु कोरोनाचाबाबतीत शहरात मोठा आ वासून प्रश्न उभा आहे. आज पिंपरी चिंचवड शहर हे आमच आहे आणि पिंपरी चिंचवडचा प्रत्येक नागरीक हा सेफ राहीला पाहीजे त्यासाठी आपण काय उपाययोजना केल्या पाहीजेत. गॅसचा सप्लाय तुम्ही केला मग तो कुणी बघुन घ्यायचा महापौरांनी बघायचा का. सिलेंडरची गाडी खाली होत असताना जो कोणी तीथे होता त्याला विचारले पाहीजे. यात जेवढे जेवढे आहेत त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करा आणि यांच्यावर सगळया प्रकारच्या कारवाया केल्या

पाहीजेत. मास्कच्या बाबतीत मला जे चुकीच दिसल ते बोलणार, नंतर सगळी चौकशी केल्यानंतर एका ठेकेदारावर कारवाइ केली आणि ज्या ठेकेदारांनी मास्क दिले होते सॅम्पल तो तर विचारुच नका तो अलबेलच. म्हणजे काय कसायला गाय धार्जीण म्हणतात तशी परिस्थिती आहे इथे. आज सिलेंडरच काढल मग या सिलेंडर मध्ये कोण कोण आहेत हे सगळे सांगा, ठेकेदाराला मी मुळीच पाठीशी घालणार नाही. ठेकेदार आणि त्याच्या बरोबर सगळे पाच पन्नास डॉक्टर, अधिकारी हे सगळे कामाला इथे लागले पाहीजेत. याच पध्दतीने मा.महापौरांनी आदेश दिला पाहीजे. मी तर जाहीर सभागृहात बोललेले आहे मी विश्वास ठेवते पत्रकारांवर मी विश्वास ठेवते नागरीकांवर की जर कोणी अधिकारी असे डेअरींग करत असतील खाली पद वेगळ आणि सही करणारे जर कुणी असतीलतर त्याला घरी पाठवल्या शिवाय साहेब तुम्ही गप्प बसू नका एवढच या प्रसंगी सांगते. माई, विषय फार गंभीर आहे आणि सत्ताधारी तुषारनी काढलेला विषय आहे. यावर सगळयांना बोलू दयात काय कुणाच्या मनात आहे ते सांगू दयात मला जे माहीत आहे ते त्यांना नसेल त्यांना याच्यापेक्षा वेगळ माहीती असेल. सगळयाना बोलू दिल पाहीजे आणि जो झालेला भ्रष्टाचार आहे तो पुर्णपणे बाहेर निघाला पाहीजे एवढीच माझी विनंती आहे. आणि मी असा ठराव मांडते की पिंपरी चिंचवडच्या नागरीकांना कोरोनाच्या काळातील करामध्ये एक वर्षाची सवलत दयावी.

मा.वैशाली घोडेकर - आताच जो ठराव मांडला त्याला अनुमोदन देते.

मा.सिमा सावळे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. प्रथमत: तुषारच प्रश्न विचारल्याबद्दल अभिनंदन. एकीकडे कोरोनायोध्दा, कोरानायोध्दा म्हणून संपुर्ण शहराने डोक्यावर घेतलेले सर्व डॉक्टर्स आणि वायसीएम, महीनाभर पण झाला नाही की आपण यांचा सत्कार करुन. त्यांनी चांगल काम केल, आहोरात्र त्याठिकाणी काम केलं, स्वत:च्या जीवाची परवा न करता काम केलं, सिमेवरती जसे जवान लढतात तसं त्यांनी काम केलं, किती किती किती उपाध्या, किती कविता आपण गायल्या होत्या. डॉ.वाबळे आपण याठिकाणी आहात, डीन आहात कोराना काळाच्या दरम्यानच आपल्या सगळयांचा परमनन्टचा विषय सुध्दा या सभागृहात आला होता.आम्ही सत्ताधारी जरी असलो, मंगलाताई तरी चुकीच्या कामाना विरोध करणारे पहीले सत्तेतले विरोधक आम्ही आहोत आणि निश्चितपणे ती जबाबदारी आम्ही अत्यंत गंभीरपणे आणि जबाबदारीने पार पाडली. मा.महापौर साहेब, आता याठिकाणी गॅस पुरवठा करणारी जी कुठली यंत्रणा असेल मग तो गॅब वाला आहे का अजून कोण आहे हे मला माहीत नाही, तो खरच काय काम करतो. या सभागृहातले सत्तर ते ऐंशी टक्के लोक अनभिज्ञ आहेत त्या विषयांवर. सर्वात गंभीर आरोप जर झाला एकतर स्टार हॉस्पिटलला

दरम्यानच्या काळामध्ये त्यांनी जो गॅस दिला. स्टार हॉस्पिटलला डॉ.अमीत वाघ आहेत व तेच अमीत वाघ आपले वायसीएमला सुध्दा आहेत. असंतर काही नाहीना की वायसीएममधले आपले काही पेशंट सिरीअस झाले किंवा सिरीअस पेशंट होते आणि म्हणून ते स्टार हॉस्पिटलला शिफ्ट केले आणि त्याठिकाणी गॅसची गरज पडली असेल, ही शक्यताआहेखरनाही, शक्यताचअसेल. दुसर असं की त्याठिकाणी असणा-या डॉ.अमीत वाघ यांनी त्यांच्या पदाचा दुरुपयोग केला, आम्हांला माहीती नाही, आम्हांला माहीती नाही, परंतु हे जर असेल आणि डॉ.वाबळे आपण डीन आहात तुमची खरी जबाबदारी आहे दहा लोक गॅसच्यामुळे एक्सपायर झालेत का, मृत पावलीत का हा आरोप भारतीय जनता पार्टीवरती आहे. संपुर्ण देशामध्ये ज्या ज्या ठिकाणी भारतीय जनता पार्टीची सत्ता आहे त्याठिकाणी सगळीकडे हा आरोप आहे आमच्यावरती आणि हा जर खरा असेलतर आणि मा.महापौर साहेब, वायसीएमचे सगळे डॉक्टर आपण बरखास्तीचे आज याठिकाणी ठराव घेतला पाहीजे, हे जर खर असेलतर. त्याठिकाणी  जे कोणी अधिकारी आहेत ते बरखास्त केले पाहीजे. आयुक्त साहेब तुमच प्रशासन आहे. तुम्हीतर टिमकी मिरवताना प्रशासनाची तर तुमचच प्रशासन आहे, तुमच्या प्रशासनाला जाब विचारायची जबाबदारी सुध्दा तुमची आहे आमची नाही. पण सत्ताधारी म्हणून जर आमच्यावर कलंक लागणार असेलतर इथ आम्ही शांत राहणार नाहीत. डॉ.वाबळे तुमची जबाबदारी आहे आणि अत्यंत जबाबदारीपुर्ण याठिकाणी तुम्ही निवेदन करायच आहे. अत्यंत जबाबदारीपुर्ण. खरच ते दहा पेशंट गॅसमुळे मृत पावलेत का. मा.महापौर साहेब, गेलेले जे दहा पेशंट असतील त्यांच्या सगळया कुटूंबीयांना, जस एखादा अधिकारी कामावर असताना कोरोनाकाळामध्ये मृत पावलातर पन्नास लाख ते एक कोटी पर्यंतच शासनाने धोरण ठेवल होत तस धोरण सुध्दा आपण याठिकाणी सुध्दा राबवाव, तर ती दहा लोक कोण आहेत त्यांची नाव सुध्दा पाहीजेत आणि खरच ते त्यांना श्वासोश्वास घेण्यासाठी गॅस कमी पडला का आणि त्यामुळे ते गेलेत का. गॅस कमी पडला असेलतर इतकी इन्टरनल माहीती तुषार कामठे यांना मिळाली कशी. ही माहीत तुषार कामठेकडे आली कशी.  ते सांगतात त्याठिकाणी ते पीपीई कीट घालून गेले होते. होय गेले होते त्या दिवशी त्यांचे वृत्तपत्रामध्ये मी फोटो पण पाहीले होते. ते त्याठिकाणी आले तुमच्याशी बोलले अजून कुठल्या डॉक्टराशी बोलले आणि ते बोलले असतील त्यांचा संवाद झाला असेल आणि त्यांनी खरी परिस्थिती निदर्शनास आणुन दिली असेलतर त्याच्यावरती आपण काय कारवाई केली. उदया पेपरला एकच बातमी असेल भारतीय जनता पार्टीच्या काळात दहा लोकांच्या मृत्यूला जबाबदार भारतीय जनता पार्टी. तुमची आमची सगळयांची तोंड आमची काळी. म्हणजे ज्या ताकदीने कोरोनाच्या काळात आम्ही काम केल ते सगळ झिरो झालं, तस ते जर खरं असेलतर. ते जर खर असेलतर. त्यामुळ तुमची जबाबदारी

फार जास्त आहे. वायसीएमला काय चालतं ते अंबरनाथदादानी सांगीतल की पेशंट गेला होता. ते नगरसेवक आहेत त्यांचा स्वत:चा अनुभव होता ते स्वत: तीथ गेले होते. त्यावेळी ज्या डॉक्टरांनी असा हलगर्जीपणा गेला असेलतर त्यांच्यावरती आपण काय कारवाई करणार आहात. माझी अंबरनाथ दादांना विनंती आहे की असा जो कोण डॉक्टर होता त्या डॉक्टरांच नाव तुम्ही आयुक्तांना भेटून सांगा. त्यांच्या बद्दलच पत्र दया त्या डॉक्टरांना घरी बसवलेलं बरं. आम्ही डॉक्टरांकडे देवदूत म्हणून पाहतो. एक जन्म आम्हांला आमच्या आई वडीलानी दिला आणि दुसरा पुर्नजन्म हा डॉक्टर देतो असं आम्ही मानतो,आम्हीच नाहीतर संपुर्ण जग मानतं. असं काही घडल आहे कारण की स्वत: अंबरनाथ तीथे होते तर त्यांच्यावरती तुम्ही काय कारवाई करणार. मा.महापौर साहेब, याठिकाणी या विषयाची आपण अत्यंत गंभीरपणे चौकशी लावली पाहीजे. आता त्यांचा काहीही खुलासा होवू देत या खुलाशानंतर सुध्दा आयुक्तांनी त्याठिकाणी एक कमिटी नेमावी कमिटी नेमून स्टार हॉस्पिटलला झालेल्या गॅसचा पुरवठा आणि त्यामुळे दहा लोक दगावलीत का. यावरती निपक्षपाती पणे चौकशी व्हायला हावी. चौकशी समिती नेमून त्याचा अहवाल सभागृहाच्या पटलावरती पुढच्या जीबी पर्यंत ठेवण्यात यावा. माझी सर्वांना विनंती आहे की अत्यंत गंभीर आरोप आहे. जोपर्यंत याचा अहवाल येत नाही इथ कोणालाही मंगलाताई पाठीशी घालण्याचा अजीबात प्रयत्न नाही परंतु पुढच्या २० तारखेच्या सभेपर्यंत आपण थांबाव. कारण का अशाप्रकारचा आरोप घेवून मलातर वाटत नाही की हे सभागृह सुध्दा मान्य करु शकेल आणि हे जर खरं ठरलतर मग मात्र प्रशासनाची अजीबात गय केली जाणार नाही. या महापालिकेत तुम्ही नौकरीला आलात तर आमचे चार वर्षाचे आरोग्य, आमच्यासाठीचा आमचा सन्मान तो शहरवासीयांच्या बरोबरचा आहे. तुम्ही जर का आम्हांला नाकारणार असालतर आम्ही ऐकूण घेणा-यातले अजीबात नाही.त्यामुळ मा.महापौर साहेब, तुम्हांला हात जोडून विनंती आहे की याच्यावरती एक कमिटी नेमा, निपक्षपातीपणे चौकशी करा दोन्ही गोष्टी एकत्रीत गुंफूण बघा त्यातन सत्य काय बाहेर येतं ते सत्य काढा आणि जे जे याच्यातले झारीतले शुक्राचार्य आहेत त्यांच्यावरती पहीला घाला घाला, धन्यवाद.

मा.योगेश बहल - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. सर्व प्रथम मी तुषार कामठेच मनापासून अभिनंदन करु इच्छितो एका चांगल्या विषयाला त्यांनी सुरवात केलेली आहे आणि हा खुप गंभीर आरोप आहे की एखादया गॅस पुरवठाधारकामुळे जर दहा लोक दगावलेले आहेत. तर ते संबंधित विभागप्रमुख, तीथले डॉक्टर, आयसीयू मधले डॉक्टर, तीथली टेक्निकली व्यवस्था बघणारे असतील हे लोक काय करत होते आणि पर्यायी व्यवस्था करण्यासाठीआपल्या वायसीएमवर जो लोढ होता तो लोढ लक्षात घेता मा.महापौर साहेब, तुम्ही स्वत:

पुढाकार घेतला, पक्षनेत्यांनी पुढाकार घेतला आपण जम्बो आयसीयूची व्यवस्था केली. आपण ऍटोक्लस्टरला आयसीयूची व्यवस्था केली. मग समोरच्याचा जीव जात होता तोपर्यंत त्या डॉक्टरांनी निष्काळजीपणे त्याला मरु दिलं त्याला इतरत्र का हालवल नाही आणि ऑक्सिजन जो मोठया टँकद्वारे होतो त्याला वॉल असतो आणि त्या वरच्या माध्यमातून सर्व डिपार्टमेंटमध्ये जात असतो. परंतु ईमर्जन्सी स्थितीमध्ये सिलेंडर लावून सुध्दा ऑक्सिजनचा पुरवठा करता येतो. जम्बो सिलेंडर लावता येतो. मग डॉक्टर करत काय होते. ते दहा लोक जीव जाईपर्यंत संबंधित डॉक्टर करत काय होते. त्यांना इतरत्र का हालवल नाही, त्यांना जम्बो सिलेंडरद्वारे ऑक्सिजन का दिला गेला नाही, तीथली व्यवस्था का बरोबर केली नाही, तीथल्या पाईपलाईनच काम व्यवस्थित का केल नाही, तीथ असलेला दहा केएलचा टँक हा अतीशय मोठा पाहीजे त्याची व्यवस्था लवकर का केली नाही. जम्बो हॉस्पिटल मध्ये पण ऑक्सिजनचा सप्लाय, ऍटोक्लस्टरला पण ऑक्सिजन होता तीथ आयसीयूच टेंडर होतं. मा.महापौर साहेब, सिमाताईनी सांगीतल्याप्रमाणे, मंगलाताईनी सांगीतल्याप्रमाणे, वैशाली घोडेकरांनी सांगीतल्याप्रमाणे याची चौकशी व्हायलाच पाहीजे. जो कोणी संबंधित डॉक्टर आहे, जो कोणी संबंधित अधिकारी आहे आता आमच्याकडे अति.आयुक्त (२) यांच्याकडे सगळी जबाबदारी देण्यात आली होती. मा.आयुक्त साहेब मी आपल स्वागतही करतो आणि आपण अलर्ट रहा, सावध रहा अशाप्रकारच विनंम्र हात जोडून तुम्हांला अभिवेदन करतो. मी तुम्हांला पत्र दिलेल होत, तुम्हांला लिगल नोटीस दिली होती त्या लिगल नोटीसच पण उत्तर आपण दिलेल नाही. त्या लिगल नोटीसच उत्तर सुध्दा माझ्या वकीलाना अति.आयुक्त (२) पवार साहेबांनी दिलं नाही. मी जे आरोप केले आहेत ते आरोप गंभीर आहेत. मी चार वर्षे महापालिकेत लक्ष घातलेल नाही परंतु २००५ आपत्ती व्यवस्थापन कायदयाच्या नावाखाली जी लुट भारतीय जनता पार्टीच्या पदाधिका-यांनी, अति.आयुक्त (२) यांनी आणि संबंधित ठेकेदारानी केली आहे ती मी त्या लिगल नोटीसमध्ये सगळ मेन्शन केलेल असताना पीआयएल सुध्दा दोन दिवसामध्ये दाखल होणार आहे आणि या सर्वाना याच उत्तर दयाव लागणार आहे. तुम्ही तुमची जबाबदारी का पार पाडत नाहीत. जाताना हार्डीकर साहेब सांगून गेले की हे अति.आयुक्त (२) यांनी केल ते चुकीच केल आहे यांनी असं घाईघाईनी करायला नको पाहीजे होतं. ३ कोटी १४ लाख १९०० रु. बील आदा, महापालिकेचा अवमान करुन बीपीएमसी ऍक्ट पायदळी तुडवून सेक्शन ७३ च उल्लंघन करुन, बीपीएमसी ऍक्ट सेक्शन ५९(१) च उल्लंघन करुन सर्व उल्लंघन करुन त्यांनी बील आदा केलेल आहे. स्थायी समितीन अभ्यास करण्यासाठी वेळ मागीतला आणि मा.आयुक्त साहेब मी आपल्याला सांगू इच्छितो, सभागृहालाही सांगू इच्छितो की का सत्ताधारी गप्प आहेत, का याच्यावर आवाज उठवत नाहीत. संदिप वाघेरे

यांनी एक पत्राद्वारे माहीती मागीतली होती, अति.आयुक्त (२) ची आपल्या महापालिकेमध्ये युडीने ऑर्डर केली सन्मा.अजीत पवार ऍडीशनल आयुक्त म्हणून दोन वर्षासाठी त्यांना २४/७/२०१९ ला इथ पाठवल गेलं. हे सन्मा.ग्रहस्थ या महापालिकेमध्ये ५ सप्टेंबर २०१९ ला रुजू झाले. मा.आयुक्त साहेब आपण आयएएस आहात तुम्हांला सर्व नियम माहीती आहेत. ज्या दिवशी ते इथ रुजू झाले त्या दिवशी त्यांच्या प्रमोशनच लेटर आपल्या महापालिकेमध्ये त्यांना पदोन्नती दिली गेली. पदोन्नती दिल्यानंतर ते तीथे अध्यक्ष म्हणून रुजू झाले,आज ते प्रमोशनचा पगार घेतात, पगार कुठला घेतात प्रमोशनचा पगार आणि मलीदा कुठला खातात इकड बसून.सकाळपासून ते संध्याकाळपर्यंत इथच टेंडर, टेंडर, टेंडर, टेंडर आणा याची सही मी करतो त्याची सही मी करतो, रॉयची सही पण मीच करतो, प्रुफ आहे प्रुफ मी बोलतोना सर्व कागद आहेत माझ्याकडे, अधिकार दिला कुणी यांना. ९ सप्टेंबरला हार्डीकर साहेबांनी पत्र लिहील आहे रेव्हेन्यू आणि फॉरेस्ट डिपार्टमेंटला की त्यांना ऍडीशनल पदभार इथ देण्यात यावा. ५ सप्टेंबरला यांच प्रमोशन झाल ५ सप्टेंबरला यांनी चार्ज घेतला, प्रमोशनचा चार्ज घेतला त्यावेळेस त्यांनी ते तातडीने कर्तव्य बजावले पाहीजे होते ते झाल नाही, इथच राहीले आणि ९ सप्टेंबरला हार्डीकर साहेबांनी रेव्हेन्यू आणि फॉरेस्ट डिपार्टमेंटला पत्र लिहील आहे की इथ आपण ऍडीशनल कमीशनरनां इथ ऍडीशनल चार्ज म्हणून आपण ठेवाव. त्याच्यावर १९/९/२०१९ ला रेव्हेन्यू आणि फॉरेस्ट डिपार्टमेंटच लेटर मिळाल आहे आपल्याला की त्यांना तातडीने इकडन रिलीव्ह करा. म्हणजे १९/९ ला रिलीव्ह करा म्हणलेलं आहे. कोणाच्या अधिकारान्वये, युडीची मान्यता नाही, रेव्हेन्यू डिपार्टमेंटची मान्यता नाही. पक्षनेते साहेब आणि विरोधी पक्षनेते साहेब आपल्या दोघानाही सांगू इच्छितो की बेकायदेशिरपणे जे इथे ५ सप्टेंबर पासून बसून आहेत आणि तेव्हापासून त्यांनी जेवढे निर्णय घेतले, कोठार विभागाचे, कोव्हीड केअर सेंटरचे आयुक्त साहेब या सर्वाची लेखी मागणी मी तुम्हांला केलेली आहे त्याचही उत्तर मला मिळालेल नाही.जेवढे यांनी त्यांच्या अधिकारामध्ये निर्णय घेतलेले आहेत ते सर्व निर्णय चुकीचे आहेत ते सगळे रद्द व्हायला पाहीजेत व दिलेले सर्व पेमेंट वसूल केले पाहीजे. मा.महापौर साहेब तुमचा पण अपमान केला, तुमची पण मान्यता नाही, आयुक्तांची मान्यता नाही, स्थायी समितीची मान्यता नसताना ३ कोटी १४ लाख १९०० रु. २५ जानेवारीला आदा करण्यात आले. हिरा लॉन्स, राम स्मृती मंगल कार्यालय तसेच शहरातील इतर कोव्हीड केअर सेंटरमध्ये झालेला भ्रष्टाचार याचाच अर्थ सत्ताधारी भाजप, ठेकेदार व अधिकारी यांनी संगनमताने केलेले कोटयावधी रुपयाची लुट आप्पती व्यवस्थापनाच्या नावाखली पालीकेला लुटले, गोरगरीबांच्या टॅक्सचे पैसे लुटून खाल्ले असा माझा गंभीर आरोप आहे आणि मी सद्सदविवेकबुध्दीने, शुध्दीमध्ये बोलतो की हे आरोप सत्य आहेत आणि या

आरोपा बद्दलचे सर्व कागदपत्र माझ्या हातामध्ये आहेत. मी भाजपवर किंवा विरोधकावर आरोप करायचे म्हणूनआरोपकरत नाही हे सर्व कागदपत्र माझ्या हातामध्ये आहेत त्याच एक उत्तम उदाहारण दयायच झालतर सिमाताई आपण पण ऐका, भाऊसाहेब भोईर आपण पण ऐका आणि सत्तारुढ पक्षनेता आपण पण ऐका. शहरामध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने प्रशासनाने दि. १५ ऑक्टोबर २०२० रोजी कोव्हीड सेंटर बंद करण्याचा निर्णय घेतला. त्याच दिवशी मा.अजीत पवार साहेब अति.आयुक्त (२) यांना केबीनमध्ये बसल्या बसल्या त्यांच्या केबीनमध्ये जे दोन, चार, पाच लोक कायम असतात ते सीसीटीव्ही मध्ये फुटेज मध्ये तुम्ही बघा, कोव्हीडच्या काळामध्ये ऍटोक्लस्टर सेंटर मध्ये किती लोक दिसतात, यांच्या केबीनमध्ये किती लोक गेले, पवार साहेबांच्या केबीनमध्ये रोज जाणारे लोक कोण ते तुम्ही बघु शकता, ते पण पुरावे घेतले आहेत. त्या दिवशी या सन्मानीयांना केबीनमध्ये बसल्या बसल्या साक्षात्कार झाला, आता साक्षात्कार काय झालातर महापालिकेला खड्डयात घालण्याचा कट रचला. त्या दिवशी म्हणजे १५/१० ला जा.क्र.अआ२/कावि/२८९२/२०२० कोव्हीड केअर सेंटर बाबत बैठक आयोजीत केली अस सर्क्युलर काढल, त्या सन्मानीयांनी त्याच दिवशी सर्क्यूलर काढला आणि लगेच दुस-या दिवशी दि. १६/१०/२०२० रोजी सायंकाळी ५.०० वाजता कोव्हिड केअर सेंटरच्या नुकसानभरपाई देण्याकरिता बैठक बोलवली. सदर बैठकीमध्ये डॉ.गोफणे, श्री.कुंभोजकर, श्री.कोळंबे, श्री.इंदलकर आदि उपस्थित होते. अशी कहाणी रंगवली गेली की पुढील बैठक लगेच ४/११/२०२० ला जा.क्र. मोका/११/कावि/२९८/२०२० पत्रान्वये घेण्याचे ठरले. या महाशयांच्या सुनियोजीत कटाला सुरवात झाली. सदर बैठकीचा सभावृत्तांत देण्यात आलेल्या नस्तीमध्ये आढळून आला नाही याचाच अर्थ बैठक झाल्याचे नसून फक्त कागदोपत्री हे घोडे फिरवलेत. वास्तविक पाहता ही कमिटी आयुक्तांच्या आदेशाने स्थापन झाली का, नाही. या कमिटीमध्ये मिनीटस झाले का, नाही. मी श्री.कुंभोजकरांना, श्री इंदलकरांना विचारल ते म्हणाले अति.आयुक्त (२) बनवायचे आमच नाव घ्यायचे आणि सही करा म्हणायचे आम्ही सही केली.तुम्हांला मागणी केली का कुणी.माझ विनंम्र आवाहन आहे मा.महापौर साहेब की या १५ ऑक्टोबरला ज्यावेळी हा कट रचला गेला पैसे खान्याचा, महापालिकेला खड्डयात घालण्याचा, भ्रष्टाचार करण्याचा त्या तारखेला कोणत्यातरी कोव्हिड सेंटरवाल्याच महापालिकेमध्ये मागणीच बील आल का, पत्र आल का, आल असेलतर त्याचा आवक क्रमांक ती तारीख त्याचा आम्हांला पुरावा दयावा. पुरावा देवू शकत नाहीत कारण संबंधित ठेकेदार आणि अति.आयुक्त (२) यांनी मिळून हा रचलेला कट की आपण आता अस करु या ८० टक्के दयायच ठरवलेल आहे पण ते कुठ ठरवलय जे कोव्हिड सेंटर चालू झाल नाही. मा.महापौर साहेब, माझ आपल्याला विनंम्र आवाहन आहे की १५ ऑक्टोबरला

सांगीतल्याप्रमाणे बीलाची नुकसानभरपाईची मागणी केली होती त्या पत्राचा आवक क्रमांक दिनांकासहीत पुरावा सादर करावा. मा.आयुक्त साहेब, हे माझ्याकडे उपलब्ध असलेले कागदपत्र, पुरावे व माहीती नुसार मी बोलत आहे.हिरालॉन्स व रामस्मृती मंगल कार्यालयभोसरी येथील कोव्हिड केअर सेंटरचे नुकसानभरपाई आदा करण्याचे अनुषंगाने १ ऑगस्ट ते ३० ऑक्टोंबरचे पैसे आदा करण्याचे ठरविले. आता मा.महापौर साहेब इथन स्टोरी सुरु झाली, आता हे ठरवल बरका की यांना पैसे दयायचे आणि ७ ऑगष्ट २०२० ला मे. स्पर्श यांनी याची निवीदा मान्य करुन कोव्हिड केअर सेंटर चालू करणेकामी आवश्यक असणा-या गोष्टींची पुर्तता करण्याकरिता उदाहरणार्थ डॉक्टर्स इतर स्टाफची यादी, त्यांची शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र, आधारकार्ड इतर आवश्यक बाबींची पुर्तता करुन कळविणेकरिता पत्र दिले होते. त्या अनुषंगाने मे. स्पर्श हॉस्पिटल यांनी स्टाफची यादी देण्यासंदर्भात निवीदामध्ये मंजूर झाल्याचे कळवणेत आले होते. त्यानंतर ४५ दिवसानी ७ ऑगष्टला प्रशासनाकडन पत्र आल आणि त्यामध्ये अटि-शर्ती मध्ये स्पष्ट म्हणल आहे की तुम्ही डॉक्टराच क्वॉलीफिकेशन, ज्या डॉक्टरांनी काम केलेल आहे त्यांच आधारकार्ड आणि त्यांची सर्व माहीती ही महापालिकेला उपलब्ध करावी. ४५ दिवसानंतर जी डॉक्टरांची यादी दिलेली आहे ती यादी सुध्दा बोगस आहे. एखादया पिक्चरमध्ये जशी व्यवस्था करतातना झटपट झटपट ती व्यवस्था करण्याचा प्रयत्न तीथ केला आहे पण ते सुध्दा आडकले कारण की आमच्याकडे त्याचे पुरावे आहेत कुठून काय गेला, तो कसा गेला, कोण डॉक्टर तीथ उपलब्ध होते याचे सुध्दा पुरावे आमच्याकडे आहेत. त्यानंतर २५ सप्टेंबर रोजी सौ.डॉ.शैलजा भावसार यांनी स्थळ पाहणी केली, स्थळ पाहणी केली असता महापालिकेनी टाकलेल्या अटी-शर्ती प्रमाणे अनेक बाबी उपलब्ध नसल्याचे त्यांना दिसून आले. त्याप्रमाणे त्यांनी २५ सप्टेंबर रोजी त्रुटी संदर्भातील अहवाल ई-मेल द्वारे सादर केला. या अहवालावर डॉ. अनिल रॉय यांनी देखील आपले स्पष्ट मत नोंदवून मे.स्पर्श हॉस्पिटलला बील आदा करता कामा नये व त्यावर संबंधितावर आपण खटला भरावा, त्यांनी महापालिकेची फसवणूक केलेली आहे आणि त्याच्यावर हार्डीकर साहेबांनी २५ तारखेला आति.आयुक्त (२) हे गैरहजर होते आणि ई-मेलद्वारे ज्यावेळेला हा नकार्थी अहवाल डॉ.शैलजा भावसार यांनी दिला त्यांनी पाहणी केली पाहणी केल्यानंतर तीथ पीपी कीट नाही, औषध नाहीत, तीथ लोक नाहीत, तीथ दोन बेड मध्ये अंतर नाही, तीथ काही सुविधा नाहीत फक्त बेड ठेवलेले आहेत ते पण जवळ जवळ बेड ठेवलेत. मग काहीच सुविधा नसताना मास्क नाहीत, पीपी कीट नाही, लोक नाहीत, स्टाफनर्स नाहीत हे सगळ त्यांनी ई-मेलद्वारे टाकल्यानंतर डॉ.रॉयनी लगेच त्याच्यावर सही करुन त्यानी ते आयुक्तांकडे पाठवून दिलं. कारण त्यादिवशी अति.आयुक्त (२) असतेतर त्यांच्याकडे फाईल गेली असती. पण ही

गेली हार्डीकरांकडे. आता हार्डीकरांच तुम्हांला पत्र दाखवतो. मा.महापौर साहेब, हा कागद मी आयुक्तांना दिलेला आहे तुम्हांला पण ही फाईल बनवून देतो. हे जे काही सर्व रिमार्क लिहीले आहेतना ते सर्व रिमार्क त्या डॉ.भावसार ज्या ज्येष्ठ सिनीअर वैदयकीय अधिकारी आहेत त्यांनी लिहीलेले आहेत अहवाल सगळे. त्याच्यावर हा जो मुख्य लिपीक आहे त्यांनी सही केली नंतर डॉ.रॉयनी सही केली आणि याच्यामध्ये हार्डीकर साहेबांच्या अक्षरामध्ये लिहीलेल आहे की ज्येष्ठ वैदयकीय अधिकारी भोसरी यांचा अहवाल व अदयापपर्यंत अमानत रक्कम भरना न केल्याने बील देण्याची गरज काय असं हार्डीकर साहेबांनी समक्ष चर्चा करावी आणि ही फाईल ताबडतोब ती डॉ.रॉय यांच्याकडे आली. आता डॉ.रॉयकड आल्यानंतर यासंबंधित अति.आयुक्त (२) यांना माहीतच नाही की ते पण मध्ये आहेत. हे जेव्हा आम्ही पत्र लिहील आणि ते ८ तारखेला पत्र इन्वर्ड केल त्यानंतर यांची खटपट सुरु झाली. मग त्यांनी या संबंधित मुख्य लिपीकाला बोलून घेतल त्याला दोन ते आडीच तास केबीनमध्ये बसवलं आणि माझ्याकडन डॉ.रॉयनी हे लिहून घेतलं असा त्याचा जबाब घेतला. मा.महापौर साहेब मला एक सांगा की डॉक्टराच काम डॉक्टरच करेलना ते कमीशनर साहेब पण नाही करु शकत आणि अति.आयुक्त (२) पण नाही करु शकत म्हणून त्या विभागाचे जे प्रमुख आहेत त्यांचा अहवाल बाजुला करुन मुख्य लिपीक यांनी लिहील आहे चिफ ऑडीटर यांनी त्याला आक्षेप घेतला आहे ते सगळे आक्षेप ओव्हरुल केले आणि दि. १२/१/२०२१ ला डॉ.रॉयचे अधिकारच काढून टाकले. आता डॉ.रॉय यांचे अधिकार का काढलेतर डॉ.रॉय पाहीजे तीथ सही करत नव्हते आणि रॉय विरोध करतील आणि तो कागदपण तुम्हांला दाखवतो. मा.महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब अति.आयुक्त (२) यांनी स्वत: डॉ.रॉय यांच्या नावाला खोडलय स्वत:च नाव लिहील आणि स्वत:च्या सहीन पाठवून दिलं. आणि मग डिपार्टमेंट हेड कशाला आहे. मी म्हणतो वायसीएम मध्ये त्यांना बसवून टाका आणि डॉ.वाबळेना घरी पाठवून दया, अति.आयुक्त चालवतीलना वायसीएम पण डॉक्टर आहेतना ते. कोण पाठीशी घालतय, का चौकशी होत नाही. तुम्ही सुध्दा म्हणता हे तु सांभाळ, हे तू सांभाळ, हे तू सांभाळ. हार्डीकरांनी पण तेच केलना. मा.महापौर साहेब, काल परवा वायसीएमचे टेंडर १५ कोटी ७१ लाख रुपयाच टेंडर आयुक्तांच्या स्वाक्षरीविना या महाशयांनी उघडून टाकल. मा.आयुक्त साहेब चौकशी करा रद्द करा हे रद्द. ते तुम्हांला पण जाळयामध्ये अडकवतील. कोणकोणते अधिकार दिले काय दिले हे बघा. हार्डीकरांनी एक कोटी पर्यंतचे अधिकार दिले होते आणि यांनी बील आदा केल आहे ३ कोटी १४ लाख रुपयाचं. कोणत्या अधिकारान्वये केल आहे. स्थायी समितीची मान्यता नाही. मा.महापौर साहेब, त्यानंतर कोणतही कारण नसताना किंवा कोव्हिड सेंटरमध्ये एकही पेशंट नसताना मे. स्पर्श हॉस्पिटलला डॉ.अमोल होळकुंदे यांनी ५ कोटी २६ लाख ६० हजार रुपयाचे

८००/- रुपये प्रमाणे बील अदा केले. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब असं म्हणल जात ज्या ठिकाणी एकही रुग्ण ऍडमीट नाही, याठिकाणी व्यवस्था नाही दुस-या बाजुला दुसरे कोव्हिड सेंटर चालू आहेत त्यांची बील थकबाकी आहे त्यांच पेमेंट बाजूला आणि जिथ काहीही नाही तीथ आप्पती व्यवस्थापनाच कलम टाकून बील अदा करण्याच कारण काय याच उत्तर आम्हांला पाहीजे. जिथ पेशंटच नाही. मगाशी ताईनी म्हणल्याप्रमाणे महापालिकेनी चांगल काम केल, आम्हीही कौतूक केलं, आयुक्त साहेबांच आम्ही कौतूक केलं सगळया योजनांच आम्ही कौतूक केलं. परंतु ज्या चुकीच्या पध्दतीने बील आदा केलेल आहे याला जबाबदार कोण. मा.आयुक्त साहेब या संपुर्ण प्रकरणाची तुम्ही चौकशी करा. हे ३ कोटी १४ लाख रुपये कुठल्या बँकेत गेले, याच्यामध्ये कोण कोण सामील आहेत आणि कोणाकोणाचे लागेबांधे यामध्ये आहेत या सर्व गोष्टींची चौकशी व्हायला पाहीजे. मी तर कोर्टात गेलो तुम्ही थांबवलतर तुमच्याकडे यईन, तुम्ही ऍक्शन नाही घेतलीतर मी तुम्हांला पण पार्टी करीन आयुक्त म्हणून. कारण आता मी गप्प बसणार नाही. त्यानंतर मी आपल्याला सांगू इच्छितो की यांनी मग मिटींगमध्ये ६५ टक्के भरपाई देण्याचा निर्णय घेतला, महापालिकेच वाचवले १५ टक्के त्याबद्दल अभिनंदन. मे. स्पर्श हॉस्पिटलने निवीदेमधील एकाही अटि-शर्तीची पुर्तता केलेली नसताना केवळ एक टक्का एलडी भरल्याचा महाप्रसाद कोव्हिड रुग्णांच्या माध्यमातून शहरातील गोरगरीब जनतेच्या टॅक्स स्वरुपातून जमा झालेल्या पैशावर डल्ला मारून कमवला आहे. ही सर्व वस्तुस्थिती असताना अशा पध्दतीने हा गैरव्यवहार करण्यात आला.महत्वाची गोष्ट म्हणजे जेवढे हॉस्पिटल शहरामध्ये आहेत त्या सर्व हॉस्पिटलच्या डॉकेटसवर त्याच्या ऑर्डर वर सहया या डॉ.अनिल रॉयच्या आहेत. फक्त मे.स्पर्श हॉस्पिटलच्या डॉकेटवर आणि त्या टेंडरवर, ज्या वर्कऑर्डर आहेत त्यांच नाव खोडून हिम्मत करुन अशा पध्दतीने अति.आयुक्त (२) पवार साहेब यांची एकमेव सही. म्हणजे मला सांगा स्पर्श हॉस्पिटलला हे पैसे देण्याची घाई का. तीथ काही पेशंट होते का, ती काही प्रॉब्लेम होता. आपत्ती व्यवस्थापन कोणासाठी असतं की लोकांच्या हितासाठी असतं इमर्जन्सी मध्ये आयुक्तांनी निर्णय घ्यावे म्हणून. जिथ काही नाही आणि डिपार्टमेंट हेडची सही नसताना अशा पध्दतीने स्पर्श हॉस्पिटलला पैसे दिलेले आहेत. विभागप्रमुखाना बाजूला ठेवलेल आहे. पवार साहेबांनी याचा खुलासा करावा. मे स्पर्श हॉस्पिटलच्या माध्यमातून सत्ताधा-यांनी काही ठरावीकांनी हा भ्रष्टाचार केल्याच मी अनेकवेळा आपल्याला सांगीतल आहे. १२ नोव्हेंबर रोजी अचानकपणे डॉ.अनिल रॉय यांना तीकडन काढण्यात आल कारण ते हा भ्रष्टाचार करु देत नव्हते. २२ जानेवारी २०२१ रोजी अधिकार नसताना अति.आयुक्त पवार यांनी ३ कोटी १४ लाख २५ तारखेला आदा केले. मा.आयुक्त साहेब २२ तारखेला

डॉकेट ठेवले आणि २५ तारखेला कुणाचीही मान्यता न घेता पैसे आदा केले आणि २७ जानेवारीला स्थायी समितीची सभा होती.२२ तारखेच डॉकेट तीन दिवसानंतर म्हणजे २५ तारखेला तो विषय अजेंडयावर आला व २७ तारखेला स्थायी समिती होती. मग स्थायी समितीसाठी पण थांबले नाहीत. २५ तारखेलाच देवून टाकले. स्थायी समितीने २७ तारखेला अभ्यास करायचा म्हणून विषय तहकूब ठेवला. मा.महापौर साहेब, २५ तारखेला यांनी पैसे देवून टाकले, २७ तारखेला विषय अजेंडयावर आला स्थायी समितीला अभ्यास करायचा होता म्हणून त्यांनी २७ तारखेला विषय तहकूब ठेवला. २७ तारखेला यांची मांडवली झाली नाही, टक्केवारी ठरली नाही, यांच्यामध्ये वाद आता एवढे पैसे वाटायचे कसे, तुला किती, मला किती फुकटचा पैसा महापालिकेला खड्डयात घालणारा पैसा, एकही पेशंट नसलेला पैसा, एकही डॉक्टर नसलेला पैसा हा वाटायचा कसा याच्यावर वाद होते आणि म्हणून यांना अभ्यास करायला लागले पंधरा दिवस. मी हे पत्र तयार केल होतं सहा तारखेला परंतु हार्डीकर साहेब रजेवर होते, मी म्हणल आता पत्र दिल काय करणार, अति.आयुक्त (१) पण नव्हते. एकतर अधिकार पण हयांच्याकडे, पुण्यातले आयुक्त आहेत त्यांना चार्ज होता त्यांची स्वाक्षरी  नाही, कुणाची स्वाक्षरी नाही हयांच्या स्वाक्षरीने सगळ झालं. मा.महापौर साहेब ८ फेब्रूवारीला स्थायी समितीने हा निर्णय घेतला आणि ८ फेब्रूवारीला हा विषय मंजूर होतो आणि तो विषय मंजूरमध्ये सुध्दा याच्यामध्ये एक अजब कहाणी आहे ती अजब कहाणी पण ऐकण्यासारखी आहे. हा तहकूब केलेला विषय ८ फेब्रूवारी रोजी देवाण-घेवाण घेण्याचा विषय झाल्यानंतर मंजूर केला. अधिकारी आणि सत्ताधा-यांनी तेरीभी चुप मेरीभी चूप म्हणत कोटयावधी रुपयाचा अपहार करुन स्वत:ची घर भरली. मी व्यक्तीश: आक्षेप नोंदवल्यानंतरघाईघाईने दर बुधवारी होणारी बैठक सोमवारी घेण्यात आली. सोमवारी का घेतली तर माझ पत्र इन्वर्ड  झाल होतं मी बाकीच्या माहीती मागीतल्या होत्या, बाकीचेप्रॉब्लेमहोतील म्हणून त्यांनी बुधवारची बैठक ८ तारखेला सोमवारी घेतली. मला भारतीय जनता पार्टीच्या लोकांच कौतूक कराव तीतक कमी वाटत कारण महापालिकेच्या इतिहासा मध्ये प्रशासन विभागामार्फत सन्मा.श्री.पवार यांच्या सांगण्यावरुन डॉ.पवन साळवे यांनी आकडयाचा खेळ करुन पहील्यांदाच ऐतीहासीक पराक्रम करत उपसूचना मांडली परंतु स्वत: केलेला पराक्रम लक्षात आल्यावर त्यांनी स्थायी समितीच्या सदस्यामार्फत आकडयांमध्ये बदल करत उपसूचना दिली आणि हेच प्रकरण गळयाशी येत असल्याचे लक्षात आल्यानंतर हा सर्व प्रकार करत आला आणि म्हणून बेकायदेशिररीत्या तो सुध्दा विषय मंजूर झाला, उपसूचना कधी सूध्दा प्रशासन देत नाही. आकडेवारीमध्ये जर बदल असेलतर प्रशासन डॉकेट परत घेतं, विषयपत्र परत घेतं परंतु हे पवार साहेबांच्या लक्षात आल्यानंतर कदाचित मला

वाटत नगरसचिवांनी सांगीतल असेल की तुम्हांला असं करता येणार नाही आता यांना माहीत होत की आपल्या गळयाला फास लागतो, हा विषयतर मंजूर व्हायला पाहीजे मग त्यांनी सदस्यांमार्फत सूचना दिली आणि सदस्यांमार्फत सूचना म्हणजे आकडेवारीचा खेळ आहे. सदस्यांना काय माहिती कुणाचे आकडे किती, काय किती, काय किती, काय किती.......

**मा.महापौर -** बहल साहेब प्रश्न वायसीएमवर आहेत, प्रश्नोत्तराचा विषय आहे.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. या प्रकरणामध्ये सामुहीकरीत्या महापालिकेची लुट करण्यात आलेली आहे. बीपीएमसी ऍक्ट सेक्शन ७३ स्थायी समितीची मान्यता न घेता बील आदा करणे. सेक्शन ५९ (१) महापालिका कर्मचारी व अधिकारी यांची अनर्हता डॉ.सौ.अंजली ढोणे उर्फ आडसकर, या स्पर्श हॉस्पिटलचे मालक श्री.विनोद आडसकर यांच्या पत्नी महापालिकेत वैदयकीय अधिकारी म्हणून काम करत असताना देखील या हॉस्पिटलची टेक्निकल बीड कशी मंजूर झाली. त्या महापालिकेमध्ये डॉक्टर आहेत आणि त्यांचे पती स्पर्श हॉस्पिटलचे डायरेक्टर आहेत मग असं असताना टेक्निकल फिल्डमध्ये हे कॅन्सल व्हायला पाहीजे होतं. शासकीय सेवा नियमावली नियम क्रमांक दोन, चार आणि सोळा या कलमांचा भंग करण्यात आलेला आहे त्यामुळे या सर्वांची विभागीय चौकशी करुन या सर्वांना तुरुंगात टाकावे अशी माझी मागणी आहे, धन्यवाद.

**मा.मिनल यादव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका.पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही श्रीमंत महापालिका म्हणून ओळखली जाते. या महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयात शुल्लक कारणावरुन ऑक्सिजन अशा गोष्टीवरुन दहा लोकांचा मृत्यू होणं हे खरच महाविकास आघाडीना सांगावस वाटत की भाजपच, सत्ताधा-यांचा आणि प्रशासनाचा हा नाकर्तेपणा आहे असं मी म्हणेल. कारण दहा लोकांचा मृत्यू झाला, कोरोनाच्या काळामध्ये आपण एवढा निधी वायसीएमला देतो, कोटयावधी रुपये निधी आपण वायसीएमला देतो असं असताना ऑक्सिजन ही शुल्लक गोष्ट पुरवली जात नाही यामुळे कुणाचा मृत्यू होतो ही खरच लाजीरवाणी गोष्ट आहे. ज्येष्ठ नागरीक विठ्ठल कराळे हे वायसीएम मध्ये आठ दिवसापासून ऍडमीट होते, पहीले चार दिवस ते व्यवस्थित कंडीशनमध्ये होते जनरल वॉर्डला ऍडमीट होते. ते एक्सपायर होण्याच्या आदिपासून दोन दिवसापासून मला कन्टीन्यू फोन करत होते की ताई मला इथे गरम पाणी पुरवल जात नाही, दोन दिवस झाल मी फक्त गरम पाणी मागतो, सकाळी एक थर्मास गार पाण्याचा आणून ठेवला जातो परत साधा ऑक्सिजन

चेक करायला सुध्दा लोक येत नाहीत, डॉक्टर्स, नर्स अव्हेलेबल होत नाहीत असे दोन दिवस तो माणूस मला कन्टीन्यू फोन करत होता मी डॉ.वाबळे सरांना आणि लाठी सरांना कितीवेळा फोन केला. आता ते असतीलतर समोर येवून माझ्याशी बोलाव की त्यांन किती वेळा माझा फोन उचलला मी चारवेळा म्हणाले आणि शेवटचा त्या माणसाने दुपारी दोन वाजता फोन केला की ताई मला श्वास घ्यायला खुप त्रास होतोय तरी तो माणूस जनरल वॉर्डमध्येच होता. जर डॉक्टरांच लक्ष असतंतर कमीत कमी त्याला ऑक्सिजन पुरवला गेला असता, तो आयसीयूमध्ये शिफ्ट करायला हवा होता साडेतीन वाजता तो माणूस एक्सपायर झाला. म्हणजे आतमध्ये माणस जगतात की मरतात ही लोक बघतात का झोपा काढतात. हे अधिकारी लोक डॉक्टर्स आतमध्ये नेमक करत तरी काय होते की लोक एक तासानी मरतात तो माणूस दोन वाजता माझ्याशी व्यवस्थित बोलला आणि साडेतीन वाजता त्याचा मृत्यू होतो. मा.महापौर साहेब, जर इंजेक्शन, प्लाझमा किंवा ऑक्सिजन हया बारीक-सारीक गोष्टी जर आपण रुग्णांना पुरवू शकत नाहीत तर फक्त काय तुम्ही बेड अव्हेलेबल करुन देतात का. जर सेवा पुरवल्या जात नसतीलतर अशा सर्व डॉक्टर्सना आणि सगळया अधिका-यांना निलंबीत करा. कारण आता ही कोरोनाची दुसरी लाट आली असं आपण म्हणतो पेशंट डबल होत चालले आहेत आणि असंच जर पेशंटकड दुर्लक्ष होत चालल ऑक्सिजन पुरवला नाही गेलातर आता दहा गेलेत उदया पन्नास जायला वेळ नाही लागणार आणि याच सगळ खापर माई आणि आयुक्त साहेब तुमच्या डोक्यावर थापल जाईल. त्यामुळ मी नम्र विनंती करते की माई वाबळे सरांनी माझ्या प्रश्नांची उत्तर दयावीत हा पेशंट कशानी गेला याच मला लेखी उत्तर दयाव, अजून त्यांनी मला लेखी उत्तर दिलेल नाही. माई, तुम्हांला नम्र विनंती करते की अशा अधिका-यांवर, डॉक्टर्सवर कारवाई केली पाहीजे, धन्यवाद.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आज ख-या अर्थानी अवघ्या चार वर्षातच तुषार कामठे यांनी प्रश्नोत्तरे केली आणि अत्यंत महत्वाच्या प्रश्नाला या सभागृहात उजाळा दिला. तुषार यांनी जे जे सभागृहात सांगीतल त्यांच्या म्हणण्यानुसार जर का खरच दहा रुग्ण माझ्या या शहरातील दहा करदाते नागरीक, ज्यांच्या जीवावरती हे शहर चालतं, सगळया अधिका-यांचे पगार यातून होतात हे जर खर असेलतर त्यावरती कठोर निर्णय आपण घेणं लागतो. आता मिनल बोलली, मगाशी मंगलाताई म्हणाल्या, योगेशभाई म्हणाले की आम्ही गप्प कसे. जर चुक असेलतर निश्चित चुक आम्ही या सभागृहाच्या निदर्शनास आणणार जर तुम्ही आणली असेलतर त्याच्या बरोबर ठामपणे उभेसुध्दा राहणार. त्याच्यात आणखी काही त्रुटी आम्हांला दिसल्यातर त्या सुध्दा आम्ही या सभागृहात आणल्या शिवाय राहणार नाहीत. सन्मा.महापौर साहेब,

जर तुषारच्या म्हणण्यानुसार डॉ.वाबळे याठिकाणी खुलासा करतील त्यावेळेस क्लेअर होणार आहे. चो-या कोण करतं, कसं होत, कुणाचे पाहूणे, कुणाचे नाते या सगळया गोष्टी या सभागृहाला माहिती आहेत. तेव्हा कुणाची हातमिळवणी असते, कुणा बरोबर होते आणि निश्चितपणे ज्यावेळेला म्हणल जात भारतीय जनता पार्टी याठिकाणी चोर आहेतर भारतीय जनता पार्टीवर आरोप करत असताना तीकडे पण कोण आहे, इकडे पण कोण आहे हे सगळे समोर आले पाहीजेत. मा.महापौर साहेब आम्ही याठिकाणी बरबटलेले नाहीत त्यामुळे आमच नाव या सभागृहामध्ये घेण्याचा अधिकार कुणालाही आम्ही देत नाहीत. जरयाठिकाणीकोणबरबटलेलेअसतीलतरतेराष्ट्रवादीचे असूदेत, भाजपचे असूदेत, शिसेनेचे असूदेत कोण असेलतर ते सगळे समोर आले पाहीजेत आणि त्यामध्ये गुंतलेले अधिकारी सुध्दा समोर आले पाहीजेत. आमचे पत्रकार बंधु सांगतात की नगरसेवकांच आमकटमक असत त्याच्या बरोबर त्यांनी सांगाव की या अधिका-यांच पण टमकटमक कस असतं ते. मा.महापौर साहेब, आम्ही याठिकाणी आरोप सहन करायला अजीबात रिकामे नाहीत. आज याठिकाणी तुषारच्या माध्यमातून अनेक विषय समोर आले त्याला लागून सन्मा.माजी महापौर योगेशभाई बहल यांनी सुध्दा अनेक विषयावर उजाळा टाकण्याचा प्रयत्न केला. सगळयात महत्वाच मा.महापौर साहेब ज्यावेळेला स्पर्श सारख्या कोव्हिड सेंटरला आपण ज्यावेळेला परवानगी दिली त्यावेळेला म्हणजे हे आपले असे आरोप आहेत मा.महापौर म्हणून तुम्ही जरी सर्व पक्षीय असलातरी हे आमच्या भाजपचे आरोप आहेत. आज आमच्या सभागृहामध्ये आमच्यावर झालेले आरोप आहेत परंतु या आरोपाना खतपाणी घालणार कोणं याचा सुध्दा निकाल आज या सभागृहामध्ये लागणं गरजेचे आहे. सन्मा.महापौर साहेब, अनेक मुद्दे योगेशभाईनी घेतलेले आहेत. परंतु सगळयात महत्वाची बाब म्हणजे जर एखाद टेंडर होतं त्या टेंडरमधील पहीला मुद्दा, दुसरा मुद्दा, तीसरा मुद्दा, चौथा मुद्दा अशा सगळया मुद्दयांवरती काम करायच असतं आणि ते मुद्दे क्लेअर झाल्यानंतरच बील अदायगी करायची असते. हा साधा नियम ज्या ज्या कोणत्या अधिका-यांना माहीत नसेल त्या सगळयांना आपण याठिकाणी सांगण लागतो. या सभागृहामध्ये ज्यावेळेला सीसी केंद्राच टेंडर काढल्या गेल त्यावेळेला ईओआय याच्यामधला मुद्दा क्र. ३.५ चा असा एक मुद्दा त्यांनी याठिकाणी घेतलेला होता. याठिकाणी स्पर्श सेंटरनी दोन मंगल कार्यालय म्हणजे रामस्मृती मंगल कार्यालय आणि हिरा लॉन्स हे दिले होते त्या दोन्ही मध्ये एकदम तीन महीन्याचे बील कसे काय आले. त्याच्या पुर्वीचा एक मुद्दा होता मुद्दा क्र. ४.४ त्यात असे आहे की या नस्तीमध्ये ते उपलब्ध आहे. परंतु त्यातलाच ४.५ चा जो मुद्दा आहे. मा.महापौर साहेब जर चार टक्के अनामत रक्कम आठ दिवसाच्या आत करारनामा झाल्यानंतर, कामाचा आदेश झाल्यानंतर देणं लागत होतो तर याठिकाणी मी अशी नस्ती जी आहे ती तुम्हांला देणार आहे. याच्यामध्ये मी

तुम्हांला पान नंबर सांगते त्या पानावर तुम्ही पहाताल ते पान नंबर ६८७ आहे याच्यावरती नमुना क्र. २२ जो आहे त्याच्यावरती आपल्याला दिसून येत की बीलातील जी अनामत रक्कम आहे ती जे अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी आहेत डॉ. पवन साळवे यांनी ती चार टक्के रक्कम होती ती बीलातून वजा करण्याचा महापराक्रम केलेला आहे आणि इतकी दुर्दैवी बाब इतक वाईट, कुणाला पाठीशी घालताय, कोण बीडर आहे, कोणाची संस्था आहे याचा या ठिकाणी खुलासा झाला पाहीजे. आपण महापालिकेतील अनेक ठेकेदारावर कारवाई करण्याच नियोजन केल, काहीवर कारवाई सुध्दा केली, ब्लॅकलीस्ट केलं मग यांना पायघडया घालण्यासाठी हे कोण आहेत, स्पर्शवाले की ज्यांना आपण इतके सुंदर रेडकार्पेट याठिकाणी पालीकेमध्ये जर अंथरत असेलतर मा.महापौर साहेब हे खपवून घेतले जाणार नाही. एका ठिकाणी जर शिक्षा असेलतर दुस-याठिकाणी सुध्दा त्याच पध्दतीने आपण याठिकाणी वागणूक दिली पाहीजे. त्याच बरोबर सन्मा.महापौर साहेब, याठिकाणी डॉ.भावसार मॅडम, ज्येष्ठ वैदयकीय अधिकारी त्यांच्याशी अनेक नगरसेवकांचा संपर्क आला असेल की एक अधिकारी म्हणून त्या कशा काम करतात हे माहीत आहे. आठ नऊ वर्षात त्यांना मी ओळखते त्या कालावधीत सुध्दा मला त्या अत्यंत प्रामाणिक आणि चांगल्या काम करणा-या अधिकारी म्हणून मला याठिकाणी वाटतं, हे मला वाटत सगळयांचा अनुभव असेल असं नाही परंतु त्यांनी एक मुद्दा लिहीला होता आपल्या ईओआयमध्ये की ज्यावेळेला आपण एखाद ऍग्रीमेंट केल जाईल त्यावेळेला तेथे काम करणारी लोक आहेत त्यांनी त्यांच्या डॉक्टरांची लीस्ट आठ दिवसाच्या आत या महानगरपालिकेच्या अधिका-यापर्यंत पोहचवायची आहे. परंतु याच ठिकाणी आपल्याला पाहीला मिळेल की स्पर्श हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी २१/९ म्हणजे तब्बल ४५ दिवसानी डॉक्टरांची लीस्ट दिली आणि संपुर्ण नस्तीमध्ये आपल्याला कुठेही त्या डॉक्टरांचे जे काही सर्टिफिकेट असतील ती पहावयास मिळत नाहीत. म्हणजेच जी काही प्रक्रीया जे काही डॉक्टर असतील त्यांच रजिस्ट्रेशन असेल ते सगळ खोटं किंवा बोगस असं याठिकाणी निदर्शनास येतं. मा.महापौर साहेब, आपण १३३ आहोत यात दोन चार जण बरबटले असतील त्यांनी त्यांच्यावरती सगळ घ्याव. त्यासाठी याठिकाणी तुम्ही अथवा आम्ही बोलणे ऐकायला रिकामे नाहीत. जर अशाप्रकारे केल असेल, संबंधित अधिकारी असतील, संबंधित कुणी असेलतर त्यांना ते भोगायला लागलच पाहीजे. त्याचबरोबर दुसरा मुद्दा असा होता की स्पर्श हॉस्पिटल यांनी जी काही कागदपत्र याठिकाणी लावली आहेत तर त्याच्यामध्ये आपल्याला एक गोष्ट निदर्शनास येते की डॉ.अमित आनंद वाघ हे मे. स्पर्श फॉर्च्यून या हॉस्पिटलचे डायरेक्टर म्हणून काम करतात. त्याच्या आदिचा एक मुद्दा होता की डॉ.विनोद आडसकर हे आपल्या महापालिकेच्या तालेरा हॉस्पिटलमध्ये डॉ.अंजली ढोणे या आपल्या पालिकेच्या अधिका-यांचे पती आहेत.

डॉ. वाबळे यांना कायमस्वरुपी केल बाकीचे डॉक्टर महापालिकेमध्ये घेतले ही प्रक्रीया चालू होती त्यावेळेला आमच्या १३३ जणांचा एकच अग्रह होता की ज्या जुन्या डॉक्टरांनी आजपर्यंत प्रामाणिकपणे आमच्या रुग्णालयाची, आमच्या करदात्या नागरीकांची सेवा केली विनाअपेक्षा म्हणजे कुठेतरी एखादा दवाखना चालू करायचा, कुठेतरी एखादी ओपीडी चालू करायची तो दवाखाना चालू न करता त्यांनी ज्या प्रामाणिकपणे या शहरातल्या नागरीकांची सेवा केली त्याचप्रमाणे या नवीन सर्व डॉक्टरांनी केल पाहीजे असा ठराव आपल्या सभागृहाने मांडला होता त्याचा पाठपुरावा करणेची जबाबदारी मा.महापौर साहेब मला वाटत आपण घेतली होती, सन्मा.आयुक्तांना तसे आदेश दिले होते की आपण या सगळया डॉक्टराकडून लेखी घ्या की आपण कुठेही बाहेर प्रॅक्टीस करणार नाहीत. मग डॉ.अमित वाघ यांनी पान नं. ७९ मध्ये दिसेल की ते या मे.स्पर्श मध्ये काम करतात, त्याचे डायरेक्टर म्हणून काम करतात. आयुक्त साहेब प्रशासन हे तुमच आहे हे खुपवेळा आम्हांला सांगता मग आम्हांला पण फाईलच ठेवावी लागेल हे तुमच आहेना, मग जबाबदारी पण पेलवायची. पुढच्या आठ दिवसात डॉ. अमित वाघच आपण काय करणार, त्या डॉ. अंजली ढोणे मॅडम आहेत त्यांच आपण काय करणार. मा.महापौर साहेब आपण आदेश दिले पाहीजेत आम्ही सभागृहात बोलतो भूंकत नाहीत, तुम्हांला मुद्देसुद कागद देतो, पुरावे देतोत आणि हे पुरावे दिल्यानंतर आपण सुध्दा या सभागृहामध्ये ज्यावेळेस आपल्यावर आरोप होतात, आमच्यावर आरोप होतात त्यावेळेला आपण हे आरोप सहन करण्याचे काही कारण नाही. ज्या डॉक्टराना आपण कोरोनायोध्दा म्हणलं, ज्या डॉक्टरांवर आपण विश्वास टाकला ते जर अशा वेगवेगळया संस्था तयार करुन या महानगरपालिकेचे पैसे लुटण्याचा प्रयत्न करत असतीलतर मग ते आपले साळवी साहेब असू दयात, अमीत वाघ असू दयात, ढोणे मॅडम असुदयात या सगळयांवरती योग्य ती कार्यवाही ऐत्या आठ दिवसात मा.आयुक्त साहेब आपण आपल प्रशासन याठिकाणी सांभाळेल. आपण साडे तीन कोटी रु. दिले काय म्हणून आपण लोकांचे आरोप सहन करायचे. जर ज्यांना आरोप सहन करायचे असतील त्यांनी खुशाल करावेत आम्ही वाटल्यास त्यांना पुरावे देणार आणि सन्मा.आयुक्त, प्रशासन म्हणून ती जबाबदारी पार पाडतील, त्यांनी याचा खुलासा सुध्दा देणं आम्हांला लागतात. मा.महापौर साहेब, डॉ.भावसार मॅडमनी लिहून दिलं आहे. आता इथ बोलल पाहीजे, ढोरे म्हणून जो आपला लिपीक आहे तो खोट बोलतोय, भावसार मॅडम खोटं बोलतात, डॉ.रॉय खोट बोलतात, डॉ.पवन साळवे खोटं बोलतात कोणतरी खोट बोलतात एक म्हणत असं होतय दुसर म्हणत नाही एकदा त्याची सुध्दा शहनिशा झालीच पाहीजे. भावसार मॅडमनी सरळ लिहील की त्याठिकाणी चेकलीस्ट लावलेली आहे. त्या चेकलीस्टनुसार आपल्याला पाहीला मिळतं, जर लिहीयचच असेलतर माणूस सगळ खोट लिहील त्या सांगतात नंबर

ऑफ बेड- १३६ आहेत, नंबर ऑफ बेड- दुसर-या बाजूला १५२ आहेत, तीस-या बाजूला ३०० आहेत. तीथे मेडीकल स्टाफ उपलब्ध नाही, कॉमन टॉयलेट आहेचा उल्लेख करतात परंतू त्याठिकाणी कर्मचा-यांच मस्टर नाही त्याठिकाणी पेशंटच रजिस्ट्रेशन नाही, पेशंटची किट तीथ नाही, क्लिनींग मटेरीअल तीथ उपलब्ध नाही, कॉन्ट्रॅक्ट परसन फक्त मीस्टर प्रशांत साळूंके. आता नाव खर शोधाव, ज्यांनी हे स्टॅम्पपेपर खरेदी केले, प्रशांत साळूंके हे कोण आहेत त्यांचा आणि स्पर्श हॉस्पिटलचा काय संबंध आहे. खुप मोठा गोप्यस्फोट त्याच्या मागे सुध्दा आहे फक्त मी सभागृहात त्याची खात्री नसल्यामुळे याठिकाणी तस सांगू इच्छित नाही परंतु या प्रशांत साळूंकेचा आणि स्पर्शचा काय संबंध आहे. ज्यावेळेस मी एखादा स्टॅम्प पेपर आणते त्यावेळेस माझी एखादी संस्था मला सांगते की तुम्ही एक स्टॅम्प पेपर घेवून या त्याचवेळेला आणतो परंतु या प्रशांत साळूंकेनी याठिकाणी हे स्टॅम्प पेपर का खरेदी केले त्याची पण आपण शहनिशा करणं लागतो. त्यानंतर आपल्याकडे काहीही उपलब्ध नाही फक्त बेड ठेवले म्हणून जर ३ कोटी १९ लाख रुपये जर आपण देत असतालतर मला वाटते आम्ही १३३ जण तसे बेड लावू जर सदरचे पैसे नागरीकांचे नसतीलतर. जर असे पैसे लुटायचे असतीलतर हे करताना याठिकाणी शिक्षा, शासन तुमच्या वतीने याठिकाणी झालं पाहीजे. मा.महापौर साहेब तुम्हांला गमंत वाटेल की या मे.स्पर्शवाल्यांनी सांगीतल की मला दोन दवाखाने ३००-३०० बेडचे चालू करायचे आहेत त्यांनी सुरवातीला सांगीतल होत की आहेर गार्डन आणि शुभम मंगल कार्यालय या दोन ठिकाणी मला सुरु करायच आहे. अजीबात कोणतही विधान मी यातल पुराव्याशिवाय बोलत नाही. त्यांनी सांगीतल की आहेर गार्डन आणि शुभम मंगल कार्यालय याबाबत सहा तारखेला त्यांनी एक पत्र दिल त्यात सांगीतल की हे आम्हांला याठिकाणी करता येणार नाही कारण की आहेर गार्डन आणि शुभम गार्डन हे नदीच्या कडेला आहेत, तीथ खुप ढास आहेत, तीथ टॉयलेटची व्यवस्था चांगली करता येणार नाही, नागरीकांची त्याठिकाणी मोठी अडचण होते असं सांगीतल्यामुळे माझे संबंधित डिपार्टमेंटचे जे कोणी अधिकारी आहेत त्यांनी ते स्विकारल आणि आहेर गार्डन कॅन्सल केलं आणि राम स्मृती लॉन्स आणि हिरा लॉन्स हे दोन ठिकाण त्यांनी त्यामध्ये दिली. अवघ्या आकरा दिवसानंतर नवीन साक्षात्कार किंवा योगायोग आपल्याला म्हणायला लागेल त्याठिकाणी आपल्याला पाहीला मिळाला आणि दुसर पत्र लगेचच साई हॉस्पिटल यांनी दि. १७/८/२०२० रोजी दिल. म्हणजे यांनी पत्र कधी दिलं. ६/११/२० ला आणि १७/८/२० ला म्हणजे आवघ्या आकरा दिवसामध्ये पुन्हा या साई हॉस्पिटलवाल्याना साक्षात्कार झाला की नाही नाही, आहेर गार्डन आणि शुभम गार्डन सुध्दा चांगले आहेत त्याठिकाणी आम्हांला परवानगी दया, आणि प्रशासन डोळे झाकुन दुध पितं असं मला वाटत असेल, कुणाला काही कळत नाही चोरी काही केलीतर परंतू याठिकाणी बाकीच्यांची

डोळे उघडे आहेत हे लक्षात ठेवाव. याठिकाणी आपल्याला दिसून येतं की त्याचठिकाणी साई हॉस्पिटलला आवघ्या आकरा दिवसात पुन्हा त्याठिकाणी दवाखाना चालू करण्यासाठी किंवा सीसी सेंटर चालू करण्यासाठी प्रशासनाने परवानगी दिलेली आहे. असा काय साक्षत्कार झाला, असा काय योगायोग होतो की एका ठिकाणी एकजण सांगते की आम्हांला होत नाही म्हणजे थोडक्यात हिरा लॉन्स आणि रामस्मृती लॉन्स सुरु तर झाल नाही त्याच्यावरती प्रश्नचिन्ह आल्याशिवाय राहत नाही. असो, पण याची तुम्ही ख-या अर्थाने शहनिशा केली पाहीजे. एवढच नव्हेतर याच्यानंतर मलाही वाटल की आपण पण काय या गोष्टीच्या मागे लागलो नको आपण याठिकाणी हे सगळ आपण डोक्यातुन काढून टाकू कारण याठिकाणी आपण या सगळया डॉक्टरांवरती वाबळे साहेब निश्चितपणे तुमच्यावरती ब्लॅइंकपेज होतं. कोरोनाच्या काळातील पेशंट सांगतात टॉयलेट सुध्दा तीथे व्यवस्थित नाहीत, ताई चला एकदा आपण जावून यायच का. पण कोरोना काळावरती कुणावरती आक्षेप घ्यायचा नाही असं आपण एकदा ठरवलयना. आपल्याला कुणावरती बोलायच नाही त्यामुळे आम्ही आपल शांत राहीलोत ती काही चुक नव्हती आम्हांला वाटत की नाही आपल्या नागरीकांसाठी ती सेवा उपलब्ध करण्याच काम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेल केल असेलतर तर जी काही सुविधा होणार त्यात एकोणीस-वीस होणारच आहे. एकोणीस-वीस चालंत होत पुर्ण वीसचे वीस आपले. त्यावेळेस नागरींना खायला आन्न नव्हतं, नौकरी नव्हती, व्यावसाय नव्हता त्या काळात सुध्दा आपण त्यांचे पैसे, त्यांच्या रक्कमा आपण जमा केल्यात. मा.महापौर आम्हांला सांगायच की जस मिनल म्हणते की आम्हांला कोव्हिडच इंजेक्शन मिळत नाही तर ती तशीच फॅक्ट आहे. आणि आपल्याला दिसत वायसीएममध्य स्टॉक गेला, ऍटो क्लस्टरला स्टॉक गेला आहे, जम्बो हॉस्पिटलला आपला स्टॉक गेला आहे. परंतु तीथून आम्हांला सांगीतल जायच की इथ इंजेक्शन आम्हांला मिळत नाही, ताई कुठ मिळतय का मग आम्ही डॉ.वाबळे साहेबांना सांगायच साहेब कुठून पण दोन इंजेक्शन उपलब्ध करा एखादया एजन्सीकडे ते शक्य असेलत आम्ही त्याचे पैसे भरुन त्यांच्याकड आम्ही घ्यायला जावू. आपण काहीपण आपल्या डॉक्टरवर आक्षेप घेतो का असं वाटल, स्पर्शवाल्याचा एवढा मोठा घोटाळा खरच आहे का आणि म्हणून वॉररुमशी संपर्क साधला त्यांना म्हणाले नक्की सांगाततर आम्हांला की या वॉररुममध्ये काय झालं. माझा पेशंट या याठिकाणी ऍडमीट करा, माझा पेशंट घरकुलला ऍडमीट करा त्यानी सांगीतल आताच घरकुलची जागा संपली तुमचा पेशंट अमक्याठिकाणी पाठवला असं सांगीतल जायचं त्यांच्याकडे ३४ केंद्राची लीस्ट असायची मग त्यातले तीनशे, दोनशे, शंभर बेड असायचे त्यामध्ये किती बेड शिल्लक आहेत त्याची इंत्भूत माहीती त्याठिकाणी असायची. मा.आयुक्त साहेब ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर या तीन महीन्याची मी माहिती मागीतली

किती पेशंट मला काही डेवाईज गरज नव्हती. पण या ३४ मध्ये कुठेही हिरा लॉन्स आणि रामस्मृती लॉन्स याचा उल्लेखही दिसत नाही. जे डॉक्टर नौकरीला तुमच्याकडे तेथे होते तर त्यांच्या आकौंटला त्यांनी पगार केला असेलना. पवन साळवेनी घाईघाईने इतक ऍक्टीव्हली प्रोव्हाईड करुन ते काम केलं त्यांना वाटल की जाऊदया नंतर स्थायीची मंजूरी घेवू पहील बील दिल पाहीजे. हरकत नाही ज्यांनी काम केल त्यांना मोबदला देणं हे आपल कर्तव्य म्हणून केल असेल. सन्मा.महापौर साहेब, तुम्हांला सांगते जी काही डॉक्टरांची लीस्ट याठिकाणी जोडली आहे, कर्मचारी वर्ग जोडले आहेत, सोडून दया सफाई कर्मचा-यांच अकौंट असेल नसेल माहीत नाही परंतु तुम्हाला एक मनापासून विनंती आहे की हे जे डॉक्टर्स या यादीमध्ये आहेत त्यांच्या अकौंटसचे डिटेल्स आपण मागवायचे आहेत आणि त्यांच्या आकौंटला पेमेंट गेल की नाही हे सुध्दा आपण याठिकाणी तपासायच आणि आम्हांला सगळयांना सांगायचं. आज आपण इतक्या वेळ सांगतो की पवन साळवे खुप ऍक्टीव्ह, खुप ऍक्टीव्ह, खुप ऍक्टीव्हत्याचा काही संबंध नाही. वायसीएम हॉस्पिटल ज्यावेळेस आपण कोव्हिड पॉझिटीव्हसाठी केलं होतं त्यावेळेस शहरातील नागरीकांची त्यावेळेस ज्यांना काही वेगळे आजार होते, कुणाचा पाय फॅक्चर झाला एखादा आजारी पडलातर अशा लोकांनी कुठ जायच त्यावेळेला नौकरी नव्हती, अन्न नव्हतं अशावेळेला माझ्या नागरीकांना डी.वाय.पाटील दवाखाना उपलब्ध केला होता आणि त्या डी.वाय.पाटीलला पेशंट पाठवायला सुरुवात केली त्यावेळेस तेथे पेशंटला सांगीतल जायच तुम्हांला दोन हजार रु.भरायला लागतील, तुम्हांला हजार रुपये भरायला लागतील आणि मग नागरीक मला फोन करायचे मग आम्ही त्यावेळेस संपर्क साधला मा.आयुक्तांशी आणि त्याच बरोबर पवन साळवीशी. डॉ. पवन साळवे साहेब म्हणला के ताई आपल आदि त्यांच्या बरोबर हा करारनामा होता तोपर्यंत हे चालल मग नंतर काही होत नाही मग सन्मा.आयुक्तांशी बोलले ते म्हणाले आपण हे करुन घेतो, फास्टमध्ये करुन घेवू. मी तस पत्र डॉ.पवन साळवेना दिलं ते दिल १४/७/२०२० रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि डी.वाय.पाटील यांचा करारनामा झाला जे काही एक्स वाय झेड बील येतं शेवटी आपण सगळे जण पळत होतो ते नागरीकांसाठी पळत होतो, त्यांना न्याय देण्यासाठी पळत होतो अशावेळेला आपण लगेच त्यांच्याशी त्वरीत करारनामा करावा असा पत्रास उल्लेख असताना १४/७/२०२० रोजीच्या त्या पत्राच उत्तर मला ५/१/२०२१ ला आलं. सहा महीन्यानंतर मला माझ्या साध्या टिचभर पत्राच उत्तर आल आणि त्यात उत्तर तर इतक सुंदर आहे की मला म्हणजे मुर्ख आहे का पत्र देणारी असा प्रश्न पडला. त्यात उल्लेख केला उपरोक्त संदर्भ क्रं १ चे पत्र मिळाले आपण डॉ.डी.वाय.पाटील रुग्णालय व यशवंतराव स्मृती रुग्णालय मधील एमओयू बाबत मागणी केली आहे तथापि आपले संदर्भ क्रं १ चे पत्रास अनुसरुन कळवण्यात येते की पिंपरी चिंचवड

महापालिका कार्यक्षेत्रा मध्ये सध्या कोव्हिड आजारी बाधीत रुग्णांची संख्या घटलेली आहे. मला हे पत्र सहा महीन्यानी येतं. इतक कार्यक्षम तुमच प्रशासन असेल तर त्यांना कस हॅण्डल करायच हे तुम्हांला सांगायची शिकवायची गरज निश्चितपणे मला याठिकाणी वाटते. मी जे जे मुद्दे सभागृहात सांगीतलेले आहेत त्याच्यावर काम का करायच आहे की या सगळया मंडळीना चांगला चाप बसला पाहीजे कोव्हिडच्या काळामध्ये आम्ही १३३ जणांनी त्यांच्यावर विश्वास ठेवला त्याच्यावरती त्यांनी बघितल पाहीजे त्याठिकाणी पेशंट नाहीत, दवाखान्यात डॉक्टर नाहीत, अशी अट नव्हती तशी अट नव्हती आम्ही म्हणल नाही आपण नाही बोलायच शेवटी पार आमच्या समोर येवून उभ राहील या सर्वाना बोलल जात या का गप्प त्या का गप्प निश्चितपणे आम्ही या सभागृहाला सांगू इच्छिते की आम्ही अजीबात कुठे चुकीच असेलतर निश्चितपणे बोलल जाईल. मा.महापौर साहेब आता जे जे मुद्दे सांगीतलेत त्याचे लेखी पत्र तुम्हांला दिल जाईल त्याचा लेखी खुलासा प्रशासनाच्या मार्फत माझ्याकडे आला पाहीजे. एवढ बोलून थांबते जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.तुषार कामठे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आता मी खुलासा मागीतला त्यानंतर आपल्या सभागृहातील ज्येष्ठांनी खुप खुप विषय घेतले. विषय चांगले होते पण विषय चालला होता गॅस पाईपलाईन, उदयाचा कोव्हिड मलाही त्याच्यावर बोलायच आहे. याच्यामध्ये माझ्या लक्षातच आल नाही कोणाला ठेकेदाराला पाठीशी घालायच का कोणाला अधिका-यांचा वचपा काढायचा विषय काय चालला होता, तुम्ही कोणता विषय घेतला. वायसीएमच्या ज्या ज्या डॉक्टरांनी काम चांगली केले नाहीत त्यांना निलंबन करा कुणी कुणी शुभेच्छांचा वर्षाव केला. माझ्या कड ही व्हीसी आहे २३ जुलै २०२० ची ती दाखवता येईल का नाही हे मला माहीत नाही. गॅस कंपनीवाले जो दिक्षीत आहेत त्याच्याशी मी पाच मिनीटे संवाध साधला तेव्हा त्यांनी काय सांगीतल ते तुम्ही ऐका त्याच्यामध्ये ठेकेदार हा फक्त गुन्हेगार आहे. त्या व्यक्तीने मला तेव्हा सांगीतल पाईपलाईन गंजलेली आहे, माझ जे शटडावून गेलय, पाईप लाईन बदलली नाही. मग त्याला आपण पैसे कशाचे देतो. त्याला पोसायला पैसे दिले का आपण. त्या ठेकेदाराची चुक जे वायसीएमचे डॉक्टर आहेत ज्यांनी काम केल स्वत:चा जीव त्यांनी टांगणीला लावला आणि नागरीकांची सेवा केली अशा लोकांबंद्दल तुम्ही लोक बोलत असतालतर तुमच्यासारख पाप कोणी केल नाही हे लक्षात ठेवा. एका ठेकेदाराला वाचवण्यासाठी तुम्ही लोकांनी वायसीएमला धारेवर धरता हे चुकीच आहे. जेव्हा निवीदा प्रसिध्द झाली तेव्हा वायसीएमचे डॉक्टर नव्हतेना, तुम्ही निवीदा तशा केल्याना. त्यावेळेस सत्ता कुणाची होती ज्या

चुका झाल्यात त्या मान्य केल्या पाहीजेत. आयुक्त साहेब मी हे तुम्हांला पाठवतो. कोणाच पाप कुणाच्या माथ्यावर फोडण्याच काम नाही. जे चुकल आहे त्याला शिक्षा व्हायला पाहीजेत. ज्यांनी काम केल, लोकांची सेवा केली त्यांना बोलन चुकीच आहे. मी सुध्दा तुमच्यासारखेच पुरावे घेवून बोलतो. मी मोघम काहीही बोलत नाही. जो दिक्षीत गॅबवाले आहेत त्यांच्या वाणीतून आलेले वाक्यच तुम्हांला दाखवतो. गॅसपाईपलाईनच त्यांनी शटडावून केलतं त्यांन ते पहील्यांदाच केल म्हणला मग एवढया दिवस तो झोपला होता का. आपल्याला ऑक्सिजन लागतो हे कळत नाही का. जे ठेकेदार चुकलेत त्याच पाप महापालिकेचे जे डॉक्टर्स आहे त्यांनी काम केलेल आहे त्यांच्या माथी मारु नका, कोणालाही पाठीशी घालू नका. आपले कुणी ते नातेवाईक नाहीत. प्रशासनाच चुकलतर तुम्ही त्यांनाही बोलू शकता तो तुमचा अधिकार आहे. मला महापालिका समजत नाही मला हे पण समजत नाही पण आज मी खुप मोठे इथे खुलासे देणार आहे आणि तुम्ही पण ते छापायचे. जे तुम्ही छापताना ते लोकांनाही समजू दयात की चुकीच काय आहे आणि योग्य काय आहे ते तुम्ही लोकांनीतपासणी केल पाहीजे आणि छापल पाहीजे. आज याचा खुलासा डिन साहेब देतीलच पण जे कोव्हिडचे आणि इतर विषय चालले होते आज मंगलाताईच सुध्दा मनापासून अभिनंदन व कौतूक. त्यांनी मागे मास्क हा विषय घेतला होता काय केल त्याच्यामध्ये कुठ काय कारवाई झाली, का नाही कारवाई झाली. कुठली कंपनी त्याच्यामध्ये दोषी होती. त्या कंपनीचे नाव सांगू. काही सदस्यांनी मागेच जुलै महीन्याच्या जीबी मध्ये सांगीतल होतं कुणाचे नातेवाईक आहेत, कुणाचे साडू आहेत, कुणाचे जावाई आहेत मला त्याच्यामध्ये जायच नाही. ही माझी वाणी नाही हा महापालिकेचा अजेंडा आहे जुलै-२० चा सभावृत्तांत २४९ नंबरच पान आहे त्याच्यावर उल्लेख केला आहे त्या मास्क मध्ये जावाई महाशय कोण आहेत त्यांनाच ब्लॅकलीस्ट केल आहे का नाही कारवाई केली तुम्ही लोकांनी, कुणी दबाव आणला प्रशासनावर का नाही बोलल कोणी याच्यामध्ये, तेव्हा का शांत बसले. मंगलाताईनी विषय काढला होता त्यांच्या प्रभागात मास्क चांगले दिले नाही त्यांनी आज तो विषय काढला माझ्या डोक्यात हा विषय नव्हता. कोणी पण असू दयात स्पेसिफीक एक नाव घेत नाही. ज्या कंपन्या होत्या त्यांना ब्लॅकलीस्ट केली पाहीजे होती, का नाही केली. बोगस एमडी आहेत त्यांनी त्या पुन्हा पाठवल्या. माझी महापौरांनी सांगीतल होतं माझा सख्खा साडू वायसीएमचा ठेकेदार आहे म्हणून. त्याच साडूच्या या एमडी होत्या, त्यालाही ब्लॅकलीस्ट केल या महापालिकेनी, आम्हांलाही नाव घेता येतात. आम्हांला सुध्दा नाव घेता येतात. कोव्हिडमध्ये प्रशासनाने जे काम केलं त्याबद्दल त्यांच मनापासून अभिनंदन. आज तुम्ही अख्ख्या महाराष्ट्रामध्ये पाहाताल तर मृत्युच प्रमाण फक्त आपल्या शहरामध्ये कमी आहे,

१.८ आहे आपल्या इथ. पुण्यामध्ये सुध्दा ते आडीच आहे. जे चांगल काम केल आहे ते चांगलच केल आहे. जम्बो कोव्हिड आपण चालू केल, म्हणजे हे शासनाने चालू केल त्या जम्बो कोव्हिडमध्ये गेल्या तीन महीने एकही पेशंट नाही आपण २ कोटी ९५ लाख महीना त्यांना देतो का देतो. आपण स्टॅण्डीगला सांगीतल होतं दहा कोटी पण त्यांना दयायचे नाहीत, प्रशासनाने का दिलेत त्याचाही खुलासा तुम्ही मागा.दहा कोटी का दिले जम्बो कोव्हिड कोण नातेवाईक होत आपलं. जेवढे गुन्हेगार आहेत तेवढयावरती गुन्हे दाखल करा,स्पर्श असू, साई असू एक्स वाय झेड जे काय असतील त्यांच्यावर केले पाहीजे, जेवढे याच्यामध्ये दोषी आहेत त्यांच्यावर केल पाहीजे. नान्याला दोन बाजू असतात फक्त एकच बाजू बघुन चालत नाही. ज्या अधिका-यांच नाव घेता तुम्ही त्यांनी २ लाख ७० हजाराची लाच घेतली होती, कुठले नेते होते याच्यामध्ये.पुरावे देवून सुध्दा कोणी त्याला पाठीशी घातलं हे आख्ख्या महापालीकेला माहीती आहे आणि शहराला पण माहिती आहे. एल-१ ला एक कंपनी आली होती ऍटो क्लस्टरच पाकीट होतं एल-१ ला तो आला तेव्हा त्याच पाकीट होतं तेव्हा त्याचा रेट होता ६४८०/- होता आणि एल-२ ला जो होता त्याचा होता रेट होता १२५००/- डॉ. अनिल रॉय यांनी पाकीट बदलली, पाकीट का बदलली याचाही पुरावामी देतो आपल्याला जुलै महीन्या मधला एक विषय होताना त्याच्यामधले जे डीडी होतेना ते त्यांनी काढून या पाकीटामध्ये टाकले. रॉय यांच्या हाताखाली एक क्लार्क आहे स्वामी म्हणून त्याला दम देवून ते पाकीट बदलली. जेव्हा अनिल रॉय यांनी पाकीट बदलली त्यानंतर त्यांच्या बरोबरच दैनिकाचा एक रिपार्टर होता तो व्यक्ती त्याला घेवून आला त्यानी सांगीतल यांचे पाकीट बदललेत त्यांच्यावर अन्याय होतो. त्या टाईमाला मी तीथ गेलो आयुक्त साहेबांनी संतोष पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली दि.२२/१०/२०२० ला आणि ते माझ निवेदन दिल संतोष पाटील यांना. त्या समितीमध्ये चौघाना नेमले त्या चौघानी तेव्हा मला विनंती केली कोव्हिडचा टाईम आहे आपल्याला विषय वाढवायला नको जे आहे ते थांबवा तेव्हा त्यांच्या विनंतीला मी मान देवून मी तीथ थांबलो, ती माझी चुक झाली ती मला मान्य आहे. मी तीथे थांबलोना कारण ते काम चालू करायचे होते, त्यांना बेड अव्हेलेबल पाहीजे होते, विभागीय आयुक्तांनी सांगीतल होत दहा हजार बेडची व्यवस्था केली पाहीजे. त्यांनी म्हणले तुम्ही थांबा कोव्हिड संपल्यावर आपण त्याच्यावर भाष्य केलतर चालेल, ही संतोष पाटील यांची तेव्हा मला विनंती होती, मग मी तीथ थांबलो. माझा कुठल्याही ठेकेदाराशी डायरेक्ट संबंध नाही ज्यांच्यावर अन्याय होतो ते माझ्याजवळ येतात. एल-१ ला येवून काम देत नसतीलतर तीथ एक विश्वस्त म्हणून मी थांबणार. जीथ चुकीच काम होतात तीथ मी थांबणार. आज तुम्हांला माहीती आहे का एक जीमच टेंडर कॅन्सल केलं. का केल कुणाची कंपनी बसत नाही, कुणाचा माणूस भेटत नाही स्वच्छतेच.

संदिपनच दिल होत कॅन्सल करा म्हणून. जो कोव्हिड मध्ये चाललेला भ्रष्टाचार आपण म्हणतो जे कोव्हिड सेंटर आयुक्तांनी चालू केले ते सुध्दा चालू केले नसते जर जम्बो कोव्हिड शासनाने आजही चालू केल असतना तर आपल्याला हे चालू करायची आवश्यकता नव्हती. तेव्हा शासनाने ते का चालू नाही केले. तेव्हा शासनाने चालू केल नाही म्हणून भारतीय जनता पार्टी म्हणून आपल जे कर्तव्य होतं या शहरामध्ये ते आपण केल. अति.आयुक्त (२) यांनी खुलासा दयायचा आहे.

(सभागृहात गोंधळ)

मा.महापौर - खुलासा दयावा, सर्वानी खाली बसून घ्यावे गोंधळ करु नये. ठिक आहे संदिप वाघेरे तुम्ही बोला.

**मा.संदिप वाघेरे** -मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. तुषार कामठे यांनी जे पाच प्रश्न विचारलेले आहेत. या सभागृहाला इथ सगळयांनी सांगीतल दहा पेशंट दगावले. वास्तविक पाहता नऊ पेशंट दगावले होते. त्यात सर्वात पहील्यांदा पत्र आणि खुलासा मीच दिला होता. त्याच्यानंतर ऑगष्टच्या जीबीमध्ये मीच तो विषय घेतला. त्यावेळेस पीजीचे डॉक्टर भरतीच वायसीएममध्ये चाललेल होतं. मी त्यावेळेला सुध्दा पंधरा सोळा मिनीटे बोललो होतो. त्यावेळेला लोकांनी किंवा सभागृहाने, नेते मंडळीनी दुर्लक्ष केलं त्याच पिरीएडमध्ये वायसीएमला माझा एका डॉक्टरा बरोबर वाद झाले, आमच्या पिंपरीतला पेशंट आहे हे सगळ सभागृहाला माहीती सर्वाना माहीती आहे. माझ्यावर कारवाई करायचा पण निघाला वटहुकूम थोडक्यात पण ती कारवाई झाली नाही. जशी तुषारकड रेकॉर्डींग आहे तशी त्या प्रकरणाची रेकॉर्डींगपण माझ्याकडे आहे. आता मधल्या पिरीएड मध्ये परत चार हॉस्पिटलला गॅसपाईपलाईन पुरवठा करायच टेंडर निघालं पिंपरीत जिजामाता, भोसरीच, आकुर्डीच अशा २६ कोटीच टेंडर तो मनोजकुमार पाटील साता-याचा आहे. त्याला ब्लॅकलीस्ट केलं तीथ सल्लागार नेमला बाकीच्या गोष्टी केल्या हे सर्व मनपाच्या प्रशासनाच्या निदर्शनास आणुन दिलं आणि तो विषय त्यावेळी तीथ थांबला गेला. मा.महापौर साहेब मला एकच म्हणायच आहे की मी इथ विश्वस्त म्हणून आलो आहे माझ सर्व व्यवस्थीत आहे ज्याच कुणाच साठेलोठे कुणाबरोबर आहेत कुणाबरोबर नाहीत भले ते भाजप पक्षाचे असतील माझ्या पक्षाचे असतील, राष्ट्रवादीचे असतील, शिवसेनेच असतील आणि आज अशी परिस्थिती आलेली आहे दुध का दुध, पाणी का पाणी करा. परिस्थिती अशी झालेली आहे की “सौ चुऐं खा के बिल्ली हाज को चली” इथ प्रत्येकाचे प्रत्येका बरोबर लागेबांधे आहेत. पहील्यांदा डॉ.पवन साळवी यांचा विषय होता ज्यावेळेला त्यांच्यावरती अन्याय होत होता त्यावेळेला मीच त्यांची बाजू घेतली. ऍडीशनल जनरलच/सॉलीसिटर

जनरलच लीगल ओपीनीयन हार्डीकर साहेबांना दाखवल म्हणलं मग त्यांना अतिरीक्त चार्ज देण्यात आला. त्यावेळेला त्या डॉक्टरवरती अन्याय होतहोता अस माझ मत झाल आणि त्यांच क्वॉलीफिकेशन होत, बाकीच्या गोष्टी होत्या. डॉ.रॉय असतील, पवन साळवे असतील, डॉ.वाबळे सर असतील वाबळे सराबाबत मी एकच सभागृहात बोलेल ते कसे आले, काय आले, डीन झाले बाकीच्या गोष्टी. जेव्हा वायसीएम हॉस्पिटलमध्ये नऊ पेशंट दगावले गेले साधारण २४ ते २५ जुलैच्या दरम्यान तीथ कोव्हिडचे पेशंट एवढे वाढत होते जी पाईप लाईन आहे त्याचा डायमिटर कमी होता त्या ठेकेदारांनी तो डायमिटर वाढविण्यासाठी या बाकीच्या गोष्टीची अगोदरच यंत्रणा करायची होती. आयुक्त साहेब आपण नवीन आलात पण आमच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये १२ मार्च २०२० ला पहीले तीन पेशंट दाखल झाले, त्याच्यानंतर मग पेशंट वाढत वाढत गेले. म्हणजे १२ मार्चला जर तीन पेशंट होते, १२ मार्च ते जुलै साधारणत: हे चार महीने चार महीने मोठा स्पॅन आहे की गॅसपाईपलाईनचे डायमिटर वगैरे आणि तोपर्यंत कळल होतं की कोरोना आजार काय आहे आणि काय नाही कसा ऍटॅक करतो, निमोनियामध्ये कन्व्हर्ट होतो, रेमिडेसिव्हर बाकीच्या ब-याच गोष्टी आपण बघत होतो. आयुक्त साहेब, इथ महापालिकेमध्ये दहा आणि बारा रुपयाच नॅपकीन पंचेचाळीस रुपयाला घेतल आहे. जे उषीकव्हर तीस ते पस्तीस रुपयाला भेटत ते शंभर ते सव्वासे रुपयाला घेतल आहे. चादर जी १३८/- ती ३७७/- रुपयाला घेतली. बेडशीट ९८ ते ११० रुपयाला भेटत ते आपण जवळ जवळ ४२५/- रुपयाला घेतले. म्हणजे नको तीथ पाहीजे तेवढया प्रमाणात भ्रष्टाचार केला गेला. मी कुणाची बाजू घेवून बोलत नाही मी जी सत्य परिस्थिती आहे ती इथे मांडतो आहे. जी इथ खरेदी केली गेली महाराष्ट्र राज्य, सोलापूरच जे आहे तीथल टेंडर एसआरए मध्ये आपल्याला बरीचशे मटेरीअल भेटल. उषी, बेडशीट वगैरे सगळया त्याचा गुणवत्ता दर्जा जर बघीतला आणि आपण खरेदी केलेला गुणवत्ता दर्जा बघीतलातर जमिन आसामानाचा फरक आहे. आता राहीला हा स्पर्शचा विषय आयुक्त मा.महापौर साहेब सगळयात पहील पत्र मीच दिल की स्पर्श विनोद आडसकरांच्या अशा गोष्टी हे सगळं. स्पर्श हॉस्पिटल हे महापालिकेचे जावाई आहेत का. आज आपण ५ कोटी २६ लाख समथींग अमौंट आपण त्यांना कार्योत्तर मान्यतेच्या अगोदर देवून टाकली. मुख्य वैदयकीय अधिकारी या महापालिकेमध्ये माझ्या माहीतीनुसार आता सुध्दा डॉ. रॉय, अति.वैदयकीय अधिकारी पवन साळवे. डॉ.रॉय माझे नातेवाईक नाहीत, त्यांना मी पहील्यांदा त्या पदावरुन काढण्यासाठी पवन साळवेनां घातल होतं. पण पवन साळवे आता चुकले आहेत आणि जे सत्य आहे तेच मी मांडणार. त्या पवन साळवेनी काय केल मुख्य वैदयकीय अधिका-यांची सही राहीली, स्वत: सही केली ते बील पास केलं बाकीच्या गोष्टी केल्या. मी हार्डीकर साहेबांना सुध्दा पत्र दिलं होत की आता

कोव्हिड पेशंट कमी झाले आहेत आपण जम्बो किट पण चालू केलेलं आहे ते २०० बेडच हॉस्पिटल तीथ पेशंट असतात इकडन तीकडन ते चालू रहाव म्हणून ऍटोक्लस्टर त्यावेळेला चालू ठेवण्यात आलं. महापालिकेचा सव्वा ते दिड कोटी रुपये दर महीन्याला तीथ खर्च होतो. मी म्हणल की ते तात्पुरत्या स्वरुपात बंद करा तीथ डॉक्टर वगैरे कोणी अव्हेलेबल नसत ऍटोक्लस्टरला हे गेल्या सहा महीन्यापुर्वीच बोलतो. त्यावेळेला पेशंट कमी व्हायला सुरवात झाली होती. पण ते न करता आणि जम्बोला आठशे बेड आपण बनवलेत तीथ सव्वाशे ते दिडशे बेड असायचे आणि सहाशे ते साडे सहाशे बेड खाली असायचे. फक्त महापालिकेत जनतेच्या कररुपाने पैसे कसे आले आहेत ते कसे उधळायचे आणि मी म्हणतोना ज्याचे कुणाचे लागेबांधे असतीलना क्लेअरकट आयुक्त साहेब तुम्ही कारवाई करा आणि ही कारवाई करतानी अति.वैदयकीय अधिकारी जे पवन साळवे आहेत त्यांना थोडस निलंबन करा कारण की या सगळया प्रकरणात तेही आहेत. अजीत पवारांनी सही केली बाकीच्या गोष्टी त्यांच्या तीथपर्यंत गेल. आज माझ्या ऑफीसमध्ये पण मी प्रत्येक डॉक्युमेंट चेक करत नाही. माझ्या खालच्या लोकांनी बघीतल की मी सही करुन मोकळा करतो, वेळ नसतो ठिक आहे तसही झाल असेल. पण आज अशी परिस्थिती झालेली आहे या महापालिकेमध्ये अस कुरण करण्यासाठी झालेल आहे, की ज्याला जे जे मनाला वाटेल त्यांनीच त्या त्या गोष्टी करत गेल्या आणि त्या त्या करत आलेले आहेत त्याच्यात त्यांना पुर्ण इन्व्हॉल्व्ह होवून गेलेले आहे. आता योगेश भाई म्हणत असतील मी याच्या बाजूने बोलतो की मला असं असं झाल ते झालं किंवा तुषार कामठे म्हणाले असतीलतर असं अंस झाल. पण कुणी कुणाच्या बाजूनी न बोलता जी सत्य परिस्थिती आहे त्या परिस्थितीत आयुक्त साहेब जो योग्य निर्णय असेल तो घ्या आणि जर तुम्ही वैयक्तिक तो निर्णय नाही घेतला तर मला नाईलाजास्तव कोर्टात जाव लागेल. याच्या अगोदर मी दोन मॅटरमध्ये गेलेलो आहे तीस-याही जाईल पण मी इथ लोकांचा विश्वस्त म्हणून आलेलो आहे मला तेच काम करायच आहे. असे उदयोगधंदे करुन बाकीचे उदयोग करुन मला ते नाही करायच आणि सभागृहाला पण विनंती आहे की आपण सर्वजण इथ विश्वस्त म्हणून आलेलो आहोत आपल्याला आपल्या जनतेसाठीच, पिंपरी चिंचवडसाठीच काम करायच आहे की जेणेकरुन आपण जी कामाची मेक रोऊ ती पुढ भविष्यात येणा-या काळात सर्व लोकांना उपयोगी पडेल एवढ बोलून थांबतो, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.अभिषेक बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, आज या सभागृहामध्ये खरं तर दुष्यम पिक्चर पाहिल्यासारखं वाटायला लागलं आहे. कारवाई नक्की कोणावर करायची? खरं तर माई ज्यावेळेस कोरोनाचा काळ चालू होता आता पण चालू आहे.कोरोनाने पूर्ण जन्म घेतलेला आहे. पिंपरी चिंचवड

शहर हे शुन्याच्या आकडयावरती आलेलं होतं आणि आता परत आकडा वाढत चालला आहे. कालपासून ६०० च्या आसपास आकडा चालू आहे. आज या सभागृहामध्ये चर्चा होणे गरजेचं आहे. आपल्याकडील थेरगांव हॉस्पिटल,जिजामाता हॉस्पिटल यांची कामे ही वायसीएमच्या धर्तीवर त्वरीत चालू व्हावीत. आपण चर्चा करतो आहे ती मागे काय घडलं त्याच्यावरती करतो आहे.ज्यावेळेस ही घटना घडली त्यावेळेस आपली जनरल बॉडी चालू नव्हती,स्टँडींग चालू नव्हती आणि त्यावेळेस थेट अधिकार हे शासनाच्या प्रशासकीय लोकांना होते. त्यांना जे योग्य निर्णय वाटतील ते त्यांनी तातडीने घेण्यात यावे. आणि त्याप्रमाणे आयुक्तांना त्या,त्यावेळेस जे निर्णय योग्य वाटतील ते त्यांनी घेतलेले आहेत. त्यावेळेस इतर पक्षाचे जे नगरसेवक असतील ते या शहरातील नागरीकांच्या हितासाठी आयुक्तांना सातत्याने भेटत होते. आणि आज जे ९ लोक दगावले आहेत त्यांच्याबाबतीत जो आरोप केला जातो आहे की,भारतीय जनता पार्टीने त्याचवेळेस याबाबतीत आवाज का उठवला नाही. खरंतर या महाराष्ट्रामध्ये महाविकास आघाडीचे शासन आहे. आणि ज्यावेळेस आम्ही काही विचारायला गेलं की,म्हणायचे हे या अधिकारात होत नाही. म्हणजे शासनावरती दबाव हा या महाविकास आघाडीचा होता. त्यामुळे आपण इतर पक्षावरती आरोप करणं चुकीचं आहे. आणि ज्यावेळेस वायसीएमएच हे आपलं आहे हे लक्षात आल्यानंतर या नगरसेवकांच्या लक्षात आलं की,या शहरासाठी काय नियोजन केलं पाहिजे. त्यावेळेस कोविड सेंटरची निर्मीती या पिंपरी चिंचवड शहरामध्ये करण्यात आली. मी आपल्या सर्वांच्या निदर्शनास आणुन देतो की,आपले पेशंट ज्या,ज्या कोविड सेंटरमध्ये अँडमिट होते त्यांच्यापैकी मरण पावणा-यांचा रेशिओ शुन्य असल्यासारखा आहे. म्हणजे ज्यावेळेस प्राथमिक स्वरुपामध्ये त्या पेशंटला गरज होती की,त्याला कुठं तरी बेड उपलब्ध करुन द्यावं,कुठं तरी नेऊन ऍडमिट करावं त्या काळामध्ये आपले सर्व सदस्य पवार साहेबांच्या केबीनमध्ये ये-जा करीत होते. त्यांना वाटत होतं की,या शहरासाठी काही तरी केलं पाहिजे. अशा काही सूचना करीत होते आणि त्या सुचनानुसार महापालिकेने कोविड सेंटर तयार केले.आणि त्या सेंटर मध्ये ब-याचशा पेशंटला रिलीफ भेटला. त्या काळामध्ये बाहेरच्या खाजगी हॉस्पिटलमध्ये पेशंटचे अडीच ते तीन लाख रु.पर्यंत बिलं होत होती. आणि त्याच काळामध्ये आपण आपल्या कोविड सेंटरमध्ये पेशंटवर मोफत उपचार केले. आज सुध्दा येणा-या काळामध्ये आपण काय,काय प्रिक्कॉशन घेतले पाहिजे. आज सुध्दा बिर्ला हॉस्पिटलमध्ये पेशंट ऍडमिट झाला होता त्याचे ३ ते ३.५० लाख रु.चे बिल झाले होते. स्थायी समितीमध्ये मी कमिशनर साहेबांना विनंती केली होती की, या खाजगी हॉस्पिटलच्या बिलाच्या संदर्भात एक कमिटी तयार करावी. आणि ती कमिटी खाजगी हॉस्पिटल्स यांनी कमीत कमी किती बिलाची आकारणी करावी यासाठी

त्यांच्यावर अंकुश ठेवण्याचं काम  ही कमिटी करील. या सभागृहामध्ये मी एखादया अधिका-याचं समर्थन करणं बरोबर की चुकीचं हे मला माहिती नाही. परंतु मी स्वत: अजित पवार साहेबा सारख्या अधिका-याचं समर्थन करतो. कारण ज्या माणसांनी कोविड काळामध्ये आयुक्त लेवलचं काम  असताना अति.आयुक्त (२)  यांनी शहरातील काही समाजसेवी संघटनांना बरोबर घेऊन  प्रत्येक ठिकाणी गेले आणि त्यांना बरोबर घेऊन त्यांनी बरीचशी कामे केली. आज त्या संघटनांनी,वारकरी संघटनांनी पवार साहेबांना पुरस्कार देऊन त्यांचा सत्कार केलेला आहे. अशा व्यक्तीबद्दल जर आपण वावडे काढीत असाल तर या सभागृहाचे दुर्देव आहे. या सगळया गोष्टी माई आपण लक्षात घ्याव्या. मला माझ्या दोन प्रश्नांचा खुलासा करणेत यावा त्यामध्ये तुषारभाऊंनी जे ५ प्रश्न विचारले होते. त्याचा कमिशनर साहेबांनी खुलासा द्यावा. आणि जे कोविड सेंटर होती त्यांना बिलं कशा पध्दतीने दिली गेली आहेत या कोविड सेंटरचा महापालिकेला फायदा झाला की नाही याची सखोल माहिती द्यावी आणि पवार साहेब यांनी या काळामध्ये चांगलं काम केलेलं आहे. तरी याचा खुलासा करावा अशी विनंती करतो.धन्यवाद.

**मा.अँड सचिन भोसले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, माई मी आपल्याला सर्वप्रथम धन्यवाद देतो की,आपण मला बोलण्याची संधी दिली आहे. माझे मित्र सत्ताधारी पक्षाचे सदस्य तुषारभाऊंचे मी मनापासून कौतुक आणि अभिनंदनही  करतो.अतिशय जिव्हाळयाचा आणि गंभीर विषय त्यांच्या माध्यमातुन या सभागृहामध्ये आला आहे. त्यांनी या सभागृहामध्ये प्रश्न विचारले आणि आपण सर्वजण त्यावर चर्चा करीत आहोत. माई,सर्वात महत्वाचा प्रश्न आहे की, या शहरातील ९ नागरीकांचा नाहक बळी गेलेला आहे. आणि त्याला वाचा फोडण्याचं काम सत्ताधारी पक्षातील एका  सदस्यांनी केलेलं आहे. आणि हा आरोप केल्यानंतर सत्ताधारी पक्षातील इतर सदस्य शांत कसे? हा त्याच्या पुढचा गंभीर प्रश्न आहे. कोविडच्या काळामध्ये वैदयकीय अधिकारी,नर्स,वॉर्डबॉय या सर्वांनी काम केलेलं आहे. आणि कोरोना योध्दा म्हणुन ज्यांना सन्मानीत केलेलं आहे ते सर्व डॉक्टर्स,कर्मचारी असतील त्या सर्वांचं याठिकाणी कौतुक झालंच पाहिजे.त्यांनी जे काम केलं आहे ते कौतुकास पात्र आहेत. परंतु दुस-या बाजुने जर आपण विचार केला तर अनेक वेळेच्या चर्चेनंतर जो काही गलथान कारभार झालेला  आहे तो यापुर्वीच्या काळामध्ये घडलेला आहे त्याची देखील दखल घेणे गरजेचे आहे. याच्यावरुन यामध्ये एकंदरीत असं चित्र दिसत आहे की, चोर तो चोर आणि वर शिरजोर,साप तर मेला आहे पण आपण त्याला काठीने मारतोय उलटा चोर कोतवाल को डाटी मगाशी मंगलाताईनी सांगितलं आहे आणि सावळेताईंनी तर उद्याची हेडलाईनची दिली त्यांनाही

याठिकाणी धन्यवाद देतो की,एक चांगली हेडलाईन वर्तमानपत्रामध्ये येईल की,भाजपाच्या काळामध्ये १० लोकांचा बळी गेला. म्हणजे ४ वर्षाच्या कालावधीमध्ये तुमच्या माध्यमातुन झालेली कामं आज तुमच्याच मुखातुन याच सभागृहात उघडकीस आली ही फार निंदनीय बाब आहे.याचा मी जाहीर निषेध करतो आणि या ४ वर्षामध्ये भ्रष्टाचाराची जी काही प्रकरणे घडली आहेत याठिकाणी ठेकेदारांचेही नातेवाईक असतील त्यांनी जे काही या महापालिकेची मिलीभगत करुन महापालिकेची लुट केली आहे. ही अतिशय निंदनीय बाब आहे. मगाशी ताईंनी सांगितले की,याची चौकशी लावा यामध्ये भ्रष्टाचार झाला असेल किंवा काही कामं चुकीची झाली असतील तर त्यांना पाठीशी घालणार नाही.जो रुग्ण मेलेला आहे तो कुठल्या पक्षाचा नाही किंवा कुठल्या जातीचा नाही तो एक माणुस गेला आहे ही बाब अत्यंत दुर्देवी आहे. आणि आपण त्याच लोकांच प्रतिनिधीत्व करतो आहे. मी सत्ताधा-यांना मनापासून कळकळीची विनंती करतो की, जर तुम्ही अशा लोकांना पाठीशी घालणार असाल आणि तुमच्यामध्ये जर ती आत्मीयता असेल चुकीचा प्रकार घडला आहे आणि त्याला पाठीशी घालू वाटत नसेल तर तुम्ही आज असा विषय मंजुर करा की,जो कोणी ठेकेदार ऑक्सीजनचा सप्लाय करतो आणि त्यामध्ये काही वेळा तुटवडा झाला असेल आणि त्यामध्ये ज्या रुग्णांचा मृत्यु झाला आहे आणि त्यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्याचे आदेश माई आपण आयुक्तांना द्यावे तरच आपण माणुस म्हणुन या सभागृहात आहोत. जो माणुस गेला आहे त्याच कुटूंब आज रस्त्यावर आलेलं आहे. त्या लोकांना काय त्रास होतो काय नाही हे त्यांच्याच कुटूंबाला माहिती आहे. याठिकाणी कितीही चर्चा केली तरी त्याच्यामधुन काही मार्ग निघत नाही. जे रुग्ण गेले आहेत त्यांना श्रध्दांजली तेंव्हाच मिळेल जेंव्हा आपण जी लोक दोषी आहेत त्यांच्यावर कडक कारवाई करु आणि आपल्या सभागृहाच्या माध्यमातुन ते व्हायला पाहिजे. दुसरी गोष्ट तुम्ही जर असं म्हणत असाल ताईंनी सांगितलं की,त्यांची चौकशी करा त्याच्यामध्ये फार महत्वाची गोष्ट आहे की,तुम्ही त्याच समर्थन करत नाही असं गृहीत धरा की,तुम्ही सत्ताधा-याचं समर्थन करत नाही मग तुम्ही आतापर्यंत गप्प का होते. हा प्रश्न पुढे समोर येतो. दुसरी गोष्ट ज्याअर्थी त्या माणसाचा मृत्यु झाला त्याच्या मृत्युनंतर त्याचा पीएम झाला त्याच्या पीएम मध्ये त्याचा पॉझअप डेट आला तर तुम्ही आज काय त्याचं ढोकळे आणणार आहे का? पीएम करायला त्या माणसाचा मृत्यु कशामुळे झाला आहे त्याचा पेपर ऑलरेडी तयार झालेला आहे. त्यामुळे ही निरंक चर्चा आहे. हे सगळं लपवण्यासाठी पीएम होतच नव्हतं या शहरातील नागरीकांना सगळया गोष्टी कळतात. तुम्ही जे काही पाप केलं आहे,कोरोनाच्या काळात जी काही चुकीची कामं झाली आहेत त्यांना या शहरातील जनता कदापी माफ करणार नाही.तुम्हांला तुमच्या पापाचा घडा भरला की,तुम्हांला जावं लागणार

आहे. माणुस म्हणुन यामध्ये जी लोक दोषी आहेत त्यांच्यावर कडक कारवाई करणेत यावी एवढीच विनंती याठिकाणी करतो. जयहिंद जयमहाराष्ट्र.

**मा.अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, तुषार कामठेंनी या सभागृहामध्ये खुप चांगला विषय मांडला आहे. तुषार कामठे यांची ही पहिलीच टर्म आहे त्यांनी गेल्या ४ वर्षामध्ये इतका अभ्यास केला आहे त्याबद्यल त्यांच मी मनापासून कौतूक करतो. माई आपण या भागामध्ये सर्वजण काम करतो परंतु आपण प्रत्येकानी वायसीएमएच असेल किंवा इतर हॉस्पिटल असेल याविषयी आपली सगळयांची भूमिका येथून मागच्या काळात राहीलेली आहे की,आपण कधीही त्या खोलात जात नव्हतो. आपल्या सगळयांची एकच अपेक्षा होती की,आपण या शहरात राहतो आणि या शहरातील नागरीकांसाठी चांगल्या प्रकारे वैदयकीय सेवा द्यावी या भूमिकेतून आपण सर्वजण गेली अनेक वर्ष या शहरामध्ये काम करतो आहे. आणि त्यासाठी कै.रामकृष्ण मोरे सरांनी वायसीएमएच ची निर्मीती केली त्यानंतरच्या काळात पिंपरी चिंचवड शहरामध्ये अनेक हॉस्पिटलची निर्मीती केली आहे.आज आपल्या पिंपरी चिंचवड शहराची लोकसंख्या जवळपास २५ लाख झालेली आहे. या हॉस्पिटलचा उपभोग फक्त आपल्या शहरातीलच लोक घेत नाहीत तर देशातील सगळया काना-कोप-यातील लोक या हॉस्पिटलचा फायदा घेत आहेत. अगदी काल परवा सुध्दा दोन पेशंट हे बाहेर ऍडमिट होते. म्हणजे हे का घडतयं तर या शहराला एक फार मोठा इतिहास आहे. या शहराचे ज्या,ज्या नेत्यांनी नेतृत्व केलं आहे त्यांनी या शहरासाठी दूरदृष्टीकोनातून सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला आहे. मग तो कुठल्याही पक्षाचा असो. आज परिस्थिती बदलली आहे. परंतु जेंव्हा कोरोनाचं संकट आलं त्यावेळेचे जर आपण या मिटींगचे मिनिटस पाहिले तर आपण सगळयांनीच अशी भूमिका घेतली होती की, सगळया जगावर जे संकट आले आहे आणि आपल्या देशावर जे संकट आले आहे आणि त्या संकटावर मात करण्यासाठी या काळामध्ये आपण कुठलेही राजकारण करायचे नाही आणि या काळामध्ये आपल्या शहरातील प्रत्येक कोरोनाच्या पेशंटला मदत झाली पाहिजे. अशा प्रकारची भूमिका घेऊन त्याला आपण मदत करण्याचे ठरवले आहे. आयुक्त साहेब,आम्ही आमच्या या सभागृहातले आमचे सहकारी तीन नगरसेवक गमावलेले आहेत. आमचे दत्ता काका साने हे माजी विरोधी पक्षनेते होते. जावेदभाई शेख आणि उंडे हे तिघेही कोरोनाच्या काळात नागरीकांना मदत करताना गेलेले आहेत. त्यावेळेस अशी परिस्थिती होती की,केंद्र शासन,महाराष्ट्र शासन आणि महापालिका असे सगळे मिळून प्रयत्न करत होतो की,ज्या माणसाला व्हेंटीलेटरची गरज आहे,त्याला व्हेंटीलेटर मिळाला पाहिजे आणि ज्यांना ऑक्सीजन मिळायला पाहिजे त्यांना ऑक्सीजन मिळाला पाहिजे. मी मागे

सांगितलं होतं की,मला माझ्या चुलत्याला ऍडमिट करायचे होते आणि त्यांना ऍडमिट करण्यासाठी उभा होतो. त्यावेळेस व्हेंटीलेटरची सोय पण नव्हती. अशा परिस्थितीमध्ये सगळयांना अनुभव आलेले आहेत. त्यावेळेस आम्ही सगळयांनी भूमिका अशी घेतली की,प्रशासनाच्या पाठीशी सर्वांनी ठामपणे उभे रहायचे. त्या काळामध्ये आमचे आदरणीय नेते शरद पवार सुध्दा या महापालिकेमध्ये आलेले होते. ते का आले तर त्यांना वाटले की,आपण या शहराचे नेतृत्व अनेक वर्षापासून करीत आहोत. आणि या शहरामध्ये कशा प्रकारची व्यवस्था केलेली आहे हे पहाण्यासाठी ते स्वत:चा जीव धोक्यात घालून याठिकाणी आले होते. आणि त्यांनी याठिकाणी सर्व माहिती घेतली यामध्ये कशा प्रकारे वॉररुम तयार केले आहेत आणि ती माहिती देण्याचा आपण पण प्रयत्न केला आहे. आणि या सगळया कालखंडामध्ये शासनाने आपल्याला निर्देश दिले होते की, आपण १० हजार बेडची सोय केली पाहिजे. आणि आपल्याकडे आणि इतर ठिकाणी सुध्दा बेडचा तुटवडा होता. सुरुवातीला आपण तीन पॅकेजमध्ये टेंडर काढले त्यामध्ये पॅकेज-ए,पॅकेज-बी, पॅकेज-सी पॅकेज- ए मध्ये सुरुवातीला ६ ठेकेदारांनी सहभाग घेतला आणि बी मध्ये १६ लोकांनी सुरुवातीला सहभाग दाखवला आणि सी मध्ये १ अशा तीन कॅटेगिरीमध्ये आपण निविदा काढलेल्या होत्या. या निविदा काढताना त्यावेळेच्या प्रशासनाने अशी भूमिका घेतली होती की, आपण हे टेंडर देताना या लोकांना असं म्हटलं होत की, त्या कोविड सेंटरमध्ये जरी पेशंट आले नाही तरी त्यांना ८० टक्के बिल त्यांना अदा करणेत यावे. अशा पध्दतीचा त्यामध्ये उल्लेख आहे. याबाबतीत कालांतराने माहिती घेण्याचा प्रयत्न केला आहे की, यामध्ये नेमक्या काय अटी आहेत ते पाहिले असता त्या लोकांनी त्यांच्या सगळया स्टाफची सोय केली आहे का? त्याठिकाणी सर्व सोयी सुविधा केलेल्या आहेत का? हे त्यांनी दाखवायचे आहे. पॅकेज ए मध्ये आपण फक्त अंम्बुलंन्स,बायोमेडीकल याची सोय करायची आणि त्यामध्ये आपण फक्त लॅबची सुविधा देणार होतो आणि बाकी सर्व त्यांनी सोय करायची अशा अटी होत्या. पॅकेज –बी मध्ये त्यांनी फक्त मॅनपॉवरची सुविधा पुरवायची होती. आणि पॅकेज सी मध्ये आपण आपली जागा आणि अंम्बुलन्स आणि बायोमेडीकलची सुविधा देणार होतो. आणि त्यावेळेस त्या ठेकेदारांनी जे रेट दिले होते त्यामध्ये समजा कॅटेगिरी ए मध्ये १०० बेडसाठी रु.१४९३/-, हा दर सरसकट सर्वांना सारखा दिला नंतर ३०० बेडसाठी रु.१२१९/- दर दिला, बी-साठी ३०० बेड,२०० बेड आणि १०० बेड यासाठी अनुक्रमे रु.५००,रु.५४३/-,आणि रु.६९९/- अशा प्रकारचे दर आपण त्यांना दिले. आणि कॅटेगिरी सी मध्ये रु.११८१/- हा दर दिला आहे. आयुक्त साहेब, याच विषयावर दोन जी.बी.झालेल्या आहेत त्याला याच विषयाची पार्श्वभूमी होती. मा.महापौर साहेब,आपण सर्वांना बोलण्याची संधी द्या शेवटी

निर्णय तुम्हांला घ्यायचा आहे. सत्ता तुमची आहे पण प्रत्येकाला लोकशाहीने जो अधिकार दिलेला आहे. या तीन कॅटेगिरीमध्ये पेमेंट अदा करताना आमचे नेते योगेशजी बहल यांनी उल्लेख केला आहे की, यामध्ये स्पर्श हॉस्पिटल असेल, रुबी केअर हॉस्पिटल असेल बाकीच्या अनेक संस्थांनी कामे घेतली असतील सगळयांनाच आपण अशा पध्दतीने आपण बिलं दिलेली आहेत. म्हणजे पहिल्या कॅटेगिरीमध्ये रु.४ कोटी ८४ लाख, दुस-या कॅटेगिरीमध्ये रु.२ कोटी ३९ लाख, आणि तिस-या कॅटेगिरीमध्ये रु.१ कोटी २३ लाख दिलेले आहेत. म्हणजे यांना आपण ६५ टक्क्याप्रमाणे बिल देणार आहोत. तर याठिकाणी आपण कोटयावधी रु.चा खर्च केलेला आहे. आणि हा खर्च बरोबर केला आहे की,चुकीचा याची तपासणी झाली पाहिजे. आणि तपासणी करताना जो कोणी चुकला असेल त्याला शासन झालं पाहिजे. या तीन कॅटेगिरी व्यतिरिक्त आपल्याला आयसीयुची किती कमतरता भासत होती. आपण ऍटो क्लस्टरला एक निविदा काढली आपल्या वायसीएमएच मध्ये रुबी अल केअर आहे त्यांची सुध्दा आपण निविदा काढली आहे. या दोन्हीचे जे दर आलेले आहेत. वायसीएमएच मध्ये रुबी अल केअरचा आयसीयु चा दर रु.११९९९/- आलेला आहे. आपले जे इस्टिमेट होतं त्याच्यापेक्षा तो दर जास्त होता त्यानंतर आयुक्तांनी त्यांना दर कमी करायला लावला तो रु.७५००/- आहे. दुस-या कॅटेगिरीमध्ये आटो क्लस्टरला जी निविदा काढली त्याच्यामध्ये दोन लोक आली होती स्पर्श आणि रुबी अल केअर यांचे जे दर होते.याच्यामध्ये स्पर्शचा जो दर होता रु.६५५०/- आणि रुबी अल केअरचा दर होता तो रु.११४७०/- या कॅटेगिरीमध्ये हा दर होता आयसीयुचा ५० बेडचा त्यांच्या दोन्ही मध्ये रु.४०००/- ते ४५०० रु.ची तफावत होती. आणि दुस-या कॅटेगिरी होती त्याच्यामध्ये ऑक्सीजनचे १५० बेड होते त्याच्यामध्ये स्पर्शचा दर रु. १९५०/- आणि रुबी अल केअरचा रु.१२५९/- हा दर आलेला आहे. या दोन्ही ठिकाणी आपल्या महापालिकेचे कोटयावधी रु.चे नुकसान झालेले आहे. हे दर आपण कमी करु शकलो असतो. परंतु प्रशासन याच्यामध्ये कुठे तरी कमी पडलं आहे. आणि जास्तीचे दर आपण त्या ठेकेदाराला दिलेले आहेत. या सगळया गोष्टीची आपण चौकशी करावी. मी याचा उल्लेख का करतोय, आज परिस्थिती जरा निवळलेली असताना मगाशी अभिषेक बारणे यांनी सांगितल्याप्रमाणे आज पुन्हा कोरोनाचं संकट वाढत चाललं आहे.हे सांगण्याचं तात्पर्य हे आहे की, हे करीत असताना कॉन्ट्रॅक्टर हे कोणाचेच नसतात. हे त्या,त्या वेळेस ज्यांची सत्ता असते त्यांच्या बरोबर हे ठेकेदार काम करीत असतात. परंतु हे सगळं करीत असताना आपण सत्ताधारी असो किंवा आम्ही विरोधी पक्षात असो सगळयांचच एक नैतिक कर्तव्य आहे की,या शहरातील ज्या नागरीकांचे आपण प्रतिनिधीत्व करतो आहे.त्या नागरीकांच आर्थीक नुकसान होऊ नये त्यांना चांगल्या प्रकारची वैदयकीय सेवा मिळावी. मगाशी मंगलाताईंनी उल्लेख केला आहे की,कोरोना

काळातील प्रॉपर्टी टॅक्स माफ करणेत यावा. टॅक्स माफ करणं शक्य नाही. माई,तुम्ही शास्तीकर माफीचा ठराव केला त्यावेळेस आम्ही मागणी करत होतो की,सरसकट सगळा शास्तीकर माफ करावा. त्यावेळेस तुम्ही आमचं ऐकलं नाही त्यावेळेस राज्यात सत्ता तुमची होती. तुम्ही तो ठराव शासनाकडे चुकीचा पाठविला आहे. आणि तो मंजुर होऊन आला आहे आणि त्याचा त्रास याठिकाणच्या नागरीकांना होत आहे. आमची भूमिका त्यावेळेस पण तीच होती १०० टक्के शास्तीकर माफ व्हावा. आजही आमची भूमिका तीच आहे. राज्य शासन तुमचं होतं,महापालिकेत सत्ता तुमची होती. तरी सुध्दा हे केलं नाही. आणि आम्ही जो ठराव केलेला आहे त्यासंदर्भात आम्ही मा.अजितदादांना भेटलेलो आहे येणा-या काळामध्ये या शास्ती कराच्या संदर्भात निर्णय १००% सोडवणार आहोत.हे मी पक्षाच्या वतीने याठिकाणी सांगतो. तुषार कामठेंच्या बोलण्यातून असं आल आहे की, ऑक्सीजन न मिळाल्यामुळे वायसीएमएच मध्ये १० लोकं मृत्युमुखी पडलेली आहेत. हे जर खरं असेल तर यासाठी जे जबाबदार आहेत त्यांच्यावरती कडक शासन झालं पाहिजे.अशी अपेक्षा करतो. आणि जाता,जाता सांगतो की,महाविकास आघाडीने पुणे आणि पिंपरी चिंचवड  या शहरासाठी चांगले विषय मंजुर केले त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला.परंतु एकनाथराव तुमच्यामध्ये खिलाडूवृत्ती नाही तुम्ही अनेकवेळा या सभागृहात ठराव मांडले त्यांस आम्ही कधीही विरोध केला नाही जे चांगले आहे त्याला पाठींबा दिला आहे.राज्याच्या हितासाठी महाविकास आघाडीने  जे काही चांगले निर्णय घेतले असतील ते सुध्दा तुम्ही स्विकारलं पाहिजे.आणि कदाचित तुमच्यापैकी अनेकजण राष्ट्रवादीत येणार आहेत.मा.महापौर साहेब, येणा-या काही दिवसामध्ये बजेट सादर होणार आहे. माई,आपण गेल्या ४ वर्षामध्ये आम्हांला बजेटवर चर्चा करु दिलेली नाही. माझी आपल्याला विनंती आहे की,हे शेवटचं बजेट आहे त्या बजेटवर सर्वांना बोलण्याची संधी द्यावी आणि तुम्ही लोकांनी जो काही चुकीचा पायंडा पाडलेला आहे तो बंद करा इतर महापालिकेमधील बजेटवरची भाषणं आपण ऐकली असतील आमच्या पक्षाची लोकं आणि तुमच्या पक्षाची लोकं कशा पध्दतीने बजेट मांडतात त्यातुन आपल्याला शिकायला मिळतयं आणि माई,सभागृहाचा दर्जा घसरलेला आहे. मागच्या जनरल बॉडीमध्ये जो काही प्रकार घडला ते अतिशय चुकीचं घडलेलं आहे. त्याच्यामागचं कारण पण तसंच होत पण तसा प्रकार येथून पुढे घडू नये.

**मा.एकनाथ पवार-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह गेल्या ३ तासापासून वायसीएमएचवर ज्या सन्मा.यांनी भाषण केलं ते सगळेजण तुषार कामठेचं कौतुक करतात. अभिनंदन करत होते. प्रत्येक जण या निमित्ताने पोळी भाजत होते असं म्हणणार नाही पण मी किती स्मार्ट आहे हे मी सभागृहामध्ये

आल्या,आल्या बघितलं कधी,कधी एच.ए.च्या मैदानावर आणि त्या मैदानावर वेगवेगळया प्रकारचे मेळे दाखवतात आणि त्या मेळयामध्ये अशा वेगवेगळया पध्दतीचं नाटक त्याला तमाशामध्ये वग म्हटल जातयं अशा पध्दतीचं चित्र या सभागृहामध्ये येत असताना मी बघत होतो. तुषारचे प्रश्न काय होते? आणि तुषारच्या प्रश्नावर ३ तासानंतर आपण तुषारचे प्रश्न केले बाजुला काही प्रश्न आपण सगळं,सगळं एका बाजुला घेवुन गेला तुषारच्या प्रश्नामध्ये जो सिरीयसपणा होता तो बाजुलाच ठेवला नां त्यांनी एक गोष्ट म्हटली की,ज्यादिवशी १० लोकं गेले ते ऑक्सीजन न मिळाल्यामुळे गेले का,कोविडमुळे गेले याच्या खोलात आपण पडलो नाही. प्रत्येकाने एक गोष्ट सांगण्याचा प्रयत्न केला गेला की,सत्ताधारी भारतीय जनता पार्टीचा नगरसेवक सांगतोय मग ते खरं की,खोटं अरे काय हे ज्या पध्दतीनं आपण या महापालिकेला अनेक वर्षापासून लुटण्याचं काम केलं तेच सातत्यानं आजही करतोय नां तुषारचं यासाठी कौतुक केलं पाहिजे की,ऑक्सीजन पुरवठा करणारा जो ठेकेदार आहे तो आता आपल्या या कोविडच्या काळामध्ये महापालिकेची लुट करतोय,शहराची लुट करतोय एक सत्ताधारी पक्षाचा नगरसेवक उघडकीस आणतोय त्याच्या मागची पापं धुण्याचं काम तुम्ही करताय बघतोय मी जे २/३ तास बघतोय आपण कोण डॉक्टरच्या वेशामध्ये येतोय खरं म्हणजे मला काही,काही गोष्टींची किव येत आहे. म्हणजे साप नाही पण सरडयासारखी रंग बदलणारी माणसं ब-यांच जणांनी म्हणलं आहे की,सौ चुहे खाके ...पण कधी,कधी परिस्थिती अशी होते की,माझ्या माणसाचं,माझ्या जवळच्या,माझ्या ठेकेदाराचं काम असेल तर त्याची सुपारी घेण्याचं काम काही मंडळी करतात. ब-याच जणांनी सांगितलं आहे की,आयुक्तांची,अति.आयुक्तांची डुप्लिकेट सही केली जाते.मला नाही माहित बाबा, केल्याशिवाय याच्या आगोदर केल्या का? एवढया खोलात मी जात नाही. युडीच्या संदर्भात तर गेल्या दिड वर्षापासून आमची तर सत्ताही नाही. युडीच्या संदर्भात काय ठराव केले जातात,आम्ही काय पाठवतोय,तेथुन काय मंजुर केलं जातय तुमची सत्ता तर राज्यात आहे नां,एखादी गोष्ट प्रामाणिकपणे या सभागृहामध्ये केली जाते.अनेक जणांना स्वप्न पडलेलं आहे की,आम्ही चांगला पाठपुराव करु सर्वांनी लिहून ठेवा की,आज ९ मार्च आहे पुढच्या ९ मार्चला सुध्दा भारतीय जनता पार्टीची सत्ता असणार आहे. आपण एखादया स्वप्नामध्ये खरंच राहू नका म्हणजे एखादं स्वप्न आपण रंगवायचं आणि आपण म्हणलं ना की,आता सत्ता येईल मी आज तुम्हांला ठामपणे सांगतो मागील ४ वर्षामधील तुम्ही कुठल्याही कामाची चौकशी लावा चौकशीमध्ये जर एखादया गोष्टीमध्ये माझा एखादा नगरसेवक किंवा ठेकेदार, ठेकेदार तुमचे नाहीत का? गेल्या २५ वर्षापासून तुम्ही या ठेकेदारांना पोसण्याचं काम केलं आहे. मा.महापौर मी या सभागृहामध्ये एवढीच विनंती करतो

की,तुषारनीं जे प्रश्न विचारले आहेत ते गेल्या ४ महिन्यापुर्वी मांडलेले आहेत आणि आज त्या प्रश्नावर आपण चर्चा करतो आहे. माझं बोलणं होण्याच्या आगोदर विचारतो हा ठेकेदार कोण आहे,हा कोणाच्या जवळचा आहे, किती रुपयाला या ठेकेदाराने महापालिकेला खड्डयात घालण्याचं काम केलं आहे. त्याला पाठीशी घालणारेच खरंतर आपण पोलिस रिपोर्ट मागीतला तर सहज मिळू शकेल.आणि तुषार तुलाही सांगेन ज्यावेळेस हा प्रश्न तु मा.महापौर यांना विचारला त्यावेळेस कुठल्या नगरसेवकाचे,कुठल्या पदाधिका-यांचे  फोन आले हे जाहीर करु नको.मा.महापौर साहेब,पहिलं या ठेकेदारावर कारवाई झाली पाहिजे. त्या ठेकेदाराला पाठीशी घालणारे नगरसेवक त्यामध्ये भाजपाचाही असु द्या जो ठेकेदार आयुष्याशी खेळतोय ऑक्सीजन पुरवठयामध्ये जर त्याची अशी  भावना असेल आणि त्याला पाठीशी घालणारे भाजपाचा पदाधिकारी असो,राष्ट्रवादीचा असो,शिवसेनेचा असो त्या नगरसेवकाला महापालिकेच्या पुढच्या १० वर्षासाठी कुठल्याही निवडणुकीला उभा राहता येणार नाही अशा प्रकारचा ठराव करुन टाका. आपण चोरांना पाठीशी घालत नाही हे लक्षात ठेवा. पण जो चोरी करणारा आहे त्याला पाठीशी घालणारा त्याची वकीली करतायत अशा नगरसेवकाला सुध्दा लाज वाटली पाहिजे. दुर्देवाने आपण  सभागृहामध्ये वर्षानुवर्ष पहातो आहे. वर्षानुवर्ष या सभागृहाच्या माध्यमातून या शहरवासियांना भासविण्याचा प्रयत्न केला जातोय आम्ही या संस्थेचे विश्वस्त आहोत.अरे,विश्वस्त तर लुटायला लागलेत तर मला नाही वाटत या महापालिकेचे काय चित्र असेल.भाऊसाहेब,आपण दुर्योधन आणि महाभारतामधील परिस्थिती भिष्माचार्याच्या रुपात बघतोय. गप्प आहेत २० तास झोपतोय.कधी,कधी भाऊसाहेब,आम्हांलाही तुमचं भाषण ऐकावासं वाटतयं आणि कधी,कधी आम्ही तुमच्यापासून प्रेरणा घेतोय माझी बहिण सिमाताई ती बिचारी इमोशनल आहे मी तिलाही म्हटलं खरोखरच इमोशनल आहे ती तिला म्हटलं मंगलाताईंनी आता कसे बोलतेत,बोलतेच नां बिचारी तिला वाटलं १० लोकं मेलेत ताई १० लोकं ऑक्सीजनी गेलेच नाहीत एकीकडे कोरोनाचा काळ चालू होता १० लोकच नाही तर दुर्देवाने  २५/२५ लोक जात होते.तुषारच्या शब्दाचा विपर्यास काढून या सभागृहात चर्चाच चर्चा करणार व्वा काही मंडळी सभागृहात हुशार आहेत आणि जो मुळ विषय आहे तो भरकटुन टाकुन द्यायचा म्हणजे मला माहिती आहे की,अजित पवारांच्यावर टिका टिप्पणी चालू होती.अति.आयुक्त (२) काय केलं,काय नाही केलं,कशा पध्दतीनं केलं आधी आठवा हा ९ मार्च महिना चालू आहे. मागील वर्षाच्या १२ मार्चला या शहरामध्ये पहिला पेशंट आला आणि २२ तारखेच्या नंतर संपुर्ण लॉकडाऊन झालं त्याच्यानंतरचा ३ महिन्याचा काळ आपण आठवावा मार्च,एप्रिल,मे या महिन्यामध्ये किती लोक रस्त्यांवर होते कुठल्या,कुठल्या पक्षाची लोकं काय करीत होती.त्यावेळेस मी नुकताच सभागृह

नेतेपदाचा राजीनामा दिला होता. त्यावेळचं जर चित्र बघितलं तर बोटावर मोजण्याइतके ५/१० आयुक्त,अति.आयुक्त असतील आणि मला असं वाटतं की,हार्डीकर साहेबांनी त्यांच्या निरोप समारंभाच्या वेळी त्यांनी एक गोष्ट सांगितली होती राहूलदादा तुम्हीही त्यावेळेस होते. आपले विरोधी पक्षनेते होते त्यांनी एक गोष्ट सांगितली होती त्यावेळेसची परिस्थिती म्हणजे कोरोनाच्या काळामध्ये हाहाकार पसरलेला होता त्या काळामध्ये घेतलेला निर्णय कदाचित त्यावेळेस तो बरोबर असेल पण आज आपल्याला चुकीचा वाटतो की नाही मगाशी कोणी तरी बोलता,बोलता उल्लेख केला आपण मगर स्टेडियमला जंम्बो कोविड सेंटर चालू केलं मला पण वाटलं होतं नां मी त्यावेळेस आयुक्तांना प्रश्न विचारला साहेब आपण आटो क्लस्टरला करतोय,आपण हिंजवडी,बालेवाडी याठिकाणी केलं आहे.४० ते ५० कोटी रु.खर्च करुन आपण या मगर स्टेडियमला जम्बो कोविड सेंटर का? करतोय १०० कोटी रु.खर्च करुन आज माझ्यासारखा सामान्य कार्यकर्ता किंवा माहिती अधिकारामध्ये काम करणारा कार्यकर्ता १०० कोट रु.वाया गेले का? का कोणाच्या खिशात गेले हा प्रश्न कधी विचारला असे प्रश्न आपण या सभागृहाच्या माध्यमातुन घेण्याचा प्रयत्न करतो आहे. मा.महापौर साहेब,माझी आपल्याला विनंती आहे. खरंतर तुम्हांला पण माहिती आहे की,आपलं हे शेवटचं वर्ष आहे. आणि या शेवटच्या वर्षामध्ये एक गोष्ट १००% होणार आहे की, प्रत्येक पक्षाच्या नगरसेवकाला प्रभागामध्ये नगरसेवक व्हायचं आहे. आणि प्रत्येक पक्षाची मानसिक भूमिका अशी असते की,माझीच पार्टी फार स्मार्ट आहे. आणि माझीच पार्टी या जनतेचा विचार करु शकते. म्हणजे आपणचं आपली पाठ थोपटून घेतो मला सर्व सन्मानियांना सांगायचे आहे की,एखादी गोष्ट चांगली असेल तर १०० गोष्टी चुकीच्या आहेत नां, म्हणजे मी माझ्या या सगळया भगिनींच मी एवढयासाठी अभिनंदन केलं असत सिमाताई मी तुम्हांला भावनिक करीत नाही पुजा चव्हाणचं प्रकरण असेल ताई,खरंतर आपण या सभागृहामधल्या जाणकार आहात एखाद्या बहिणीवर अशा पध्दतीची परिस्थिती ओढवल्यानंतर काय कारवाई होऊ शकते याच सभागृहामध्ये आपण ३/४ तास भाषणं केली आहेत.म्हणजे कधी,कधी मलाही खरचं वाटतय की,माझ्यामध्ये झाशीची राणी आली पाहिजे होती.ज्यावेळेस अशा पध्दतीची परिस्थिती निर्माण होते म्हणजे आपण सभागृहाचा वेळ ३/४ तासानंतर मागच्या आठवडयामध्ये नामदेवरावांनी प्रेसनोट दिली होती. मला माहिती ती नोट किती पेपरला छापली गेली होती. मला आठवतयं की,मागच्या वेळेस मंगलाताईंनी या सभागृहामध्ये मास्क आणले होते.लाल,पिवळया कलरचे मास्क आणले होते. ही कोणाची कंपनी होती, कोणाच्या संबंधित होती. काय झालं त्याचं, दुसरी गोष्ट वायसीएमएच काय आहे हे आपण जाणुन घ्यायला कमी पडतो आहे. शेजारी डी.वाय.पाटील इन्सिटयुट

आहे,हाकेच्या अंतरावर भारती विद्यापीठ आहे, त्याच्या पुढच्या अंतरावर एमआयटी आहे. ज्या पध्दतीनं या मोठया एज्युकेशन संस्थेमध्ये पोष्ट ग्रॅज्युएट इन्सिटयुट एखादया संस्थेला मिळते आणि एखादया पोष्ट ग्रॅज्युएट विद्यार्थ्यांसाठी करोडो रु.चे डोनेशन दिलं जातयं एवढी मोठी अपॉर्च्युनिटी खरंतर केंद्र सरकारच्या माध्यमातून यशवंतराव चव्हाण हॉस्पिटलला मिळाली खरंतर त्याच कोडकौतुकच होणार म्हणजे आधी आपण वायसीएमएच म्हणलं की,डॉक्टर, डॉक्टर म्हणलं की,भांडार,भांडार म्हणलं की करपशन, सन्मा.सभागृहाच्या माध्यमातून मा.आयुक्तांना विनंती करतो की, कधी तरी एक गोष्ट लक्षात ठेवा ज्याठिकाणी पी.जी.इन्स्टिटयुट आहे आणि त्या माध्यमातून आज त्याठिकाणी किमान १०० डॉक्टर असे आहेत की,जे कोविडसारख्या रुग्णांना गेली वर्षभरापासून ट्रिटमेंट देत आहेत त्याचबरोबर अनेक रुग्णांना देखील सेवा देत आहेत वायसीएमएचच्या डॉक्टरांना माहिती आहे का हो तिथली काय परिस्थिती आहे. मा.डीन साहेब इथं आहेत डीन साहेबांना माहिती आहे का एखादी खरेदी वायसीएमएच च्या माध्यमातून केली जाते ती याठिकाणी तळमजल्यामध्ये असलेल्या भांडार विभागामधुन केली जाते. वैदयकीय विभागाच्या माध्यमातून रिक्वायरमेंटची मागणी केली जाते. आणि इथली जी खरेदी आहे ती भांडार आणि वैदयकीय अधिका-यांच्या माध्यमातून केली जाते. माझा मित्र संदीपभाऊ गेला असेल तिथं त्यांनी सांगितलं की,वैदयकीय अधिकारी कोण आहे.डॉ.रॉय आहे की,डॉ.साळवी आहे यांच भांडण कशासाठी आहे.सहीसाठी नाही तर यांच भांडण भांडारासाठी आहे लक्षात ठेवा माझा आरोप आहे. आणि ज्या,ज्या अधिका-याजवळचे सत्ताधारी पक्षाचे नेते असतील त्यांचे सगळे रेकॉर्ड तपासा,त्यांचे मेसेज तपासा त्यांनी कुठल्या अधिका-यांना कुठल्या कामासाठी १० वेळा फोन केला आहे. त्यांनी सभागृहामध्ये छातीठोकपणे सांगावं की,त्याचं कौतुक करु की, तो खरचं दोषी नाही. बिझनेस हा कोणीही करु शकतो.पण कधी,कधी सभागृहाच्या समोर आम्ही धुतल्या तांदळासारखे आहोत आणि प्रत्येक गोष्टीमध्ये पडायचं ही जर भूमिका विरोधकाची असेल तर ती अत्यंत चुकीची आहे हे लक्षात ठेवा. मा.महापौर साहेब,मी आपल्याला विनंती करतो की, याठिकाणी सहीचा अधिकार रॉयचा आहे की साळवेचा आहे याच्याशी आम्हांला काही घेणं देणं नाही. पण मला कधी,कधी दु:ख वाटतयं याच तुषारचं कोणी कौतुक केलं नाही. मागच्या ८ महिन्याच्या सर्वसाधारण सभेमध्ये लाच प्रकरण तुषारनींच काढलं नां त्यावेळेस कोणी म्हणलं नाही,तुषार आम्ही तुझं अभिनंदन करतो. कधी,कधी मलाही प्रश्न पडतो ताई, या महापालिकेमध्ये आपण सगळयात जास्त अनुभवी आहात.आणि कधी,कधी सभागृहामध्ये असं वाटतयं की,भाऊसाहेबांनी जे बोललं ते खरं आहे असं मला वाटतयं पण कधी,कधी मला असं वाटतयं की, तुम्ही एक भूमिका आता घेता आणि लगेच दोन मिनिटांत बदलून टाकता. ( सभागृहात गोंधळ) योगेशभाई

तुम्ही बोलत असताना मी मध्येच कधी कॉमेंट केलेली नाही. एक लक्षात ठेवा ज्यादिवशी मला तुमच्या विरोधात बोलायचं आहे त्यादिवशी मी ठेकेदाराच्या नावासहीत जाहीर बोलू शकतो मी कोणाच्या बापाला ३० ते ३५ वर्षामध्ये घाबरलो नाही. म्हणुन तर बोलतोय नां या सभागृहामध्ये खोटं बोलून,चोरी करुन जर म्हणत असतील आम्ही खुप संन्याशी आहोत अशा विरोधकांना ही तर जनतेला सुध्दा माहिती आहे. वायसीएमएच मध्ये कोणाचा वर्षानुवर्ष ठेका आहे. कोणाला त्रास होणार आहे वायसीएमएच जर चांगलं पध्दतीनं चालायला लागलं तर आपल्या हितचिंतकांना किती बाधा येणार आहे. हे लोकांना माहिती आहे हे आम्हांला बोलायचं नाही. आणि महापौर साहेब,मी तुषारचं अभिनंदन करतो.तुषारनी खरं तर या सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित केली आहेत.त्या प्रश्नांच्या संदर्भामध्ये या गॅस एजन्सीने किती भ्रष्टाचार केला आहे,ही एजन्सी कोणाच्या संबंधित आहे. तुषारनी एक मुद्या मागच्या काळामध्ये घेतला होता. कुठल्या ठेकेदाराने आयसीयुचे बेड देण्यासाठी कोणी दबाव आणला होता. अतिशय निकृष्ट दर्जाच आयसीयु चं किट हे ओके आहे,अत्यंत चांगलं आहे असे व्हेंटीलेटर तर ख-या अर्थाने राहुलदादा सत्ता कोणाची असु द्या पण सर्वसामान्य माणसांच्या आरोग्याशी त्याच्या जीवाशी खेळू नका हे पाप खुप मोठं लागणार आहे. आणि हे पाप करुन तुम्ही नगरसेवक व्हाल,आमदार व्हाल,खासदार व्हाल पण आयुष्यामध्ये हे पाप याच ठिकाणी फेडायचं आहे. याच जन्मात आणि इथंच फेडायचं आहे. आणि मा.महापौर साहेब,मी आपल्याला विनंती करतो की,अत्यंत चुकीच्या पध्दतीने या शहरवासियांच्या जीवांशी खेळण्याचा प्रयत्न या ठेकेदाराने केला आहे ज्या ठेकेदाराने या गॅसच्या माध्यमातून केला आहे,व्हेंटीलेटरच्या माध्यमातून केला आहे अशा ठेकेदाराला अशा ठेकेदाराला या महापालिकेच्या पुढच्या काळामध्ये एकही पैशाचा बिझनेस करता येणार नाही. अशा पध्दतीने या ठेकेदाराला काळया यादीमध्ये टाकावं. भाजपच्या सर्व नगरसेवकांना माझी विनंती आहे की, पुढच्या काळामध्ये कॉमेंट करुन पळवणारी मंडळी आहेत हे लक्षात ठेवा कोणाच्या भुलथापाला बळी पडू नका,आपल्याला आपल्या पध्दतीनं काम करायचं आहे. आपल्याला पुढच्या काळामध्ये सावध रहावं लागणार आहे,आपल्याला पुढच्या काळामध्ये २० वर्ष भारतीय जनता पार्टी सत्तेमध्ये असणार आहे. या शहरामध्ये आपल्याला बोलण्याची कोणाची हिंमत नाही. त्यामुळे तुम्ही चिंता करु नका. राष्ट्रवादीच्या नगरसेवकांनी तुम्हांला सांगितलं खुप चांगलं बोलतोय आपल्या मनामध्ये ठेवा पुढची वाटचाल आपण आपल्या पध्दतीने चालवायची आहे. एवढंच याप्रसंगी सांगतो आणि थांबतो.

**मा.तुषार हिंगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह तुषार कामठेंनी जो विषय घेतला आहे आणि सभागृहातील काही सदस्यांनी असं बोललं

आहे की, भारतीय जनता पार्टीच्या नगरसेवकांनी यामध्ये लक्ष का घातलं नाही. माझं आयुक्त साहेबांना सांगणं आहे की, कोविडला आपल्याला मार्चमध्ये सामोरं जावं लागलं पण १४ जानेवारीला मी आयुक्त साहेबांना पत्र दिल होतं वायसीएमएच मधल्या जेवढया गॅस पाईपलाईन आहेत त्या एकदम  ढिसुळ दर्जाच्या झालेल्या आहेत मी म्हणतो म्हणुन खराब म्हणु नका आपण चांगल्या आहेत असेच म्हणु त्यामुळे आपण थर्ड पार्टी म्हणुन याचं ऑडीट करावं या विषयावर मी आयुक्त साहेबांशी वेळोवेळी चर्चा केली आहे. भारतीय जनता पार्टीच्या नगरसेवकांनी वायसीएमएच मध्ये नक्की काय चालते हे आम्ही वेळोवेळी आयुक्तांच्या निदर्शनास आणुन दिलेलं आहे. त्याचप्रमाणे मी आपल्याला कोविड सेंटरच्या बाबतीत सांगु इच्छितो की,  कोविडच्या प्रादुर्भावामुळे ज्यावेळी वायसीएमएच मध्ये बेड मिळणे अशक्य झाले होते त्यावेळी ज्यांना काहीच लक्षणे नव्हती अशा पेशंटकडुन बाहेरचे हॉस्पिटल भरमसाठ पैसे उकळत होते. त्यावेळेस आपण मा.आयुक्त, मा.अति.आयुक्त २ अजित पवार साहेब असतील शहरातील सर्व संस्था असतील त्यांच्या मदतीने आपल्या शहरात दोन संघटना काम करीत आहेत. आणि त्यांना आपण सांगितलं की,आपण वायसीएमएच मध्ये येऊन पेशंटला एक दिवस द्यावा जेणेकरुन आमच्यावर जो लोड येत आहे तो कमी होईल. पण शहरातील कुठल्याही डॉक्टरांनी आपल्याला मदत केलेली नाही. त्यामुळे आपल्या वायसीएमएच वर भरपूर ताण वाढला आणि प्रायव्हेट जे हॉस्पिटल होते त्याठिकाणी लोकांची लुट चालू होती त्यावेळेस आम्ही प्रशासनाला वारंवार तक्रार केली त्यावेळेस प्रशासनाकडनं काहीच कारवाई झाली नाही. त्यावेळेस आम्ही निविदा प्रक्रीया करुन शहरातील सर्व डॉक्टरांना आणि संघटनांना  बोलावलं आणि प्रशासनाने निर्णय घेतला की, पेशंटला खरी गरज आयसीयु उपलब्ध करुन देण्यासाठी  सिम्टमॅटीक आणि नॉन सिम्टमॅटीक असे दोन प्रकार होते यामध्ये आयसीयुची  जागा कमी असल्यामुळे आपण पहिल्यांदा नॉन सिम्टमॅटीक पेशंटसाठी सेंटर केले आणि त्याठिकाणी पेशंट शिफ्ट केले. त्यानंतर ए,बी,सी कॅटेगिरीचे कोविड सेंटर निर्माण केले गेले. सेंटर सुरु करण्याच्या निविदा प्रसिध्द झाल्या सर्व निविदा मध्ये सहभागी होण्यासाठी उर्वरित सर्व संस्था त्यामध्ये सहभागी झाल्या होत्या. यापुर्वी प्रशासनाकडुन सहभागी हॉस्पिटल व संस्था यांना सेंटर सुरु करण्याचे आवाहन केले. व सर्वात विशेष हॉस्पिटल व संस्था यांनी ठरवलेल्या दराने नाही तर महापालिकेने ठरवलेल्या दराप्रमाणे कामकाज सुरु करण्याचे आदेश दिले. सेंटर चालू झाल्यानंतर त्याठिकाणच्या कामगारांचा पगार वेळेवर दिला जात नसल्यामुळे  ब-याचशा सेंटरवर कामगारांनी गोंधळ घालण्याचा सुध्दा प्रकार झाला. ब-याचशा अडचणीवर मात करीत पिंपरी चिंचवड महापालिका यशस्वी झाली आहे. व दिलेल्या मुदतीत पेशंटची संख्या कमी झाल्यामुळे बरेचसे सेंटर बंद करावे लागले. परंतु कोविड

सेंटर बंद झाले तर ते का बंद केले आहेत त्याची खात्री करुन महापालिकेनी बिले अदा करावीत अजुन काही संस्थांच बिल अदा झालेलं नाही. या शहरातील विविध संस्था असतील,विविध हॉस्पिटल असतील त्या आपल्या मदतीला उभं राहणार नाहीत कारण कोविड परत जन्म घेतोय त्यासाठी आपण शहानिशा करावी आणि जे योग्य असेल तेच करावं अशी माझी अपेक्षा आहे. त्याच पध्दतीने आपण डी.वाय.पाटीलला दरमहा पाच कोटी रु.देत होतो. त्यासंदर्भात आपण चौकशी करावी. कारण डी.वाय.पाटीलला पेशंट गेल्यानंतर तिथे पैसे घेतलेले आहेत.त्याच पध्दतीने जम्बो कोविड सेंटरला आपण २० कोटी रु.देत आहोत त्याची पण आपण चौकशी करावी. आयुक्त साहेब,मला आपल्याला सांगायचं आहे की, जेंव्हा गॅसपाईपलाईनचे जेंव्हा आपले टेंडर पब्लिश झालं त्याची सीओपी नी त्याची पुर्ण टेंडर प्रक्रीया राबविली आहे आता तत्कालीन हार्डीकर साहेब त्यांनी त्यामध्ये बदल केले आहेत व माझी आपल्याला विनंती आहे की, एकदा आपण सीओपी कडे गेलो तर ते परत चेंज करु शकतो का? गॅस पाईपलाईन हा जिव्हाळयाचा प्रश्न आहे त्यामध्ये ज्या टेक्नीकल बाबी आहेत त्या टेक्नीकल बाबी मध्ये आपण फेरफार करु शकतो का? याचा पण आपण खुलासा करावा. सीओपी ही टेंडरची जी रक्कम आहे त्याच्या १ टक्का फी घेते. त्यानुसार त्यांना २६ ते २७ लाख रु.देणार असाल तर आयुक्तांना त्या टेंडरमध्ये फेरफार करण्याची मुभा आहे का? याचा पण खुलासा करावा. याच कारण काय आहे गेल्या २/३ महिन्यामध्ये जेवढे टेंडर येत आहेत ते सगळे टेंडर कॅन्सल होत आहेत.जर का टेंडर कॅन्सल होत असेल तर आणि सीओपी कडे सगळे टेंडर जात असतील आणि आपली पुर्ण टीम काम करीत असेल आणि आपले आर्थीक बाबीचे जर का नुकसान होत असेल तर आणि हे आर्थीक नुकसान लोकांच्या टॅक्स मधुन जाणार असतील तर हे चुकीचं आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, एक तर आपण सीओपीकडं तरी जावं नाही तर टेक्नीकल टीम कडे तरी जावं मा.महापौर साहेब,आयुक्त साहेबांना मी कोरोना येण्यापुर्वीपासून सांगत आहे की,वायसीएमएचची गॅस पाईपलाईनची थर्ड पार्टी ऑडीट करावी किंवा सीओपीकडनं ऑडीट करुन घ्यावं. नेमकी काय परिस्थिती आहे ती समजेल आपल्याला यामध्ये कोण दोषी आहे हे आपल्याला समजेल एवढंच मी या ठिकाणी सांगतो. याचा वाबळे साहेबांनी खुलासा करावा आणि पवार साहेबांनी जे कोविड सेंटर चालू केले आहेत ते चालू करताना काय,काय अडचणी आल्या आहेत शहरात ठराविक लोकच काम करीत होती. त्यावेळेस पवार साहेबांनी जे निर्णय घेतले होते ते खरोखरचं योग्य होते. त्यावेळेस त्यांचे या शहरातील नागरीकांनी कौतुकही केले आहे.

**मा.राहुल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह गेल्या ३ ते ३.३० तासापासून आपण आमचे सहकारी तुषार कामठे यांनी विचारलेल्या प्रश्नांवर चर्चा चालू आहे. त्यामुळे तुषारचे मी अभिनंदन करण्याच्या आगोदर मला प्रथम आपले अभिनंदन करावे वाटते कारण आपण तुषारला प्रश्न विचारण्याची परवानगी दिली आहे. कारण मागच्या वेळेस महापौर राहुल जाधव हे आम्ही दिलेले प्रश्नोत्तर हे टोपलीतच जायचे त्यामुळे बरं वाटलं की,माईंनी आता प्रश्नोत्तर घ्यायला सुरुवात केली आहे. असेच प्रश्न दरवेळी आमचेही घ्या नाही तर असं व्हायला नको की,भारतीय जनता पार्टीच्याच सदस्यांचे प्रश्न घ्यायचे परंतु तुषारचे प्रशासनाने दिलेल्या उत्तराने बिल्कुल समाधान झालेले नाही. असं एकंदर तुषारच्या बोलण्यावरुन वाटले. परंतु प्रशासनाला प्रश्न कधी विचारले होते आणि त्याच उत्तर कधी देताय या प्रश्नावर सगळयांना बोलण्याची गरज पण आहे. माई,आपण या शहराचे मालक नाही विश्वस्त आहोत.या सभागृहात सगळयांना बोलण्याचा अधिकार आहे ठिक आहे आपली परवानगी लागते. आणि आपणही हे सभागृह लोकशाही पध्दतीनं चालवल्याबद्ल मी आपल्याला धन्यवाद देतो. माई,तुषारनी जे प्रश्न विचारलेले आहेत त्याची आयुक्त साहेबांनी चौकशी करावी आणि चौकशी करीत असताना थर्ड पार्टीकडनं करावी कारण काय होत आहे आपलीच लोक त्याची चौकशी करणार आणि सभागृहात काय प्रसिध्दी झाली सर्वपक्षीय एक गट आहे त्यांच म्हणणं आहे की,अजित पवार साहेब, एकदम चांगले आहेत आणि दुसरा गट आहे अजित पवार यांनी भ्रष्टाचार केला मला वाटत अजित पवार साहेबांनी एकदम चांगल काम केले आहे आम्ही त्याच्याबद्दल काहीच म्हणत नाही. आपण म्हणताय नां विषय भरकटतोय, विषय इकडं-तिकडं जातोय सगळा विषय हा वायसीएमएचचा आहे. आणि हा विषय जनतेच्या आरोग्याशी निगडीत असणारा विषय आहे. सर्वांना शहराच्या नागरीकांच्या आरोग्याची काळजी आहे. लोकांनी आपल्याला त्यासाठीच निवडुन दिलं आहे नां,त्यासाठीच दिलं आहे नां आपल्याला आपणही त्यांच्यासाठीच करतोय नां जनता पण आपल्या पाठीशी आहे. ऑनलाईन पण चालू आहे. आपण हे सगळं करीत असताना कुठं तरी तु,तु,मै,मै चालू आहे. मला तर असं वाटतयं की,२००७ पासून गॅस,गॅस आपण गॅसची चौकशी निश्चितपणे करावी. टिका करण्यास कोणाचेही दुमत नाही. पण कोणाची तरी एक गोष्ट लपवायची म्हणुन एक गोष्ट काढायची,मी अटॅक केला म्हणुन तो अटॅक केला हे या शहराचे दुर्देव आहे. ही चर्चा मला वाटतं पोलिस स्टेशनपर्यंत गेली आहे. ठिक आहे,आपण कोरोना काळात आपण सांगितलं की,परत असं काही घडलं तर परत येणार नाही. आम्ही पण सांगतो की,पवार साहेबांनी चांगलं काम केलं आहे. जेंव्हा आपण त्यांना सांगितलं होतं की, साहेब तुम्हांला अधिकार आहेत. स्टॅंडींग कमिटीच्या रेकॉर्डवर पण आहे तुम्ही ते रेकॉर्ड काढून बघा पण कोणीही चुकीचं काम करु नका हे सुध्दा आम्ही

त्यात सांगितलं होतं. तुम्ही काहीही करत सुटा असं आम्ही पवार साहेबांना कधीही सांगितलं नाही. ज्यावेळेस चांगल काम केलं त्यावेळेस आम्ही त्यांच्या पाठीशी आहोत. एकनाथराव तुम्ही कोविड सेंटरच काढायचं ना तुमचे आमदार आहेत नां राज्य शासनाकडे विचारतील नां, तुम्हांला राज्य शासनाची एवढी काळजी असेल पण आम्हांला इथं शहराची काळजी आहे. राज्याच्या प्रश्नाची काळजी नाही. तुम्ही काय खर्च केला,काय नाही हे सांगा नां तिथं राज्याचं अधिवेशन चालू आहे तिथं प्रश्न विचारायला सांगा. त्या पुजा चव्हाणची पण चौकशी होईल नां सगळयांना महिला भगिनींची काळजी आहे.चौकशी व्हावी असं सगळयांना वाटतयं. पण त्याचा वापर अशा पध्दतीने नाही म्हणजे ही काय लोकशाही आहे का, ही लोकशाही म्हणण्यापेक्षा कुठं तरी सुडाचं राजकारण करीत आहात.आयुक्त साहेब,चौकशी तर झालीच पाहिजे आम्ही सर्वांनी मागणी केली आहे. आयुक्त साहेब,तुम्ही वरती म्हणले स्पर्शला पैसे द्या आणि खाली जाऊन पत्रकार परिषद घेतली. मीच तुमच्या आगोदर पत्रकार परिषद घेतली आहे. मी काय सांगितलं होत साहेब,स्पर्शचा जो काही ५/७ लाख रु.खर्च झाला असेल तेवढाच द्या. मी असं म्हणलं नव्हतं की, सव्वा कोटी रु.द्या.त्याचे जे बेडस् या शहराला दिसतात त्याचे पैसे फक्त द्या.पण याचा अर्थ काय झाला, तुम्ही तर सर्व विषय कार्योत्तर मान्यतेसाठी आणले नां सगळयांनीच माहिती सगळयांना वाचून दाखवली आहे कोविड सेंटर किती होते मला वाटतं पहिले ७ सेंटर होते. आणि बाकीचे जे होते त्यामध्ये ए कॅटेगिरीचे ६ होते आणि बी कॅटेगिरीचे १६ सेंटर होते अशा या सगळया सेंटरची चौकशी करावी लागेल फक्त एकटया स्पर्श हॉस्पिटलची चौकशी करुन चालणार नाही. आणि कोणीही डॉक्टरांना दोष दिलेला नाही. ज्यांनी सेवा केली त्यांनी सेवाच केली. मला वाटतं एकनाथरावांनी सांगितलं आहे की, भांडार खरेदी करतयं आणि तुम्ही डॉक्टरांना दोष देताय. भांडारातील डॉक्टरांना आम्ही कोणीही दोष दिला नाही. ज्या खरेदीची अनियमितता झाली,ज्या ठिकाणी आम्हांला शंका आहे जे पैसे विनाकारण दिलेले आहेत त्याला आम्ही दोष दिला आहे. आपण स्पर्शला दोष दिला डॉक्टरांना कधी दोष दिला नाही. संदीपनी डॉक्टरांना दोष दिला नाही,त्यांनी जी कार्यपध्दती अवलंबली आहे त्याला दोष दिला आहे. हि कार्यपध्दती कोणी अवलंबली आहे तर ती अधिका-यांनी अवलंबली आहे. आम्ही रात्रं,रात्र डॉक्टरांना फोन केले आपल्यासारखी प्लाझमाची सिस्टीम महाराष्ट्रात कुठंच नाही. ही कामगिरी सुध्दा वाखाणण्याजोगी आहे. हे काय ४ दिवसात झालं नाही गेल्या १५ वर्षाची या शहरातील नागरीकांची तपस्या आहे तेंव्हा कुठं हे वायसीएमएच झालेले आहे. आणि तेंव्हा ती कुठं या शहरात आरोग्याची सेवा उभी आहे. ४ वर्षात आम्ही निवडुन आलो आणि अचानक चेंज झाला मी तर असं म्हणेण की, तुम्ही कोरोनात उघडे पडले मृत्यु एक झाला काय अन शंभर झाले काय मृत्यु हा मृत्युच आहे आणि

माझ्या शहरात मृत्यु कमी झाले. आणि कोविड सेंटरमध्ये कोणाला अँडमिट केले आहे नॉन सिंथमेटीक पेशंट सी.सी.सेंटरमध्ये ऍडमिट केले आहेत. मी प्रत्येकी जी.बी.मध्ये सांगत होतो की, ज्याठिकाणी  कोविड सेंटर उभे केले आहेत त्याठिकाणी मी सांगत होतो की, तिथं जायला रस्ता नाही माझं कोणी ऐकलं का? मला अगदी पवार साहेबांनी सांगितलं की,जाऊ द्या नां असं,असं आहे. मला त्यांनी नांव सुध्दा सांगितल.आणि आता भाऊ कोण हे शोधा. आणि त्यांनी मला सांगितलं हे भाऊचं आहे पण कोणाचंही असु द्या त्यात तुम्हांला काय करावं लागलं. प्रत्येक मिटींग मध्ये आम्ही म्हणायचं त्याठिकाणी एकही पेशंट नाही त्याला  कशाला पैसे देताय त्यांनी जेवढी इन्व्हेस्टमेंट केली आहे तेवढेच पैसे द्या. कशासाठी तुम्ही पैसे द्यायची घाई करताय पवार साहेब,तुम्हांला दोष द्यायचा नाही पण एवढं सगळं चांगल काम करताना कुठं तरी एक चुक झाली की मागच्या सगळया  चांगल्या  कामावर  परिणाम होतो. आणि हे काही कोणाचे वैयक्तीक पैसे नाहीत हे या शहरातील आम जनतेचे पैसे आहेत म्हणुन आम्ही ओरडतोय. सगळे जण फक्त स्पर्शवरच बोलले आहेत मी तर म्हणतो सगळया २२ सेंटरवर बोलले पाहिजे. फक्त स्पर्श हॉस्पिटलनी एकटयांनी काय केलं आहे. याच्याकडे पेशंट नव्हते म्हणुन तो तुम्हांला दिसला आणि या बाबतीत सर्वात पहिल्यांदा मीच बोललो होतो. पण ज्या ठिकाणी पेशंट होते त्यांचीही चौकशी केली पाहिजे. समीर लॉन्सचं पत्र आहे आमचं लॉन्स कोविड सेंटरला द्या याच्यावर तुमच्या सर्व अधिका-यांचे शेरे आहेत सबब मे.हॉस्पिटल यांची समीर लॉन्स यांची कोविड सेंटरचे उर्वरित  ४४ दिवसाचे बिल अदा करणेकामी पुर्तता होणेकामी  मार्गदर्शन होणेस विनंती. आता मार्गदर्शन काय झालयं प्रशासन अधिकारी किवळे करसंकलनाचे संदर्भानुसार कराची रक्कम,तुम्हांला त्याचे बिल द्यायचे विचारले आहे तुम्हांला टॅक्सचं कोणी सांगितलं आहे त्याच तो टॅक्स भरेल नां, कोणी सांगितलं होत टॅक्सच काढायला आणि मग आता तुम्ही म्हणताय ना मी जे केलं ते सगळं चांगल केलं आहे परत खाली लेखाधिका-यांकडे फाईल गेली आहे. अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी पानांक क्र.४७७ वर करसंकलन अधिका-याचे पत्र त्यांच बिल द्यायच असा साधा प्रश्न होता तुम्ही ही फाईल करसंकलन विभागाला पाठवली. प्रत्येक सेंटरमध्ये बिल कॅलक्युलेट करताना किमान ३०० बेडचे हिशोबाने बिल कॅलक्युलेट करुन केलेलं आहे. पण याठिकाणी १६० च बेडची संख्या होती हे त्यांनी सांगितलेलं आहे नां. मी तुम्हांला २५/१/ ला पत्र दिलं होतं की,मला त्याठिकाणचं हजेरी पत्रक द्या १९/१ ला आणि तुम्ही त्याच्याकडनं २५/१ ला माहिति घेताय म्हणजे तुमच्याकडं माहिती अपडेट नव्हती. म्हणजे जसं आम्ही तुम्हांला पत्र देत होतो तशी तुम्ही माहिती गोळा करीत होते का?   असं प्रशासन चालतं का साहेब, आणि परत म्हणता विषय

भरकटु नका, हा शहरातील नागरीकांच्या आरोग्याच्या संबंधितच विषय आहे नां आणि तुम्ही जो खर्च केला आहे तो शहराच्या नागरीकांच्या आरोग्यासाठीच केला आहे. कोविड,कोविड कोणी तरी म्हणलं महाविकास आघाडीनं त्यावेळेस लक्ष दिलं नाही प्रश्न असा आहे की,इथं कोणी कोणावर ताशेरे ओढायचं काम करायचं नाही इथं कोण धुतल्या तांदळासारखे नाही. प्रत्येकाला दुस-याकडे बोट करता येईल पण हे करीत असताना याठिकाणी स्पर्श आणि आटो क्लस्टर आपली अजुन जनरल प्रॅक्टीस आहे आपण करताना काय करतो एल-१,एल-२ याठिकाणी तुम्ही काय केलं आहे ५० बेड आणि १५० बेड एक आयसीयु आणि एक ओटु चं दोन टेंडर काढले याठिकाणी तुम्ही काय उल्लेख केला आहे. १२५९/- रु. त्यामध्ये तुम्ही काय केलं रेट कमी करण्यास सांगितले त्यांनी काय सांगितले १० रु कमी करतो म्हणुन सांगितले.स्पर्शनी रेट काय दिला रु. १९५०/- तरी सुध्दा स्पर्शला काम दिलं ना हे कुठल्या रेटनी काम दिलं त्याच्या रेटनी काम दिलं म्हणजे याठिकाणी तुम्ही सरळ ७०१/- रु.जास्त दिलेले आहेत हे कोणासाठी दिले आहेत आणि दुस-या बाजुला म्हणायचं मी सही करणार नाही आणि चर्चा काय म्हणताय,चर्चा हा नागरीकांचाच आहे या शहराचाच  आहे. तुम्ही सरळ म्हणताय ९ लोक गेली आहेत मी त्याचवेळेस विचारलं होतं त्यावेळेस  सांगितलं की,सांगता येणार नाही,कारण कोविडचे भरपूर पेशंट होते. आणि गॅसपाईपलाईन मध्ये जर काही असेल तर बरेच पेशंट गेले असतील मला अजिबात कोणाची बाजु घ्यायची नाही प्रशासनाची तर अजिबात घ्यायची नाही. पण एका बाजुला म्हणता यामध्ये डॉक्टरांचा काय दोष आहे आणि दुस-या बाजुला पेशंट गेल्यानंत  डॉक्टर  उत्तर द्यायला उभा रहातो. उत्तर द्यायला ठेकेदाराला बोलवा नां कशाला पाहिजेत आयुक्त आणि  अति.आयुक्त  याठिकाणी अति.आयुक्तांवर आरोप केले आहेत त्यांनाच तुम्ही उत्तर द्यायला उभं करता. त्यांनी आरोप करायचे आणि आम्ही पण म्हणयाचे त्यांनी चांगल काम केलं आहे आम्ही पण आय  विटनेस आहोत मी पहिल्या दिवसापासून म्हणजेच मार्च पासून सांगत होतो की, आपण ही चुक करु नका याच्यामध्ये भ्रष्टाचार करतील ते म्हणले नाही,नाही आता फार घाई आहे.मास्कच्या संदर्भात मी सांगत होतो की,तुम्ही कापड आणा आणि बचत गटांना मास्क बनविण्याचे काम द्या त्यावेळेस त्यांनी ते ऐकलं नाही. ते म्हणले शहरातील महिलांना रोजगार मिळेल शेवटी तुम्ही आमचं न ऐकता काय केलं एका ठेकेदारालाच काम दिलं आणि ठेकेदारांन काय केलं सगळयांना हे काम डिस्ट्रीब्युट केलं आणि हे ओपन सिक्रेट आहे प्रत्येक गोष्ट प्रत्येकाला माहिती आहे. यामध्ये काय झालं आहे मोजकी लोक खेळली जातायत  आहेत आणि बाकीची लोक खेळली जात आहेत. एवढाच विषय आहे. आणि इथं कोणीही धुतल्या तांदळासारखे नाही. पण एक आहे जो करतो ना त्याला त्याची पाप इथचं फेडावी लागणार आहेत. त्यामुळे याची तुम्ही बाहेरच्या अधिका-यांमार्फत चौकशी

करावी.हार्डीकर साहेब जाता,जाता म्हणले होते याची चौकशी लावतो. आयुक्त साहेब,मी स्थायी समितीमध्ये पहिल्यापासून सांगत होतो की, सी.सी.कशाला करताय आणि हे आपला रेटनी करताय का? तुम्ही मला साई हॉस्पिटलची १४० पेशंटची लिस्ट दिली आहे. आणि तुम्ही ही लिस्ट देताना तुम्ही त्याच्याच लेटरहेडवर दिली आहे. त्यांनी तुम्हांला जशी लिस्ट दिली तशीच तुम्ही मला आणुन दिली तुम्ही त्याची कॉफी ठेवलीच नाही. ओरीजनलच यादी देवुन टाकली. आणि ती पण कधी दिली आहे मी तुम्हांला १९/१ रोजी मागणी केली आहे आणि तुम्ही साई हॉस्पिटलकडनं लिस्ट घेतली २५/१ ला आणि मला दिली आता ती पण खुप गदारोळ झाला की,माहिती देत नाही, माहिती देत नाही म्हणुन माहिती दिली. दुस-या बाजुला साहेब तुम्ही स्वत: तुम्ही स्वत:ची फाईल पहा तिथं १६० च्या वर व्यवस्था नव्हती. ३०० बेडची व्यवस्था करायला सांगितली होती तिथं १६० बेडची व्यवस्था केली आणि मग तुम्ही ५० टक्के बिल का आगोदरच दिले. तुम्ही कॅलक्युलेशन करतानाच १६० बेडचं करुन द्यायला पाहिजे होतं.दुस-या बाजुला तुम्ही १ % एमडी घेताय तुम्ही काय म्हणताय टेंडरच्या दिवशी १ टक्का आणि उरलेले ८ दिवसांनी ३ टक्के म्हणजे एकुण ४ % म्हणजे ४ % ची अट मला वाटतं शेंडगेताईंनी वाचुन दाखवली आहे. आरोग्य कार्यकारी अधिकारी यांची कोठेही स्वाक्षरी नसुन आरोग्य वैदयकीय अधिकारी यांनी समिती सदस्य म्हणुन स्वाक्षरी केली आहे. इथं अधिकारी बसुनच होते नां, तुमच्या सोयीनुसार तुम्ही नियम बदलतात चल,आज नाही ना तो चल त्याच्याकडे फाईल पाठव त्याची सही घे मला तर मंगलाताईंनी सांगितले की,आयुक्तांच्या खोटया सहया करतात मला तर अजुन शॉक बसला आहे. आयुक्त साहेब, जर का अशा खोटया सहया होत असतील तर तुम्हांला आता काळजीपुर्वक काम करावं लागेल.याचं उत्तर तुम्हांला कुठं तरी द्यावच लागेल. एका बाजुला तुम्ही काय म्हणता तिथं पेशंट पाठवले गेले नाही. आणि दुस-या बाजुला साई सारखं हॉस्पिटलची तुम्ही त्यांना किती तारखेला सांगताय १ नोव्हेंबरला हॉस्पिटल चालू झालं आणि तुम्ही त्यांना ५/८/२० ला आदेश दिला होता. ज्यावेळेस या शहरात कोरोना रुग्ण वाढत होते त्यावेळेस एक ते दिड महिन्यांनी सेंटर का सुरु झालं तुम्ही जाणीवपुर्वक उशिरा हे कोविड सेंटर सुरु केलं का? साई हॉस्पिटलनी ४४ दिवस काम केलं होतं असा आयुक्तांचा शेरा होता. १५ ऑगष्टला ते बंद पडले. समजा आपण ४४ दिवसाच्या ऐवजी २४० दिवस पकडू १२१९ गुणिले २४०, २४० का तर आपण ८०% बिल देतो नां तर याचे एकुण बिल होतय रु.१ कोटी ३१ लाख ६५ हजार २०० दाखवलेले रुग्ण १०६० आहेत.तसे वेगळे जरी केले तरी सप्टेंबर मध्ये ५०४० व ऑक्टोबर मध्ये ५७६० म्हणजे एकुण १०८००, १०८०० गुणिले १२१९ =

१,३१,६५,२००/- रु.होतात. हे सगळं होत असताना तीन महिन्यामध्ये तुम्ही अँव्हरेज बिल कोणत्या हिशोबाने काढले आहे. हे होत असताना आमचं असं म्हणणं होतं की, तुमच्याकडे डॉक्टरांची नांवे नाही, परिचारीकांची नांवे नाहीत जे आम्ही तुम्हांला मागणी करतोय ती यादी तुम्ही देत नाही.तुम्ही जी यादी दिली आहे ती पेशंटची दिली आहे. तुम्हांला त्यांनी सांगितलं की,१६० बेडचं आहे आणि तुम्ही म्हणताय की,भाडयापोटी १ लाख रु. त्याची पण तुमची एक नोट आहे. परंतु आपला कराराराना कुठं झाला आहे समीर लॉन्स आणि साई हॉस्पिटलचा तो करारनामा तुमच्या फाईलमध्ये नाही. पण तुमच्या फाईलमध्ये असं आहे की, समीर लॉन्सचं १ कोटी ७ लाख ५२ हजार ९०० थकबाकी म्हणजे तुम्हांला काय म्हणायचं होतं तेच समजत नाही. त्या मालकांनी ५२ लाख भरुन शास्ती सोडून मला वाटतं आताच अजित गव्हाणेंनी सांगितलं आहे. म्हणजे तुम्ही त्यांचे १ कोटी ७ लाख घ्यायला निघाले होते त्यांनी शास्ती सोडून कर पुर्ण ५२ लाख भरुन टाकला. पेपरवरती दोनच महिने आहेत १ सप्टेंबर ते २४ ऑक्टोबर प्रत्यक्षात ३ महिन्याचा करारनामा करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले होते. आयुक्त साहेब,जे पैसे दिलेले आहेत त्याला काय म्हणायचे भ्रष्टाचार म्हणायचा का? डॉक्टरांचे वेतन यामध्ये नमुद नाही,हजेरीपत्रक त्यामध्ये नाही, कार्यालयाचे ऍग्रीमेंट नाही म्हणजे याला काय म्हणायचं म्हणजे आम्ही या विषयावर बोलायचेच नाही का, तुमच्या फाईलमध्ये काहीच कागदपत्र नाहीत तरी तुम्ही त्यांना पैसे दिले आहेत. आणि ज्यावेळेस आम्ही पेपर मागतो त्यावेळेस तुमचे पत्र त्यांच्याकडे गेलेले आहेत. त्यानंतरच्या तुमच्या इनवर्डच्या तारखा आहेत.ही जबाबदारी तुम्ही कोणावर टाकणार, ही जबाबदारी तुम्हांला कोणावर तरी निश्चित करावी लागेल. मला वाटतं संदीप वाघेरे हे योगेशजी बहल हे सुप्रीम कोर्टात चालले आहेत.म्हणजे तुम्ही २ कोटी रु.तुम्ही एल-१ आणि एल-२ यांना दिले.म्हणजे तुमच्या मनाला वाटलं म्हणुन तुम्ही दिले. त्यामुळे हे २/२ कोटी रु.चं नुकसान झाले आहे. याची जबाबदारी तुम्ही कोणावर निश्चित करणार आहात. आणि ही जबाबदारी निश्चित करावीच लागणार आहे. एकनाथरावांनी जाहीर भाषण केलं आणि निघुन गेले त्यांनी ब-याच वेळा सांगितलं आहे की,पार्टी,पार्टी इथं पार्टीचा काहीच संबंध येत नाही. इथं भाजपची सत्ता आहे पण भाजप सत्तेत नाही. असं ते नेहमी म्हणतात आता याचा अर्थ काय घ्यायचा तो घ्या आणि स्वत:चे नगरसेवक सांभाळा ते म्हणतात नां,कोण येतयं,कोण खाजगीत बोलतयं. आयुक्त ही खरेदी होत असताना भांडार विभागाची सुध्दा चौकशी झाली पाहिजे. संदीपनी सांगितलं आहे की,१० रु.ची उशी १५० रु.ला घेतली आहे. ११० रु.ची चादर ३५० रु.ला घेतली आहे. नामदेवरांव तुम्हीच एक पत्र द्या मी राज्य शासनाकडुन चौकशीचं पत्र आणुन देतो. पवार साहेब,तुम्ही ७०० रु.जास्त दिले

आहेत. ७०० गुणिले १५० बेड आणि २०० दिवस म्हणजे सरळ,सरळ तुम्ही २ कोटी रु.चं नुकसान केलं आहे. महापौर तुम्ही ठरवून तुषारचे प्रश्न घेतले आहेत का, तुषार तु प्रश्न विचार त्याअनुषंगाने कोविडच्या संदर्भात प्रश्न विचारले की,तुम्ही म्हणणार कोविडचे प्रश्न कशाला विचारताय आहे त्या विषयावर बोला. मग माईंनी सांगायचं वाबळे साहेब,तुम्ही उत्तर द्या नंतर सांगायचं पवार साहेब तुम्ही उत्तर द्या माई इथं जरी नवीन नगरसेवक असले तरी सगळयांना थोडं,थोडं कळतयं नां मी एकदा पवार साहेबांना बोललो होतो कशाला तुम्ही रात्री १० वा.बिल काढताय तर ते म्हणाले की,कशाला चार चौघात बोलताय आत मध्ये बोला. म्हणजे साहेब,हे सगळे जनतेचे प्रश्न आहेत सगळेच पोटतिडकीने बोलतात तेवढयाच पोटतिडकीने माईकडनं अपेक्षा आहे की,याची चौकशी लावावी. माईंनी जरी एक पत्र अँण्टी करप्श्नला पत्र दिलं तरी त्याची चौकशी सुरु होईल. अजिबात वरनं काय आणायची अजिबात गरज नाही. माझी आपल्याला विनंती आहे की,आपण सर्वजण या शहराचे विश्वस्त आहोत हे असताना शहरातील नागरीकांच्या पैशाची उधळपट्टी होऊ नये एमरजन्सी होती त्यावेळेस आपण चांगलं काम केलं आहे चांगल काम केल्यामुळे त्यावेळेस आम्ही त्यांची पाठ पण थोपटली आहे.परंतु काही काम चुकीची झालेली आहेत त्याची शिक्षा पण झाली पाहिजे. अशी मी जाहीरपणे विनंती करतो आणि कारवाई ही झालीच पाहिजे विनाकारण या सभागृहात प्रश्न विचारले, भाषणं झाली,चर्चा केली आणि चार दिवसांनी विसरले असे होता कामा नये. संदीपला काही गोष्टी बोलता येत नाहीत सत्ताधारी भारतीय जनता पार्टी म्हणुन तुम्हांला चांगलचं माहिती आहे. तर काय करा,निलंबन करुन चौकशी करा या सभागृहाचा रोख एकच आहे सगळयांची एकच भावना आहे हा जो पब्लिकचा पैसा आहे त्याची कोणीही लुट करु नये. धन्यवाद.

**मा.नामदेव ढाके** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह खरं म्हणजे गेल्या तीन-चार तासापासून या सभागृहामध्ये तुषार कामठेंनी जे प्रश्नोत्तराच्या माध्यमातुन जे प्रश्न विचारले आणि वायसीएमएच मध्ये ज्या कंपनीच्या ऑक्सीजन गॅस पुरवठाधारकाच्या संदर्भामध्ये याठिकाणी प्रश्न उपस्थित केले गेले. आणि त्यानंतर स्पर्श हॉस्पिटलच्या संदर्भामध्ये कोविडच्या काळामध्ये काही मुद्दे उपस्थित केले गेले.सन्मा.महापौर मी आपल्याला विनंती करणार आहे की, गेल्या तीन-चार तासापासून या सभागृहामध्ये दोन विषयाच्या भोवती संपुर्ण सन्मा.सदस्यांनी आपआपल्या भूमिका मांडलेल्या आहेत. मी आपणांस विनंती करेन की, प्रथमत: वायसीएम हॉस्पिटल मध्ये ऑक्सीजन गॅस पुरवठाधारक ठेकेदार आहे त्यासंदर्भामध्ये तुषार कामठेच्या प्रश्नोत्तराच्या संदर्भामध्ये आपण प्रशासनाने खुलासा करण्याची मी आपणास विनंती करतो.

आणि तसे आपण आयुक्तांना आदेश द्यावा.आणि त्यांचा खुलासा झाल्यानंतर स्पर्श हॉस्पिटलच्या संदर्भामध्ये सन्मा.सदस्यांनी जे मुद्ये उपस्थित केले आहेत त्यासंदर्भातही आयुक्तांनी खुलासा द्यावा आणि मी विनंती करणार आहे या खुलाशाच्या नंतर सविस्तररित्या मी याठिकाणी बोलणार आहे.

**मा.डॉ.वाबळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह सन्मा.तुषार कामठे यांनी विचारलेल्या प्रश्नांबद्यल पुरक उत्तर मी येथे देत आहे. त्यांनी पहिला प्रश्न विचारला होता तो म्हणजे वायसीएम रुग्णालयाकरीता दररोज किती ऑक्सिजन वापरला जातो. त्याच मी उत्तर दिलं होतं ३.५ K.L. ऑक्सिजन दररोज मागच्या एक वर्षापासून वापरला जात होता. त्यापुर्वी २००९ पासून जी खपत होती त्याच्यामध्ये कंन्टीन्यु वाढच दिसत होती. आणि ती पेशंटच्या आकडयाच्या प्रपोशनमध्ये योग्य होती असे निदर्शनास येते. २००९ ते २०१५ मध्ये जी खपत होती ती साधारण .६ ते १ K.L. म्हणजे ६०० लिटर ते १ हजार लिटर एवढी ऑक्सिजनची खपत होती. २०१६ ते १७ या दरम्यान १ ते दिड किलो लिटर म्हणजे एक हजार ते दिड हजार लिटर लिक्वीड ऑक्सिजनची खपत होती. २०१८-१९ मध्ये दिड ते दोन किलो लिटर एवढी ऑक्सिजनची खपत होत होती. आणि कोविडच्या काळामध्ये त्याचा जो आकडा आहे तो बदलला आहे. २०२० मध्ये साडे तीन किलो लिटर म्हणजे साडे तीन हजार लिटर लिक्वीड ऑक्सिजनची खपत होत होती. म्हणजे कोविडच्या काळामध्ये ऑक्सिजनची खपत ही डब्बल झाली आहे. त्याच्यामध्ये जेंव्हा आपल्या असं लक्षात आलं की,आहे तो पुरवठा पुढच्या नजिकच्या भविष्यामध्ये ऑक्सिजनचा पुरवठा आपल्याला कमी पडणार आहे. त्यामुळे आपण लगेच जी एजन्सी आहे त्यांना आपण सूचवलं होत की, आपली ऑक्सिजनची जी स्त्रोत आहे त्यामध्ये वाढ करण्याची गरज आहे. आपल्याकडे सध्यस्थितीमध्ये १० किलो लिटरची त्यावेळेस टॅंक होती.आणि ती १० किलोची जी टॅंक आहे ती फक्त २०० किंवा २२५ पेशंटला पुरेल एवढाच ऑक्सिजनचा पुरवठा करु शकेल आपण त्याच्यामध्ये वाढ करुन २० किलो लिटरची टॅंक बसवली आहे. जेणेकरुन ऑक्सिजनचे जे स्त्रोत आहेत ते जवळ जवळ ५०० ते ५५० च्या घरात आहेत ते आता सध्यस्थितीमध्ये वायसीएम हॉस्पिटलमध्ये असणा-या प्रत्येक बेडला आपण ऑक्सिजन पुरवठा केलेला आहे. आणि त्या कारणाने ही जी साडे तीन किलोची जी वाढ आहे ती योग्य आहे. दुसरा जो प्रश्न होता तो म्हणजे मुळ निविदेमध्ये काय दराने ऑक्सिजन खरेदी केला आणि आता काय दराने खरेदी केला जातो? तर मुळ निविदेमध्ये रु.२६/- प्रति क्यु.मी. इतका दर होता. आणि आता सध्या ३०/- रु.प्रति क्यु.मी.या दराने खरेदी केला जातो.त्याच्यामध्ये आपण २/३ गोष्टी या लक्षात घेतल्या पाहिजेत.

सुरुवातीचा जो दर आहे आणि त्याच्यानंतरचा जो दर आहे त्याच्यामध्ये दरवाढीची काही पुरकशी कारणे दिलेली आहेत. त्यामध्ये १) शासनाचे वाढलेले कर २) कामगारांचे वाढलेला पगार ३) भाववाढ ऑक्सिजनची जी भाववाढ झालेली होती ही कारणे होती. आणि या व्यतिरिक्त या ऑक्सिजन प्लँटचं मेन्टनंन्स,पाईपलाईनचं मेंन्टनंन्स हे सुध्दा त्याच एजन्सीकडे होतं. प्रश्न क्र.३ –मुळ निविदेमध्ये किती वर्षासाठी ठेका कालावधी होता? तो संपल्यानंतर पुन्हा निविदा काढली होती का? काढली नसल्याची त्याची कारणे सांगा. यामध्ये मुळ निविदेमध्ये ठेका कालावधी नमुद नाही.परंतु मा.स्थायी समिती ठराव क्र.१६८८२ दि.१२/१२/२००६ अन्वये, मे.गॅब एंटरप्रायझेस यांना १५ वर्ष कालावधीकरिता करारनामा करुन Liquid Medical Oxygen Plant उभारण्यास मान्यता देणेत आली असुन दि.३/१२/२००७ रोजी तसा करारनामा करणेत आला आहे. त्यानुसार प्रकल्पाची मुदत दि.१५/१०/२०२३ पर्यंत आहे. सदरचा कालावधी संपुष्टात आला नसल्याने पुन्हा निविदा काढण्यात आलेली नाही. निविदा कालावधी संपुष्टात येण्या आगोदर नवीन निविदा काढण्याची कार्यवाही करण्यात येईल. प्रश्न क्र.४ – ऑक्सिजनची गाडी खाली घेताना तो पहाणेसाठी कोणत्या अधिका-यांची नेमणुक केली आहे? त्यांची शैक्षणिक पात्रता काय आहे? हे काम आपण वायसीएमएच चे जे भांडार विभाग आहे त्यांच्याकडे हे काम सुपूर्द केले आहे. आणि त्याच्या वजनाचं जे काम आहे ते जिथं जवळ Digital weighing machine जिथं मोठया गाडयांच वजन करतात Digital असल्या कारणाने तिथं योग्य रितीनेच होत आहे असं मला वाटतयं. सन्मा.सदस्य तुषार कामठे यांनी सभागृहामध्ये स्टार हॉस्पिटल बद्दलची एक पावती त्यांनी दर्शवली त्या पावतीची जर का मला कॉपी मिळाली तर मला त्याची शहानिशा करुन जे गॅस पुरवठाधारक आहेत त्यांच्याकडुन खुलासा मागवुन त्याचा अहवाल सन्मा.आयुक्त साहेबांना सादर करण्यात येईल. प्रश्न क्र.५ यामध्ये प्रत्यक्षात वापरात येणा-या ऑक्सिजनचे रेकॉर्ड कसे ठेवले जाते? याचे उत्तर आहे प्रत्यक्ष वापरण्यात येणा-या ऑक्सिजनचे रेकॉर्ड भांडार विभागाकडील दैनंदिन साठा नोंद रजिस्टर क्र.११६ मध्ये ठेवली जाते. मी येथे नम्रपणे नमुद करु इच्छितो की, ऑक्सिजन पुरवठयाच्या कमतरतेमुळे कोणत्याही पेशंटचा मृत्यु झाल्याचे निदर्शनास येत नाही. तसं झालं असतं तर वायसीएमएच मध्ये जवळपास ४५० ते ५०० पेशंट हे हॉस्पिटल मध्ये अँडमिट होते. आणि ९ मृत्यु झाल्याचा त्यावेळचा जर हा आकडा आपण बघितला ज्यादिवशी शटडाऊन घेतला त्याच दिवशी याची जास्तीची वाढ दिसली असती तर तसं निदर्शनास येत नाही. ऑक्सिजनची कमतरता पुढे आपल्याला जाणवणार याचं नियोजन आपण वेळेतच केलं होतं

आणि त्यादृष्टीने पावलं उचलून संबंधित जी एजन्सी होती त्या एजन्सीला आपण तसे निर्देश दिले होते. आणि त्या कारणानंच आपण त्या महिन्यात २० किलो लिटरची मोठी टँक बसवुन घेवु शकलो आणि योग्य प्रमाणात आपण ऑक्सिजनचे स्त्रोत/आऊटलेट हॉस्पिटलमध्ये निर्माण केले जेणेकरुन प्रत्येक बेडला आपण ऑक्सिजन देवु शकलो. मी आपल्याला आणखीन एक माहिती देवु इच्छितो कोविडच्या मागच्या काळामध्ये मार्च पासून ते नोव्हेंबरपर्यंत आपण टोकन स्क्रीन केलेले पेशंट २१००० त्याच्यामध्ये पॉझिटीव्ह पेशंट जे दवाखान्यामध्ये अँडमिट झाले ते १६५०० त्याच्यामध्ये दगावलेल्या पेशंटची संख्या आहे ८५० हा सर्वात चांगला रिकव्हरी रेट आपल्या वायसीएम हॉस्पिटलचा होता. त्याच दरम्यानचा आपण तशी तुलना करु नये पण जर ससुन हॉस्पिटलचा परफॉर्मन्स बघितला तर त्याठिकाणी साधारण ४५०० पेशंट अँडमिट होते आणि त्याठिकाणी डेथ झालेल्या पेशंटची संख्या पाहिली तर तिथं १६०० होती. हा त्याच दरम्यानचा आकडा आहे. ऑक्सिजनचा जो पुरवठा असतो तो हा फक्त आयसीयु मध्येच ऑक्सिजन लागतो असे नाही. आयसीयु व्यतिरिक्त आपण प्रत्येक बेडला जनरल वॉर्डमध्ये कोविडसाठीचे ६१० बेड उपलब्ध आहेत त्याच्यापैकी ५७४ बेडला आपण ऑक्सिजन दिलेला आहे. म्हणजे याचा अर्थ ऑक्सिजन हा फक्त आयसीयु मध्येच पुरवठा होतो असे नाही. दुसरं आपण जो वॉर्डमध्ये ऑक्सिजन सप्लाय करतो तो मॅग्झीमम १५ लिटर पर लेग या रेटनी सप्लाय करतो. आणि आयसीयु मध्ये तोच जो रेट आहे ६० लिटरपर्यंत जातो. व्हेंटीलेटरवर लागणारा जो पुरवठा आहे तो ६० लिटर प्रति मिनिट या रेटनी फ्लो होतो. तर फक्त आयसीयु मध्ये अँडमिट होणा-या पेशंटचीच संख्या आपल्याला गृहीत धरावी लागत नाही. वॉर्डमध्ये जे पेशंट अँडमिट होते त्यांची पण आपल्याला संख्या धरावी लागेल. समजा आपल्या हॉस्पिटलमध्ये ५०० ते ५५० पेशंट अँडमिट आहेत ज्यावेळेस पीच पिरीएड होता त्यावेळेस ३०० ते ३५० पेशंट हे ऑक्सिजनवर असायचे आणि त्याच्यामध्ये ऑक्सिजनवर असणा-या पेशंटला या सुचना दिलेल्या असतात तुम्हांला जर गरज लागली तर हा नॉब आहे त्याची वाढ किंवा कमी लागली तर करु शकता त्या पेशंटला तसे करता येते. म्हणजे ब-याच वेळेला असेही व्हायचे की,पेशंटला थोडा वेळ तो ऑक्सिजन घ्यायचा नंतर तो काढुन ठेवायचा.

**मा.तुषार कामठे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह सन्मा.डीन साहेबांनी जो खुलासा केला आहे. २०२०-२१ मध्ये ऑक्सिजन लागला आपल्याला १० लाख ६९ हजार त्यावेळेस तुमच्या जवळ पेशंट होते २२१८७ त्यानंतर तुम्ही बिल अदा केलं २ कोटी २४ लाख रु.२०१९-२० मध्ये तुमच्या जवळ पेशंट होते ३६००० ही पेशंटची लिस्ट तुम्ही आणुन दिली आहे का? ऑक्सिजन किती लागणार आहे हे पण तुम्हीच दिलेलं आहे. तुम्ही जे

सांगताय याच्या आधी कोविडच्या आधी आपल्याला ६०० ते १००० किलो लागत होता. त्यावेळेस तुम्ही जी बिलं दिलेली आहेत त्याचा आणि आताच्या बिलाचा ताळमेळच लागत नाही. तुम्ही सांगितलं आहे की,आपल्या भांडार विभागामध्ये त्याची नोंद असते. ती नोंद कशाची असते आपण जो ऑक्सिजन घेतोय जी गाडी खाली होते त्या हिशोबाने सांगितलं आहे. तुम्ही ऑक्सिजन किती वापरला आहे त्याची नोंद आपल्या वायसीएमएच मध्ये कुठेच नाही. कोविडच्या नावाखाली ठिक आहे पण ही माहिती फक्त तुमचा गॅबवाला देवु शकतो. आपल्या वासीएमएच मधला एकही माणुस देवु शकत नाही. हे छातीठोकपणे मी आपल्याला सांगु शकतो. आता तुम्ही पेशंटची यादी नंबरवाईज देणार जेंव्हा २०१० मध्ये २४००० पेशंट झाले तेंव्हा त्याचे बिल दिले ७० लाख रु. आज तुम्ही २०२०-२१ पेशंट दाखवताय २२००० त्याचं बिल दाखवताय २ कोटी २४ लाख रु. तुम्ही सांगितलेलं आहे की, निविदेमध्ये नमुद केलेला दर तेंव्हा होता रु.२६/- आणि आता होता रु.३०/- त्यामध्ये भाववाढ, पगारवाढ,डिझेलची वाढ दाखवली आहे. डिझेलची वाढ ही आता झाली आहे नां. २००९ आणि आताच्या डिझेलच्या रेट मध्ये खुप तफावत आहे. त्यावेळेस त्याला महागाई भत्ता नव्हता, डिझेलचे दर वाढले नव्हते, मेन्टनंन्स वाढलेले नव्हते. मेन्टनंस्चे पैसे आपण पेड केलेले आहेत. एक लक्षात ठेवा तुम्ही जो खुलासा केला आहे तो चुकीचा आहे. आयुक्त साहेब,आपण याच्यामध्ये चौकशी करावी. याच्यामध्ये चौकशी समिती लावा. त्या समितीचा जो काही अहवाल येईल त्याप्रमाणे तुम्ही निर्णय घ्या. आणि ही चौकशी बाहेरच्या अधिका-यांकडनं लावा. पण जे सत्य आहे ते या सभागृहापुढं आले पाहिजे. तुम्ही जो खुलासा केला आहे आनंद आहे पण त्या खुलाशाने आम्ही समाधानी नाही. ही जी आकडेवारी दिलेली आहे ती त्यांनीच दिलेली आहे. आणि याच्यामध्ये आणि बिलामध्ये खुप तफावत आहे. मा.महापौर साहेब,आपल्याला माझी विनंती आहे की,तुम्ही चौकशी समितीची नेमणुक करुन याची चौकशी लावावी.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह याठिकाणी आपण गेल्या ३/४ तासांपासून ज्याविषयावर चर्चा करतो आहे आणि खुल्या मनाने आपण चर्चा करु दिली त्याबद्दल महापौर आपले अभिनंदन आणि आभार मानते. डॉक्टर साहेब,आमचा प्रश्न एकच होता की, जे ९/१० लोक गेलेली आहेत ती खरचं ऑक्सिजनमुळे गेली असतील तर त्या कॉन्ट्रॅक्टरवर कारवाई झाली पाहिजे. त्याला ब्लॅकलिस्ट केलं पाहिजे. आपण जे सांगितलं आहे की,ते गॅसच्या कमतरतेमुळे पेशंटचा मृत्यु झाला नाही. त्यामुळे आमचा जीव भांडयात पडला आणि बरं वाटलं धन्यवाद. आणि एकंदर वाबळे साहेबांची जर का बिजागरी पाहिली तर त्यांच्यावरती विश्वास ठेवावा असेच आहे.आणि त्यामुळे

तुम्ही जो  खुलासा केला आहे त्यातुन आमच्यावर जे आमच्यावरती पाप येणार होतं ते येणार  नाही. अनेक लोकांनी मगाशी सांगण्याचा प्रयत्न केला आहे की, सिमाताईंनी तर उद्याच्या पेपरला हेडलाईनच दिली आहे. जे काही लोक गेले डॉक्टरांनी केलेल्या खुलाशामुळे  त्यातनं आम्हाला  वाचवलेलं आहे. मा.महापौर साहेब,मा.कमिशनर साहेब, मगापासनं जी चर्चा चालली आहे त्याला ख-या अर्थानं त्याला विराम देण्याची वेळ आलेली आहे. आणि कमिशनर साहेब,चौकशीची आम्ही पहिल्यापासून मागणी केली होती. एक कमिटी नेमुण आपण कारवाई केली पाहिजे. दुसरं असं आहे की,स्पर्श हॉस्पिटलवर खुप चर्चा झालेली आहे. कमिशनर साहेब,आपल्याकडे रामस्मृती मंगल कार्यालय आणि हिरा लॉन्सवरती याठिकाणी आपण कोणाला काम दिलं होतं तर  फॉर्च्युन स्पर्श हेल्थ केअर प्रा.लि. यांच्याबरोबर आपली वर्कऑर्डर असायला पाहिजे होती. ती त्यांच्या नावाने नसुन नुसती स्पर्श हॉस्पिटल या नावाने ऑर्डर आहे. डॉ.आम्ही फक्त स्पर्श हॉस्पिटलवरती नाही तर फॉर्च्युन स्पर्श हेल्थ केअर प्रा.लि.वरती त्यामुळे ते डायरेक्टर दिसतात त्यांनी राजीनामा दिला होता की नाही हे मला माहिती नाही. परंतु आपण जर का बँकेत गेलो आणि नावांमध्ये समजा माझ नांव  सिमा आहे. Seema, आणि  Sima  असे पण होते. आणि ते जर का चुकलं तर बँक ॲक्सेप्ट करीत नाही. मगापासून अनेक लोकांची बोलण्याची इच्छा आहे. पवारांकडे पण आमचे अति.आयुक्त २ हे खुपच खतरनाक आहेत त्यांच्या बाबतीत बोलावं की नाही असा प्रश्न आम्हांला पडतो. त्यांचे अनेकांशी हितसंबंध आहेत आणि मला मगापासनं किव येते की, यांच्याबाबतीत जे,जे बोलले मा.महापौर साहेब आणि कमिशनर साहेब तुम्हांला ओपन चॅलेंज आहे आणि तुम्हांला  विनंती करायची आहे की, याची अँण्टी करप्शन मार्फत  एकदा चौकशी  होऊनच जाऊ द्या. यांचे पण सापडतील आणि आमचे पण सापडतील अरे,हा काय खेळ लावला आहे हो,काय खेळ लावला आहे इथं काय  तुम्ही आम्हांला मुर्ख समजता का? अरे,१५,१५ वर्ष काढलेत. तुम्हांला काय वाटतं, अटी शर्ती टाकल्या म्हणुन तुम्ही खेळता नां, नाही होऊ देणार आम्ही तुम्ही या सभागृहात लहान आहात,बच्चा आहात असं नाही करता येणार साहेब, आणि मला वरच्या अधिका-यांनाच सांगायचं आहे की,आपण कोणावर विश्वास टाकुन काय,काय खेळ करतो.नवीन आहेत त्यांच किती ऐकायचं हे पण आम्ही ठरवलं पाहिजे नां, म्हणजे आम्ही ऐकुण घेतो म्हणजे आम्ही चोर आहे का? या महानगरपालिकेमध्ये आम्हांला कोणी शिकवायची गरज नाही. मगापासनं हे जे काही चाललं आहे मला असं वाटत स्पर्शमध्ये ज्या,ज्या एजन्सी होत्या नां त्यांची नांव उघडकीस आणा,आणलीच पाहिजे आणि यांची बॅक अकौंट तपासा आणि जे सब कॉन्ट्रॅक्टर होते त्यांच्या नावांवर पैसे कसे ट्रान्सफर झाले ते ही सांगा सगळीकडे हैदोस चालू आहे. इकडं

काय तेच, त्याठिकाणी गेले तेच, तिकडं गेलं तेच, हे बघुन,बघुन कंटाळा आला होता साहेब, आम्हांला आणि हे सहन पण होत नव्हतं आणि त्याहून कळस काय आहे किळस आली हो भाऊसाहेब मला ज्यांची नांवे मी वाचली,ऐकली,ज्यांना,ज्यांना आम्ही रेड हॅण्ड पकडलं ती सगळीच बोलतात आव आणुन आणि म्हणतात वाबळे साहेब,माझा एक पेशंट आहे करता का तेवढं अँडमिट रिक्सेस्ट आहे तुम्हांला,घेता का तेवढं अँडमिट करुन तिथं नाही का, दुसरीकडे करता का, तिसरीकडे करता का आणि यांच काय माझाच माणुस बसला पाहिजे. असं करीत माझाच माणुस बसला पाहिजे.अरे तुम्हीच सगळयांना रिंगा करायच्या,तुम्हीच सगळीकडे बोंबाबोंब करायची,तुम्हींच तिथं बदल घडवुन आणायचं आणि आम्ही आपले फिल्डवरती आणि जे फिल्डवरती ते कोरोनाग्रस्त आणि जे नव्हते ते सहीसलामत आता काय करावं बरं याला, केस तर फायनल होणार आहे कुठं आहे तर २ कडं पवार साहेब खरंतर तुमचं अभिनंदन करायला पाहिजे. शिकायचं असेल तर महसुलच्या अधिका-यांकडनं शिकायचं एक दिलीप बंड साहेब होते त्यांनी ३६ नगरसेवकांना अनाधिकृत बांधकामाच्या नोटीसा पाठवून ठेवल्या त्यांनी कधीही बंड साहेबांच्या विरोधात कधीही या सभागृहात बोलू शकले नाहीत. तसे या पवार साहेबांनी केले आहे. पण हे सगळं जरी खरं असलं तरी आयुक्त साहेब,याच्यामध्ये मिस्टीक आहे आणि ही मिस्टीक उघडकीस आणण्याचं काम नगरसेवकांनी करायच असत. आता काय झालं, मला वाट बघावी लागते,अच्छा भाऊसाहेब माझा विषय काढतात का, थांब जरा,भाऊसाहेबांचा मी विषय काढतो. मी काय चिडले तर हा जो खेळ चालला आहे तो तुमच्या लेवलमध्ये कोणी तरी खेळणारा ठिक आहे नां, एक डाव भूताचा असतो,एक तुम्ही खेळला तर तो दुसरा खेळतो, तुम्ही तिसरा खेळला तर तो चौथा खेळतो तुम्हीच प्लेअर आहात नां त्यातले आम्ही तर येत पण नाही तिथं बघायला मग घ्या नां तुम्ही तुमचं समजुन आणि हे आम्हांला सांगावं लागतयं या सभागृहामध्ये आम्हांला पोटतिडकीने बोलावं लागतं. आयुक्त साहेब, यामध्ये कोण,कोण इन्व्हॉल आहेत हे मी नांव घेवुन बोलते मला कोणाची भिती नाही.अटी/शर्तीच अशा टाकायच्या आता तिथं लिहायचं राजन पाटील उंची ५ फुट ६ इंच,रंग सावळा आता तिथं अजित पवार कधी मॅचच होणार नाही नां, राजन पाटीलचं राजन पाटीलच मॅच होणार आहे आणि आता हे सांगायला तुम्ही आम्हांला शिकवणार आहे का? आम्हांला शिकवणार, आम्ही या सभागृहात एक वेगळी उंची प्राप्त केलेली आहे. मग तुम्ही आम्हांला शिकवणार का? वाचुन,वाचुन वेड लागायची वेळ आली आहे. हे तितकच खरं आहे की,आपल्या वॉर रुमला सिम्टमॅटीक/ असिम्टमॅटीकची ही वेगळी नोंद व्हायला पाहिजे. ती झालेली नाही. आम्ही आज सकाळी वॉर रुमचा डेटा घेतला आहे. खरं काय,खोटं

काय बघायला जर त्याठिकाणी अजित पवार यांनी त्यांचे अधिकार नसताना त्यांनी पैसे दिलेत त्यांच्यावरती कारवाई व्हायला पाहिजे नां. त्यांची चौकशी लावली पाहिजे. आणि त्या चौकशी मध्ये अजित पवारांनी शपथपत्र देवुन सांगितलं पाहिजे की, कोण,कोण नगरसेवक इन्व्हॉल आहेत यांच्या नगरसेविका इन्व्हॉल नाहीत का? आहेत नां,आमचे पण नगरसेवक इनव्हॉल्वमेन्ट आहे आम्ही कुठं नाही म्हणतो पण आव तर आणु नका ना बाबांनो या सभागृहामध्ये चार तास झाले आम्ही वाट बघतोय आता संपल,मग संपल आम्ही म्हणतोय डॉक्टर दोषी असेल तर त्यांना डिसमीस करा,नोकरीतून काढून टाका,मग तुम्ही म्हणणार डॉक्टरांना कसं काय बोलता. मग डॉक्टरांना बोलायचं नाही,अजित पवारांना बोलायचं नाही, कोणाला दोष द्यायचा त्या ठेकेदाराला,अरे ठेकेदाराला आणा त्याला भर चौकात फटके घाला तुम्हांला काय करायचं ते करा,कोणी रोखलं आहे. सत्ताधारी आहोत आपण करा आता ठराव ठेकेदाराला ब्लॅकलिस्ट करा म्हणुन कोणी रोखलं आहे. पण याच्यासाठी म्हणुन एक काढण्यासाठी दुसरं का लपवायचं तर दुस-यामध्ये जे,जे इनव्हॉल आहेत ते सुध्दा समोर आले पाहिजेत. सी.सी.केंद्रामध्ये अनेक नगरसेवकांची त्याच्यामध्ये इनव्हॉल्वमेन्ट आहेत.अनेक नगरसेवकांची हे सत्य आहे,त्रिवार सत्य आहे आणि हे कोणी नाकारु शकत नाही. अनेक नगरसेविकानी, माझ्या भगिनीनी प्रामाणिकपणाने डब्बे पोहचविण्याचं काम केलं आहे. त्यांच कोणी कौतुक करीत नाही. आम्ही त्यावेळेस अधिका-यांना सांगितलं होतं मास्क वगैरे वाटू नका, कोणाला वाटणार आहात तुम्ही हे १५ लाख मास्क तर ते म्हणाले नाही आम्ही वाटतो, वाटून,वाटून कोणाला वाटले तर शिक्षण मंडळाचा आपला जो ठेकेदार आहे त्याला तुम्ही सांगितलं की,तुला यावर्षीची आणि पुढच्या वर्षीची एकच वर्कऑर्डर देणार त्याच महाशयांनी हे मास्क पुरवले काय तो मास्क आमच्या साडीचे जे फॉल असतात नां त्याचे मास्क बनवले आहेत मग त्याच्याविषयी कोणी नाही बोललं आता एक संबंधित नगरसेविकाच तर त्यांच्या बाबतीत तर काय सांगायचच नको बाबा, मग बोललं तर तुम्हांला राग येतो,आम्ही बोलायला लागलो की अनेक लोकांना त्रास होतो. आम्हांला असं वाटतयं की,जाऊ दे बाबा आहेत आपले काय चाललयं ते चालू दे,आम्हांला काही घेणं-देणं नाही जोपर्यंत चुकीचं होत नाही तोपर्यंत आम्हांला त्यात बोलायचं नसतं म्हणुन आम्ही गेली ४/५ महिने झाले त्याच्यावर आम्ही बोललो नव्हतो. आणि जे,जे मुद्ये स्पर्शच्या ज्या निमित्ताने आलेले आहेत त्याच खापर सुध्दा आमच्यावर फोडू नका आमची जर का कुठे इनव्हॉल्वमेन्ट दिसली तर निश्चितपणे आम्हांला तिथं उभं करा पण निश्चितपणे आमची याच्यामध्ये सुध्दा कुठेही इनव्हॉल्वमेन्ट नाही आणि मा.महापौर साहेब, या स्पर्शच्या निमित्ताने याचा सुध्दा खुलासा करायला सांगा डॉक्टरांना याची सुध्दा चौकशी समिती नेमा कोणाकडे पैसे गेले हे बरोबर कळतयं,अकौंट कुठं, कसं ओपन कंपनी

कुठली मुंबईची,खातं कुठ उघडायचं पतसंस्थेमध्ये आता हे न समजणं आपण काय मुर्ख आहोत का,आपल्याला सगळं कळतंय,बोलून कशाला कोणाला मोठं करायचं आहे. परंतु हा जो मगापासनं खेळ चाललेला आहे आणि माझा कन्सेप्ट एकच होता की,वायसीएमएच ला जे १० पेशंट गेल्याचा जो काही आरोप होता तो ते आम्ही घेतले जाणार नाहीत. हे निश्चीत आहे की,मी त्यांच्याबाबतीत भावनाशिल आहे.कारण निश्चितपण त्यांची जबाबदारी सत्ताधारी पक्ष म्हणुन आमची पण तेवढीच येत होती. कारण की,आम्ही सगळे जण असताना हे घडलं कसं याच्याबाबतीत आम्हांला प्रचंड मनस्ताप होत होता. आणि जसं आमच्याकडं घडलं तसं वेगवेगळया ठिकाणी घडलेलं आहे. मग आम्ही सांगितलं जम्बो कोविड सेंटर कशाला पाहिजे. आम्ही काय त्याला विरोधच केला होता आणि थोडया वेळातच जी.बी.मधुन निघुन गेलो होतो. इतर ठिकाणी आपण एवढा मोठा खर्च करतोय आणि जम्बो सेंटरसाठी कशाला खर्च करतोय त्यांनी सांगितलं की, हे राज्य शासनाचं आहे,पीएमआरडीए खर्च करीत आहे आता राज्य शासनाच्या खर्चामध्ये आपल्याला जे काही खर्च द्यायचा होता तर आपला काय अधिकार आहे तर या देशात राहणारा प्रत्येक नागरीक हा भारत देशाचा नागरिक आहे असं संविधानाने सांगितलेलं आहे. आणि मग आम्ही विरोध करणारे कोण? मग तिथे पेशंट नाही आले म्हणुन आज आपण त्याचं बिलं देणार नाही का, कारण एकीकडे यंत्रणा उभी करायला लावायची, पेशंट आणायचे मग पेशंट कमी झाल्यानंतर मग तिथं बिलामध्ये जर का काही कमी जास्त झालं तर तिथं प्रशासन जबाबदार आहे असं कस म्हणता येईल. कारण स्पर्शमध्ये रामस्मृती आणि हिरा लॉन्स जिथं पेशंट आले नाहीत,करारनामा नाही,करारनामा कुठं करायचा आहे. करारनामा महापालिकेचा आणि कॉन्ट्रॅक्टरचा, तुमचा जर का मी भाडेकरु असेल तर जो घरमालक आहे त्याच्या बरोबर करारनामा केला पाहिजे नां. हा करारनामा कुठंच नाही, त्याच्या मालकीचं पण नाही आणि या सगळया विषयावरती आता खुप चर्चा झालेली आहे. मला वाटतं मा.महापौर साहेब,मला या विषयात जास्त खोलात जायचं नाही परंतु अति.आयुक्त १ यांना सांगणार आहोत की,तुम्ही पण पवारांचे काही गुण शिका एवढं झाल्यावर फार सोपं नाही हो, आणि इतक्या लोकांना दाबुन ठेवणं सुध्दा सोपं नाही. याचं कारण असं आहे नां साहेब, ज्या ज्यावेळेस रेव्हीन्युचे लोक आहे नां,त्या त्यावेळेस संतोष पाटील आणि अजित पवार यांना डोक्यावर बसवलं आहे. त्या,त्यावेळेस, म्हणजे कुठं काय लागलं ना,गावाला जायचं असेल,एखादी बाई गरोदर असेल,माहेरी सोडायचं असेल तर,त्या,त्यावेळेस तुमच्या सारखे म्हणले नाही साहेब, एका नगरसेवकाला मी ५ मिनिटचं देतो.काय,तुमचं माझ्याकडं काम आहे का? असं नाही बोलले साहेब, ते म्हणतात,या बसा ५ मिनिटं थांबा पास तयार आहे. हे त्या काळात झालं आहे

आणि म्हणुन त्यांची आज एवढया लोकांनी बाजु घेतली आहे. हे काय झालं माहित नाही का?सगळयांना माहिती आहे. कागदं खोटं बोलत नाहीत त्यांचे काही गुण चांगले पण आहेत. आणि म्हणुन त्यांना आम्ही सावरलं होतं. आज मी विरोधी पक्षात असते नां तर आज अजित पवाराचं नांव मी खुप मोठं केलं असतं पण जी कामे चांगली केली आहेत त्याच कौतुक पण केलं पाहिजे. आणि ते कौतुक करताना निश्चितपणे पवार साहेब आपण काही गोष्टीचं प्रिक्वॉशन घ्या,आपण मागच्या वेळेस शिक्षण मंडळाचं बिल रात्री ११.०० वा. दिलं,हे पण बिल दिलं जे काही बिल आपण देणं लागतो तो दिवसाला द्या. वेळेत द्या,अधिकार नसताना बिल दिलं असेल तर त्याचा माफीनामा लिहा, येथून पुढे होणार नाही  असं काही तरी करा,जेणेकरुन काम करायला सुरुवात होईल. आणि नवीन आलेले आयुक्तांना सुध्दा माझी विनंती आहे की, आपल्याकडे आल्यानंतर काही जण सांगत होते की, आपण कार्ड मागता, आपण नगरसेवकांना कार्ड छापून द्या, तर तुम्ही कार्ड वगैरे काही मागु नका. आणि आम्ही आणि तुम्ही हे एका गाडीचे दोन चाकं आहेत आणि हे आपण बरोबर चाललो तर आपण जास्त बरोबर चालू शकतो. तर आपल्याला विनंती आहे की, जे काही विषय याठिकाणी घडलेले आहेत ते पोटतिडकीने मांडलेले विषय आहेत यामध्ये तुषार कामठे असतील, राहुल कलाटे असतील, आमच्या पक्षाच्या नेत्यांनी मांडलेले असतील या प्रश्नांचा आपण निश्चितपणे विचार करा याच्यामध्ये फक्त एकच आहे की, विचार करताना प्रकल्प कोण,कोण चालवतं याच्यावर पण कारवाई करायला पाहिजे. आणि निश्चितपणे पुढच्या काही काळामध्ये  ज्यांची नांवे आपल्याकडे आहेत,नावं आहेत आपल्याकडे मी घाबरत नाही,मी माझ्या पक्षातील जरी नांवे असली तरी मी अजिबात घाबरणार नाही. त्यामुळे पुढच्या काळामध्ये मी आपल्याकडे डायरेक्ट नांव घेवुन आपल्याकडे येणार,बॅंकेचे स्टेटमेंट घेवुन येणार आणि आपल्याला कारवाई करायला भाग पाडणार धन्यवाद .

**मा.आयुक्त -** मा.महापौर महोदया साहेब, सन्मा.सभागृह गेली ४.३० तास आपले सर्व जे काही युक्तीवाद आणि आरोप आणि त्याच्यानंतर  आमच्या सहकार्यांनी जे काही क्लेरिफिकेशन दिलं ते सर्व मी एकत्र करुन माहीती देतो अजुन मला इथे येऊन एक महिना व्हायचा आहे. सुरुवातीला मी ताईच्या प्रश्नांचा खुलासा करतो की,मी माझ्याकडे भेटण्यासाठी आलेल्यानां  कार्ड वगैरे मागतो.पण तसं काही नाही. एक थोडं डिसीप्लिन आणण्यासाठी. कारण मध्ये कोणी तरी बसलेलं असतं आणि ते आपल्याला काही तरी सांगत असतं,मध्ये दुसरं कोणी तरी येत असतं आपण माझ्याकडे कधीही येऊ शकता मी सगळयात आधी तुम्हांलाच बोलवतो. आणि मला सांगायला येतात की,तुम्हांला भेटायला सदस्य आलेले आहेत त्याच्यामध्ये माझा तसा काही उद्देश नाही,मी डेमोक्रॅट आहे  आपल्या देशामध्ये

लोकशाही शासन आहे त्याचा मी पाईक आहे आणि त्याच्यावर माझा पुर्ण विश्वास आहे. कृपा करुन कोणाचा अपमान केला तो तुमच्या बरोबर तुम्ही जे लोकांना रिपेझेंट करतात या सगळयांचा अपमान असतो. कारण माझ्याकडुन तसं कधी होणार नाही.त्याबद्दलच जे काही बेसिकली आरोप झाले त्यामध्ये तुम्हाला जशा वेदना झाल्या तशा मला पण झाल्या. जे काही सिस्टमेटीक इश्यु आहेत त्यामध्ये टेंडर प्रक्रिया त्यामध्ये होणारी ईरेग्युलॅरीटी ही निश्चितपणे मी बंद करेन आणि त्या कठोरपणे बंद होतील. त्याच्यामध्ये जे बीटधारक आहेत त्यांचे इलिजीबिलीटी त्याच्यामध्ये खुप तफावत दिसते. त्यानंतर आपले फायनान्शियल जे रुल्स आहेत म्युनिसीपल अकौंटींग आहे त्याला धरुन ब-याचदा डेवीएशन होताना दिसतयं या सगळया गोष्टी काटेकोरपणे पाळल्या जातील. आणि त्यामुळे या प्रकारचे जे एररं होतात ते कमी होतील. आणि ज्या,ज्या गोष्टी माझ्या नजरेत येतील,उघड,उघड मी त्याच्या खोलात जाण्याचा प्रयत्न करीन. माझ्या करीयरला १५ वर्ष झाली आहेत. मी कोणत्याही भ्रष्टाचाराला प्रोत्साहन दिलेलं नाही किंवा त्याला खपवून घेतलेलं नाही. त्यामुळे तुमचा जो काही उद्देश होता स्पर्शचं प्रकरण असो किंवा गॅसचं प्रकरण त्याची व्यवस्थित चौकशी केली जाईल आणि इनडिपेंडंट लोकांकडुन केली जाईल. फक्त तुमच्या सगळयांचा आणि लोकांचा भरोसा आला पाहिजे. की,इथं सगळे लोक बसलेत या साईडला आणि या साईडला आणि लोकांच्या ज्या भावना आहेत त्या तुमच्यामार्फत आमच्यापर्यंत येतात त्यांना जाणीव आणि विश्वार्हता ठेवणं हे आमचं काम आहे. त्यामुळे आपणां सर्वांना आश्वासन देतो की,खुप कमी वेळेमध्ये आम्ही या चौकशा करु, आपण जे कोविड सेंटर उभे केले होते त्याची चौकशी करुनच त्यांचे प्रॉपर पेमेंट अदा केले जाईल. यामध्ये हार्डीकर साहेबांनी जातांना म्हटलं होतं की, ते आपल्याला ज्ञापन करु द्यावं असं मला वाटतयं की जेव्हा क्रायसिस असतो ब-याचवेळेला आपला फोकस असतो की कस क्रायसिस मॅनेज करायचं आहे. त्यामुळे त्यावेळेला कोविडच्या केसेस वाढत होत्या लोक कोविडचा पेशंट बघायला पण तयार नव्हते. तो समोर दिसला तरी पळून जात होते. आणि ज्या घरामध्ये पेशंट येत होता त्याला घरातले लोक सुध्दा त्यांना सोडून देत होते. म्हणजे आई-वडीलांना सोडून देणारी मुले पण आहेत. अशी तेंव्हा परिस्थिती होती. आणि त्या परिस्थितीमध्ये त्यावेळेला जे काही प्रशासनाने निर्णय घेतले असतील तेंव्हा आयुक्त किंवा अति.आयुक्त असतील त्यावेळेस आपला फोकस वेगळा असतो की,आपल्याला लोकांना वाचवायचं असतयं आज सुध्दा मी विचार करीत होतो की,आज सुध्दा आपल्याला जिजामाता हॉस्पिटल आणि भोसरी हॉस्पिटल नवीन मध्ये आपले जे आयसीयु आहे ते पटकन कसं चालू करता येईल त्याच्यासाठी काय करता येईल,टेंडर वगैरे बाजुला ठेवुन लगेच काम देता येईल का याचा सुध्दा मी विचार करीत होतो. याच्यासाठी विचार करीत होतो की,आपल्याकडे व्हेंटीलेटर आणि आयसीयु असले की, जे क्रिटीकल पेशंट असतात

त्यांना जर आपण वाचवलं तरचं लोकांना आपण वाचवू शकणार आहोत. आणि त्यामुळे काही चुका होणं स्वाभाविक आहे. कारण त्या गर्दीमध्ये हजारो गोष्टी At a time Attend करीत असतात कुठे व्हीसी असते, कुठे कॉल असतो तर यामध्ये काही लोक पोळी भाजणारे पण असतात प्रशासनामध्ये पण असतात आणि सगळीकडे असतात. तर ज्या काही चुका झाल्यात त्याला त्या इन्व्हारमेंटमध्ये त्या Situation मध्ये बघितलं पाहिजे आणि त्यामुळे मला वाटतयं त्याची जेन्यूनिटी जी आहे ती निश्चित प्रकारे चेक केली जाईल. म्हणजे त्याची जी विश्वासर्हता आहे की त्यावेळेला काम चांगलं झालं आपण त्याच्याबद्दल वारंवार बोललो असेल तर त्याची विश्वासर्हता कशी वाढेल त्याच्यामधुन आपल्याला भविष्यामध्ये जे काही शिकता येईल चुकीचं झालं असेल तर पुढे कसं होणार नाही हे मागच्याला Avoid कसं करता येईल यादृष्टीने निश्चितपणे पावले उचलली जातील. हे मी आपल्याला आश्वासन देवु शकतो. मी मा.महापौरांना सांगेन की, आयुक्त म्हणुन याचा पाठपुरावा करुन सभागृहासमोर त्याचे तथ्य मांडेन. धन्यवाद.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह खरं म्हणजे मी याठिकाणी सविस्तर बोलणार नाही. परंतु गेल्या ४ ते ४.३० तासापासून याठिकाणी अनेक सदस्यांनी मुद्दे उपस्थित केले आहेत आणि त्यासंदर्भामध्ये खरं या ज्या काही गोष्टी घडलेल्या आहेत स्पर्श हॉस्पिटलच्या संदर्भामध्ये असतील किंवा वायसीएमएच मधील गॅसपुरवठा धारकांच्या संदर्भामध्ये असतील खरं म्हणजे मी गेल्या आठवडयामध्ये पत्रकारांच्या पत्रकार परिषदेमध्ये सांगितलं की, खरं म्हणजे सिमाताईंनी सुध्दा सांगितलं की, चुकतयं कोणा कोणाचं आणि कशा संदर्भामध्ये चुकतयं कारण गेल्या १५ वर्षापासून या वायसीएम हॉस्पिटलमध्ये ख-या अर्थानं पण याठिकाणी मी कोणाचं नांव घेणार नाही परंतु ज्याअर्थानं याठिकाणी आक्सिजनच्या संदर्भामध्ये काम चाललेलं होतं त्यासंदर्भामध्ये याठिकाणी तुषार कामठेच्या प्रश्नाच्या माध्यमातुन अनेक मुद्दे उपस्थित केलेले आहेत. डीन साहेबांनी त्यासंदर्भात खुलासा केलेला आहे. परंतु त्यांच्या बोलण्यावरुन असं लक्षात आलेलं आहे की,ज्यावेळेला रुग्ण कमी होते त्यावेळेला देखील ऑक्सिजनची बिले याठिकाणी अदा केलेली आहेत त्या बिलामध्ये असणारी तफावत,रुग्णांमध्ये असणारी तफावत व्हेंटीलेटरची एका बाजुला बिलं दिली गेलेली आहेत. नेमकं यासंदर्भामध्ये मा.आयुक्त यांनी सांगितलं आहे. परंतु ख-या अर्थानं गेल्या अनेक वर्षापासून हा ठेकेदार याला कोण पाठीशी घालतयं,आणि कोणाला काय होतयं आताच आयुक्त साहेबांनी सांगितलं आहे की,आपल्याला कोविडची रुग्णसंख्या वाढत आहे यासंदर्भामध्ये इतर

हॉस्पिटलच्या माध्यमामधुन सुध्दा आपल्याला थेरगांवचं हॉस्पिटल असेल,जिजामाता हॉस्पिटल असेल,भोसरीचं हॉस्पिटल असेल याठिकाणी कोरोनाच्या संदर्भामध्ये आपल्याला पुर्वतयारी करण्याची आवश्यकता आहे. आणि त्याअनुषंगाने निविदा काढलेल्या आहेत. त्यासंदर्भात मी याठिकाणी बोलणार नाही. परंतु ऑक्सिजनच्या संदर्भातील बिलामध्ये अनियमितता असल्यामुळे आणि त्या दरामध्ये असणारी तफावत आताच आपण आटो क्लस्टरमध्ये २४/- रु.पर के.जी.या दराने ऑक्सिजन खरेदी करतोय आणि वायसीएम हॉस्पिटल मधील ठेकेदाराला ३६/- रु.पर के.जी.दराने ऑक्सिजनची बिलं अदा करतोय. त्याच पध्दतीने तुषार कामठेंनी सांगितलं की,रुग्णांच्या अनुषंगाने त्याठिकाणी ऑक्सिजनचे रुग्ण किती असतील,आयसीयु मध्ये असणारे रुग्ण किती असतील त्यासंदर्भामध्ये ऑक्सिजनचा पुरवठा कसा केला पाहिजे यासंदर्भामध्ये बिलांची अनियमितता आणि त्यांनी पुरवठा केलेले ऑक्सिजनचे टँकर यासंदर्भामध्ये सखोल चौकशी करणेत येईल असे आयुक्तांनी सांगितले आहे. ऑक्सिजनचा पुरवठा करणारा जो ठेकेदार आहे त्याच्या बिलाच्या अनियमिततेमध्ये चौकशी व्हावी यासंदर्भामध्ये आपण आयुक्तांना आदेश करावेत. त्यानंतर स्पर्श हॉस्पिटलच्या संदर्भामध्ये याठिकाणी अनेक लोकांनी त्यावेळेला या सभागृहामध्ये मुद्या उपस्थित केला आहे. आणि आयुक्त साहेबानी सांगितल आहे की, कोरोनाच्या महामारीमुळे त्यावेळेला आपले सन्मा.विभागीय आयुक्त त्यांनी याठिकाणी पालकमंत्री,उपमुख्यमंत्र्यांच्या कॉन्फरन्सच्या माध्यमातुन त्यांनी त्याठिकाणी सांगितलं आणि कोविडची परिस्थिती लक्षात घेऊन याठिकाणी १० हजार बेड निर्मीती करण्याचं सुध्दा याठिकाणी आयुक्तांच्या माध्यमातुन आपल्या महापालिकेला तसे आदेश दिलेले आहेत. सन्मा.महापौर याठिकाणी मी आपल्याला विनंती करणार आहे की, याठिकाणी फक्त आरोप केले जात आहेत परंतु आयुक्त साहेबांनी याठिकाणी डिटेलमध्ये खुलासा करणं अपेक्षित होतं. परंतु मी याठिकाणी आपल्याला माहिती देतो त्यावेळेला १० हजार बेडची निर्मीती करण्याची सूचना विभागीय आयुक्तांच्या माध्यमातून याठिकाणी केली गेली. आणि ७ रुग्णालयांच्या माध्यमामधुन आपल्या वायसीएम रुग्णालयामध्ये आपल्याला जे १० हजार बेडची निर्मीती करावयाची होती.आणि आपल्याकडे मनुष्यबळ नसल्यामुळे,याठिकाणी स्टाफ उपलब्ध नसल्यामुळे तशा संदर्भामध्ये आपण खाजगी हॉस्पिटलला आऊटसोर्सींग करण्याचा निर्णय विभागीय आयुक्त आणि पालकमंत्र्यांच्या सूचनेवरुन याठिकाणी केला गेला. आणि मला असं वाटतयं की,त्यावेळेला घरामध्ये आपल्या रुग्णाला कशा पध्दतीची वागणुक देत होते,सोसायटीमध्ये त्याला कशा पध्दतीची वागणुक देत होते,समाज त्याला कुठल्या अँगलनी बघत होता. अशा परिस्थितीमध्ये आपण याठिकाणी कोविड सेंटर निर्माण करण्याचा प्रयत्न केला आणि मला वाटतं त्या कोविड सेंटरच्या

ए,बी,सी कॅटेगिरी मधुन निर्माण केली.विभागीय आयुक्तांनी जरी आपल्याला १० हजार बेडची सोय करण्याचा आदेश दिला होता तरी आपण एवढं करुन सुध्दा ए,बी,सी कॅटेगिरीमध्ये बेड उपलब्ध करीत असताना ४७०० बेडची निर्मीती फक्त त्याठिकाणी करु शकलेलो आहे. याठिकाणी दिशाभूल करण्याचं काम याठिकाणी करु नये. कारण हे सभागृह पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या करदात्यांच्या पैशावरती आपण सर्वजण याठिकाणी काम करतोय आणि त्यावर नियंत्र्ण ठेवण्याचं काम करतोय याचा अर्थ असा नाही की, कुठल्याही पध्दतीनं संशयाचा वातावरण या सभागृहामध्ये निर्माण करायचं आणि आरोप करायचा अशा प्रकारच्या भूमिका केल्या जात आहेत. सन्मा.महापौर मी याठिकाणी दोन मुद्दे उपस्थित करणार आहे की,ज्यावेळेला कोविड सेंटरचा युआय काढला गेला त्यावेळेला Serface Interest ज्यावेळेला काढला गेला त्यावेळेला याठिकाणी आपल्या अटी/शर्तीमध्ये दिलेलं होतं की,९० दिवसामध्ये आपल्याला पेशंट पुरवण्याचं काम महानगरपालिकेकडुन केलं जाणार आहे. आणि ८० % पेमेंट देण्याची हमी या युआय मध्ये करणेत आलेली होती. आणि दुस-या बाजुला कोविड सेंटरच्या बाबतीत वाद निर्माण झाला जर महानगरपालिकेतर्फे निर्णय घेतला जाईल अशा प्रकारच्या अटी/शर्ती सुध्दा कोविड सेंटरच्या माध्यमातून ए,बी,सी कॅटेगिरीच्या माध्यमातुन दिलं होतं. मला याठिकाणी जास्त बोलायचं नाही परंतु त्यानंतर आपले सेंटर चालू झाले आणि चालू झाल्यानंतर त्यानंतर गणपतीचा काळ होता आणि त्यानंतर अचानक रुग्ण वाढायला सुरुवात झाली त्यावेळेस मा.महापौर उपमहापौर स्थायी समिती चेअरमन,पक्षनेता,गटनेता, विरोधी पक्षनेता यांची मा.आयुक्त यांच्या माध्यमातून तातडीची बैठक झाली आणि विभागीय आयुक्तांच्या सूचनेनुसार याठिकाणी ४७०० बेडची निर्मीती केली गेलेली आहे. ए,बी,सी कॅटेगिरीचे जे नियम आहेत त्यांना काय नियम लावले,कसे लावले गेले,आणि आपण त्यांना लिगली ८०% पेमेंट देण्याचं जसं ताईंनी आताच सांगितलं की, कोविड सेंटरमध्ये त्याठिकाणी एकही रुग्ण नसतानाही त्याठिकाणी आपण ३ कोटी रु. आपण त्या जम्बो हॉस्पिटलला अजुनही पेड करतोय. जम्बो सेंटरच्या मध्ये कुठलाही एक रु.नसताना सुध्दा महाराष्ट्र शासनाने त्याठिकाणी १००% रक्कम ही त्याठिकाणी दिलेली आहे. मला याठिकाणी महाराष्ट्र शासनाच्या संदर्भामध्ये बोलायचं नाही परंतु तोच नियम याठिकाणी स्पर्श हॉस्पिटलच्या बाबतीत लावला गेलाआहे. आणि मला असं वाटतं आपण सर्वजण सुज्ञ नगरसेवक आहेत पदाधिकारी आहेत आणि त्यांना माहिती आहे की,युआय काय आहे त्यासंदर्भातील लेखी माहिती सुध्दा मला वाटतं प्रत्येकांनी घेतलेली असेल, परंतु याठिकाणी फक्त दिशाभूल करायचं आणि प्रसारमाध्यमांच्या समोर मी कसा चांगला हे दाखवण्याचा केविलवाणा प्रकार याठिकाणी दाखवण्याचा

प्रयत्न केला आहे. याठिकाणी विरोधी पक्षाच्या नेत्यांनी सांगितलं आहे की, अशा पध्दतीने त्याठिकाणी आहे. परंतु त्याठिकाणी या नेत्यांना माहिती नाही की, आता या नेत्यांना स्वत:ची भिती वाटत आहे की, महानगरपालिकेच्या वायसीएम रुग्णालयामध्ये गेल्या अनेक वर्षापासून जी मोनोपॉली केली गेली, आमच्या स्वत:ची जहागिरी असल्यासारखं काम केलं त्या नेत्याच्या पायाखालची वाळू याठिकाणी घसरली असल्यामुळे यांना आता भिती वाटायला लागली की,या वायसीएमएच मध्ये असणारे ठेकेदार,मशिन पुरवणारे ठेकेदार, औषध पुरवणारे ठेकेदार यांना भिती वाटत आहे आणि म्हणुन हे अशा प्रकारचे उपद्व्याप याठिकाणी करीत आहेत. हे सिनियर नेते गेली २०/२५ वर्ष या सभागृहामध्ये राहिले आणि त्यांनी या सभागृहामध्ये सन्मा.सदस्याची दिशाभूल करण्याचं काम केलल आहे. असा आरोप मी याठिकाणी करतोय. ए,बी,सी. कॅटेगिरीच्या संदर्भामध्ये मी सांगितलं आहे की, या स्पर्श हॉस्पिटलला ८०% पेमेंट देण्याचा करारनाम्यातील अटी/शर्तीनुसार रु. ५ कोटी २६ लाख ७ हजार ८०० रु.देय असताना सुध्दा याठिकाणी समिती नेमली गेली आणि या महानगरपालिकेच्या हितासाठी,बचत होण्याच्या संदर्भामध्ये आणि आता मला सांगा मा.महापौर साहेब,जम्बो कोविड सेंटरमध्ये रुग्ण ठेवण्यासाठी रुग्णच तयार झाले नसतील तर रुग्ण कोण पाठविणार मी याठिकाणी कुठल्याही ठेकेदाराची बाजु घेत नाही परंतु याठिकाणी आवर्जुन सांगेन की,ज्यावेळेला आपण अँग्रीमेंट करतो,त्यामध्ये ज्या अटी/शर्ती टाकतो त्यानुसार त्याला पेमेंट अदा करणे बंधनकारक असताना सुध्दा आम्ही आयुक्तांना सांगितलं की,त्यांनी जर त्याठिकाणी काम केलेलं नसेल आणि त्यांनी त्याठिकाणी स्टाफ पुरवला असेल, सेवा पुरवली असेल, गोळया औषधासाठी स्टाफ पुरविला असेल या सगळया गोष्टी त्यांनी त्याठिकाणी उपलब्ध करुन दिल्या असतील तर त्यांना बिल दिलं गेलं पाहिजे. कारण भविष्यामध्ये अशा प्रकारची जर आपल्याकडे परिस्थिती आली तर आपण ओपन चर्चामध्ये जाऊन टेंडर प्रसिध्द करुन मोजकीच लोक याठिकाणी स्पर्धेमध्ये आले आणि या स्पर्धैमध्ये आल्यानंतर त्यांनी सुध्दा या कोविड सेंटरच्या माध्यमातुन चांगली सेवा केली आहे असे मला वाटतं ज्यावेळेस या बिलाचा प्रश्न याठिकाणी उपस्थित झाला त्यावेळेला आपण आयुक्तांना सांगितलं की,या बिलाच्या संदर्भात आपण विचार करावा. आणि जे कोविड सेंटर चालवणारे जे ठेकेदार आहेत त्या ठेकेदारांनी कोर्टात जाण्याची भाषा आयुक्तांच्या माध्यमातून केली गेली आहे. आणि म्हणुन आयुक्तांनी या ५ जणांची नियुक्ती केलेली आहे. या समितीच्या माध्यमातून आपण त्यांना याठिकाणी ६५% पैसे देण्याचं मान्य केलं. एवढंच नव्हेतर त्यांच्याकडनं आपण अफेडेव्हीट करुन घेतलं आणि त्यामध्ये भविष्यामध्ये आम्ही कुठल्याही कोर्टामध्ये जाणार नाही.

**( सभागृहात गोंधळ )**

**मा.नामदेव ढाके –** मा.महापौर साहेब,मला कुठल्याही ठेकेदाराचं घेणं-देणं नाही पण महानगरपालिकेच्या या सभागृहामध्ये दिशाभूल करण्याचं काम जर कोणी करत असेल तर.....

**( सभागृहात गोंधळ )**

**मा.नामदेव ढाके –** याठिकाणी पदाधिका-यांनी सांगितलं आहे की, या डॉक्टरांच्या संदर्भामध्ये राजीनामा देणार याठिकाणी डॉक्टरांची यादी दिलेली आहे.

**मा.महापौर -** पक्षनेते आपण खाली बसुन घ्या मी कमिशनर साहेबांना आदेश देणार आहे.

**( सभागृहात गोंधळ )**

**मा.नामदेव ढाके –** सन्मा.महापौर मला आपल्याला विनंती करायची आहे की, या सभागृहामध्ये दिशाभूल होता कामा नये. आणि याठिकाणी भारतीय जनता पार्टीच्या विरोधामध्ये सांगितलं की, मी राजीनामा देईन, या डॉक्टरांची यादी माझ्याकडे आहे. हे डॉक्टर बोगस आहेत असे काही सदस्यांनी सांगितलेलं आहे. पण या डॉक्टरांना युनिर्व्हसिटीच्या माध्यमातून सर्टीफिकेट दिलेलं आहे. याठिकाणी सांगितलं गेलं की,भारतीय जनता पार्टीचे जे नगरसेवक याठिकाणी आहेत ते राजीनामा देणार आहेत मी याठिकाणी खुल्लं आवाहन करतो की,भारतीय जनता पार्टीचा कुठलाही नगरसेवक किंवा पदाधिकारी राजीनामा देणार नाही. भारतीय जनता पार्टी हा पक्ष राष्ट्रीय आहे.प्रायव्हेट लिमिटेड कंपनी नाही.

**( सभागृहात गोंधळ )**

**मा.नामदेव ढाके –**मा.महापौर साहेब**,** याठिकाणी माझ्याकडे डॉक्टरांची यादी आहे ती खरी आहे आणि ती खोटी आहे असे त्यांनी सांगितले तर त्यांनी राजीनामा द्यावा.याठिकाणी वृत्तपत्राच्या माध्यमातून पक्षाची बदनामी होणार असेल तर ती खपवून घेतली जाणार नाही.

**( सभागृहात गोंधळ )**

**मा.नामदेव ढाके –** सन्मा.महापौर, हे ज्यावेळेला सदस्य बोलत होते त्यावेळेला मी कधीही बोललो नाही. याठिकाणी एका अधिका-यांच्या संदर्भामध्ये मी मागेही

उल्लेख केला आहे की,सन्मा.सदस्यांनी  सुध्दा उल्लेख केला आहे. ६.११.२०२० च्या संदर्भामध्ये रामस्मृती मंगल कार्यालयाच्या संदर्भामध्ये मुद्या उपस्थित केलेला आहे आणि त्यांना कुठल्याही प्रकारचा अधिकार नसताना  दि.२७/१०/२०२० रोजी त्यांना सहा.आरोग्य वैदयकीय अधिकारी यांच्याकडे विभाग सोपवण्यात आलेले आहेत. यांना कुठलेही अधिकार नसताना त्या सन्मा.अधिका-यांनी याठिकाणी तसं पत्र दिलेले आहे. आणि त्या पत्रामध्ये याठिकाणी दबाव टाकुन हे केलेलं आहे. डॉ.रॉय यांनी आटो क्लस्टरच्या डिमांड ड्राफ्टमध्ये सुध्दा बदल केलेला आहे असा माझा आरोप आहे. नंतर दि.६/११/२०२० चे पत्र आहे ते अधिकार नसताना पत्रं कसे काय गेले आणि हे पत्र प्रसार माध्यमाच्या माध्यमातुन थेट  गेलेलं आहे. त्यांना अधिकार नसताना दि.६/११/२० रोजी कसे काय पत्र काढले आहे. याची सुध्दा चौकशी करावी. मागच्या काळामध्ये आपल्याला माहिती आहे की, याठिकाणी आपण बघितलं असेल की, याठिकाणी त्यांनी २ लाख रु.लाच घेतल्याचं संदर्भामध्ये त्याची डी.ई.लावलेली आहे. पण त्यांच्यावरती कुठल्याही प्रकारची सस्पेंडची कारवाई केली नाही. आणि हाच अधिकारी याठिकाणी दबाव क्लार्कच्या माध्यमातून  टाकला जातोय. हा दबाव क्लार्कच्या माध्यमातून कसा टाकला जातोय, क्लार्कला कसं सांगितलं जातयं अशा पध्दतीने सुध्दा या अधिका-यांच्या माध्यमातून दबाव टाकला जातोय आणि यांनी २ लाख रु.घेतलेले असताना,त्यांची डी.ई.लावलेली असताना सुध्दा हाच अधिकारी टेंडर प्रक्रीया राबवतोय हाच अधिकारी अटी/शर्ती तयार करतात आणि हेच अधिकारी या नवीन टेंडरच्या माध्यमातून सरळ असतात. या स्वच्छतेच्या साफसफाईच्या संदर्भात सुध्दा या ५२९ लोकांच्या चुकीचा दाखला याच अधिका-यांनी दिलेला आहे. आणि आरोग्य अधिकारी, अति.आयुक्त,आयुक्त  यांच्या संदर्भामध्ये अशा पध्दतीचं पत्र याठिकाणी सन्मा.सदस्यांच्या माध्यमातुन विचारणा केली गेलेली आहे.२३९ लोक काम करीत असताना ५२९ लोकांच्या चुकीचा दाखला सुध्दा याच अधिका-यांनी याठिकाणी दिलेला आहे. आणि त्याच पध्दतीने हे टेंडर बनवलेलं आहे. सन्मा.महापौर आपण याठिकाणी चार गोष्टींचा उल्लेख केलेला आहे ऑक्सिजनच्या माध्यमामधुन, स्पर्श हॉस्पिटलच्या माध्यमामधुन आणि रॉय अधिका-यांच्या चुकीच्या माध्यमातुन याठिकाणी पदाचा वापर करत कामे केली जात आहेत याची सखोल चौकशी याठिकाणी व्हावी आणि यांनी जे चुकीचं सर्टीफिकेट दिलेलं आहे, तिथं सेवा शर्ती मध्ये नसताना सुध्दा २/२ लाख रु.ठेकेदारांकडुन आपल्या खात्यावर वर्ग केलेले आहेत. याचे पुरावे सुध्दा याच सभागृहामध्ये दिलेले आहेत. सन्मा.महापौर मी आपल्याला विनंती करेन की, डॉ.रॉय या अधिका-यांची सुध्दा याठिकाणी चौकशी झाली पाहिजे. तसेच ऑक्सिजन पुरवठयाच्या जी अनियमीतता झालेली त्याचीही चौकशी झाली पाहिजे. आणि स्पर्श हॉस्पिटलच्या संदर्भात जर काही चुकीचं झाले

असेल तर त्याठिकाणी कोणीही अधिकारी असेल तर त्याला कुठल्याही प्रकारे पाठीशी घालु नये. आणि या तीनही प्रकारची आपण सखोल चौकशी करावी. आणि तशा पध्दतीचे आदेश आपण आयुक्तांना द्यावेत अशी विनंती करतो.धन्यवाद.

**मा.महापौर -** मा.आयुक्त साहेब,सभागृहाच्या भावना लक्षात घेवुन याठिकाणी बरेच आरोप,प्रत्यारोप झालेले आहेत. मी आपल्याला आदेश देते की, अति.आयुक्त (२) यांच्यावर देखील काही आरोप झालेले आहेत. त्यांच्यावरील आरोप हे आपल्याला चौकशीच्या रुपाने सिध्द केले पाहिजेत. तोपर्यंत त्यांच्याकडे असलेले अधिकार हे बाजुला ठेवा, काढून घ्या त्याच बरोबर डॉ.रॉय सरांच्या बाबतीत सुध्दा काही आरोप झालेले आहेत ते सिध्द होईपर्यंत त्यांनाही कुठलेही अधिकार देवु नका. ऑक्सिजन पुरवठा करणारा जो कॉन्ट्रॅक्टर आहे जो या महानगरपालिकेची आणि लोकांची दिशाभूल करतोय, नगरसेवकांना बदनाम करतात त्याला ताबडतोब काळया लिस्टमध्ये टाका आणि त्याच बरोबर स्पर्श हॉस्पिटलला जे बिल अदा केलेलं आहे त्याची सुध्दा चौकशी करावी. कारण ही विचारणा मला वरती झाली होती त्या मिटींगमध्ये मला जे काही बोलायचे होते ते मी बोलले आहे. आयुक्त साहेब, कोणाच्याही मनामध्ये शंका असता कामा नये. निर्मळ आणि स्वच्छ मनाचा इथे कारभार असेल तर माझा हा डिसीजन जो काही आहे तो आपल्याला सर्वांना पटेल म्हणुन मी सांगते. अति.आयुक्त २ पवार साहेबांची जोपर्यंत चौकशी होत नाही, सिध्द होत नाही तो पर्यंत त्यांचे अधिकार काढा त्याच बरोबर डॉ.रॉय साहेब यांचे सुध्दा अधिकार काढावेत त्यांनी यामध्ये जो काही गोंधळ घातलेला आहे. नागरीकांच्या पैशांचे जर असे डोळयात धुळ फेकुन जर आपण अशा प्रकारची बिले देत असाल तर त्याची चौकशी करणेत यावी. आणि ऑक्सिजन पुरवठा करणा-या ठेकेदाराला ब्लॅकलिस्ट मध्ये टाकलं पाहिजे. आणि आपण सांगितले आहे की, मी चौकशी करेन त्याचप्रमाणे तुम्ही आम्हांला लवकरात लवकर या सर्व प्रकरणाची चौकशी करुन कमिटी नेमून त्याचा अहवाल आम्हांला कधी मिळेल. ते ही याठिकाणी आयुक्तांनी सांगावे.

**मा.आयुक्त -** सन्मा.महापौर, सन्मा.सभागृह मला वाटतं थोडा वेळ घेवुन याची चौकशी करावी लागेल. त्यामुळे यासाठी किमान २० दिवस तरी लागतील.

**मा.महापौर -** येणा-या २० तारखेच्या जनरल बॉडीच्या मिटींगमध्ये मला ही सगळी माहिती पाहिजे.सभागृहातील सन्मा.सदस्यांनी याठिकाणी आपल्या भावना मांडलेल्या आहेत.

**मा.आयुक्त –** माझी आपल्याला विनंती आहे की,२० तारीख ही फार जवळ आलेली आहे.

**मा.महापौर –** विनंती वगैरे काही नाही रात्रं-दिवस हे सगळं करा आणि मला अहवाल द्या.

**मा.माया बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह आपले नवनियुक्त आयुक्त राजेश पाटील यांचे या वृक्षाच्या मंदिरात स्वागत करते. आणि त्यांची ही महानगरपालिका सावरण्याची  ही पहिलीच वेळ आहे. परंतु त्यांच्याकडनं अपेक्षा आहे की,ते उत्तम प्रकारे महानगरपालिकेचं कामकाज करतील. खरंतर महापालिकेची मी आपल्याला थोडक्यात ओळख करुन देणार आहे. महानगरपालिकेमध्ये असलेले वेगवेगळे विभाग आहेत आणि या वेगवेगळया विभागाचं कामही वेगवेगळया पध्दतीनं चालतं मी आपल्याकडनं अपेक्षा व्यक्त करते की, या वेगवेगळया विभागाचं जे कामकाज चालतयं त्यामध्ये ज्या योजना अर्धवट स्थितीमध्ये आहेत आणि त्याच्या अनुषंगाने चालणारे जे गैरव्यवहार आहेत. याची आपण सखोल माहिती घ्यावी. आणि या शहरातील नागरीकांना योग्य तो न्याय द्यावा. अशी मी सर्व नगरसेवक आणि नागरीकांच्या वतीने विनंती करते. यामध्ये सगळयात महत्वाचा विभाग आहे तो म्हणजे पाणीपुरवठा सगळयांना माहिती आहे की,पिंपरी चिंचवड शहर हे वाढतं शहर म्हणुन या शहराची ओळख आहे. आणि या शहराची २५ लाखांच्या पुढेही लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. २०१२ पासून या शहरामध्ये असा एकही नगरसेवक नाही की,तो या विभागाच्या कामकाजावर खुश आहे. आजही आपल्या शहराची अशी अवस्था आहे की,१००% धरण भरलेलं असताना देखील आपण शहराला दररोज पाणीपुरवठा करु शकत नाही. कुठलंही कामकाज करीत असताना ३० ते ४० वर्षाचं नियोजन करुन काम करीत असतो. परंतु याठिकाणी त्या कामकाजाचा अभाव आपल्याला जाणवतोय. दरवर्षी होणारी ४० टक्के जी गळती आहे. याचं प्रमाण आजतागायत कमी  झालेलं नाही. आपण पवना धरणातून ४८० एमएलडी पेक्षा जास्त पाणी उचलतो पण ४० टक्के गळतीमुळे आपण १०० टक्के पाणीपुरवठा करु शकत नाही.ही खरी खेदाची गोष्ट आहे.म्हणुनच आपण २०१२ ला या सभागृहामध्ये पाणीपुरवठयाचा विषय आला त्यावेळेस सर्व नगरसेवकांची ओरड सुरु झाली. त्यावेळेस आपल्या अधिका-यांना जाग आली २०१२ नंतर त्यांनी भामा आसखेड,आंद्रा  धरण असेल  यामधुन पाणी उचलण्यासाठी नियोजन सुरु केलं. भामा आसखेड धरणामधुन आपण १६७ एमएलडी पाणी घेणार आहे. आणि आंद्र धरणातुन १०० एमएलडी पाणी घेणार आहे. पण आयुक्त साहेब,आज शहराची जर लोकसंख्या पाहिली तर आणि वाढतं क्षेत्र जर का पाहिलं तर भविष्यात हे ही पाणी आपल्याला कमी पडणार आहे. ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे आपले अधिकारी झोपेचं सोंग घेतात की,काय हे ही समजत नाही. आपण २०१४ ला मंजुरी घेतली आहे. मंजुरी घेतल्यानंतर पहिला हप्ता जो द्यायचा होता त्यामध्ये आपल्या अधिका-यांनी गलथानपणा केला आणि ही योजना पुन्हा गायब झाली. २०१४ नंतर या सभागृहात पुन्हा ओरड सुरु झाली त्यानंतर यांना साक्षात्कार ही झाला आणि आपल्या अधिका-यांनी मान्यता घेण्यासाठी पुन्हा प्रयत्न केले. २०१८ पर्यंत म्हणजे त्यांना तब्बल ४ वर्ष प्रयत्न करावे लागले. ४ वर्षानंतर आता आपण पहिला हप्ता भरलेला आहे. पण एवढं असताना सुध्दा आज

वस्तुस्थिती अशी आहे की, कुठलंही काम करताना भूसंपादन फार महत्वाचा विषय असतो. आणि आपलं घोडं इथंच अडकलेलं आहे. यामध्ये १०० टक्के भूसंपादन आजही झालेलं नाही. यामध्ये ५ कि.मी.खाजगी जागेतुन आणि ७ कि.मी.वन खाते आणि उर्वरित एमआयडीसी व सार्वजनिक बांधकाम विभाग या जागेतुन हे काम जाणार आहे. परंतु आज आपल्याकडे भूसंपादन न झाल्यामुळे आजही हा विषय रेंगाळलेलाआहे. एवढं सगळं करुन जर भूसंपादन झालं नाही तर सर्व नागरीक आणि आम्हांलाही असं वाटतयं की, आपली स्थिती पुन्हा पवना बंद जलवाहिनीसारखी होऊ नये. ही योजना बारगळु नये म्हणुन म्हणते आयुक्त साहेब आपण दक्ष रहा. खरंतर आपण शहराला दररोज पाणीपुरवठा करणार अशी घोषणा केली होती. परंतु आज अशी वस्तुस्थिती आहे की, दिवसाआड पाणीपुरवठा करतोय. शहराला दररोज पाणीपुरवठा करण्याची कॅपॅसिटी नसताना देखील २४ बाय ७ पाणीपुरवठा ही योजना आपण का बरं राबवली आहे. या योजनेसाठी आपण कोटयावधी रु.कशासाठी खर्च केले आहेत. आणि ठराविक ठेकेदार आणि टारगेट डोळयासमोर ठेवुन आपण अनावश्यक खर्च करीत असतो. मुळ जो उद्देश आहे तो आपण कधीच सोडवण्याचा प्रयत्न करीत नाही. आयुक्त साहेब,माझी आपल्याला विनंती राहील की, आपण मुळ प्रश्नांकडे लक्ष द्यावं आणि तो प्रथम सोडवावा. भूसंपादन लवकरात लवकर करुन शहरातील नागरीकांना व्यवस्थित पाणी पुरवठा करता यावा यासाठी आपण जातीनं लक्ष द्यावं. दुसरा प्रश्न आहे मोकाट कुत्र्यांवर अनेक जनरल बॉडी गाजलेल्या आहेत. खरंतर शहरामध्ये भटक्या कुत्र्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असुन गेल्या वर्षभरात ८७५३ कुत्र्यांनी चावा घेतलेला आहे. आणि या कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी २०१९ साली ४ कोटी रु.खर्च केलेला आहे. निर्मल केंद्रात ४०१ खोल्या उभारणार आणि त्याठिकाणी दररोज १०० मोकाट कुत्र्यांवर शस्त्रक्रिया करणेचे नियोजन होते.तर आतापर्यंत आपण किती कुत्र्यांवर शस्त्रक्रिया केलेल्या आहेत. आणि जर शस्त्रक्रिया प्रामाणिकपणे केल्या तरीही ती संख्या दिवसेंदिवस वाढतच जातात. ७००० मोकाट कुत्र्यांसाठी जवळ जवळ ७० हजारांचा खर्च अपेक्षित आहे. आणि एवढया मोठया प्रमाणात खर्च करुनही आपल्याला आऊटपुट

काहीच मिळत नाही. म्हणुन आयुक्त साहेब,माझी आपल्याला विनंती आहे की, खरंतर आपण दक्ष रहा.आपला पुढचा प्रकल्प आहे तो म्हणजे वेस्ट एनर्जी प्रकल्प या प्रकल्पाला आपण २०१८ रोजी मंजुरी घेतली आणि हा प्रकल्प अजुनही पेपरवरतीच आहे. आज तो काय स्टेजला आहे याचा खुलासा नगरसेवकांना दिला जात नाही. या प्रकल्पासाठी मनपा तर्फे ५० कोटी देणार आहोत. यासाठी कोणत्या प्रकारची मशिनरी वापरणार आहे. आणि ती कुठून आणणार आहे याची माहिती नगरसेवकांना दिली जात नाही. म्हणजे एवढया मोठया प्रमाणात खर्च करुनही सगळे नगरसेवक अनभिज्ञच आहेत याकडे आयुक्त साहेब,आपण लक्ष द्यावं आणि म्हणुन म्हणते आयुक्त साहेब,आपण दक्ष रहा. कोरोना काळातील बिलांची चौकशी मला वाटतं याच्यावर गेल्या २/३ महिन्यापासून रामायण झालेलं आहे. आणि खरंतर कोरोना काळामध्ये भरमसाठ बिलं दिलं गेलेली आहेत. या बिलांची चौकशी व्हावी यासाठी आपल्या शहराचे आमदार खासदार यांनी विधानसभेमध्ये मागणी केलेली आहे. खरंतर ही गोष्ट आपल्या शहरासाठी फार लाजीरवाणी गोष्ट

आहे. जिथं लोकांच्या जगण्याचा प्रश्न निर्माण झाला तिथं भ्रष्टाचार करणं सुध्दा सोडलेलं नाही. म्हणुन म्हणते आयुक्त साहेब,आपण दक्ष रहा. महानगरपालिकेची प्रतिमा भ्रष्टाचारामुळे दिवसेंदिवस मलीन होत चाललेली आहे. ती प्रतिमा स्वच्छ कधी होणार आहे. खरंतर कामगार नगरी म्हणुन ओळखली जाणारी ही नगरी,श्रीमंत महानगरपालिका म्हणुन ओळख आहे आणि आता ही ओळख पुसत चालली आहे. आणि भ्रष्टाचारी महानगरपालिका ही नव्याने ओळख होत चालली आहे. आयुक्त साहेब,ही जर ओळख आपल्याला पुसायची असेल तर आपण खरंच दक्ष रहाणं गरजेचं आहे. सल्लागारांना आपण पोसायचं काम करतोय. या सल्लागारांना पोसण्याचं काम आपण कमी केलं पाहिजे. १९८२ साली महानगरपालिकेची स्थापना झाली त्यावेळेला आपल्या अधिका-यांनी वायसीएमएच असेल,रामकृष्ण मोरे सभागृह असेल,अप्पुघर असेल असे वेगवेगळे प्रकल्प राबवले आणि ते यशस्वी केले. माणुस म्हणल्यानंतर १०० टक्के चुका होत असतात. त्यांच्याकडनं ही चुका झाल्या आहेत पण आज सल्लागार पोसणं हे फॅडचं झालेलं आहे. कुठलाही प्रोजेक्ट करायचा म्हणलं की त्याची आपल्याला गरजच पडते. आणि या सल्लागारावर कोटयावधी रु.खर्च करुन देखील त्यांनी केलेले प्रोजेक्ट फेल गेलेले आहेत. अशा वेळी आपण त्या सल्लागारावरती काय कारवाई केलेली आहे. त्यांच्यावरती योग्य ती कारवाई करणेत यावी. खरंतर या शहरामध्ये अनेक जेष्ठ नागरीक आहेत आणि त्यांनी त्या,त्या डिपार्टमेंटमध्ये खुप चांगलं काम केलेलं आहे. आणि काही संस्थाही आहेत त्यात त्यांचा उत्तम हातखंड आहे. अशा लोकांना जर का आपण आवाहन केलं तर नक्कीच आपल्या कुठल्याही प्रोजेक्टला आपल्याला योग्य ते मार्गदर्शन मिळेल आणि नागरीकांचा सपोर्टही मिळेल. आपण सल्लागारावर जो खर्च करतोय तो अनावश्यक खर्च आपल्याला कुठं तरी कमी केला जाईल. स्मार्ट सिटीची घोषणा मा.पंतप्रधानांनी दि.२५/२/२००५ रोजी केली राज्य शासनाने या योजनेसाठी महाराष्ट्र राज्यातील ६ शहरांची निवड केली त्यामध्ये पिंपरी चिंचवड शहराचा अंतिम टप्प्यामध्ये समावेश करणेत आला. आपल्याला केंद्र शासनाचे ५०० कोटी,राज्य शासनाचे २५० कोटी आणि महापालिकेचे २५० कोटी असा जवळ,जवळ १००० कोटी रु.प्रोजेक्ट आहे. हा प्रोजेक्ट करताना याच्यामध्ये २ विभाग केलेले आहेत. एरिया डेव्हलपमेंट आणि पॅन सिटी यामध्ये एरिया बेस डेव्हलपमेंटसाठी ५६४ कोटीचा निधी व पॅन सिटी साठी ५३९ कोटीचा निधी राखीव ठेवण्यात आलेला आहे. पण वस्तुस्थिती अशी आहे की, स्थायी समितीपेक्षा स्मार्ट सिटीमध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार चालतोय अशा बातम्या वारंवार वर्तमानपत्रामध्ये येतात. खरंतर मी पुढारीचं अभिनंदन करेन की, योग्य गोष्टींना योग्यवेळी ते वाचा फोडण्याचं काम करतयं आणि या स्मार्ट सिटी अंतर्गत जेवढया कामांचे आदेश दिलेले आहेत. त्या सगळया कामांची आयुक्त साहेब आपण सखोल चौकशी करावी. कारण त्यामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. आणि दूध का दूध आणि पाणी का पाणी हे फक्त आपणच करु शकता.आणि सर्व नागरीकांच्या आपल्याकडनं खुप अपेक्षा आहेत म्हणुन म्हणते आयुक्त आपण दक्ष रहा. त्यानंतर पंतप्रधान आवास योजना हा एक महत्वाचा प्रोजेक्ट होता. सर्वसामान्यांना परवडणारी घरे बांधण्यामध्ये म्हाडा, पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरण यांना जे अपयश आले आहे.

महानगरपालिकेची घरकुल योजना असेल या सगळया योजनांकडे पंतप्रधान आवास योजनेकडे सगळया नागरीकांच लक्ष लागलेलं आहे. या योजनेसाठी ४९ हजार अर्ज आले असुन त्यासोबत पालिकेने प्रत्येकी ५ हजार रु.चा डिमांड ड्राफ्ट घेतलेला आहे. त्यापोटी पालिकेकडे २४ कोटी ५८ लाख रु.जमा झाले असुन ही रक्कम पालिका बिनव्याजी वापरणार आहे. ३६६४ घरांसाठी सोडत काढल्यानंतर उर्वरित ४५ हजार ४९९ लोकांचे प्रत्येकी ५ हजार रु.याप्रमाणे २२ कोटी ७४ लाख ९५ हजार रु.अडकुन पडणार आहेत. २५ लाख लोकसंख्येच्या शहरात सामान्य माणसाला परवडतील अशा किमान १ लाख घरांची गरज असताना या योजनेतील ३६६४ घरे आहेत इथं तर ६० हजार घरेही पुरणार नाही. भरणा वेळेत भरला नाही तर किंमत वाढणार का? कारण घरांचा प्रश्न सोडवण्यासाठी पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरणाची स्थापना झाली परंतु प्राधिकरण ही मुळ उद्देशापासून भरकटली आहे त्यामुळे अनधिकृत बांधकामे वाढली आहेत व मनपा हद्यीत देखील अनधिकृत बांधकामे वाढली. म्हाडा, प्राधिकरणाचे प्रकल्पाचे दर हे जास्त असल्याने लोक पालिकेच्या योजनेकडे डोळे लावुन बसले आहेत. परंतु आरक्षित जागेचा ताबा मिळवण्यासाठी अडचणी अनुदान मिळवण्यास व भूसंपादन न झाल्यामुळे त्यासाठी लागणारा विलंब त्यामुळे त्याची किंमत वाढते की काय घरकुलाच्या किंमती वाढल्या तर पंतप्रधान आवास योजनेची गत याप्रमाणे होणार आहे की,काय असं नागरीकांना आता वाटायला लागलं आहे. म्हणुन म्हणते आयुक्त साहेब,दक्ष रहा. आपल्या महानगरपालिकेत सर्वात महत्वाचा विभाग म्हणजे बांधकाम विभाग एखाद्या जत्रेला स्वरुप यावं असं या डिपार्टमेंट मध्ये रोजचं स्वरुप असतं पण या बांधकाम विभागामध्ये इतक्या मोठया प्रमाणात भ्रष्टाचार चालतोय खरंतर इथं सर्वसामान्य माणसाला डीसी रुल लावला जातो.परंतु जे मोठे बांधकाम व्यवसायीक आहेत त्यांच्यासाठी डी.सी.रुल नाही का? महानगरपालिकेच्या स्थापनेपासून ३५ ते ४० हजार लोकांनी बांधकाम परवानगी घेतली पण त्याचं कम्पलीशन लेटर फक्त ३ ते ४ हजार लोकांनीच घेतलेलं आहे. यामध्ये सर्वसामान्य नागरीकांच्या सर्व्हेसाठी ज्याप्रमाणे आपण एजन्सी निर्माण केली तशी एजन्सी या बांधकाम व्यवसायिकांच्या बांधकामासाठी नेमावी अशी आयुक्त साहेब आपल्याला विनंती करते. आणि या विभागांकडे आपण जातीने लक्ष द्यावं म्हणुन म्हणते आयुक्त साहेब,खरंतर आपण दक्ष रहा. झोपडपट्टी मुक्त शहर कधी होणार सर्व्हेक्षणानंतर खरंतर आपल्या शहरामध्ये ७१ झोपडपट्टया आहेत त्यातील ३७ घोषित झोपडपट्टया आहेत २६ अघोषित झोपडपट्टया आहेत त्यातील १२ झोपडपट्टयांचं पुनर्वसन झालेलं आहे ८ झोपडपट्टयांच्या पुनर्वसनासाठी बांधकाम व्यवसायिकांनी प्रस्ताव जिल्हाधिका-यांकडे पाठवला आहे. परंतु तो प्रस्ताव आज कोणत्या स्टेजला आहे हे आजतागायत कुठल्याही नगरसेवकांना माहित नाही. या झोपडपट्टीमध्ये २००१ ला २ लाख ४२ हजार ८०६ नागरीक राहतात. ही लोक आर्थीकदृष्टया दुर्बल घटकातील असल्यामुळे यांनाही कमी किंमतीमध्ये चांगल्या प्रकारची घरे मिळावी अशी त्यांची अपेक्षा आहे. आणि या योजनेमध्ये आपण जातीने लक्ष घालून मार्गी लावावी. यासाठी मी आपल्याला विनंती करते की,आपण दक्ष रहा. आपला आताचा एक मोठा इश्यु होता तो बोगस एफडीआर

खरंतर पिंपरी चिंचवड मनपाच्या वादग्रस्त ठरलेल्या ठेकेदारांच्या बोगस ठेवी आहेत त्यातील १८ ठेकेदारांना आपण काळया यादीत टाकले तर ५ जणांवर फौजदारी गुन्हे दाखल झाले आहेत. असे बोगस ठेवी ठेवणा-यांना साथ देणारे अभियंता व अधिकारी याला तेवढेच जबाबदार आहेत. यामध्ये राजकीय दबावामुळे सखोल चौकशी झालेली नाही.तत्कालीन आयुक्त यांनी सक्षम अधिका-यांची नेमणुक करुन याची सखोल चौकशी का केली नाही. चौकशी केली असती तर चुक करणारा अधिकारी आणि ठेकेदार समोर आले असते. महानगरपालिकेची निविदा ही चार पाकीटामध्ये भरली जाते.सर्व कागदपत्रे, सर्टीफिकेट, नोंदणी दाखला, बयाणा रक्कम..........

**मा.महापौर –** माया ताई, एकच मिनिट बोलते,मलाही हे आवडत नाही पण काय झालं आहे मायाताई आजचा आपला काहीच विषय नाही,अजेंडा नाही त्यामुळे मला आपल्याला सांगाव लागत आहे. म्हणुन आशाताईंना तुमच्याकडे पाठवलं होतं.

**मा.माया बारणे –** शेवट आहे मा.महापौर, ठेका किती दराने भरला याची आकडेवारी यामध्ये असते. खरंतर निविदा प्रक्रिया उघडल्यानंतर लेखापाल,लेखापरिक्षक, संबंधित कामाचा कार्यकारी अभियंता किंवा उपअभियंता,संबंधित विभागाचा निविदा लिपिक यांच्यासमोर निविदा उघडली जाते. निविदा उघडताना प्रथम पाकीट क्र. १ उघडली जाते तेंव्हा कागदपत्रांची छाननी होणे अपेक्षित आहे. परंतु अशा प्रकारची छाननी खरंतर पारदर्शीपणे केली जात नाही. म्हणुनच हे जे बोगस एफडीआर प्रकरण झालं आहे त्याला आपले अधिकारी आणि संबंधित ठेकेदार जबाबदार आहेत. खरंतर पोलिस आयुक्त कृष्ण प्रकाश यांच्या म्हणण्यानुसार खटले दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे परंतु महापालिकेने सक्षम असा अधिकारी नेमलेला नाही. आयुक्त साहेब,असे खटले दाखल करताना सक्षम असा अधिकारी नेमावा अशी मी आपल्याला विनंती करते. आणि मा.महापौर साहेब, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभारी आहे. याठिकाणी थांबते धन्यवाद.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह आदरणीय आमच्या भगिनीताईंनी ज्या काही पोटतिडकीने विषय मांडलेले आहेत. आयुक्त साहेब, आपण या विषयाकडे थोडसं लक्ष द्यावं आणि माझी नगरसचिवांना विनंती आहे की, सभागृहात कोरम नसलेने सदरची सभा गुरुवार दिनांक १८/०३/२०२१ रोजी दुपारी १.३० वा.पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा. ॲड.मोरेश्वर शेंडगे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेवुन आजची सभा कोरम अभावी दि.१८/३/२०२१ रोजी दुपारी १.३० पर्यंत तहकुब करणेत येत आहे.

------

(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी- ४११ ०१८**
**मा.महापालिका सभा**
**कार्यपत्रिका क्रमांक – ५३**
**सभावृत्तांत**
**(दि.१८/२/२०२१ (दु.२.०० व २.३०), दि.२२/२/२०२१ व दि. ९/३/२०२१ ची तहकूब सभा)**

दिनांक – १८.३.२०२१ वेळ – दुपारी १.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.९/३/२०२१ दुपारी २.०० ची तहकूब मा.महापालिका सभा गुरुवार दिनांक १८/३/२०२१ रोजी दुपारी १.३० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर
२) मा.कुंदन अंबादास गायकवाड
३) मा.वसंत प्रभाकर बोराटे
४) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे
५) मा.बुर्डे सुवर्णा विकास
६) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
७) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
८) मा.डोळस विकास हरिश्चंद्र
९) मा.गोफणे अनुराधा देविदास

१०) मा.बारसे प्रियांका प्रविण

११) मा.अजित दामोदर गव्हाणे

१२) मा.लांडगे रवि लक्ष्मण

१३) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

१४) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

१५) मा.सावळे सिमा रविंद्र

१६) मा.लांडे विक्रांत विलास

१७) मा.राहुल हनुमंतराव भोसले

१८) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

१९) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

२०) मा.केशव हनुमंत घोळवे

२१) मा.मंगला अशोक कदम

२२) मा.तुषार रघुनाथ हिंगे

२३) मा.अश्विनी भिमा बोबडे

२४) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

२५) मा.संजय बबन नेवाळे

२६) मा.भालेकर प्रविण महादेव

२७) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

२८) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

२९) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३०) मा.घोलप कमल अनिल

३१) मा.उत्तम प्रकाश केंदळे

३२) मा.चिखले सचिन तुकाराम

३३) मा.यादव मीनल विशाल

३४) मा.वैशाली जालिंदर काळभोर

३५) मा.राजू मिसाळ

३६) मा.बाबर शर्मिला राजू

३७) मा.अमित राजेंद्र गावडे

३८) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३९) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४०) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

४१) मा.भोईर सुरेश शिवाजी

४२) मा.अपर्णा निलेश डोके

४३) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४४) मा.गावडे राजेंद्र तानाजी

४५) मा.जयश्री वसंत गावडे

४६) मा.कोमल दिपक मेवानी

४७) मा.सुलक्षणा राजू धर

४८) मा.शाम गणपतराव लांडे

४९) मा.सुजाता सुनिल पालांडे

५०) मा.योगेश मंगलसेन बहल

५१) मा.कदम निकीता अर्जुन

५२) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

५३) मा.नढे विनोद जयवंत

५४) मा.पाडाळे निता विलास

५५) मा.काळे उषा दिलीप

५६) मा.बारणे अर्चना तानाजी

५७) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

५८) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

५९) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

६०) मा.बारणे माया संतोष

६१) मा.निलेश हिरामण बारणे

६२) मा.कलाटे राहुल तानाजी

६३) मा.कामठे तुषार गजानन

६४) मा.चोंधे आरती सुरेश

६५) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

६६) मा.सविता बाळकृष्ण खुळे

६७) मा.सुनिता हेमंत तापकीर

६८) मा.चंद्रकांत बारकु नखाते

६९) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

७०) मा.कुटे निर्मला संजय

७१) मा.आंगोळकर सागर सुनिल

७२) मा.मुंढे उषा अंकुश

७३) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

७४) मा.आशा धायगुडे-शेंडगे

७५) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

७६) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

७७) मा.नवनाथ दत्तू जगताप

७८) मा.संतोष बबन कांबळे

७९) मा. भाऊसाहेब सोपानरावभोईर

८०) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

याशिवाय मा.राजेश पाटील-आयुक्त, मा.विकास ढाकणे-अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप-नगरसचिव तथा अति.आयुक्त (३), मा.कुंभोजकर-मुख्य लेखापरिक्षक, मा.डॉ.रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.पवार-उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे-मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.इंगळे, मा.चितळे, मा.दुरगूडे, मा.इंदलकर, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत-उप आयुक्त, मा.भालकर, मा.सवणे-सह शहर अभियंता, मा.शिंदे-प्रशासन अधिकारी(प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे-अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे-अधिष्ठता वायसीएमएच, मा.कुलकर्णी, मा.भोसले-कार्यकारी अभियंता, मा.दगडे-पशुवैद्यकीय अधिकारी, मा.जरांडे- सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.महापौर –** उपस्थित मा.नगरसेवक, मा.नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.उत्तम केंदळे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- ३

दिनांक १८/३/२०२१ विभाग –मा.आयुक्त

**संदर्भ** – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पअक/५/कावि/५४६/२०२०, दि.२३/१०/२०२०

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.७७२७ दि.०९/१२/२०२० अन्वये.

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.५८७, दि.२०/०१/२०२१

पिंपरी चिंचवड शहरातील सांडपाण्यावर शहरातील विविध मलनि:सारण केंद्राव्दारे प्रक्रिया केली जाते. सदर मलनि:सारण केंद्रामधून बाहेर पडणा-या प्रक्रियायुक्त पाण्यावर पुढील प्रक्रीया करुन शहरातील औद्योगिक तसेच निवासी भागात पाणी पुरवठा करण्याकरीता [Recycling & Reuse] सल्लागारामार्फत शहरासाठी विस्तृत आराखडा तयार करण्यात आला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समिती मार्फत मा.महापालिका सभा ठराव क्र.३३८, विषय क्रमांक १० दि.२०/१२/२०१८ नुसार उक्त पुनर्वापर व पुनर्चक्री करणाच्या विस्तृत धोरणास तसेच सदरच्या प्रकल्पाची अंमलबजावणी PPP किंवा HAM Mode I नुसार करणेचे प्रस्तावास मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर प्रक्रियायुक्त पाणी पुरवठ्याकरिता सल्लागारामार्फत शहरासाठी विस्तृत आराखडा [Master Plan] तयार करण्यात आला आहे. सदर Master Plan मध्ये शहराच्या भौगोलिक रचनेनुसार चार भाग करण्यात आले आहेत.

1. भाग क्र.१ : पिंपळे सौदागर, वाकड, हिंजवडी MIDC चिंचवड
2. भाग क्र.२ : चिखली MIDC
3. भाग क्र.३ : निगडी प्राधिकरण व तळेगांव MIDC
4. भाग क्र.४ : चाकण MIDC

सदर आराखड्यानुसार संपूर्ण शहरासाठी प्रतिदिन १२० दशलक्ष लिटर एवढ्या प्रक्रियायुक्त पाण्याचा पुनर्वापर केला जाऊ शकतो सदर Master Plan पैकी पहिल्या टप्प्यामध्ये स्मार्ट सिटी अंतर्गत Area Based Development (ABD) मधील पिंपळे

सौदागर, तसेच वाकड, हिंजवडी MIDC Area याकरिता कासारवाडी मलनिःसारण प्रक्रिया केंद्रातून प्रतिदिन ७५ दशलक्ष लिटर सांडपाणी प्रक्रिया करून पाणीपुरवठा करणे प्रस्तावित आहे .

तथापि, शहरासाठी विस्तृत आराखड्यामधून मनपा हद्दीबाहेरील हिंजवडी भागासाठी MIDC कडून अद्याप MOU झाले नसल्याने सद्यस्थितीत पहिल्या टप्प्यामधून वगळण्याचे तसेच शहरातील पाण्याची टंचाई असणा-या भागाचा समावेश करुन प्राधान्यक्रम बदल करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. त्यानुसार शहरातील वेगाने वाढणा-या चिखली व च-होली भागाचा दुस-या टप्प्यातील भागाचा समावेश प्राधान्याने पहिल्या टप्प्यात करणेच्या प्रस्तावास मान्यता घेणे आवश्यक आहे. यामध्ये चिखली मैलाशुध्दीकरण केंद्र टप्पा १ (क्षमता १६ एमएलडी) हे ३० वर्षापेक्षा जुने झाले असून जुन्या तंत्रज्ञानावर आधारित आहे. सदर STP ची दुरुस्ती करणेसाठी मोठा खर्च लागणार आहे . चिखली येथील सदर मलशुद्धीकरण केंद्राचे आयुष्यमान संपुष्टात येत असल्याने सदर मलशुद्धीकरण केंद्राची पुनर्बांधणी करणे आवश्यक आहे.याकरिता सदर ठिकाणी सध्याच्या १६ MLD क्षमतेच्या केंद्राच्या ठिकाणी अत्याधुनिक तंत्रज्ञानावरील व भविष्यातील वाढणा-या सांडपाण्याचा विचार करुन २० MLD क्षमतेचा MBR तंत्रज्ञानावर STP करणेचे प्रस्तावित करण्यात येत आहे. नूतनीकरण प्रस्तावित असलेल्या प्रकल्पातून पुनर्वापर योग्य पाण्याची निर्मिती करण्यात येईल. त्यामुळे खर्चात बचत होणार आहे .पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पुनर्वापर व पुनर्चक्रीकरणाच्या प्रकल्पाची निविदा काढणेकामी विविध तांत्रिक मते, कल समजण्या हेतूने विविध संभावित इच्छुक निविदाधारकांची अनौपचारिक बैठक (Pre Tender Conference) दिनांक ११/०६/२०२० रोजी Online आयोजित करणात आली होती. सदर बैठकीमध्ये इच्छुक निविदाधारक यांनी प्रकल्प HAM पद्धतीमध्ये कमीत - कमी ६० %प्रकल्प किमतीची रक्कम उभी करू शकतात तसेच विविध वित्तीय संस्था व वित्तीय पुरवठा करणा-या धनको यांनी प्रकल्प उभारणीच्या काळात कर्जावरील लागणारे व्याज IDC (Interest During Construction) हे प्रकल्प किमतीमध्ये गृहीत धरावा अशी मागणी केली. त्याबाबत प्रकल्पाच्या Technical Appraisal Committee (TAC) कडे मागणी विचारार्थ ठेवली असता TAC समितीने या बाबींस मान्यता दिली आहे. तसेच, प्रकल्प अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १७७, ६६अ, कलम ६६ च्या पोटकलम ४१अ नुसार लोक खाजगी सहभागातून (PPP) किंवा HAM [Hybrid Annuity Model] पुनर्वापर व पुनर्चक्रीकरण प्रक्रिया केंद्र व यंत्रणा उभारणी व कलम १०९ नुसार विविध वितीय पुरवठादाराद्वारे निधी उभारणेसाठी मा.आयुक्त यांना कलम ७२(ब) अन्वये

प्राधिकृत करणेस मान्यता देणेचेही प्रस्तावित आहे. प्रकल्पाचा प्राधान्यक्रम बदलून शहराच्या वाढीचा वेग व पाण्याचा तुटवडा असलेल्या भागांचा समावेश पहील्या टप्प्यात करुन खालील भागाचा समावेश करणेस मान्यता आवश्यक आहे.

1. वाकड, पिंपळ सौदागर, पिंपळेगुरव, कासारवाडी, चिंचवड, चिखली च-होली व MIDC क्षेत्रात कासारवाडी येथून ७५, चिखली मधून २० व च-होली येथून ५ असे एकुण प्रतिदिन सुमारे १०० दशलक्ष लिटर इतके पाणी पुर्नविक्रीकरणव्दारे उपलब्ध करणे व त्यापैकी सुमारे ८ एम.एल.डी.पाणी पिण्याच्या गुणवत्तेचे शुध्द करणेसाठी RO प्रणालीचा वापर करणे.

2. प्रक्रियायुक्त पाण्याच्या पुनर्वापराकरिता आवश्यक त्या ठिकाणी आराखड्यानुसार सुमारे ३०६ किमी प्राथमिक जाळे तयार करणे .

3. वाकड, पिंपळे सौदागर, कासारवाडी एम.आय.डी.सी. चिखली व च-होली अशा पाच ठिकाणी १ ते ५ दशलक्ष लिटर क्षमतेचे जलकुंभाची निर्मिती.

4. या प्रस्तावित योजने अंतर्गत येणारा खर्च तसेच प्रकल्पाच्या बांधकाम कालावधीतील व्याज इत्यादींचा समावेश करता प्रकल्पाचा मुळ खर्च र.रु.५३२/- कोटी व जीएसटी, रॉयल्टी Contingencies Charges, Interest During Construction व Work Establishment Charges इत्यादी सह एकत्रित प्रकल्पाचा अंदाजित खर्च र.रु.६५४ -/कोटी इतका येत आहे .त्यास प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे.

सदर योजना HAM पद्धतीनेच राबविण्याचे प्रस्तावित असून यामध्ये एकूण खर्चापैकी मनपा मार्फत जास्तीत जास्त ४०% भांडवली खर्च कंत्राटदारास प्रकल्प उभारणीच्या कालावधीत टप्प्याने वितरीत करण्यात येईल व उर्वरित हिस्सा प्रकल्प कार्यान्वित झाल्यापासून ७ वर्षात त्रैमासिक पद्धतीने वितरीत करण्यात येईल. सदर प्रकल्पाच्या १५ वर्षाच्या परिचालनाची तसेच देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी सबंधित ठेकेदाराची असणार आहे. सबब, पिंपरी चिंचवड शहरातील सांडपाण्यावर प्रक्रीया करुन त्याचे पुनर्चक्रीकरण तसेच पुन:र्वापर (Recycling & Reuse) करणे या प्रकल्पाच्या सुधारित र.रु.६५४ -/कोटीच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस किंवा प्रकल्पाच्या किंमतीमध्ये बदल झालेस होणारे प्रत्यक्ष खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी तसेच यापूर्वी मा.महापालिका सभेने ठराव क्रमांक ७१, दिनांक ०७/१२/२०१८ रोजी मान्यता दिलेल्या विषयामध्ये वरील नमूद केलेप्रमाणे शहराची होणारी वाढ व काही भागात असणारी पाणी टंचाई यांचा विचार करुन प्रकल्पाचा प्राधान्यक्रम बदलणेस तसेच आवश्यकते प्रमाणे प्रकल्पाची व्याप्ती निश्चित करणेस तसेच सदरचा प्रकल्प कलम १०९ नुसार खाजगी सहभागातून विविध वित्तीय पुरवठ्याव्दारे निधी उभारणेच्या (PPP/HAM) धोरणास महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम कलम १७७, ६६अ, कलम ६६ चे पोटकलम ४१ अ त्याचप्रमाणे या प्रकल्पासाठी कलम ७२(ब) अन्वये मा.आयुक्त यांना अंमलबजावणी प्राधिकारी म्हणून सर्व वित्तीय अधिकार देवून

निविदा मान्यतेकामी सक्षम प्राधिकारी यांचेकडे सादर करणेचे सर्व अधिकार देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.उषा मुंढे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.केशव घोळवे** – मा.महापौर साहेब, मी पुढील प्रमाणे उपसूचना मांडतो- सदर प्रकल्पातून पुरवण्यात येणा-या प्रक्रियायुक्त पाण्यासाठी स्वतंत्र पाणी मीटर प्रत्येक जोडणीसाठी बसविणेत यावे. तसेच सदरच्या प्रकल्पातून प्रक्रिया केलेल्या पाण्याचे दर हे घरगुती वापरासाठी पहिल्या तीन वर्षासाठी मोफत व त्यापुढे मनपाच्या पिण्याच्या पाण्याच्या दरापेक्षा २०% कमी तसेच वाणिज्य तसेच औद्योगिक वापरासाठी ३०% कमी ठेवणेत यावेत म्हणजेच घरगुती वापरासाठी पहिल्या तीन वर्षासाठी मोफत व त्यापुढे पिण्याच्या पाण्याच्या दराच्या ८०% तसेच वाणिज्य व औद्योगिक वापरासाठी पहिल्यापासुन ७०% दराने आकारणी करणेस मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र. २९ पिंपळे गुरव येथील वैदुवस्ती, भैरवनाथ नगर, गणेश नगर व सुदर्शन नगर परिसर भौगोलिक दृष्ट्या उंचावर असलेने, सदर ठिकाणी नागरिकांना पुरेशा दाबानी पाणी मिळत नाही. सद्यस्थितीत एकदिवसा आड पाणीपुरवठा असलेने व अपु-या दाबाने पाणीपुरवठा होत असलेने तेथील नागरिकांच्या वारंवार तक्रारी येत आहेत. सदर परिसरात पुरेशा दाबाने पाणीपुरवठा करणेसाठी, उंच पाण्याची टाकी बांधणे आवश्यक आहे. परंतु सद्यस्थितीत सदर परिसरात मोकळी जागा उपलब्ध नाही त्यामुळे सदर परिसरामध्ये उपलब्ध असलेल्या, आरक्षण क्र. 357 A बेघरांसाठी घरे (HDH) या जागेमध्ये पाण्याची उंच टाकी बांधणेकामी आवश्यक ती पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच प्रभाग ३१ नवी सांगवी या परिसरात नागरिकांना खूप दिवसापासुन पिण्याच्या पाण्याच्या अनेक समस्या जाणवत आहेत. रोज कमी दाबाने पाणीपुरवठा होणे, तसेच कमी वेळ पाणीपुरवठा होणे, अशा समस्या वारंवार जाणवत असुन नागरिक त्यामुळे त्रस्त झाले आहेत. याबाबत वारंवार तक्रारी करुनही प्रश्न सुटत नाही. त्यासाठी पाण्याची टाकी बांधने आवश्यक आहे. परंतु सद्यस्थितीत सदर परिसरात जागा उपलब्ध नाही. त्यामुळे सदर परिसरामध्ये उपलब्ध असलेल्या आरक्षण क्र. ३३४ (मोकळी जागा) या ठिकाणी पाण्याची उंच टाकी बांधणेकामी आवश्यक ती पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत डुडुळगांव आरक्षण क्र.१/२३३, गट नं.१०५पै, १०७पै ते ११२ पै येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १३७८ निवासी गाळे बांधणेकामी प्रकल्प राबविण्याचे नियोजन आहे.

विषयांकित कामास मा.महापालिका सभा ठराव क्र.३९, दि.२०/०६/२०१७ अन्वये मान्यता मिळालेली आहे. सदर ठराव करतेवेळी विषयांकित कामाच्या

अंदाजपत्रकीय रक्कम ही सन २०१६-१७ च्या DSR प्रमाणे दर गृहित धरुन अंदाजपत्रकीय खर्च र.रु.७४,१३,९०,७२०/- (Infra खर्च वगळता) काढलेली होती.

त्याचप्रमाणे अंदाजपत्रक बनविणेकामी आवश्यक लागणा-या सर्व नाहरकत दाखले घेण्याची कार्यवाही सुरु असून कामाचे अंदाजपत्रक सन २०२०-२०२१ च्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील राज्यस्तरीय दरसूची (State Schedule Rate), MJP DSR-२०१९-२० व पिं.चिं.म.न.पा. मंजूर दर पृथ्थकरणानुसार करणेत येत आहे. त्याकामी अंदाजपत्रकीय खर्च र.रु.२००,००,००,०००/- (अक्षरी र.रु. दोनशे कोटी फक्त) इतका येणार आहे.

परंतू, सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रकात विषयांकित कामाची अंदाजपत्रकीय र.रु.९०,००,००,०००/- असल्यामुळे अंदाजपत्रकीय रकमेस तांत्रिक मान्यता घेणे व शासनाकडे DPR मान्यतेसाठी पाठविणे शक्य नसल्याने सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.२००,००,००,०००/- स प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

सबब, सन २०२०-२१ च्या दरसुचीनुसार व मंजूर दर पृथ्थकरणानुसार सदर प्रकल्पासाठी येणा-या अंदाजपत्रकीय र.रु.२००,००,००,०००/- स प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

तसेच प्रभाग क्र.२६ वाकड-पिंपळे निलख येथील रक्षक चौकात मनपामार्फत चौक सुशोभीकरणाच्या कामातून कृत्रिम धबधबा बांधण्यात आलेला होता. सद्यस्थितीत सदर धबधब्याची तुटफुट झालेली असून पुर्णपणे मोडकळीस आलेला आहे व अनेक वर्षांपासून बंद स्थितीत आहे. सदरचा कृत्रिम धबधबा पाडणेबाबत सदर प्रभागातील मा.नगरसेवक श्री.तुषार गजानन कामठे व मा.नगरसेविका श्रीमती.आरती सुरेश चौंधे यांनी मागणी केली होती. त्यानुषंगाने मा.ड प्रभाग समिती विषय क्र.६, ठराव क्र.२५, दि.१६/०३/२०१८ अन्वये सदर ठिकाणचा कृत्रिम धबधबा पाडणेबाबत मान्यता घेणेत आली.

परंतू मा.आयुक्तसो यांचेकडे विषयांकित बाबत प्रस्ताव सादर केला असता सदरची मनपा मालमत्तेची मिळकत पाडणे असल्यास मा.महापालिका सभेची मान्यता घेणेबाबत मा.आयुक्तसो यांनी दि.०३/११/२०१८ रोजीच्या शेरांकनानुसार कळविले आहे.

त्यास अनुसरून सद्यस्थितीत सदर धबधब्याची तुटफुट झालेली असून पुर्णपणे मोडकळीस आलेला आहे व अनेक वर्षांपासून बंद स्थितीत असल्यामुळे व मा.नगरसदस्य यांचे मागणीनुसार प्रभाग क्र.२६ वाकड-पिंपळे निलख येथील रक्षक चौकातील जुना कृत्रिम धबधबा पाडणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत यावी.

तसेच थेरगाव बापुजीबुवा नगर येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे वेंगसरकर अँकॅडमीच्या पेव्हेलियनचे उर्वरीत काम सद्यस्थितीत चालु आहे. अंदाजपत्रकात समावेश होता परंतु प्रत्यक्ष साईट वरील कामाच्या आवश्यकते नुसार सुधारीत बांधकाम परवाना व अग्नीशमन प्रतिबंधक योजना या मानांकनानुसार मुळ अंदाजपत्रकाच्या मोजमापात वाढ होत आहे. स्थापत्य विषयक कामात पॅव्हेलियनच्या इमारतीस टफन विथ लॅमिनेटेड ग्लास लावणे, ग्राऊंडच्या दर्शनिय बाजुस जाळी लावणे, सिमाभींतीस मुख्य गेट बसविणे, टेरेस मजल्यावरील किचन युनिट, सीमाभिंतीची उंची वाढविणे (m/s), जमिनी खालीली पाण्याची टाकी RCC, टेरेस मजल्यावरील शेराबोर्डचे फॉलसिलींग करणे, टेरेस व तळमजल्यावरील फर्निचर करणे, ईमारतीच्या सभोवतालचा परीसर सुशोभीकरण करणे, मुख्य गेट जवळ सुरक्षा रक्षक केबिन, इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वारा वरील काचेचे छत (Main entrance) या बाबी आवश्यक असलेने अंदाजपत्रकात वाढ होत आहे. इमारत पुर्ण व वापरात आणण्याच्या दृष्टीने सदर कामे करणे गरजेचे आहे.

विद्युत विषयक कामाच्या करारनाम्यात अग्निशामक प्रतिबंधक योजना (Fire Fighting), आग्निशामक जिना (M.S) या बाबींचा समावेश नव्हता परंतु इमारत पुर्णत्वाचा दाखला व अग्निशामक प्रतिबंधक योजना (Fire Fighting) यांच्या मानांकणानुसार मुळ अंदाजपत्रकात समावेश नाही, परंतु सदर कामे करणे गरजेचे आहे. सदर कामाच्या करारनाम्यात यांत्रिक बायुवीजन (Mechanical ventilation) शौचालयासाठी, इंटरनेट वायफाय सिस्टीम आणि इंटरकॉम सिस्टीम, सी.सी.टी.व्ही कॅमेरे, डेकोरेटीव्ह लाईट्स, बाबींचा समावेश नव्हता. परंतु कामाच्या आवश्यकतेनुसार खालील कामे करणे गरजेचे आहे. स्थापत्य व विद्युत विभागाची सुधारीत अंदाजपत्रकात एकुण र.रू. १,५३,००,०००/- इतकी वाढ होत आहे.

उर्वरीत कामे करानाम्यानुसार मनपाला पुर्ण करून देणे आवश्यक आहे. या कारणांमुळे सदर इमारतीचे काम पुर्ण करणेस प्रशासकीय मान्यता रक्कम अपुरी पडत आहे. त्यासाठी रक्कम रू २,००,००,०००/- इतक्या वाढीव प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता आहे. पुर्वीची प्रशासकीय मान्यता र.रू. ५०००००००/- इतकी आहे. त्यामध्ये र.रू. २,००,००,०००/- इतक्या रकमेची वाढ करून र.रू. ७०००००००/- इतकी प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

थेरगाव बापुजीबुवा येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे दिलीप वेंगसरकर अकॅडमीच्या पव्हेलीयनचे उर्वरीत काम करणे. या कामासाठी र.रू. ७०००००००/- इतकी वाढीव प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

तसेच प्रभाग क्र ४९ थेरगाव बापुजीबुवानगर येथील सर्व्हे नं ९ मध्ये दवाखाना इमारत बांधनेचे काम चालू आहे. सदर कामामध्ये डॉक्टरांच्या निवासस्थानाकरिता पाचवा मजल्याचे वाढीव बांधकाम करावयाचे असलेने त्या कामाकरिता र रु १४,३०,६५,००० इतकी निविदा रकमेत वाढ होत आहे. सदर वाढीव रक्कम सह सुधारित निविदा रक्कम रु.६३,२४,५५,५१५ इतकी होत आहे. सदरची रक्कम मूळ प्रशासकीय मान्यतेच्या (र.रु.६३,३८,३१,०००) मर्यादेत आहे. तथापी सदर कामाच्या स्वरुपात बदल झाला असलेने सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

सबब थेरगाव बापुजीबुवानगर येथील सर्व्हे नं ९ मध्ये दवाखाना इमारत बांधणेच्या कामाच्या सुधारित निविदा र.रु.६३,२४,५५,५१५ यास सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकातील फ क्षेत्रिय कार्यालय, स्थापत्य विभागाकडील प्रभाग क्र १३ मध्ये प्रथम प्राधान्याने करावयाच्या ब-याचशा विकास कामांसाठी अपुरी तरतुद ठेवणेत आली असल्याने, त्यामधील काही चालू कामांना व काही विकास कामांचे अंदाजपत्रक तयार करून, निविदा कार्यवाही करणेसाठी, प्रथम प्राधान्याने करावयाचे कामांचे तरतुदीमध्ये वाढ करणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे तरतुदीमध्ये वाढ करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | पा.क्र. | अ. क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०२०-२१ मधील तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | एकुण आवश्यक तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र १३ मधील यमुनानगर व इतर राहिलेल्या ठिकाणच्या रस्त्यांचे डांबरीकरण करणे | | | ५००००००० | ० | २००००००० | ० | २००००००० |
| २ | प्रभाग क्र १३ मधील निगडी व इतर राहिलेल्या ठिकाणच्या रस्त्यांचे डांबरीकरण करणे | | | ५००००००० | ० | २००००००० | ० | २००००००० |
| ३ | प्रभाग क्र १३ मधील यमुनानगर व इतर राहिलेल्या ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे | | | २००००००० | ० | १००००००० | ० | १००००००० |
| ४ | प्रभाग क्र १३ मधील निगडी व इतर राहिलेल्या ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे | | | २००००००० | ० | १००००००० | ० | १००००००० |
| ५ | भुसंपादन निधी | ३४२ | ३ | | १५०००००००० | ० | ६००००००० | १४४००००००० |
| | एकुण | | | १४००००००० | १५०००००००० | ६००००००० | ६००००००० | १५०००००००० |

एकूण र.रू ६,००,००,०००/- (अक्षरी र.रू. सहा कोटी फक्त इतके वर्गीकरण करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत यावी.

तसेच प्रभाग क्र.१६ रावेत किवळे मामुर्डी हद्दीलगत देहुरोड कॅन्टोमेंट हद्द आहे. मनपाच्या हद्दीलगत शितळानगर येथे स्मशानभुमी, ख्रिश्चन व मुस्लीम दफन भुमी आहे. मनपा ह्ददीत ख्रिश्चन व मुस्लीम दफन भुमी नसून मनपा ह्द्दीतील नागरीक सदरच्या दफनभुमीचा प्राधान्याने वापर करतात. देहुरोड कॅन्टोमेंट बोर्डाकडून सदर दफनभुमीची दुरुस्ती वेळोवेळी होत नाही. त्यामुळे मनपा हद्दीतली नागरीकांची दुरुस्तीकामी वारंवार मागणी होत आहे. सद्यस्थितीतील स्मशानभुमीचे काम मनपा मार्फत करणेत येत आहे.

ख्रिश्चन व मुस्लीम दफन भुमीचे दुरुस्ती व सुशोभीकरणाचे काम मनपामार्फत करणेत यावे. सदर बाब मनपा अंदाजपत्रकात देहुरोड कॅन्टोमेंट बोर्ड हद्दीतील शितळानगर येथील ख्रिश्चन व मुस्लीम दफन भुमीची दुरुस्ती व सुशोभिकरण कामाचा समावेश करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच प्रभाग क्र.१६ रावेत किवळे मामुर्डी हद्दीलगत देहुरोड कॅन्टोमेंट हद्द आहे. मनपाच्या हद्दीलगत चिंचोली, थॉमस कॉलनी, किन्हई येथे रस्ता उपलब्ध असुन तो अत्यंत खराब आहे. मनपा ह्ददीत ह्द्दीतील नागरीक सदरच्या रस्त्याचा प्राधान्याने वापर करतात. देहुरोड कॅन्टोमेंट बोर्डाकडून सदर रस्ता दुरुस्ती वेळोवेळी होत नाही. त्यामुळे मनपा हद्दीतली नागरीकांची दुरुस्तीकामी वारंवार मागणी होत आहे. सद्यस्थितीतील रस्ता दुरुस्ती काम मनपा मार्फत करणेची मागणी होत आहे.

चिंचोली, थॉमस कॉलनी, किन्हई रस्ता दुरुस्ती काम मनपामार्फत करणेस मान्यता देणेत यावी. सदर बाब मनपा अंदाजपत्रकात देहुरोड कॅन्टोमेंट बोर्ड हद्दीतील चिंचोली, थॉमस कॉलनी, किन्हई रस्ता दुरुस्ती व निधी वर्ग करणेबाबत कामाचा समावेश करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच प्रभाग क्रमांक १९ मधील कोहिनूर शांग्रीला, एम्पायर इस्टेट, विस्डम पार्क, साईबाबा नगर व आनंद नगर इत्यादी भागामध्ये एम.आय.डी.सी. लाईन मधून पाणीपुरवठा होतो. सदर ठिकाणी नागरिकांना पुरेशा दाबाने पाणीपुरवठा होत नसल्याने तेथील नागरिकांच्या वारंवार तक्रारी येत आहेत. सदर परिसरात पुरेशा दाबाने पाणीपुरवठा करणेसाठी, उंच पाण्याची टाकी बांधणे आवश्यक आहे. परंतू सद्यस्थितीत सदर परिसरात मोकळी जागा उपलब्ध नाही.

त्यामुळे सदर परिसरात पाणीपुरवठा करणेसाठी उंच टाकी बांधणेकामी जागा उपलब्ध करुन देऊन आवश्यक ती पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका फ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र ११ मध्ये दुर्गानगर परिसरात "स्वर्गीय श्री. गोपीनाथ मुंढे" चौक असून सदरचा चौक हा शहरातील महत्वपुर्ण व मोठ्या प्रमाणावर वाहतुकीचा आहे. सदर चौकाचे अलीकडच्या काळात मा. प्रभाग समितीचे मान्यतेने "स्वर्गीय श्री. गोपीनाथ मुंढे" यांचे सामाजीक व राजकीय क्षेत्रातील अत्यंत मोलाचे योगदान लक्षात घेता नामकरण करणेत आले आहे.

तथापी सदर चौकाची वेगळी ओळख निर्माण होणेचे अनुषंगाने व चौकाचे सुशोभिकरणाचे दृष्टीने याठिकाणी "स्वर्गीय श्री. गोपीनाथ मुंढे" यांचा अर्धाकृती पुतळा बसविणे बाबत परिसरातील नागरीकांचा मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. त्याअनुषंगाने सदरच्या चौकात "स्वर्गीय श्री. गोपीनाथ मुंढे" यांचा अर्धाकृती पुतळा बसविणे व त्याकरीता आवश्यक बाबी पुतळा तयार करणा-या कलाकाराची नेमणूक करणे, त्याकामी देय असलेली फी अदा करणे, आवश्यक मान्यता घेणे या बाबी करणेस मान्यता देणेत यावी. तसेच कामाचा मनपाच्या अंदाजपत्रकात समावेश करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच ह क्षेत्रीय कार्यालय, स्थापत्य विभागा कडील प्रभाग क्र. ३२ येथील विविध स्थापत्य विषयक कामे चालू आहेत. तथापि सदर कामासाठी सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकात अपुरी तरतूद असल्यामुळे सदर कामाचे बील अदायगी करता येत नाही. तरी सदर कामांसाठी अंतर्गत तरतूद वर्गीकरण करणेसाठी खालील प्रमाणे तरतूद वर्गीकरण सुचविण्यात येत आहे, त्या प्रमाणे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात खालील प्रमाणे इतर कामातुन वाढ/घट करून सदर वर्गीकरणास मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | उपलेखाशिर्ष अथवा कामांचे नाव | पानांक | अ.क्र. | अंदाजपत्रकीय र.रू. | सन २०२०-२१ चा मुळ अंदाज | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | सन २०२०-२१ चा सुधारीत अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भांडवली - स्थापत्य विषयक कामे | सन २०२०-२१ साठी प्रभाग क्र.३२ मधील ममतानगर व परिसरात स्थापत्य विषयक कामे करणे. | ३३२ | ७६ | ३०,००,००० | ० | ४,००,००० | ० | ४,००,००० |
| २ | भांडवली - स्थापत्य विषयक कामे | सन २०२०-२१ साठी प्रभाग क्र.३२ मधील प्रियदर्शनीनगर व परिसरात स्थापत्य विषयक कामे करणे. | ३३२ | ७७ | ३०,००,००० | ० | ४,००,००० | ० | ४,००,००० |
| ३ | भांडवली - स्थापत्य विषयक कामे | सन २०२०-२१ साठी प्रभाग क्र.३२ मध्ये सारथी वेबवरील तक्रारी निवारणाकरीता स्थापत्य विषयक कामे करणे. | ३३९ | ३० | १०,००,००० | २,००,००० | ६,००,००० | ० | ८,००,००० |
| ४ | महापौर विकास निधी | महापौर विकास निधी | ६३ | १८ | ५,३५,००,००० | ५,३५,००,००० | ० | १४,००,००० | ५,२१,००,००० |
| | एकुण | | | | | | १४,००,००० | १४,००,००० | |

तसेच वाय.सी.एम.एच. विभागाचे वापरासाठी दोन नग टाटा विंगर डी टाईप रुग्णवाहिका व टाटा स्टार बस एक नग खरेदी करणेकामी वायसीएमएच विभागाची मागणी आहे. सदरच्या कामाचा सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकामध्ये समावेश करुन र.रु. ६६,०१,२००/- यास प्रशासकिय मान्यता देणेत यावी तसेच सदर कामासाठी तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | उप लेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | पान क्र. | अनु क्र. | मुळ प्रशासकिय रक्कम रु. | सुधारीत प्रशासकिय मान्यता र.रु. | सन २०२१ मुळ तरतूद | वाढ | घट | सुधारीत तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाहन घसारा निधी | वाय.सी.एम. एच. विभागाचे वापरासाठी दोन नग टाटा विंगर डी टाईप रुग्णवाहिका खरेदी करणे. | ०४ | - | ५०००००० | ५४३९२००० | ५०००००० | ४३९२००० | ० | ५४३९२००० | अ.क्र. ३ वरुन वर्ग |
| २ | वाहन घसारा निधी | टाटा स्टार बस एक नग खरेदी करणे. | ०४ | - | ५०००००० | ५२२०९२०० | ५०००००० | २२०९२०० | ० | ५६६०१२०० | अ.क्र. ३ वरुन वर्ग |
| ३ | महापौर विकास निधी | महापौर विकास निधी | ६३ | १८ | ५३५००००० | ५३५००००० | ५३५००००० | ० | ६६०१२०० | ४३३९८८०० | |

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ च्या मुळ अर्थसंकल्पात “महापौर विकास निधी” या लेखाशीर्षावरील र.रु.५,३५,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.पाच कोटी पस्तीस लाख फक्त) तरतूदीतून खालील प्रमाणे अंदाजपत्रकात वाढ / घट करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | उपलेखाशिर्ष अथवा कामांचे नाव | पा क्र | अ.क्र. | अंदाजपत्रकीय र.रू. | सन २०२०-२१ चा मुळ अंदाज | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | सन २०२०-२१ चा सुधारीत अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भांडवली - डांबरी रस्ते - मुख्यालय | प्रभाग क्र.५७ (नविन प्रभाग क्र.३१) पिंपळे गुरव मधील काटेपुरम चौक ते मनपा शाळा पर्यंतचा रस्ता अद्यावत पध्दतीने विकसित करणे. | ३१६ | ३ | १०,००,००,००० | १,२५,००,००० | ३३,०८,००० | ० | १,५८,०८,००० |
| २ | स्थापत्य विशेष योजना | पिंपळे गुरव प्रभाग क्र.५७ येथील मुख्य व अंतर्गत रस्त्यांचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे. | २६ | १३२ | ३,००,००,००० | १०,००,००० | २३,८५,००० | ० | ३३,८५,००० |
| ३ | भांडवली - डांबरी रस्ते - मुख्यालय | प्रभाग क्र.५७ (नविन प्रभाग क्र.३१) पिंपळे गुरव मधील काटेपुरम चोक ते मनपा शाळा पर्यंतचा रस्ता अद्यावत पध्दतीने विकसित | ३१६ | ३ | १०,००,००,००० | १,२५,००,००० | ९५,४४,१७८ | ० | २,२०,४४,१७८ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | करणे. | | | | | | | |
| ४ | महापौर विकास निधी | महापौर विकास निधी | ६३ | १८ | ५,३५,००,००० | ५,३५,००,००० | ० | १,५२,३७,१७८ | ३,८२,६२,८२२ |
| | एकुण | | | | | | १,५२,३७,१७८ | १,५२,३७,१७८ | |

तरी सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात वर नमूद केलेल्या तरतुद वर्गीकरणस मान्यता देणेत यावी.
तसेच सन २०२०-२१ च्या मूळ अंदाजपत्रकातील कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| अ.क्र | लेखाशिर्ष | कामाचे नाव | पानांक | अ.क्र | मूळ प्रशासकीय मान्यता | सुधारित प्रशासकीय मान्यता | सन २०२०-२१ ची मुळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विशेष योजना | प्रभाग क्र. २० संत तुकारामनगर मधील वाय सी एम हॉस्पिटल येथे सहाव्या मजल्यावर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी कक्ष तयार करणे व आवश्यक कामे करणे. | १७ | ३१ | ४००००००० | १०००००००० | ९०००००० |
| २ | विशेष योजना | प्रभाग क्र. २० संत तुकारामनगर मधील वाय सी एम हॉस्पिटल येथे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी | १७ | २९ | २००००००० | ५००००००० | ७५००००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | आवश्यक कामे करणे व आवश्यक नुतनीकरण करणे. | | | | | |
| ३ | विशेष योजना | प्रभाग क्र. २० संत तुकारामनगरमधील वाय सी एम हॉस्पिटल मधील ओ.पीडी कॉंम्पलेक्स MICR नॉंम्सनुसार व O T रिनोव्हेशनची उर्वरित कामे करणे. | १७ | ३० | ३००००००० | ५००००००० | ९०००००० |
| ४ | विशेष योजना | प्रभाग .क्र.२० संत तुकारामनगर यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय येथील तिसरा मजल्यावरील वॉर्डचे एम.सी.ए. मानांकनानुसार अद्यावत पध्दतीने नुतनीकरण करणे. | १८ | ४० | ५००००००० | १०००००००० | ५०००० |
| ५ | विशेष योजना | प्रभाग .क्र.२० संत तुकारामनगर यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय येथील चौथा मजल्यावरील वॉर्डचे एम.सी.ए. मानांकनानुसार अद्यावत | १८ | ४१ | ५००००००० | १०००००००० | ५०००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पध्दतीने नुतनीकरण करणे. | | | | | |
| ६ | विशेष योजना | प्रभाग .क्र.२० संत तुकारामनगर यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय येथील पाचवा मजल्यावरील वॉर्डचे एम.सी.ए. मानांकनानुसार अद्यावत पध्दतीने नुतनीकरण करणे. | १८ | ४२ | ५००००००० | १०००००००० | ५०००० |
| ७ | विशेष योजना | प्रभाग .क्र.२० संत तुकारामनगर यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयासाठी बाहेरील बाजूने एसीपी पँनेल बसविणे बाहेरून व  आतून रंगरंगोटी करणे. व अनुषंगिक कामे करणे. | १८ | ४३ | ४००००००० | ६००००००० | ५०००० |

प्रभाग क्र.२६ कस्पटेवस्ती स्मशानभूमी येथे गॅबियन वॉल बांधणे व इ. स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणे (निविदा क्र.७०/१०/२०१८-१९) चे कामाचे आदेश ठेकेदार मे.सोनाली स्टोन क्वारी यांना क्र.स्था/नि/ड-मुख्य/२०२/२०१९, दि.०८/०३/२०१९ अन्वये देणेत आलेले असून कामाची मुदत ३० महिने म्हणजेच दि.०७/०९/२०२१ अखेर पर्यंत आहे. त्यानुसार ठेकेदार यांनी प्रत्यक्ष कामास सुरूवात करून २६% काम पुर्ण केलेले आहे.

परंतू मा.राष्ट्रीय हरित लवाद यांचेकडील दाखल याचिका क्र.४९/२०१९ दि.१६/०६/२०२० रोजीचे आदेशानुसार व मा.राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांचेकडील कोर्ट ऑर्डर दि.२६/०९/२०१९ चे आदेशानुसार नदीपात्रात व नदीपात्रालगत अनाधिकृत बांधकामे, भराव व नविन बांधकामे करणेस मनाई करणेत आलेली आहे, त्यामुळे सदरचे काम करणे शक्य नसल्याने सद्यस्थितीत बंद ठेवण्यात आलेले आहे.

पिंपळे निलख परिसरातील नाले पावासाळयात तुडूंब भरून वाहतात. त्यामुळे सदर नाल्यांची वेळोवेळी दुरूस्ती करणे आवश्यक आहे. तसेच काही नैसर्गिक ओपन नाले तुडूंब भरून सोसायटीच्या आवारात त्याचे पाणी घुसून नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे. सदर परिसरातील नागरिक सदर नैसर्गिक नाले बांधून अथवा दुरूस्ती करून मिळणेबाबत सतत मागणी करीत आहेत.

त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रभाग क्र.२६ कस्पटेवस्ती स्मशानभूमी येथे गॅबियन वॉल बांधणे व इ. स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणे या कामाअंतर्गत त्याच प्रभागातील नैसर्गिक नाल्यांची दुरूस्ती व आवश्यक त्या ठिकाणी ओपन नाले बंदिस्त करणेच्या स्थळबदलास मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र.२६ पिपंळे निलख येथील रक्षक चौक ते पिपंळे निलख गावठाणातून संरक्षण विभागाच्या हद्दीतून जाणा-या १८ मी. डी.पी. रस्त्यास सब-वे करणे, व ताब्यात येणारा १२.०० मी. रुंदीचा डी.पी. रस्ता विकसीत करणे (नि.नो.क्र.६६/०१/२०१७-१८) या कामाचे आदेश क्र.स्था/नि/ड-मुख्य/१०७/२०१८, दि.१७/०३/२०१८ अन्वये देणेत आलेला आहे. सदरचे काम साधारण गेली २ वर्षापासून रखडलेले आहे. तसेच सदर कामास संरक्षण विभागामार्फत कोणताच प्रतिसाद मिळत नाही. तसेच संरक्षण विभागामार्फत सब-वे च्या कामात अडथळा होणारी झाडे काढून न मिळाल्याने सब-वे चे काम अर्धवट आहे. याबाबत संरक्षण विभागास वेळोवेळी पत्रव्यवहारही करणेत आलेला आहे. तरी ही झाडे काढणेचे काम करणेत आलेले नाही. संरक्षण विभागाशी साईटवर झालेल्या चर्चेनुसार झाडे काढण्यास अजून किती वेळ लागेल हे माहित नाही. त्यामुळे सदरच्या कामातील सब-वे च्या कामातील रक्कम शिल्लक आहे. त्यामुळे त्या शिल्लक रक्कमेतून प्रभाग क्र.२६

येथील रक्षक चौक ते पिंपळे निलख STP पर्यंतचा रस्ता सेवा वाहिन्यांच्या खोदाईमुळे खराब झालेल्या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम, गणपती मंदीर चौकापासून श्रीहरी कॉलनी पर्यंतचा संरक्षण विभागास लागून असलेल्या रस्त्याचे डांबरीकरण व प्रभागातील इतर रस्त्यांची डांबरीकरणाची कामे करणे गरजेची आहेत.

प्रभाग क्र.२६ पिपंळे निलख येथील रक्षक चौक ते पिपंळे निलख गावठाणातून संरक्षण विभागाच्या हद्दीतून जाणा-या १८ मी. डी.पी. रस्त्यास सब-वे करणे, व ताब्यात येणारा १२.०० मी. रुंदीचा डी.पी. रस्ता विकसीत करणे (नि.नो.क्र.६६/०१/२०१७-१८) या कामातून प्रभाग क्र.२६ येथील रक्षक चौक ते पिंपळे निलख STP पर्यंतचा रस्त्याचे, गणपती मंदीर चौकापासून श्रीहरी कॉलनी पर्यंतचा संरक्षण विभागास लागून असलेल्या रस्त्याचे डांबरीकरण व इतर रस्त्यांची डांबरीकरणाची कामे करणेच्या स्थळबदलास मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बाल कल्याण योजने अंतर्गत पंडित दिनदयाल उपाध्याय-महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम योजने अंतर्गत सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात घेण्यात आलेल्या कोविड-१९ व महिलांसाठी अन्य कोर्सेस प्रशिक्षणाकरीता सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात अपुरी तरतुद असल्याने नगररचना विभागाकडील भुसंपादन निधी मधुन र.रु.१५,००,००,०००/- (अ.र.रु.पंधरा कोटी फक्त) सुधारीत अंदाजपत्रकामध्ये तरतुद वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणेत यावी.

वर्गीकरणाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | लेखाशिर्षाचे नाव | अंदाजपत्रक पान क्र. | अ. क्र. | सन २०२०-२१ सुधारीत | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नगररचना | भुसंपादन निधी | २८६/२८७ | ४ | १५०,००,००,०००/- | --- | १५,००,००,०००/- |
| २ | नारवस्ती विकास योजना विभाग | महिलांसाठी योजना/ महिला व बाल कल्याण योजना - पंडित दिन दयाल उपाध्याय- महिलांसाठी ज्ञान कौशल्य कार्यक्रम | ३११ (महसुली जमा खर्च अंदाजपत्रक -२) | ५ | ३८,३२,००,०००/- | १५,००,००,०००/- | -- |
| एकुण वाढ/घट | | | | | | १५,००,००,०००/- | १५,००,००,०००/- |

वरीलप्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस (वाढ व घट) करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच प्रभाग क्र.३ च-होली मधील मनपा हद्द (डुडुळगाव चौक) ते आळंदी चौक व मनपा हद्द (काटे कॉलनी) ते आळंदी चौक हा खुप रहदारीचा रस्ता आहे. सदर आळंदी

रस्त्याचे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायामुळे विशेष असे महत्व आहे. सदर रस्ता मनपा हद्दीबाहेर आहे. तरी सदर रस्त्यावर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत दिवाबत्ती व्यवस्था करुन देणेस मान्यता देणेत यावी. व सदर हद्दीबाहेरील रस्त्याचे दिवाबत्ती व्यवस्थेचे काम विदयुत विभागातील चालु कामामुन करुन घेण्यास किंवा नव्याने निविदा प्रसिध्द करुन दिवाबत्ती व्यवस्थेचे काम करुन घेण्यास मान्यता देणेत यावी. तसेच कामगार चळवळीचे जनक दिवंगत रावसाहेब नारायण मेघाजी लोखंडे यांची जयंती दि.९ फेब्रुवारी रोजी दरवर्षी तसेच माता रमाई भीमराव आंबेडर यांची जयंती दि.०७ फेब्रुवारी रोजी दरवर्षी शासकीय इतमानाने पिंपरी चिंचवड शहरात साजरी करणेस मान्यता देणेत यावी. तसेच पुणे – मुंबई महामार्गावरील मेट्रो मार्गिकेवर फुगेवाडी येथे मेट्रो स्टेशन तयार करणेत आलेले आहे. सदर मेट्रो स्टेशनला माजी महापौर रंगनाथदादा फुगे यांचे नाव देण्यास मान्यता देणेत यावी. तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारकातील सभागृहास ‘कै.विजय सदाशिव जाधव’ व ‘महात्मा जोतीराव फुले सार्वजनिक वाचनालय व स्पर्धा परीक्षा केंद्र’ असे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी. सद्यस्थितीत क्रांतीज्योती सावित्री फुले स्मारकातील स्थापत्य विषयक कामकाज पुर्णत्वास आले असून सदर इमारतीचे उदघाटन करणेचे नियोजन आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे भोसरी येथील पुणे नाशिक रस्त्यावरील महाराष्ट्र राज्य वखार मंडळाच्या पूर्वेकडील व मनपाच्या प्रभाग क्र. ६ मध्ये येणा-या वसाहतीचे ‘जयवंत नगर’ असे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.ज्ञानदेव थोरात** – मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.उत्तम केंदळे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक - ६०४ विषय क्रमांक- ३
दिनांक १८/३/२०२१ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. पअक/५/कावि/५४६/२०२०, दि. २३/१०/२०२०

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.७७२७ दि.०९/१२/२०२० अन्वये.

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.५८७, दि.२०/०१/२०२१

पिंपरी चिंचवड शहरातील सांडपाण्यावर शहरातील विविध मलनि:सारण केंद्राव्दारे प्रक्रिया केली जाते. सदर मलनि:सारण केंद्रामधून बाहेर पडणा-या प्रक्रियायुक्त पाण्यावर पुढील प्रक्रीया करुन शहरातील औद्योगिक तसेच निवासी भागात पाणी पुरवठा करण्याकरीता [Recycling & Reuse] सल्लागारामार्फत शहरासाठी विस्तृत

आराखडा तयार करण्यात आला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समिती मार्फत मा.महापालिका सभा ठराव क्र.३३८, विषय क्रमांक १० दि.२०/१२/२०१८ नुसार उक्त पुनर्वापर व पुनर्चक्री करणाच्या विस्तृत धोरणास तसेच सदरच्या प्रकल्पाची अंमलबजावणी PPP किंवा HAM Mode I नुसार करणेचे प्रस्तावास मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर प्रक्रियायुक्त पाणी पुरवठ्याकरिता सल्लागारामार्फत शहरासाठी विस्तृत आराखडा [Master Plan] तयार करण्यात आला आहे. सदर Master Plan मध्ये शहराच्या भौगोलिक रचनेनुसार चार भाग करण्यात आले आहेत.

१. भाग क्र.१ : पिंपळे सौदागर, वाकड, हिंजवडी MIDC चिंचवड
२. भाग क्र.२ : चिखली MIDC
३. भाग क्र.३ : निगडी प्राधिकरण व तळेगांव MIDC
४. भाग क्र.४ : चाकण MIDC

सदर आराखड्यानुसार संपूर्ण शहरासाठी प्रतिदिन १२० दशलक्ष लिटर एवढ्या प्रक्रियायुक्त पाण्याचा पुनर्वापर केला जाऊ शकतो सदर Master Plan पैकी पहिल्या टप्प्यामध्ये स्मार्ट सिटी अंतर्गत Area Based Development (ABD) मधील पिंपळे सौदागर, तसेच वाकड, हिंजवडी MIDC Area याकरिता कासारवाडी मलनिःसारण प्रक्रिया केंद्रातून प्रतिदिन ७५ दशलक्ष लिटर सांडपाणी प्रक्रिया करून पाणीपुरवठा करणे प्रस्तावित आहे. तथापि, शहरासाठी विस्तृत आराखड्यामधून मनपा हद्दीबाहेरील हिंजवडी भागासाठी MIDC कडून अद्याप MOU झाले नसल्याने सद्यस्थितीत पहिल्या टप्प्यामधून वगळण्याचे तसेच शहरातील पाण्याची टंचाई असणा-या भागाचा समावेश करुन प्राधान्यक्रम बदल करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. त्यानुसार शहरातील वेगाने वाढणा-या चिखली व च-होली भागाचा दुस-या टप्प्यातील भागाचा समावेश प्राधान्याने पहिल्या टप्प्यात करणेच्या प्रस्तावास मान्यता घेणे आवश्यक आहे. यामध्ये चिखली मैलाशुध्दीकरण केंद्र टप्पा १ (क्षमता १६ एमएलडी) हे ३० वर्षापेक्षा जुने झाले असून जुन्या तंत्रज्ञानावर आधारित आहे. सदर STP ची दुरुस्ती करणेसाठी मोठा खर्च लागणार आहे .चिखली येथील सदर मलशुद्धीकरण केंद्राचे आयुष्यमान संपुष्टात येत असल्याने सदर मलशुद्धीकरण केंद्राची पुनर्बांधणी करणे आवश्यक आहे.याकरिता सदर ठिकाणी सध्याच्या १६ MLD क्षमतेच्या केंद्राच्या ठिकाणी अत्याधुनिक तंत्रज्ञानावरील व भविष्यातील वाढणा-या सांडपाण्याचा विचार करुन २० MLD क्षमतेचा MBR

तंत्रज्ञानावर STP करणेचे प्रस्तावित करण्यात येत आहे. नूतनीकरण प्रस्तावित असलेल्या प्रकल्पातून पुनर्वापर योग्य पाण्याची निर्मिती करण्यात येईल. त्यामुळे खर्चात बचत होणार आहे .पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पुनर्वापर व पुनर्चक्रीकरणाच्या प्रकल्पाची निविदा काढणेकामी विविध तांत्रिक मते, कल समजण्या हेतूने विविध संभावित इच्छुक निविदाधारकांची अनौपचारिक बैठक (Pre Tender Conference) दिनांक ११/०६/२०२० रोजी Online आयोजित करणेत आली होती. सदर बैठकीमध्ये इच्छुक निविदाधारक यांनी प्रकल्प HAM पद्धतीमध्ये कमीत - कमी ६० %प्रकल्प किमतीची रक्कम उभी करू शकतात तसेच विविध वित्तीय संस्था व वित्तीय पुरवठा करणा-या धनको यांनी प्रकल्प उभारणीच्या काळात कर्जावरील लागणारे व्याज IDC (Interest During Construction) हे प्रकल्प किमतीमध्ये गृहीत धरावा अशी मागणी केली. त्याबाबत प्रकल्पाच्या Technical Appraisal Committee (TAC) कडे मागणी विचारार्थ ठेवली असता TAC समितीने या बाबींस मान्यता दिली आहे. तसेच, प्रकल्प अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १७७, ६६अ, कलम ६६ च्या पोटकलम ४१अ नुसार लोक खाजगी सहभागातून (PPP) किंवा HAM [Hybrid Annuity Model] पुनर्वापर व पुनर्चक्रीकरण प्रक्रिया केंद्र व यंत्रणा उभारणी व कलम १०९ नुसार विविध वितीय पुरवठादाराद्वारे निधी उभारणेसाठी मा.आयुक्त यांना कलम ७२(ब) अन्वये प्राधिकृत करणेस मान्यता देणेचेही प्रस्तावित आहे. प्रकल्पाचा प्राधान्यक्रम बदलून शहराच्या वाढीचा वेग व पाण्याचा तुटवडा असलेल्या भागांचा समावेश पहील्या टप्प्यात करुन खालील भागाचा समावेश करणेस मान्यता आवश्यक आहे.

१. वाकड, पिंपळ सौदागर, पिंपळेगुरव, कासारवाडी, चिंचवड, चिखली च-होली व MIDC क्षेत्रात कासारवाडी येथून ७५, चिखली मधून २० व च-होली येथून ५ असे एकुण प्रतिदिन सुमारे १०० दशलक्ष लिटर इतके पाणी पुनर्चक्रीकरणव्दारे उपलब्ध करणे व त्यापैकी सुमारे ८ एम.एल.डी.पाणी पिण्याच्या गुणवत्तेचे शुध्द करणेसाठी RO प्रणालीचा वापर करणे.
२. प्रक्रियायुक्त पाण्याच्या पुनर्वापराकरिता आवश्यक त्या ठिकाणी आराखड्यानुसार सुमारे ३०६ किमी प्राथमिक जाळे तयार करणे .
३. वाकड, पिंपळे सौदागर, कासारवाडी एम.आय.डी.सी. चिखली व च-होली अशा पाच ठिकाणी १ ते ५ दशलक्ष लिटर क्षमतेचे जलकुंभाची निर्मिती.
४. या प्रस्तावित योजने अंतर्गत येणारा खर्च तसेच प्रकल्पाच्या बांधकाम कालावधीतील व्याज इत्यादींचा समावेश करता प्रकल्पाचा मुळ खर्च र.रु.५३२/- कोटी व जीएसटी, रॉयल्टी Contingencies Charges,

Interest During Construction व Work Establishment Charges इत्यादी सह एकत्रित प्रकल्पाचा अंदाजित खर्च र.रु.६५४/-कोटी इतका येत आहे .त्यास प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे.

५. सदर योजना HAM पद्धतीनेच राबविण्याचे प्रस्तावित असून यामध्ये एकूण खर्चापैकी मनपा मार्फत जास्तीत जास्त ४०% भांडवली खर्च कंत्राटदारास प्रकल्प उभारणीच्या कालावधीत टप्प्याने वितरीत करण्यात येईल व उर्वरित हिस्सा प्रकल्प कार्यान्वित झाल्यापासून ७ वर्षात त्रैमासिक पद्धतीने वितरीत करण्यात येईल. सदर प्रकल्पाच्या १५ वर्षाच्या परिचालनाची तसेच देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी सबंधित ठेकेदाराची असणार आहे. सबब,पिंपरी चिंचवड शहरातील सांडपाण्यावर प्रक्रीया करुन त्याचे पुनर्चक्रीकरण तसेच पुन:र्वापर (Recycling & Reuse) करणे या प्रकल्पाच्या सुधारित र.रु. ६५४/-कोटीच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस किंवा प्रकल्पाच्या किंमतीमध्ये बदल झालेस होणारे प्रत्यक्ष खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी तसेच यापूर्वी मा.महापालिका सभेने ठराव क्रमांक ७१, दिनांक ०७/१२/२०१८ रोजी मान्यता दिलेल्या विषयामध्ये वरील नमूद केलेप्रमाणे शहराची होणारी वाढ व काही भागात असणारी पाणी टंचाई यांचा विचार करुन प्रकल्पाचा प्राधान्यक्रम बदलणेस तसेच आवश्यकते प्रमाणे प्रकल्पाची व्याप्ती निश्चित करणेस तसेच सदरचा प्रकल्प कलम १०९ नुसार खाजगी सहभागातून विविध वित्तीय पुरवठ्याव्दारे निधी उभारणेच्या (PPP/HAM) धोरणास महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम कलम १७७, ६६अ, कलम ६६ चे पोटकलम ४१ अ त्याचप्रमाणे या प्रकल्पासाठी कलम ७२(ब) अन्वये मा.आयुक्त यांना अंमलबजावणी प्राधिकारी म्हणून सर्व वित्तीय अधिकार देवून निविदा मान्यतेकामी सक्षम प्राधिकारी यांचेकडे सादर करणेचे सर्व अधिकार देणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच सदर प्रकल्पातून पुरवण्यात येणा-या प्रक्रियायुक्त पाण्यासाठी स्वतंत्र पाणी मीटर प्रत्येक जोडणीसाठी बसविणेत यावे. तसेच सदरच्या प्रकल्पातून प्रक्रिया केलेल्या पाण्याचे दर हे घरगुती वापरासाठी पहिल्या तीन वर्षासाठी मोफत व त्यापुढे मनपाच्या पिण्याच्या पाण्याच्या दरापेक्षा २०% कमी तसेच वाणिज्य तसेच औद्योगिक वापरासाठी ३०% कमी ठेवणेत यावेत म्हणजेच घरगुती वापरासाठी पहिल्या तीन वर्षासाठी मोफत व त्यापुढे पिण्याच्या पाण्याच्या दराच्या ८०% तसेच वाणिज्य व औद्योगिक वापरासाठी पहिल्यापासुन ७०% दराने आकारणी करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. २९ पिंपळे गुरव येथील वैदुवस्ती, भैरवनाथ नगर, गणेश नगर व सुदर्शन नगर परिसर भौगोलिक दृष्ट्या उंचावर असलेने, सदर ठिकाणी नागरिकांना पुरेशा दाबानी पाणी मिळत नाही. सद्यस्थितीत एकदिवसा आड पाणीपुरवठा असलेने व अपु-या दाबाने पाणीपुरवठा होत असलेने तेथील नागरिकांच्या वारंवार तक्रारी येत आहेत. सदर परिसरात पुरेशा दाबाने पाणीपुरवठा करणेसाठी, उंच पाण्याची टाकी

बांधणे आवश्यक आहे. परंतु सद्यस्थितीत सदर परिसरात मोकळी जागा उपलब्ध नाही त्यामुळे सदर परिसरामध्ये उपलब्ध असलेल्या, आरक्षण क्र. 357 A बेघरांसाठी घरे (HDH) या जागेमध्ये पाण्याची उंच टाकी बांधणेकामी आवश्यक ती पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रभाग ३१ नवी सांगवी या परिसरात नागरिकांना खूप दिवसापासुन पिण्याच्या पाण्याच्या अनेक समस्या जाणवत आहेत. रोज कमी दाबाने पाणीपुरवठा होणे, तसेच कमी वेळ पाणीपुरवठा होणे, अशा समस्या वारंवार जाणवत असुन नागरिक त्यामुळे त्रस्त झाले आहेत. याबाबत वारंवार तक्रारी करुनही प्रश्न सुटत नाही. त्यासाठी पाण्याची टाकी बांधने आवश्यक आहे. परंतु सद्यस्थितीत सदर परिसरात जागा उपलब्ध नाही. त्यामुळे सदर परिसरामध्ये उपलब्ध असलेल्या आरक्षण क्र. ३३४ (मोकळी जागा) या ठिकाणी पाण्याची उंच टाकी बांधणेकामी आवश्यक ती पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत डुडुळगांव आरक्षण क्र.१/२३३, गट नं.१०५पै, १०७पै ते ११२ पै येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १३७८ निवासी गाळे बांधणेकामी प्रकल्प राबविण्याचे नियोजन आहे.

विषयांकित कामास मा.महापालिका सभा ठराव क्र.३९, दि.२०/०६/२०१७ अन्वये मान्यता मिळालेली आहे. सदर ठराव करतेवेळी विषयांकित कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम ही सन २०१६-१७ च्या DSR प्रमाणे दर गृहित धरुन अंदाजपत्रकीय खर्च र.रु.७४,१३,९०,७२०/- (Infra खर्च वगळता) काढलेली होती.

त्याचप्रमाणे अंदाजपत्रक बनविणेकामी आवश्यक लागणा-या सर्व नाहरकत दाखले घेण्याची कार्यवाही सुरु असून कामाचे अंदाजपत्रक सन २०२०-२०२१ च्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील राज्यस्तरीय दरसूची (State Schedule Rate), MJP DSR-२०१९-२० व पिं.चिं.म.न.पा. मंजूर दर पृथ्थकरणानुसार करणेत येत आहे. त्याकामी अंदाजपत्रकीय खर्च र.रु.२००,००,००,०००/- (अक्षरी र.रु. दोनशे कोटी फक्त) इतका येणार आहे.

परंतू, सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रकात विषयांकित कामाची अंदाजपत्रकीय र.रु.९०,००,००,०००/- असल्यामुळे अंदाजपत्रकीय रकमेस तांत्रिक मान्यता घेणे व शासनाकडे DPR मान्यतेसाठी पाठविणे शक्य नसल्याने सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.२००,००,००,०००/- स प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सबब, सन २०२०-२१ च्या दरसुचीनुसार व मंजूर दर पृथ्थकरणानुसार सदर प्रकल्पासाठी येणा-या अंदाजपत्रकीय र.रु.२००,००,००,०००/- स प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रभाग क्र.२६ वाकड-पिंपळे निलख येथील रक्षक चौकात मनपामार्फत चौक सुशोभीकरणाच्या कामातून कृत्रिम धबधबा बांधण्यात आलेला होता. सद्यस्थितीत सदर धबधब्याची तुटफुट झालेली असून पुर्णपणे मोडकळीस आलेला आहे व अनेक वर्षांपासून बंद स्थितीत आहे. सदरचा कृत्रिम धबधबा पाडणेबाबत सदर प्रभागातील मा.नगरसेवक श्री.तुषार गजानन कामठे व मा.नगरसेविका श्रीमती.आरती सुरेश चौंधे यांनी मागणी केली होती. त्यानुषंगाने मा.ड प्रभाग समिती विषय क्र.६, ठराव क्र.२५, दि.१६/०३/२०१८ अन्वये सदर ठिकाणचा कृत्रिम धबधबा पाडणेबाबत मान्यता देणेत येत आहे.

परंतू मा.आयुक्तसो यांचेकडे विषयांकित बाबत प्रस्ताव सादर केला असता सदरची मनपा मालमत्तेची मिळकत पाडणे असल्यास मा.महापालिका सभेची मान्यता घेणेबाबत मा.आयुक्तसो यांनी दि.०३/११/२०१८ रोजीच्या शेरांकनानुसार कळविले आहे.

त्यास अनुसरून सद्यस्थितीत सदर धबधब्याची तुटफुट झालेली असून पुर्णपणे मोडकळीस आलेला आहे व अनेक वर्षांपासून बंद स्थितीत असल्यामुळे व मा.नगरसदस्य यांचे मागणीनुसार प्रभाग क्र.२६ वाकड-पिंपळे निलख येथील रक्षक चौकातील जुना कृत्रिम धबधबा पाडणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

तसेच थेरगाव बापुजीबुवा नगर येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे वेंगसरकर अँकॅडमीच्या पेव्हेलियनचे उर्वरीत काम सद्यस्थितीत चालु आहे. अंदाजपत्रकात समावेश होता परंतु प्रत्यक्ष साईट वरील कामाच्या आवश्यकते नुसार सुधारीत बांधकाम परवाना व अग्नीशमन प्रतिबंधक योजना या मानांकनानुसार मुळ अंदाजपत्रकाच्या मोजमापात वाढ होत आहे. स्थापत्य विषयक कामात पॅव्हेलियनच्या इमारतीस टफन विथ लॅमिनेटेड ग्लास लावणे, ग्राऊंड च्या दर्शनिय बाजुस जाळी लावणे, सिमाभींतीस मुख्य गेट बसविणे, टेरेस मजल्यावरील किचन युनिट, सीमाभिंतीची उंची वाढविणे (m/s), जमिनी खालील पाण्याची टाकी RCC, टेरेस मजल्यावरील शेराबोर्डचे फॉलसिलींग करणे, टेरेस व तळमजल्यावरील फर्निचर करणे, ईमारतीच्या सभोवतालचा परीसर सुशोभीकरण करणे, मुख्य गेट जवळ सुरक्षा रक्षक केबिन, इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वारा वरील काचेचे छत (Main entrance) या बाबी आवश्यक असलेने अंदाजपत्रकात वाढ होत आहे. इमारत पुर्ण व वापरात आणण्याच्या दृष्टीने सदर कामे करणे गरजेचे आहे.

विद्युत विषयक कामाच्या करारनाम्यात अग्निशामक प्रतिबंधक योजना (Fire Fighting), आग्निशामक जिना (M.S) या बाबींचा समावेश नव्हता परंतु इमारत पुर्णत्वाचा दाखला व अग्निशामक प्रतिबंधक योजना (Fire Fighting) यांच्या मानांकणानुसार मुळ अंदाजपत्रकात समावेश नाही, परंतु सदर कामे करणे गरजेचे आहे. सदर कामाच्या करारनाम्यात यांत्रिक बायुवीजन (Mechanical ventilation)

शौचालयासाठी, इंटरनेट वायफाय सिस्टीम आणि इंटरकॉम सिस्टीम, सी.सी.टी.व्ही कॅमेरे, डेकोरेटीव्ह लाईट्स, बाबींचा समावेश नव्हता. परंतु कामाच्या आवश्यकतेनुसार खालील कामे करणे गरजेचे आहे. स्थापत्य व विद्युत विभागाची सुधारीत अंदाजपत्रकात एकुण र.रू. १,५३,००,०००/- इतकी वाढ होत आहे.

उर्वरीत कामे करानाम्यानुसार मनपाला पुर्ण करून देणे आवश्यक आहे. या कारणांमुळे सदर इमारतीचे काम पुर्ण करणेस प्रशासकीय मान्यता रक्कम अपुरी पडत आहे. त्यासाठी रक्कम रू २,००,००,०००/- इतक्या वाढीव प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. पुर्वीची प्रशासकीय मान्यता र.रू. ५०००००००/- इतकी आहे. त्यामध्ये र.रू. २,००,००,०००/- इतक्या रकमेची वाढ करून र.रू. ७०००००००/- इतकी प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

थेरगाव बापुजीबुवा येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे दिलीप वेंगसरकर अकॅडमीच्या पव्हेलीयनचे उर्वरीत काम करणे. या कामासाठी र.रू. ७०००००००/- इतकी वाढीव प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रभाग क्र ४९ थेरगाव बापुजीबुवानगर येथील सर्व्हे नं ९ मध्ये दवाखाना इमारत बांधनेचे काम चालू आहे. सदर कामामध्ये डॉक्टरांच्या निवासस्थानाकरिता पाचवा मजल्याचे वाढीव बांधकाम करावयाचे असलेने त्या कामाकरिता र रु १४,३०,६५,००० इतकी निविदा रकमेत वाढ होत आहे. सदर वाढीव रक्कम सह सुधारित निविदा रक्कम रु.६३,२४,५५,५१५ इतकी होत आहे. सदरची रक्कम मूळ प्रशासकीय मान्यतेच्या (र.रु.६३,३८,३१,०००) मर्यादेत आहे. तथापी सदर कामाच्या स्वरुपात बदल झाला असलेने सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सबब थेरगाव बापुजीबुवानगर येथील सर्व्हे नं ९ मध्ये दवाखाना इमारत बांधणेच्या कामाच्या सुधारित निविदा र.रु.६३,२४,५५,५१५ यास सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकातील फ क्षेत्रिय कार्यालय, स्थापत्य विभागाकडील प्रभाग क्र १३ मध्ये प्रथम प्राधान्याने करावयाच्या ब-याचशा विकास कामांसाठी अपुरी तरतुद ठेवणेत आली असल्याने, त्यामधील काही चालू कामांना व काही विकास कामांचे अंदाजपत्रक तयार करून, निविदा कार्यवाही करणेसाठी, प्रथम प्राधान्याने करावयाचे कामांचे तरतुदीमध्ये वाढ करणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे तरतुदीमध्ये वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पा.क्र. | अ. क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०२०-२१ मधील तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | एकुण आवश्यक तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र १३ मधील यमुनानगर व इतर राहिलेल्या ठिकाणच्या रस्त्यांचे डांबरीकरण करणे | | | ५००००००० | ० | २००००००० | ० | २००००००० |
| २ | प्रभाग क्र १३ मधील निगडी व इतर राहिलेल्या ठिकाणच्या रस्त्यांचे डांबरीकरण करणे | | | ५००००००० | ० | २००००००० | ० | २००००००० |
| ३ | प्रभाग क्र १३ मधील यमुनानगर व इतर राहिलेल्या ठिकाणी पेव्हींग ब्लॉंक बसविणे | | | २००००००० | ० | १००००००० | ० | १००००००० |
| ४ | प्रभाग क्र १३ मधील निगडी व इतर राहिलेल्या ठिकाणी पेव्हींग ब्लॉंक बसविणे | | | २००००००० | ० | १००००००० | ० | १००००००० |
| ५ | भुसंपादन निधी | ३४२ | ३ | | १५०००००००० | ० | ६००००००० | १४४०००००००० |
| | एकुण | | | १४०००००००० | १५०००००००० | ६००००००० | ६००००००० | १५०००००००० |

एकूण र.रू ६,००,००,०००/- (अक्षरी र.रू. सहा कोटी फक्त इतके वर्गीकरण करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रभाग क्र.१६ रावेत किवळे मामुर्डी हद्दीलगत देहुरोड कॅन्टोमेंट हद्द आहे. मनपाच्या हद्दीलगत शितळानगर येथे स्मशानभुमी, ख्रिश्चन व मुस्लीम दफन भुमी आहे. मनपा ह्ददीत ख्रिश्चन व मुस्लीम दफन भुमी नसून मनपा ह्द्दीतील नागरीक सदरच्या दफनभुमीचा प्राधान्याने वापर करतात. देहुरोड कॅन्टोमेंट बोर्डाकडून सदर दफनभुमीची दुरुस्ती वेळोवेळी होत नाही. त्यामुळे मनपा हद्दीतील नागरीकांची दुरुस्तीकामी वारंवार मागणी होत आहे. सद्यस्थितीतील स्मशानभुमीचे काम मनपा मार्फत करणेत येत आहे.

ख्रिश्चन व मुस्लीम दफन भुमीचे दुरुस्ती व सुशोभीकरणाचे काम मनपामार्फत करणेत यावे. सदर बाब मनपा अंदाजपत्रकात देहुरोड कॅन्टोमेंट बोर्ड हद्दीतील शितळानगर येथील ख्रिश्चन व मुस्लीम दफन भुमीची दुरुस्ती व सुशोभिकरण कामाचा समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रभाग क्र.१६ रावेत किवळे मामुर्डी हद्दीलगत देहुरोड कॅन्टोमेंट हद्द आहे. मनपाच्या हद्दीलगत चिंचोली, थॉमस कॉलनी, किन्हई येथे रस्ता उपलब्ध असुन तो अत्यंत खराब आहे. मनपा ह्ददीत ह्द्दीतील नागरीक सदरच्या रस्त्याचा प्राधान्याने वापर करतात. देहुरोड कॅन्टोमेंट बोर्डाकडून सदर रस्ता दुरुस्ती वेळोवेळी होत नाही. त्यामुळे मनपा हद्दीतली नागरीकांची दुरुस्तीकामी वारंवार मागणी होत आहे. सद्यस्थितीतील रस्ता दुरुस्ती काम मनपा मार्फत करणेची मागणी होत आहे.

चिंचोली, थॉमस कॉलनी, किन्हई रस्ता दुरुस्ती काम मनपामार्फत करणेस मान्यता देणेत येत आहे. सदर बाब मनपा अंदाजपत्रकात देहुरोड कॅन्टोमेंट बोर्ड हद्दीतील चिंचोली, थॉमस कॉलनी, किन्हई रस्ता दुरुस्ती व निधी वर्ग करणेबाबत कामाचा समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रभाग क्रमांक १९ मधील कोहिनूर शांग्रीला, एम्पायर इस्टेट, विस्डम पार्क, साईबाबा नगर व आनंद नगर इत्यादी भागामध्ये एम.आय.डी.सी. लाईन मधून पाणीपुरवठा होतो. सदर ठिकाणी नागरिकांना पुरेशा दाबाने पाणीपुरवठा होत नसल्याने तेथील नागरिकांच्या वारंवार तक्रारी येत आहेत. सदर परिसरात पुरेशा दाबाने पाणीपुरवठा करणेसाठी, उंच पाण्याची टाकी बांधणे आवश्यक आहे. परंतू सद्यस्थितीत सदर परिसरात मोकळी जागा उपलब्ध नाही.

त्यामुळे सदर परिसरात पाणीपुरवठा करणेसाठी उंच टाकी बांधणेकामी जागा उपलब्ध करुन देऊन आवश्यक ती पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका फ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र ११ मध्ये दुर्गानगर परिसरात "स्वर्गीय श्री. गोपीनाथ मुंढे" चौक असून सदरचा चौक हा शहरातील महत्वपुर्ण व मोठ्या प्रमाणावर वाहतुकीचा आहे. सदर चौकाचे अलीकडच्या काळात मा. प्रभाग समितीचे मान्यतेने "स्वर्गीय श्री. गोपीनाथ मुंढे" यांचे सामाजीक व राजकीय क्षेत्रातील अत्यंत मोलाचे योगदान लक्षात घेता नामकरण करणेत आले आहे.

तथापी सदर चौकाची वेगळी ओळख निर्माण होणेचे अनुषंगाने व चौकाचे सुशोभिकरणाचे दृष्टीने याठिकाणी "स्वर्गीय श्री. गोपीनाथ मुंढे" यांचा अर्धाकृती पुतळा बसविणे बाबत परिसरातील नागरीकांचा मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. त्याअनुषंगाने सदरच्या चौकात "स्वर्गीय श्री. गोपीनाथ मुंढे" यांचा अर्धाकृती पुतळा बसविणे व त्याकरीता आवश्यक बाबी पुतळा तयार करणा-या कलाकाराची नेमणूक करणे, त्याकामी देय असलेली फी अदा करणे, आवश्यक मान्यता घेणे या बाबी करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच कामाचा मनपाच्या अंदाजपत्रकात समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच ह क्षेत्रीय कार्यालय, स्थापत्य विभागा कडील प्रभाग क्र. ३२ येथील विविध स्थापत्य विषयक कामे चालू आहेत. तथापि सदर कामासाठी सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकात अपुरी तरतूद असल्यामुळे सदर कामाचे बील अदायगी करता येत नाही. तरी सदर कामांसाठी अंतर्गत तरतूद वर्गीकरण करणेसाठी खालील प्रमाणे तरतूद वर्गीकरण सुचविण्यात येत आहे, त्या प्रमाणे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात खालील प्रमाणे इतर कामातुन वाढ/घट करून सदर वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | उपलेखाशिर्ष अथवा कामांचे नाव | पानांक | अ.क्र. | अंदाजपत्रकीय र.रू. | सन २०२०-२१ चा मुळ अंदाज | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | सन २०२०-२१ चा सुधारीत अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भांडवली - स्थापत्य विषयक कामे | सन २०२०-२१ साठी प्रभाग क्र.३२ मधील ममतानगर व परिसरात स्थापत्य विषयक कामे करणे. | ३३२ | ७६ | ३०,००,००० | ० | ४,००,००० | ० | ४,००,००० |
| २ | भांडवली - स्थापत्य विषयक कामे | सन २०२०-२१ साठी प्रभाग क्र.३२ मधील प्रियदर्शनीनगर व परिसरात स्थापत्य विषयक कामे करणे. | ३३२ | ७७ | ३०,००,००० | ० | ४,००,००० | ० | ४,००,००० |
| ३ | भांडवली - स्थापत्य विषयक कामे | सन २०२०-२१ साठी प्रभाग क्र.३२ मध्ये सारथी वेबवरील तक्रारी निवारणाकरीता स्थापत्य विषयक कामे करणे. | ३३९ | ३० | १०,००,००० | २,००,००० | ६,००,००० | ० | ८,००,००० |
| ४ | महापौर विकास निधी | महापौर विकास निधी | ६३ | १८ | ५,३५,००,००० | ५,३५,००,००० | ० | १४,००,००० | ५,२१,००,००० |
| | एकुण | | | | | | १४,००,००० | १४,००,००० | |

तसेच वाय.सी.एम.एच. विभागाचे वापरासाठी दोन नग टाटा विंगर डी टाईप रुग्णवाहिका व टाटा स्टार बस एक नग खरेदी करणेकामी वायसीएमएच विभागाची मागणी आहे. सदरच्या कामाचा सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकामध्ये समावेश करुन र.रु. ६६,०१,२००/- यास प्रशासकिय मान्यता देणेत येत आहे तसेच सदर कामासाठी तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | उप लेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | पान क्र. | अनु क्र. | मुळ प्रशासकिय रक्कम रु. | सुधारीत प्रशासकिय मान्यता र.रु. | सन २०२१ मुळ तरतूद | वाढ | घट | सुधारीत तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाहन घसारा निधी | वाय.सी.एम. एच. विभागाचे वापरासाठी दोन नग टाटा विंगर डी टाईप रुग्णवाहिका खरेदी करणे. | ०४ | - | ५०००००० | ५४३९२००० | ५०००००० | ४३९२००० | ० | ५४३९२००० | अ.क्र. ३ वरुन वर्ग |
| २ | वाहन घसारा निधी | टाटा स्टार बस एक नग खरेदी करणे. | ०४ | - | ५०००००० | ५२२०९२०० | ५०००००० | २२०९२०० | ० | ५६६०१२०० | अ.क्र. ३ वरुन वर्ग |
| ३ | महापौर विकास निधी | महापौर विकास निधी | ६३ | १८ | ५३५००००० | ५३५००००० | ५३५००००० | ० | ६६०१२०० | ४३३९८८०० | |

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ च्या मुळ अर्थसंकल्पात “महापौर विकास निधी” या लेखाशीर्षावरील र.रु.५,३५,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.पाच कोटी पस्तीस लाख फक्त) तरतूदीतून खालील प्रमाणे अंदाजपत्रकात वाढ / घट करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | उपलेखाशिर्ष अथवा कामांचे नाव | पा क्र | अ.क्र. | अंदाजपत्रकीय र.रू. | सन २०२०-२१ चा मुळ अंदाज | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | सन २०२०-२१ चा सुधारीत अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भांडवली - डांबरी रस्ते - मुख्यालय | प्रभाग क्र.५७ (नविन प्रभाग क्र.३१) पिंपळे गुरव मधील काटेपुरम चौक ते मनपा शाळा पर्यंतचा रस्ता अद्यावत पध्दतीने विकसित करणे. | ३१६ | ३ | १०,००,००,००० | १,२५,००,००० | ३३,०८,००० | ० | १,५८,०८,००० |
| २ | स्थापत्य विशेष योजना | पिंपळे गुरव प्रभाग क्र.५७ येथील मुख्य व अंतर्गत रस्त्यांचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे. | २६ | १३२ | ३,००,००,००० | १०,००,००० | २३,८५,००० | ० | ३३,८५,००० |
| ३ | भांडवली - डांबरी रस्ते - मुख्यालय | प्रभाग क्र.५७ (नविन प्रभाग क्र.३१) पिंपळे गुरव मधील काटेपुरम चोक ते मनपा शाळा पर्यंतचा रस्ता अद्यावत पध्दतीने | ३१६ | ३ | १०,००,००,००० | १,२५,००,००० | ९५,४४,१७८ | ० | २,२०,४४,१७८ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | विकसित करणे. | | | | | | | |
| ४ | महापौर विकास निधी | महापौर विकास निधी | ६३ | १८ | ५,३५,००,००० | ५,३५,००,००० | ० | १,५२,३७,१७८ | ३,८२,६२,८२२ |
| | एकुण | | | | | | १,५२,३७,१७८ | १,५२,३७,१७८ | |

तरी सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात वर नमूद केलेल्या तरतुद वर्गीकरणस मान्यता देणेत येत आहे.
तसेच सन २०२०-२१ च्या मूळ अंदाजपत्रकातील कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र | लेखाशिर्ष | कामाचे नाव | पानांक | अ.क्र | मूळ प्रशासकीय मान्यता | सुधारित प्रशासकीय मान्यता | सन २०२०-२१ ची मुळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विशेष योजना | प्रभाग क्र. २० संत तुकारामनगर मधील वाय सी एम हॉस्पिटल येथे सहाव्या मजल्यावर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी कक्ष तयार करणे व आवश्यक कामे करणे. | १७ | ३१ | ४००००००० | १०००००००० | ९०००००० |
| २ | विशेष योजना | प्रभाग क्र. २० संत तुकारामनगर मधील वाय सी एम हॉस्पिटल येथे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी आवश्यक कामे करणे व आवश्यक नुतनीकरण करणे. | १७ | २९ | २००००००० | ५००००००० | ७५००००० |
| ३ | विशेष योजना | प्रभाग क्र. २० संत तुकारामनगरमधील वाय सी एम हॉस्पिटल मधील ओ.पीडी कॉंम्पलेक्स MICR नॉम्सनुसार व O T रिनोव्हेशनची उर्वरित कामे करणे. | १७ | ३० | ३००००००० | ५००००००० | ९०००००० |
| ४ | विशेष योजना | प्रभाग .क्र.२० संत तुकारामनगर | १८ | ४० | ५००००००० | १०००००००० | ५०००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय येथील तिसरा मजल्यावरील वॉर्डचे एम.सी.ए. मानांकनानुसार अद्यावत पध्दतीने नुतनीकरण करणे. | | | | | |
| ५ | विशेष योजना | प्रभाग .क्र.२० संत तुकारामनगर यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय येथील चौथा मजल्यावरील वॉर्डचे एम.सी.ए. मानांकनानुसार अद्यावत पध्दतीने नुतनीकरण करणे. | १८ | ४१ | ५००००००० | १०००००००० | ५०००० |
| ६ | विशेष योजना | प्रभाग .क्र.२० संत तुकारामनगर यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय येथील पाचवा मजल्यावरील वॉर्डचे एम.सी.ए. मानांकनानुसार अद्यावत पध्दतीने नुतनीकरण करणे. | १८ | ४२ | ५००००००० | १०००००००० | ५०००० |
| ७ | विशेष योजना | प्रभाग .क्र.२० संत तुकारामनगर यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयासाठी बाहेरील बाजूने एसीपी पँनेल बसविणे बाहेरून व आतून रंगरंगोटी करणे. व अनुषंगिक कामे करणे. | १८ | ४३ | ४००००००० | ६००००००० | ५०००० |

प्रभाग क्र.२६ कस्पटेवस्ती स्मशानभूमी येथे गॅबियन वॉल बांधणे व इ. स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणे (निविदा क्र.७०/१०/२०१८-१९) चे कामाचे आदेश ठेकेदार मे.सोनाली स्टोन क्कारी यांना क्र.स्था/नि/ड-मुख्य/२०२/२०१९, दि.०८/०३/२०१९ अन्वये देणेत आलेले असून कामाची मुदत ३० महिने म्हणजेच दि.०७/०९/२०२१ अखेर पर्यंत आहे. त्यानुसार ठेकेदार यांनी प्रत्यक्ष कामास सुरूवात करून २६% काम पुर्ण केलेले आहे.

परंतू मा.राष्ट्रीय हरित लवाद यांचेकडील दाखल याचिका क्र.४९/२०१९ दि.१६/०६/२०२० रोजीचे आदेशानुसार व मा.राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांचेकडील कोर्ट ऑर्डर दि.२६/०९/२०१९ चे आदेशानुसार नदीपात्रात व नदीपात्रालगत अनाधिकृत बांधकामे, भराव व नविन बांधकामे करणेस मनाई करणेत आलेली आहे, त्यामुळे सदरचे काम करणे शक्य नसल्याने सद्यस्थितीत बंद ठेवण्यात आलेले आहे.

पिंपळे निलख परिसरातील नाले पावासाळयात तुडूंब भरून वाहतात. त्यामुळे सदर नाल्यांची वेळोवेळी दुरूस्ती करणे आवश्यक आहे. तसेच काही नैसर्गिक ओपन नाले तुडूंब भरून सोसायटीच्या आवारात त्याचे पाणी घुसून नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे. सदर परिसरातील नागरिक सदर नैसर्गिक नाले बांधून अथवा दुरूस्ती करून मिळणेबाबत सतत मागणी करीत आहेत.

त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रभाग क्र.२६ कस्पटेवस्ती स्मशानभूमी येथे गॅबियन वॉल बांधणे व इ. स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणे या कामाअंतर्गत त्याच प्रभागातील नैसर्गिक नाल्यांची दुरूस्ती व आवश्यक त्या ठिकाणी ओपन नाले बंदिस्त करणेच्या स्थळबदलास मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र.२६ पिपंळे निलख येथील रक्षक चौक ते पिपंळे निलख गावठाणातून संरक्षण विभागाच्या हद्दीतून जाणा-या १८ मी. डी.पी. रस्त्यास सब-वे करणे, व ताब्यात येणारा १२.०० मी. रुंदीचा डी.पी. रस्ता विकसीत करणे (नि.नो.क्र.६६/०१/२०१७-१८) या कामाचे आदेश क्र.स्था/नि/ड-मुख्य/१०७/२०१८, दि.१७/०३/२०१८ अन्वये देणेत आलेला आहे. सदरचे काम साधारण गेली २ वर्षापासून रखडलेले आहे. तसेच सदर कामास संरक्षण विभागामार्फत कोणताच प्रतिसाद मिळत नाही. तसेच संरक्षण विभागामार्फत सब-वे च्या कामात अडथळा होणारी झाडे काढून न मिळाल्याने सब-वे चे काम अर्धवट आहे. याबाबत संरक्षण विभागास वेळोवेळी पत्रव्यवहारही करणेत आलेला आहे. तरी ही झाडे काढणेचे काम करणेत आलेल नाही. संरक्षण विभागाशी साईटवर झालेल्या चर्चेनुसार झाडे काढण्यास अजून किती वेळ लागेल हे माहित नाही. त्यामुळे सदरच्या कामातील सब-वे च्या कामातील रक्कम शिल्लक आहे. त्यामुळे त्या

शिल्लक रक्कमेतून प्रभाग क्र.२६ येथील रक्षक चौक ते पिंपळे निलख STP पर्यंतचा रस्ता सेवा वाहिन्यांच्या खोदाईमुळे खराब झालेल्या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम, गणपती मंदीर चौकापासून श्रीहरी कॉलनी पर्यंतचा संरक्षण विभागास लागून असलेल्या रस्त्याचे डांबरीकरण व प्रभागातील इतर रस्त्यांची डांबरीकरणाची कामे करणे गरजेची आहेत.

प्रभाग क्र.२६ पिपंळे निलख येथील रक्षक चौक ते पिपंळे निलख गावठाणातून संरक्षण विभागाच्या हद्दीतून जाणा-या १८ मी. डी.पी. रस्त्यास सब-वे करणे, व ताब्यात येणारा १२.०० मी. रुंदीचा डी.पी. रस्ता विकसीत करणे (नि.नो.क्र.६६/०१/२०१७-१८) या कामातून प्रभाग क्र.२६ येथील रक्षक चौक ते पिंपळे निलख STP पर्यंतचा रस्त्याचे, गणपती मंदीर चौकापासून श्रीहरी कॉलनी पर्यंतचा संरक्षण विभागास लागून असलेल्या रस्त्याचे डांबरीकरण व इतर रस्त्यांची डांबरीकरणाची कामे करणेच्या स्थळबदलास मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बाल कल्याण योजने अंतर्गत पंडित दिनदयाल उपाध्याय-महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम योजने अंतर्गत सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात घेण्यात आलेल्या कोविड-१९ व महिलांसाठी अन्य कोर्सेस प्रशिक्षणाकरीता सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात अपुरी तरतुद असल्याने नगररचना विभागाकडील भुसंपादन निधी मधुन र.रु.१५,००,००,०००/- (अ.र.रु.पंधरा कोटी फक्त) सुधारीत अंदाजपत्रकामध्ये तरतुद वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणेत येत आहे.

वर्गीकरणाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | लेखाशिर्षाचे नाव | अंदाजपत्रक पान क्र. | अ. क्र. | सन २०२०-२१ सुधारीत | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नगररचना | भुसंपादन निधी | २८६/२८७ | ४ | १५०,००,००,०००/- | --- | १५,००,००,०००/- |
| २ | नागरवस्ती विकास योजना विभाग | महिलांसाठी योजना/ महिला व बाल कल्याण योजना - पंडित दिन दयाल उपाध्याय- महिलांसाठी ज्ञान कौशल्य कार्यक्रम | ३११ (महसुली जमा खर्च अंदाजपत्रक -२) | ५ | ३८,३२,००,०००/- | १५,००,००,०००/- | -- |
| एकुण वाढ/घट | | | | | | १५,००,००,०००/- | १५,००,००,०००/- |

वरीलप्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस (वाढ व घट) करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रभाग क्र.३ च-होली मधील मनपा हद्द (डुडुळगाव चौक) ते आळंदी चौक व मनपा हद्द (काटे कॉलनी) ते आळंदी चौक हा खुप रहदारीचा रस्ता आहे. सदर आळंदी रस्त्याचे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायामुळे विशेष असे महत्व आहे. सदर रस्ता मनपा हद्दीबाहेर आहे. तरी सदर रस्त्यावर पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत दिवाबत्ती व्यवस्था करुन देणेस मान्यता देणेत येत आहे. व सदर हद्दीबाहेरील रस्त्याचे दिवाबत्ती व्यवस्थेचे काम विदयुत विभागातील चालु कामातुन करुन घेण्यास किंवा नव्याने निविदा प्रसिध्द करुन दिवाबत्ती व्यवस्थेचे काम करुन घेण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच कामगार चळवळीचे जनक दिवंगत रावसाहेब नारायण मेघाजी लोखंडे यांची जयंती दि.९ फेब्रुवारी रोजी दरवर्षी तसेच माता रमाई भीमराव आंबेडकर यांची जयंती दि.०७ फेब्रुवारी रोजी दरवर्षी शासकीय इतमानाने पिंपरी चिंचवड शहरात साजरी करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पुणे – मुंबई महामार्गावरील मेट्रो मार्गिकेवर फुगेवाडी येथे मेट्रो स्टेशन तयार करणेत आलेले आहे. सदर मेट्रो स्टेशनला माजी महापौर रंगनाथदादा फुगे यांचे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारकातील सभागृहास 'कै.विजय सदाशिव जाधव' व 'महात्मा जोतीराव फुले सार्वजनिक वाचनालय व स्पर्धा परीक्षा केंद्र' असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. सद्यस्थितीत क्रांतीज्योती सावित्री फुले स्मारकातील स्थापत्य विषयक कामकाज पुर्णत्वास आले असून सदर इमारतीचे उदघाटन करणेचे नियोजन आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे भोसरी येथील पुणे नाशिक रस्त्यावरील महाराष्ट्र राज्य वखार मंडळाच्या पूर्वेकडील व मनपाच्या प्रभाग क्र. ६ मध्ये येणा-या वसाहतीचे 'जयवंत नगर' असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकुल- ७२ प्रतिकुल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.महापौर** – अजित आपलं काय म्हणणं आहे ते बोला.

**मा.अजित गव्हाणे –** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह आपण ज्या पध्दतीने म्हणताय बोला,आपलं काय म्हणणं आहे. अहो,मुळात आमचा विषय मांडू देणार नसाल, सभागृहात येऊ देणार नसाल तर ही काय लोकशाही आहे का? तुमच्याकडनं आमच्या अशा अपेक्षा नाहीत. मा.महापौर साहेब,याठिकाणी वॉटर Recycling जो विषय आहे. आपल्या शहरामध्ये पाण्याचा तुटवडा मोठया प्रमाणात निर्माण झालेला आहे. कारण मागच्या अनेक वर्षापासनं आपण जे ४८० एमएलडी पाणी उचलतो आणि एमआयडीसीचं पाणी उचलतो याच्यामध्ये जवळपास ४० टक्के गळती आहे असं प्रशासनाकडनं वारंवार सांगण्यात येत आहे. मुळात या विषयाच्या अनुषंगाने आयुक्त साहेब,माझी यानिमीत्ताने या ४० टक्के जी गळती आहे त्यावर आपण लक्ष देणं गरजेचं

आहे. ती गळती नेमकी कशा प्रकारची आहे. अनेक ठिकाणी मेन लाईन्सला ज्याठिकाणी आपण टाकी भरतो व ज्याठिकाणी मेन लाईनवरती डिस्ट्रीब्युशनच्या लाईनवरती अनेक कनेक्शन डायरेक्ट घेतले गेलेले आहेत. त्यामुळे त्या लोकांना डायरेक्ट पाणी मिळतयं आणि आपण जे टप्पे केलेले आहेत अशा ठिकाणी रोज पाणी जात आहे. त्यामुळे काही भागामध्ये लोकांना चांगल पाणी मिळतयं काही भागामध्ये लोकांना मिळत नाही. याच्यामध्ये आपण गांर्भीयाने लक्ष घालण्याची गरज आहे. या विषयाच्या अनुषंगाने आयुक्त साहेब, आपण जो विषय या सभागृहापुढे आणलेला आहे. पुर्वी आपण हे चार ठिकाणी करणार होतो परंतु त्यातला एक जो विभाग आहे तो आपण करत नाही आपण चिखलीला आपण प्लँनिंग ठरवतोय. खरं म्हणजे हे या शहराच्या अत्यंत हिताचं आहे. आपल्याला अशा प्रकारे रिसायकलींग करुन पाणी वापरणे हि काळाची गरज आहे. सिंगापुर सारख्या देशामध्ये जर का आपण पाहिलं तर त्याठिकाणी १०० टक्के अशा प्रकारचे काम केलेले आहे. कारण त्याठिकाणी पाण्याचा मोठया प्रमाणात तुटवडा आहे.परंतु हे करीत असताना आयुक्त साहेब याच्यामध्ये काही त्रुटी आहेत त्या मी आपल्या निदर्शनास आणुन देवु इच्छितो. याच्यामध्ये आपण ऍप पध्दतीने पुढे जाणार आहोत. मी मागच्या काही दिवसांमध्ये यासंबंधी माहिती घेण्याचा प्रयत्न केला त्यावेळी आपल्या अधिका-यांनी सांगितलं की,आपण काही लोकांना बोलावलं त्यांच्याबरोबर चर्चा केली आणि हे करत असताना आयुक्त साहेब,आपल्याला याच्यामध्ये जे काही महापालिकेचे पैसे लावायचे आहेत आणि बाकीचे पैसे बँकेतनं उभे करायचे आहेत आणि त्या अनुषंगाने आपण जी उपसूचना दिली आहे. आपण लोकांकडनं कसे पैसे घेणार आहोत आता जी उपसूचना वाचली त्यातनं असं लक्षात आलं की, घरगुती वापराला आपण सुरुवातीचे ३ वर्ष मोफत देणार आहोत. आणि नंतर त्यांच्याकडनं ८० टक्के आणि इंडस्ट्रीयल आणि कर्मशियल याचे धोरण आपण वेगळं अवलंबलेलं आहे. याच्यामध्ये मुख्य त्रुटी आहे ती फायनानशियल आहे याच्यामध्ये तुम्हांला खोलात जावं लागेल मला वाटतं प्रशासन याच्यामध्ये डिटेल गेलेलं नाही. आर्थीकदृष्टया कितपत वायबल आहे हे सुध्दा पाहणं गरजेचं आहे. दुसरी गोष्ट आहे, ज्यांना गरज आहे त्यांची रिक्वायरमेंट आपण मागितलेली नाही आपण असाच अंदाजे विचार करतोय की, एमआयडीसीला काही रिक्वायरमेंट आहे. मोठमोठया सोसायटया आहेत त्यांची रिक्वायरमेंट असेल किंवा वेगवेगळे जे गार्डन्स आहेत किंवा महापालिकेच्या ज्या प्रॉपर्टीज आहेत त्याठिकाणी आपण याच्यामधनं सुध्दा पाणी वापरु शकतो. अशी आपल्या अधिका-यांची भूमिका आहे. परंतु ते करत असताना अजुनही याच्यावर डिटेलिंग झालेलं नाही. समजा आता भोसरी एमआयडीसीला पाणी लागतयं तर किती पाणी भोसरी एमआयडीसी ला घेतलं जाणार आहे. त्याचा आपल्याकडे निश्चित आकडा नाही. तसेच महापालिकेच्या ज्या प्रॉपर्टीज आहेत त्याठिकाणी आपण किती पाणी वापरतोय आणि त्याठिकाणी याच्यामधनं किती पाणी वापरलं जाईल किंवा इतर मोठ मोठया ज्या सोसायटया आहेत या सोसायटयांमध्ये या प्रकारचं पाणी वापरलं जाऊ शकतं पण आपण त्यांच्याकडनं अजुन डिमांड घेतली गेली नाही. आणि आपण हे न घेतल्यामुळे याच्यामध्ये जे

नेटवर्कींगचा जो विषय आहे आपल्याला यामध्ये नवीन लाईन टाकाव्या लागणार आहेत. आणि ते नेटवर्क टाकत असताना आपल्याला रिक्वायरमेंट कोणाची आहे हे जर का माहित नसेल तर हे सगळं आपलं अंदाजे चाललं आहे. आणि दुसरी महत्वाची गोष्ट ज्याठिकाणी आपण हे रिसायकलींग करतोय चिखलीचं एक उदाहरण घेतलं तर त्याठिकाणी एसटीपी प्लॅन्ट हे खालच्या भागात आहेत. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी पाणी देताना आपल्याला पंपींग करावं लागणार आहे. आणि पंपींग करण्यासाठीचा आपल्याला मोठा खर्च करावा लागणार आहे. आणि मग तो खर्च किती येणार आहे. आणि हे पंपीग किती ठिकाणी करावं लागणार आहे. पंपींग करताना हे पाणी शेवटपर्यंत पोहोचण्यासाठी किती प्रेशरनी सोडावं लागणार आहे. या सगळया गोष्टीचा खुलासा या सभागृहापुढे झाला पाहिजे. किंबहूना प्रशासनामार्फत तुमच्यापुढे मांडल पाहिजे. आता मगाशी महापौरांनी घाई,घाई मध्ये विषय मंजुर केला परंतु विषय खुप चांगला आहे आणि तो आपण सर्वांनी समजुन घेतला पाहिजे. आमचा या विषयाला विरोध नाही. नामदेवराव तुम्ही सुध्दा याच्या डिटेलमध्ये गेलो नाही. गेलो असेल तर तुम्ही तसा खुलासा करावा. नाही तर आमचं अज्ञान असेल तर तुम्ही तसं सांगा तुम्ही नेमकं नेटवर्क कशा पध्दतीनं टाकणार आहे याचं प्रेझेंटेशन दाखवा.किती कि.मी.चे नेटवर्क टाकणार आहे. या सगळया गोष्टी सभागृहाला कळल्या पाहिजेत. आणि हे शहराला सुध्दा कळलं पाहिजे. जर आपल्या शहरात एखादा चांगला प्रोजेक्ट होत असेल तर त्याला विरोध निश्चितपणे नाही. आपण सर्वांना विश्वासात घेवुन काम करा. प्रत्येकाच्या ज्या काही सूचना आहेत त्या आल्या पाहिजेत. नामदेवराव तुम्ही म्हणताय कोरोना वाढतोय त्याची आम्हांला पण काळजी आहे आपण सर्वांनी प्रिक्वॉशन घेतलं पाहिजे. तुम्ही सर्व गटनेत्यांची बैठक घेतली पाहिजे. ती घेतली नाही. आमच्या गटनेत्यांना आम्ही विचारलं तर ते म्हणले मला पण आताच कळालं आहे. आणि गटनेत्यांची बैठक घेतल्यानंतर गटनेत्यांनी आम्हांला सूचना दिल्या पाहिजेत. उद्या सभागृहामध्ये मिटींगला कोणी येऊ नये. किंवा सभागृहामध्ये सुध्दा ४/५ पक्षाचेच सदस्य अलौड आहेत. आज हे सभागृहात झालं पण परवा आपण आपल्याकडे काही स्टाफ जादा ठेवले होते. त्याठिकाणी मोठया प्रमाणात गर्दी झाली होती. आयुक्त आपण भोसरी हॉस्पिटल नवीन याठिकाणी व्हॅक्सीन देत आहोत आणि त्याठिकाणच्या नागरीकांचे मला फोन आले की,आम्ही व्हॅक्सीनसाठी थांबलो आहे परंतु याठिकाणी आम्हाला बसण्याची सुध्दा सोय नाही. आम्हांला उन्हात बसावं लागतयं मी त्याठिकाणी ताबडतोब गेलो मी तिथल्या अधिका-यांशी बोललो त्यांना सांगितलं की, तुम्ही या नागरीकांना बसण्याची सोय करा. त्यांनीही लगेच नागरीकांना बसण्याची सोय करतो म्हणुन सांगितले. दुसरी गोष्ट मी त्यांना अशी सूचना केली की,आपल्याला शहरात ब-याच ठिकाणी हे करता येऊ शकतं आणि त्यासाठी तुम्ही स्टाफ बदलताय. सांगायचं तात्पर्य हे की,आयुक्त साहेब,जर आपल्याला नियम पाळायचे असेल तर सगळया ठिकाणी पाळले पाहिजे. शहरात अजुन काही होत नाही. आणि सिरीयसनेस कुणालाच नाही. आयुक्त साहेब,सभागृहात बसताना याठिकाणी बरीच स्पेस आहे प्रत्येक

गटनेत्यांना तुम्ही सांगितलं असतं की,तुमची ५/१० लोकांनी बसावे असं काही तरी लोकशाही पध्दतीने करा नां. सभागृहात येताना सिमाताई,आशाताई खुप चिडल्या होत्या. आम्हांला आतमध्ये सिक्युरिटी येऊ देत नव्हते. आम्हाला याची काहीच माहिती नव्हते इथं आल्यावर आम्हाला समजलं की,तुम्हांला अलौड नाही. ही पध्दत बरोबर नाही नां. शेवटी लोकशाहीने आम्हाला पण अधिकार दिलेला आहे. आम्ही पण नगरसेवक म्हणुन काम करतोत याठिकाणी विषय मांडण्याचा आमचा हक्क आहे. तो हक्क तुम्ही हिरावून घेताय आता जो तुम्ही विषय मंजुर केला आहे तो मंजुर करायला नव्हता पाहिजे. एवढया चांगल्या विषयावर आमच्या काही भूमिका आहेत त्या मांडू द्या आणि जे ऑनलाईन आहेत त्यांनाही या विषयावर बोलायचे असेल नां. प्रशासन म्हणुन आयुक्त साहेब तुम्ही या विषयाच्या खोलात जावं याच्यामध्ये चुका होऊ नये. मागच्या काळामध्ये काही चुका झालेल्या आहेत. त्या परत होऊ नयेत कारण हा विषय काही छोटा नाही. आणि या शहराच्या दृष्टीने लाँगटर्मचा विषय आहे. पुढील २०/२५ वर्ष या पाण्याचा उपयोग आपल्या शहरातील नागरीकांना होणार आहे. त्यामुळे आयुक्त साहेब,तुम्ही या विषयाच्या खोलात जा. अशी मी विनंती करतो.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह आजचा विषय पाण्याचा पुर्नवापराचा आहे. आणि खरंतर सगळयांच्या जिव्हाळयाचा विषय आहे. याच्यावरती गेली अनेक वर्ष म्हणजे जे,जे पक्ष सत्तेवर होते त्या सगळयांनी प्रयत्न केले होते. निश्चितपणे आम्ही जे प्रयत्न केले आहेत त्या प्रयत्नाला पहिल्यांदा यश आल्याचं दिसतयं आजची मान्यता ही ७२ (ब) अन्वयेची आहे. किती वर्षासाठी देतोय म्हणुन आपण त्याठिकाणी करतोय. माझी कमिशनर साहेबांना विनंती आहे की, हा प्रकल्प ७२ (ब) ची मान्यता आहे. १५/२० वर्षासाठीची आहे, लाँगटर्मसाठीची आहे. हा प्रकल्प शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. कारण नवीन पाणी कोणी देत नाही आणि बांधकाम परवानग्या कोणी थांबत नाहीत आणि आपण थांबवू पण शकत नाही. त्यामुळे नागरीकांना पाणी कमी मिळते. तर या विषयाचे महत्व लक्षात घेता आपण याला ७२ ब ची मान्यता दिलेली आहे. त्याच बरोबर त्या प्रकल्पाची ग्रॅव्हीटी ख-या अर्थानं पूर्ण होणार आहे का? कारण जवळपास ६५० कोटीचा प्रकल्प आहे. आणि एवढा मोठा जर का प्रकल्प असेल तर त्याठिकाणी करणारी जी माणसं आहेत सगळया गोष्टी आपल्याला बारीक,बारीक तपासाव्या लागतील. आणि आपण त्या निश्चितपणे तपासणार कारण एकंदर आम्ही आपल्या कामाचा जो आढावा पाहतो खूप बारीक निरीक्षण करुन आपलं काम चालू आहे. खुप छान काम करताय तुम्ही. त्यामध्ये तुम्हांला आवर्जुन सांगायचं आहे की, कोविडच्या काळामध्ये माझ्या प्रभागात ५ स्लम एरिया आहेत. तर त्या स्लमसाठी मला एक स्लमसाठी डेलीगेट प्रभागातील नागरीकांसाठी कोविड सेंटर जिथं आपली टेल्को रोडला ओपीडी आहे त्याठिकाणी खास करुन आपलं लक्ष द्यावं.आणि दुसरं असं आहे की,याच प्रकल्पासाठी याठिकाणी दर कमी करण्याची उपसूचना आली आहे ती सुध्दा आपल्याला तपासावी लागेल. कारण प्रकल्प जर तुम्हांला रन करायचा असेल तर

प्रकल्पाला येणारा खर्च हा नागरीकांकडनचं नाही तर हा जो आकारणार आहे त्याच्याकडनं पण झाला पाहिजे. लोकांवरती हा भार टाकून किंवा लोकांच्या डोक्यावरती हा खर्च करुन अशा प्रकारचं कामकाज झालं नाही पाहिजे.आणि आपण जे काही टिपीकल एरिया घेतलेले आहेत तर त्यामध्ये असे म्हणायचे आहे की,हा संपुर्ण शहराचा विषय आहे. आज आपण हा प्रकल्प मंजुर करु पण जसे कमिशनर बदलतात तसे,तसे त्याच्यामध्ये बदल होत जातात. आणि पर्यायाने आपण पण विसरुन जातो. आपल्या सगळयांनाच इतका वेळ रहात नाही.वेळ असतो तो फक्त त्या,त्या प्रोजेक्टच्या अधिका-यांना आणि ते काही सांगत नाहीत कारण की आता याच्यामध्ये सुरुवातीलाच आपण दर कमी करण्याच्या उपसूचना दिलेल्या होत्या. तर मला वाटत नाही बरेच फायदे होतील म्हणुन आणि जे प्रोजेक्टच्या पाण्याचे दर आहेत त्या दराच्या हिशोबाने आपण काम करायला शिकले पाहिजे.आणि ते जर होत नसेल तर आपण हा विषय आल्या,आल्या लगेच मंजुर केला. या विषयाला या सभागृहातील एकही नगरसेवक विरोध करणार नाही. परंतु आपण घाई,घाईने विषय मंजुर करुन आपणच तोंडघशी पडतो. आणि मी याठिकाणी कमिशनरसाहेबांनाच विनंती करणारआहे की, ज्या बारीक पध्दतीने आपण सगळे प्रोजेक्ट करण्यास सुरुवात केली आहे.सगळया प्रोजेक्टवरती आपण जे प्रेंझेंटेशन घेताय खुप चांगल आहे साहेब,आणि या प्रेझेंटेशन मधुन तुम्हांला मी एक छोटीशी विनंती पण करेन की, वॉर्डमध्ये तुम्ही एकदा व्हीजीट करा चारच नगरसेवक बरोबर घ्या आणि ऑन दि स्पॉट व्हीजीट करा, म्हणजे कुठल्या वर्षी प्रकल्प सुरु झाला होता आणि त्याची आता काय कंडीशन आहे. आणि तो ठेकेदार काम करतो का कारण अनेक लोकांना आपण वाढीव खर्चाची मंजुरी दिलेली आहे. १०० ते १२५ कोटी रु.जादाचे खर्च झालेले आहेत. कारण वेळेत त्यांनी काम करायचे नाही आणि भुर्दंड महापालिकेने सोसायचा हे काही योग्य नाही. आणि म्हणुन आपण ते जर का केलं तर चांगल काम करता येईल. कोविडच्या काळात आपण काही बंधन घातले असतील विनंती एकच आहे की,जे काही असेल ते आपल्यापर्यंत पोहचलं पाहिजे. मा.नगरसचिव साहेब, तुमचं काम होतं आम्हांला मेसेज टाकायचा आमच्या मोबाईलचं तुम्हांला जे काही करायचं असेल ते करा आम्हांला दाखवा तुमचा आम्हाला मेसेज होता का? आमची लिंक फॉरवर्ड झालेली आहे. आणि कशासाठी आपण हे करतोय, चो-या वगैरे केलेल्या आहेत का? चोर आहेत का आम्ही कोविडच्यासाठी आम्ही सगळेजण १०० टक्के तुमच्या बरोबर आहोत. मागच्या १०/११ महिने आम्ही अधिका-यांना सांगत होतो की, आज आम्ही मा.महापौरांकडे पाहिलं त्यांच्या सिक्युरिटी गार्डकडे, नगरसचिवांनी लिंक टाकायला पाहिजे होती ती लिंक आली नाही. मा.महापौरांच पत्र घेवुन मी तिथं उभे होते. जे काही दोन-चार लोक घेवुन सभागृह चालवायचं म्हणता,कशासाठी ५० लोक बसण्याची परवानगी जर शासन देत असेल तर महानगरपालिका का चालू शकत नाही. आणि इतक्या अवघड परिस्थितीमधुन नगरसेवकांनी यावं काय अर्थ आहे मा.महापौर,मा.महापौर तुम्हीच सांगा.भांडाव तर आमचं तोंड दिसतं पण अपमान

नको, अपमानजनक परिस्थिती राहणारी मी तरी नक्की नाही. मी तरी नाही सहन करणार, मी येत नव्हते मला तर आजच्या जी.बी.ला यायचंच होतं. मला ४/५ नगरसेवकांचे फोन आले की, सिमाताई आपल्याला सभागृहात सोडत नाहीत आणि म्हणुन मी आले,सभागृहात यायला बंदी आहे. ४/५ लोक ठरवतात तेच येणार आज कोविडची काय परिस्थिती आहे,आज सगळे कोविड सेंटर बंद आहेत वायसीएम हॉस्पिटलवरचा भार वाढलेला आहे. भोसरी हॉस्पिटलवरचा भार वाढलेला आहे. सगळे हॉस्पिटल आता फुल्लं व्हायला लागले आहेत आपल्याला प्रिक्काशन्स घ्यायचे आहेत. कमिशनर साहेब,तुम्हांला सांगते की, हार्डीकर साहेब हे तुमच्या आधी तेच आम्हांला कमिशनर होते. त्यांनी आम्हां सगळयांना विश्वासात घेतलं आणि त्यांनी परिस्थिती समजुन सांगितली साहेब,पॉलटिकल माणसांला जमणार नाही इतकं शहर हँण्डल करत होते. आख्खं शहर हार्डीकरनी म्हणलं घरात बसायचं तर घरात बसायचं,त्यांनी सांगितलं रस्त्यांवरती इतक्या वाजता निघा तर त्याच वेळेला लोक रस्त्यावर यायचे. आणि हे सगळं कॉऑर्डीनेशन,एकमेकावरचा विश्वास मला विश्वास बसत नाही की,मी कमिशनरला फोन केला की,कमिशनर कुठल्या नां कुठल्या वॉर्डातील माझ्या शहरातील पेशंटसाठी जागा करीत होते. आणि तो विश्वास तुमच्यात आणि आमच्यामध्ये निर्माण व्हायला पाहिजे. परंतु अशा प्रकारचं माई आपल्याकडनं आपण सगळे पॉलटिकल आहोत हे सगळे निर्णय प्रशासन म्हणुन घ्या नां. आणि जे २/४ लोक ऑनलाईनला घेतले आहेत माझ्याकडं तर लिंकच नाही. दुपारी १.३७ मिनिटांनी मा.पक्षनेत्यांचा मेसेज डिलीव्हर झालेला आहे. व्हॉटसअपवरचा मेसेज तर काय खोटं सांगत नाही. तुमचा मेसेज जर मला १.३७ मिनिटांनी आला असेल तर मी काय करायला पाहिजे. आम्हांला कळालचं नाही, आणि वाईट कशाचं वाटतं की,ज्या सभागृहात येण्यासाठी या शहरातले ५/१० हजार लोक फार्म भरतात आणि सगळा रिपोर्ट इथं लोकांच्या प्रश्नासाठी या सभागृहात भांडण्यासाठी येण्याचा प्रयत्न करतात त्या सभागृहात यायला कोरोनाच्या नावाखाली बंदी घातलेली आहे. आता आपल्या महाराष्ट्र राज्याचं अधिवेशन चालू होतं. सगळे आमदार तिथं उपस्थित होते. तिथं कोरोना नव्हता का? माई, हे शेवटचं वर्ष आहे आणि तुम्ही पण महापौर म्हणुन शेवटचं वर्ष आहे. ५० लोकांची मर्यादा आहे तर ज्यांना यायचं ते येतील नां, हाच असला पाहिजे,तोच असला पाहिजे कोणी दिला तुम्हांला चॉईस करण्याचा अधिकार सभागृहात निवडुन आलेला प्रत्येक नगरसेवक तो कुठल्याही पक्षाचा असला तरी त्याला इथं येऊन बसण्याचा अधिकार आहे. आणि त्याला अधिकार हा लोकशाहीने दिलेला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाने दिलेला आहे. आणि म्हणुन मा.महापौर साहेब,मगाशी जी घटना घडली त्याचा मी तीव्र निषेध करते. आणि प्रशासनाला आपण आदेश करावेत की, या बाबतीत प्रशासनाने ठरवावे आमचं काही म्हणणं नाही,आम्ही प्रशासनाच्या बरोबर जाणार आहोत कारण आम्हांला सुध्दा आवडेल, कारण आमचे सुध्दा तीन नगरसेवक कोरोनाच्या काळात बळी गेलेले आहेत. आणखी कुठला बळी जाऊ द्यायचा नाही. परंतु अपमानजनक परिस्थिती करु नका, नगरसचिव साहेब,तुम्हांला सुध्दा आता विनंती केली, येथुन पुढे तुमचा जर का मेसेज

नसला तर मग आम्हांला सांगायचं नाही आम्ही सभागृहात काय करायचं,आम्हांला सांगायचं नाही, तुमचा मेसेज आम्हांला पाहिजे, महापौर म्हणुन सभा चालवण्याची जशी जबाबदारी आहे तशी तुमची सुध्दा तिथं जबाबदारी आहे. लिंक नाही आली आम्हांला, मा.महापौर आजचा जा विषय आहे पाण्याचा पुर्नवापर करणे अत्यंत चांगला विषय आहे. शहराला नवी दिशा देणारा आहे. जे कोणी केलं नाही ते आज या सभागृहात होत आहे. पाण्याचा पुर्नवापर जर का आपण करुन दाखवलं तर निश्चितपणे आपल्या शहरात येणारी जी लोकसंख्या आहे जी वाढ आहे ती आपण सरळ नेऊ शकू, कारण भामा आसखेड,आंद्र धरण असेल याठिकाणाहून पाणी उचलण्यासाठी,आणि पाणी आणण्यासाठी लागणारा कालावधी आणि आपली होणारी वाढ ही कुठेही मॅच होणारी आहे. आणि आज जसं आपलं एक दिवसाआड पाणी आहे भविष्यकाळात दोन दिवसाआड होऊ नये. याठिकाणी आपण जी काही खबरदारी घेण्याचा प्रयत्न केलेलाआहे निश्चितपणे मी आपलं याठिकाणी अभिनंदन करेन आणि बोलू दिलं त्याबद्दल मनापासून धन्यवाद.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह खरंतर परवा जेंव्हा आयुक्त साहेबांबरोबर मिटींग झाली तेंव्हा मी या गोष्टीचा उल्लेख केला होता. शहराच्या सर्वांगीण दृष्टीकोनातून विषय अत्यंत महत्वाचा आहे. आणि भविष्याच्या वाटचालीसाठी चांगला विषय आहे. नदीमध्ये जी जलपर्णी वाढत आहे ती एक निसर्गाचं वरदान आहे.कारण अशुध्द पाण्याचा साठा ज्यावेळेस वाढतो त्यावेळेस अशुध्द पाणी शुध्द करण्यासाठी जलपर्णी ही प्रक्रीया करीत असते. त्यामुळे जलपर्णी ही एक निसर्गानं दिलेली देणगीच आहे. आणि जलपर्णी येणं हे प्रशासनाचं अपयश आहे. या विषयावर मी थोडा अभ्यास करीत आहे आणि येत्या ८/१० दिवसामध्ये त्याचा अहवाल मी आयुक्तांना देईनचं परंतु हा जो विषय आणलेला आहे  या विषयाचं संपुर्ण वाचन केल्यानंतर असं लक्षात येतं की, सर्व तयारी झालेली आहे आणि त्याचा पाठपुरावा करुन प्रक्रिया सुरु करावयाची आहे. मी मा.महापौर यांना सांगु इच्छितो की, तुम्ही राष्ट्रवादीत असताना मी काँग्रेसमध्ये एकटाच असायचो आणि तुमचा निर्णय चुकला की,त्या टाईमाला अशी काय पध्दत नव्हती की, बजेटमधुन हे कमी करायचं ते करायचं त्यावेळेस सर्व पक्षाच्या नगरसेवकांच्या कामाचा समावेश करायचं त्यावेळी मी नेहमी एक वाक्य  बोलायचं की,सत्ता तुमची जरी असली तरी नगरविकास खातं आमच्याकडं आहे. ही जी प्रक्रिया आहे ती मी पहिल्यांदा बघत आहे. माई,तुम्हांला माहिती आहे की,जास्त विस्तारपूर्वक बोलण्यापेक्षा जास्त आशयपुर्वक मी बोलतो. या प्रक्रियामध्ये अतिशय पारदर्शकता असायला हवी  अनेक वर्षापासून होतंय म्हणुन काही तरी डोळयासमोर ठेवुन कोणतीही प्रक्रिया करु नये. कारण हा जिव्हाळयाशी खेळण्याचा प्रकार आहे. आयुक्त साहेब,मी याचा अभ्यास करीत आहे. नंतर तुम्हांला मी ज्यावेळेस भेटेन त्यावेळेस पूर्ण अभ्यास करुन सविस्तर निश्चितपणे बोलेन परंतु देशामध्ये असे जे  काही प्लँन्ट आहेत त्याचा रिझल्ट काही चांगले नाहीत. यावर तुम्हांला एक धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल यामध्ये केवळ सांडपाणी किंवा मैलाशुध्दीकरण किंवा अंडरग्राऊंड ड्रेनेजच्या माध्यमातून

महापालिकेच्या माध्यमातून घेतो तो सोसायटीच्या माध्यमातून देखील आपल्याला धोरणात्मक निर्णय आपल्याला घ्यावे लागतील. त्यांच्यासाठी सुध्दा बांधकाम नियमावलीमध्ये करणे हे अत्यंत गरजेचं असणार आहे. म्हणुन हा विषय करीत असताना धोरण पास झालं,विषय पास झाला आता विषय फक्त सभागृहाच्या पटलावर आणलेला आहे. म्हणुन याच्यावर झालं आता संपल असं काही कोणी समजण्याचं कारण नाही. त्यामुळे माझी एकच विनंती आहे की, हा विषय सेन्शीटीव्ह आहे तो व्यवस्थित करावा.आणि हा विषय जागतिक दर्जाचा आहे, भारताच्या दर्जाचा आहे म्हणुन डोळयासमोर ठेवुन काम करु नये ती रद्य करण्याची क्षमता सध्या तरी माझ्याकडे किंवा आमच्याकडे म्हणा आहे. मी असं कधीच बोलत नाही की,माई,तुम्ही ऐकलं असेल मी १५ दिवस चर्चा करीत होतो. परंतु असं नेहमी घडत असेल तर त्याला कुठं तरी पायबंद घालण्याची गरज आहे. कारण ही सेन्शिटीव्ह गोष्ट आहे. आता कोरोनामुळे अनेक रोगांकडे दुर्लक्ष करतो. या पर्यावरणाच्या संदर्भात संपुर्ण उध्दवस्त होत चाललं आहे. खरंतर इथं हा विषय सोडून एक सूचना देवु इच्छितो की,जसं कोरोना योध्दा म्हणुन कर्मचा-यांना लस दिली जाते तसं सर्व नगरसेवकांना सुध्दा कम्पलसरी आणि या सभागृहात द्यावी. काही फरक पडत नाही कारण आपल्याला  सुध्दा जनतेसमोर जावं लागतयं परंतु हे सगळं करत असताना या सर्व गोष्टीकडं दुर्लक्ष आपण अनेक बाबीकडं न कळत अनेक वर्ष याकडे दुर्लक्ष झालेलं आहे. हे नाकारता येत नाही. हे करत असताना हेतुपुरस्पर कोणत्याही गोष्टी करु नये. ज्यावेळेस मी या विषयावर बोलेन त्यावेळेस आंतरराष्ट्रीय दर्जाचे सर्व दाखले वगैरे देवुन कोणत्या कंपन्या याच्यामध्ये आहेत ते सर्व बोलेन परंतु हेतुपुरस्पर डोळयासमोर ठेवुन कोणतीही गोष्ट होता कामा नये. या विषयाच्या संदर्भात मी सूचना दिली.

**मा.मंगला कदम** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह आजच्या जी.बी.चे जे काही नाट्य घडलं आहे. मला असं वाटत होतं की,तुम्हांला एक ४/५ लोकं घेवुन जी.बी.चालवायची की,काय ऑनलाईनमध्ये माई,एवढं बोलता येत नाही. हे काही कॉन्फरन्स नाही की,आपण ऑनलाईनवरुन बोलतोय. समोरचा माणुस सांगतो आणि आपण सर्वांसमोर बोलतो.

**( सभागृहात गोंधळ )**

**मा.मंगला कदम** - मा.महापौर, मी आता राहुल कलाटेंना शेवटी म्हणलं होतं की, भोसले साहेब माझ्या मागे,मागे येतील मी सिक्युरिटींना एवढं सुध्दा म्हणलं होतं की, त्यांना सोडा मा.आयुक्त साहेब,जलपर्णीचा हार घातला म्हणुन सभागृहात यायचं नाही. हे काय मला योग्य दिसत नाही. उद्या तुम्ही म्हणाल की,हाच ड्रेसकोड असला पाहिजे. तुम्ही असंच आलं पाहिजे,तसंच आलं पाहिजे. असं थोडचं चालणार आहे. जलपर्णी हा संपुर्ण शहराचा प्रश्न आहे. जलपर्णी त्यांनी फक्त चिटकुन आणलेली आहे. आपण लोकशाही मध्ये राहतो की,कुठली शाही आहे हेच समजत नाही आम्हांला जनरल बॉडीमध्ये यायचं नाही.

**मा.महापौर** - -त्यांना बोलावलं आहे,त्यांना बोलवायला गेले आहेत ते येतील तुम्हांला जे बोलायचं आहे ते बोला.

**मा.मंगला कदम** - माई, राहूल कलाटेंना मी याठिकाणी सांगितलं आहे की, शिवसेनेचा माणुस आहे त्यांना आणायला तुम्ही सांगितलं आहे. ही योग्य पध्दत नाही. उद्या तुम्ही आणखी काही सांगाल हे करायचं नाही,ते करायचं नाही, उद्या एखादयाला वाटलं की,उद्या एखादयाला वाटलं आम्ही हार घालुन येणार आहे मग तो येऊ शकत नाही का? स्वागत करतो आपण मा.महापौर,मी काल नगरसचिवांना फोन केला होता. त्यांना विचारलं होतं की,आजची जनरल बॉडी होणार आहे किंवा कशी मागच्या १८ मार्चला कोरोनाचे किती पेशंट होते. आणि आजच्या १८ मार्चला कोरोनाचे किती पेशंट आहेत. त्याचवेळेस मा.महापौर आणि कमिशनर साहेब तुम्ही बसुन ठरवायला पाहिजे होतं की, जी.बी.घ्यायची की नाही, मागच्या वेळेस आपण कोरोनामुळं जी.बी.तहकुबच केली होती नां. मा.महापौर,आम्ही बोलायला लागलो तर स्पीकरचा आवाज येत नाही. आता स्पीकरचा आवाज येतोय मगाशी मी बोलतांना स्पीकरचा आवाज का येत नव्हता. माई,५ वर्ष सत्ता मिळाली म्हणुन उतू नये मातू नये. पिंपरी चिंचवड शहरातील नागरिक नक्कीच तुम्हांला तुमची जागा दाखवून देतील. मी काल नगरसचिवांना सांगितलं होतं की, नगरसचिव म्हणाले तुम्ही महापौरांशी बोला कोरोनामुळे आजच्या दोन्ही जी.बी.तहकुब करा कारण मागच्या वर्षीच्या १८ मार्चला नवीन कोरोना असताना सुध्दा एवढे पेशंट शहरामध्ये नव्हते की, जेणेकरुन एवढे पेशंट या शहरामध्ये आहेत. नाही त्यावेळेला कोरम नाही सभा तहकुब करायची, श्रध्दांजली वाहून सभा तहकुब करायची, अमकं झालं सभा तहकुब करायची तुम्हांला जर या शहराची एवढी काळजी असेल तर मिटींग तहकुब करायची होती.मला मिटींग घ्यायची आहे असं जर तुम्ही सांगितलं आहे ना, मग तुम्ही मिटींग घ्यायची कालच्या बातमी मध्ये सांगितलं आहे की, विद्यार्थी हा ३ फुटावर बसला तरी त्याला धोका नाही कमिशनर साहेब,तुम्ही कालची बातमी बघितली असेल की नाही हे मला माहित नाही. मी ती बातमी ऐकली आहे. आणि मग आम्ही किती फुटावर बसणार आहेत आणि कशासाठी आम्ही या सभागृहात यायचं नाही. महापौरांनी आदेश काढला आहे, असा कसा काय महापौरांनी आदेश काढला आहे.अहो,आज तुमच्याच पक्षाच्या महिला भगिनींना,मैत्रिणींना या सभागृहात येण्यासाठी भांडाव लागलं. आमच्या सर्व सदस्यांना फोन करुन सांगितलं की, मिटींग ऑनलाईन आहे सभागृहात कोणचं नाही. अहो,माई काय आहे हे, जसं काय तुम्ही पहिल्यांदा महापौर झाला आहात आणि महापौर झाला आहात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. आणि मला माहिती आहे की, तुमचे नेते तुम्हांला असलं काही शिकवणार

नाहीत. मला तुमच्या नेत्यांवर खात्री आहे, आज संध्याकाळी भेटा आणि त्यांना सांगा मंगलाताई सभागृहात अशा म्हणल्या आहेत. तुम्ही ज्यांना नेते म्हणता नां ते तुम्हांला असलं काही शिकवणार नाहीत. सभागृहात त्यांना बोलवून घेवु नका, त्यांना असं करु देवु नका,त्यांना हे करु देवु नका असं तुम्हांला कोणी सांगणार नाही. पण तुम्ही बाकीच्यांच ऐकुण असं काही करु नका. मग तुमच्या सोबत काय फक्त नामदेव ढाके होते काय, मी विषयावर बोलते मा.महापौर साहेब, पण हे जे काही चाललं आहे ते अजिबात चालणार नाही. वाटल्यास तुम्हांला जर या शहराची एवढी काळजी असेल तर सभा तहकुब करुन टाका सभागृहामध्ये येऊ नका. काही फरक पडत नाही. जर आपण लग्नाला ५० लोक,२०० लोक जाऊ शकतो तर आपण सभागृहात बसु शकत नाही. सभागृह चालवू शकत नाही. मिटींगला फक्त पदाधिकारी, पदाधिकारी आम्ही निवडलो म्हणुन पदाधिकारी झाले आहेत. आम्ही निवडले म्हणुन तुम्ही महापौर झालेत नाही तर तुम्ही काय महापौर झाले असते,आणि बाकीचे काय पदाधिकारी झाले असते. सध्या निवडुन आलेले सगळे पदाधिकारीच आहेत. म्हणुन आपण कुठल्या एका पदावर बसलो आणि त्या पदावरचं, ज्या खर्चीवर आपण बसतो ना त्या खुर्चीची उंची वाढवायची हे आपण ठरवायचं हे असलं करुन त्या खुर्चीची किंमत वाढत नाही. मा.महापौर,६५० कोटीचा विषय आहे त्याला फक्त मंजुरी असु दे नाही तर काही असु दे सभागृहामध्ये हा विषय किती वेळा तहकुब झाला या विषयावर चर्चा का झाली नाही. विषय वाचला की,मंजुर करायचा कशासाठी मंजुर करायचा एखादा जर का आजार झाला तर आपण दुस-या डॉक्टरांकडे विचारायला जातो की,मला या डॉक्टरांनी हे करायला सांगितलं आहे ते केलं तर चालेल का? नाही तर मला सेकंट ओपीनियन घ्यायचं आहे. या प्रश्नामध्ये असा विषय आला की नाही या शहरामध्ये पाणी पुर्नवापर कुठे केलं आहे की नाही,कमिशनर साहेब,अधिकारी बोलवा सभागृहाला सुध्दा समजु दे हे ६५० कोटी जे काही आहेत पाण्याचं पुर्नवापर करायचं असेल तर त्याच कॉस्टींग किती होतं आणि ते शहराला देण्यासाठी परवडणार आहे का? शहराला पिण्यासाठी पाणी देणार आहे का?आणि त्याचा दर्जा उच्च दर्जा असणार आहे का? त्याच्यानंतर आता आपण या शहरामध्ये कुठे करणार आहात. किती कि.मी.साठी लाईन टाकली आहे. ती लाईन आपल्या अधिका-यांना चालू करता येते का? संजय कुलकर्णी हे पर्यावरणाचे अधिकारी आहेत त्यांनी माझ्या संभाजीनगर वॉर्डामध्ये ज्यावेळी आम्ही मॉडर्न वॉर्ड केला त्यावेळेला हा प्रश्न खुप वेळा चालला होता. इंडस्ट्रीयलवाले ज्यावेळेला आपल्याकडनं पाणी घेत नाही मग या पाण्याचं आपण काय करायचं ठिक आहे, लोकांना गाडया धुण्यासाठी असेल,गार्डनसाठी असेल, असं आपण हे पाणी द्यावं की,कमीत कमी आपण हे पाणी परत नदीमध्ये,खाणी मध्ये सोडून देतो त्यापेक्षा आपल्याच शहरातील बांधकामासाठी असेल,गार्डनसाठी असेल यासाठी या पाण्याचा वापर करता येतो का? हे बघण्यासाठी आपण असा उद्योग करुन घेतलेला आहे. त्यासाठी आपण दिड कोटी रु.खर्च केला आहे. दिड कोटी रु.चं व्याज किती झालं आहे.आमच्या वॉर्डमध्ये हे दिड दिवस सुध्दा पाणी आलेलं नाही. आणि

हा विषय एका मिनिटात मंजुर करता सल्लागार म्हणजे हे काय कोठुन आलेले आहेत का? ती सुध्दा माणसंच आहेत नां,माणसांसारखी माणसंच आहेत नां,प्रत्येक गोष्टीला सल्लागार,सल्लागार असंच चालू आहे बाकीच्या लोकांच्या मेंदुला गंज चढलेला आहे. त्यांना स्वत:ला काम करायला नको का? त्यांना आम्ही विचारलं तर ते म्हणतात आम्हांला महापालिकेने काहीच काम ठेवलेलं नाही. प्रत्येक गोष्टीला सल्लागार मा.महापौर,आता संजय कुलकर्णी यांना बोलवायचं सभागृहाला या सगळया गोष्टी कळू दे. पुर्नवापर पाण्याचा उपयोग या शहरामध्ये होतो किंवा नाही. आणि जुना वॉर्ड क्र.९, प्रभाग क्र.१० या मॉडर्न वॉर्डमध्ये पुर्नवापर पाण्याचा प्रयोग केला होता की नाही.आणि तो प्रयोग कार्यरत आहे की नाही. यापुर्वीच्या कमिशनर साहेबांना सुध्दा भरपूर पत्रं दिलेली आहेत. आयुक्त साहेब,परवा तुम्हांला आम्ही हे पत्र दिलेलं आहे त्यामध्ये सुध्दा मी याचा उल्लेख केलेला आहे की,पाण्याच्या पुर्नवापराच्या माझ्या प्रभागामधील सगळया पाईपलाईन बंद आहेत. आणि मग एवढं सगळं केल्यानंतर काय करायचं आणि म्हणुन माई,विषय असा आला आहे की, आणि लगेच मंजुर करा,व्हीप देणारे सुध्दा फार हुशार आहेत अशातला काही भाग नाही, नुसतंच आपलं व्हीप देतात,व्हीप देतात मी पण ५ वर्ष पक्षनेता होते पण आम्ही चर्चा कशासाठी करु देत होतो. चर्चा याच्यासाठी करु देत होतो दिवस,दिवस सभागृह चालवत होतो. याचं कारणचं ते होतं की,चर्चेतुनच काही तरी चांगल निघतं प्रत्येकाला चांगल्या गोष्टी येतात म्हणुन आमीष देवुन नाही राहीलो. सगळयांना परमेश्वर जन्माला घालतो कोणी आयुक्त होतो,कोणी नगरसचिव होतो,कोणी नगरसेवक होतो. देवांनी काय लिहून पाठवलं होतं का, कपाळावर की हे,हे होणारआहेत कोणी आपल्याला परमेश्वरांनी लिहून पाठवलेलं नाही. म्हणुन चर्चा केली तरचं समजणार आहे नां, या गोष्टीचा वापर केला तर आपल्याला काही फायदा होणार आहे का? आज माझ्याकडचे दिड कोटी रुपये पाण्यात गेले. नाही तर, कमिशनर साहेब,तुम्ही त्यांना सांगा उद्यापासून आमच्या लोकांना पाणी गार्डनसाठी असेल,गाडया धुण्यासाठी असेल, सोसायटीतील जीने धुण्यासाठी असतील, आमच्याकडे असे किती एकरमध्ये गार्डन असे आहेत की, याला महापालिकेचं पाणी आहे. किंवा थर्मेक्स चौकापासून ते भोसरी पर्यंतचे जे गार्डन्स आहेत याला सुध्दा आमच्या ट्रिटमेट प्लँन्टवरनंच पाणी आहे. मग हे पाणी त्यांना मिळतयं का? याचा खुलासा तरी होऊ दे नां. मा.महापौर साहेब,याचा खुलासा दिल्यानंतर मला परत बोलण्याची संधी द्या. मा.महापौर साहेब, तुम्ही जसा रोखठोक विषय मंजुर केला तसा या पाण्याचा पुर्नवापर होणार का याचा खुलासा झाला पाहिजे. मला वाटतं सभागृहाने एकदा बघुन घ्यावे की,माझ्या वॉर्डमध्ये दिड कोटी रु. ची पाईपलाईन सडून गेली आहे. त्याचा काहीही उपयोग झाला नाही. आता वायसीएमएच मध्ये पण तसंच झालेलं आहे. मग कशाला हे ६५० कोटी रु.चा खर्च म्हणुन संजय कुलकर्णी यांना बोलवून घ्या आणि त्यांना खुलासा करण्यास सांगावे त्यानंतर परत मला बोलण्याची संधी द्या.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह ख-या अर्थाने माई, विषय इतका सुरेख आणि अत्यंत चांगला आहे. उद्याची काळाची गरज विचारात घेवुन आणलेला विषय आहे. म्हणुन मी या विषयाच्या सुरुवातीला सांगितलं की,माई मला या विषयावर बोलायचं आहे. मला नाही माहित, तुम्हांला काय वाटलं, आणि माई,तुम्ही मला बघायचं पण टाळलं. खरंच तुम्हांला सांगते,मला हा विषय बघु द्या अत्यंत चांगला विषय आहे. ख-या अर्थानी उद्याची वाटचाल सुरु करीत असताना काही तरी नवीन आहे आणि या शहराची जी गरजआहे असे विषय पटलावर आलेले आहेत असे विषय मंजुर होताना इतका सुंदर विषय आहे त्यावर चर्चा व्हायला पाहिजे. आणि म्हणुन मी बोलत होते परंतु तुम्हांला काय वाटलं माहित नाही आशाताई काय म्हणतात,काय नाही पहिला विषय मंजुर करु या, मा.महापौर साहेब,तुम्हांला विनंती आहे की, हे लोकशाहीचं मंदिर आहे. सत्ताधारी असो,विरोधी असो कोणीही असेल,चर्चा तर होऊ द्या. आपली सत्ता आहे त्यामुळे आपण विषय मंजुर करु शकतो. मग इतकी घाई कशाला करता,मी फक्त हात वर केला होता. जेंव्हा विषय विषय पटलावर येतो त्यावेळेस आम्ही त्यावर बोलू शकतो तेंव्हा मानदंडाला हात लावू शकतो. मानदंडाला हात लावायला सुध्दा इथं तुम्ही कुंपण टाकलेलं आहे. हे योग्य नाही.मानदंडाला हात लावता आला पाहिजे. आणि मग तिथं तुमच्यापर्यंत पोहचण्याची आमची रिऍक्शन काय आहे हे तिथ पर्यंत पोहचण्यासाठी मानदंड आहे. हे शोभेची वस्तु निश्चितपणे नाही. परंतु जेंव्हा माझ्यासारख्या सामान्य स्त्रीचा हात लागतो का बघा किंवा तुम्ही खाली येऊन पहा की,तुमचा हात लागतोय का? मा.महापौर,जर त्या मानदंडाला हात लावू शकत नाहीत हे योग्यच आहे. मला याठिकाणी सांगायचं होतं की,याठिकाणी चांगला विषय आलेला आहे. परंतु हा विषय आल्यानंतर या विषयाची मंजुरी तुम्ही सर्वांच्या वतीने नक्की घ्या. परंतु ती मंजुरी घेतल्यानंतर त्याच्यावर अंमलबजावणी करण्यासाठी मा.मंगलाताई मगाशी बोलल्या आहेत माझ्या प्रभागातील दोन उद्यानांना मी एसटीपी वरुन पाण्याची लाईन नेली आणि त्या पाण्याच्या लाईनमधनं दोन्ही उद्यानं चालू आहेत म्हणुन त्यांची अवस्था अशी होती की, उन्हाळयामध्ये लोकांनी त्याठिकाणी जायचं आणि म्हणायचं ताई,तुम्ही येऊन बघा नां हराळी सुकली आहे असे म्हणायचे आणि मग कुठं तरी ब्लॉक बसवायचा काम कमी करा परंतु एसटीपी वरुन पाणी आणा आणि माझ्या गार्डन या हिरव्या राहील्या पाहिजेत उन्हाळयामध्ये यादृष्टीकोनातून ती पावले उचलून करण्यास आम्हांला यश मिळालं आहे. हा विषय करताना आपण छोटा प्रोजेक्ट राबवला पाहिजे. आणि या प्रोजेक्टसाठी ६५० कोटी रु.खर्च केले तर फार काही वावगं नाही शहरातल्या पाण्याचा एक मोठा प्रश्न मग तो गार्डनसाठी असेल, बांधकामासाठी असेल,सोसायटयांतील गार्डनसाठी असेल पिण्यासाठी सोडून इतरत्र कामासाठी वापरत असाल तर ते आपण वापरावं. मंगलाताईच्या प्रभागातील ही यंत्रणा फेल गेली आहे.तर मा.महापौर साहेब, आपण आयुक्तांना आदेश दिले गेले पाहिजे की, आपण जर हा विषय करणार असु तर त्याचं १००% १५ वर्ष जो कोणी काम करणार असेल त्यांनी ते काम

केलचं पाहिजे. म्हणुन मा.महापौर साहेब,या विषयावर चर्चा होणं गरजेचं आहे आणि चर्चेतूनच मुद्दे सापडतात,मार्ग सापडतात त्याच्यामुळे तुम्हाला समजतात मंगलाताईंच्या वॉर्डात झालं नाही मग कुठं चुकतयं हे जर आपण शोधण्याचा प्रयत्न केला आणि त्याची दुरुस्ती जर आपण केली तर निश्चितपण आपल्याला याठिकाणी यश मिळणार आहे. आणि त्याच्या बरोबर एक विषय महत्वाचा होता आज आपण ६५० कोटीच्या योजनेला या सभागृहात मा.महापौर यांनी मंजुरी पण दिली आहे. कारण त्यांचा तुमच्यावर विश्वास आहे. परंतु आयुक्त साहेब,तुम्ही एक राऊंड मारा त्यामध्ये आपल्या शहरातील ज्या नद्या आहेत त्या नद्यांमध्ये येणारं नाल्याचं पाणी हे डायरेक्ट सोडले जात आहे.आज आमच्या प्रभागामध्ये दापोडी,फुगेवाडी,कासारवाडी हे पूर्ण पवना नदीच्या कडेने राहणारी माणसं आहेत याठिकाणच्या बातम्या रोज पेपरला छापतात आम्ही नगरसेवकांनी काय करायचं मागच्या दोन वर्षामध्ये माझ्या प्रभागातील जलपर्णी काढण्याचं काम सुध्दा केलं आहे. पण हे काम एक दिवसात काढून होत नाही. मा.महापौर,याठिकाणी ज्यावेळेस आयुक्त श्रीकर परदेशी होते मला वाटतं त्यांच्याकडे बसुन ४/५ वेळेस व्हीडीओ रेकॉर्डींग करुन त्याची सीडी तयार केली होती. साधारणपणे ८ जुनला पाऊस पडला आणि ५/६ तास जलपर्णी वाहण्याचं काम चालू होतं.मग ज्या माणसांनी जलपर्णी काढण्याचं काम घेतलं होतं त्या ठेकेदाराचं काय ? आमच्या प्रभागातील नागरीकांनी आम्हांला निवडुन देवुन या सभागृहात पाठवलं आणि रोज संध्याकाळी ५ वाजले की, किमान ५० फोन तरी आम्हांला घ्यावे लागतात. ताई, हे मच्छर बघा नां,मच्छर बघा नां, असे म्हणत असतात. मग या जलपर्णीवर आपल्याकडनं प्रक्रिया का होत नाही. म्हणजे आज आपण इथं इतक्या मोठया गप्पा मारतोय की, आम्ही या शहराला चांगल पाणी देणार पण याचा रिझल्ट मिळाला पाहिजे. हे निश्चित चांगलं आहे.या विषयावर टिका करण्याचं कारण पण नाही. त्याच बरोबर आपण ज्या मैलाशुध्दीकरणावरती कोटयावधी रु.खर्च करतो त्याच्यावर आपण काय प्रोसेस करतो हे आजही या सभागृहात अनेक नगरसेवक बोलले असतील की,अमक्या ठिकाणी नदीला पाणी जातयं हे आम्ही अनेकवेळा याठिकाणी बोललो आहे. परंतु त्या बोलण्यावरती इम्पलीमेंट का होत नाही. मा.महापौर साहेब,तुम्हांला विनंती आहे की,आज तुम्ही कमिशनर साहेबांना सांगून टाका की, पुढच्या जी.बी.ला येताना एक सुध्दा ड्रेनेजची लाईन नदीला नसली पाहिजे. मी जर नगरसेवक असेल तर या शहराच्या दृष्टीने महत्वाची कामं केली पाहिजेत. मी हे सगळया पुराव्यानिशी दाखवते की,कोणती ड्रेनेज लाईन कोणत्या ठिकाणी जाऊन नदीला मिळते. आणि त्याच्यावरती आपण काम केलं पाहिजे. त्यामुळे सगळयात महत्वाचा मुद्या आहे की, जलपर्णी जी आहे ती आमच्या शहरातीलच आहे. किमान माझ्या प्रभागातील जलपर्णी ही काढूनच न्या नाही तर आम्हांला सांगावं आम्ही चारही नगरसेवक उद्यापासून कामाला लागतो.आणि रोज तुम्हांला फोटो टाकतो साहेब,आज एवढं काम झालं, तेवढं झालं,एवढं स्केअरफुट काम झालं, एवढं स्केअरमीटर काम झालं तसं असेल तर आम्हांला सांगा. साहेब,अत्यंत वाईट अवस्था आहे. माझी जशी अवस्था आहे तशीच माईची पण आहे. अशा ठिकाणी आयुक्त

साहेब,नागरिकांशी तोंड देणं अजिबात सोपं नाही. याठिकाणी मला दोन मुद्यांवर चर्चा करावयाची होती एक एसटीपी आणि जलपर्णीचा विषय असेल, एसटीपीतून जे पाणी बाहेर पडतं त्याच्यावर सुध्दा आपण अभ्यास करावा. आपण म्हणतो एसटीपीतून इतकं,इतकं एमएलडी पाणी बाहेर पडतं ख-या अर्थानं तेवढं पाणी बाहेर पडतं का? काही ठिकाणी जाळी लावून पाणी सोडून दिलेलं आहे. या सगळया विषयाचा आयुक्त साहेब आपण अभ्यास करावा. अशी मी विनंती करते. आणि माई,पुढच्या ८ दिवसामध्ये माझं लेखी पत्र तयार आहे ते तुमच्यापर्यंत उद्यापर्यंत पोहचेल त्यामुळे याठिकाणी ठोस निर्णय घेण्याची वेळ आलेली आहे. कारण कोरोना काळात आमच्या नागरीकांनी दु:ख सहन केलं आहे. मी या सभागृहात आले त्यावेळेस तिथं अजितदादा होते,माई होते आणि आम्ही ३/४ जण होतो त्यावेळेस ते मला म्हणाले की,तुम्हांला सभागृहात जाता येणार नाही. मला चक्क फिल झालं तुम्ही सगळयांना सांगा एका बेंचवर दोन,दोन सदस्यांनी बसावे हा तुमचा आदेश असेल तर तो आम्ही मान्य करणार आहे. पण ज्या हेतूने आम्ही लोकशाहीच्या मंचावर आलो त्या हेतूलाच तुम्ही हरताळ फासताय,आम्हांला धक्काबुक्की झाली आहे. हे योग्य आहे का? मा.महापौर साहेब, आम्हांला या शहराचे प्रश्न सभागाहात मांडायचे होते. आणि तुम्ही सिक्युरिटींना सांगितलं की, एवढयाच लोकांना आत सोडा असं कसं काय करता. हे ८ लोक तर येतीलच पण त्याच्या बरोबर ५० लोक बसण्याची जी व्यवस्था आहे तेथून पुढच्यांना प्रवेश देवु नका. तुम्ही म्हणताय की,८ लोक तर तुम्ही तुमची यंत्रणा बघा त्या यंत्रणेतून निम्मा आवाज गायब होतो. मी इथं समोर बसुन तुम्हांला हात केला तर तुम्ही माझ्याकडे बघत नव्हता. इथं आमच्या ज्या भावना आहेत त्या तुमच्या पर्यंत पोहोचवण्याचं काम आम्हांला करायचं असतं मा.महापौर साहेब,आमची तुम्हांला विनंती आहे की, या प्रकल्पांवर आपण ख-या अर्थांनी काम करावं धन्यवाद.

**मा.संदीप वाघेरे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह धन्यवाद म.महापौर साहेब, रिसायकलींग वॉटर युज हा विषय २०१८ सालच्या जी.बी.ला ऑक्टोबर मध्ये ज्यावेळेस पाणीपुरवठयाचा विषय होता त्यावेळेला मी बोललो होतो. आणि आयुक्तांनी तो विषय मान्य केला. आता मला कुलकर्णी साहेबांना विचारायचं आहे की, आपल्याकडे जल ३१२ एमएलडी होतं म्हणजे कुलकर्णी साहेबांच्या रिपोर्टप्रमाणेच,स्काडाप्रमाणे कुलकर्णी साहेब आहेत का? कुलकर्णी साहेबांनी याठिकाणी प्रेझेंटेशन द्यावं की,आपण जे ६५० कोटी रु.खर्च करणार आहे रिसायकलींग युजसाठी आज आपण हे पाणी कंन्सल ट्रिटमेंट करुन करणार आहे का? सेकंडरी करुन परत रद्य करणार आहे. कारण की,१० एमएलडी डेअरीफार्मला पाण्याचा प्रकल्प बंद झाला.आणि आता आपण सांगताय की,कासारवाडीला ७५ एमएलडी एसटीपी मध्ये ट्रिट करतोय. त्याची कॅपॅसिटी १२० एमएलडी आहे. आता ते ७५ एमएलडी ट्रिट केलेलं पाणी कुठं जातयं. आता शासनाची सांडपाण्याची योजना आहे याचं जे आपण नियोजन केलेलं आहे १०० कि.मी.पर्यंत

सुध्दा आपण शेतीसाठी पाणीपुरवठा करु शकतो, एमआयडीसीला करु शकतो. बाकीच्या याच्यासाठी सुध्दा वापरु शकतो. त्याच्यानंतर आपण सांडपाण्यावर प्रक्रीया करणेकामी संस्थेकडुन मार्गदर्शन घेतलेलं आहे. आणि आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये महापालिकेच्या ४३३ मिळकती आहेत. त्याच्यापैकी ४० उद्याने आहेत, २०८ खाजगी शाळा आहेत. आणि रुग्णालये आहेत. आता मंगलाताईंनी मगाशी सांगितलं त्यांच्या प्रभागामध्ये आपण दिड कोटी रु.खर्च केला एवढा खर्च करुनही ती लाईन दिड दिवस सुध्दा चालली नाही. या टेंडरसाठी आपल्याकडे ६ ठेकेदार आलेले आहेत. म्हणजे ४० टक्के मनपा, ६० टक्के ठेकेदार करणार आहे. आज मला सांगा की,६ ठेकेदार आलेले आहेत या ठेकेदारापैकी एक पायलट प्रोजेक्ट आपण राबवून बघितला पाहिजे. ६ च्या ६ ठिकाणी आपण करणार आणि ये,रे माझ्या मागच्या आणि दुसरी गोष्ट गेल्यावर्षी मार्च मध्येच मी नदीसुधार वरती ५ प्रश्न विचारले होते. त्यावेळेला कुलकर्णींनी सभागृहामध्ये काही ठराविक उत्तरं दिली. त्याच्यानंतर तुमची १२/१०/२०२० ला आयुक्तांच्या दालनामध्ये पहिली मिटींग झाली. त्याच्यामध्ये सभासदांना सांगितलं गेलं की, त्याच्यामध्ये माजी पक्षनेता एकनाथ पवार, जेष्ठ नेते भाऊसाहेब भोईर असतील प्रत्येक पक्षाचे नगरसेवक,पदाधिकारी या नदीसुधारच्या बाबतीत घ्या हा काही तुमच्या एकटयाचा विषय नाही. महापौर,उपमहापौर,स्थायी समितीचे चेअरमन आहेत एवढे ठराविक लोकं घेतले त्याच्यामध्ये कुठल्याही पक्षाचा गटनेता नाही. नगरसेवक नाहीत.आयुक्त साहेब,तुम्ही याठिकाणी नवीन आला आहात पण ज्यावेळी आम्ही या महापालिकेत प्रवेश केला २०१७ ला त्यावेळेस पहिल्या जी.बी.ला नितीन अप्पा महापौर होते अजेंडयावर दोन विषय होते स्मार्ट सिटी आणि पर्यावरण त्यावेळेस पासून मी पर्यावरणावर बोलत होतो म्हणजे आल्या दिवसापासून नदी सुधारबाबतीत माझे वैयक्तीक प्रयत्न चालू आहेत. म्हणजे एकच टेंडर आलं होतं ते ओपन करायला लावलं नंतर त्यांनी सर्व्हे केला,त्यानंतर डीपीआर केला त्याच्यानंतर एनव्हायरमेंट परमीशन त्या राहिलेल्या आहेत. आज मला सांगा साहेब,आपण हे सगळं नदीसुधार योजनेसाठी करतोय साधारणपणे आपण २७५७ कोटी रु.चे हे बजेट कुलकर्णी साहेबांनी बनवलेलं आहे. इंद्रायणी,पवना आणि मुळा नदीसाठी बनवलेलं आहे. मुळा नदीचा ७ कि.मी.चा भाग आहे म्हणजे आपण पुणे महापालिकेला पैसे देणार आहोत. नदी सुधार प्रकल्पासाठी आयुक्त साहेब,निधी अपुर्ण होता म्हणुन त्यावेळेला मी आयुक्तांना सूचना केली होती की,आपली महापालिका ही ए ग्रेड मध्ये आहे आपण २ हजार कोटीचे बाँड काढू आणि हे बाँड लगेच जातील आणि आपली नदी सुधार लगेच करता येतील. तर आयुक्तांनी माझे ऐकुण २०० कोटीचे बाँड काढले,आणि बाकीचे आपण टप्याटप्याने काढू असे सांगितले. टप्याटप्याने काढू असं म्हणल्यानंतर ती पुढची प्रोसेस चालू झाली आयुक्त साहेब मला सांगायला थोडसं वाईट वाटतं की,सीएसआर हा सगळयांनी ऐकला असेल पण सीईआर म्हणजे कॉर्पोरेट एनव्हायरमेंट टॅक्स असा एक राज्य शासनाने आणि केंद्र शासनाने जी.आर.काढलेला आहे. तो जी.आर.आपल्या महापालिकेत दोन वर्ष नव्हता. मी एकदा मुंबईला मंत्रालयात एनव्हायरमेंटसाठी

माझ्या वैयक्तीक केससाठी गेलो होतो तो जी.आर.तिथं मला भेटला आणि तो मी कुलकर्णीला दिला आणि त्यांना सांगितल की,सीईआर म्हणजे कॉर्पोरेट एनव्हायरमेंट टॅक्स म्हणजे १०० कोटीचा प्रोजेक्ट असेल तर २ टक्का,५०० कोटीचा प्रोजेक्ट असेल तर १.५ टक्का,१ हजार कोटीचा प्रकल्प असेल तर १ टक्का म्हणजे प्रत्येक विकसक ए महापालिका सीईआर म्हणुन जमा करु त्याच एक पत्र कलेक्टर यांना दिलं आणि एक पत्र वैयक्तीक आयुक्त साहेबांना दिलं होतं हे जे पैसे मी पण बांधकाम व्यवसायिकच आहे बाकीचे जे बिल्डर बांधकाम व्यवसायिक आहेत ते कलेक्टरकडे भरतायत तर आपल्या महापालिकेचे डेव्हलपमेंट होत आहे आपले गोष्टी आहेत, आपले पैसे आहेत आपल्या एनव्हारयरमेंटसाठी वापरता येतील त्या अनुषंगाने कुलकर्णी साहेबांनी आजपर्यंत कुठलेही पाऊल उचलेले नाही. या शहरात काय,काय गोष्टी करणे गरजेचे आहे हे आम्हांला कळतंय मा.महापौर साहेब,मला या सभागृहात येऊन फक्त ४ वर्ष झाले आहेत पण तुम्हांला याठिकाणी २३ वर्ष झाली आहेत पण मी आल्यापासून या नदीसुधार योजनेच्या विषयावर बोलतो आहे.म्हणजे आमची कुठंतरी पोटतिडकी आहे. आणि तुम्ही जी कमिटी रद्य केली आहे. म्हणजे याठिकाणी सभागृहाला थोडसं वेगळं वाटेल मला पर्यावरणाचा जरी सदस्य केला असता नां तरी आनंदी राहीलो असतो. मा.महापौर साहेब,या विषयावर प्रॉपर आणि प्रॅक्टीकल काम करणे गरजेचं आहे. आज या कुलकर्णी साहेबांनी २५०० कोटीचं नदी सुधार योजनेचं बजेट बनवले आहे. आयुक्त साहेब,यांनी १४८ कोटीचं ड्रेनेजलाईनसाठी टेंडर काढलं इंद्रायणी आणि पवना नदी आयुक्त साहेब,याचा ४ कोटी ८० लाख रु.पर कि.मी.खर्च आहे. आणि तेच काम अमृत योजनेचं मंजुर नाही तरी पण कासारवाडी एसटीपी पासून भाटनगरपर्यंत साधारणपणे ६.५ कि.मी.ते ७ कि.मी. पडतोय त्याचा रेट पर कि.मी. १ कोटी २० लाख ते १ कोटी ३० लाख पडतोय. डेअरी फार्म मध्ये दिड ते पावणे दोन कि.मी. मी पण ते काम घेउन केलं. म्हणजे कुठं तरी इफेक्स लावायचे होते. आज चार वर्ष झालं मी ती माहिती चेक करतोय ते काम रडत पडत चाललेलं आहे. एक्झीक्युटीव्ह कोण आहे,काम थांबवा आतापर्यंत या ड्रेनेजच्या कामावरती ४ वर्षामध्ये ४ एक्झीक्युटीव्ह झालेले आहेत. अजुनपर्यंत ते काम पूर्ण झालेलं नाही. आणि यांनी १४८ कोटीचं काम काढलं मी यांना म्हणलं तुम्ही परमीशन न घेता आणि बाकीच्या गोष्टी नाहीत तरी तुम्ही काम लगेच कसं करता आजपर्यंत याच्या आगोदरही ब-याचवेळेला ड्रेनेजलाईन टाकुन झालेल्या आहेत. आणि त्या सगळया लोकांनी फोडलेल्या आहेत. मी निवडुन आल्या,आल्या १५ दिवसात कुलकर्णी साहेबांना सांगितलं की,हे सगळं पाणी नदीमध्ये जात आहे. त्या ठेकेदारावरती काय कारवाई केलेली आहे. काही नाही, म्हणजे नदी सुधार, रिसायकलींग वॉटर हे २०१८ मध्ये विषय मांडलेले होते. ४ वर्षापासून यासाठी प्रयत्न करतोय आजपर्यंत हे प्रोजेक्ट ४ पावलं सुध्दा पुढं गेलेलं नाही. फक्त कागदी घोडे नाचवले गेलेले आहेत. म्हणजे कुलकर्णी साहेब,त्या जागेवरती आले आणि ती जागा त्यांनी रोखून ठेवलेली आहे. आयुक्त साहेब,तुम्ही जर आता इंद्रायणी आणि पवना नदीत बघितलं तर इतकी जलपर्णी झालेली आहे. साहेब,ज्यांनी जलपर्णी काढण्याचा ठेका हा त्या ठेकेदाराने अंगावरती

घ्यायला नको होता आयुक्त म्हणुन पिठासिन अधिकारी म्हणुन तुमचा मानसन्मान आहे. आणि हा मान तुम्ही आमचा राखला पाहिजे आणि तुमचा आम्ही राखला पाहिजे.आयुक्त साहेब,तुम्ही आल्या,आल्या म्हणले की,ज्यादिवशी तुम्ही चार्ज घेतला त्यादिवशी म्हणले की,हे शहर मी आंतरराष्ट्रीय दर्जाचं करणार आहे. साहेब,तुमच्यासाठी ही एकदम सुवर्णसंधी आहे नदी सुधार प्रोजेक्ट तुम्ही राबवा,मार्गाला लावा जी परमीशन राहिलेली आहे. आमच्या प्रोजेक्टला एनव्हायरमेंटची एनओसी घ्यायची झाली तर ४ ते ६ महिने लागतात. असा कुठला मोठा प्रोजेक्ट आहे तुम्हांला आम्ही सर्व्हे करुन दिला. सिटी सर्व्हेकडुन तुम्हांला जागेची मोजणी करुन दिली. डीमार्केशन झालं, तिथं तुमचं प्रकरण २ वर्ष झालं अडकलयं ते अजुन पुढंही सरकलेलं नाही. बरं तुमच्याकडं निधी नाही म्हणुन बाँड काढायला लावले आहेत. २०० कोटी बाँडसची तरतुद केली आहे. दोन वर्षापुर्वी मला आमच्याच नेत्यांचा फोन आला की, हे बाँडस् कॅन्सल करा आपण केंद्राकडनं पैसे मागवु मी त्यावेळेला सांगितलं की, या प्रोजेक्टसाठी मी गेली दिड,दोन वर्ष झालं फॉलोप करतोय मी आयुक्तांना पत्र देणार नाही,तुम्ही तुमच्या नगरसेवकांना सांगा नाही तर तुम्ही तुमचं वैयक्तीक पत्र द्यां परंतु मला  नदी सुधार प्रकल्प झाला पाहिजे आणि पिंपरी चिंचवडचं पर्यावरण सुधारलं पाहिजे. अशा पध्दतीने मी याठिकाणी काम करतोय आणि प्रत्येक नगरसेवक या शहराबद्दल पोटतिडकीने बोलतोय. इथे कोण कुणाचे वैयक्तीक विषय घेवुन येत नाही. मा.महापौर साहेब,आज तुम्ही या सभागृहात ९ पदाधिकारी यांना येऊ द्या आणि बाकीच्यांना येऊ देवु नका बरं आम्हाला कोणाला मेसेज पण नाही. हे सगळं चुकीचं आहे गेली चार वर्ष चाललं आहे अजुन एखादं वर्ष चालेल पण त्याच्यानंतर काय होईल ते मी ही सांगु शकत नाही आणि तुम्हीही सांगु शकत नाही. एवढं बोलून थांबतो जयहिंद,जयमहाराष्ट्र.

**मा.राहुल कलाटे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह अतिशय चांगला विषय असताना यावर चर्चा करुन विषय मंजुर करायला पाहिजे होता. याला कोणाचाच विरोध नव्हता. परंतु आपण मागचे ४/५ वर्ष पाहिले असेल जशी जशी सत्ता आली तशी,तशी बरीच स्वप्न दाखवली गेली आहेत. नदी सुधार, वॉटर रिसायकलींग होणार, शहर चांगल होणार आणि हा पण एक पर्यावरणाचाच एक भाग होता आणि त्याच्यावर आपण कोटयावधी रु.ची उधळपट्टी करुन या शहरातील नागरिकांच्या पैशाची केलेली आहे. संदीपनी सांगितलं आहे की,आयुक्तांना ही सुवर्णसंधी आहे म्हणजे कुठं तरी भारतीय जनता पार्टीचे लोकही मान्य करायला लागले आहेत की, गेली ५ वर्ष आपली कुठलीही काम झालेली नाहीत. असं आता यांना जाणवतयं माई,अतिशय चांगला प्रकल्प असताना खरंतर याच्यावर ऊहापोह झालाच पाहिजे काही सूचना घेतल्या पाहिजेत. सल्लागारांनी  डॉकेट केलं म्हणजे त्यात सगळचं  आंतर्भाव झाला असं होत  नाही. आता मंगलाताईंनी सांगितलं की, माझ्या प्रभागात दिड कोटीचा प्रकल्प झाला आणि तो फेल झाला. म्हणजे प्रत्येक नगरसेवकाला आपआपल्या प्रभागात काय चालू आहे हे माहिती आहे. तसं पहायला गेलं तर याच्यामध्ये तुम्ही तीन भाग करताय चिखलीला २० एमएलडीचा, च-होलीला ५ एमएलडी आणि कासारवाडी येथून ७५ एमएलडी असे

एकुण १०० एमएलडी पाणी शुध्द करणेसाठीचा प्रकल्प करीत आहात हे करीत असताना तुम्ही जुने एसटीपी जे आहेत त्यात हा प्रोजेक्ट तुम्ही करीत आहात. आयुक्त साहेब,माझी आपल्याला विनंती आहे की,आपण याचा व्यवस्थित अभ्यास करावा. कारण आम्ही तर खुप स्वप्न पाहिलेली होती. मला वाटतं १०० /१०० कोटीच्या दोन नदीकडनं पाईपलाईन सुरु आहेत. ४ वर्षापुर्वी नद्यांच प्रेझेंटेशन झालेलं होत त्यासाठी आम्हांला पण बोलावल होतं या महापालिकेत पवना आणि इंद्रायणी नदीचं झालं आम्हाला भासच होत होता की, आपल्या नद्या चांगल्या झाल्या आहेत आपण नदीकडे सायकल ट्रॅकवर फिरतोय असा कधी,कधी भास होतोय. नंतर उठल्यावर समजतयं की हे स्वप्न आहे. माई,हे स्वप्न बघण्याचं काम कुठंतरी थांबली पाहिजेत. आणि अँक्च्युएल कामाकडे फोकस केला पाहिजे. आमची एकच विनंती होती की, तुम्ही विषय मंजुर करणार होताच याठिकाणी डेव्हलपमेंटच्या बाबतीत कोणाचाच विरोध नाही. पण हे होत असताना ६२८ कोटीचा प्रकल्प ६५० कोटीचा का झाला याची माहिती दिली पाहिजे की,ज्यावेळेस या विषय ठेवला त्यावेळेस याच्यामध्ये ही कामे नव्हती,त्या कामाचा अंतर्भाव केली आहेत आयुक्त साहेब, सीएसआर याच्यामध्ये सुध्दा आपल्याला थोडा बदल करावा लागेल. बिल्डर हा कलेक्टरकडे पैसे देतो आणि कलेक्टर आपल्याला पैसे देताना ते म्हणतात की,आम्ही एसटीपीला देणार,गार्डनला देणार, टॉयलेट ब्लॉकला देणार असे काही त्यांचे नॉर्म्स आहेत. हे करीत असताना खुप सायकल होती. आणि हे करीत असताना टीडीआर आता महापालिकाच देणार आहे. याच्यामध्ये ५० टक्के शासनाला जाणार आणि ५० टक्के महापालिकेला जाणार हे होत असताना माझी आपल्याला विनंती आहे की,या शहराच्या नागरीकांच्या डेव्लपमेंटसाठी जे पैसे द्यायचे आहेत. या महापालिकेतच एक सीएसआर हेड ओपन करा आणि गर्व्हेमेंटला विनंती करा की, हे जर पैसे या हेडवर आले तर त्याचा वापर आपल्याला करता येईल. आम्ही आता प्रत्येक भागाला एक एसटीपी बसवण्याची मागणी करतोय प्रत्येक भागाला एक एसटीपी बसवला तर ऍटलीस्ट जे घाण पाणी येतयं साहेब,आपण जर का नदीत गेलो तर त्याठिकाणी पाय सुध्दा ठेवु शकत नाही. जलपर्णी तर अशी आहे की,एखादा माणुस त्याच्यावरुन चालू शकतो त्याला खाली पडल्यावर समजेल की,ही जलपर्णी आहे. ही परिस्थिती आहे ही गार्डन आहे की,जलपर्णी हे समजत नाही. आमचे सन्मा.सदस्यांनी जलपर्णी घेवुन आले ते या सभागृहात घेवुन आले नाही ठिक आहे पण त्यांची पहिल्यापासूनची इच्छा आहे की, गेटसमोर कोणत्या तरी अधिका-यांनी यावं कुलकर्णी साहेबांना फोन केला तर ते म्हणले की,डॉ.रॉय साहेबांकडे आहे. रॉय सरांना फोन केला तर त्यांनी तो उचलला नाही. बेंडाळे साहेब हे नंतर आले त्यांचा कोणाला त्रास देण्याचा हेतू नव्हता त्यांची जी भावना आहे ती या सभागृहाला कळावी आणि या सभागृहाच्या माध्यमातून या शहराच्या नागरीकांना कळावी. हे सगळं एकमेकाच्या रिलेटेड आहे. मग तो एसटीपी असेल, वॉटर पुर्नवापर प्रकल्प असेल,जलपर्णी असेल हे करीत असताना याच्यामध्ये तुम्हांल दोन/तीन गोष्टी साध्य करायच्या आहेत.आज अशी परिस्थिती आहे की,मी गेल्या ५ वर्षापासून या सभागृहात ओरडतोय की,जसं तुम्ही सेक्टर २३ ला वॉटर

फिल्ट्रेशन प्लँन्ट तयार केला आहे तसाच आमच्या इथं एक प्लँन्ट कचराडेपो साठी जी जागा आरक्षित आहे त्या जागेमध्ये करावा. कारण की,आमच्या येथून तुम्ही पाणी नेताय ते पाणी आम्हांला वाकडला २८ कि.मी.नी येतो. वाकड आणि पुनावळेला आणि आमच्यातल्या ब-याचशा सोसायटया या टँकरवर चालतात. आणि हे होत असताना आपण खुप स्वप्न पाहिलेली आहेत. आम्ही तर म्हणतो की,याच्यामधुन तुम्ही काही तरी चांगला मार्ग काढा एवढे मोठ मोठे प्रोजेक्टचा तुम्ही नीट अभ्यास करा, आणि काय होतयं कुठं तरी भारतीय जनता पार्टीच्या पदाधिका-यांना याच्यामधुन काय साधायचं आहे. कोणतेही प्रोजेक्ट बघा असेच आहेत आणि आता हा प्लँन्ट १५ वर्ष आता आपण पुढच्या टर्मला येतो की नाही हे कळत नाही कारण कोणताही प्रोजेक्ट पाहिला तर १०/१० वर्ष ठेकेदाराला दिलेले आहेत. तुम्ही जुन्या चुका केल्या असतील तर त्या सुधरा,तुम्ही नाही सुधारल्यातर पुढच्या वर्षी जे कोणी सत्तेत येतील ते ठरवतील आणि तुम्ही नाही ठरवलं तर या शहरातील नागरीक सुज्ञ आहेत ते ठरवतील. आयुक्त साहेब,६५४ कोटी रुपये देताना तुम्ही काय करणार आहे.तुम्ही काम चालू असताना त्याला पैसे देणार आणि तो प्लँन्ट उभा करायला दोन वर्ष तरी लागणार हे जे काही पैसे देणार आहात ६० टक्के ते ७ वर्षामध्ये डिव्हायईड करुन द्या. म्हणजे कुठंतरी असं व्हायला नको की,या पाण्याच्या नावाखाली शहरातील जनतेच्या पैशाची लुट करायची. साहेब,माझ्याकडे कच-याच्या ठेकेदाराचं रेकॉर्डींग आहे त्या ठेकेदाराला मी ज्यावेळेस पकडलं तर तो ठेकेदारा प्रायव्हेट ठिकाणी कचरा विकत घेत होता त्याच्यानंतर त्याच्यावर एफआयआर दाखल झाला त्यानंतर तो काय म्हणतो की,कोरोना काळात कच-याचं वजन कमी झालं आहे आणि ते वजन मला वाढवायचं आहे आणि मला वरुन आदेश आहेत की,वजन वाढवण्याचे म्हणुन मी कर्मशियल कचरा भरतोय आणि मोशीला घेवुन जाणार आहे. आपण कच-याचे वजनावर पैसे देतो जेवढं वजन भरेल तेवढं बिल आपण त्याला देतो. त्यासाठी सुध्दा मी या सभागृहाला २/४ वेळा विनंती केली होती की, कच-याचा जो फॉर्म्युला आहे तो चुकला आहे. खरंतर पहिल्या स्थायी समितीच्या चेअरमनने केला दुस-या चेअरमनने त्याची फक्त दिशाभूल केली तो बदलत असताना उलट जास्त पैसे दिले. हे पैसे या शहरातील जनतेचा पैसा आहे हा प्रकल्प तुम्ही वाढवा आता संदीपनी सांगितलं की, हे पाणी तुम्ही एमआयडीसी आणि शेतीला देणार आहात यामध्ये आपण एमआयडीसीचा सल्ला घेतला का, जर आम्ही असा,असा प्रोजेक्ट बनवला तर तुम्ही हे पाणी घेणार आहात का? आज माझ्या माहिती प्रमाणे एमआयडीसीच्या हद्यीत असणा-याना त्यांच्याकडे जादा पाणी आहे. त्यांच्याकडे एक्सेस पाणी असताना ते आपल्याकडनं पाणी घेणार आहेत का? या गोष्टीची आपण शहानिशा केली का? शेती, आता तुमच्याकडे शेती कुठं राहीली आहे. म्हणजे ही पाईपलाईन १०० कि.मी. तुम्ही कुठे नेणार आहात. साहेब,हे सगळं करीत असताना कुठं तरी असं व्हायला नको की, खरी गरज तर या शहरातील नागरीकांची आहे. ती गरज भागवत असताना आपण कुठे तरी एक ठेकेदार पोसतोय मला तर वाटतयं याच्यामध्ये अदानी,अंबानी

यायला बसलेत. भरोसा नाही नां, आता तुम्ही ४५० कोटी,५०० कोटीचे टेंडर आहेत. या शहरात काम करीत असताना ज्या पध्दतीने काम चालू आहेत या कामामध्ये शंका घ्यायला जागा आहे. आता माई,तुम्ही मला एक सांगा आपण एक कमिटी केली त्या कमिटीमध्ये संदीपनी आताच सांगितलं आहे की, पवना,इंद्रायणी व मुळा नदीवरील पुर्नजीवन प्रकल्पाअंतर्गत विविध कामांची अंमलबजावणी करण्यासाठी मा.नगरसेवकांची समिती गठीत करणे. समितीमध्ये कोण १.मा.महापौर- अध्यक्ष, २.उपमहापौर,३.स्थायी समिती चेअरमन, ४.सभागृह नेते,५.विरोधी पक्षनेते,आणि ६. आयुक्त, ७. भावसार विजयचे राजे भावसार,दिशा फाऊंडेशनचे धनंजय शेजवळ, सुदर्शन तांदळे, संस्कार ग्रुपचे मोहन गायकवाड, अविरत निलेश लोंढे मला वाटतं हे माईच्या अधिकारात ही कमिटी नेमलेली आहे. आणि आयुक्त साहेब, या डॉकेटवर तुमचीच सही आहे. ५.८.२०२० रोजी ही कमिटी नेमलेली आहे. ही कमिटी करीत असताना या सभागृहातील सदस्य कसे निवडले आहेत. ज्यांनी या सभागृहात २/३ टर्म काढलेले आहेत अशी मंडळी पण यामध्ये घ्या नां. मा.महापौर साहेब,तुम्ही याकडं लक्ष द्या संदीप जरी पोटतिडकीने बोलला आहे खरंतर त्याच्यावर पण अन्यायच झालेला आहे. संदीप तु,महापौर,स्थायी समिती चेअरमनसाठी प्रयत्न करीत होता हे सांगायचं ना आम्हांला आपण सगळे मिळून पक्षनेत्याकडे गेलो असतो. असो,याच्यामागची सगळयांची एकच भावना आहे की, हे काम चांगल आहे आणि हे काम करीत असताना भ्रष्टाचाराला कुठे वाव राहीला नाही पाहिजे. आपण याची व्यवस्थित माहिती घ्या. चांगल्या कामासाठी विरोध करणे असा कोणाचाही उद्देश नाही.काम करीत असताना या कामाच्या माध्यमातून शहरातील जनतेचा पाण्याचा प्रश्न अत्यंत ज्वलंत प्रश्न आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मागचे दोन निवडणुका तर पाण्यावरच झाले आमच्याकडच्या लोकांनी तर नो वॉटर नो व्होटींग असा निर्णय घेतला होता. म्हणजे कुठं तरी अशा दृष्टीने या शहराच्या वाटचाल सुरु आहे. ही वाटचाल सुरु असताना आपल्यासारख्या अधिका-यांनी आणि महापौरांनी,सर्वांनीच याच्यामध्ये लक्ष दिलं पाहिजे अशी मी सभागृहाच्या वतीने विनंती करतो आणि हे करत असताना माई,आपण देखील हा विषय घाईने मंजुर करण्याची काहीच गरज नव्हती. या विषयाला विरोध कोणाचाच नव्हता,विरोध हा सभागृहात येऊ न देण्याला होता. त्याच्यामध्ये तुम्ही हा विषय घाई,घाईने मंजुर केला याठिकाणी संजय कुलकर्णी आले असतील ते प्रेझेंटेशन पण देतील. माई,पुढच्या जी.बी.ला आपण एका सिटवर दोघेजण सदस्य बसतील अशा सदस्यांची नांवे प्रत्येक पक्षांकडन घ्या. तुम्ही ठरवा कोण सिनियर आहेत ते घ्या. आताची जी पध्दत आहे सदस्य याठिकाणी डायरेक्ट आल्यानंतर सिक्युरिटी त्यांना आत मध्ये सोडणार नाही. सगळयांना आपल्याकडनं अपेक्षा आहे की, माई,आई,या सगळया नात्याने आपण या सभागृहांकडे पहावं आणि हे करीत असताना डेमोक्रॅटीक महापौर हा कसा असतो हे आपण या सभागृहाला दाखवून दिलं पाहिजे. आयुक्त साहेब,आपण या प्रकल्पाची माहिती घेवुन याच प्रेझेंटेशन या सभागृहाला दाखवावं अशी मी विनंती करतो.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह माझ्या आधी सर्वांनीच दिलगीरी व्यक्त केली किंवा खंत व्यक्त केली असे म्हणले तरी चालेल.ज्या पध्दतीने आज या सभागृहात घेण्यासाठी सदस्यांना जो मज्जाव केला आणि ज्या पध्दतीने हा विषय मंजुर झाला मा.महापौर साहेब,तुम्ही येथून मागे ज्या पक्षातून आला आहात या पक्षामध्ये त्या पक्षाचा तुम्ही काळ पण आठवा भारतीय जनता पक्षाचे फक्त तीन नगरसेवक असायचे, शिवसेनेचे १०/१२ असायचे बाकीचे काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे असायचे परंतु त्यावेळेस सुध्दा आम्ही सर्वांनाच बोलू द्यायचे सर्वांना बोलण्याची संधी द्यायचे, टिका केली तर चालेल काही हरकत नाही पण हे लोकशाहीचे सभागृह आहे. आणि या लोकशाहीच्या सभागृहामध्ये बोलण्याचा अधिकार सर्वांनाच आहे. परंतु आज आपण बघा मगाशी मंगलाताई म्हणाल्या मला पण तेच सांगायचं आहे की,किमान तुमच्याकडनं आम्हाला अशी अपेक्षा नाही. नवीन आता जे सदस्य निवडुन आलेले आहेत ते म्हणु शकतात त्यांना खुप घाई आहे. कारण ते घाई,घाई मध्येच निवडुन आलेले आहेत. आणि त्यांना जायची पण घाई लागलेली आहे. म्हणुन कोटयावधी रुपयांचे विषय असतील त्यावर चर्चा करायची नाही,बजेट एवढं मोठं बजेट ५ मिनिटात मंजुर करायचं हा इतिहास फक्त भारतीय जनता पार्टीच करु शकते. आणि ते पण पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये आजही तुमच्या नगरसेवकाना विचारा दु:खी आहेत,दु:खी एवढा मोठा विषय,चांगला विषय असताना आम्ही ठरवलं विरोध करायचा तर काय करुन फायदा आहे का? तुमचं बहुमत आहे त्यामुळे तुम्ही विषय मंजुर करु शकता. परंतु असं काही तरी करायचं आणि विषय पटकन मंजुर करायचा कारण लोकांसमोर याची चर्चा व्हायला नको, वर्तमानपत्रात नांव खराब व्हायला जायला नको, शहरातील कचरा साफ होत नाही,लोकांना पाणी मिळत नाही याकडं तुमचं दुर्लक्ष आहे आणि अशा कोटयावधी रुपयांचे विषय २ मिनिटात कसे मंजुर करता हि किमया फक्त तुमच्या पक्षातच आहे. आणि म्हणुन आम्हांला दु:ख वाटतं की,तुमच्यासारख्या एक जुन्या जाणत्या सदस्य आहात तुम्ही स्थायी समितीचे अध्यक्ष म्हणुन काम केलं आहे,तुमचा स्वभाव अतिशय चांगला आहे हे सगळं असताना तुम्ही असं का वागता,एवढा मोठा विषय ६५४ कोटीचा आहे २ मिनिटात उपसूचना देवुन मंजुर करता. मा.महापौर साहेब,मला नामदेवरावांना पण विचारायचं आहे की,त्यांनी या विषयावर किती अभ्यास केला आहे. याचं उत्तर मला नामदेवरावांनी दिलं तरी आम्हांला चालणार आहे. आता याच्यामध्ये शब्द आहे **HAM, PPP** आता याच वर्णन करुन सांगा बरं पटपट आता आपण Hybrid Annuity Model कुठं करतो तर नॅशनल हायवेला करतो.पण गर्व्हेमेंटनी असं फॉम

केलेलं आहे की, PPP Model मध्ये करावं किंवा तुम्ही HAM मध्ये करावं.किंवा Public private partnership हे आपण PPP Model म्हणतो मग Public private partnership ज्यावेळेला असते That is why entity आणि दुस-या बाजुला आपण म्हणतो की, Legal Relationship Demand by of the Government आता Legal Relationship Demand by of the Government One entity pcmc & otherly entity is the private आणि आता हे दोघांनी मिळून जबाबदारीने काम करायचं आहे. खुप मोठी जबाबदारी आहे,खुप मोठं काम आहे. या शहराचा चेहरामोहरा बदलण्यासारखा हा निर्णय आहे. मग अशा परिस्थितीमध्ये एवढया घाईने निर्णय घेण्याच्या आधी जर तुम्ही लोकांना बोलू दिलं असतं आणि बोलताना त्यात आम्हांला काही सूचना करता आल्या असत्या काही प्रश्न विचारता आले असते तिथं तुमचं बिघडलं काय,इथं भारतीय जनता पार्टीचं बिघडलं कुठं, का बोलू देत नाही,का? चर्चा करु देत नाही आता आम्ही एवढं ओरडतोय नंतर तुम्ही आम्हांला सांगणार की,विषय मंजुर झाला आता बोलून काय फायदा आहे पण नागरीकांना कळू द्या,जनतेला कळू द्या कोणत्या पध्दतीने तुमची दादागिरी आहे तुम्ही सभागृह कशा पध्दतीने चालवता लोकशाही पध्दतीने सभागृह चालत नाही. पटपटपट उपसूचना द्यायची आणि विषय संपवायचा मंजुर करायचा सर्वांना बोलू द्या आज तुम्ही अनुभवी आहात मंगलाताईच्या ५ टर्म झाल्या आहेत, कोणाचे २ टर्म झालेत,कोणाचे ३ टर्म झालेत माझी स्वत:ची ६ वी टर्म आहे. अशा काही बाकीच्या अनुभवी सदस्यांनी काही चांगल्या सुचना केल्या असत्या तर काही प्रश्न विचारले असते तर त्यात काय बिघडलं असतं. बोलू न द्यायच्या मागचं कारण काय याच्यामध्ये भ्रष्टाचार आहे का? का फिक्सिंग झालं आहे. तसं सांगावं भारतीय जनता पार्टीनं फिक्सिंग केलं आहे. सगळयांना बोलू द्या नां आम्हांला काही प्रश्न मांडू द्या आम्ही पण लोकप्रतिनिधी आहोत ,निवडुन आलो आहोत आम्ही मागच्या दारानं आलो नाही. खुप पाडण्याचा प्रयत्न केला आम्हाला पण आलो नां निवडुन आम्ही मग अशा पध्दतीने सभागृह का चालवता मा.महापौर साहेब याच्यामध्ये मला अजित गव्हाणेंनी सांगितलं की, उपसूचना दिली गेली की,कर्मशियलवाल्याकडनं एवढे घ्यायचे, निवासीवाल्याकडनं एवढे घ्यायचे,एमआयडीसीकडनं एवढे घ्यायचे मा.महापौर साहेब,तुम्हांला चांगल माहिती आहे की,आपल्या शहरामध्ये किती एसटीपी कार्यान्वीत आहेत, किती चांगल्या पध्दतीने चालतात आज आपल्या नदीचं हालत काय आहे. गटार आहे,गटार याच्या पुर्वी जेंव्हा प्रभाकर वाघेरे अजितदादाकडे फाईल घेऊन जायचा आणि सांगायचा दादा माझं स्विमींग टँक मंजुर करा, माझं स्विमींग टँक

मंजुर करा, दादा म्हणायचे अरे,प्रभाकर तुझं घर तर नदीला लागुन आहे कशाला स्विमींग टँक करतो. सकाळी जात जा तुझा व्यायाम पण होईल. आज काय परिस्थिती आहे. बाजुला उभं राहता येत नाही. श्वास घेता येत नाही असं त्या नदीचं गटार झालं आहे. मग आपले एसटीपी किती चांगल काम करतात आणि आता आपण वॉटर रिसायकलींगचा प्रोजेक्ट केलेला आहे त्याचे आपण बारकावे बघायला नको का, आम्ही काय त्याला विरोध करतोय का, आमचा तर चांगल्या कामाला कधीच विरोध नाही. तुम्हांला फक्त घाई आहे निविदा काढण्याची,लवकर मंजुरी घेण्याची आणि सर्वात जास्त घाई आहे खरेदीची मा.आयुक्त साहेब,मला आपल्याला विनंती करायची आहे की, थोडसं विषयांतर होणार आहे की,ज्या गैरपध्दतीने अजित पवार अति.आयुक्त २ या महापालिकेमध्ये बसुन आहेत Additional commissioner 2 illegall sitting & holding the charge and in what capacity he is sitting who has given approval or Revenue Department has given approval,when he is told to be relieved within 15 days,how come and how dose he is sitting here.How are you putting it he has taken the charge there,he should be relieved immediately आणि त्या काळामध्ये कोटयावधी रुपयाचा भ्रष्टाचार झालेला आहे या महापालिकेमध्ये आणि विशेषत: विभागामध्ये,भांडार विभागामध्ये हार्डीकर साहेबांना ज्यावेळेस पत्र दिलं होतं त्या पत्रांमध्ये रेव्हीन्यु डिपार्टमेंटनी स्पष्ट सांगितलेल आहे की,त्यांना १५ दिवसामध्ये रिलीव्ह करा, मग त्यांना तुम्ही का थांबवताय आणि त्यांनी जेवढे निर्णय घेतलेले आहेत त्याला मी कोर्टामध्ये चॅलेंज केलेलं आहे. मा.महापौर साहेब व आयुक्त साहेब आपल्याला विनंती आहे की, एवढा मोठया विषय ज्या पध्दतीने मंजुर केलेला आहे तो चुकीच्या पध्दतीने मंजुर केलेला आहे. एमआयडीसी एक तर त्यांची जबाबदारी पाळत नाही एमआयडीसीचे जेवढे छोटे,छोटे कारखाने आहेत त्यांच पाणी डायरेक्ट नदीला मिळतयं यासंदर्भात अनेक मिटींग झाल्या,त्यांना अनेक वेळा सांगितलं की,तुम्ही तुमचं पाणी ट्रिट करण्याची प्रोव्हीजन करा, ते करत नाहीत, आपण त्याच्याबद्ल काही ठरवलं आहे का? या कामामध्ये ते घेतलं आहे का, शहराच्या बाहेर जी गावे आहेत त्यांच्याबद्दल काय केलं आहे. भविष्यामध्ये जी गावे आपण घेणार आहोत त्याबद्दल काही प्लँनिंग केलं आहे का? असे आमचे अनेक प्रश्न आहेत याच्यामध्ये मा.महापौर साहेब,हे कोणाचं तरी पाप तुम्ही तुमच्या माथी घेवु नका, हे तुम्हांला काही तरी चुकीचं काम करायला लावतील विषय चांगलाआहे,त्यावर चर्चा करा, लोकांच्या सूचना घ्या आपण कुठला पण डेव्लपमेंट प्लँन्ट करतो त्यावेळेस काय करतात सूचना/हरकती

घेतात. आपण काय घेतलं सूचना/हरकती काहीच नाही. एवढया मोठया विषयावर चर्चा करु द्यायला पाहिजे होती. अधिका-यांना आपण सांगायचं होतं,आयुक्तांनी आमच्या शंका ज्या होत्या त्या दूर केल्या असत्या,आमच्या काही सूचना असत्या तर त्या दिल्या असत्या त्यात काही बदल करुन विषय मंजुर केला असता आमची फक्त एवढीच मागणी आहे. एवढे मोठ,मोठे विषय मंजुर करीत असताना तुम्ही सभागृहाला विश्वासातच घेत नाही. विषय मंजुर म्हणलं की,संपल हे बरोबर नाही महापौर साहेब, आणि मा.आयुक्त साहेब,मला आपल्याला विनंती करायची आहे की, मी जे बोललो आहे त्याचं लेखी पत्र सुध्दा दिलेलं आहे त्या गोष्टीवर तुम्हांला अँक्शन घ्यावी लागेल आणि अँक्शन घेतली नाही तर मी महापालिकेच्या विरोधात कायदेशिर कारवाई करणार आहे,धन्यवाद.

**मा.पंकज भालेकर -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह आज आपण बराच वेळ मल्लनि:स्सारण केंद्रातून बाहेर पडणा-या प्रक्रियेचं पाणी आपण त्याच्यावर प्रक्रिया करुन औद्योगिक आणि निवासी भागाला देणार आहे. हा प्रोजेक्ट ६५० कोटीचा आहे. आयुक्त साहेब,मला आपल्याला आठवण करुन द्यायची आहे की, गेल्या दिड वर्षापुर्वी असाच विषय हा विषय चांगला आहे परंतु या विषयाला राज्य शासनाच्या ज्या काही परवानग्या असतील, किंवा विविध विभागाच्या ज्या परवानग्या आवश्यक असतात त्या घेतल्या गेलेल्या आहेत का? कारण दिड वर्षापुर्वी जेंव्हा आम्ही स्थायी समितीला होतो तर त्यावेळेस असं १५० कोटीचं ड्रेनेज लाईन इंद्रायणी नदी,पवना नदी याठिकाणी मंजुर करण्यात आला होता त्यावेळेस मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने त्याला विरोध केला होता. रात्री १२.०० वा.त्याची वर्कऑर्डर काढली आणि ३.०० वा.त्याला देण्यात आली. हे महानगरपालिकेच्या प्रशासनाला कसं काय शक्य होतयं ठिक आहे केलं पण त्याची पुढे काय अंमलबजावणी झाली आज माझ्या तळवडे येथे पहातोय त्याठिकाणची लाईन चालू केल्यानंतर त्यांना पहिल्यांदा शेतक-यांनी आडवलं त्यानंतर ती प्रायव्हेट जागेतून टाकली नंतर ती नदीपात्रातून गेली. नदीपात्रातून घेतल्यानंतर एलजीटीनी आडवलं त्यानंतर ते काम बंद केलं. परत हे काय चाललं आहे. परत त्यांनी स्मशानभूमीमध्ये काम चालू केलं आहे ही कसली पध्दत आहे. तुम्ही काम करायच्या आधी त्याच अलायमेंट आहे का? त्याचं प्लॅनिंग नाही ही कसली पध्दत आहे. त्याची परमिशन सुध्दा नाही. आम्ही गेल्या दिड वर्षापुर्वी सुध्दा सांगितलं होतं याची परमिशन घेतलेल्या नव्हत्या त्यामुळे आम्ही सर्वांनी याला विरोध केला होता. त्यावेळेस आमचा विरोध डावलून विषय मंजुर केला आणि त्याच रात्री त्या कामाची ठेकेदाराला वर्कऑर्डर दिली आहे. म्हणजे ही महापालिका म्हणजे चरण्यासाठी कुरण आहे का? प्रत्येकानी याठिकाणी मोठमोठे प्रोजेक्ट काढायचे ठिक आहे काढा पण त्यासाठी ज्या परवानग्या लागतात त्या घ्या. त्याचं कधी प्रेझेंटेशन दिलं नाही,कुठली माहिती दिली नाही. आणि

आपण हा विषय मंजुर केला आहे. मा.महापौर, मला याठिकाणी जी अडचण आली होती ती ड्रेनेज लाईन टाकताना जाणवली आणि आता ते काम सर्व बंद आणि ठप्प आहे. मग विनाकारण एवढे मोठमोठे प्रोजेक्ट काढुन बंद करायचे का? त्याची कॉस्ट वाढत जाणार,त्यामुळे महापालिकेचे आर्थीक नुकसान होणार आहे. मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,हे असे मोठमोठे प्रोजेक्ट काढताना त्याच्यावर सविस्तर चर्चा व्हायला पाहिजे. आणि त्यावर सगळयांच्या सूचना घेतल्या गेल्या पाहिजेत. आपल्याला विनंती आहे की, हा पर्यावरणाचा विषय आहे त्याच्या अनुषंगाने मला आपल्याला बोलायचं आहे की, आयुक्त साहेब,आपण काल मुंबईला गेला होता तिथं एक मिटींग लावली होती आमच्या प्रभागाच्या बाजुला तळवडे,रुपीनगर ,कॅन्टोन्मेंटचं असेल याठिकाणी जी मोकळी जागा आहे तर त्याठिकाणी त्यांनी गेल्या महिन्याभरापासून त्यांच्या कचराडेपोला आग लागलेली आहे त्याच्या धुरापासून लोकांना खुप त्रास झालेला आहे. त्यादिवशी मी रात्री ११.०० वा.आयुक्त साहेबांना फोन केला होता आपण त्याठिकाणी अग्निशामक दलाच्या गाडया पाठवून दिल्या पण आम्हांला याचा दरवर्षी उन्हाळयामध्ये याचा खुप त्रास होतोय. नागरीकांना काय वाटतयं महानगरपालिकेनं काही तरी केलं पाहिजे. महापालिका म्हणते कॅंन्टोन्मेंटच्या जागेमध्ये आमचा काही हस्तक्षेप करण्याचा संबंध येत नाही. काल त्यांचे सी.ओ.आले होते त्यांनी सरळ सांगितले की,आम्ही याच्यामध्ये काहीच करु शकत नाही. आम्हांला त्याच्यामध्ये तुमची काही तरी साथ पाहिजे अतिरिक्त आयुक्त सुध्दा आल्यानंतर सुध्दा त्याच्यामधुन काहीच मार्ग निघत नाही. त्यांना आम्ही सांगितलं की, आम्ही अग्निशामक दलाच्या गाडया पाठवल्या आहेत पाणी मारलेलं आहे तरी त्यांचा काही उपयोग होत नाही किमान त्याच्यावर माती तरी टाकून ती आग विझवण्याचा प्रयत्न करा. गेल्या महिन्याभरापासून त्याठिकाणाहून एवढा धूर येतोय की,लोकांना श्वसनांचा त्रास व्हायला लागला आहे. कारण दरवर्षी ३/४ महिने हा त्रास होत आहे जोपर्यंत पाऊस पडत नाही तोपर्यंत हा त्रास जाणवतोय. याच्यामध्ये आपण मा.महापौर साहेब,पुढाकार घ्यावा. कॅंन्टोन्मेंट बोर्डाचा दिवसाला काही तरी ५/६ टन कचरा आहे त्याच्यामध्ये जर काही आपल्याला मदत करता येते का ते बघावे जेणेकरुन आम्हांला जो त्रास होत आहे तो ब-याच वर्षापासून चालत आलेला आहे. तो तरी कमी होईल. तरी मा.आयुक्त साहेब,आपण याच्यावर लक्ष घालावं आणि कॅन्टोन्मेंट बोर्डाचे जे ब्रिगेडीयर असतील,त्यांचे सी.ओ.असतील यांच्याबरोबर एक मिटींग घेवुन त्याच्यावर कायमस्वरुपी तोडगा काढावा ही आपणांस विनंती आहे.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह आता जी उपसूचना दिली गेली आहे त्याच्यामध्ये तसेच सदर प्रकल्पातून पुरवण्यात येणा-या प्रक्रियायुक्त पाण्यासाठी स्वतंत्र पाणी मीटर प्रत्येक जोडणीसाठी बसविणेत यावे. तसेच सदरच्या प्रकल्पातून प्रक्रिया केलेल्या पाण्याचे दर हे घरगुती वापरासाठी पहिल्या तीन वर्षासाठी मोफत व त्यापुढे मनपाच्या पिण्याच्या पाण्याच्या दरापेक्षा २०% कमी तसेच वाणिज्य तसेच औद्योगिक वापरासाठी ३०% कमी ठेवणेत यावेत म्हणजेच घरगुती वापरासाठी

पहिल्या तीन वर्षासाठी मोफत व त्यापुढे पिण्याच्या पाण्याच्या दराच्या ८०% तसेच वाणिज्य व औद्योगिक वापरासाठी पहिल्यापासुन ७०% दराने आकारणी करणेस मान्यता देणेत येत आहे आता अशा प्रकारची ज्यावेळेस आपण उपसूचना देतो याच्यामध्ये TAC कमिटी नेमलेली आहे त्याच्या मध्ये Technical Adviser असतील, आयुक्त असतील त्यांनी त्याचा अभ्यास केला असेल आपण त्याची फिजीबीलीटी बनवली असेल,एवढया वर्षामध्ये एवढे पैसे होतील मग त्याला पुढचे १५ वर्ष त्याला सांभाळायचे आहेत आणि मग असं याच्यामध्ये डिस्टर्ब होणार नाही का? का,मग आपण आपल्या मनानेच ३ वर्ष त्यांना मोफत द्या ४० टक्के माफ करा,उद्या याच्यामध्ये आयुक्त येणार आहेत. म्हणजे उद्या आयुक्तांना याच्यामध्ये टाकतो की,काय? उद्या तुमच्या उपसूचनेमुळे जर त्यांना रेव्हीन्यु जनरेट होतोय असं वाटतयं पण झालाच नाही तर काय होणार फिजीबीलीटी बदलेल का? आपण अभ्यासपूर्वक उपसूचना मांडली आहे का? त्याच्या मागचा काय अभ्यास आहे. उपसूचना तुम्हांला कोणत्या अधिका-यांनी लिहून दिली आहे. ज्यावेळेस आपण अशा उपसूचना देतो त्यांनी या सभागृहाला समजून सांगावं धन्यवाद.

**मा.अॅड.सचिन भोसले -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह खरंतर हा विषय या सभागृहात मंजुर झालेला आहे. आणि मला असं वाटतयं की,या विषयावर आपण कितीही चर्चा केली तरी ऑलरेडी हा विषय मंजुर झाला आहे. ज्या पध्दतीने या सभागृहात हा विषय मंजुर करण्यात आला आहे. माई,आपण या विषयावर सगळयांना बोलण्याची संधी देवुन सर्वांच्या ज्या काही सूचना आहेत त्या घेतल्या असत्या तर त्या आणखीन चांगलं झालं असतं बहुमत आपलं आहे विषय मंजुरच होणार होता. परंतु आम्हाला असं वाटतयं की,सर्वाचा विचार त्यामध्ये यायला पाहिजे होता. त्यामुळे या विषयावर आता चर्चा करणे काही योग्य होणार नाही ऑलरेडी विषय मंजुर झालेला आहे. या विषयाला धरुन आम्ही जे आंदोलन केलं आहे माई, मी आपल्याला अगदी नम्रपणे कळवतो की, याठिकाणी आल्यानंतर प्रवेशद्वारावरती आपल्या सिक्युरिटीने आडवलं मी त्यांना विनंती केली की,सभागृहात जे कोणी संबंधित अधिकारी असतील त्या संबंधित अधिका-यांना ही फक्त जलपर्णी द्यायची आहे. याच्या मागचा उद्देश असा होता की, शहरामधील दोन्ही नद्यांमध्ये जलपर्णी प्रचंड प्रमाणात वाढलेली आहे. मा.महापौर, एक महिन्यापुर्वी या सभागृहाच्या माध्यमातून संबंधित अधिकारी आणि आयुक्तांना विनंती केली होती की, या प्रश्नांवरती ताबडतोब उपाययोजना करा, आणि लवकरात लवकर या दोन्ही नद्या स्वच्छ करा कारण की, याठिकाणी या शहरातील नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. एका बाजुला आपण कोरोनासारख्या आजाराचा सामना करतोय आणि दुस-या बाजुला या शहराच्या नागरीकांना या जलपर्णीमुळे प्रचंड मनस्ताप होतोय, लोकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. सर्वाच्या वतीने मी या सभागृहामध्ये विनंती केलेली होती. परंतु

त्याच्यावर अद्यापपर्यंत कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. चार दिवसापूर्वी मी मा.आयुक्तांना पत्र दिलं त्यावर अजुनपर्यंत कुठलीही ऍक्शन घेण्यात आलेली नाही. त्यामुळे याठिकाणी मला आंदोलन करावं लागलं खरंतर मी या सभागृहाच्या बाहेर विनंती करत होतो की, आपल्याशी स्पीकींग फोनवरती संपर्क साधण्याचा प्रयत्न करत होतो की,माई, मला जलपर्णी घेवुन आत मध्ये येऊ द्या त्याच्यामागे माझा कोणताही उद्देश नव्हता. आणि जलपर्णी म्हणजे कुठलं शस्त्र नाही, किंवा अस्त्र नाही वनस्पती आहे, झाडपाला आहे. याठिकाणी मी प्रशासनाचे डोळे उघडण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रशासन याठिकाणी काम करण्याचं सोंग करत आहे.प्रत्यक्षात ते काहीच करीत नाही. प्रशासनाचं लक्ष दुसरीकडच आहे. ज्याठिकाणी यांना मलई मिळते त्याठिकाणी हे चांगल काम करतात. ज्याठिकाणी आर्थीक फायदा आहे तिकडे यांच चांगल लक्ष असतयं परंतु या शहरातील नागरीकांच्या आरोग्याच्या प्रश्नांकडे लक्ष देत नाहीत. माई,मला कोणालाही दुखवण्याचा उद्देश नव्हता ढाके साहेब,ज्यावेळेस बाहेर आले त्यावेळेस मी त्यांना सांगितलं की, संबंधित जे कोणी अधिकारी असतील त्यांना फक्त ही जलपर्णी द्यायची आहे. म्हणजे काय होईल की,याठिकाणी नेली की,जलपर्णी काढण्याचं काम या सभागृहातनं चालू झालं असं मला वाटत होतं. परंतु त्यांनी काय केलं,आले दोन मिनिटं उभे राहिले आणि कुठल्याही प्रकारची दखल त्यांनी घेतली नाही,माझ्याशी बोलले पण नाही. माई, आपण या सभागृहामध्ये लोकांचे प्रश्न मांडण्यासाठी आलेलो आहोत. आणि आपण प्रश्न मांडून सुध्दा हे अधिकारी दखल घेत नसतील तर आपण काय केलं पाहिजे. कुठल्याही अधिका-यांशी माझं वैर नाही,कुणाचं इनसल्ट करण्याचा माझा उद्देश नाही. मी सिक्युरिटीचा सुध्दा मान ठेवलेला आहे. त्यांना कुठेही धक्काबुक्की केलेली नाही. मी जे प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केलेलाआहे त्याचं उत्तर देण्यास प्रशासन जे टाळाटाळ करीत आहे. माई,मी आपल्याला विनंती करतो की,सर्व प्रशासनाच्या अधिका-यांना आपण सक्त ताकीद देणेत यावी की,जो कोणी लोकप्रतिनिधी याठिकाणी समस्या मांडतोय तर त्या समस्येचं निराकरण करणं हे तुमचं काम आहे. आले, दोन मिनिटं बोलले आणि पळून गेले, तुम्ही पळून कशाला जाताय, तुम्ही पळाल्याने प्रश्न काही सुटत नाहीत. जर तुम्ही थांबले असते तर दंगा झाला नसता याच्या आगोदरही मी तुम्हांला आंदोलन करताना सांगितलं होतं की, आम्ही नम्रपणे तुम्हांला सांगतोय,आम्हांला कुठल्याही प्रकारचं आंदोलन करायला लावू नका. याच्यामधनं जर काही गैरप्रकार झाला तर त्याला तुम्ही सर्वस्वी जबाबदार आहात. ही जलपर्णी काय माझ्या एकटयाचा प्रश्न नाही. या पुर्ण शहराचा प्रश्न आहे. लक्षात घ्या,मी अजुनही तुम्हांला सांगतोय तुम्ही अजुनही वेळ घ्या इतक्या दिवसामध्ये आपण ही उपाययोजना करणार आहोत. गेली ४/५ वर्ष झाली साहेब, या वर्षामध्ये जलपर्णीवर किती कोटी रुपये खर्च झालेला आहे. दरवर्षी जलपर्णी काढण्याचं टेंडर काढलं जातयं आणि पाऊस आला की,ती वाहुन जातेय याच्यामध्ये ठेकेदार आणि अधिकारी मिलीभगत आहे. माई,हे असं किती दिवस चालणार आहे. याचा काहीही उपयोग नाही. तर आपण सक्त सूचना देणेत याव्या या जलपर्णीवर जर परमनंन्ट सोल्युशन काढायचं असेल तर त्यासाठी काय करावं लागेल, काय यंत्रणा

राबवावी लागेल किंवा कुठली ट्रिटमेंट करावी लागेल. परवा मी आयुक्त साहेबांशी बोलत असताना आयुक्त साहेब म्हणले की,ज्या कंपन्या आहेत नदीच्या साईडनी आहेत त्यांना बोलवून घ्या, त्यांना नोटीस द्या, ज्या कंपन्या दुषीत पाणी सोडतात त्यांना नोटीस द्या पाण्यामध्ये जे जीवप्राणी आहेत त्यांना सुध्दा यामुळे धोका आहे. मला असं वाटतयं की,आयुक्त साहेब,आपण यामध्ये जातीने लक्ष घालून या ज्याकाही कंपन्या आहेत त्या आपले वेस्ट पाणी नदीमध्ये सोडतात त्यांना प्रथम नोटीस द्या आणि नाहीच ऐकलं तर त्यांच्यावर केसच करा. याच्या आगोदर कधी अशा केसेस झालेल्या आहेत का, या जलपर्णीवर आपण ठोस उपाययोजना काय केली आहे हा पण एक प्रश्न आहे. तर माझी आपल्याला नम्र सुचना आहे की, या जलपर्णीवर आपल्याला काय करता येईल ते बघा आणि दुसरी गोष्ट कंपन्याच्या वॉटर ट्रिटमेंटच्या बाबतीत परमनंन्ट उपाययोजना काय करता येईल त्याचा विचार करा, आयुक्त साहेब,आम्ही याठिकाणी जे पोटतिडकीने बोलतोय त्याची तुम्ही गांर्भीयाने दखल घ्या. परत एकदा सांगतो एक महिन्याचा कालावधी घ्या आणि त्याच्यावर कायमस्वरुपी उपाययोजना करावी. आता कोरोनाचा काळ आहे त्यामुळे आंदोलन करण्यास सुध्दा परमिशन नाही. त्यामुळे उद्या जर आंदोलन करावं लागलं आणि यासाठी शिवसेना उद्या जर रस्त्यांवर उतरली तर त्याचे परिणाम वेगळे असतील लक्षात ठेवा. त्याच्यामुळे मी आपल्याला विनंती करतो की, लवकरात लवकर याच्यावर कायमस्वरुपी उपाययोजना करावी. कुठल्याही अधिका-यांना दुखावण्याचा माझा उद्देश नाही. तुम्ही तुमचं काम व्यवस्थित करा,आमचं म्हणणं व्यवस्थित ऐका, हे माझं एकटयाचं म्हणणं नाही सर्व लोकप्रतिनिधींची हीच समस्या आहे. नागरीकांची समस्या आहे ती मी माडण्याचा प्रयत्न केला आहे. एवढीच मी आपल्याला विनंती करतो. धन्यवाद.

**मा.विकास डोळस -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह माई,मी सागर आणि पैलवान तिघंजण एकत्र येत होतो. आणि सागर मला म्हणला आपल्याला आत मध्ये जाऊ देणार नाहीत. मी सागरला म्हणलं असं का बरं, तर तो म्हणला आपल्याला आत मध्ये सोडत नाहीत. मी त्याला म्हणलं आपण नगरसेवक आहोत आणि त्यातल्या त्यात सत्ताधारी नगरसेवक आहोत. आपल्याला कोण अडवणार आहे. त्यानंतर वरती आल्यावर आमचे सचिन भाऊ गळयामध्ये जलपर्णी घेवुन थांबले होते. खरंतर हा जलपर्णी विषय फक्त शिवसेनेचा किंवा सचिनभाऊंचा नाही तर नदीकिना-यावरती जी काही गावं आहेत त्या,त्या गावातील नागरीकांचा प्रश्न आहे. आणि त्यांना मी आल्या,आल्या म्हणलं की,तुम्ही जे करताय ते योग्य करताय कारण प्रशासन त्याच्यावर कारवाई करीत नाही. माझा प्रभाग बोपखेल नदीच्या काठी आहे या मच्छरामुळे त्याठिकाणच्या नागरीकांना संध्याकाळी ६ नंतर दरवाजा लावावा लागतोय,घरात धुर करावा लागतो. त्याठिकाणी टु व्हिलर जर कोणी बाहेर गेला तर तोंडात १०/२० मच्छर जातात. नागरीकांची एवढी मोठी गैरसोय होत असताना प्रशासन त्याच्यावर कोणतीही कारवाई करीत नाही त्यामुळे मी सचिनभाऊंना सांगितलं की,मी तुमच्या बरोबर आहे. आणि त्यांना या सभागृहात येऊ द्यावं यासाठी प्रयत्न करीत होतो. आज

आपण कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी मी कालच कमिशनर साहेबांना फोन केला होता लडकत साहेबांना एक व्हीडीओ कॉल केला होता. ८ दिवसापुर्वी कमिशनर साहेबाना फोन केला होता. काल सकाळी ७.०० वा.माझ्या घरी जवळपास १०० ते १५० महिल्या आल्या होत्या या महिला दाखवण्यासाठी मी लडकत साहेबांना व्हीडीओ कॉल केला होता. तो यासाठीच की,आमच्या घरी सकाळी,सकाळी १०० ते १५० महिला ग्रुपनी येतात. हा विषय या विषयाशी सुसंगत नाही पण माई,मला थोडी बोलण्याची परवानगी देण्यात यावी. आज कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आपण एकीकडे नगरसेवकांना सभागृहात येण्यापासून रोखतोय. आज आम्हांला या सभागृहात येण्यासाठी संविधानाने हक्क दिलेला आहे. आणि दुसरीकडे पाण्यासाठी १०० ते १५० महिला त्यांच्या जीवाची पर्वा न करता रस्त्यावर येतात मग याला जबाबदार कोण, आज आपण दिवसाआड पाणी केलं आहे ते का केलं आहे. आपल्या शहराची लोकसंख्या किती आहे आणि त्याना पाणीपुरवठा करण्याची व्यवस्था आपली आहे. मग आपण दिवसाआड पाणीपुरवठा करतोय गेल्या २० दिवसापासून माझ्या भगिनींच्या घरामध्ये पाण्याचा थेंब नाही. ती महिला अक्षरशा रडत होती. ८दिवसापुर्वी कमिशनर साहेबांना फोन केला होता त्याच्या आगोदर जेई, डेप्युटी,एक्झीक्युटीव्ह, सिटी इंजिनियर असु द्या प्रत्येकाच्या समोर समस्या मांडलेली आहे. या ज्या महिला एकत्र जमतात त्यामध्ये जर का कोणाला कोरोनाचा प्रादुर्भाव झाला तर त्याला जबाबदार कोण याचं उत्तर मला आयुक्त साहेबांनी द्यावं. त्या महिलांच्या जीवाची पर्वा आपण करायची नाही का? त्यापैकी काही महिलांना शुगर असेल,बीपी असेल तर त्यांच्या जीवाची काळजी कोण करणार ?जिथे माझे नागरीक राहतात त्या मच्छराच्या प्रादुर्भावामुळे त्यांना जे रोग होतात त्यांना कोण जबाबदार आहे. मुळात तुम्ही या सभागृहात नगरसेवकांना येण्यापासून मज्जावच करायला नाही पाहिजे. जेंव्हा सागर मला म्हणला आपल्याला आत मध्ये जाऊ देणार नाही तेंव्हा मी त्याला म्हणलं आपण सत्ताधारी आहोत आणि आत मध्ये आल्यानंतर जेंव्हा सिमाताईंना आत मध्ये येण्यास रोखलं तेंव्हा मी सागरला म्हणलं आपण खरचं सत्ताधारी आहोत का? आज तुम्ही नगरसेवकांना रोखताय या गोष्टीचा मी तीव्र निषेध करतो. पाण्यासाठी माझे नागरीक रस्त्यांवर येत आहेत,कोरोनाचा प्रादुर्भाव वाढतोय या काळात लोकांना पाण्याची गरज आहे. दिवसाआड पाणी पुरवठा याच कारणासाठी केला आहे की,लोकांना व्यवस्थित पाणीपुरवठा व्हावा मी कळकळीनं तुम्हांला एक गोष्ट सांगतो की, जेंव्हा,जेंव्हा मी हार्डीकर साहेबाना कॉल केला त्याच्या ५ व्या मिनिटाला संबंधित एक्झीक्युटीव्ह इंजिनियरपासून ते सिटी इंजिनियर असतील त्यांचे सगळयांचे फोन मला आलेले आहेत. तुम्हांला मी दोन वेळा फोन केला त्यामध्ये साधा जेईचा पण मला फोन आला नाही. पण मला अजिबात तुलना करायची नाही पण हे जे अधिकारी आहेत ना हे स्वत:च्या अधिकारात घेवुन तुम्हांला विकुन खातील. आयुक्त साहेब,तुम्ही बोपखेलला या त्याठिकाणची पाण्याची समस्या,जलपर्णीची समस्या बघा या पण महत्वाच्या समस्या

आहेत. जे आपण स्मार्ट सिटी म्हणतो ना जे टेलवर गावं आहेत त्यांना पाणी देणं गरजेचं आहे. तसेच रस्त्याची काय परिस्थिती आहे ती पण बघा माई,आपण मला बोलायला संधी दिली त्याबद्दल धन्यवाद. आणि आयुक्त साहेब,आपल्याला विनंती आहे की,जेंव्हा कोणी नगरसेवक आपली समस्या सांगेल त्याच्यावर आपण त्वरीत कार्यवाही करावी.धन्यवाद,जयहिंद जयमहाराष्ट्र.

**मा.राजु मिसाळ -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह माई,तुम्ही विषय मंजुर केला आहे.आणि मंजुर झाल्यानंतर त्याच्यावर आता गेली तासभर चर्चा सुरु आहे. हीच जर का चर्चा विषय मंजुर करण्यापुर्वी झाली असती तर हे जे घडलं ते मगाशीच घडलं असतं माई, रिसायकलींग वॉटरच्या प्रोजेक्टसाठी ६५४ कोटीचा आपण खर्च करणार आहोत त्याच्यामध्ये रॉयल्टी,जीएसटी,व्याज इ.याच्यामध्ये एकुण खर्चापैकी मनपा मार्फत ४० टक्के भांडवली खर्च करण्यात येणार आहे. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर ७ वर्ष सार्वजनिक पध्दतीने वितरीत करण्यात येईल. माई,मगाशी मंगलाताईनी सांगितले त्यांच्या प्रभागामध्ये दिड कोट रु.खर्च करुनही हा प्रकल्प धुळखात पडलेला आहे. माई,माझं म्हणणं आहे की,या सर्व गोष्टींची शहानिशा होणं गरजेचं आहे. तुम्ही निविदा प्रकल्पामध्ये ६० टक्के निधी उभी करु शकता तर राहीलेली ४० टक्के निधी कोण देणार आहे. याची काहीच कल्पना न देता पक्षनेते याचा खुलासा होणं गरजेचं होतं. या विषयाला आमचा विरोध नाही. परंतु याची माहिती या सभागृहामध्ये देणं फार गरजेचं होतं या सभागृहामधील ज्या,ज्या लोकांना अनुभव आलेला आहे.ज्या,ज्या सदस्यांच्या मनामध्ये ज्या काही कल्पना आहेत त्या कल्पनांचा ऊहापोह होणं गरजेचं आहे. आयुक्त साहेब,आपल्याला विनंती आहे की,हा प्रकल्प कसा होणार आहे याचं प्रेझेंटेशन सभागृहामध्ये द्यावं आणि मगाशी मंगलाताईनी जे सांगितलं आहे त्याचा खुलासा करावा त्यानंतर आम्हाला बोलण्याची संधी द्यावी.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह खरं म्हणजे विषय क्र.३ वरती आज आपण सांडपाण्याच्या पुर्नवापर प्रकल्पावर जवळपास गेली दिड तासापासून चर्चा करतो आहे. सन्मा.महापौर माई,मी आपणांस विनंती करणार आहे की, खरं म्हणजे मगाशी जनरल बॉडी चालू करण्याच्या आगोदर आयुक्तांच्या बरोबर आपल्या अध्यक्षतेखाली कोरोनाच्या संदर्भात मिटींग आयोजित केली होती. आणि कोरोनाची संख्या वाढत असताना सभागृहातील सदस्यांची नेमकी संख्या काय असावी आयुक्तांनी,प्रशासनाने नेमकी काय पावले उचलली आहेत.कोरोनाचे रुग्ण कशा पध्दतीने आहेत,आपले आयसीयु कशा पध्दतीने आहेत अथवा आपली ट्रिपल सीसी सेंटर कशा पध्दतीची आहेत अशा प्रकारची सविस्तर माहिती आपल्या अध्यक्षतेच्या खाली प्रशासनाकडुन घेतली आहे. आणि मला वाटतं त्यावेळेस आपण सर्व गटनेत्यांना आमंत्रित केलं होतं. आणि म्हणुन आपली ज्यावेळेला गटनेत्यांची बैठक झाली त्यावेळेला कोरोना बाधीतांचा दैनंदिन आकडा ८००,८५० असा आलेला आहे. आणि त्याअनुषंगाने आपले सर्व गटनेते बसलेले असताना शिवसेनेचे गटनेते त्यांना काही काम असल्यामुळे

त्यावेळेस ते अचानक निघुन गेले. परंतु आपण सर्व ग्टनेते असताना चर्चा केली आणि आपण या परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर जनरल बॉडीच्या संदर्भमध्ये आपण नेमकं काय केलं पाहिजे. इतर वेगवेगळया महापालिकेच्या संदर्भात चर्चा झाली ठाणे महानगरपालिका कोर्टात  गेली, पुणे महापालिका गेल्या वर्षापासून ऑनलाईन जनरल बॉडी केली जात आहे. अशा वेगवेगळया महापालिकांच्या माध्यमामधुन आपण सर्वांनी आयुक्तांच्या बरोबर चर्चा केली. लोकशाहीच्या मार्गाने आयुक्तांशी  चर्चा झाल्यानंतर याठिकाणी निर्णय घेतला आणि कोरोनाची परिस्थिती बघितली तर ही वाढत चाललेली आहे. आणि एवढं ५/६ तास सभागृहात बसणं आणि आपल्या सर्वांच्या चर्चेमधुन निष्पन्न झालं  आणि मला वाटतं  सर्व गटनेत्यांच्या उपस्थितीमध्ये सभागृहामध्ये ५/१० लोक हवे आहेत त्यासंदर्भामध्ये आपल्या समितीच्या अध्यक्षांना याठिकाणी निमंत्रित केलं गेलं.सन्मा.महापौर आपण  पिठासिन अधिकारी म्हणुन आपण त्याठिकाणी प्रशासनाच्या माध्यमातून आपण याठिकाणी हा प्रयत्न केला. याच्या मध्ये सन्मा.महापौरांच्या बाबतीत कुठल्याही सन्मा.सदस्यांनी त्यांच्या मनामध्ये शंका ठेवु नका. सन्मा.महापौरांचा हाच उद्देश याठिकाणी होता. कोरोनाच्या परिस्थितीमध्ये आपण या सभागृहामध्ये बसल्याच्या नंतर उद्या प्रसारमाध्यमांच्या मधुन सुध्दा आपण काळजीपुर्वक विचार करतोय,तसेच जळगांव महापालिकेची निवडणुक सुध्दा ऑनलाईन पध्दतीने करण्यास कोर्टाने परवानगी दिलेली आहे. ठाणे महापालिकेची जनरल बॉडी सुध्दा ऑनलाईन पध्दतीने झाली आहे. कोरोनाचा मागचा जर काळ बघितला तर त्या काळामध्ये आपली परिस्थिती ही कशी होती. त्यावेळेस सुध्दा आपले सभासद बोटावर मोजण्या इतके सभागृहात येत होते. एवढया मोठया प्रमाणात संख्या असताना सुध्दा त्यावेळेस आपण काटेकोरपणे पालन करत होतो. आणि मग दुस-या टप्प्याला कोरोनाला ज्यावेळेस सुरुवात झाली आहे. माझी सर्व सन्मा.सदस्यांना विनंती आहे की, कुठल्याही प्रकारच्या भावना मा.महापौरांच्या माध्यमातून याठिकाणी पिठासिन अधिकारी म्हणुन प्रशासनाने त्यांना सांगितलं की, अधिकार तुमचा आहे तुम्ही याठिकाणी हे करा, म्हणुन प्रशासनाच्या वतीने याठिकाणी हे नियोजन केलं गेलंल होतं. यासंदर्भात मी याठिकाणी स्पष्टीकरण केलेलं आहे मला यासंदर्भात अधिक बोलायचं नाही. गेल्या वर्षी कोरोनाचे रुग्ण कमी असताना सुध्दा कोटेकोरपणे आपण  त्याठिकाणी पालन करीत होतो.आणि तीच परिस्थिती आपल्या शहरातील नागरीकांच्या,रुग्णांच्या माध्यमातून आल्यामुळे हा याठिकाणी निर्णय आणि इतर महापालिका यांचा विचार केलाआणि आम्ही त्यांची चौकशी केली तर त्या महापालिकामध्ये ऑनलाईन पध्दतीने निवडणुक असेल,जी.बी.असेल शेजारीच असलेली पुणे महापालिकेमध्ये सुध्दा गेल्या वर्षभरापासून एकही जनरल बॉडी थेट सभागृहामध्ये झालेली नाही. आणि आधुनिक काळामध्ये आपण सोशल मिडीयाचा माध्यमातून आपण मोबाईलचा  वापर करतो. आणि मला वाटत मोठमोठया सभा या ऑनलाईनच्या माध्यमातून होत आहेत. कॉन्फरन्स ऑनलाईनच्या माध्यमातून होत आहेत. केंद्र सरकार,राज्य सरकार यांचे निर्णय सुध्दा ऑनलाईनच्या माध्यमातून होत आहेत. आपणही ऑनलाईन बोलू शकतो. याठिकाणी आपण

सन्मा.सदस्यांचा आदर करीत सभा आयोजित केलेली आहे. मी पुन्हा एकदा सन्मा.सदस्यांना विनंती करणार आहे की, आपण या सभागृहात तासनं तास चर्चा करण्यापेक्षा ऑनलाईन पध्दतीने चर्चा करणे योग्य होईल. तरी असो याठिकाणी विषय क्र.३ जो आहे तो अतिशय चांगला आहे शहराच्या दृष्टीने अतिशय चांगला विषय आहे. सांडपाण्यावरती पुर्नप्रक्रिया करुन पाणी वापरणं आपल्याला पाण्याचं महत्व माहिती आहे. मला वाटत नाही प्रत्येक सदस्यांला पाण्याच्या बद्दल काय सांगावं कारण पाणी हे आपल्याला नैसर्गीक देण आहे. इतर राज्य किंवा देशामध्ये गेल्यानंतर पाण्याची काय परिस्थिती असते. हे आपण बघता. म्हणुन या शहरामध्ये एकीकडे लोकसंख्या वाढत आहे, त्यानुसार पाण्याचं नियोजन करणं हे आपलं कर्तव्य समजुन करत आहोत.सन्मा.सदस्य योगेश बहल यांनी सांगितलं आहे की,२०१७ मध्ये आमचे सन्मा.सदस्य वादळामुळे निवडुन आलेले आहेत. आणि असंच वादळ २०२२ मध्ये येणार आहे हे सन्मा.सदस्य जनतेचा आदर करुन याठिकाणी आलेले आहेत. जनतेनी याठिकाणी सन्मा.सदस्यांना निवडुन दिलेलं आहे त्या जनतेचा तुम्ही अपमान करीत आहात. आणि त्या मतदान करणा-या नागरीकांचा तुम्ही अपमान करीत आहात. आणि सर्व जनतेला माहिती आहे की,भारतीय जनता पार्टी ही सर्वसामान्य नागरीकांना घेवुन या शहरामध्ये नियोजन करीत आहे. आणि त्याचाच परिपाक म्हणुन याठिकाणी आपण २०१७ ला निवडुन आल्यानंतर आंद्रा आणि भामा आसखेड धरणाचं १०० एमएलडी पाणी आणण्याचं नियोजन याठिकाणी केलेलं आहे. आणि त्याच माध्यमातून आमचे सन्मा.अध्यक्ष आणि आमदार महेशदादा लांडगे यांनी प्रत्यक्ष त्याठिकाणी पहाणी केली. प्रत्यक्ष फिल्ड मध्ये उतरुन याठिकाणी डिसेंबर पर्यंत पाणी देण्याचं काम हाती घेतलेलं आहे. डिसेंबरच्या आत या शहरातील नागरीकांना कच्चं पाणी देण्याचं काम सुध्दा आम्ही दोन्ही आमदारांच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे योगेश भाई तुम्ही चिंता करु नका, तुम्ही राष्ट्रवादीच्या माध्यमातून उल्लेख केला आहे भारतीय जनता पार्टीकडे योगेशभाईंच्या म्हणण्यांप्रमाणे २५/२५ वर्ष सत्तेत असताना त्यावेळेस तुम्ही काय करत होता. आम्ही आंद्र धरणामधुन पाणी आणलं,जलशुध्दीकरण केंद्र उभं केलं, त्याठिकाणी पाईपलाईनच काम चालू झालेलं आहे, टाक्यांच काम चालू झालेलं आहे. आपण म्हणता की,याठिकाणी घाई,घाईने निर्णय घेतले जातात पण घाई,घाईने निर्णय घेत असताना या शहरातील नागरीकांच्या हितासाठी निर्णय घेतले जातात. हे आपण विसरता कामा नये. मी याठिकाणी योगेशभाईंना सांगेन की,याठिकाणी वादळ हे भारतीय जनता पार्टीचंच आहे आणि २०२२ ला सुध्दा भारतीय जनता पार्टीचंच वादळ असणार आहे. यात कुठल्याही प्रकारची शंका नाही. कारण या ४ वर्षामधला जर आपण इतिहास बघितला तर या महापालिकेच्या वेगवेगळया योजनांच्या माध्यमामधुन पाणीपुरवठयाचं नियोजन सुध्दा सन्मा.अध्यक्ष आणि आमदार महेशदादांनी याठिकाणी केलंल आहे. मा.महापौर साहेब,याठिकाणी सांडपाण्याच्या प्रक्रियेवरती आपण चिखलीमध्ये मैलाशुध्दीकरणाचा १६ एमएलडीचा जो टप्पा आहे तो २० एमएलडी पर्यंतचा टप्पा उभा करण्याचं काम आपण याठिकाणी केलेला आहे. परंतु माझ्या

माहितीनुसार, या सांडपाणी पुर्नप्रक्रियांच्या माध्यमातुन परदेशामध्ये आपण सिंगापुरमध्ये गेलो तर पुर्नप्रक्रिया केलेलं पाणी जनता पित आहे. आणि अशा पध्दतीची HAM जी काही टेक्नॉलॉजी आहे त्याच्या माध्यमातुन आपण ही प्रक्रिया करणार आहोत. पाण्याचं नियोजन,पाणी कसं दिलं जाणार आहे या माध्यमातून आपण त्याठिकाणी पाईप लाईन टाकलेल्या आहेत. इंडस्ट्रीयलला कसं पाणी दिलं जाणार आहे. खरं म्हणजे सन्मा.महापौर साहेब, या सभागृहामध्ये एक उपसूचना आलेली आहे आणि ती प्रोत्साहनात्मक उपसूचना आलेली आहे. मी मगाशी उल्लेख केला आहे की, सिंगापुरमध्ये हे पाणी नागरीक पितात आणि म्हणुन आपण तशा पध्दतीनं एवढं चांगल पाणी या प्रकल्पाच्या माध्यमातून तयार होणार आहे. आणि म्हणुन त्याला एक उपसूचना दिली आहे. ३ वर्षाकरीता जे नागरीक घरगुती वापर करतील त्यांना आपण पाणी हे मोफत देणार आहे. आणि अशा पध्दतीनं आपण जे काही पाणी वापरलं जातयं आपण आपल्या घरामध्ये पाण्याला किती महत्तव दिलं पाहिजे. अशा प्रकारची उपसूचना याठिकाणी आलेली आहे. मा.महापौर साहेब,आपण या सभागृहाला सांगावं की,जो काही प्रोजेक्ट आहे तो एकुण १२० एमएलडीचा आहे. आणि त्यात आपण पहिल्या टप्प्याचा २० एमएलडीचा प्रोजेक्ट ३० वर्षापुर्वीचा एसटीपीचा प्लँन्ट हा जुना आहे. यासंदर्भात त्याच्या आजुबाजुच्या असणा-या नागरीकांनी सुध्दा वारंवार याठिकाणी तक्रारी केलेल्या आहेत की,त्याठिकाणी असलेल्या मैलाशुध्दीकरण केंद्राचा आम्हांला त्रास होत आहे. गेल्या३० वर्षामध्ये टेक्नॉलॉजी बदलत गेलेली आहे आणि या आधुनिक टेक्नॉलॉजीच्या पध्दतीनं आपण या सांडपाण्याच्या पुर्नप्रक्रिया करणेचा प्रकल्पाचा विषय या सभागृहामध्ये आणलेला आहे. शहरातील नागरीकांच्या दृष्टीने अत्यंत चांगला प्रकल्प आहे. खरं म्हणजे ब-याच सन्मा.यांनी सांगितलं आहे की, मी त्याबाबतीत बोलणार नाही पण यात नक्की एवढंच आहे की, सन्मा.महापौर मागची सभा सुध्दा तुम्ही ५/७ तास चालवली आहे. आणि चांगल्या वातावरणामध्ये आपल्याला कुठलीही गडबड करायची नाही. आणि या शहरासाठी चांगला उपक्रम करत असताना तो आलेलाआहे आणि तो आपण मंजुरच केलेला आहे. या प्रोजेक्टच्या बाबतीत संजय कुलकर्णी यांना खुलासा करण्याचे आदेश द्यावेत. अशी विनंती करतो आणि थांबतो धन्यवाद.

**मा.महापौर –** मा.आयुक्त साहेब, या प्रोजेक्टच्या संदर्भातील संपुर्ण माहिती संजय कुलकर्णी यांनी द्यावी.

**मा.संजय कुलकर्णी (कार्यकारी अभियंता)-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह सन २०१८ मध्ये जेंव्हा पाण्याचा तुटवडा निर्माण झाला होता खुप मोठया प्रमाणात जनरल बॉडी मध्ये चर्चा झाल्यानंतर मा.आयुक्त साहेब, यांनी यावर परमनंन्ट उपाययोजना काय करता येईल यासंदर्भात मिटींग बोलावली होती. आपण जे प्रिपेड पाणी सोडून देतो त्याचा जास्तीत जास्त पुर्नवापर कसा करता येईल यासाठी या शहराचा एक मास्टर प्लॅन तयार करण्याची आयडीया त्यांनी सांगितली आणि त्यानुसार

आपण एका सल्लागाराची नेमणुक केली आणि त्यांनी ज्या मोठमोठया शहरात जे एसटीपी प्लँन्ट आहेत त्यातील जे प्रिपेड वॉटर आहे ते आपल्याला मॅग्झीमम कसं वापर करता येईल आणि ते पाणी रिसायकल करुन सध्या जो पाण्याचा तुटवडा आहे तो कसा मॅग्झीमम कसा भरुन काढता येईल आणि प्रिपेड पाण्याचा वापर करता येईल. आणि २०१८ मध्ये जनरल बॉडीमध्ये त्याचं प्रेझेंटेशन पण दाखवलं होतं त्याला मंजुरी पण मिळाली होती. त्यावेळी आपण फक्त फस्ट फेजमध्ये हिंजवडी धरलेलं होतं. त्यावेळेस आपल्याकडे हिंजवडी येईल असं धरलेलं होतं. पण त्यानंतर आपण चिखली,आणि च-होली , चिखलीचा जो जुना प्लँन्ट आहे त्याला ३० वर्षापेक्षा जास्त जुना झालेला आहे त्याच पण सदर मलशुद्धीकरण केंद्राची पुनर्बांधणी करणे आवश्यक आहे.याकरिता सदर ठिकाणी सध्याच्या १६ MLD क्षमतेच्या केंद्राच्या ठिकाणी अत्याधुनिक तंत्रज्ञानावरील व भविष्यातील वाढणा-या सांडपाण्याचा विचार करुन २० MLD क्षमतेचा MBR तंत्रज्ञानावर STP करणेचे प्रस्तावित होतं या सगळया गोष्टी लक्षात घेवुन आपण हिंजवडी त्याच्या ऐवजी मोशी,चिखली,च-होली,आणि प्लस कासारवाडीचा जो एसटीपी आहे त्याच्यावरुन वाकड, पिंपळेसौदागर हा पूर्ण एरिया कव्हर केलेलाआहे. आणि मॅग्झीमम एमआयडीसी एरिया आणि या रिसायकल वॉटर बद्दलच धोरण सुध्दा शासनाने जाहीर केलेलं आहे. तसं त्यांनी सर्व महानगरपालिकेला सुध्दा सांगितलेलं आहे. तसेच एमजीपी यांनी सांगितलं की,जेवढं पाणी वापरता त्यातील २० ते ३० टक्के पाण्याचा पुर्नवापर तुम्ही केला पाहिजे. आणि या सक्तीचं धोरण तुम्ही सर्व महानगरपालिकेनं निश्चित केलं पाहिजे. आणि त्याची अंमलबजावणी केली पाहिजे. त्यादृष्टीने हा विषय प्रशासकीय मान्यतेसाठी महापालिका सभेसमोर आणलेला आहे. प्रशासकीय मान्यता झाल्यानंतर याबद्दलचं डिटेल इंजिनियरींग होणार आहे. त्यानंतर टेक्नीकल मंजुरी होऊन, बाकीच्या गोष्टी होऊन निविदा निघणार आहे. आणि यामध्ये जे शासकीय अनुदान मिळणार आहे किंवा त्याचे फायनान्स उपलब्ध करावयाचे आहेत यासाठी HAM टेक्नॉलॉजी किंवा PPE मार्फत करु शकतो. हा विषय आता फक्त प्रशासकीय मान्यतेसाठी सभागृहासमोर आणलेला आहे.

**मा.मंगला कदम –** मा.महापौर साहेब, माझ्या वॉर्डामध्ये दिड कोटी रु.खर्च करुन जी प्रायोगिक तत्वावर पाईपलाईन टाकलेली आहे. त्याचा पण खुलासा मागितलेला आहे. तो खुलासा यांना द्यायला सांगा. आता यांनी जे काही सांगितलेलं आहे ते सगळयांना माहिती आहे. खुलासा करावा नाही तर आमचा या विषयाला विरोध आहे. कुणाचं काय असेल त्याच्याशी आमचं काही घेणं-देणं नाही पण माझ्या वॉर्डामध्ये दिड कोटी रु.खर्च करुन मॉडेल वॉर्ड तयार करण्यासाठी संजय कुलकर्णीनींच करुन दिलेलं आहे. तो प्रकल्प आज कार्यान्वित आहे का? आणि कार्यान्वीत असेल तर आताच सर्व सदस्यांनी त्याठिकाणी भेट द्यावी मी त्यांना जेवण सुध्दा देते.

**मा.सागर आंगोळकर -** मा.महापौर साहेब, या खुलासा करताना याच्याबरोबरच दिड कोटी रुपये खर्च करुन जर आपण लॉस मध्ये आहोत, का दुसरा प्रोजेक्ट करुन शहराचा फायदा पण होणार आहे याचं बायफरगेशन व्यवस्थित हवं आहे आम्हांला.

**मा.सचिन चिखले** - मा.महापौर साहेब, कुलकर्णी साहेब, PPP किंवा HAM Mode l तत्वार घेतल्यानंतर त्याच्यानंतर पुन्हा एकदा हा विषय सभागृहासमोर येणार आहे का? म्हणजे पुढचं प्रोव्हीजन त्याला लागणारा कालावधी यासाठी पुन्हा विषय सभागृहासमोर येईल का?

**मा.संजय कुलकर्णी (कार्यकारी अभियंता)** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह सदर प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर त्याचं डिटेल इंजिनियरींग होईल त्यानंतर टेक्नीकल मंजुरी, टेक्नीकल अँडव्हायझर कमिटी पण आहे त्याच्या समोर हा विषय जाईल त्यानंतर टेक्नीकल अँडव्हायझर कमिटीमध्ये यावर चर्चा होईल त्यानंतर या विषयाला मुर्त स्वरुप झाल्यानंतर आपण परत एकदा त्याच परत एकदा प्रेझेंटेशन सर्व सदस्यांच्या समोर ठेवू शकतो. आता प्रशासकीय मान्यता झाल्यानंतर स्टँडींग कमिटीला विषय जाईल.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, यांना खुलासा कोणता करायला सांगितला आहे.

**मा.संजय कुलकर्णी (कार्यकारी अभियंता)** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह मा.मंगलाताई कदम यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्याचा मी खुलासा करतो. मागच्या ५/७ वर्षापुर्वी मॉर्डल वॉर्डचं काम चाललं होतं. चिखली येथील सोसायटयांना आणि मेन गार्डन यांना पाणी द्यावं असा त्यांचा आग्रह होता त्यानुसार मॉडेल वॉर्डच्या एरियामध्ये लाईन टाकण्याचा निर्णय घेतला आणि तिथले मोठ,मोठे गार्डन त्या वॉर्डामध्ये आहेत त्या गार्डनमध्ये हे प्रिपेड वॉटर सप्लाय करण्यासाठी लाईन टाकण्याचं काम केलं त्यानंतर ब-याच ठिकाणी ज्या लाईन टाकल्या होत्या त्याठिकाणी फुटपाथचं काम असेल, काँक्रीटीकरणाचं काम असेल,त्यामुळे त्या लाईन मोठया प्रमाणात डॅमेज झालेल्या आहेत. त्यातनं जे रिसायकल वॉटर आहे त्या भागातल्या ज्या मोठमोठया गार्डन्स आहेत एचडीएफसी कॉलनी आहे,शाहू उद्यान आहे इथं पण मोठमोठया लाईन टाकलेल्या आहेत. त्यानंतर तिथे पंपींग सिस्टीम बसवलेली आहे. आणि त्यावेळी ऊन्हाळयामध्ये गार्डन विभाग त्याचा वापर करीत होतं ब-याच सोसायटयांना आपण ड्राफ्ट दिला होता पण त्यांनी तो वापरला नाही. तर कॉर्पोरेशनच्या मोठमोठया गार्डनमध्ये त्याचं पाणी वापरलं जात होतं. आणि आता सुध्दा नवीन लाईन टाकल्यानंतर त्या गार्डनला जोडलेल्या आहेत. आणि त्या गार्डनमध्ये आता सध्या चिखली मधुन प्रिपेड पाणी जात आहे.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह त्यांनी इतका सुंदर खुलासा केला आहे. कमिशनर साहेब,कसं गुंडाळतात ते बघा. मगाशी आमच्या

सदस्यांनी सांगितलं आहे की,तुम्हांला आमच्या कॉर्पोरेशनचे अधिकारी काय करतील. त्यांनी असं सांगितल आहे की,लाईन टाकलेल्या आहेत. आणि आताही त्या गार्डनला पाणी जातयं. आता जो तुम्ही विषय ६५४ कोटीचा घेतला आहे त्यामध्ये तुम्ही नागरीकांना ३ वर्ष मोफत देणार आहात मग त्यावेळेस तुम्ही असंच म्हणणार आहात का,फक्त गार्डनला पाणी देणार आहे. लाईन डॅमेज झालेल्या असतील तर त्या दुरुस्त करण्याचं काम कोणाचं आहे. तुम्ही करारामध्ये म्हणले आहे की,नागरीकांना ३ वर्ष मोफत पाणी देणार आहे. डॅमेज झालेली लाईन दुरुस्त करण्याचं काम कोणाचं आहे. नागरीकांना किती वाजता पाणी सोडणार हे समजलं तर नागरीक नळ चालू करतील नाही तर नागरीकांनी नळ चालू ठेवायचा आणि पाणी धो,धो वाहून गेलं पाहिजे असं म्हणायचं आहे का तुम्हांला. नागरीकांना पाणी सोडणेचं वेळापत्रक मिळालं का, नागरीकांना गाडया धुण्यासाठी किंवा गार्डनला सकाळी किंवा संध्याकाळी पाणी पाहिजे. त्यावेळेला तुम्ही पाणी दिलं आहे का, आज जर गार्डनला पाणी मिळत असेल तर त्या लाईन चालू असतील तर मधल्याच लाईन बंद का आहेत. ते सांगतात गार्डनला पाणी चालू आहे. मी,ही सांगते सर्व गार्डनला पाणी चालू आहे. तर मग बाकीच्या लाईन टाकलेल्या आहेत नागरीकांच्यासाठी आजचा जो विषय आहेत त्याला अनुसरुन त्या लाईन चालू का नाहीत. मा.आयुक्त् साहेब,माझी एक विनंती आहे की, २४ बाय ७ च्या लाईन टाकण्याचं काम अजुनही चालू आहे. मिटर बसवण्याचं काम सुध्दा आता चालू आहे. मागील ७ वर्षापुर्वी यमुनानगरला किती तरी महिने २४ तास पाणी देत होते हे लडकत साहेबांना बोलवून जाब विचारा. आमचं म्हणणं आहे की, शहरामध्ये चांगले प्रोजेक्ट आले पाहिजेत त्याला सुध्दा आमची मान्यता आहेच. पण त्या योजना कार्यान्वीत होतात की नाही हे कोण बघणार आहे. जसे हे दिड कोटी गेले आहेत तसेच या ६५० कोटीवर जो डल्लाच मारला आहे कोणाला डोळयासमोर ठेवून ही काम करतात. २४ बाय ७ ची लाईन टाकुन झाली आहे की नाही, मीटर बसवुन झाले आहेत की नाही प्रत्येक नगरसेवकाला विचारा किती दिवस २४ बाय ७ मध्ये २४ तास पाणी देत होते. का? तर ठेकेदाराना २४ बाय ७ ची लाईन टाकायची होती ठेकेदारांना ठिक आहे आमच्या काळात झालं असेल, म्हणुन आम्ही काय म्हणतोय की,दुरुस्ती करायला नको का? का,चुकलं म्हणजे चुकतचं रहायचं का, आज तुम्ही २४ बाय ७ ची लाईन टाकताय,मिटर लावताय. आज दिवसाआड पाणी देताय,काही दिवसांनी दोन दिवसांनी देताय का,चार दिवसांनी देताय माहित नाही. या ६५० कोटीचं तुम्ही टेंडर काढणार असाल तर, आमच्या वॉर्डातली जी लाईन डॅमेज झाली आहे ती व्यवस्थित करुन दिली तर ते बरोबर आहे असे मी समजेन आणि २४ बाय ७ ची लाईन चालू करुन देणेत यावी ती दिली तर बरोबर आहे असे मी समजेन. असा छोटा प्रकल्प कुठेही राबवा आणि तो अंमलात आला तरच त्या ६५० कोटीच्या प्रकल्प करा अन्यथा या विषयाला माझा विरोध नोंदवुन घेणेत यावा. कमिशनर साहेब,मी तुम्हांला पत्र देणार आहे,की हे काम तुम्ही काढू नका. हे कोणाला तरी डोळयासमोर ठेवुन पोसण्याचं काम आहे. २४ बाय ७

ची लाईन टाकण्याचं काम आजही चालू आहे. अहो,साहेब पाणीच नाही तरी तुम्ही लाईन टाकताय. म्हणजे आपण नागरीकांना किती वेडं बनवत जायचं आहे. आम्हांला पण असं वाटलं,हैद्राबादला कॉन्फरन्सला गेलो,इकडं गेलो, तिकडं गेलो त्या पाण्याचं पार वाटोळं झालं. याच्यामधुन काहीही आऊटपुट नाही. कुलकर्णी साहेबांनी सभागृहाला ठामपणाने सांगावे की,या ६५० कोटीची जबाबदारी मी घेतो. ई-वेस्टचा प्रकल्प त्यांनी केला होता की,नाही त्या प्रकल्पाचं काय झालं आज शहरातील ई-वेस्टचा कचरा कुठं जातोय. हे मी कुलकर्णी डोळयासमोर ठेवुन बोलत नाही पण मागच्या वर्षी पण मी पर्यावरणावर बोलले होते. कुलकर्णी काय एकटे कर्ते करविते नाही. तुम्हांला पण कोण तरी सांगतं की हे करा,ते करा म्हणुन तुम्ही हे सगळे उपद्व्याप करता. नाही, तर तुम्ही मागेच नोकरी सोडायला तयार झाला होता. कमिशनर साहेब,आपल्या अधिका-यांना कोणी तरी,कुठून तरी प्रपोजल आणुन देतात एवढे करोडो रुपयांचे प्रप्रोजल आणुन देतात ते होणार आहे की,नाही हे बघायला पाहिजे. आज २४ बाय ७ प्रकल्पाची वाट लागलेली आहे. आज जर त्या लाईनला नळजोड करायची असेल तर ती होणारचं नाही. कारण लाईनवर फुटपाथ झाले,ब्रेकअप झाल्या म्हणुन त्याचं परत टेंडर काढावं लागणार आहे. म्हणुन या कामाला घाई गडबड करु नका, माझ्या वॉर्डात सगळया लाईन टाकलेल्या आहेत जर त्या ब्रेकअप झाल्या असतील तर त्या दुरुस्त करायला नको का, इकडे तुम्ही स्मार्ट सिटीसाठी ६५० कोटी रु.चे टेंडर काढणार. स्मार्ट सिटीचं झालं तसंच याचं होणार आहे. नामदेवराव ढाके मगाशी म्हणले की,आज सभागृहात इतकी लोक आलं पाहिजे, तितकी आली पाहिजे. ढाके साहेब,मध्यंतरी मोठमोठे कार्यक्रम झाले, माझी महिला भगिनी चुकली तरी मी तिच्या विरोधात कधीच बोलत नाही. परंतु तुम्ही मला सांगा कोरोनाची झपाटयाने वाढ कोणत्या दिवसापासून झाली. किती नगरसेविकांनी रॅम्प वॉक केलं त्यावेळेला तुम्ही का सांगितलं नाही हा कार्यक्रम ऑनलाईन घ्या. हिंम्मत होती का तिथं जाऊन सांगायची ऑनलाईन कार्यक्रम घ्या म्हणुन त्यावेळेला काय बोलले नाही. सभागृहामध्ये तुम्हांला तुमच्या मनाप्रमाणे वागायचं म्हणुन तुम्ही सांगताय की,सभा ऑनलाईन घ्या. निवडणुका ऑनलाईन घ्या,सभा ऑनलाईन घ्या, तुमची हिंम्मत असतील तर त्या कार्यक्रमाची ठिकाणी तुम्ही जाऊन सांगितलं असतं. मी पक्षनेता आहे त्यामुळे सगळयांच्या वाढदिवसाचे कार्यक्रम हे ऑनलाईन घ्या. अशी तुम्ही हिंम्मत दाखवली असती तर आम्ही म्हणलं असत काय भारी आहे पक्षनेता असं काही चालणार नाही आणि असं काही होऊ देणार नाही. आम्ही या सभागृहात येणार आणि बोलणार मा.कमिशनर साहेब,तुम्हांला परत एकदा सांगते की, संजय कुलकर्णी यांनी तोंडाला पानं पुसायचं काम केलं आहे इथं, मुळात त्यांना त्यातलं काहीच कळतं नाही. हे मी त्यांच्या तोंडावर सांगते. ते लडकत सुध्दा खुप उडया मारत होते त्यांना ज्यावेळेस सेक्टर २३ सोडायला लावले त्यावेळेस त्यांना कळलं की, २४ बाय ७ याबाबतीत आम्ही गेल्या १५ वर्षापासून ओरडतोय. २००५ साली मला त्या कॉन्फरन्सला घेवुन गेले होते यांनी आज पर्यंत काय झालं,काही झालं नाही. आणि हे पुढेही होणार नाही. या विषयाला माझा विरोध नोंदवुन घ्या माझं तुम्हांला उद्या पत्र

येईल. याबाबतची कंन्सलटंटची फी खड्डयात गेली ती गेली तर गेली पाण्यात परंतु पुढे याचं काहीही करु नये. आणि जर करायचं असेल तर कमिशनर साहेब,संबंधित अधिकारी यांनी जबाबदारी घ्यावी,अँग्रीमेंट करताना तुम्ही तसं त्याचं लेखी पत्र द्यावं की,या प्रकल्पामध्ये जर आमच्या करदात्याचे पैसे डुबले तर या प्रकल्पाला आम्ही जबाबदार आहोत. आयुक्त साहेब,तुम्हांला मी विनंती करते की,तुम्ही स्वाभीमानाने काम करावे. कुलकर्णी साहेबांनी अजुनही व्यवस्थित केलेला नाही त्याच्यामध्ये मला अजुनही सांगायचे आहे की, ज्यावेळेला आम्ही पाणी पुर्नवापराचा ज्यावेळेस विचार करत होतो त्यावेळेस आम्ही प्रत्येक कंपनीला विचारत होतो त्यांना विचारा की,आमचं पुर्नवापर प्रक्रिया केलंलं पाणी घेणार का, तेंव्हा ते म्हणाले की,एमआयडीसी पेक्षा तुमचा रेट जास्त आहे त्यामुळे आम्हाला हे परवडणार नाही. आणि मग आज न शिकलेला शेतकरी जर त्याला शेती करायची असेल तर तो आधी शेतीचा करार करतो. जर काही नाविन्यपुर्ण काही करायचं असेल तर मी पिकवलेलं तुम्ही विकत घेणार असाल तर मी शेती पिकवतो. आणि जर तुम्ही एवढया मोठया गोष्टी करणार असाल तर त्या मार्केट मध्ये कुठे विकल्या जाणार आहेत हे तुम्ही पहिलं बघितलं पाहिजे. पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांना ३ वर्ष पाणी फुकट दिलं ना तर ते म्हणतील हे तुम्हीच पाणी प्या नको आम्हांला तुमचं पाणी नक्कीच याच्यामध्ये काही तरी घोटाळा आहे. पिंपरी चिंचवड शहरातील जेवढे ट्रिटमेंट प्लँन्ट आहे त्याची आपण नक्की पहाणी करावी. हे २/४ दिवस जाऊ द्या नंतर गुपचुप व्हीजीट करा. रात्री १.०० वा.जा, ट्रिटमेंट प्लँन्ट मध्ये हे पाहिजे तेवढं केमिकल टाकतात ते बघा. ते पाणी तेवढं शुध्द होतं का, आणि ते पाणी बाहेर आल्यानंतर ते नदीला जिथं सोडायचं तिथं सोडतात का, का,डायरेक्ट गाळचं येतो ते ही बघा. साहेब,मी तुमच्यावर बिल्कुल नाराज नाही. मी कोणत्याही अधिका-याचा लाड केलेला नाही. ना,कोणत्या अधिका-याला भेटले ना कोणत्या अधिका-याला आहेर दिला ना मी घेतला नाही तुम्ही बोललात म्हणुन मी बोलते. आयुक्त साहेब, हे पाणी एमआयडीसी मधील कोणतीही कंपनी घेणार नाही एवढा मोठा खर्च करुनही त्या पाण्याचा वापर होणार नाही. मगाशी पक्षनेत्यांनी सांगितलं की, सिंगापुरला रिसायकल केलेलं पाणी हे लोक पितात. त्याठिकाणी पाणीच नाही त्यामुळे ते लोक तेच पाणी पितात. फक्त सिंगापुरचं उदाहरण देवुन उपयोग नाही संपुर्ण युरोप देशामध्ये जा तुम्हांला ट्रिट केलेलं वॉटरच प्यावं लागेल. आपण तुलना कोणाशी करतो हे महत्वाचं नाही. आपण हा केलेला प्रोजेक्ट किती दिवस चालणार आहे हे महत्वाचं आहे. हे पण पाहिले पाहिजे. धन्यवाद.

**मा.अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आताच कुलकर्णी साहेबांनी सांगितल आहे की,आम्ही सभागृहामध्ये फक्त प्रशासकीय मान्यतेसाठी आलेलो आहोत. नंतर त्यांच म्हणणं आहे की,नंतर आम्ही प्रेझेंटेशन दाखवणार आहोत. दाखवायचा का नाही आणि हा विषय परत सभागृहामध्ये येईल की नाही हा पहिला मुद्या आहे. दुसरा मुद्या तुम्ही असं सांगितलं आहे की,टेक्नीकल डिटेल्समध्ये आपण नंतर जाणार आहे. कुलकर्णी साहेब, तुम्ही जो ६५४ कोटीचा आकडा

कसा आलेला आहे. त्याचा खुलासा करावा. जर तुम्ही डिटेल्स मध्ये गेले नाही तर ६५४ कोटीचा आकडा आला कसा? दुसरा मुद्या असा आहे की, तुम्ही ३०६ कि.मी.चं जाळं नेटवर्क करणार आहात तर मग कुठं तरी तुम्ही डिटेलमध्ये येणारचं नां, कुठल्या भागात तुम्ही जाळं टाकणार आहात उद्या असं आहे का, तुम्ही मुंबई-पुणे रस्त्यावर पाईपलाईन टाकणार आहात असं नाही तर तुम्ही या पाण्याची मागणी कोणा कोणाची आहे ती घेतली का, मगाशी पण बोलताना हेच विचारलं होतं की, तुम्ही जे रिसायकल वॉटरची रिक्वायरमेंट कोणाची आहे ती घेतली आहे का? हे पण या सभागृहाला माहिती झाल पाहिजे. याच्यामध्ये अजुन एक मुद्या अनुत्तरीत आहे की, जे पैसे उभे करणार आहात PPP किंवा HAM Mode l असे दिलेले आहेत. त्याच्यामध्ये तुम्ही असेही म्हणले आहे की, महापालिका ४० टक्के रक्कम देणार आहे. हे पैसे तुम्ही त्या ठेकेदाराला कशा पध्दतीने देणार आहात. आपण काय म्हणतोय की,आपण हे पाणी विकणार आहे त्यातुन जे पैसे मिळणार आहेत ते पैसे आपण त्या ठेकेदाराला देणार आहोत. अशा प्रकारचं आपलं नियोजन आहे. पण वस्तुस्थिती अशी आहे की, तुमच्याकडे आता काही नाही, तुमच्याकडनं कोण पाणी घेणार आहे त्याची यादी नाही. हा विषय एकदम मोघम पध्दतीने आणलेला आहे. या विषयाला फक्त प्रशासकीय मान्यता घ्यायची होती. काही तरी विषय आणुन त्याला या सभागृहाची मान्यता घ्यायची असं यामध्ये दिसत आहे. मी नामदेवरावांना मगाशीच म्हणलं की,तुम्ही या विषयामध्ये १०० टक्के खोलात गेलेले नाही. पहिल्यांदा आम्हांला चांगल वाटलं की, हा विषय चांगला आहे काळाची गरज आहे. पण या सगळया गोष्टीचा खुलास आयुक्त साहेब तुम्ही याच्या डिटेलमध्ये जा विषय मंजुर झाला असला तरी याच्यामध्ये घाई करु नका, पण याच्यामध्ये जर काही चुक झाली तर ही चुक निस्तरता, निस्तरता ५ वर्ष जाणार आहेत. बंद पाईपलाईनमध्ये आपले जसे पैसे अडकले आहेत त्याप्रमाणे हे अडकायला नको. त्यामुळे हा प्रकल्प विचारपुर्वक करावा. हा विषय पुढच्या जी.बी.ला मंजुर केला तरी काय फरक पडणार नाही. या प्रकल्पाचा डिटेल अभ्यास करा मगच हा विषय मंजुर करावा अशी माझी विनंती आहे.

**मा.बापु उर्फ शत्रुघ्न काटे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह ब-याच नगरसदस्यांच या विषयावर वेगवेगळं मत आहेत. आता कुलकर्णी साहेबांनी खुलासा केला आहे. त्याच बरोबर या विषयाचं या सभागृहामध्ये प्रेझेंटेशन द्यावं त्यानंतरआयुक्त साहेबांनी खुलासा केला तरी चालेल.

**मा.आयुक्त -** सन्मा.महापौर महोदया,सन्मा.सभागृह आज आपल्या सन्मा.सदस्यांनी जे मतप्रदर्शन केलेलं आहे निश्चित प्रकारे तुमचे जे कन्सर्न आहेत. हा प्रोजेक्ट होईल, नाही होईल कसा होईल मला वाटतं २०२५ मधलं एक मॉडर्न शहर करायचं म्हणतो किंवा त्याचा विचार करतो. तेंव्हा पाणी हे एक असा रिसोर्स आहे की, लिमिटेड आहे अनलिमिटेड नाही. त्यामुळे पाणी Reuse करणं गरजेचे आहे. आता आपण म्हणतो

की, हे होणार नाही आणि आपण ते चॅलेंज म्हणुन स्विकारलं पाहिजे असं मला वाटतं या प्रोजेक्टचं जे DPR आहे त्याचं Workout झालेलं आहे म्हणुनच त्याचा हा खर्चाचा आकडा आलेला आहे. इथे सभागृहामध्ये जे प्रपोजल मांडलेलं आहे की,पहिले ३ वर्ष आपण विनामुल्य पाणी देणार आहोत. त्याच्या मागचं कारण आहे की,हे पाणी वापरणं हे त्यांना अंगवळणी पडण्याकरीता त्यांना पुश करावं लागणार आहे. खुपच इश्युज असणार आहेत तर त्यादृष्टीने आपण जर पॉझीटीव्ह विचार केला तर आपण जे १०० एमएलडी पाणी Reuse करणार आहोत. म्हणजे हे १०० एमएलडी पाणी जनरेट होणार आहे. याच्यामध्ये आपण पर डे १५० लिटर पाणी वापरतो त्यातील ५० लिटर पिण्याचं पाणी सोडलं तर १०० लिटर जे पाणी आहे तेआपण वेगवेगळया कारणांसाठी वापरतो ते पाणी आपण रियुज करुन वापरता येऊ शकतं. याच्यामध्ये असं प्लॅनिंग आहे की, जो काही एरिया डेव्हलप होत आहे त्यामध्ये आपण डब्बल पाईपलाईन कंपलसरी केलेली आहे. त्यामुळे त्या एरिया मध्ये आपण हे कंम्पलसरी पाणी देणार आहोत. त्यांच्याकडे ऑप्शन नसणार आहे. डिमांडचा नसली तरी ते कंपलसरी असणार आहे. कारण ही काळाची गरज आहे आणि ते आपल्या नागरीकांना पुश करावं लागणार आहे. आणि मला वाटतं हे चॅलेंज आहे आणि ते आपण स्विकारलं पाहिजे. त्यानंतर इतर जो वापर आहे त्यामध्ये गार्डन आहे तर त्यादिवशी मी एकंदर जी रिक्वायरमेन्ट आहे ती वर्कआऊट झालेली आहे. त्यामुळे मला वाटतं सभागृहाने जो निर्णय घेतलेलाआहे तर निश्चितपणे आपले जे कंन्सर्न आहेत ते कन्सर्न लक्षात घेवुन आम्ही या प्रोजेक्टवर काम करु. आणि फयुचर मध्ये आपल्या या सभागृहाला वाटलं की, नाही,बाबा तुमचं या प्रोजेक्टविषयी काय चाललंय तर परत आपण या विषयी मा.महापौर यांना प्रेझेंटेशन देवु शकतो. तसं काही नाही. त्यानंतर आदरणीय मंगला मॅडमचा जो इश्यु आहे बंद पडलेला प्रकल्प आहे मी आपल्याला खात्री देतो की,त्याठिकाणी मी स्वत: येऊन त्याठिकाणी भेट देवु शकतो. तो प्रकल्प बंद पडला म्हणजे तो प्रकल्प अयशस्वी झाला असे नाही. आपण कुठे तरी चुकलेलो आहे,राहुन गेलेलो आहे तर ते आपण करु यात आणि फ्युचर मध्ये मला वाटत Recycle Water use आपल्या पृथ्वीला वाचवण्यासाठी खुप गरजेचं आहे. आणि आपण सगळयांनी त्याबद्दल कन्सर्न एक्सप्रेस केलेलं आहे. ते आम्ही नोट करतो आणि त्याला लक्षात घेवुन इथे कोणत्याही प्रकारचं वेस्टेज होणार नाही आणि हा प्रोजेक्टची अंमलबजावणी करण्याचे आश्वासन मी आपल्याला देतो. धन्यवाद.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आता आयुक्त साहेबांनी खुलासा देताना एक गोष्ट सांगितले आहे. मला वाटले तुम्ही चांगले प्रवचनकार आहात ज्या पध्दतीने आपण आता बोललात ते आपण रियुज,रिसायकल हे सगळे इथे म्हणालेत की, आम्ही हे सगळे शब्द लहानपणापासून ऐकत आहोत आणि त्या पध्दतीनं काम मात्र कुठल्याही कॉर्पोरेशनमध्ये होत नसेल कारण मागे आपण प्लॅस्टिक

बंदी केली पण ते प्लॅस्टिक बंदीच काम सुध्दा महापालिकेकडनं झालेलं नाही आमचा मुलभूत प्रश्न एकच आहे की, तुम्ही जे पाणी देणार आहात ते कॉर्पोरेशनच्या हद्दीतील सर्व नागरीक वापरणार आहेत का? आज मी याठिकाणी एक गृहिणी म्हणुन तुमच्याशी बोलते आहे. माझ्याकडचे कालचे शिळं पाणी असलेलं सुध्दा मी ओतून देते. माझ्याकडे असलेला कॉर्पोरेशनचा एक टॅब आणि माझा एक टॅब आणि माझ्याकडे असलेल्या पाण्याच्या टाकीचा एक टॅब असा आमच्यात जवळपास पीसीएमसीकडे लागलेला असतो. मी कॉर्पोरेशनचं आलेलं पाणी डायरेक्ट ज्या वेळेत येत असेल त्या वेळेमध्ये मी भरुन ठेवते. मात्र तेच पाणी माझ्या टाकीत जातं त्या टाकीतलं पाणी मी प्यायला वापरत नाही. मग साहेब,माझा एक प्रश्न आहे की, हे जर का तुम्ही कंम्पलसरी केलं तरी नागरीक त्याचा किती वापर करणार आहे याचं तरी उत्तर द्या. आयुक्त साहेब,आपण पीसीएमसी मध्ये बरेच मोठमोठे प्रोजेक्ट आणलेले आहेत हा प्रोजेक्ट सुध्दा खुप चांगलाच आहे. कारण या प्रोजेक्टची अंमलबजावणी करताना कुलकर्णी साहेबांना आम्ही डायरेक्ट बोलतो. मला वाटतं कुलकर्णी साहेब सुध्दा बिच्चारे आहेत. कारण त्यांच्याकडे मॅनपॉवर सुध्दा खुप कमी आहे. त्यांच्या डिपार्टमेंट असणा-या माणसाला सुध्दा घेवुन बसता येत नाही. कारण कुलकर्णीकडे पर्यावरण एक विभाग असेल तर तुम्हांला स्थापत्यची माणसं लागत असतील,पर्यावरणासाठी माणसं लागत असतील तर तुम्ही कर्मचा-यांची मागणी आयुक्त साहेबांकडे का करत नाही. तुमच्याकडे जेंव्हा एवढा मोठा प्रोजेक्ट येतोय तो प्रोजेक्ट यशस्वी करायचा असेल तर मला वाटत आयुक्त साहेब, तुम्हांला जुजबी उत्तर देवुन चालणार नाही. तर तुम्हांला चांगल्या पध्दतीनच काम करावं लागणार आहे. अजित गव्हाणे जे बोलले की, तुम्ही म्हणताय की, नाही हे आम्हांला माहित नाही. पूर्णपणे विषय जर वाचला तर सर्वसामान्य नागरीकांना सुध्दा याच्यामधलं सगळं कळतयं की,तुम्ही कुठल्या पध्दतीने यामध्ये फसवणुक करताय. हा प्रोजेक्ट करताना सर्व नगरसेवकांना मान राखला पाहिजे. मी सुध्दा सर्व नगरसेवकांचा मान राखूनच बोलते. ज्या पध्दतीने हे सगळं सांगितलं जात आहे गटनेते बसले,पक्षनेते बसले आम्हांला वाटतं प्रत्येक नगरसेवक हा कॉर्पोरेशनचा एक अविभाज्य भाग आहे. आम्हाला सुध्दा हे विषय कळले पाहिजेत. या प्रोजेक्टचं प्रेझेंटेशन आम्हांला द्या आणि त्यावर पुन्हा ऊहापोह करण्यासाठी आम्हाला वेळ द्यावा लागेल. आज माझ्या भगिनी मंगलाताईच्या वॉर्डात केलेल्या प्रोजेक्टचा वापर किती केला गेला याचा खुलासा कुलकर्णी साहेबांनी द्यावा. आज वायसीएमएच चा जो प्रोजेक्ट आहे त्याची पाईपलाईन करताना दरवाजावरुन,खिडक्यांवरुन पाईपलाईन घेवुन गेलेले आहेत त्याला फोर्सनी पाणी आले तर पाईप फुटतात. आपण काय करतो,कुठल्या पध्दतीने करतो याचा आपण अभ्यास केला पाहिजे. एवढे मोठे प्रोजेक्ट करताना फक्त प्रशासकीय मान्यता घेण्यासाठी तुम्हांला काहीही अधिकार नाही तुम्हांला आयुक्त साहेब प्रथम या प्रोजेक्टचं प्रेझेंटेशन द्या त्यानंतर त्याचा व्यवस्थित खुलासा करा आणि मग तुम्ही हे काम करा. एवढं बोलते जयहिंद, जयमहाराष्ट्र.

**मा.महापौर –** आज झालेल्या विषयाची बैठक घेण्यात येईल त्याच बरोबर मच्छरांचा जो त्रास आहे तो आपल्याला माहिती आहे. काही नगरसेवकांनी आपले मनोगत व्यक्त केलेलं आहे. आयुक्त आपण स्वत: ज्या नद्या आहेत पवना,इंद्रायणी,मुळा याठिकाणी आपण भेट द्यावी. काम चालू आहे पण हा जो मच्छराचा त्रास आहे तो नागरीकांना होणार नाही याची दक्षता घ्या. त्याच बरोबर काही जणांनी म्हणले आहे की,काही लोक वादळाने निवडुन आलेले आहेत हा शब्द प्रोसिडींगमधनं काढून टाकणेत यावा. त्याच बरोबर आयुक्त साहेबांकडनं एक शब्द चुकून गेला आहे तो ही शब्द प्रोसिडींगमधुन वगळणेत यावे.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक -४
दिनांक -१८/३/२०२१ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.अपर्णा डोके, मा.अश्विनी जाधव यांचा प्रस्ताव –
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८०२३,
दि.१३/०१/२०२१

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.४ दि.११/१२/२०२० अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सध्या निगडी, चिंचवड, संभाजीनगर, संत तुकारामनगर येथे संगीत अकादमी चालविल्या जातात. या संगीत अकादमी मध्ये शास्त्रीय गायन, सुगम गायन, तबलावादन, हार्मोनियम वादन इ. विषय शिकविले जातात. या संगीत अकादमीमध्ये प्रशिक्षित झालेल्या विद्यार्थ्यांना अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय, मुंबई या अधिकृत संस्थेमार्फत परीक्षेस बसविले जातात. संगीत अकादमी सुरु झाल्यापासून अद्याप पर्यंत अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय, मुंबई यांच्या प्रारंभिक ते विशारद या परीक्षांमध्ये अंदाजे १५०० विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. पिंपरी चिंचवड शहराचा आता स्मार्ट सिटी मध्ये समावेश झाला असून महापालिकेकडून नागरिकांच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत. शहरामध्ये सांस्कृतिक चळवळ निर्माण व्हावी तसेच नागरिकांचा सहभाग वाढविणे ही संकल्पना रुजण्यासाठी कला, संगीत अकादमीचे कामकाजाचा विस्तार करण्याची गरज निर्माण झाली आहे. पिंपरी चिंचवड शहरात कला, संगीत अकादमीचे काम निरंतर चालवण्यासाठी मा.महेश काळे, प्रख्यात भारतीय शास्त्रीय गायक यांनी दिनांक १ डिसेंबर २०२० रोजीच्या ई-मेल द्वारे पिंपरी चिंचवड परिसरातील विद्यार्थी व

उदयन्मुख कलाकारांना व्यासपीठ मिळवून देणेसाठी महेश काळे स्कुल ऑफ म्युझिक व म.न.पा.च्या संयुक्त विद्यमाने संगीत अकादमी चालू करणे व सदर अकदमी ही इतरांसाठी प्रेरणास्त्रोत ठरेल असे कळविले आहे.

सदर प्रस्तावात त्यांनी उल्लेख केलेल्या प्रमुख बाबी खालील प्रमाणे आहेत –

१) सद्याच्या प्रगत पिढीनूरुप अद्ययावत अभ्यास अंतर्भाव असलेला आभ्यासक्रम.

२) सध्याच्या पिढीनूसार व संगीत क्षेत्रात होणा-या विविध बदलास अनूसरुन राबविण्याची शैक्षणिक पद्धत.

३) अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापरकरुन शिक्षण देणे उदा. विविध संकेतस्थळावरील उपलब्ध असलेले ख्यातनाम कलाकारांचे माहितीपट

४) विद्यार्थ्यांना यु-ट्युबद्वारे नामांकित कलाकारांची, त्यांच्या घराण्यांची, रागांची माहिती उदा. नाट्यसंगीत, अभंग, ठुमरी, रबिंद्र संगीत इ. उपलब्ध होईल.

५) विद्यार्थ्यांचे WHATS APP ग्रुप तयार करुन त्यावर संगीत विषयक माहिती गोळा करुन ती इतर विद्यार्थ्यांबरोबर आदान – प्रदान करणे.

६) इंटरनेटवर मिळणा-या ध्वनिफित व लेख.

७) संगीत क्षेत्रातील विशेषतज्ञ प्राध्यापकांना आमंत्रित करुन विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करणे.

८) संगीत कार्यशाळेचे आयोजन करणे.

९) संगीत मैफिल / महोत्सवाचे आयोजन करणे.

१०) साऊंड इंजिनिअरींगचे आजच्या संगीतामध्ये असलेला प्रभाव आणि महत्व.

११) विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळणेकामी संगीत शिक्षकांच्या कामकाजाचे वेळोवेळी मुल्यमापन करणे.

१२) विद्यार्थ्यांच्या अडचणी व त्यांचे ध्येय प्राप्तीसाठी त्यांचे आभ्यासाचे मुल्यमापन व मार्गदर्शन.

१३) विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पोषक वातावरण तयार करणे.

१४) संगीत विद्यालयातील अंतर्भाव व्यवस्था उदा. स्वतंत्र रियाज कक्ष,

तांत्रिकदृष्ट्या अद्ययावत संगीत वर्ग, ग्रंथालय, प्रेक्षागृह, ध्वनिमुद्रण कक्ष, उपहारगृह, कलाकारांची राहण्याची व्यवस्था, पर्यावरणपुरक वातावरण.संगीत अकादमीचे कामकाजाचे प्राथमिक स्वरुप –

१) विद्यार्थ्यांसाठी नियमित संगीत वर्ग भरविणे.

२) शिक्षकांना प्रशिक्षण देणे.

३) विद्यार्थ्यांची सार्वजनिक कार्यक्रमाद्वारे वार्षिक प्रस्तुती.

४) संगीत कार्यशाळा / आमंत्रित तज्ञांचे तासिका वर्ग.

५) ग्रंथालय.

६) संगीत विषयक जोड शिक्षण.

७) संगीत महोत्सव व मैफल.

८) साऊंड इंजिनिअरींग.

९) शिष्यवृत्ती कार्यक्रम.

१०) पर्यावरण संवर्धन.

प्राथमिक स्त्रोत –

सदर प्रकल्पाचे अंमलबजावणी करतेवेळी महापालिकेचे ९ संगीत शिक्षक व अस्तित्वात असलेल्या जागेचा वापर करता येईल. त्याच बरोबरीने संपूर्ण संगीत अकादमीच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणेसाठी एका प्रशासकीय अधिका-याची व दोन जादा संगीत शिक्षकांची नियुक्ती करणे. तसेच सध्याची संगीत अकादमी जागेच्या दुरुस्तीसाठी र.रु.५.०० लक्ष ही खर्चाची मर्यादा राहील व टप्प्या-टप्प्याने अकादमीस योग्य त्या सुविधा म.न.पा. मार्फत निर्माण करणेत येतील. वरील बाबींच्या बरोबर प्रेक्षागृह, संगीत सभागृह, कार्यशाळेसाठी जागा व जाहिरातीसाठी आवश्यक स्त्रोत या सर्वांचा विचार वेळोवेळी करावा लागेल. सदर संगीत अकादमीत पहिल्या वर्षी ५०० विद्यार्थी, दुस-या वर्षी ७५० विद्यार्थी व तिस-या वर्षी १००० विद्यार्थी यांचा समावेश विचारात घेऊन प्रशासकीय व आवश्यक स्त्रोतांचे नियोजन करावे लागेल. तसेच मा.महेश काळे यांनी अतिरिक स्त्रोताबाबत प्रपत्र अ नुसार व संगीत अकामदमी करीता म.न.पा.च्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मोफत व म.न.पा. शाळेव्यतिरिक्त विद्यार्थ्यांसाठी र.रु.१०००/- अशी मासिक फी महेश काळे संगीत अकादमी आकारेल.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि महेश काळे स्कूल ऑफ म्युझिक यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी चिंचवड संगीत अकादमी चालविणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता घेणे आवश्यक आहे व या बाबत योग्य तो करारनामा मा.आयुक्त यांनी करावा व अकादमी चालविणे बाबतचे पूर्ण अधिकार मा.आयुक्त यांना राहिल. सबब, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि महेश काळे स्कूल ऑफ म्युझिक यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी चिंचवड स्कूल ऑफ म्युझिक, निगडी कलादालन येथे सुरु करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेची मा.क्रिडा कला साहीत्य व सांस्कृतिक समितीच्या सदस्यांची मागणी असलीतरी सदरचा विषय दप्तरी दाखल करणेत यावा.

**मा. ज्ञानदेव थोरात-** मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देतो.

**मा.नामदेव ढाके-** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- सदरचा विषय शहराच्या वैभवात वाढ करणारा असल्याने शहरामध्ये कलाकारांना या माध्यमातून व्यासपीठ मिळणार आहे त्यामुळे महेश काळे म्युझिक ऍ़कॅडमी निगडी यांच्या संयुक्त विद्यमाने मा. कला, क्रिडा साहित्य व सांस्कृतिक समिती सदस्यांच्या मान्यतेप्रमाणे तसेच मनपा शाळा व्यतिरीक्त विदयार्थ्यासाठी १०००/- ऐवजी ५००/- प्रमाणे मासिक फि आकारणेत येवून 'दप्तरी दाखल करणेकामी' हा शब्द वगळून हा विषय मंजूर करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.मंगला कदम** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह विषय दप्तरी दाखल करावा म्हणुन स्थायी समितीकडनं विषय आला म्हणुन स्थायी समितीचे सर्व सहकारी जुने मा.महापौर साहेब,विषय दप्तरी दाखल करण्याचा विषय आहे परंतु याच्यामध्ये मला कळलं नाही कोणा एकाचं नांव त्याच्यामध्ये आहे. म्हणुन हा विषय दप्तरी दाखल करत आहोत ज्यावेळेस एखादं टेंडर असतं आणि ते वाटून द्यायचं असत तशा पध्दतीने आज आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये जर आपल्याला चांगले गायक तयार व्हायचे असतील तर त्याच्यासाठी आपण प्रयत्न का करु नये. याच्यामध्ये महेश काळेनी त्यांनी त्याच्यामध्ये खुलासा केलेला आहे की, १००० रु.देणार असतील किंवा काय आज जर त्यांनी ठरवलं तर त्यांचे क्लासेस पिंपरी चिचवड,पुणे नाही तर ऑल वर्ल्ड मध्ये चालतात. आणि स्वर सागरच्या मिटींगमध्ये आम्ही ज्यावेळेला बघितलं त्यावेळेस त्यांची अशी इच्छा होती की, प्राधिकरणातील जे नाटयगृह आहे त्या नाटयगृहाच्या प्रिमायसेस मध्ये जी गाणं शिकणारी मुलं आहेत जसं साहेब,तुम्ही मगाशी सांगितलं नां व्हीजन असलं पाहिजे ते व्हीजन फक्त कमिशनर किंवा अधिका-यांना असुन चालत नाही तर शहरातल्या नागरीकांना सुध्दा तसं व्हीजन असतं. म्हणुन

सजेशन ऑब्जेक्शन घ्यायचं असतं आणि म्हणुन त्या मिटींगमध्ये महेश काळे यांनी सांगितलं की, पिंपरी चिंचवड मध्ये इतके कलाकार आहेत की, त्याच्यामध्ये आमची श्रावणी गायीका आहे,तिची आई पण गायीका आहे असे चिंचवड मध्ये खुप मोठे गायक आणि कलाकार आहेत. यांना जर व्यासपीठ मिळायचं असेल तर,आपल्याकडे कलाकार,गायक तयार करायचे असतील तर मला वाटतं महेश काळे यांच नांव आहे म्हणुन त्याला विरोध करण्याचं काही कारण नाही. महेश काळे आल्यानंतर जे काही कलाकार असतील भाऊसाहेब जास्त नाटयक्षेत्रामध्ये आहेत आणि त्या दृष्टीकोनातून हा विषय दप्तरी दाखल करण्याचं कारण मला समजलं पाहिजे. पिंपरी चिंचवड शहरामध्ये जेवढे संगीत क्लास चालतात मा.महापौर साहेब, तुम्ही गेली ४ वर्ष झाले या सभागृहात आहात तुम्हांला संगीत कला अकॅडमी यांनी कधी गॅदरींगला बोलावलं आहे का? की,आम्ही एवढे कलाकार इथे तयार केले. त्यांना महापालिकेचा पगार किती, आणि त्यांनी शिकवलेले विद्यार्थी या विद्यार्थ्यांची जर का आपल्याला सांगड घालायची असेल तर ती सांगड बसते का? माझ्या वॉर्डात सुध्दा संगीत अकॅडमी आहे, तिथेही विद्यार्थी शिकतात. वर्षाला १५० कलाकार तयार झाले किंवा गायक तयार झाले हा आख्खं पिंपरी चिंचवड शहर किंवा एका वर्गाच प्रशिक्षण नव्हे की, आम्ही एवढे विद्यार्थी तयार केले. कॉम्पीटीशन झालं पाहिजे.आज जर आपण ग्लोबल याचा विचार करणार असू तर १०० टक्के आज आमच्या कडची एक मुलगी ए.आर.रेहमान यांच्याकडे क्लासला जाते. हैद्राबादला ती मुलगी जाते, दिल्लीला त्यांचे क्लासेस चालू असतात महिनोन महिने तिच्या आई-वडीलांना तिथं वास्तव करण्याची परवानगी आहे. ती मुलगी तिथे शिकते. ज्यावेळेस तुम्ही हा विषय दप्तरी दाखल करण्याचा निर्णय घेतला त्यावेळेस आपल्या विद्यार्थ्यांचा विचार केला का? या पिंपरी चिंचवड शहराचं नांव फक्त उद्योग नगरी न रहाता वेगवेगळया पध्दतीने या शहराचे नावलौकिक झालं पाहिजे आणि त्याच्यामध्ये जर चांगले संगीतकार तयार झाले तर वाईट वाटण्याचं कारण काय आणि म्हणुन हा विषय दप्तरी दाखल करण्याच्या ऐवजी तहकुब करुन त्यावर अभ्यास करणेत यावा. आज महेश काळे यांचे गाणी ऐकण्यासाठी लोक कुठून,कुठून येतात. कशासाठी हा विषय दप्तरी दाखल करायचा आपल्या शाळेतल्या शिक्षकांना कॉम्पीटीशन म्हणुन ती लोकं आलीच पाहिजे. आपल्याकडे चांगले चांगले विद्यार्थी हे घडलेच पाहिजेत. मा.महापौर तुम्हांला आता जर काही निर्णय घेता येत नसेल तर हा विषय तहकुब करावा पुढच्या मिटींगला अभ्यास करुन त्यावर निर्णय घ्यावा. एखादया कलाकाराच्या नावानिशी आलेला विषय आहे याचाच अर्थ आपण त्याचा अपमान करण्यासारखं होतं आणि त्याच्यासारख्या व्यक्तीचा अपमान आहे. महेश काळे हे आपल्या महाराष्ट्राची आणि देशाची शान आहे. अशा माणसांच्या नावानिशी आलेला ठराव दप्तरी दाखल करायचा हे योग्य नाही. मा.महापौर तुम्हांला जर विषय तहकुब करायचा असेल तर अभ्यास करण्यासाठी करा.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह विषय क्र.४ वर चर्चा चालू आहे आणि विषय क्र.४ दप्तरी दाखल करण्याची उपसूचना मा.पक्षनेते देणारच आहेत. परंतु त्याच बरोबर मंगलाताई असतील,सुजाताताई असतील या दोन्ही ताईंना विनंती आहे की, आमच्याकडचे शब्दच तसे असतात मी काही कमिशनरसाहेबांची बाजू घेत नाही. अहो, खरंच सांगते पण तो शब्द त्यांना तसा उच्चारायचा नसेल,त्याला समर्पक शब्द सापडला नाही, गावाकडे आम्ही जे ओघाने बोलतो तसंच त्यांच्याकडनं तो शब्द गेलेला आहे. याठिकाणी आयुक्त साहेबांच्या शब्दांचा खेळ न करता याठिकाणी त्यांची जी प्रामाणिक कारणं आहेत ती सुध्दा आपण समजून घेतली पाहिजे. आयुक्त साहेब,आपण पुस्तकी शब्द वापरायला सुरुवात करावी. अशी विनंती आहे. आणि मा.महापौर साहेब, या विषयामध्ये जरी महेश काळे यांच नांव असलं तरी मला असं वाटत की,आपल्या या शहरामध्ये सुध्दा अनेक चांगली लोक काम करतात त्यांना सुध्दा मुभा असली पाहिजे. म्हणजे सगळयांना सामावून घेणारा असा एखादा कलाकार मी मा.पक्षनेत्यांना विनंती केली की, या विषयातील शेवटची ओळ दप्तरी दाखल करण्याची ओळ काढून टाकावी आणि तशी आपण उपसूचना देणारच आहे. मा.मंगलाताई आणि सुजाताताई या दोघींच्याही भावनांचा पूर्ण आदर करुन आपण कमिशनर साहेबांना सुध्दा आम्ही सांगितलेलं आहे, सांभाळून घेऊ या. काही काम करुन घेण्यासाठी त्यांना आपण वेळ दिला पाहिजे. या मताची मी पण आहे. आता आम्ही ठरवलं आहे की, काही दिवस झाल्यानंतर आम्हांला त्या विषयावर बोलायचं आहे.धन्यवाद.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह याठिकाणी जो विषय आहे संगीत कला अकॅडमी अनेक वर्षापासून चालवतोय मला वाटतयं मला पडलेले प्रश्न गेल्या वेळी मी क्रीडा समितीमध्ये असताना आम्ही २६ जानेवारीला एक कार्यक्रम घेतला त्यात एक सुरेखता आली. त्यावेळेला त्या संगीत अकॅडमीमध्ये काम करणा-या संगीत शिक्षकांचा अगदी कस लावून त्यांनी हा कार्यक्रम केला. तरी सुध्दा एक प्रश्न आहे की, संगीत कला अकॅडमी मध्ये आतापर्यंत शिकलेले विद्यार्थी किती आहेत. आतापर्यंत अकॅडमीमध्ये असलेल्या शिक्षकांची प्रत्येक वेळेला चाचपणी झाली का? खोटया पध्दतीने शिक्षक भरले जातात. कोणत्या पध्दतीनं कोणता शिक्षक काय काम करतं किती शिक्षक हे शिकवत असतील तर त्यांचे किती शिष्य आहेत याची आपण कधी चाचपणी केली आहे का? मुळात गेल्यावेळेस संगीत अकॅडमीचे जेवढे शिक्षक आहेत. ते थोडेसे अधांतरीच होते. आणि कला,क्रिडा,साहित्य हे जनरल नांव माझे सहकारी जितेंद्र ननावरे असताना साहित्य हे असं नांव जोडलं गेलं आहे. आणि ती संगीत कला अकॅडमी ही कलर,क्रीडा,साहित्यामध्ये मर्ज झाली. पिंपरी चिंचवड शहर हे औद्योगिक नगरी आहे या औद्योगिक नगरीबरोबरचं आपण पर्यटन स्थळ प्रोजेक्ट पण राबवतोय की बाहेरचे लोकांनी येऊन आपले प्रोजेक्ट पाहिजेत. तसेच पिंपरी चिंचवड मधील सांस्कृतिक देवाण-घेवाण पण झाली पाहिजे. पिंपरी चिंचवड संगीत अकॅडमीचं नांव

वगळुन आपण संगीत,कला आणि नृत्य हे नांव या पध्दतीने केलं पाहिजे. असे हे संगीताचेच प्रकार नाही तबला,पेटी चालवली पाहिजे असं नाही. पण बरेचसे गुरु आहेत ज्या पध्दतीने आपण नृत्य प्रकार आहे,शास्त्रीय नृत्य प्रकार आहे. हे सुध्दा आपल्याकडे शिकवले गेले पाहिजे. आज ज्या पध्दतीने गुरुकुल सिस्टीम राबवली जाते. आज आपण म्हणतो ज्ञान प्रबोधिनी सारखी गुरुकूल सिस्टीम आपल्याकडे आहे. मग एखादया सांस्कृतिक देवाण-घेवाणसाठी आपण पीसीएमसी मध्ये आपली एवढी लोकसंख्या असताना इथे एखादी सांस्कृतिक देवाण-घेवाणसाठी गुरुकुल सिस्टीम का होऊ नये. मा.महापौर,मा.आयुक्त यांना माझी नम्र विनंती आहे की, सांस्कृतिक गुरुकुल अकॅडमी एखादी सुरु करावी. मला वाटतं तुपे साहेब हे स्वर सागरचे कार्यक्रम तेच घेत होते. आणि हे सगळे कार्यक्रम आमच्या मंगलाताईच्याच वॉर्डामध्ये जातात. मग आमच्याकडे काही लोक नाहीत का, मा.महापौर, आपले जेवढे ८ प्रभाग आहेत त्या प्रभागामध्ये जे नाटयगृह आहेत त्याच्या मध्ये दरवर्षी स्वर सागरचा कार्यक्रम घेतला गेला पाहिजे. आज आपण कॉम्पीटीशन का घेतोय मला वाटतयं आपण गणपती महोत्सव घेत होतो त्यावेळेला सुध्दा आम्ही संत तुकाराम नगरमध्ये जसा कार्यक्रम घेतो तसे वेगवेगळया प्रभागामध्ये आपण चालना देण्यासाठी चांगल्या,चांगल्या स्पर्धा चालू केल्या पाहिजेत. संगीत अकॅडमी बरोबर महेश काळेचं नांव जोडलं जाणं मलाच नाही तर संपुर्ण पिंपरी चिंचवड शहरासाठी ही भाग्याची गोष्ट आहे. आज जर आम्हांला महेश काळेंचा कार्यक्रम घ्यायचा असेल तर मला वाटतं तिकीटाचे जे काही पैसे असतील ते आम्ही इथं देतो आणि कार्यक्रमाला जातो. अशा माणसांच्या हातामध्ये जेंव्हा ही धुरा जाईल तेंव्हा या पिंपरी चिंचवड शहराचं नांव सांस्कृतिक जडण-घडणीमध्ये चांगल्या अग्रेसर क्रमांकावर जाईल. माई,माझे तुम्हांला सांगणं आहे की, पिंपरी चिंचवड शहरामध्ये एक छानसं गुरुकुल सांस्कृतिक देवाण-घेवाण साठी आपण सुरु करावं आणि या शहरातील सांस्कृतिक भूक भागवण्यासाठी हे फार मोठं कार्य होईल. एवढंच बोलते आणि थांबते जयहिंद,जयमहाराष्ट्र.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह सुजाताताईंनी जी सूचना मांडलेली आहे त्याला माझं अनुमोदन आहे. खरंतर माई, हा विषय आपल्या पिंपरी चिंचवड शहराच्या नावलौकिकामध्ये भर पाडणारा विषय आहे. आज आपल्याकडे सगळया बिल्डींग झाल्या असल्या कारणाने क्रिंडागणामध्ये तुम्ही आम्ही बाहेर खेळले असु तसे खेळ मुलांना खेळताना पहायला मिळत नाही. याचं कारण आहे की,आपले जे क्रिंडांगणे जी आहेत ती मुलांसाठी कुठेच उपलब्ध होत नाहीत. कमिशनर साहेब, शहरातील जेवढी क्रिंडागणे आहेत या सगळयांची पहाणी करा. या शहरातील विद्यार्थी ही नवी पिढी आहे ती घडवण्याचं काम या शहराच्या माध्यमातून होत असतं. त्याच ठिकाणी आपल्याला दिसेल की,काय दंडमशाही चालू असते एक ठराविक गट किंवा त्याठिकाणी विविध प्रकारच्या लोकांनी त्यावर अतिक्रमण केलेलं आहे. सन्मा.महापौर साहेब, याच विषयाबरोबर आपण क्रीडा विषयाकडे सुध्दा वळलं

पाहिजे. आणि त्याठिकाणी जी शहरामधील आपल्या मुलांना घडवतील अशा लोकांना त्यामध्ये आंतर्भूत करुन त्यांना आर्थीक फायदा होतो की नाही हे काही तुमचं किंवा माझं नाही परंतु त्याच बरोबर माझ्या शहरातील किती क्रिंडागणे आहेत त्याठिकाणी वेगवेगळया प्रकारचे चुकीचे प्रकार घडताना पहायला मिळतात. मध्यंतरी मी आपल्या साहेबांना बोलवून घेतलं होत आणि त्यांना सांगितलं की, हे काय चाललं आहे हे बघा. त्याठिकाणी आपली प्रॉपर्टी आहे आणि त्याठिकाणी आपली सिक्युरिटी नाही आणि खाजगी सिक्युरिटी पण नाही. आणि मग अशा वेळेला या सगळया गोष्टींचा कुठं तरी अंतर्भाव केला पाहिजे. जेणेकरुन या शहरातील विद्यार्थी किंवा नवी पिढी घडली पाहिजे. त्यामुळे सर्व क्रिंडागणचा विषय घ्या. त्याठिकाणी बॅडमिंटन हॉल असतील, क्रिंडागणे असतील हे सर्व आपल्या शहराचे नावलौकिक आहे. या शहराच्या नावलौकिकाला आणि त्याला मुकूट घालण्याचं जे काम आहे ते आपल्या महापालिकेमार्फत झालं पाहिजे. त्यादृष्टीने जसं संगीत कला अकॅडमीचा जसा विषय घेतला आहे तसंच या विषयाला अंतर्भूत करुन घ्यावं अशी विनंती करते आणि थांबते.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह थोडं फार कला क्षेत्राचं समजत म्हणुन बोलू इच्छितो. पिंपरी चिंचवड महापालिकेची परंपरा आहे. नगरसेवक सोडून ज्याला काही कळत नाही त्याला तर जास्त इंटरेस्ट असतो. आणि तो बोलण्याचा अधिकार प्राप्त केलेला आहे. आज मी गेली २५ वर्ष झालं नाटयपरिषदेचा अध्यक्ष आहे. त्यामुळे मी अजुनही शिकत आहे. या महानगरपालिकेमध्ये दुकान म्हणुन काढलं जात आहे कलाकार म्हणुन नाही,कलावंत म्हणुन नाही. माई,अनिता फरांदे महापौर झाल्या होत्या त्यावेळेस पिंपरी चिंचवड महोत्सव सुरु होता. पहिलं मला त्या अनितातार्ईनी बोलावलं तुम्ही हे पहाताय त्यावेळेस ५० लाख,६० लाख खर्च व्हायचा. त्यावेळेस मी १५ लाख रु.मध्ये हा महोत्सव साजरा केला होता त्यावेळेस पासून मला या पिंपरी चिंचवड महोत्सवापासून हद्दपार केलं आहे. काही दुकानदार मंडळी एवढा मोठा खर्च करत होती आणि मी त्यांची दुकानदारी बंद केली. एक तरी असं क्षेत्र असावं की,तिथं नतमस्तक करुन,पाया पडून सेवा करावी. ही महापालिकेमध्ये परंपरा आजपर्यंत नाही. आणि मी या सभागृहामध्ये २५ वर्ष आहे. ज्याला काही समजत नाही, काही नाही, कोण तरी अधिकारी पुढं येतो, कोणाच्या तरी ओळखीचा असतो आपल्याकडे कलावंताना जर आपण म्हणले नां तुम्ही येता का ? त्यांना ५ हजारच्या ऐवजी ५ लाख सांगा नां, त्यातले २.५० लाख रु.मला दे हे सगळे धंदेवाईक आहेत. माई,मी हे अत्यंत गंभीरपणाने बोलतोय. आणि मला प्रसिध्दीपत्राची गरज नाही. मी कला क्षेत्रामध्ये काय केलं आहे. ४ चित्रपटाची निर्मीती, २ व्यवसायिक नाटकं, ५ हौशी नाटकं, एकांकीका काय नाही म्हणुन केलं नाही. भारता मध्ये आशा भोसले अवॉर्ड फक्त आमच्या सारखे कार्यकर्ते मी म्हणजे आम्ही, आम्ही सर्वजण यामध्ये मला मदत करणा-याचा प्रत्येकाचा सहभाग आहे. आणि मला लता मंगेशकर,हृदयनाथ मंगेशकर, पवार साहेब सगळेजण ओळखतात त्यामुळे मला प्रसिध्दीपत्राची गरजच नाही. पण हे जे

चाललं आहे ते खुप धोकादायक आहे. मी सर्वसामान्यांना सांगु इच्छितो की, ९७ साली पुरस्कार दिला होता आणि सत्ता कोसळली होती. एवढी आपल्या महापालिकेला सांस्कृतिक परंपरा आहे. तुम्ही कोणताही विषय आणत असताना म्हणजे केशवराव भोसले असतील,बालगंधर्व असतील, हृदयनाथ मंगेशकर असतील, संगीत नाटय क्षेत्राची मी परंपरा सुरु केलेली आहे. त्यातील नवीन पिढीचे तीनच्या तीन गायक आहेत. त्यात राहूल देशपांडे,महेश काळे, जितेंद्र अभिषेकी कोणतंही धोरण ठरवताना तुम्ही कोणत्याही व्यक्तीचं नांव जर टाकुन आणला आणि तो फेटाळला तर त्याचे आंतरराष्ट्रीय स्तरावर परिणाम होत असतात. महाराष्ट्रात अनेक तज्ञ,विद्वान माणसं आहेत त्यामुळं त्याच्या बुध्दीमतेच्या खोलात जातच नाही त्यामुळे मी त्यांना शिकवतच नाही. मी आपला साधा कार्यकर्ता आहे परंतु मी नेहमी सांगतो,आजही वेळ गेलेली नाही. या शहरामध्ये आजही संगीत नाटक असेल, भरतनाटय असेल, कथ्थक असेल अनेक याच्यामध्ये प्रकार आहेत सुगम संगीत असेल,शास्त्रीय संगीत असेल या सगळया प्रकारासाठी याठिकाणी तज्ञ माणसं आहेत. मी या सभागृहात भाषण करुन निर्णय घेण्यापेक्षा मी वैयक्तीक किती वेळा सांगितलं की, एक समिती नेमा  माई,मी पुर्ण शिकलो आहे असे म्हणत नाही मी  शिकतोय आता तर २५ वर्ष झाली आहेत अजुन ५० व्हायची आहेत  अजुन ब-याच जणांचा कार्यक्रम करायचा आहे. तेंव्हा या सगळया गोष्टीचं भान ठेवुन आपण हे सगळं करत असताना महेश काळे हे नांव का टाकलं गेलं तुम्ही एक धोरण ठरवुन आम्ही एक प्रपोजल पुढं करु, माई,तुम्ही या शहराचे महापौर आहात मग तुम्ही कोणाला बोलावलं पाहिजे. शहरात संगीत नाटकाचं काम कोण करतयं तुम्हाला काय दिशा द्यायची आहे,काय योग्य वाटतयं, काय योग्य केलं पाहिजे आपल्याला सगळं कळतयं टेबलावर बसुन निविदा प्रक्रिया करणारी मंडळी जर साहित्य क्षेत्राबद्दल जर बोलायला लागली.त्यामुळे कोण बोलतयं, काय बोलतयं खरं सांगा नां त्यावेळेस मी तुमचं अभिनंदन करतो नां. एखादी संस्था जर चालवायची असेल तर त्याच्या सोबत आपल्याला काही करता येईल का, त्यावर आपल्याला काही मार्ग काढता येईल का, संगीत अकॅडमी चालू द्या. मी महोत्सव घेतला म्हणजे मला सगळं कळत असं नाही.मी आजही सांगतो की,मला अजुनही कळत नाही हे मी स्पष्टपणे जाहीर सांगतो. अहो,हे खुप मोठं शास्त्र आहे ही अनेक वर्षापासूनची परंपरा आहे. खुप नाटकं करतात, नाटयशास्त्र आहे नाटय आयुष्य करतो,व्यक्तीमत्वाचा विकास होतो. माणुस कसा जगतो, कसं वागावं हे एक शास्त्र आहे. जे नाटकं करतात नां त्यांचा मी अध्यक्ष आहे. असं मी तुच्छतेने बोलतो म्हणजे मला कळतचं नसल्यामुळे मी असंच बोलणार ना, त्यामुळे आम्ही सर्व अज्ञानी आहात,मी तरी अज्ञानी आहे. माई, एक कमिटी करावी. माई, महेश काळेचं नांव उद्याच्या पेपरला आलं तर महेश काळे हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे आहेत आणि हे नवीन पिढीचे नायक आहेत. राहूल देशपांडे हे वसंतराव देशपांडे यांचे नातू जितेंद्र अभिषेकी यांचे चिरंजीव  या माणसांनी संगीत नाटय  जिवंत ठेवलेली आहेत. असं कोणी म्हणायचं केशवराव भोसलेची आक्रमकता,बालगंधर्वची नजाकता, दिनानाथ मंगेशकर ही संगीत नाटय क्षेत्रातील परंपरा  आहे. आम्हांला त्या कमिटीमध्ये घेवु नका,आम्हांला

काही कळत नाही. पण ज्यांना कळतं त्यांच्या सहवासात मी आहे. म्हणुन माई,हा विषय दप्तरी दाखल केला तर याचे आंतरराष्ट्रीय स्तरावर याचे पडसाद उमटतील. जर तुम्हांला हा विषय अभ्यास करुन परत आणायचा असेल तर असं मी विनंती करतो की,महेश काळेनी स्विकारलं त्याचा आदर ठेवुन आम्ही त्यांना परत बोलावून त्यांच काय म्हणणं आहे ते घेऊन आपल्याला काय धोरण ठरवता येईल अशी काही तरी वाक्यरचना करुन आपल्या महापालिकेची प्रतिमा चांगली राहील. तुम्हांला कल्पना नसेल, महापालिकेचा एक अधिकारी होता एका मोठया गायिकाना म्हणले खाजगीमध्ये आपण म्हणतो तुमचं मानधन किती आहे. तर त्या अधिका-याने त्यांना काय म्हणले तुमचा रेट किती आहे. त्यानंतर ते या पिंपरी चिंचवड मध्ये आले नाहीत. त्याला त्यानंतर आणलं फक्त मी, असं काही तरी बोलायचं हे योग्य नाही. ज्या क्षेत्रातील माणसं आहेत शास्त्राचं काम आपणच करायचं, डॉक्टरांच काम पण आपणचं करायचं, इंजिनियरींगच काम पण आपणचं करायचं मग त्यांनी काय करायचं माई,मी एक ठराव दिला होता त्याचं कोणालाच सिरीएसनेस नाही. फक्त याठिकाणी हा ठराव पास करा,त्याच्या अटी/शर्ती या करा, नुसता धुमाकुळ चालला आहे. पत्र द्या आणि मला हे आता,आता कळायला लागलं आहे. मी कधी निविदा प्रक्रियेत कधी भाग घेतलेला नाही. माझा मावस भाऊ आहे तो मला सांगत असतो की,हे असे,असे करतात त्यांना दोष देत होते म्हणुन मी सपोर्ट करतो. माई, या विषयावर अतिशय गांर्भीयपुर्वक बोलतो हा सेन्शिटीव्ह विषय आहे. तो सहज घेवु नका महेश काळेचं नांव घेवुन असा विषय आणायलाच नको होता. परंतु आता आला आहे तर तो मंजुर केला तरी चालेल. आणि याचा अधिकार आयुक्तांना द्या. धन्यवाद.

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह क्रिडा समितीच्या वतीने जो विषय याठिकाणी आलेला आहे. त्यामुळे मी सर्वांना सांगू इच्छितो की, आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये ४ संगीत अकॅडमी आहेत. क्रिडा समितीला फक्त क्रिडा म्हणुन संबोधलं जातं. परंतु आमच्या समितीचं असं काम आहे की, सांस्कृतिक असो, कला असो किंवा क्रिडा असो प्रत्येकाला समान न्याय देण्याचं काम आमचे ९ सदस्य करतात. यामध्ये निगडी याठिकाणी मी स्वत: जाऊन भेट दिलेली आहे. सर्व शिक्षकांबरोबर जवळ,जवळ ४/५ महिने गेलेले आहेत. चिंचवड असेल,संभाजीनगर असेल,संत तुकारामनगर असेल याठिकाणी आपल्या संगीत अकॅडमी आहेत. १२ शिक्षक त्याठिकाणी कार्यरत आहेत समितीच्या मार्फत कमीत कमी क्षेत्रीय कार्यालयानुसार ८ संगीत अकॅडमी करण्याचा ठराव पण मंजुर झालेलाआहे. त्याच्यामध्ये नवीन ८ संगीत अकॅडमी उभारण्यासाठी त्याला २४ शिक्षकांची गरज आहे. त्याचाही ठराव मान्य होऊन मा.आयुक्त साहेबांकडे प्रस्ताव येईल. त्यानंतर या कमिटीमध्ये परिक्षण केंद्र आणि वाचनालये हे ही याठिकाणी मर्ज करुन घेण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत. त्याच प्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये गोवा या राज्याच्या ठिकाणी एक सुसज्ज अशी देशातील एक चांगली संगीत अकॅडमी आयोजित केली होती. त्या धर्तीवर

महानगरपालिकेच्या एखादया चांगल्या जागेत किंवा विकसित करण्यात येणा-या जागेमध्ये एखादा संगीत अकॅडमी करता येईल. असं आम्ही क्रिडा समिती आणि क्रिडा स्थापत्यच्या वतीने या बजेट मध्ये तरतुद ठेवुन हेड ओपन करुन यावर्षी पुर्ण करण्याचा मानस आहे. हा विषय दोन वेळा जी.बी.मधुन माघारी आला भाऊसाहेब,मला दोन तीन वेळा बोलले कसा आहे विषय त्यानंतर माझीही पक्षनेत्या बरोबर चर्चा झाली आणि तो विषय उपसूचनेसह मंजुर करावा याच्यामुळे क्रिडा बरोबर शहराची सांस्कृतिकही ओळख झाली पाहिजे. असा समितीचा मानस आहे. आणि याठिकाणी थांबतो.धन्यवाद.

**मा.राहुल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले नगरसेवक, नगरसेविका. भाऊसाहेबांनी सांगीतल की हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. ललीत अकॅडेमी सारखा संस्था म्हणजे जशी पुण्यात एकटी आहे त्या धरतीवर पिंपरी चिंचवड शहरात होती. हे होत असताना शहरातील सांस्कृतीक जडणघडण होणं ही कला शहरासाठी चांगली आहे. पण ज्यावेळेस स्थायी समितीला हा विषय झाला होता त्यावेळेस महेश काळे या नावाला किंवा अशा कुठल्याही गोष्टीला विरोध नव्हता. परंतु ऑनलाईन पध्दतीने त्यांनी मागणी केली आणि विषय आला. दिनांक १ डिसेंबर २०२० रोजीच्या ई-मेल द्वारे पिंपरी चिंचवड परिसरातील विद्यार्थी व उदयन्मुख कलाकारांना व्यासपीठ मिळवून देणेसाठी महेश काळे स्कुल ऑफ म्युझिक व म.न.पा.च्या संयुक्त विद्यमाने संगीत अकादमी चालू करणे. एकचा उद्देश होता की एवढा मोठा प्रोजेक्ट राबवत असताना, खरच जस भाऊसाहेबांनी सांगीतल त्यातले तज्ञ लोक असतील, महत्वाचे लोक असतील त्यांना एकत्र बसवा जे जे संगीत क्षेत्रात काम करतात त्यांना एकत्रीत बसवा. महेशजी काळे यांचेसारखे अजून कुणी असतीलतर भाऊसाहेबांनी सांगीतल तसं त्यांच्याहीपेक्षा श्रेष्ठ आणि ज्येष्ठ व्यक्ती त्या क्षेत्रात आहेत त्या सर्वांना आपण बोलवून त्यांच देखील मार्गदर्शन घ्याव हाच त्या मागचा एक हेतू होता. मला वाटते नंदकुमार कपोते आणि त्यांची टिम ही देखील आज काम करते. परंतु या शहरात काही गोष्टी आम्ही पण पाहील्यात कुठतरी संगीताच्या नावाखाली स्वत:चे प्रायव्हेट कार्यक्रम घ्यायचे आणि कुठेतरी स्व:ला प्रसिध्दी मिळवायची असं न करता खरच या शहरातल्या मुलांना या शहरात संगीत क्षेत्रात शिकायच ती मुल घडली पाहीजेत त्यांची जडणघडण झाली पाहीजेत या प्रकारे ही अकॅडमी जर चालवलीतर निश्चितच त्याचा फायदा शहराला होईल. आम्हांला महेश काळे या नावाला विरोध नाही आणि कुणालाच विरोध नाही परंतु एका ई-मेल द्वारे मागणी होती त्यापेक्षा साहेब आपण त्यांची बैठक घेतली पाहीजे, माईने बैठक घेतली पाहीजे, त्या क्षेत्रातील जे तज्ञ लोक आहेत त्यांना बोलवल पाहीजे त्यांच्या काय सूचना आहेत त्याचा अंतर्भाव केला पाहीजे. आपण आपल्या क्षेत्रातील एक वास्तू त्यांच्या ताब्यात देतो आपली मुल घडणार आहेत, त्यांची फिज आहे मग ती चालणार कशी. नाहीतर परत अस नको व्हायला की येथून माग घडल. कुठतरी अकॅडमी करायची आणि स्वत:चे प्रायव्हेट कार्यक्रम करायचे असं न होता याची अतीशय चांगल्या प्रकारे याच डिझाईन झाल पाहीजे. त्यात शिक्षक

किती, मुल किती त्यांना तुम्ही काय करणार, महापालिकेच्या शाळेतील मुल त्यांना काय करणार, प्रायव्हेटच काय. आज जस ताईनी सांगीतल की मुल मुंबईला जातात, परदेशात जातात इकड तीकड जावुन संगीत शिकतात. अस असताना साहेब आज आपल्याकड इन्फ्रास्ट्रक्चर आहे आपल्या शहराची आर्थीक परिस्थिती एकदम चांगली आहे. उत्तमरावानी सांगीतल त्यांनी पण खुप ऊहापोह केला, अभ्यास केला पण ई-मेल पेक्षा तुम्ही तज्ञ लोकांच्या बैठका घ्या जस मगाशी संदीपनी इन्व्हायरमेंटमध्ये त्याची इच्छा राहून गेली तशी अजून कुणाची पण इच्छा गेली तो विषय नाही पण हा संगीताशी संबंधीत विषय आहे. भाऊसाहेबासारखे ज्येष्ठ नेते सभागृहात आहेत त्यांचा तर त्या फिल्डशी संबंध आहे त्यांना तुम्ही विश्वासात घ्या. कुठल्याही संगीतकाराच्या कुठल्याही मोठया नावाला विरोध करण्याचा या सभागृहाचा मानस नाही किंवा आमचा कुणाचाही नाही परंतु कुठेतरी ई-मेलद्वारे मागणी केली आणि प्रस्ताव याठिकाणी आला परंतु त्याच व्यवस्थित डॉकेट आल पाहीजे, व्यवस्थित अभ्यास झाला पाहीजे तज्ञ लोक त्याच्यावर पाहीजेत आणि अशाप्रकारे हा विषय करण हे आपल्यासाठी देखील एक मानाचा तुरा आहे. हे होत असताना कुणाचाही अपमान झाला नाही पाहीजे याची दखल सभागृहाने याठिकाणी घ्यावी आणि आपण योग्य ते निर्णय या विषयावर दयावेत ही विनंती करतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले नगरसेवक, नगरसेविका. विषय क्रमाक चार हा चांगला विषय या सभागृहामध्ये आलेला आहे आणि मला असं वाटत भाऊसाहेबांनी सांगीतल, मंगलाताईनी सांगीतल, क्रिडा सभापती उत्तम केंदळे यांनी सुध्दा या विषयाच्या संदर्भामध्ये माहीती दिली.पिंपरी चिंचवड शहराच नावच कामार नगरी आहे परंतु या शहराच्या वैभवामध्ये येणा-या काळामध्ये आणि मागच्या काळामध्ये आपण जर बघीतलतर आपण धनराज पिल्लेंच्या माध्यमातून एक हॉकीची अकॅडमी त्यांना दिलेली आहे आणि चांगले खेळाडू या अकॅडमीच्या माध्यमातून घडलेले दिसतात. आपल्या राज्यस्तरावरील, देशामध्ये चांगल्याप्रकारचे खेळाडू या अकॅडमीच्या माध्यमातून तयार होतात. तसेच आपण थेरगाव मध्ये बघीतल असेल व्यंगसरकर अकॅडमीच्या माध्यमातून क्रिकेटमध्ये ज्यांनी नावलौकीक केल अशी व्यंगसरकर अकॅडमी आपण महापालिकेच्या माध्यमातून याठिकाणी दिली गेलेली आहे आणि मला असं वाटत की राज्यामध्ये रंजीमध्ये खेळणारे सुध्दा खेळाडू व्यंगसरकर अकॅडमीच्या माध्यमातून त्याठिकाणी तयार होतात. खर म्हणजे भाऊसाहेबांनी सांगीतल की नावानिशी हा विषय याठिकाणी यायला नव्हता पाहीजे परंतु ठिक आहे सभागृहाचा उद्देश क्लेअर आहे की या शहराच्या वैभवामध्ये जर ख-या अर्थाने सांस्कृतिक नगरी म्हणून आपल्याला ओळख करायची असेल मी तुम्हांला गेल्या अनेक वर्षापासून बघतो की सांस्कृतिक क्षेत्रामध्ये एक चांगल काम तुमच्या माध्यमातून या शहरामध्ये होत. मी नाव जर घेतली तर दोन डझन नाव मी याठिकाणी सांगू शकतो की आपल्या माध्यमातून या शहरामध्ये चांगले कलाकार घडवण्याचकाम आपली अखिल भारतीय नाटयपरिषद आहे त्या माध्यमातून सुध्दा झालेल आहे. अनेक कलाकार आपल्याकडे येतात, सांगतात आणि हा विषयतर आपल्या शहराच्या वैभवामध्ये वाढ करणारा असल्यामुळे याठिकाणी हा जो विषय आलेला आहे.

मगाशी राहूल कलाटेनी सुध्दा सांगीतल आहे यामध्ये मनपा शाळेव्यतिरीक्त विदयार्थ्यासाठी १०००/- रु. ऐवजी ५००/- फि घ्यावी.

मा.महापौर साहेब मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-- सदरचा विषय शहराच्या वैभवात वाढ करणारा असल्याने शहरामध्ये कलाकारांना या माध्यमातून व्यासपीठ मिळणार आहे त्यामुळे महेश काळे म्युझिक ऍ़कॅडमी निगडी यांच्या संयुक्त विद्यमाने मा. कला, क्रिडा साहित्य व सांस्कृतिक समिती सदस्यांच्या मान्यतेप्रमाणे तसेच मनपा शाळा व्यतिरीक्त विदयार्थ्यासाठी १०००/- ऐवजी ५००/- प्रमाणे मासिक फि आकारणेत येवून 'दप्तरी दाखल करणेकामी' हा शब्द वगळून हा विषय मंजूर करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर -** पुरातन काळापासून आलेले हे संगीत भाऊसाहेबांचा अनुभव मोठा आहे संगीत या कलेसाठी आपल्याला प्रोत्साहन दयायच आहे. स्थायी समितीकडून थोडा हा विषय अभ्यास न करता आला त्याबद्दल मी दिलगीरी व्यक्त करते. या विषयामध्ये असलेला दप्तरी दाखल करणे हा शब्द वगळून उपसूचनेसह वि.क्र.४ मंजूर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ६०५ विषय क्रमांक - ४
दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.अपर्णा डोके, मा.अश्विनी जाधव यांचा प्रस्ताव –
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८०२३, दि.१३/०१/२०२१

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.४ दि.११/१२/२०२० अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सध्या निगडी, चिंचवड, संभाजीनगर, संत तुकारामनगर येथे संगीत अकादमी चालविल्या जातात. या संगीत अकादमी मध्ये शास्त्रीय गायन, सुगम गायन, तबलावादन, हार्मोनियम वादन इ. विषय शिकविले जातात. या संगीत अकादमीमध्ये प्रशिक्षित झालेल्या विद्यार्थ्यांना अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय, मुंबई या अधिकृत संस्थेमार्फत परीक्षेस बसविले जातात. संगीत अकादमी सुरु झाल्यापासून अद्याप पर्यंत अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय, मुंबई यांच्या प्रारंभिक ते विशारद या परीक्षांमध्ये अंदाजे १५०० विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. पिंपरी चिंचवड शहराचा आता स्मार्ट सिटी मध्ये समावेश झाला असून महापालिकेकडून नागरिकांच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत. शहरामध्ये सांस्कृतिक चळवळ निर्माण व्हावी तसेच नागरिकांचा सहभाग वाढविणे ही

संकल्पना रुजण्यासाठी कला, संगीत अकादमीचे कामकाजाचा विस्तार करण्याची गरज निर्माण झाली आहे. पिंपरी चिंचवड शहरात कला, संगीत अकादमीचे काम निरंतर चालवण्यासाठी मा.महेश काळे, प्रख्यात भारतीय शास्त्रीय गायक यांनी दिनांक १ डिसेंबर २०२० रोजीच्या ई-मेल द्वारे पिंपरी चिंचवड परिसरातील विद्यार्थी व उदयन्मुख कलाकारांना व्यासपीठ मिळवून देणेसाठी महेश काळे स्कुल ऑफ म्युझिक व म.न.पा.च्या संयुक्त विद्यमाने संगीत अकादमी चालू करणे व सदर अकदमी ही इतरांसाठी प्रेरणास्त्रोत ठरेल असे कळविले आहे.

सदर प्रस्तावात त्यांनी उल्लेख केलेल्या प्रमुख बाबी खालील प्रमाणे आहेत –

१) सद्याच्या प्रगत पिढीनूरुप अद्ययावत अभ्यास अंतर्भाव असलेला आभ्यासक्रम.

२) सध्याच्या पिढीनूसार व संगीत क्षेत्रात होणा-या विविध बदलास अनूसरुन राबविण्याची शैक्षणिक पद्धत.

३) अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापरकरुन शिक्षण देणे उदा. विविध संकेतस्थळावरील उपलब्ध असलेले ख्यातनाम कलाकारांचे माहितीपट

४) विद्यार्थ्यांना यु-ट्युबद्वारे नामांकित कलाकारांची, त्यांच्या घराण्यांची, रागांची माहिती उदा. नाट्यसंगीत, अभंग, ठुमरी, रबिंद्र संगीत इ. उपलब्ध होईल.

५) विद्यार्थ्यांचे WHATS APP ग्रुप तयार करुन त्यावर संगीत विषयक माहिती गोळा करुन ती इतर विद्यार्थ्यांबरोबर आदान – प्रदान करणे.

६) इंटरनेटवर मिळणा-या ध्वनिफित व लेख.

७) संगीत क्षेत्रातील विशेषतज्ञ प्राध्यापकांना आमंत्रित करुन विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करणे.

८) संगीत कार्यशाळेचे आयोजन करणे.

९) संगीत मैफिल / महोत्सवाचे आयोजन करणे.

१०) साऊंड इंजिनिअरींगचे आजच्या संगीतामध्ये असलेला प्रभाव आणि महत्व.

११) विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळणेकामी संगीत शिक्षकांच्या कामकाजाचे वेळोवेळी मुल्यमापन करणे.

१२) विद्यार्थ्यांच्या अडचणी व त्यांचे ध्येय प्राप्तीसाठी त्यांचे आभ्यासाचे मुल्यमापन व मार्गदर्शन.

१३) विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पोषक वातावरण तयार करणे.

१४) संगीत विद्यालयातील अंतर्भाव व्यवस्था उदा. स्वतंत्र रियाज कक्ष,

तांत्रिकदृष्ट्या अद्ययावत संगीत वर्ग, ग्रंथालय, प्रेक्षागृह, ध्वनिमुद्रण कक्ष, उपहारगृह, कलाकारांची राहण्याची व्यवस्था, पर्यावरणपुरक वातावरण.

संगीत अकादमीचे कामकाजाचे प्राथमिक स्वरुप –

१) विद्यार्थ्यांसाठी नियमित संगीत वर्ग भरविणे.
२) शिक्षकांना प्रशिक्षण देणे.

३) विद्यार्थ्यांची सार्वजनिक कार्यक्रमाद्वारे वार्षिक प्रस्तुती.

४) संगीत कार्यशाळा / आमंत्रित तज्ञांचे तासिका वर्ग.

५) ग्रंथालय.

६) संगीत विषयक जोड शिक्षण.

७) संगीत महोत्सव व मैफल.

८) साऊंड इंजिनिअरींग.

९) शिष्यवृत्ती कार्यक्रम.

१०) पर्यावरण संवर्धन.

प्राथमिक स्त्रोत –

सदर प्रकल्पाचे अंमलबजावणी करतेवेळी महापालिकेचे ९ संगीत शिक्षक व अस्तित्वात असलेल्या जागेचा वापर करता येईल. त्याच बरोबरीने संपूर्ण संगीत अकादमीच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणेसाठी एका प्रशासकीय अधिका-याची व दोन जादा संगीत शिक्षकांची नियुक्ती करणे. तसेच सध्याची संगीत अकादमी जागेच्या दुरुस्तीसाठी र.रु.५.०० लक्ष ही खर्चाची मर्यादा राहील व टप्प्या-टप्प्याने अकादमीस योग्य त्या सुविधा म.न.पा. मार्फत निर्माण करणेत येतील. वरील बाबींच्या बरोबर प्रेक्षागृह, संगीत सभागृह, कार्यशाळेसाठी जागा व जाहिरातीसाठी आवश्यक स्त्रोत या सर्वांचा विचार वेळोवेळी करावा लागेल. सदर संगीत अकादमीत पहिल्या वर्षी ५०० विद्यार्थी, दुस-या वर्षी ७५० विद्यार्थी व तिस-या वर्षी १००० विद्यार्थी यांचा समावेश विचारात घेऊन प्रशासकीय व आवश्यक स्त्रोतांचे नियोजन करावे लागेल. तसेच मा.महेश काळे यांनी अतिरिक स्त्रोताबाबत प्रपत्र अ नुसार व संगीत अकामदमी करीता म.न.पा.च्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मोफत व म.न.पा. शाळेव्यतिरिक्त विद्यार्थ्यांसाठी र.रु.१०००/- अशी मासिक फी महेश काळे संगीत अकादमी आकारेल. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि महेश काळे स्कूल ऑफ म्युझिक यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी चिंचवड संगीत अकादमी चालविणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता घेणे आवश्यक आहे व या बाबत योग्य तो करारनामा मा.आयुक्त यांनी करावा

व अकादमी चालविणे बाबतचे पूर्ण अधिकार मा.आयुक्त यांना राहिल. सबब, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि महेश काळे स्कूल ऑफ म्युझिक यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी चिंचवड स्कूल ऑफ म्युझिक, निगडी कलादालन येथे सुरु करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेची मा.क्रिडा कला साहीत्य व सांस्कृतिक समितीच्या सदस्यांची मागणी असलीतरी सदरचा विषय दप्तरी दाखल करणे ऐवजी सदरचा विषय शहराच्या वैभवात वाढ करणारा असल्याने शहरामध्ये कलाकारांना या माध्यमातून व्यासपीठ मिळणार आहे त्यामुळे महेश काळे म्युझिक ऍकॅडमी निगडी यांच्या संयुक्त विद्यमाने मा. कला, क्रिडा साहित्य व सांस्कृतिक समिती सदस्यांच्या मान्यतेप्रमाणे तसेच मनपा शाळा व्यतिरीक्त विदयार्थ्यासाठी १०००/- ऐवजी ५००/- प्रमाणे मासिक फि आकारणेत येवून ‘दप्तरी दाखल करणेकामी’ हा शब्द वगळून हा विषय मंजूर करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

मा.केशव घोळवे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ६०६ विषय क्रमांक - ५
दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.सुवर्णा बुर्डे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव–
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८०९०, दि.१३/०१/२०२१

कोविड - १९ संसर्गाच्या पार्श्वभुमीवर पिंपरी चिंचवड पोलीस विभागामार्फत मास्क सक्तीबाबत दंडात्मक कारवाई करून जमा होणा-या १००% महसूला पैकी ५०% महसूल पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस व ५०% महसूल पिंपरी चिंचवड पोलीस यांना वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.ज्ञानदेव थोरात - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.सचिन चिखले - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मा.महापौर मागच्या दोन-तीन दिवसापुर्वी तुम्ही कोवीड संदर्भात सर्व गटनेत्यांची मिटींग घेतली पण त्या गटनेत्यांच्या मिटींगला मी काही घरगुती कारणास्तव येवू शकलो नाही त्याबद्दल दिलगीरी व्यक्त करतो. परंतु गेले दोन दिवसापासुन कोरोनाचा संसर्ग ही मोठया प्रमाणात पिंपरी चिंचवड शहरावर वाढत आहे. मोठया प्रमाणामध्ये रुग्णसंख्या ही वाढत आहे. त्यादृष्टिकोनातून आपण एकदम सिरीअसली पुन्हा एकदा कामाला सुरवात

केली पाहीजे. मी सर्व अधिकारी वर्ग असेल, कर्मचारी वर्ग असेल डॉक्टर असतील सिस्टर असतील, नर्स असतील कोरोना काळामध्ये ज्या ज्या संस्थानी मदत केली आहे त्या सर्वांच मी मनापासून अभिनंदन करतो. पुन्हा एकदा जोमानी आपणा सर्वाना हातात हात देवून काम कराव लागेल, कारण येणारे दिवस हे काही दिवस आपल्याला मोठे भीषण संकटाचे दिवस डोळयासमोर उभे राहताना दिसत आहे. मा.महापौर साहेब, आपल एॅटोक्लस्टर फुल आहे, बालनगरी फुल आहे, वायसीएममध्ये सुध्दा रुग्ण ठेवण्यासाठी जागा अव्हेलेबल नाही. दोन ते तीन दिवसापासून कन्टीन्यू फोन येतात की कोवीड पॉझिटीव्ह झालो जायच कुठं. मागच्या जनरल बॉडीमध्ये आपण खुप मोठया प्रमाणात चर्चा केली. विवीध अधिका-यावर ताषेरे ओढले परंतु तो वेगळा पार्ट होता. मा.महापौर साहेब, आता या सर्व गोष्टी बाजूला ठेवून लवकरात लवकर खाजगी हॉस्पिटल्स असतील, त्याचप्रमाणे प्रायव्हेट हॉस्पिटल असतील या सर्व लोकांना आदेश देवून आपल्या पिंपरी चिंचवड शहरातील सर्व रुग्णांना, नागरीकांना कुठतरी दिलासा देण्याच काम तुम्ही-आम्ही सर्वांनी केल पाहीजे. मा.महापौर साहेब, काल एक फोन आला की भाऊ माझा ऍक्सिडेंट झाला आहे आणि ऍक्सिडेंट झाल्यामुळे माझा एक पाय थोडासा निकामी झालेला आहे पण मी कोवीड पॉझिटीव्ह आहे. मी डॉक्टरांना फोन केल्यानंतर त्यांनी सांगीतल की आपले आयसीयू आणि वायसीएम हे पुर्णपणे फुल आहेत तुम्ही ससूणला जावा. रुग्णाची आर्थीक परिस्थिती एकदम डावून असल्यामुळे त्यांनी ससुणला जाण्याचा प्रयत्न केला. परंतु ससुणला सुध्दा जागा नसल्यामुळे त्यांना विवीध संकटाना तोंड दयाव लागलं. मा.महापौर साहेब, मी तुम्हांला नंम्र विनंती करतो की पुन्हा एकदा आपल्या शहरातील खाजगी हॉस्पिटल असतील ती वाढवण्याची गरज आपल्या सर्वांना आहे. प्रायव्हेट हॉस्पिटल असतील त्यांना सुध्दा विनंती करण्याची गरज आहे. जेणेकरुन आपल्या शहरातील नागरीकांना कुठेतरी कोरोनापासून दिलासा मिळाला पाहीजे. मा.महापौर साहेब, जे पोलीस कर्मचारी असतील, कॉन्सटेबल असतील, होमगार्ड आहेत गेले कित्येक दिवस जी व्यक्ती मास्क घालत नाही त्याच्यावर ५००/- रु. पहीला दंड आकारला आहे आणि तो विषय आपल्या समोर आहे त्याच्यातला जो निधी जमा झालेला आहे तो निधी पन्नस टक्के पण देणार आहोत आणि ५० टक्के पालीस डिपार्टमेंटला देणार आहोत. माझी आपल्या सर्वाना विनंती आहे की पोलीस पुर्ण सतरकतेनी आपल्या जनतेची सेवा करीत आहेत. या पोलीसाना आपण पैसे देणार आहोत का आणि पैसे देणार असूतर ते कशा आणि कोणत्या पध्दतीने देणार आहोत ही माहीती आम्हांला सर्वांना कळवावी, धन्यवाद.

मा.ज्ञानदेव थोरात - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. हा विषय आपल्या पिंपरी चिंचवड शहरात जी लोक विनामास्क फिरत होते त्यांचे ५००/- रु. दंड प्रशासनाने त्याच्यावर घेतलेले आहेत. याच्यावर मला आयुक्त साहेबांना एक असं विचारायच होतं की आयुक्त साहेब तुम्ही गेल्या महीन्यात जॉईन झाला होतात आणि त्या वेळेस केंद्रीय पथक आलेल होतं की सफाई कामारांच्या बद्दल ज्या सूचना होत्या किंवा त्यांच्या ज्या

तक्रारी होत्या त्या तक्रारीवजा त्यांन मिटींग घेतली होती आणि योगायोगाने उपमहापौरांनी मला चला म्हणाले आणि मी त्या मिटींगला गेलो होतो. त्या मिटींगला सन्मा.नगरसचिव साहेब, अति.आयुक्त साहेब, रॉय साहेब असे बरेचसे वरिष्ठ अधिकारी होते. आयुक्त साहेब तीथ एवढया तक्रारी आल्या. कामगार पालीकेचा आणि मॅनेजमेंट मध्ये तुम्ही वरचे अधिकारी या दोघा मधला दुवा असतो तो वेलफेअर ऑफिसर असतो आणि ते आपले वेलफेअर ऑफिसर आहेत प्रमोद जगताप साहेब. अति. आयुक्त तीथ साक्षीला होते. त्या जगताप साहेबांला कामगार आणि मॅनेजमेंट किंवा आपल्या प्रशासनास यातल एकही उत्तर देता आल नाही. योगायोगाने तुम्ही पण निघून गेले मी ती नाराजगी ढाकणे साहेबांना पण बोलून दाखवली की हे शहर स्वच्छ राहते, चांगले राहते त्या सफाई कामगाराबद्दल तुम्ही अस्था दाखवली नाही असा माझा आरोप होता. ढाकणे साहेबांना मी ते बोलून दाखवल तुम्ही जायला नव्हत पाहीजे त्या मिटींगमधन. अक्षरश: त्या ड्रेनेजमध्ये लोक उतरतात आणि आपले अधिकारी काहीच करत नाहीत. एका महीलाचा आरोप होता आणि तो साहेबांसमोर सांगीतला की मला ठेकेदार पैसे देत नाही, मला कामावर घेत नाही, काम केल्याचे पैसे देत नाही. आम्ही त्यांना विचारल तुम्ही हे कुणाला सांगीतलतर त्यांनी सांगीतल मी हे कामगार कल्याण अधिकारी जगताप साहेबांना सांगीतल. जगताप साहेब म्हणाले मी या महीलेला ओळखतच नाही आणि हे कुठ काम करतात मला काय माहीती कोण कॉन्ट्रॅक्टर आहे जेव्हा ती महीला उठली आणि म्हणाली थोरात साहेब यांना मी फोन दिला होता आणि फोन माझ्या समोर केला, मी फोन केलातर यांनी मला उडवाउडवीची उत्तर दिली. आणि ज्यावेळेस त्या ताईनी सांगीतल की त्यांच्या मांडीला मांडी लावून तो कॉन्ट्रॅक्टर बसला होता साहेब, एवढी मोठी अधिका-याची मजल गेली. तो कॉन्ट्रॅक्टर जगताप साहेबाच्या शेजारी बसला होता आणि तरी ते म्हणतात की मला तो कॉन्ट्रॅक्टर माहीती नाही आणि मग तुमच्या शेजारी येवून तो बसला कसा. ती मिटींग जर केंद्राची होती, आयोग आला होता, उपमहापौर होते तुम्ही होते मग इथ कॉन्ट्रॅक्टर आले कसे. याचा अर्थ पैशाची देवाण-घेवाण होते त्यात वरिष्ठ अधिकारी सुध्दा सामील आहेत यात कॉन्ट्रॅक्टरची चुकी नाही. असे बरेचसे प्रश्न माझ्याकडे आहेत. त्यादिवशी विचारले सफाई कामगारांचे किती मृत्यू झाले, साक्षीदार मी होतो, ढाकणे साहेब होते. त्यांच्याकडे तीन लोकांच्या मृत्यूचा विषय होता त्यांच्या पेपरमध्ये दिलेलं आहे. त्यातले पेपर माझ्याकडे पण आहेत. आपल्या रॉय साहेबांनी सांगीतल माझ्याकडे दोनच आहेत. पगार घेत नाहीत का हे कुणाचा पगार घेतात. ५००/- रु.दंड करतात मी त्याला विरोध करणार नाही पण ही पिंपरी चिंचवडची जनता आहेना त्यांच्याकडून तुम्ही टॅक्स घेता, मास्क नाही लावलेतर ५००/- रु. घेता, पाणी नाही आलतरी पाणी कर घेता म्हणजे हे एकतर्फी चाललय. हे काही पाकीस्तानचे नागरीक आहेतका सगळे. जे वरिष्ठ अधिकारी आहेत त्यांनी काय केल याबद्दल. काय सजा केली ते सांगा, काय पनिशमेंट दिली त्यांना. साहेब हे प्रायव्हेट सेक्टर असतना तर यातला एकही अधिकारी इथ कामाला राहीला नसता. वरिष्ठ अधिका-यांनी एक महीना प्रायव्हेट सेक्टरला काम करुन दाखवा. वरिष्ठ उदयोजक

आहेत बिर्लाजी असतील, टाटाजी असतील त्यांनी सांगीतलेल आहे कुठलीही संस्था, कुठलही सहकार क्षेत्र जे चुकीच काम करतं आणि जे बरोबर होत नाही त्याला कामगार जबाबदार नसतात तर वरिष्ठ अधिकारी जबाबदार असतात. आयुक्त साहेब, माझ्या मते तुम्ही अति.आयुक्तांचे वरिष्ठ अधिकारी आहेत ते सगळया गोष्टीला जबाबदार आहेत, मला याच उत्तर पाहीजे. कासारवाडीचा रॅम्प आहेना तो बारा वर्षापुर्वी बांधलेला आहे त्याच्यावरुन एक पण टू व्हिलर, थ्री व्हिलर, फोर व्हिलर गेलेली नाही याला जबाबदार कोण. त्यासाठीचा जो कोटयावधीचा खर्च झाला तो कुणाच्या खीशातून झाला तुमच्या पगारातून गेला की ही सर्वसामान्य जनता आहे त्यांच्या करातून गेलेला आहे. को तो बंद आहे बारा वर्षे झाल त्याचा कुणी विचार केला का. का टू व्हिलर तीथून खाली येत नाही आणि आमच्या नागरीकांनी चुक केली की डायरेक्ट त्याला दंड, नाहीतर त्यांची मालमत्ता पाडता तुम्ही, त्यांचे पैसे कटींग करता मग हे तुमच्यासाठी का लागू होत नाही याचा आयुक्त साहेब तुम्हांला खुलासा दयावा लागणार आहे. अजून एक विषय माझ्याकडे आहे मी स्थानिक अधिका-याना विचारायचा प्रयत्न केला पण त्यांनी उत्तर दिल नाही. जे एखाद काम करत मला त्याच उत्तर दयाव लागल की आपण त्याच इस्टीमेट ठरवत नाही. जर एखाद काम १०० रुपयाच असेलतर माझ्याकडे पत्र आहे ते ४५ टक्केनी बिलो आहे साहेब, आणि हे तुमचेच पेपर आहे आणि हे पत्र दयायला सुध्दा शेख साहेबांनी पंधरा दिवस लावले. शेख साहेबांना फोन केलाना तर ते फोन सुध्दा घेत नव्हते. शेवटी माझा कार्यकर्ता तीथ गेला दोन, दोन, दोन दिवस देतो म्हणून सांगीतले आणि शेवटच्या दिवशी गेलेनातर म्हणाले मी आता रजेवर जाणार आहे मला अजून दोन दिवस दया. मग याच्यात शेख साहेबांचा हात आहे का, आयुक्त साहेबांचा हात आहे का अति.आयुक्त साहेबांचा हात आहे कुणाचा हात आहे. ज्यावेळेस मी फोन केला तीथून पुढ दोन तासानी शेख साहेबांनी मला हे पत्र दिलं. का मी या शहराचा नागरीक नाही का, मी महाराष्ट्राचा नागरीक नाही. तुम्ही सन्मा.सदस्यांना जर अशी वागणूक देत असालतर सर्वसामान्य नागरीकांना कशी वागणूक देत असाल. साहेब माझा एकच प्रश्न ४५ टक्के बिलो टेंडर गेल आहे. माझ्या माहीती प्रमाणे १०० रुपयातून ४५ रुपये गेले म्हणजे खाली राहीले किती. त्याच्यामध्ये १२ टक्के जीएसटी आहे. वरीष्ठ अधिका-यांचे किती टक्के आहेत हे मला माहीत नाही. भाऊसाहेब मी पहील्यांदाच आलोय या महापालिकेत परंतु मी एका चांगल्या पक्षाचा गेले पंचवीस वर्षापासून कार्यकर्ता आहे आणि सक्रीय कार्यकर्ता आहे. एवढी टक्केवारी जात असेल आणि चुकी कुणाची आहे हे खरच काम होतय का. चांगली गोष्ट आहे साहेब जर १०० रुपयाच काम तुमचे अधिकारी ४५ रुपयामध्ये करुन घेत असतीलतर आख्ख्या शहराला हे लागू करा. मी कामगार नेताच आहे, एक मी शेतकरी कुटूंबातील शेतक-याचा मुलगा आहे. मला कामाची काहीच लाज नाही. पण हे अधिका-यांनी करुन दयाव १०० रुपयाच काम ४५ रुपयात आख्ख्या शहरात ही स्किम राबवू साहेब, याची समिती नेमा. याच्यात दोन तीन मी सँपल आणलेले आहेत. आपल्या वायसीएमच काम किती पटीच काम आहे किती पटीत जात ते पण मी तुम्हांला दाखवतो. याच्यावर समिती नेमा आणि हे जर काम होत

असेलतर चांगल आहे आणि काम होत नसेलतर त्याची जबाबदारी तुमची आहे. हा विषय गांभीर्याने घ्यावा आणि कासारवाडीच्या रॅम्पचा सुध्दा विषय मला पाहीजे. मी पण कामगार आहे, मी पण पगार घेतो पण टाटा, बिर्लानी सुध्दा सांगीतल आहे जो तनख्वा घेतो तो मजदूर असतो. तुम्ही सुध्दा सगळे मजदुर आहात हे लक्षात ठेवा. माझ ठाम मत आहे की तुम्ही सर्वसामान्यापासून पावत्या करता, त्यांना दंड मारता. या अधिका-यांनी काय केले आहे याचा मला खुलासा पाहीजे आणि जे जे काम जास्त टक्के कमीन झालेले आहेत ते चांगल आहे पण हे काम होतात का आणि ठरावीक ठिकाणी चालू आहेत. वायसीएमच मी तुम्हांला दाखवतो याची निवीदा आहे १० कोटी १६ लाख १८ हजाराची ते बिलो जावुन १ कोटी २८ लाख ५४ हजाराला जात माझ्या माहीती प्रमाणे त्याचा जीएसटी १ लाख २१ हजार जातोय. म्हणजे दहा कोटीच काम सात कोटीमध्ये होत का. आणि होत असेलतर ही पिंपरी चिंचवडची ऐतिहासीक गोष्ट आहे. भाऊसाहेब मला पुरेश ज्ञान नाही पण मी जे बोलतोय ते पुराव्यानिशी बोलतोय. यामध्ये समिती नेमली पाहीजे आणि त्या समितीने इन्क्वायरी केली पाहीजे. तसेच कंपन्यानी नदीमध्ये डायरेक्ट पाणी सोडलेल आहे. कंपनीला डायरेक्ट पाणी सोडण्याचा कुठलाही अधिकार नाही. तुम्ही आता चला मी दहा मिनीटारमध्ये डायरेक्ट लाईन टाकलेली दाखवतो, कुणाच्या आदेशानी ते पाणी सोडल आहे. यामध्ये अधिकारी सामील आहेत आणि तुमची जबाबदारी आहे. तुम्ही या महापालिकेचा पगार घेता त्याच्यामुळे इथल्या सर्वसामान्य जनतेला न्याय दयावा अशी माझी विनंती आहे, धन्यवाद.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---

मा.उत्तम केंदळे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - ६

दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.कर/मुख्य/९/कावि/१९/२०२१, दि.१३/०१/२०२१

२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८२०४, दि.१९/०१/२०२१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९९ च्या तरतूदी अन्वये महानगरपालिकेने कार्यक्षेत्रातील मिळकतींवर कर व करेत्तर बाबींचे दर सन २०२०-२०२१ करिता लागू केलेले आहे तसेच शासनाचे शिक्षणकर, रोजगार हमीकर व फ्लोअरेज कराची वसुली शासनाने ठरवून दिलेल्या दराने शासनाचे करिता केली जाते.

तसेच सन २०२१-२०२२ या सरकारी वर्षाकरिता दिनांक २० फेब्रुवारी २०२१ पूर्वी करांचे दर ठरविणे आवश्यक आहे .त्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ९९ अन्वये सन २०२१-२०२२ या वित्तिय वर्षासाठी खालील प्रमाणे करांचे आणि करेत्तर बाबींचे फी/शुल्काचे दर प्रस्तावित करण्यात येत आहे.

सन २०२१-२२ या सरकारी वर्षाकरिता कराचे व करेत्तर बाबींचे दर निश्चिती बाबत –
अ. करांचे दर

| अ.क्र. | कराचे नाव | करआकारणी पध्दत करयोग्यमूल्यावर | सन 2020-2021 चे प्रचलित दर (सध्याचे) | | सन 2021-2022 करिता प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | निवासी | निवासेत्तर | निवासी | निवासेत्तर |
| 1 | सामान्य कर | र.रु.1/- ते 12000/- | 13% | 14% | 13% | 14% |
| | | र.रू.12001/ ते - 30000/- | 16% | 17% | 16% | 17% |
| | | र.रु.30001/- व त्यापुढील | 24% | 24% | 24% | 24% |
| ब1 | साफ सफाई कर | करयोग्य मूल्यावर | 5% | 6% | 5% | 6% |
| | अग्निशामक कर | करयोग्य मूल्यावर | 2% | 2% | 2% | 2% |
| | मनपा शिक्षणकर | करयोग्य मूल्यावर | 4% | 5% | 4% | 5% |
| 2 | मलप्रवाह सुविधा लाभ कर | करयोग्य मूल्यावर | 5% | 5% | 5% | 5% |
| 3- | पाणीपुरवठा लाभ कर | करयोग्य मूल्यावर | 4% | 5% | 4% | 5% |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 4 | रस्ता कर | करयोग्य मूल्यावर | 2% | 3% | 2% | 3% |
| 5 | विशेष साफ सफाई कर (फक्त मॉल्स, लॉजिंग बोर्डिंग, मंगल कार्यालय,सभागृह, रुग्णालय, हॉटेल्स, कॅन्टीन्स, रेस्टॉरंट या स्वरुपाच्या मिळकतींस ) | करयोग्य मूल्यावर | -- | 2% | -- | 2% |
| 6 | वृक्षकर | करयोग्य मूल्यावर | 1% | 1% | 1% | 1% |

वरील करांव्यतिरिक्त (नाटयगृह कर) (करमणूक कर) खालीलप्रमाणे वसूल केला जातो.

| अ. क्र. | कराचे नाव | करआकारणी पध्दत | सन 2020-2021 चे प्रचलित दर(सध्याचे) | सन 2021-2022 करिता प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| 7 | नाटयगृहावरील कर(करमणूक कर) | 1. सिनेमा | | |
| | | अ) 500 पर्यंत किंवा त्यापेक्षा जास्त बैठक व्यवस्था (सिट्स) असणा-या थिएटरला प्रती स्क्रीन | प्रती दिवस रु.250/- | प्रती दिवस रु.250/- |
| | | ब) मराठी सिनेमा | कर माफी | करमाफी |
| | | क) वातानुकुलित थिएटर प्रती स्क्रीन | प्रती दिवस रु.350/- | प्रती दिवस रु.350/- |
| | | 2. नाटक | प्रती प्रयोगास रु.100/- | प्रती प्रयोगास रु.100/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 3.सर्कस(कॉन्व्हिलपेट्स) | प्रती प्रयोगास रु.100/- | प्रती प्रयोगास रु.100/- |
| | | 4.तमाशा | प्रती प्रयोगास रु.100/- | प्रती प्रयोगास रु.100/- |
| | | 5.संगीत जलसे/शास्त्रीय संगीत जलसे (थियटर मधील किंवा थियटर व्यतिरिक्त प्रत्येक प्रयोगास) | प्रती प्रयोगास रु.100/- | प्रती प्रयोगास रु.100/- |
| | | 6. कुस्त्या/मुष्टीयुध्द | प्रती प्रयोगास रु.50/- | प्रती प्रयोगास रु.50/- |
| | | 7. वरील खेरीज इतर प्रत्येक प्रयोगास (जर वेगवेगळे खेळ नसतील तर अशा प्रत्येक दिवसास) | प्रती दिवस रु.100/- | प्रती दिवस रु.100/- |

ब) सामान्य करातील सवलत योजना : सामान्य कर (सामान्य करामध्ये सामान्य कर + साफसफाई कर +अग्निशामक + मनपा शिक्षण उपकर हे कर समाविष्ट आहेत.)

| अ क्र. | योजना | सन 2020-2021 चे प्रचलित दर (सध्याचे) | सन 2021-2022 करिता प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| 1 | स्वातंत्र्य सैनिककिंवा त्यांचे पत्नी यांचे स्वत: राहत असलेल्या फक्त एका निवासी घरास सामान्य करात सुट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50%रक्कम सूट |
| 2 | फक्त महिलांचे नावे असलेल्या स्वत: राहत असलेल्या फक्त एका निवासी घरास सामान्य | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या |

| अ क्र. | योजना | सन 2020-2021 चे प्रचलित दर (सध्याचे) | सन 2021-2022 करिता प्रस्तावित दर |
| --- | --- | --- | --- |
| | करात सुट | 50% रक्कम सूट | 50% रक्कम सूट |
| 3 | 40% किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व असणा-या अंध, अपंग, मतिमंद, कर्णबधिर व मुकबधिर यांच्या नावावर असणा-या मिळकतीस | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कम सूट |
| 4 | संपूर्ण मिळकतकराची रक्कम आगाऊ भरणा-यांकरिता सामान्य करात सुट देणे | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>.1स्वतंत्र नोंद असलेल्या निवासी वापराच्या मिळकतीस - 10% रक्कम सूट<br>.2बिगर निवासी / मिश्र /औद्योगिक /मोकळया जमिनी इ . मिळकतीस- 5% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>.1स्वतंत्र नोंद असलेल्या निवासी वापराच्या मिळकतीस - 10% रक्कम सूट<br>.2बिगर निवासी / मिश्र /औद्योगिक/ मोकळया जमिनी इ .मिळकतीस -5% रक्कम सूट |
| 5 | ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिम मिळकती ग्रीहा : ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टीममध्ये २५०० चौ.मी.पेक्षा जास्त भूखंडावरील प्रकल्पांना बांधकाम परवानगी विभागामार्फत अंतिम | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>• 3Star Rating -05% रक्कम सूट<br>• 4 Star Rating - 08% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>• 3 Star Rating -05% रक्कम सूट<br>• 4 Star Rating - 08% रक्कम सूट |

| अ क्र. | योजना | सन 2020-2021 चे प्रचलित दर (सध्याचे) | सन 2021-2022 करिता प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| | भोगवटापत्रक व अंतिम ग्रीन बिल्डींग Certificate प्राप्त झालेल्या मिळकतींना सामान्य करात सूट | • 5 Star Rating -10% रक्कम सूट | • 5 Star Rating -10% रक्कम सूट |
| | स्वग्रीहा : ग्रीन बिल्डिंग रेटींग सिस्टिममध्ये २५०० चौ.मी.पेक्षा कमी भूखंडावरील प्रकल्पांना बांधकाम परवानगी विभागामार्फत अंतिम भोगवटापत्रक व अंतिम ग्रीन बिल्डींगCertificate प्राप्त झालेल्या मिळकतींना सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>• 1 Star Rating - 05% रक्कम सूट<br>• 2 Star Rating - 08% रक्कम सूट<br>• 3 Star Rating - 10% रक्कम सूट<br>• 4 Star Rating - 12% रक्कम सूट<br>• 5 Star Rating - 15% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>• 1 Star Rating - 05% रक्कम सूट<br>• 2 Star Rating - 08% रक्कम सूट<br>• 3 Star Rating - 10% रक्कम सूट<br>• 4 Star Rating - 12% रक्कम सूट<br>• 5 Star Rating - 15% रक्कम सूट |
| 6 | संरक्षणदलातीलशौर्यपदक धारकआणिमाजीसैनिकां च्याविधवा तसेच अविवाहीत शहीद सैनिकांचे नामनिर्देशितांचे राहणा-या त्याचप्रमाणे शहरात वास्तव्य करणा-या माजी सैनिकांना मालमत्ता करातून सूट | मालमत्ताकरात (सामान्यकर, मलप्रवाहसुविधालाभकर , पाणीपुरवठालाभकर, रस्ताकर) सूट | मालमत्ताकरात (सामान्यकर, मलप्रवाहसुविधालाभकर, पाणीपुरवठालाभकर, रस्ताकर) 100 %सूट |

| अ क्र. | योजना | सन 2020-2021 चे प्रचलित दर (सध्याचे) | सन 2021-2022 करिता प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| | (शासननिर्णयानुसार) | | |
| 7 | वरील योजनेपैकी कोणत्याही फक्त एका योजनेचा लाभ मिळकत धारकास घेता येईल तसेच वरील योजनेचा सामान्य करातील सवलतीचा लाभ घेणेकामी थकबाकी सह दोन्ही सहा माहीची संपूर्ण बिलाची रक्कम एक रक्कमी आगाऊ भरणेची मुदत (बिल मिळो अथवा न मिळो) | अ.क्र. 1 ते 5 मधील सवलत योजनांसाठी – दिनांक 30 जून अखेर<br><br>अ.क्र. 6 चे सवलत योजनेसाठी संपूर्ण वर्ष | अ.क्र. 1 ते 5 मधील सवलत योजनांसाठी – दिनांक 30 जून अखेर<br><br>अ.क्र. 6 चे सवलत योजनेसाठी संपूर्ण वर्ष |
| 8 | थकबाकीसह एक रक्कमी मिळकतकराचाभरणा ऑनलाईन पेमेंट गेट-वे द्वारेकरणा-या मिळकत धारकास चालू आर्थिक वर्षाचे सामान्यकरात सवलत | 1. दि.1/4/2020 ते 30/6/2020 अखेर सर्वसाधारण करात 5%<br>2. दि.1/7/2020 ते 31/3/2021 अखेर सर्वसाधारण करात 2% | 1. दि.1/4/2021 ते 30/6/2021 अखेर सर्वसाधारण करात 5%<br>2. दि .1/7/2021 ते3 1/3/2022 अखेर सर्व साधारण करात 2% |

क. करेत्तर बाबींचे फी / शुल्कांचे दर

| अ.क्र. | नाव | सन 2020-2021 चे प्रचलित | सन 2021-2022 करिता |
|---|---|---|---|

| | | दर (सध्याचे) | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| 1 | मिळकत हस्तांतरण नोंद नोटीस फी | करयोग्य मूल्यावर 5% | करयोग्य मूल्यावर 5% |
| 2 | थकबाकी नसलेचा दाखला फी | प्रती दाखला 10/- रूपये | प्रती दाखला 10/- रूपये |
| 3 | मिळकत उतारा | प्रती उतारा 20/- रूपये | प्रती उतारा 20/- रूपये |
| 4 | प्रशासकीय सेवाशुल्क | प्रति बीलास 10/- रूपये | प्रति बीलास 10/- रूपये |

सन २०२१-२०२२ या वर्षाकरिता महानगरपालिका करांचे दर आणि करेत्तर बाबीची फी/शुल्क निश्चित करणेत यावे.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१४ दिनांक १६/२/२०२१ अन्यये पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील घोषित अघोषित झोपडपट्टीवासियांना त्यांचे आरोग्य हे उत्तम राहण्याकरीता तसेच त्यांच्या कुटुंबियांचे आरोग्यमान व जीवनमान आरोग्यदृष्टया उत्तम राहणे ही महानगरपालिकेची पालक म्हणुन प्राथमिक जबाबदारी असलेने झोपडपट्टीवासियांच्या घरामध्ये सोलर होम लाईटचा (ग्रीन एनर्जी) पर्यावरणदृष्टया प्रवाह होणे गरजेचे असून महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण मार्फत तयार होणा-या विजेचा वापर कमी होईल तसेच त्यातुन निर्माण होणारा प्रदुषण वायू पासून म्हणजेच Co2 (कार्बन), Nox Sox यापासून तेथील रहिवाशाचा बचाव होईल. घराच्या छपरावर सोलर पॅनेल उभारुन त्याव्दारे सोलर फोटो व्होल्टाइक पॅनेलव्दारे वीजनिर्मिती केली जाते. यामध्ये निर्माण झालेली वीज थेट महावितरणच्या जाळयाला (ग्रीड) ला जोडली जाऊ शकते. यातुन भारनियमन बंद होईलच शिवाय विजेचे मासिक बिल अत्यंत कमी प्रमाणात येईल. त्यासाठी प्रत्येक झोपडपट्टीतील कुटुंबाना प्रत्येकी १ सोलर

होम लाईट सेट म्हणजे २ टयुब लाईट, १ फॅन चालविण्यासाठी सोलर पॅनल तसेच बॅटरी बॅकअप, इनव्हरटर व १ पोल कार्यान्वीत करुन देण्यात यावा. सदरचे काम करणेसाठी Broadcast Engireening Consultants India Limited अथवा Savitribai Phule Pune University या संस्थेस थेट पध्दतीने देण्यात यावे. सदरची खरेदी महानगरपालिकेच्या शहर सुधारणा विभागाअंतर्गत येणा-या लेखाशिर्षावरील अ.क्र. १) महसुली – झोनिपु स्थापत्य विभाग किरकोळ दुरुस्ती व देखभाल पान क्र.९१७ ते ९४८, २) महसुली – विद्युत विभाग पान क्र.९४९ ते ९५३, ३) भांडवली- झोनिपु स्थापत्य पान क्र. ५९८ ते ६०२, ४) भांडवली - विदयुत विभाग पान क्र.६३२ ते ६३६ यावरुन खर्च करण्यात यावा. तसेच सदर योजना पुर्ण करणेकामी शहर सुधारणा विभागातील तसेच इतर विभागातील अखर्चित रक्कम सदरच्या लेखाशिर्षावर वेळोवेळी उपलब्ध करण्यात यावी. सदरचे साहित्य प्रायोगिक तत्वावर सुरुवातीला तीन झोपडपट्टया शांतीनगर, विठ्ठलनगर, दत्तनगर या झोपडपट्टीमधील सर्व कुटुंबाना सदर साहित्याचा लाभ मिळावा तसेच आवश्यकतेनुसार याकामी निधी कमी पडल्यास वेळोवेळी निधी उपलब्ध करुन देणेस मा.स्थायी समिती ठराव क्र.८५१० दि.१७/०२/२०२१ अन्वये मान्यता मिळाली असून सदर ठरावास मान्यता देणेत यावी. तसेच करसंकलन विभाग हा महानगरपालिकेस स्थायी उत्पन्न मिळवून देणारा विभाग आहे. मिळकत कराचा जास्तीत जास्त भरणा होणेचे दृष्टीने दरवर्षी दिनांक ३१ मार्च पुर्वी संपुर्ण कराचा भरणा करणा-या मिळकतधारकांना चालू वर्षाचे मागणीमध्ये विवीध सवलती देणेत येत आहेत. विहित मुदतीत न चुकता प्रमाणिकपणे दरवर्षी मिळकत कराचा भरणा करणा-या मिळकतधारकांना सन्मानित/प्रोत्साहित करणेकामी प्रोत्साहनपर सवलत योजना राबविणे आवश्यक आहे.

ज्या मिळकतधारकांनी सन २०१८-२०१९ ते सन २०२०-२०२१ या मागील ३ सलग आर्थिक वर्षामध्ये ३१ मार्च पूर्वी विहीत मुदतीत थकबाकीसह संपुर्ण मिळकत कराचा भरणा केला आहे. अशा सर्व मिळकतधारकांनी सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षामध्ये थकबाकीसह संपुर्ण मिळकत कराचा एकरकमी भरणा दिनांक ३१ मार्च पूर्वी केलेस अशा मिळकतधारकांना चालू वर्षाच्या म्हणजेच चौथ्या वर्षाच्या मागणीतील सामान्य करात २% (दोन टक्के) जादा प्रोत्साहनपर सवलत देण्यास मान्यता देणेत यावी.

अशाच प्रकारे ज्या मिळकतधारकांनी त्या वर्षाच्या पुढील प्रत्येक सलग ३ वर्षाचा मिळकत कराचा थकबाकीसह संपूर्ण मिळकत कराचा एकरकमी भरणा दिनांक ३१ मार्च पुर्वी केलेस त्याचे पुढील वर्षी म्हणजेच चौथ्या वर्षाच्या सामान्य करात २% (दोन टक्के) जादा प्रोत्साहनपर सवलत योजना निरंतर लागू करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.अंबरनाथ कांबळे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.आशा धायगुडे- शेंडगे-** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- महाराष्ट्रातील राज्यभाषा ही मराठी आहे. थोडक्यात आपण मराठी भाषीक आहोत. या मराठी भाषेचा आदर मान ठेवत ज्या आपल्या शहरातील मराठी माध्यमाच्या खाजगी अनुदानीत, विना अनुदानीत व विशेष मुलांना शिक्षण देणा-या संस्थाचा शास्तीकरासह मुळ कर कायमस्वरुपी माफ करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.सिमा सावळे –** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आता जो विषय आला त्याच्यामध्ये एक योजना आहे स्वातंत्र सैनीक किंवा त्यांचे पत्नी यांचे स्वत: राहत असलेल्या फक्त एका निवासी घरात सामान्य करात सुट. मा.महापौर साहेब, आपण यासाठी काही अटी शर्ती टाकल्यात, अटी शर्ती म्हणजे स्वातंत्र सैनिक किंवा त्यांची पत्नी, किंवा त्यांची विधवा किंवा जे अविवाहीत शहीद सैनिक आहेत त्यांचे आई वडील याना त्यामध्ये आदिवास प्रमाणपत्र दयायच आहे. १५ वर्षे वास्तव्य असलेल डोमोसाईल त्यांनी काढायच आहे. डोमोसाईल काढताना त्याच्यामध्ये एक अट असते की तुमच्या वडीलांचा शाळा सोडल्याचा दाखला. माई, आज माझ वय काय माझे वडील कधी गेले ते मला माहीती नाही. त्यांचा शाळा सोडल्याचा दाखला आपल्याला देता आला नाहीतर आपल्याला आदिवास प्रमाणपत्र मिळत नाही. मग ते आदिवास प्रमाणपत्र या योजनेसाठी देता आल नाहीतर ही योजना आपण कशी काय लागू करणार आहेत. त्यासाठी माझी आपल्याला एक विनंती आहे की यासाठी आपल्याला दुसरा काही सोर्स करता येतो का, कुठल्या पध्दतीने देता येत का ते बघायला लागेल. सैनिक अधिकारी प्रमाणपत्र दिल्यानंतर मग अदिवासाचा अट्टहास का. महाराष्ट्रामध्ये तो वास्तव्यास आहे. त्याच आधारकार्ड असेल किंवा बाकीच काही असेल, त्याच रेशनिंग कार्ड हे सुध्दा प्रुफच आहे. त्यामधुन तो काही

देत असेलतर अदिवास प्रमाणपत्र जे आहे ही अट शिथील करण्यात यावी एवढी माझी विंनंती राहील. त्याचबरोबर २०२० हे आपल वर्षे कोरोना महामारीमध्ये गेल. त्या पिरीएडमध्ये आपण आपली टॅक्सेशनची जी बील दिली गेली ती बील मे किंवा जून पर्यंत दिली जातात म्हणज मे च्या अगोदर ती दिली जातात. ती बील आपण डिसेंबरमध्ये दिली गेलेली आहेत. ती डिसेंबरमध्ये बील गेल्यानंतर सर्वसामान्य करामध्ये महीलासाठी जी सुट देण्यात येते ती सुट यावेळेस आपल्याला महीलांना देता आली नाही कारण की मे आणि जून मध्ये ती योजना आपली संपलेली आहे. यावर्षी बीलामध्ये ज्यांना त देता आलेल नाही त्यांना त्याचा लाभ देता येईल का तेवढ पहाव आणि आयुक्त साहेब मोठया ज्या कंपन्या मालमत्ता कर भरत नाहीत त्यांच्यासाठी तेम्ही काय कारवाई केली  याचे उत्तर तुम्हांला दयाव लागेल.

**मा.आशा धायगुडे- शेंडगे-** मा.महापौर साहेब, मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका.  ख-या अर्थानी मगाशी मला उपसूचना दयायची होती त्यामुळे मलात्यावर बोलता आल नाही आपण सर्वांनी विचार केला पाहीजे की आपण जो नागरीकांकडून कर गोळा करतो त्या करावरती आपली पिंपरी चिंचवड महानगरपालिका चालते. त्याच्यामध्ये आपण सामान्य कर घेतो, साफसफाई कर घेतो, अग्निशामक कर घेतो, साफसफाई कर घेतो मनपा शिक्षण कर घेतो, मलप्रवाह कर घेतो, पाणीपुरवठा लाभ कर घेतो, रस्ता कर घेतो आणि वृक्षकर घेतो. मा.महापौर साहेब, ख-या अर्थाने आम्हांला अधिका-यानी सांगायच की आपण या शहरातील नागरीकांच्या जीवावर हे शहर आपण सगळेजण रण करतो, पळवतोय त्याच्यातून नवनवीन शहरातील विकासाची काम काढतो त्या नागरीकांना जे कर आपण घेतो त्या कराचा मोबदला देतो का. सामान्य कराच ठिक आहे परंतु जर साफसफाई कर आपण जर याठिकाणी म्हणलो तुम्ही जावून या शहरामध्ये राऊंड मारुन यात तुम्ही महापौर आहात, प्रभागातील नगरसेवक सर्वजण आपआपली जबाबदारी पेलवतो त्यावेळेस तुम्हांला आम्हांला मानसीक समाधान मिळतं का. आपल्या शहरामध्ये साफसफाई केली जाते का. याचा विचार सुध्दा मा.महापौर साहेब आपण केला पाहीजे. आता माऊलीन सांगीतल आहे. हा ठेका यांचा पगाराच ऐटीएम कार्ड माझ्या खात्यावर बारा हजार रुपये दिसतात ते एटीएम मध्ये टाकलेले व बारा वाजून एक मिनीटानी, दोन मिनीटानी ते बारा हजार रुपये पुर्ण काढलेले असतात. कारण की एटीएम आमचा ठेकेदारच रण करतो. मग कशी साफसफाई शहरामध्ये आम्ही देणार. हे जे दु:ख शहराच आहेना त्याचा सुध्दा आपण विचार केला पाहीजे. एवढच नव्हेतर आपण रस्ता

कर घेतो अख्ख्या शहरात लोकाना रस्ता कुठे उपलब्ध आहे का, फुटपाथवर किती ठिकाणी अतिक्रमण झालेल आहे. टप-या असतील, बस असतील, गाडया असतील रोजचे पेपरचे पानची पान भरलेली असतात. की आज याठिकाणी इतकी वाहन उभी होती आज त्याठिकाणी इतक इतक पाणी लीकेजेस झालेल आहे, आज याठिकाणी इतकी घाण आहे, या या ठिकाणी ढास आहेत. रोज ही बदनामी म्हणजे नगरसेवक म्हणून आपण १३३ जण काम करत नाहीत, प्रशासन काम करत काम करण्याचा आव आणतं कोणत्या तोंडानी आपण लोकांना म्हणायच तुम्ही जा आणि कर भरा म्हणून कारण तुमच्याच करावरती आमच शहर चालत आणि अधिका-यांचे पगार होतात हे आम्ही कोणत्या अधिकाराने लोकांना सांगायच. आता सुध्दा पालांडेताईनी सांगीतल ते अधिका-यांना कळत नाहीत का या बेसीक गोष्टी आहेत. आज सुध्दा सांगाव लागत की शहरातील मराठी भाषीक शाळांना तुम्ही करमुक्त करा, का हे सांगाव लागत. तुम्ही बाकी सगळया राज्यामध्ये बघा त्यांच्या राज्यामध्ये त्यांच्या त्यांच्या भाषेतील ज्या शाळा चालतात त्यांना कोणताही कर घेतला जात नाही मग पिंपरी चिंचवड शहरामध्ये असं काय आपल याच्यावरती आडलेलं आहे. जीथ मोठे लोक आहेत ते वीना कराचे काम करुन घेतात मग इथ शिक्षण देण्याच ज्ञान देण्याच अत्यंत अल्प फिमध्ये २० आणि ५० रु. फि घेतात मराठी माध्यमाच्या शाळा तुम्हांला आजही विश्वास बसणार नाही एवढया अल्प दरामध्ये विदयार्थ्यांना शिक्षण देण्याच काम ती शाळा करते तर त्यांच्याकडन कर घेण्याचा अट्टहास का. आपल शहर म्हणून जेवढे पैसे आपल्याला राज्यसरकारला पाठवायचे असतात तेवढे दोन प्रकारचे कर घ्यायचे आणि बाकीचे पिंपरी चिंचवड शहराचा एक वेगळा आदर्श याठिकाणी आपण निर्माण केला पाहीजे की आमच पिंपरी चिंचवड शहर असं आहे हे महाराष्ट्रातल एक शहर म्हणून आम्ही मराठी माध्यमाच्या शाळांचा कर घेणार नाही. मला वाटते त्याच्यामध्ये आपल्याला राज्यशासनाचे जे दोन प्रकारचे कर असतात एक असतो शिक्षण कर तो फक्त राज्यशासनाला आपल्याला पाठवावा लागतो तो काही दोन पाच टक्के असेल तेवढा घ्यायचा आणि बाकी सगळया करातून आपण या मराठी माध्यमाच्या शाळा या करमुक्त केल्या पाहीजेत. त्याच बरोबर अंध, अपंग शाळा असतील, मतीमंद मुलांच्या शाळा असतील हे करण सोप नाही तुम्हाला आम्हांला एखाद मुल तस वाटयाला आलना तर ते सांभाळण कस जड जात. ज्यांना ते आपत्य आहे त्यांचा तो त्रास काय आहे तो त्यांनाच माहीत आहे तो ते आनंदाने झेलतात आणि त्यांच संगोपन करणा-या शाळा असतीलतर त्यांची सुध्दा अवस्था फार काही वेगळी नसते. मा.महापौर साहेब, आपण याठिकाणी या दोघांचा विचार केला पाहीजे. मी जी उपसूचना मांडली जो

कर राज्यशासनाकडे जातो तेवढाच तो कर दयावा बाकीचे कर आपण आपल्या आयुक्तांच्या माध्यमातून तुमचा आदेश जर तुम्ही आयुक्तांना दिलातर याच ठिकाणी आपण तो विषय मंजूर करु शकतो आणि जो काही दोन चार पाच टक्के शासनाचा असेल तेवढाच जर दिलातर एक नवीन आदर्श पिंपरी चिंचवड शहरातील मा.महापौर तुमच्या माध्यमातून याठिकाणी आपल्याला करता येईल. परंतु सन्मा.महापौर साहेब, जे काही आता मी विषय मांडले मी साफसफाई कर देत असेलतर मी या शहरातील नागरीकांना आहवान करते सभागृहाच्या माध्यमातून की जोपर्यंत तुम्हाला रस्ते आम्ही मोकळे करुन देत नाहीत, जोपर्यंत स्वच्छ रस्ते देत नाही, जोपर्यंत चांगल पाणी देत नाहीत तोपर्यंत अजीबात टॅक्स भरु नका, चालणार आहे का. चाललतर हे शहर आपल पळेल का. मग हे जर कळत की लोकांनी टॅक्स भरलाच पाहीजे त्यांच्यावरतीचे जप्तीचे बोर्ड आपण सर्व शहरामध्ये लावलेत, जर आम्ही या सर्व सुविधा दर्जेदार देत असूना तर निश्चितपणे त्यांच्याकडून आम्ही कर घेणं लागतो. आजच पेपरला बातम्या आहेत याठिकाणी ड्रेनेज लाईन फुटलेली आहे, याठिकाणी अमुक आहे, त्याठिकाणी तमुक आहे मग आमचा अधिकारी वर्ग करतो काय. मगाशी कोणतरी म्हणल की कन्सलटंट नेमलेमुळे अधिका-यांना कामच नाही. त्यांना शहरातील असलेल्या समस्यावरही काम करायच नाही मग अधिकारी नेमक करतात काय याच संशोधन आपण केल पाहीजे. ज्या त्या प्रभागातील अधिका-यांनी त्या त्या प्रभागात कोणतीही समस्या उद्भवणार नाही याची काळजी त्यांनी केली पाहीजे. मा.महापौर साहेब, दरवर्षी उन्हाळा आला की मी त्या ड्रेनेजवाल्याला फोन करत असते सगळया ड्रेनेजच्या लाईन  आताच साफ करायच्या असतात का तर पावसाळयामध्ये यांच्या वॉर्डात तुंबणार, त्यांच्या वॉर्डात तुंबणार आणि मग मला काही नंतर गाडी उपलब्ध होणार नाही, चला आताच ही काम संपवून टाकू म्हणजे पावसाळयात कमीत कमी त्रास होईल. यासाठी आम्ही हे प्लॅनिंग करायच कारण की का तर पुन्हा पुन्हा आम्हांला नागरीच्या समोर जायच असतं म्हणून. अधिकारी पगार घेतात त्यांच हे काम नाही का. आता पुढचा विषय आहे की आपण यांत्रिकी पध्दतीने साफसफाई करायला देणार आहे. ख-या अर्थाने याठिकाणी बील काढण्याच काम जे होतं त्याचा विचार आपण केला पाहीजे. आता परत नवीन एक टेंडर आल आहे सिक्युरीटीच. माझ्या उदयानातल एक मोठ स्टील तोडल्या गेल आहे मी म्हणाले तुम्ही पोलीस स्टेशनला कंम्प्लेन्ट करा. सन्मा.महापौर साहेब, ज्यांना हा ठेका दिला त्या ठेकेदारावरती कंट्रोल करण्याच काम आमच्या अधिका-यांच नाही का याच उत्तर आपण दयाव आणि येथून पुढे आपण लोकांना सांगीतल पाहीजे की हे सगळे कर आम्ही तुमच्याकडून घेतोना,

छातीठोकपणे आम्ही तुमच्याकडून मागतोतर आम्ही पण तुम्हांला तेवढयाच सुविधा देतो हे आपल्याला सांगता आल पाहीजे, धन्यवाद.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. या संपुर्ण शहराला कोरोना काळात पुर्ण स्कुल, कॉलेजेस बंद होते यांना सर्वांना त्या पिरीएडचा टॅक्स माफ करावा अशी मी सभागृहात सूचना मांडतो. ते करत असताना आता आपण सांगीतल की विशेष शाळांना सांगीतल, ताईनी मराठी भाषीक शाळांना सांगीतल परंतु शहरामध्ये ज्या ज्या संस्था ज्ञानदानाच काम करतात मोठमोठया संस्था असतील, शाळा असतील पुर्ण कोरोना काळात आज ते सुध्दा मेथाकुटीला आलेले आहेत त्यांना देखील कोरोना काळातील हा जो कर आहे त्यात आपण सुट दयावी.

मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिं.चिं.शहरात शैक्षणिक संस्था हया ज्ञानदानाचे काम करतात त्या सर्व शिक्षण संस्थांना कोरोना कालावधीमधील कर माफ करणेस तसेच शिक्षण संस्थांना वाणिज्य ऐवजी निवासी दराने कर आकारण्यास मान्यता देणेत यावी तसेच नागरीकांना देखील कोरोना कालावधीतील करमाफ किंवा सवलत देण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मगाशी याच्या अगोदरचा एक विषय होता की आपण नागरीकांना दंड आकारतो, जस नागरीकांकडून कर घेतो व नागरीकांना दंड आकारतो. मागच्या मिटींगमध्ये मी असे म्हणले होते की शहरामधील कोरोनाच्या परिस्थितीमध्ये पिंपरी चिंचवड शहरामध्ये कामगारनगरी आहे, कंपन्या बंद होत्या आणि हा इशारा आपण केला गेला पाहीजे की आपल्याला नागरीकांना एक वर्षासाठी करामध्ये सवलत देता येत का किंवा आपल्याला त्यांना काय सवलत देता येईल हा सुध्दा आपण विचार केला पाहीजे. मा.महापौर आपण लाखाचे मास्क वाटप केले मग याच्यामध्ये कितीतरी भ्रष्टाचार झाला कितीतरी काहीतरी झालं. या सगळया गोष्टी करण्यापेक्षा थेट नागरीकांपर्यंत म्हणजे आपण म्हणतो शेतक-यांनी शेतात पिकवायच आणि नागरीकांना थेट सवलत मिळाली पाहीजे. मला असं वाटत नागरीकांना आपण कोरोनाच्या काळामध्ये सवलत ही टॅक्सच्या स्वरुपामध्ये दिली गेली पाहीजे. आता ताईनी विषय मांडला की मराठी शाळांना दिल पाहीजे, बाकीच्यांना दिलं पाहीजे परंतु नागरीकांचा सुध्दा हा हाक्क आहे.

आज नागरीकांची अशी परिस्थिती होती की त्यांच्याकडे घरामध्ये स्वयपाकाला अन्नही नव्हतं की जेणेकरुन पगार झाले नाही म्हणून. खुप नगरसेवकांनी दिलं, सेवाभावी संस्थानी दिलं, आपल्या महापालिकेमधुन आशा काही एनजीओज होत्या की जे रस्त्यावर असणारे कामगार त्यांना रोज दोनवेळेचे जेवण देणं हे सुध्दा आपण पिंपरी चिंचवड शहरामध्ये केलेलं आहे. आता दुसरी लाट आलेली आहे अजून कुठेही पिंपरी चिंचवड शहर हे स्थिर झालेल नाही. तुम्ही नागरीकांना सरसकट करामध्ये पन्नास टक्के सवलत दयावी. महीलांनातर आपण देतोच पण सरसकट दयावी अशी मनापासून इच्छा आहे. बाकी तुम्ही मास्क वगैरे काही देवू नका, डस्टबीन देता काही उपयोग नाही. मास्क वाटप करतो काही उपयोग नाही. परत आपण भ्रष्टाचारा विषयी बोलतो, आज मगाशी खरच आशाताई म्हणाल्या खरच आपल्या शहरामध्ये एवढी स्वच्छता आहे का. स्वच्छता कर लावला आहे, मलनिस्सारण कर लावला आहे सगळे कर लावलेले आहेत आपण. मग या सुविधा आपल्याला आज योग्य पध्दतीने दिल्या जातात का. फुटपाथ उखडलेले आहेत, स्मार्ट सिटीन तर अख्ख्या शहराच वाटोळ केलं. आख्ख शहर खोदून ठेवलेलं आहे. मग आता ते परत एवढ दुरुस्त करायच त्याच्यात परत त्या स्मार्ट सिटीचा घोळ. मग तुम्ही डायरेक्ट करदात्यांना दयाना मग ते तरी म्हणतील की कोरोनाच्या काळामध्ये आमच्याकडे पैसे नसताना महापालिकेनी ५० टक्के सवलत दिली करामध्ये. त्यांना बाकीच काही देवू नका, मास्क वगैरे पुढच्या येणा-या काळामध्ये टेंडर काढू नका, कुठल्याही ठेकेदाराना पोसण्यापेक्षा त्यांना कराच्या स्वरुपात सवलत दयावी अशी मी मा.महापौर मागणी करते. शहरामध्ये दुरुस्त्या केल्या गेल्या पाहीजेत, सुधारणा खुप झाली पाहीजे. शहर बकाल झालेल आहे, आम्ही बोलतोत आम्ही विरोधक आहोत असं वाटत असेल परंतु सत्ताधारी सुध्दा बोलतात. याचा अर्थ शहरामध्ये बदल हा केला गेला पाहीजे आणि सत्त्यात आहे, वास्तवात आहे म्हणून ते लोक सुध्दा बोलतात, आम्ही बोलतोत त्याच बरोबर त्यांना सुध्दा कुठेतरी नागरीकांकडून या गोष्टीची झळ बसते, नागरीक विचारतात आणि म्हणून मा.महापौर साहेब करामध्ये सरसकट ५० टक्के सवलत दयावी. मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांच्या मिळकत करामध्ये ५०% कोरोनाच्या पार्श्वभूमीवर कोरोनाच्या काळातील मिळकत करामध्ये सवलत देण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.अनुराधा गोफणे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

**मा.अजीत गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. याठिकाणी टक्सचा विषय सभागृहात आलेला आहे त्याच्यामध्ये

कुठलीही वाढ केलेली नाही त्याच्याबद्दल तुमचे आभार. परंतु मला याठिकाणी दोन महत्वाच्या गोष्टी सांगावयाच्या आहेत की आपण आता शास्तीकर बाजूला ठेवून टॅक्स घेतो. ३१ मार्च पर्यंत आपण शास्तीर बाजूला ठेवतो आणि टॅक्स घेतो. माझी आपल्याला विनंती आहे की ३१ मार्च नंतर सुध्दा शास्तीकर बाजुला ठेवून जर आपण टॅक्स घेतलातर मला वाटते शहरातील नागरीक आनंदाने पैसे भरतील आणि महापालिकेलाही त्याच्यातून उत्पन्न मिळेल. जर शास्तीकर आपण मागायला गेलोतर मला वाटते नागरीक तो भरुच शकत नाहीत. मुळात कोरोनाच्या काळामध्ये आर्थीक संकट सगळयावर आलेलं आहे. कारण ही कामगार नगरी आहे आणि मला वाटते की त्यामुळे लोकांकडे एवढे पैसे भरायला नाहीत आज काही लोक भरतात पण काही लोकांची अशी परिस्थिती आहे की त्यांना ३१ मार्च पर्यंत भरता येणार नाही. त्याच्यामुळे ही जी मुदत आहे ती ३१ मार्चनंतरही आपण चालू ठेवावी त्यासाठी ज्या काही मंजूरी लागतात शासनाकडे असलीतरी शासनाकडून सुध्दा दादांच्या माध्यमातून शास्तीकर बाजूला ठेवून जसा ३१ मार्च पर्यंतचा निर्णय आम्ही आणला तसा पुढचा सुध्दा निर्णय आणण्याचा आपल्या शहरातील नागरीकांसाठी प्रयत्न करु तुम्ही पण करा. उदयाच्या काळामध्ये शास्तीकर माफीसाठीचा आम्ही सुध्दा प्रयत्न करतोच आहोत. आम्ही हे करुन आणणार आहोतच कारण या शहरातील नागरीकांसाठी हे करायचच आहे. त्यावेळेस आम्ही तुम्हांला म्हणलो होतो की शास्तीकर बाजूला ठेवून कर घ्या तर ते तुम्ही ऐकले नाही, या तीन चार वर्षात आपल्याला चांगल उत्पन्न मिळाल असतं. दुसरा मुद्दा असा आहे की पुढच्या विषयपत्रीकेमध्ये एक विषय आहे ५ नंबर ज्याच्यामध्ये तुम्ही आयुक्तांना जुने जे आपले टॅक्स आहेत ते दुरुस्त करण्या संदर्भातला त्याठिकाणी विषय आहे. मुद्दामहुन आता बोलतो कारण की बराचवेळ आता झालेला आहे तुम्ही काय कराल पटकन जीबी संपवताल म्हणून त्या विषयाबाबत आताच मी बोलतो. आपण एका बाजूला टॅक्स वाढवत नाहीत परंतु दुस-या बाजूला पुढच्या विषयपत्रीकेवर विषय आलेला आहे. जुन्या मिळकतधारकांना टॅक्स कमी येतो म्हणून त्यांचा टॅक्स वाढवायचा तो विषय आहे. तरी मा.महापौर साहेब तसं तुम्ही करु नये कारण या वर्षीच आर्थीक संकट लक्षात घेता प्रशासनानी जरी विषय मांडला असलातरी माझी विनंती आहे की तशा पध्दतीने तो विषय करु नये अशा प्रकारची माझी आपल्याला विनंती आहे.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. कर आपण वाढविलेच नाहीत, खरतर कोवीड संपल्यानंतर राज्यशासनाकडे आपण ठराव करुन पाठवलेला आहे की निम्मा टॅक्स घ्यावा

म्हणून त्यावर राज्यशासनाच उत्तर यायच आहे. नागरीकांच्या बाजूनी आपण ऑलरेडी निर्णय त्या संदर्भात घेतलेलाच आहे. हा निर्णय घेत असताना आता आजीतभाऊ तुम्ही म्हणाले की शास्तीकर सोडून तुम्ही जर टॅक्स घेतला असतातर तुमच म्हणण खर आहे आम्हीतर आजही घ्यायला तयार आहोत फक्त एकदा ते जे सॉफ्टवेअर आहे ते जर राज्यशासनाने आम्हांला दुरुस्त करुन दिलतर लगेच उदयापासूनच शास्तीकर सोडून आम्ही टॅक्स घ्यायला सुरवात करतो. सत्ताधारी म्हणून आमची ती जबाबदारी आहे ती आम्ही नाकारतच नाहीत. परंतु राज्यशासनाने सॉफ्टवेअर दुरुस्त  करुन दिलतर आम्हांला ते चांगल्या प्रकारे करता येणार आहे. मा.महापौर साहेब, जुन्या मिळकतीची नोंदच नव्हती अशा मिळकतीचा आपण सर्व्हे केला आणि सर्व्हे केल्यानंतर त्यातल चांगल्या पैकी उत्पन्न आपल्याला मिळाल आहे. खुप पुर्वीपासून ज्यांची कुठे नोंदच नव्हती अशा मिळकतीचा आपण सर्व्हे केलेला आहे आणि सर्व्हे केल्यानंतर त्याठिकाणी आपल्याला चांगल उत्पन्न मिळाल आहे हे जरी खर असलतरी आता याठिकाणी आपण मिळकत कर कुठलाही वाढवलेला नाही. हा मिळकतकर वाढवला नाही इतपत ठिक आहे परंतु आता आपण काय केल की जागोजागी बोर्ड लावून जी दंवंडी पिटवून नागरीकांकडन जप्तीचा धाक दाखवून आपण टॅक्स जमा करतो. टॅक्स जमा केला पाहीजे का तर शंभर टक्के जमा केला पाहीजे कारण महापालिका त्याच्या शिवाय चालणार नाही. परंतु एखादयाने जर विनंती केली, दोन दिवसाची, तीन दिवसाची मुदत मागीतलीतर मला वाटते त्याठिकाणी मुदत दयायला काही हरकत नाही. दोन आणि तीन दिवसानी काही आकाश कोसळणार नाही. दोन तीन महीन्याच असतंतर तुम्ही विचार नका करु, दोन दिवसाची, तीन दिवसाची मुदत देत नाहीत आणि मग एखादयाला डोळयापुढे धरुन एखादयावर कारवाई करणं, त्याच्याकडन जप्तीन वसुल करणं आणि जे लोक तुमचे बगलबच्चे आहेत, अधिकारीच खास करुन त्यांना अशा ठिकाणी सुट देणं हे कितपत योग्य आहे. मग नियम करायचा असेलतर सरसकट सगळयांना एकसारखा करा. या कोरोनामध्ये संपुर्ण जग होरपळून निघालय हे आपल्याला माहीती आहे. देवू थोडीशी उसंत, दोन दिवस, तीन दिवस त्यांच्याकडन इन्डीमेटी बॉण्ड घ्या, लिहून घ्या, पत्र घ्या या तारखेपासून या तारखेपर्यंत तुम्ही जर नाही पे केलतर आम्ही जप्ती करु. केल पाहीजे पण आपण सुटच दयायची नाही असं जर ठरवल असेलतर मला वाटत त्याने सुध्दा मोठया प्रमाणात नागरीकांची नाराजी आपण ओढवून घेतो आणि ही नाराजी आपण कुठतरी थांबवली पाहीजे. या करामध्ये आपण वाढ केलेलीच नाही परंतु ती घेत असताना सुध्दा आता जर का आपण सभागृहाने जर का ठराव केला असेल की  शास्तीकर वगळून मुळ मिळकतकर घेण्यात यावा तर

मला वाटत अधिका-यांना काही प्रॉब्लेमच नसला पाहीजे. तुम्ही जी सारखी टिमकी वाजवतात की राज्यशासनाकडून आल पाहीजे, राज्यशासनाकडन आल पाहीजे मला वाटत पैसे घेण्याला बंधन नाही कुणाला दयायच असेलतर त्याला बंधन असल पाहीजे. हे तर घ्या काय होत त्या टॅक्सवरती व्याज वाढत आणि १२ टक्केनी जर वार्षीक व्याज वाढलतर सावकार पेक्षा मोठ आपण होवू. तुम्ही लोकांना हाप्ते पाडून दया आता लोकांकडे उत्पन्नाचे सोर्सोस नाहीत. शाळाच भरायच, लाईट बील भरायच, टॅक्स भरायचा, घर पण चालवायच कामावरती अर्धा पगार झालेला आहे. लोकांनी करायच काय. यासाठी सगळयाची साखळी आपल्याला गुंफवावी लागणार आहे आणि साखळी गुंफताणा आपल्याला कुठेतरी लोकांच्या बाजूने निर्णय घेणं फार महत्वाच आहे नव्हेतर तो घ्यावाच लागणार आहे. आपण जर असं केलतर त्यांना जागेवरती बील प्रोसेस चालू केलीतर मला वाटत काही हरकत होणार नाही. राज्यशासनाला आपण उत्तरदायी आहोत जनता उत्तरदायी नाही आणि जनतेला आपण उत्तरदायी आहोत कारण आपण सत्ताधारी आहोत. या सभागृहात जे नगरसेवक निवडून आलेले आहेत ते सत्ताधारी म्हणूनच आहेत. कारण का विरोधी पक्षात जरी असलेतरी सत्तेच्या पदावरती आहेत. आणि म्हणून सगळयांना विनंती आहे की आपण ठराव करु या की या नागरीकांच्यासाठी त्यांनी आपल्याला शास्ती नाही दिली तरी, शास्ती पेन्डींग ठेवा जो काही टॅक्स आहे असेल मुळ कर जो आहे त्याच्यामध्ये तीन हाप्ते करुन आपण त्यांचा टॅक्स वसुल करावा.

मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- पिं.चि.मनपातील नागरिकांचे शास्तीकर (मुळ) वगळून तीन हस्यामध्ये घेण्यास मान्यता देणेत यावी जेणेकरुन वसुली होईल व नागरिकांना सवलत मिळेल.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब उपसूचनेला अनुमोदन देतो. मी सिमाताईंच अभिनंदन करतो कारण की या कोवीडच्या काळात सर्वांच आर्थीक संतुलन बीडघलेल आहे त्यामुळे त्याच नियोजन करण्यासाठी त्यांनी योग्य उपसूचना मांडली त्यास मी अनुमोदन देतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. खर म्हणजे कराच्या संदर्भात कुठल्याही प्रकारची करवाढ याठिकाणी केली नाही मला असं वाटत सर्वांनी त्याच कौतूक केलेल आहे. परंतु आपल्या सन्मा.सदस्यांनी याठिकाणी अपेक्षा व्यक्त केली आणि मंगलाताईनी सुध्दा याठिकाणी सांगीतल की कोवीड काळामध्ये लॉकडावून होत काही लोकांकडे पैसे नव्हते, पगार मिळत नव्हता आणि म्हणूनच आपण नोव्हेंबर महीन्याच्या जीबी

मध्ये ठराव करुन शासनाकडे आपण हा विषय पाठवलेला आहे. सहा महीन्याचा शंभर टक्के टॅक्स माफ करावा अशा प्रकारची उपसूचना देवून हा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबीत आहे. मला असं वाटत की आपली सत्ता आहे त्यामुळे आपण जर कापाठपुरावा केलातर आणि शासनाकडून तशी मंजूरी मिळालीतर आपण सहा महीने लोकांचा कोरोनाकाळामधला जो टॅक्स आहे तो शंभर टक्के माफ करावा अशा संदर्भातला ठराव शासनाकडे प्रलंबीत आहे. अजीतभाऊ आपण शास्तीकराच्या संदर्भात सांगीतल, शास्तीकराचा सुध्दा विषय आपण चांगल्या पध्दतीने सरकारच्या माध्यमातून केला त्याबद्दल मी आपल्या सर्वांच याठिकाणी अभिनंदन करतो. परंतु मगाशी ताईन सांगीतल की सॉफ्टवेअरमध्ये बदल करुन पाहीजे. मला वाटत शासनाने विशेष बाब म्हणून फक्त कोरोनाकाळामध्ये लोकांना शास्ती कर भरण्याची सवलत मिळावी म्हणून ८ मार्च पर्यंत होत त्याची मुदत आपण याठिकाणी शासन स्तरावर वाढवून आणली. मला वाटत जनतेचा जो काही शास्ती कर आहे तो बाजूला ठेवून मुळ टॅक्स भरण्यासाठी बरेच नागरीक आपल्याकडे सुध्दा येतात आणि त्या संदर्भामध्ये तशी आपण शासनाकडून मंजूरी आणलीतर त्याच सुध्दा आम्ही अभिनंदन करु. अजीतभाऊ हे सुध्दा विसरु नका की ज्यावेळेला शास्तीकराच्या संदर्भात शंभर टक्के माफीचा सभागृहाच्या माध्यमातून शासनाकडे आहे. दिड वर्षापुर्वी सुध्दा शास्तीकर संपुर्ण माफ व्हावा म्हणून अशाप्रकारची उपसूचना मांडून शासनस्तरापर्यंत हा विषय सुध्दा शास्तीकराचा प्रलंबीत आहे. आता परत तोच विषय येतो की राष्ट्रवादीच्या काळामध्ये, आता आम्ही म्हणतो का आमच्या काळामध्ये आमच शासन नव्हतं आम्ही म्हणतो एक हजार पर्यंत आम्हीही माफ केला. त्यावेळेला राष्ट्रवादीनीच हा त्यावेळेला लावलेला शास्तीकर आहे आता तुम्हांला संधी आहे एक वर्षे सरकार हे तुमच या राज्यामध्ये आहे. मला तुम्हांला असं वाटत की महापालिकेच्या ऐरीयामध्ये असणा-या प्रत्येक नागरीकांचा शास्तीकर हा माफ व्हावा म्हणून आता तुमच सरकार आहे तुम्हीच त्यावेळेला सांगीतल होतं आम्ही शंभर टक्के शास्तीकर माफ करु म्हणून, तुम्हांला कोणी आडवल आहे. आपण शंभर टक्के शास्तीकर माफ करावा अशाप्रकारचा ठराव या सभागृहामार्फत पाठवलेला आहे. अजीतभाऊ मी आपल अभिनंदन करेन, राष्ट्रवादीच अभिनंदन करेन की हे आपण लवकरात लवकर मंजूर करुन आणाव आम्ही अभिनंदनाचा ठराव याठिकाणी मांडू. तुम्हांला कुणी थांबवल नाही वर्षभरापासून आपली सत्ता राज्यामध्ये आहे. राज्यामध्ये आपली सत्ता असताना आपण हा विषया याठिकाणचा करावा जेणेकरुन आपल्याला सॉफ्टवेअर बदला, विशेष बाब करा हे आपल्याला कराव लागणार नाही. तुम्हीच लावलेल पाप, तुम्हीच लावलेल भूत, तुम्हीच केलेल हे

काम आहे हे तुम्ही करुन घेतलतर त्याच आम्ही अभिनंदन करु. मा.महापौर हा जो शास्ती नावाचा कर आहे हा राष्ट्रवादीन त्यावेळेस लावलेल आहे आणि त्यांच सरकार राज्यामध्ये आहे त्यांनी ते करुन आणाव या सभागृहामध्ये मी त्यांच अभिनंदन करीन. येत्या महीनाभरामध्येच हे करुन आणा आम्ही अभिनंदनाचा ठराव मांडू. मा.महापौर साहेब, हा कराच्या संदर्भामधला विषय आहे तो आपण मंजूर करावा अशी आपणास मी विनंती करतो. आपण याठिकाणी उपसूचना मांडलेली आहे, मंगलाताईनी मांडलेली आहे हा शासनाकडे जाणार आहे तो तुम्ही मंजूर करुन आणा त्याच सुध्दा आम्ही अभिनंदन करु, धन्यवाद.

**मा.महापौर -** उपसूचना स्विकारल्या आहेत का.

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, उपसूचनां स्विकारलेल्या आहेत विषय मंजूर करावा.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ६०७ विषय क्रमांक - ६

दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.कर/मुख्य/९/कावि/१९/ २०२१, दि.१३/०१/२०२१

२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८२०४, दि.१९/०१/२०२१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९९ च्या तरतूदी अन्वये महानगरपालिकेने कार्यक्षेत्रातील मिळकतींवर कर व करेत्तर बाबींचे दर सन २०२०-२०२१ करिता लागू केलेले आहे तसेच शासनाचे शिक्षणकर, रोजगार हमीकर व फ्लोअरेज कराची वसुली शासनाने ठरवून दिलेल्या दराने शासनाचे करिता केली जाते. तसेच सन २०२१-२०२२ या सरकारी वर्षाकरिता दिनांक २० फेब्रुवारी २०२१ पूर्वी करांचे दर ठरविणे आवश्यक आहे .त्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ९९ अन्वये सन २०२१-२०२२ या वित्तिय वर्षासाठी खालील प्रमाणे करांचे आणि करेत्तर बाबींचे फी/शुल्काचे दर प्रस्तावित करण्यात येत आहे.

सन २०२१-२२ या सरकारी वर्षाकरिता कराचे व करेत्तर बाबींचे दर निश्चिती बाबत –

अ. करांचे दर

वरील करांव्यतिरिक्त (नाटयगृह कर) (करमणूक कर) खालीलप्रमाणे वसूल केला जातो.

| अ.क्र. | कराचे नाव | करआकारणी पध्दत करयोग्यमूल्यावर | सन 2020-2021 चे प्रचलित दर (सध्याचे) | | सन 2021-2022 करिता प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | निवासी | निवासेत्तर | निवासी | निवासेत्तर |
| 1 | सामान्य कर | र.रु.1/- ते 12000/- | 13% | 14% | 13% | 14% |
| | | र.रू.12001/ ते -30000/- | 16% | 17% | 16% | 17% |
| | | र.रु.30001/- व त्यापुढील | 24% | 24% | 24% | 24% |
| ब1 | साफ सफाई कर | करयोग्य मूल्यावर | 5% | 6% | 5% | 6% |
| | अग्निशामक कर | करयोग्य मूल्यावर | 2% | 2% | 2% | 2% |
| | मनपा शिक्षणकर | करयोग्य मूल्यावर | 4% | 5% | 4% | 5% |
| 2 | मलप्रवाह सुविधा लाभ कर | करयोग्य मूल्यावर | 5% | 5% | 5% | 5% |
| 3- | पाणीपुरवठा लाभ कर | करयोग्य मूल्यावर | 4% | 5% | 4% | 5% |
| 4 | रस्ता कर | करयोग्य मूल्यावर | 2% | 3% | 2% | 3% |
| 5 | विशेष साफ सफाई कर (फक्त मॉल्स, लॉजिंग बोर्डिंग, मंगल कार्यालय,सभागृह, रुग्णालय, हॉटेल्स, कॅन्टीन्स, रेस्टॉरंट या स्वरुपाच्या मिळकतींस) | करयोग्य मूल्यावर | -- | 2% | -- | 2% |
| 6 | वृक्षकर | करयोग्य मूल्यावर | 1% | 1% | 1% | 1% |

| अ. क्र. | कराचे नाव | करआकारणी पध्दत | सन 2020-2021 चे प्रचलित दर(सध्याचे) | सन 2021-2022 करिता प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| 7 | नाटयगृहावरील कर(करमणूक कर) | 1. सिनेमा | | |
| | | अ) 500 पर्यंत किंवा त्यापेक्षा जास्त बैठक व्यवस्था (सिट्स) असणा-या थिएटरला प्रती स्क्रीन | प्रती दिवस रु.250/- | प्रती दिवस रु.250/- |
| | | ब) मराठी सिनेमा | कर माफी | करमाफी |
| | | क) वातानुकुलित थिएटर प्रती स्क्रीन | प्रती दिवस रु.350/- | प्रती दिवस रु.350/- |
| | | 2. नाटक | प्रती प्रयोगास रु.100/- | प्रती प्रयोगास रु.100/- |
| | | 3.सर्कस(कॉन्व्हिलपेट्स) | प्रती प्रयोगास रु.100/- | प्रती प्रयोगास रु.100/- |
| | | 4.तमाशा | प्रती प्रयोगास रु.100/- | प्रती प्रयोगास रु.100/- |
| | | 5.संगीत जलसे/शास्त्रीय संगीत जलसे (थियटर मधील किंवा थियटर व्यतिरिक्त प्रत्येक प्रयोगास) | प्रती प्रयोगास रु.100/- | प्रती प्रयोगास रु.100/- |
| | | 6. कुस्त्या/मुष्टीयुध्द | प्रती प्रयोगास रु.50/- | प्रती प्रयोगास रु.50/- |
| | | 7. वरील खेरीज इतर प्रत्येक प्रयोगास (जर वेगवेगळे खेळ नसतील तर अशा प्रत्येक दिवसास) | प्रती दिवस रु.100/- | प्रती दिवस रु.100/- |

ब) सामान्य करातील सवलत योजना : सामान्य कर (सामान्य करामध्ये सामान्य कर + साफसफाई कर +अग्निशामक + मनपा शिक्षण उपकर हे कर समाविष्ट आहेत.)

| अ क्र. | योजना | सन 2020-2021 चे प्रचलित दर (सध्याचे) | सन 2021-2022 करिता प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| 1 | स्वातंत्र्य सैनिककिंवा त्यांचे पत्नी यांचे स्वत: राहत असलेल्या फक्त एका निवासी घरास सामान्य करात सुट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50%रक्कम सूट |
| 2 | फक्त महिलांचे नावे असलेल्या स्वत: राहत असलेल्या फक्त एका निवासी घरास सामान्य करात सुट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कम सूट |
| 3 | 40% किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व असणा-या अंध, अपंग, मतिमंद, कर्णबधिर व मुकबधिर यांच्या नावावर असणा-या मिळकतीस | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कम सूट |
| 4 | संपूर्ण मिळकतकराची रक्कम आगाऊ भरणा-यांकरिता सामान्य करात सुट देणे | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>.1स्वतंत्र नोंद असलेल्या निवासी वापराच्या मिळकतीस - 10% रक्कम सूट<br>.2बिगर निवासी / मिश्र / औद्योगिक/ मोकळया जमिनी इ .मिळकतीस- | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>.1स्वतंत्र नोंद असलेल्या निवासी वापराच्या मिळकतीस - 10% रक्कम सूट<br>.2बिगर निवासी / मिश्र / औद्योगिक/ मोकळया जमिनी इ .मिळकतीस- |

| अ क्र. | योजना | सन 2020-2021 चे प्रचलित दर (सध्याचे) | सन 2021-2022 करिता प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| | | 5% रक्कम सूट | 5% रक्कम सूट |
| 5 | ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिम मिळकती ग्रीहा : ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टीममध्ये २५०० चौ.मी.पेक्षा जास्त भूखंडावरील प्रकल्पांना बांधकाम परवानगी विभागामार्फत अंतिम भोगवटापत्रक व अंतिम ग्रीन बिल्डींग Certificate प्राप्त झालेल्या मिळकतींना सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>• 3Star Rating -05% रक्कम सूट<br>• 4 Star Rating - 08% रक्कम सूट<br>• 5 Star Rating -10% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>• 3 Star Rating -05% रक्कम सूट<br>• 4 Star Rating - 08% रक्कम सूट<br>• 5 Star Rating -10% रक्कम सूट |
| | स्वग्रीहा : ग्रीन बिल्डिंग रेटींग सिस्टिममध्ये २५०० चौ.मी.पेक्षा कमी भूखंडावरील प्रकल्पांना बांधकाम परवानगी विभागामार्फत अंतिम भोगवटापत्रक व अंतिम ग्रीन बिल्डींगCertificate प्राप्त झालेल्या मिळकतींना सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>• 1 Star Rating -05% रक्कम सूट<br>• 2 Star Rating - 08% रक्कम सूट<br>• 3 Star Rating - 10% रक्कम सूट<br>• 4 Star Rating - 12% रक्कम सूट<br>• 5 Star Rating - 15% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>• 1 Star Rating - 05% रक्कम सूट<br>• 2 Star Rating - 08% रक्कम सूट<br>• 3 Star Rating - 10% रक्कम सूट<br>• 4 Star Rating - 12% रक्कम सूट<br>• 5 Star Rating - 15% रक्कम सूट |
| 6 | संरक्षणदलातीलशौर्यपदकधारक आणिमाजीसैनिकांच्याविधवा तसेच अविवाहीत शहीद सैनिकांचे नामनिर्देशितांचे राहणा-या त्याचप्रमाणे शहरात वास्तव्य करणा-या माजी सैनिकांना मालमत्ता करातून सूट (शासननिर्णयानुसार) | मालमत्ताकरात (सामान्यकर, मल प्रवाह सुविधा लाभ कर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ताकर) सूट | मालमत्ताकरात (सामान्यकर, मल प्रवाह सुविधा लाभ कर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ताकर) 100 %सूट |

| अ क्र. | योजना | सन 2020-2021 चे प्रचलित दर (सध्याचे) | सन 2021-2022 करिता प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| 7 | वरील योजनेपैकी कोणत्याही फक्त एका योजनेचा लाभ मिळकत धारकास घेता येईल तसेच वरील योजनेचा सामान्य करातील सवलतीचा लाभ घेणेकामी थकबाकी सह दोन्ही सहा माहीची संपूर्ण बिलाची रक्कम एक रक्कमी आगाऊ भरणेची मुदत (बिल मिळो अथवा न मिळो) | अ.क्र. 1 ते 5 मधील सवलत योजनांसाठी – दिनांक 30 जून अखेर<br>अ.क्र. 6 चे सवलत योजनेसाठी संपूर्ण वर्ष | अ.क्र. 1 ते 5 मधील सवलत योजनांसाठी – दिनांक 30 जून अखेर<br>अ.क्र. 6 चे सवलत योजनेसाठी संपूर्ण वर्ष |
| 8 | थकबाकीसह एक रक्कमी मिळकतकराचाभरणा ऑनलाईन पेमेंट गेट-वे द्वारेकरणा-या मिळकत धारकास चालू आर्थिक वर्षाचे सामान्यकरात सवलत | 3. दि.1/4/2020 ते 30/6/2020 अखेर सर्वसाधारण करात 5%<br>4. दि.1/7/2020 ते 31/3/2021 अखेर सर्वसाधारण करात 2% | 3.दि.1/4/2021 ते 30/6/2021 अखेर सर्वसाधारण करात 5%<br>4.दि .1/7/2021 ते3 1/3/2022 अखेर सर्व साधारण करात 2% |

## क. करेत्तर बाबींचे फी / शुल्कांचे दर

| अ.क्र. | नाव | सन 2020-2021 चे प्रचलित दर (सध्याचे) | सन 2021-2022 करिता प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| 1 | मिळकत हस्तांतरण नोंद नोटीस फी | करयोग्य मूल्यावर 5% | करयोग्य मूल्यावर 5% |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | थकबाकी नसलेचा दाखला फी | प्रती दाखला 10/- रूपये | प्रती दाखला 10/- रूपये |
| 3 | मिळकत उतारा | प्रती उतारा 20/- रूपये | प्रती उतारा 20/- रूपये |
| 4 | प्रशासकीय सेवाशुल्क | प्रति बीलास 10/- रूपये | प्रति बीलास 10/- रूपये |

सन २०२१-२०२२ या वर्षाकरिता महानगरपालिका करांचे दर आणि करेत्तर बाबीची फी/शुल्क निश्चित करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१४ दिनांक १६/२/२०२१ अन्यये पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील घोषित अघोषित झोपडपट्टीवासियांना त्यांचे आरोग्य हे उत्तम राहण्याकरीता तसेच त्यांच्या कुटुंबियांचे आरोग्यमान व जीवनमान आरोग्यदृष्टया उत्तम राहणे ही महानगरपालिकेची पालक म्हणुन प्राथमिक जबाबदारी असलेने झोपडपट्टीवासियांच्या घरामध्ये सोलर होम लाईटचा (ग्रीन एनर्जी) पर्यावरणदृष्टया प्रवाह होणे गरजेचे असून महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण मार्फत तयार होणा-या विजेचा वापर कमी होईल तसेच त्यातुन निर्माण होणारा प्रदुषण वायू पासून म्हणजेच CO2 (कार्बन), Nox, Sox यापासून तेथील रहिवाशाचा बचाव होईल. घराच्या छपरावर सोलर पॅनेल उभारुन त्याव्दारे सोलर फोटो व्होल्टाइक पॅनेलव्दारे वीजनिर्मिती केली जाते. यामध्ये निर्माण झालेली वीज थेट महावितरणच्या जाळयाला (ग्रीड) ला जोडली जाऊ शकते. यातुन भारनियमन बंद होईलच शिवाय विजेचे मासिक बिल अत्यंत कमी प्रमाणात येईल. त्यासाठी प्रत्येक झोपडपट्टीतील कुटुंबाना प्रत्येकी १ सोलर होम लाईट सेट म्हणजे २ टयुब लाईट, १ फॅन चालविण्यासाठी सोलर पॅनल तसेच बॅटरी बॅकअप, इनव्हरटर व १ पोल कार्यान्वीत करुन देण्यात यावा. सदरचे काम करणेसाठी Broadcast Engineering Consultants India Limited अथवा Savitiribai Phule Pune University या संस्थेस थेट पध्दतीने देण्यात यावे. सदरची खरेदी महानगरपालिकेच्या शहर सुधारणा विभागाअंतर्गत येणा-या लेखाशिर्षावरील अ.क्र. १) महसुली – झोनिपु स्थापत्य विभाग किरकोळ दुरुस्ती

व देखभाल पान क्र.९१७ ते ९४८, २) महसुली – विद्युत विभाग पान क्र.९४९ ते ९५३, ३) भांडवली- झोनिपु स्थापत्य पान क्र. ५९८ ते ६०२, ४) भांडवली - विदयुत विभाग पान क्र.६३२ ते ६३६ यावरुन खर्च करण्यात यावा. तसेच सदर योजना पुर्ण करणेकामी शहर सुधारणा विभागातील तसेच इतर विभागातील अखर्चित रक्कम सदरच्या लेखाशिर्षावर वेळोवेळी उपलब्ध करण्यात यावी. सदरचे साहित्य प्रायोगिक तत्वावर सुरुवातीला तीन झोपडपट्ट्या शांतीनगर, विठ्ठलनगर, दत्तनगर या झोपडपट्टीमधील सर्व कुटुंबाना सदर साहित्याचा लाभ मिळावा तसेच आवश्यकतेनुसार याकामी निधी कमी पडल्यास वेळोवेळी निधी उपलब्ध करुन देणेस मा.स्थायी समिती ठराव क्र.८५१० दि.१७/०२/२०२१ अन्वये मान्यता मिळाली असून सदर ठरावास मान्यता देणेत येत आहे. तसेच करसंकलन विभाग हा महानगरपालिकेस स्थायी उत्पन्न मिळवून देणारा विभाग आहे. मिळकत कराचा जास्तीत जास्त भरणा होणेचे दृष्टीने दरवर्षी दिनांक ३१ मार्च पुर्वी संपुर्ण कराचा भरणा करणा-या मिळकतधारकांना चालू वर्षाचे मागणीमध्ये विवीध सवलती देणेत येत आहेत. विहित मुदतीत न चुकता प्रमाणिकपणे दरवर्षी मिळकत कराचा भरणा करणा-या मिळकतधारकांना सन्मानित/प्रोत्साहित करणेकामी प्रोत्साहनपर सवलत योजना राबविणे आवश्यक आहे.

ज्या मिळकतधारकांनी सन २०१८-२०१९ ते सन २०२०-२०२१ या मागील ३ सलग आर्थिक वर्षामध्ये ३१ मार्च पूर्वी विहीत मुदतीत थकबाकीसह संपुर्ण मिळकत कराचा भरणा केलाआहे. अशा सर्व मिळकतधारकांनी सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षामध्ये थकबाकीसह संपुर्ण मिळकत कराचा एकरकमी भरणा दिनांक ३१ मार्च पूर्वी केलेस अशा मिळकतधारकांना चालू वर्षाच्या म्हणजेच चौथ्या वर्षाच्या मागणीतील सामान्य करात २% (दोन टक्के) जादा प्रोत्साहनपर सवलत देण्यास मान्यता देणेत येत आहे. अशाच प्रकारे ज्या मिळकतधारकांनी त्या वर्षाच्या पुढील प्रत्येक सलग ३ वर्षाचा मिळकत कराचा थकबाकीसह संपूर्ण मिळकत कराचा एकरकमी भरणा दिनांक ३१ मार्च पुर्वी केलेस त्याचे पुढील वर्षी म्हणजेच चौथ्या वर्षाच्या सामान्य करात २% (दोन टक्के) जादा प्रोत्साहनपर सवलत योजना निरंतर लागू करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच महाराष्ट्रातील राज्यभाषा ही मराठी आहे. थोडक्यात आपण मराठी भाषीक आहोत. या मराठी भाषेचा आदर मान ठेवत ज्या आपल्या शहरातील मराठी माध्यमाच्या खाजगी अनुदानीत, विनाअनुदानीत व विशेष मुलांना शिक्षण देणा-या संस्थाचा शास्तीकरासह मुळ कर कायमस्वरुपी माफ करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांच्या मिळकत करामध्ये

५०% कोरोनाच्या पार्श्वभूमीवर कोरोनाच्या काळातील मिळकत करामध्ये सवलत देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिं.चिं.शहरात शैक्षणिक संस्था हया ज्ञानदानाचे काम करतात त्या सर्व शिक्षण संस्थांना कोरोना कालावधीमधील कर माफ करणेस तसेच शिक्षण संस्थांना वाणिज्य ऐवजी निवासी दराने कर आकारण्यास मान्यता देणेत येत आहे तसेच नागरीकांना देखील कोरोना कालावधीतील करमाफ किंवा सवलत देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिं.चि.मनपातील नागरिकांचे शास्तीकर (मुळ) वगळून तीन हस्यामध्ये घेण्यास मान्यता देणेत येत आहे जेणेकरुन वसुली होईल व नागरिकांना सवलत मिळेल.

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - ७

दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.आयुक्त

**संदर्भ -** १) मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८३४१, दि.०३/०२/२०२१

महाराष्ट्र शासन यांचेकडील पीसीसी/३००९/संक्र-२३३/प्र.क्र.३६९/१० नवि-२२ दि.०६/०८/२०१० आदेशान्वये र.रु.२५,००,०००/- इतके अनुदान कन्या विद्यालय, देहु यांना देण्यास मान्यता दिलेली आहे. अद्यापपर्यंत कन्या विद्यालय, देहु यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे अनुदानापोटी र.रु.१०,००,०००/- (अक्षरी र.रु.दहा लाख फक्त) अदा करणेत आलेले आहेत. तर उर्वरित र.रु.१५,००,०००/- अदा करणे बाकी आहे. कन्या विद्यालय, देहु या विद्यालयाचे नावा ऐवजी संत जिजाबाई कन्या विद्यालय, देहु असा बदल झाला आहे. तरी नावात बदल झाल्याने संत जिजाबाई कन्या विद्यालय, देहु यांना उर्वरित अनुदानापोटी र.रु.१५,००,०००/- देणेस मान्यता देणे.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.सुरेश भोईर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.संतोष कांबळे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ६०८ विषय क्रमांक - ७
दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८३४१, दि.०३/०२/२०२१

विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ७२ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - ८
दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.आयुक्त

**संदर्भ -** १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.आमुका/९/कावि/३१/२०२१, दि.२०/०१/२०२१
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८३५८, दि.०८/०२/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहरातील रस्ते यांत्रिकी पध्दतीने साफसफाईचे कामकाज करण्याकरिता निविदानोटीस क्र.२/२०१५-१६ अन्वये निविदा प्रक्रियेद्वारेमे.डी.एम.एंटरप्रायझेस व मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. या २ संस्थांना दि.१/१२/२०१५ ते दि.३०/११/२०१७ या २ वर्षे कालावधी करिता कामकाज सोपविण्यातआलेले होते. सदर कालावधी संपुष्टात आल्यानंतर उक्त संस्थांना मा.स्थायीसमिती सभा ठराव क्र.२३५७ दि.२८/०२/२०१८, ठराव

क्र.२७२२ दि.३०/०५/२०१८ वठराव क्र.३४१६ दि.२३/१०/२०१८ अन्वये मुदतवाढ देण्यात आलेली होती. सदरचीमुदतवाढ दि.३१/१२/२०१८ अन्वये संपुष्टात आल्यामुळे ठराव क्र.४०९८दि.२२/०१/२०१९ अन्वये ४ महिने कालावधीकरिता मुदतवाढ देण्यात आलेली होती. तदनंतरनिविदा नोटीस क्र.८/२०१९-२० अन्वये शहरातील रस्त्यांची यांत्रिकीपध्दतीने साफसफाई करण्याचे कामकाजाकरिता पॅकेज निहाय दर मागविण्यात आलेलेहोते. तथापि सदर निविदा प्रक्रियेमध्ये तांत्रिक त्रुटी राहिल्याचे निदेर्शनास आल्याने दि.६/०७/२०२० रोजीचे आदेशान्वये सदरनिविदा रद्द करण्यात आलेली होती. निविदा नोटीस क्र.७-१ ते८/२०२०-२१ अन्वये शहरातील रस्ते व गटर्स साफसफाईचे कामकाजाकरिता निविदामागविण्यात आलेल्या असून सदर निविदा प्रक्रियेचे कामकाज सुरु आहे. सदरनिविदेमध्ये शहरातील १८.०० मी. पेक्षा कमी रुंदी असलेल्या रस्त्यांचीसाफसफाई करण्याचे कामकाज प्रस्तावित आहे. तथापि, १८.०० मी. पेक्षा अधिकरुंदी असलेल्या रस्त्यांची साफसफाई यांत्रिकी पध्दतीने करावयाची असूनत्याकरिता निविदा प्रक्रिया राबविण्याचे प्रस्तावित आहे. मा.स्थायीसमिती सभा ठराव क्र.३१६४ दि.११/०९/२०१८ अन्वये शहरातील रस्ते, मंडई व इतरमोकळया जागा यांत्रिकी पध्दतीने साफसफाईचे कामकाजा करिता आर एफ पी तयारकरण्याकरिता मे.टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा. लि. यांची नियुक्ती करण्यासमान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार शहरातील १८.०० मी व त्यापेक्षामोठ्या रस्त्यांची साफसफाई ही यांत्रिकी पध्दतीने करणेकामी मे.टंडन अर्बनसोल्युशन्स प्रा. लि. यांचेमार्फत तयार करण्यात आलेला आरएफपी मसुदादि.७/०१/२०२१ रोजी सादर करण्यात आलेला आहे. सदर आर एफ पी चे अनुषंगानेदि.१९/०१/२०२१ रोजी मा.आयुक्त सो. यांचे समक्ष सादरीकरण झालेले असूनत्यामध्ये दुरुस्ती करण्याच्या सूचना सल्लागार संस्थेस देण्यात आलेल्याहोत्या. त्यानुसार मे.टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा.लि. यांचे मार्फत दि.१९/०१/२०२१ रोजी सुधारित आर एफ पी मसुदा सादर करण्यात आलेला आहे. त्यानुसारशहरातील १८.०० मी. पेक्षा मोठ्या रस्त्यांची चार भागांमध्ये विभागणीकरण्यात आलेली असून त्यामध्ये Southern side of head office चे २ पॅकेज वNorthern side of head office चे २ पॅकेजअशा रितीने ४ पॅकेज निश्चित करण्यातआलेले आहे. पॅकेज क्र.१ करिता २२१.६८ किमी, पॅकेज क्र.२ करिता२३६.०२ किमी, पॅकेज क्र.३ करिता २३९.८६ कि.मी. आणि पॅकेज क्र.४ करिता२३०.६९ कि.मी. इतकी रस्त्याची लांबी निश्चित करण्यात आलेली आहे. त्यामुळेशहरातील एकत्रित रस्त्यांची अंदाजित लांबी (Sweeping Length)९२८.२५ गृहीतधरण्यात आलेली आहे.

यामध्ये शहरातील महामार्ग, बीआरटी मार्ग व १८.०० मी.पेक्षा रस्त्यांची लांबी गृहीत धरण्यात आलेली आहे. यांत्रिकी पध्दतीनेरस्ते साफसफाई कामकाजाकरिता आवश्यक असलेल्या मनुष्यबळाबाबतची माहिती आर एफपी मध्ये समाविष्ट करण्यात आलेली असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे –

| **Sr. No.** | **Package Details** | **Contractual Sweeper (Required with Mechanized Sweeping Machines)** | **Driver (for Mechanical sweepers, transport vehicles & water tankers)** | **Operator for Mechanical Sweepers** | **Helper for transport vehicles and water tanker** | **Total** |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Package – 1(Southern side of head office Ward – ABDG) | 112 | 12 | 8 | 4 | 136 |
| 2 | Package – 2(Southern side of head office Ward – BDGH) | 112 | 12 | 8 | 4 | 136 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 3 | Package – 3(Northern side of head office Ward – CHE) | 112 | 12 | 8 | 4 | 136 |
| 4 | Package – 4(Northern side of head office Ward – ACF) | 112 | 12 | 8 | 4 | 136 |
| **Total** | | **448** | **48** | **32** | **16** | **544** |

तसेच यांत्रिकी पध्दतीने रस्ते साफसफाई कामकाजा करिता आरएफपी मध्ये २४ स्विपींग मशीन ८ हूक लोडर व ४ पाण्याचे टॅंकर्सची आवश्यकता असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. तथापि, वाहनांच्या संख्येमध्ये आवश्यकते नुसार बदल होण्याची शक्यता आहे. सदर निविदा कालावधी हा ७ वर्षांचा असून त्या करिता अंदाजे र.रु.४६३.९४ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. तथापि, निविदा प्रक्रिया राबविण्या करिता खालील बाबींची पूर्तता करुन कार्यवाही होणे आवश्यक आहे.

१) निविदा कालावधी हा ७ वर्षांचा असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२ (ब) नुसार असे दायित्व पत्करण्यापूर्वी मा.महापालिकासभेची मंजूरी घेण्याचे प्रावधान आहे.त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया राबविण्या करिता अधिनियमातील कलम ७२ (ब) नुसार मा.महापालिका सभेची अंदाजित र.रु.४६३.९४ कोटी अथवा होणा-या प्रत्यक्ष खर्चास प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

२) मा.महापालिका सभेमार्फत प्रशासकीय मान्यता घेण्यात आल्यानंतर आरएफपी मसुद्या मध्ये निविदा प्रक्रिये पूर्वी अथवा निविदा प्रक्रिये दरम्यान काही बदल करणे आवश्यक असल्यास उदा.मनुष्यबळ, वाहनसंख्या, अंदाजित /प्रत्यक्षखर्चइ .सदर बदल करण्याचे अधिकार आयुक्तांना राहतील.

३) निविदा प्रक्रियेअंती निश्चित होणा-या दरास व संविदेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक राहील.

सबब, शहरातील रस्ते, मंडई व इतर मोकळया जागा यांत्रिकी पध्दतीने साफसफाई चे कामकाजाकरिता तयार करण्यात आलेल्या निविदा/आर एफ पी नुसार ७ वर्षे कालावधीकरिता निविदा प्रक्रिया राबविणेकामी व त्यापोटी होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यतेकामी तसेच प्रस्तुत विषयातील कामासाठी अटी शर्ती बदलण्यास मान्यता देणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२(ब) नुसार मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.सुरेश भोईर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.संतोष कांबळे -** मा.महापौर साहेब सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. मुद्दा असा आहे की जो खोडसाळपणा प्रशासन करतं वारंवार मी परवाच सांगीतल की एका कंपनीमुळ हे काय चालल हे कळायला तयार नाही. याठिकाणी वारंवार निवीदा प्रक्रीया आपल्या मना सारख्या अटि शर्ती नाही झाल्यानंतर त्याला विलंब लागू नये, रद्द करायच्या, चालू करायच्या आणि परत आरोग्यावर आपणच चर्चा करायची आणि आरोग्याच्या अधिका-यावर ताषेरे आपणच ओढायचे ही जी चाललेली परंपरा आहेना ती कुठतरी खंडीत करा. माई तुम्ही हा विषय तहकूब ठेवा आणि ते तुम्हीच ठरवा पुढच्या वर्षी करायच का कधी करायच ते. पण हे कशासाठी कोणत्या कंपन्या डोळयासमोर ठेवून आपण हे करतो. आपण एका बाजुला काय म्हणतो शहरामध्ये प्रचंड कोरोना आहे, आरोग्याच्या संदर्भात चर्चा, पर्यावरणावर बोलतो. रस्ते खोदलेले आहेत, अनेक ठिकाणी केरकचरा साठलेला आहे हे भाषण करतो आणि आपल्या भावना व्यक्त करतो आणि परत असे विषय आल्यानंतर दप्तरी करतो, दप्तरी दाखल करण्यासाठी कोणती घटना घडली. मुद्दा असा आहे की कोण दप्तर घेवून फिरत ते तरी कळू दयात. मा.महापौर साहेब तुम्ही निर्णय घ्या. या

सगळया परिस्थितीच भान ठेवून शहराच्या सर्वांगीन कुणालाही कशाचाही पध्दतीच डोळया समोर ठेवून काम करण्यापेक्षा या शहराच्या कोणत्या अत्यावश्यक बाबी आहेत, आरोग्य, वैदयकीय, पाणीपुरवठा या सगळया मुलभूत महत्वपुर्ण ज्या सुविधा आहेत त्यामुळे हा विषय दप्तरी दाखल न करता तहकूब करा नाहीतर याच संपुर्ण खापर हे तुमच्यावर असेल, कोणतीही आरोग्याच्या संदर्भात तक्रार आलीतर, शहरामध्ये टिका झालीतर त्यास सर्वस्व आम्ही जबाबदार आहोत हे तुम्ही व्यक्त करा, नाहीतर विषय तहकूब करा.

**मा. निलेश बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. कुठलेही विषय महापालिकेनी आणले जसा हा विषय आला. कुणाच तरी त्याच्यामध्ये कुठतरी घेणंदेण राहत आणि आपण हा विषय फेटाळला जातो. आताच संदिपजी वाघेरे यांनी म्हणल की आजीत पवार साहेब जे अति.आयुक्त आहेत. १८० कोटीच मॅन्युअल जे साफसफाईच टेंडर आहे, आपल २१ दिवसाची प्रोसिडींग असते २१ दिवसात ते टेंडर ओपन झाल पाहीजे. २१ दिवसानंतर ते टेंडर ओपन केल नाही त्याच्यानंतर ते टेंडर तीन महीन्यानंतर कॅन्सल केलं. त्याच्यामध्ये त्यांना समजल की याच्यामध्ये कॉम्पेटेशन झाली, जे काही लोक भरले गेलेले होते आपली रिंग तुटलेली आहे. साहेब हे टेंडर करतानी सीईओपीला आपण एक ते दिड टक्क्यापर्यंत पैसे दिले असणार आहेत. १८० कोटीचे एक ते सव्वा टक्के काढा किती पैसे दिले तुम्ही. टेंडर कन्सलटंट नेमला होता त्याला .२५ टक्के दिले असणार. हे वारंवार का होतय. याच टेंडर तुटल कॅन्सलेशन, जीमच टेंडर तुटल कॅन्सलेशन मग टेंडर तुम्ही काढता कशाला, थेट काम दयाना. असं वारंवार झाल नाही पाहीजे हीच माझी विनंती आहे.

**सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. विषय दप्तरी दाखल केलातरी परत तीन महीन्यानी सभागृहाच्या पुढे येणारच आहे. अनेक दिवसापासून हा विषय लांबतो. आयुक्त साहेब ज्यावेळेस याची निवीदा प्रक्रीया झाली गुगल मॅपींगनी रस्त्याची लांबी, रुंदी बघीतली. आता जी काही रुंदी बघीतली होती त्यांनी गुगल मॅप मध्ये अतिक्रमण झाल्याची कुठेही नोंद येत नाही आणि एकीकडे कोरोना सारख्या काळामध्ये महामारीमध्ये आमचे चतुर्थश्रेणी कॉन्ट्रॅक्ट बेसीसवरती काम करणा-या साफसफाई कर्मचा-यांनी जी काम केलीत, जीव धोक्यात घालून काम केलीत, पोटासाठी काम केलं त्यातले अनेक माझे बंधु-भगिनी बे-रोजगार झाले आणि प्रशासनाने अगदी डोळे बंद करुन, बुध्दी गहाण ठेवून, त्याठिकाणी सल्लागाराने आणि प्रशासनाने काम केलं. हा सगळा विषय वाचल्यानंतर प्रचंड मोठ वादळ या

महापालिकेत निर्माण झाल. वादळ निर्माण करणारे आम्हीच आहेत, आम्ही अजीबात नाकारत नाहीत. पण त्याच कारण असं होतं की त्यांना सांगीतल की तुम्ही जागेवरती जा. यांत्रीकी साफसफाई म्हणतात तुम्ही मग हाताने जे साफसफाई करतात, जे झाडलोट करतात, गटर काढतात त्यांच काय. त्यांना त्याठिकाणी काम मिळणार नाही आणि म्हणून आम्ही सांगीतल होत की ही अरेंजमेंट करा. किती लोक बेरोजगार होणार आहेत, किती रस्त्यावरती अतिक्रमण आहेत. मगाशी माझ्या मोठया भगीनी मंगलाताईनी खुप चांगला उल्लेख केला की स्मार्ट सिटीमुळे तर अख्ख्या रस्त्यांच वाटोळ झालेल आहे, खर आहे ते. महीनाभरात जो रस्ता चांगला असतो तो पाहील की दुस-या तीस-या दिवशी खोदायला सुरवात होते. मग आपण फोन करायचा आहो, कालच केलना डांबरीकरण, आहो तीथे पेव्हींग ब्लॉक तुम्ही बसवलेना सगळ उखडलय, आधिका-यांना सुध्दा माहीती नसतं. आणि मग अशा ठिकाणी रस्त्यांचे त्यांच्याकडे मेजरमेंटस नव्हते केवळ अंदाजे त्यांनी ही निवीदा प्रसिध्द केली. निवीदेला विरोध कधीच नाही. यांत्रीकी साफसफाई करणालाही विरोध नाही. परंतु जे हाताने साफसफाई करतात ते सुध्दा बेरोजगार होवू नये म्हणून यामध्ये दुरुस्ती करण्याच काम प्रशासनाच्या वतीने तेव्हाच करायला पाहीजे होत ते अजून पर्यंत झालेल नाही आणि म्हणून प्रशासनाला वारंवार विनंत्या केल्या आणि विनंती केल्यानंतर सुध्दा त्यामध्ये दुरुस्ती झाली नाही. १८ मी. चे रस्ते असतील त्यावरचे रस्ते असतील दोन्ही बाजूला गाडया आहेत मग त्यामध्ये अधिका-यांनी आम्हांला सांगीतल की गाडयाच्या खाली वाकून रस्ता साफसफाई होते. आता घरात सोफा असलाना तर सोफ्याच्या खालून झाडूच मारत नाहीत आणि रस्ता अर्धा अर्धा कि.मी. एक एक कि.मी. असतो आणि तीथ तुम्ही सांगता की रस्ता गाडयाच्या खाली वाकून घे, हे शक्यच होणार नाही. मुळात ती लोक बेरोजगार होणार होते आणि ते बेरोजगार होवू नये म्हणून खरतर या विषयाला आम्ही विरोध केला होता, अजून पर्यंत त्याच्यावरती दुरुस्ती झालेली नाही. भाऊसाहेब हा विषय तीन महीन्यानंतर येणार आहे मला असं वाटत की यांत्रिकी साफसफाई झालीच पाहीजे परंतु त्याच बरोबर ते जे गोरगरीब आहेत त्यांच सुध्दा हातावरच पोट आहे त्यांच्या पोटाची काळजी करणं आपल काम आहे आणि ते काम आपण इमानेइतबारे केले पाहीजे. विषय येण्याच्या आत आम्ही विषय सांगीतला परंतु प्रशासनाची हिम्मत आहे, प्रशासनाने त्यामध्ये कुठलीही काळजी घेतलेली नाही. एक दोन नगरसेवक कुठल्यातरी एक्स वाय झेड ठेकेदाराकडे गेले मग ते त्याच्या सीसीटीव्ही मध्ये दिसले काय असे खुप विषय होते ते सगळे विषय आम्ही काननिराळी टाकले किंवा टाकतो आजही हा विषय करण्याला आमचा विरोध

असण्याचे कारण नाही परंतु दुरुस्ती झाली पाहीजे. खास करुन प्रशासनाने केली पाहीजे. आता अति.आयुक्त (१) यांच्याकडे इतका पदभार दिला आहे आयुक्त साहेबांनी त्यांनी मनात आणलतरी एका विषयाला दहा मिनीटे वेळ देवू शकतात खरच त्यांच्याकडे एवढा पदभार दिलेला आहे. पण कामकाज ठप्प झाल परंतु यामध्ये दुरुस्ती होणं गरजेच आहे आणि म्हणून महापौर साहेब, बाजूनी अति.आयुक्त (३) बसलेले आहेत त्यांच्याकडे काहीतरी जबाबदारी आपण दिली पाहीजे. हा विषय आपण तीन महीन्यानंतर आणणार आहोत. विषयाला हेतूपुरस्सर विरोध असण्याच काही कारण नाही फक्त त्यामध्ये काही दुरुस्त्या आहेत त्या दुरुस्तीसहीत मा.महापौर साहेब, आपण प्रशासनाला सांगीतल पाहीजे की दुरुस्ती काय आहे की जी आपल्याला अपेक्षीत आहे. कारण की आपण हा विषय दप्तरी दाखल करायचा म्हणतो, दुरुस्त्यासहीत आणलातर निश्चितपणे किंवा आतापर्यंत आणल्या असत्यातर, सभागृहात प्रशासनाने मांडल्या असत्यातर निर्णय घ्यायला सुध्दा आपल्याला सोप झाल असतं, धन्यवाद.

**मा.अजीत गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. मा.महापौर साहेब, हा विषय आपण दप्तरी दाखल केला, मुळात तीन महीन्यानंतर हा विषय येणार आहे, आता याठिकाणी आयुक्त साहेब नाहीत त्यांनी या गोष्टीचा इतीहास माहीती करुन घेतला असेल कदाचित. सिमाताईनी ब-याचशा गोष्टींचा उलगडा करायचा प्रयत्न केला त्यांनी माहीती दिली परंतु पडदया माग जे काही घडलय, पडदया माग अनेक घटना या टेंडरच्या माध्यमातून घडलेल्या आहेत. सुरवातीच्या काळात मागच्यावेळेस पुर्वी आपण जेव्हा काम करायचो तेव्हा स्थानीक ज्या काही संस्था आहेत यांना आपण त्यावेळेस काम दयायचो आणि त्या वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळया प्रभागात ती लोक काम करायची. मेकानाईज पध्दतीने काम करायच आपल धोरण नव्हत त्याच्यामुळ त्याठिकाणी अनेक लोकांना रोजगार मिळायचा, स्थानिक संस्थामध्ये जी काही काम करणारे कॉन्ट्रॅक्टर्स होते किंवा महीला मंडळ या वेगवेगळया लोकांना त्यामधुन दोन पैसे मिळायचे आणि शहरामधल्या अनेक लोकांना त्याचा फायदा झाला. नंतर त्याच एकत्रीकरण करायच ठरलं, वेगवेगळया प्रभागात वेगवेगळे कॉन्ट्रॅक्टर्स नेमायचे ठरले आणि त्यावेळी याला प्रचंड विरोध झाला. ज्या लोकांकड हे काम होत त्यांनी याला खुप विरोध केला आणि नामदेवराव इतिहास असा आहे की तो खर्च, माई आपण तेव्हा जो खर्च करायचो आणि जेव्हा आपल एकत्रीकरण केलं तो खर्च कितीतरी पटीने वाढला तरीपण त्यावेळेस नामदेवराव तुम्ही ऐकल नाही तुम्ही हाट्टाने ते काम करुन घेतलं आणि त्या लोकांवरती अन्याय झाला नंतरच्या काळात तुम्ही तशा पध्दतीचे कॉन्ट्रॅक्ट दिले. आज जेव्हा हे मेकॅनाइज पध्दतीने काम करण्याची निवीदा निघाली त्याच्यामध्ये निलेश बारणे यांनी काही गोष्टी सांगण्याचा प्रयत्न केला. मुळात टेंडर निघाली, कामाच पण नियोजन झाल परंतु काही लोकांना याच्यामध्ये संधी मिळाली नाही म्हणून नामदेवराव जाणीवपुर्वक ही सगळी

निवीदा प्रक्रीया रद्द करण्यात आली, हा त्यातला एक विषय आहे परंतु हे सगळ बघताना मुळ निवीदा प्रक्रीया त्यावेळेस राबवली त्या निवीदा प्रक्रीया परत करेपर्यंत जो काही महापालिकेचा खर्च झाला त्यांची जबाबदारी कोणाची. महापालिकेचे असे अनेक काम निघतात त्याच्यामुळे आपण भरपूर खर्च करतो याच्यामध्ये आपण डिटेल्स मध्ये वाचलतर हा विषय अर्धवटपणे सभागृहापुढे प्रशासनाने मांडला आहे. परंतु तो जो काही खर्च झालेला आहे त्याची जबाबदारी कुणाची आहे. मग त्याचे कन्सलटंट अपॉईंट झालेले असतील, सीईओपीला काही काम दिल त्यांना काही १ टक्के दिला असेल असे अनेक पैसे या सगळया प्रक्रीयेमध्ये गेले हे पैसे कुणाचे आहेत, हे नागरीकांचे पैसे आहेत. आपण सगळे जण इथ बोलतो की आपल्या इथे रहाणा-या कामगारांचा फायदा व्हावा मग त्यांच्या पैशाची अशाप्रकारे लुट होते आणि याला जबाबदार कोण आहे त्या जबाबदार व्यक्तीवरती शासन झाल पाहीजे. ज्यांनी कुणी ही नवीन प्रक्रीया राबवली त्यांना शासन झाल पाहीजे. त्यांच्याकडन अशी भरपाई घेतली पाहीजे. नामदेवराव आपण एकमेकावर आरोप करतो तुम्ही उत्पन्न वाढवायच म्हणून मागच्या काळात शास्तीकर अर्धवट माफ केला. आता मंगलाताईनी विषय मांडला, आम्ही राज्यसरकारकड जाणार हे बरोबर आहे परंतु या ज्या चुका तुम्ही केलेल्या आहेत हे तुमच पाप आहे. शास्तीकर त्यावेळेस का लावला होता की अनधिकृत बांधकाम होवू नये ही त्याच्या मागची भूमीका होती. अनधिकृत बांधकाम काढायची म्हणून शास्तीकर लावला. इलेक्शनला तुमचा जो काही जाहीरनामा होता त्याच्या मध्ये तुम्ही सांगीतल की आम्ही शास्तीकर पुर्ण माफ करणार. अनधिकृत बांधकाम शंभर टक्के नियमीत करणार. मला तुम्ही सांगा किती बांधकाम नियमीत झाली हो. नामदेवराव पुर्ण दहा ते बारा बांधकाम नियमीत झाली. तुम्ही म्हणालांना अभिनंदनाचा ठराव तर परवा आमच्या विरोधी पक्षनेत्यांनी अभिनंदनाचा ठराव मांडला त्यावेळेस एकनाथराव कसे बोलत होते. तुमच्या शासनाचे निर्णय चांगले झालेतर आम्ही कधी विरोध केला नाही. तुम्ही तुमच राजकारण करायच म्हणून राजकारण करु नका. अनेक गोष्टी बोलण्यासारख्या आहेत मी बोलू इच्छित नाही. मा.महापौर साहेब, या विषयाच्या अनुषंगाने जी काही मागची प्रक्रीया झालेली आहे त्यामध्ये जे काही आर्थीक नुकसान झाल आहे त्याची सुध्दा जबाबदारी फिक्स करा आणि त्या संबंधीत लोकांवरती तशा पध्दतीने ऍक्शन घेतली पाहीजे अशाप्रकारची अपेक्षा व्यक्त करतो.

**मा.आशा धायगुडे- शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. मगाशी सिमाताईनी अत्यंत चांगल्या पध्दतीने खुलासा केला त्यामुळे अजीबात मी या विषयावर बोलणार नाही. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब तुमच एका विषयाकडे मी लक्ष वेधू इच्छिते. मागच्या वर्षभरामध्ये जवळपास आपआपल्या प्रभागातल एकही टेंडर निघाल नव्हतं. कुठतरी कोरोना कमी झाल्यानंतर राज्यशासनाशी पत्रव्यवहार केल्यानंतर आपण टेंडर काढायला सुरवात केली परंतु आयुक्त साहेब तुम्ही माहीती घेतलीतर जे काही टेंडरस निघाले त्या टेंडर्स पैकी निम्मे टेंडर्स, काय सेटींग म्हणजे आमच सोडून दया हे अधिका-यांच काय

सेंटींग चालू असतं ते मला कळल नाही एकतर इतका बिलो गेलेला असतो आता एफडीआर प्रकरण गाजल आहे त्याच्यामध्ये आपण सोईचे पाच माणसावर कारवाई केली, बाकीच्यावर का नाही केली अजीबात मला त्या खोलात जायच नाही कारण की आज सगळयांना आम्हांला वॉर्डामध्ये काम पाहीजेत. या स्मार्ट सिटीने आमच आख्ख स्मार्टनेस घालवल आहे. तुम्ही माझ्या वॉर्डात येवून पहा की रस्ता इतका वाईट आहे म्हणजे का लोकांनी आम्हांला ठोकू नये असं वाटायला लागतं परंतु हातात कामच नाहत आमच्या. अशावेळेला तुम्ही माहीती घ्या टेंडर ओपन कधी झाल पहील पाकीट, दुसर पाकीट कधी ओपन झालं. त्या निवीदेची प्रक्रीया स्टॅण्डींगला कधी आली, सिल कधी झाल, त्या माणसानी पीएचडी, एमडी कधी ठरली इतक सगळया गोष्टींचा तुम्ही लेखाजोखा घेतला पाहीजे. आज चार चार महीने झाले टेंडर निघालेले आहेत तरी आजही वर्कऑर्डर हातात नाहीत. साहेब, वर्कऑर्डर हातात नाहीतर आमची चुक आहे का, प्रशासन म्हणून तुम्ही काय करता मग. हे प्रशासन तुमच आहे तुमच आहे शंभर टक्के तुमच आहे आमच काही म्हणण नाही. मग या प्रशासनाला धाक दयायच काम तुमच आहे का आमच आहे. आज माझ्या प्रभागातल एक टेंडर ३६.५ टक्के बिलो आहे. ४ कोटीच काम असेल त्याला दिड कोटीचा एफडीआर भरायला लागतो तो भरत नाही. लोकांना सांगीतल एक आठ दिवसात आपल्या वॉर्डात डांबरीकरण सुरु होईल, पुढच्या आठ दिवसात होईल. मा.महापौर आम्ही इथ करायच काय. साफसफाई वगैरे हे सगळे मोठमोठे विषय तरी आहेत परंतु आज आमची वॉर्डातली अवस्था, प्रभागातली अवस्था किती बिकट आहे. जर काही सत्तर काम निघालेतर, साठ काम निघालेतर दहा कामाच्या सुध्दा वर्क ऑर्डर हातामध्ये नाहीत मग याठिकाणी प्रशासन ठप्प कसं. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब आपल्याला त्वरीत विनंती आहे की येत्या दोन दिवसात सगळया टेंडर क्लार्ककडे, संबंधित एक्झिक्यूटीव्ह ईंजिनीअर्सकडे सगळी माहीती मागवा जे जे एल-१ आलेले नाहीत त्या एल-२ ला विचारा दोन दिवसाची प्रक्रीया करा नसेलतर पुन्हा रिटेंडरींग करा कारण आमच्या प्रभागात आम्हांला काम करण्या शिवाय पर्याय उरलेला नाही मागच्या काळात आम्ही लोकांना उत्तर दिली की कोरोना आहे, पालीकेला पैसे लागतील, कोरोनाचे लोक आहेत त्यांच्यावर उपचार करणं ही आपली नैतीक जबाबदारी आहे. तरी या बाबीवर आम्ही थोडेसे शांत राहीलोत परंतु आज तशी परिस्थिती राहीलेली नाही. जर एखादया नागरीकांचा ऍक्सिडेंट झालातर, एकतर आपण कोरोनाच्या लोकांना जपायच हे नक्की आहे पण त्याचा ऍक्सिडेंट झालातर त्याच उत्तरदायित्व निश्चितपणे तुमच्या आणि आमच्या वर येणार आहे पर्यायाने, तरी आपण त्वरीत या विषयाची सुध्दा माहीती घ्यायची आहे. उदया मी आपल्याला पत्र देते किमान आमच्या आमच्या प्रभागातली काम मार्गी लावावी आणि तुम्ही फाईलवर सहया करत जा, धन्यवाद.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. खर म्हणजे हा विषय यांत्रीकी पध्दतीने साफसफाई करण्याचा आहे. याठिकाणी ब-याच सदस्यांच्या माध्यमातून विनंती केलेली

आहे आणि मा.महापौर साहेबांनी विषय दप्तरी दाखल करण्याचे आदेश दिलेले आहेत. परंतु सर्व सन्मा.सदस्यांच्या माहीती नुसार भाऊसाहेब आपण म्हणल्याप्रमाणे या वर्षी किंवा पुढच्या वर्षी हा विषय येणार नाही, हा विषय दप्तरी दाखल केलेला आहे. मगाशी ताईनी सांगीतल्याप्रमाणे २०१८ पासूनची ही निवीदा प्रक्रीया याठिकाणी चालू आहे. प्रशासकीय माध्यमातून आठ वर्षाचे सात वर्षे करणं त्याची किमंत कमी अधिक होणं पुन्हा जीबीला हा विषय येणार अशा वेगवेगळया माध्यमातून हा विषय स्थायी समितीच्या माध्यमातून आलेला आहे. सन्मा.महापौर मला वाटत की आता खर यांत्रीकी पध्दतीने, आधुनीक पध्दतीने रस्त्याच्या संदर्भामध्ये नेमक आपण त्या यांत्रीकी मशीनच्याद्वारे साफसफाई केली पाहीजे या मताशी मी सुध्दा सहमत आहे. परंतु ज्यावेळेला ही टेंडर प्रक्रीया राबवल्या गेल्याच्यानंतर ताईनी सांगीतल की गुगलच्या माध्यमातून या रस्त्याची लांबी, रुंदी कशी घेतली गेली. १८ मी. च्या पुढच्या रस्त्याची साफसफाई करण्याच आणि त्याचा कालावधी आणि त्याची किमंत याठिकाणी निश्चित केलीली आहे आणि म्हणून हा विषय याठिकाणी आलेला आहे. परंतु मी याठिकाणी एक विनंती करणार आहे आपण बघीतल असेल की कोरोनाच्या काळामध्ये ब-याच माध्यमातून याठिकाणी नौकरी सर्वसामान्य कामागार वर्गाच्या गेलेल्या आहेत. साफसफाईच्या टेंडरच्या माध्यमातून या ठिकाणी अजीतभाऊनी पण सांगीतल की २०१७ च्या अगोदर स्वयंरोजगार संस्थाच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये रस्त्याची साफसफाई केली जात होती. त्या संदर्भा मध्ये आज आपण जर का बघीतलतर यांत्रीकी पध्दतीने साफसफाई करणं हा विषय बरोबर आहे परंतु आज प्रायोरीटी आज जर का बघीतल असेलतर लोकांना कोरोनाच्या काळामध्ये आमच्या कडे कार्यकर्ते येतात आमच्या हाताला काम दया म्हणून अशा पध्दतीने काम मागणाराचीं संख्या ही आताच्या काळामध्ये खुप मोठया प्रमाणात वाढलेली आहे. मा.महापौर साहेब, हा विषय दप्तरी दाखल केलेला असलातरी मी सभागृहाला सांगू इच्छितो की येणा-या काळामध्ये ख-या अर्थाने माणसाच्याद्वारे याठिकाणी साफसफाई झालीतर मला वाटते की ख-या अर्थाने कोवीडमध्ये आपण म्हणतो की लोकांच्या नौक-या गेल्यात लोकांना हाताला काम दिल पाहीजे तर अशा संदर्भामध्ये मानवतेच्या दृष्टिने येणा-या काळामध्ये यांत्रीकी पध्दतीने साफसफाई करण्याच्या ऐवजी मॅन्युअली साफसफाई केली मला वाटते २०१७ ला स्वयंरोजगार संस्था कोर्टात गेल्या कोटातून स्टे आणला नाही आणला त्या खोलात न जाता मानवतेच्या दृष्टिने शहरामध्ये असणा-या नागरीकांना, मध्यमवर्गीयांना त्याच्या हाताला काम मिळण्यासाठी मला वाटत हा विषय आपण याठिकाणी दप्तरी दाखल केलेला आहे आणि भविष्यामध्ये माणसाच्या तर्फे स्वयंरोजगार संस्था असतील किंवा अन्य संस्था असतील त्यांच्या माध्यमातनू किंवा इतर संस्थांच्या माध्यमातून यांत्रीकी पध्दतीने न करता मानवतेच्या दृष्टीने हाताला काम मिळाव म्हणून हा विषय दप्तरी आपण दाखल केलेला आहे. काहीनी सांगीतल की यांत्रीकी पध्दतीने ज्यावेळेला काढल त्यावेळेला अनेक मोर्चे या महापालिकेमध्ये आले, अनेक संस्था याठिकाणी आल्या त्यांनी सांगीतल की आमच काम तुम्ही काढून घेतात

अशा प्रकारचे अनेक मोर्चे, अंदोलन, निवेदन आपल्या सर्वांकडे आलेले आहेत. मला वाटते की या संदर्भामध्ये त्यांचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन त्यांच्या हाताला काम मिळण्याकरीता त्यांना रोजगार उपलब्ध होईल यादृष्टिने आपण हा विषय दप्तरी दाखल केलेला आहे. आयुक्त साहेब याठिकाणी टेंडर प्रक्रीया राबवली जाते आपण सुध्दा प्रशासनाला सांगा की एखादा विषय कन्सलटंटच्या माध्यमातून आणला जातो कन्सलटंटला फि दिली जाते त्यामध्ये त्रुटी असतात ती अधिका-याची जबाबदारी आहे की एखादा विषय कन्सलटंटच्या माध्यमातून आणला जातो त्यावेळेला किंवा टेंडर आणतो त्याच्या अटी शर्ती केल्या जातात त्याच पुर्णपणे पालन करणं त्यांनी केलेले विषय अचुकपणे याठिकाणी झाले पाहीजे जेणेकरुन महानगरपालिकेच्या करदात्यांच्या पैशामधून जी काही कन्सलटन्सी फि जाते आणि पर्यायाने अशा पध्दतीचे टेंडर आपल्याला कॅन्सल करावे लागतात ही सुध्दा आपण दखल घेणं गरजेचे आहे. यासंदर्भामध्ये टेंडर प्रक्रीया राबवत असताना जो काही कालावधी असेल ज्या काही अटी शर्ती असतील त्याचवेळेला तो एखादा विषय असेल तो पुर्ण करा आणि मग ती प्रक्रीया कायदेशीर रीत्या पुर्ण झाली, बीडर तीन पेक्षा जास्त आलेतर परत ते टेंडर कुठल्याही प्रकारे थांबवता कामा नये. हे टेंडर थांबवलतर दुस-या कुठल्यातरी सदस्यांना वाटत कुणाचतरी याच्यामध्ये हित आहे आणि कारण नसताना सन्मा.सदस्यांच्यामध्ये एक आपआपसात भांडण होत म्हणून मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब मी याठिकाणी सांगणार आहे की कुठलही टेंडर ज्यावेळेला आणतो ते टेंडर आणत असताना जर कन्सलटंट यांनी जी काही निवीदा प्रक्रीया पुर्ण राबवली असेल त्याच्या अटी शर्ती बनवल्या असतील मग कन्सलटंटला ज्यावेळेस काम देतो त्या कामाच्यामध्ये अशाप्रकारचा उल्लेख करन त्याला पैसेकाढून घेण्याची तरतूद सुध्दा येणा-या काळामध्ये कन्सलटंटकडून कराव असं याठिकाणी मी सांगतो. हा विषय गेल्या दिड दोन वर्षापासून याठिकाणी पटलावरती येतो मानवतेच्या दृष्टिने सर्वसामान्य लोकांना काम मिळाव हे टेंडर हा विषय आपण दप्तरी दाखल केलेला आहे.

**मा.महापौर -** विषय क्रमांक ८ दप्तरी दाखल केलेला आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक - ६०९ | विषय क्रमांक - ८ |
| दिनांक- १८/३/२०२१ | खाते- मा.आयुक्त |

**संदर्भ -** १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.आमुका/९/काविं/३१/२०२१, दि.२०/०१/२०२१
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८३५८, दि.०८/०२/२०२१

विषय क्रमांक ८ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल-७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - ९

दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/२/कावि/६९२/२०२० दि.१५/१२/२०२०

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.१५ दि.१५/१/२०२१ अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'चिफ केमिस्ट' अभिनामाचे १ पद र.रु १५६०० - ३९१०० ग्रेड वेतन ६६०० (सहाव्या वेतन आयोगानुसार) मध्ये शासन मंजूर असून सदरचे पद रिक्त आहे. प्रस्तुतच्या पदाकरीता शासन निर्णयाप्रमाणे निर्धारीत केलेली अर्हता पुढीलप्रमाणे :- महाराष्ट्र शासन राजपत्र, दि.१८ फेब्रुवारी २०२० अधिसूचना पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार पुढीलप्रमाणे, पदोन्नतीने १००% - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील केमिस्ट या पदावरील किमान ३वर्ष सेवा पुर्ण झालेल्या अधिका-याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. 'चिफ केमिस्ट'रिक्त पद पदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्तसो यांच्या अध्यक्षतेखाली पदोन्नती समिती सभा दिनांक ०२/११/२०२० रोजी आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व 'चिफ केमिस्ट' पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, आरक्षण, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्व, संगणक अर्हता आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादि सेवाविषयक तपशिल पडताळून, श्री.जगताप प्रशांत अरुण, केमिस्ट यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित विशेष अनुज्ञायाचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गातून 'चिफ केमिस्ट' पदावर र.रु १५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६०० (सहाव्या वेतन आयोगानुसार) या वेतनश्रेणीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार शासन मंजूरीच्या अधिन तसेच

मा.महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे. सबब, श्री.जगताप प्रशांत अरुण यांना र.रु १५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६०० (सहाव्या वेतन आयोगानुसार) मध्ये 'चिफ केमिस्ट' पदावर, पदोन्नती मधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गाच्या रिक्त जागेवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो. मा.विधी समिती ठराव क्र.०९ दिनांक १४/१२/२०२० अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थापनेवर सह आयुक्त (Joint Commissioner) अभिनामाचे एक पद मंजूर असून रिक्त आहे. शासनाने महापालिकेतील विविध पदांच्या भरती प्रक्रीये करीता सेवा(सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२० मंजूर केले आहेत. त्यानुसार सह आयुक्त पदाची पदोन्नतीकामीची अर्हता पुढील प्रमाणे आहे.

| संवर्ग | पदनाम | नेमणूकीची पध्दत | नेमणूकीकरीता अर्हता |
|---|---|---|---|
| प्रशासकीय सेवा श्रेणी-१ | सह आयुक्त | पदोन्नती १००% | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या कोणत्याही शाखेचा पदवीधर, सह आयुक्त पदाच्या कनिष्ठ पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक |

सह आयुक्त पदाकरिता शासनाने पदोन्नतीकामी निश्चित केलेल्या अर्हतेमध्ये स्पष्टता दिसून येत नाही. त्यामध्ये स्पष्टता आणणे आवश्यक आहे. सह आयुक्त पदावर पदोन्नतीने नेमणूकीकामी कनिष्ठ पदामध्ये (Feeder Cadre) उप आयुक्त आणि नगरसचिव या MMC Act Sec 45 अंतर्गत प्रशासकीय संवर्गातील समकक्ष पदांचा समावेश आहे. सबब, सह आयुक्त पदावर पदोन्नतीने नेमणूकीकामी सेवा नियम अधिक स्पष्ट होण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे अर्हता निश्चित करण्यास मान्यता देण्यात यावी.

पदोन्नतीकामी सुधारित अर्हता

| संवर्ग | पदनाम | नेमणूकीची पध्दती | नेमणुकीकरीता सुधारित अर्हता |
|---|---|---|---|
| प्रशासकीय सेवा श्रेणी-१ | सह आयुक्त (Joint Commissioner) | पदोन्नती १००% | १) मान्यता प्राप्त कोणत्याही विद्यापीठाचा पदवीधर<br>२) MMC Act Sec.45 अंतर्गत प्रशासकीय संवर्गातील उप आयुक्त अथवा नगरसचिव या गट-अ मधील पदावरील किमान ०३ वर्षांचा प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव आवश्यक<br>३) उपआयुक्त पदाचे समावेशनाचे तारखेपासून किमान ०३ वर्षाचा प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव आवश्यक |

'अतिरिक्त आयुक्त' या पदाकरिता शासनाने MMC Act Sec.45 अंतर्गत प्रशासकीय संवर्गातील उप आयुक्त अथवा नगरसचिव या पदांवर काम करणा-या सेवाज्येष्ठ अधिका-यांची नेमणूक करणेबाबतची अर्हता शासन निर्णयाद्वारे निश्चित केली आहे. सबब सह आयुक्त हे अतिरिक्त आयुक्त पदाचे कनिष्ठ पद असल्याने या पदाकरिताही उपरोक्त नमूद प्रमाणे अर्हता निश्चित करणे उचित होणार असल्याने MMC Act Sec.45 अंतर्गत महापालिका अस्थापनेवर प्रशासकीय संवर्गातील उप आयुक्त अथवा नगरसचिव या कनिष्ठ पदांवर (Feeder Cadre) काम करणा-या सेवा ज्येष्ठ अधिका-यांची पदोन्नतीने नेमणूक करणेकामी अर्हता निश्चित / स्वयंस्पष्ट करण्यास मान्यता देण्यात यावी. तसेच उपआयुक्त अथवा नगरसचिव या समकक्ष पदांवरील निवड समितीने विहीत पध्दतीने निवड केलेल्या सेवाज्येष्ठ अधिका-याची नेमणूक करण्यास मान्यता देण्यात यावी. तसेच मा.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली आयोजित दि.०२/११/२०२० रोजीच्या पदोन्नती सभेत महानगरपालिकेत वाहतूक नियोजन विभाग सुरु करणे व त्यामधील उपअभियंता पदनामाची २ पदे भरणेबाबत चर्चा झाली. त्यामध्ये संधीग्तता असल्यामुळे त्यास शासनाचे मार्गदर्शन घेणेचा निर्णय घेतला होता. त्यानुसार मनपाने शासनास पाठविलेल्या प्रस्तावास वाहतूक नियोजन व पर्यावरण विभागासाठी शासनाने सेवा नियम व कार्यकारी अभियंता (वाहतूक नियोजन) या पदास दि.१ फेब्रूवारी २०२१ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे मंजूरी दिलेली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील कायम आस्थापनेवर उपअभियंता (स्थापत्य) या पदावर बी.आर.टी.एस.विभागात कार्यरत असलेले श्री.बापू केरबा गायकवाड यांची २३ वर्ष

७ महिने इतकी सेवा झाली आहे. वाहतक नियोजन विभागास आवश्यक असलेल्या कार्यकारी अभियंता (वाहतूक नियोजन) पदासाठी नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणारे एकमेव श्री.बापू केरबा गायकवाड, उपअभियंता (स्थापत्य) यांना कार्यकारी अभियंता (वाहतूक नियोजन) या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर “उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी” या अभिनामाचे एक पद वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ५४०० मध्ये (सहाव्या वेतन आयोगानुसार) सदरचे पद रिक्त आहे. सदरचे पद महानगरपालिका आस्थापनेवरील सेवाजेष्ठ लेखाधिकारी पदामधून भरण्याची तरतूद असल्याने सदर पदावर लेखाधिकारी पदावरील सेवाजेष्ठ अधिकारी श्री.रमेशकुमार विठ्ठलराव जोशी हे “उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी” या पदावरील पदोन्नतीसाठी असलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव कालावधी धारण करीत असल्याने नियमानुसार त्यांना उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी या रिक्त पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास त्याचप्रमाणे श्री. जोशी हे मनपा सेवेतून दिनांक ३०/६/२०२१ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेनंतर त्यांचे रिक्त होणा-या पदावर पुढील सेवाजेष्ठ लेखाधिकारी श्री.प्रदिप बाबुराव बाराथे यांची “उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी” या पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महापालिका सभा ठराव क्रमांक ८६६ दिनांक २०/०५/२०१६ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण हे अधिकारी/कर्मचारी यांच्या श्रेणी/गट निहाय तयार करणेत आले होते. सदर आकृतीबंधास मान्यता देणेत आली. सदर मान्यतेमध्ये “विशेष अधिकारी” या प्रशासकीय सेवेतील गट अ मधील पदास ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी १५६००-३९१००, ग्रेड वेतन ६६०० या प्रमाणे मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच प्रशासकीय संवर्गातील विशेष अधिकारी या गट अ मधील पदाच्या सेवा प्रवेश नियमावलीस शासन निर्णय पीएमसी-२०२०/प्रक्र२०५/नवि-२२ दि. २७ ऑगस्ट २०२० नुसार मान्यता देणेत आली आहे.

मनपा आस्थापनेवर प्रशासकीय संवर्गातील गट अ मधील “विशेष अधिकारी” या अभिनामाचे पद शासन मंजुर असून या पदाचे सेवा प्रवेश नियमावलीनुसार या पदावर पदोन्नतीने नेमणुकीसाठी जनता संपर्क अधिकारी श्री. किरण देवेंद्र गायकवाड हे सेवाज्येष्ठता यादीमध्ये एकमेव अधिकारी असून पदोन्नती मिळणेस आवश्यक सर्व अर्हता ते धारण करीत असल्याने त्यांना प्रशासकीय संवर्गातील “विशेष अधिकारी” (वेतनश्रेणी –पे लेवल S-२०, ५६१००-१७७५००) या पदावर पदोन्नती/नेमणुक देणेस मान्यता देणेत यावी.

माहिती व जनसंपर्क विभागातील विशेष अधिकारी यांना विविध कामकाजासाठी महत्वाच्या कार्यालयांमध्ये जावे लागते तसेच मा. मंत्री महोदय, संसद सदस्य, विधीमंडळ सदस्य, उच्च पदस्थ अधिकारी, पदाधिकारी यांचेशी समन्वय ठेवावा लागणार आहे. विशेष अधिकारी हे पद उपआयुक्त या पदाचे समकक्ष असून दोन्ही पदांची वेतनश्रेणी समान असल्यामुळे फक्त “विशेष अधिकारी” पदनामात बदल आवश्यक आहे. तरी “विशेष अधिकारी” या पदनामाऐवजी “उपआयुक्त (माहिती व जनसंपर्क)” असा पदनामात बदल

करणेस तसेच विशेष अधिकारी हे पद उपआयुक्त या पदामध्ये समायोजन करणेस मान्यता देणेत यावी. महापालिका सभा ठराव क्रमांक ८६६ दिनांक २०/०५/२०१६ अन्वये “विशेष अधिकारी” पदाची वेतनश्रेणी (६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी १५६००-३९१००, ग्रेड वेतन ६६००) आणि “विशेष अधिकारी” या पदनामा ऐवजी “उपआयुक्त (माहिती व जनसंपर्क)” असा पदनामात बदल करणेस मान्यता देणे बाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेस मान्यता देणेत यावी.

तसचे सद्यस्थितीत महानगर पालिकेच्या मंजूर Recruitment Rules नुसार सह शहर अभियंता स्थापत्य पदाची ५ पदे मंजूर आहेत, त्यापैकी ३ खुल्या प्रवर्गासाठी असून २ पदे SC,ST प्रवर्गासाठी आहेत. सर्व पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत.

खुल्या प्रवर्गातून खालील प्रमाणे अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

१. श्री.मकरंद निकम
२. श्री.श्रीकांत सवणे
३. श्री.रामदास तांबे

SC,ST पदासाठी सुयोग्य उमेदवार नसल्यामुळे खालील अधिका-यांना तात्पुरता पदभार दिलेला आहे.

१. श्री.अशोक भालकर – महाराष्ट्र शासनाकडुन प्रतिनियुक्तीवर
२. श्री.प्रवीण लडकत- मनपा आस्थापना

मंजूर Recruitment Rules नुसार ही पदे पदोन्नतीने महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी याचे सेवा जेष्ठतेनुसार भरवायची आहेत. तसेच शासनाकडुन प्रतिनियुक्ती वरुन हे पद भरावयाची कोणतीही तरतुद नाही. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. बीसीसी-२०१६/प्र क्र.२२८ A/ 16/ 16-ब दि. २९ मे २०१७ मधील कलम h नुसार “ज्या विभागास राखीव पद ३ वर्ष रिक्त ठेवणे प्रशासकीय कामकाज सुरळीत चालण्याच्या दृष्टीने शक्य नसेल, अशा वेळी मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेले पद ३ वर्ष तात्पुरत्या स्वरुपात अनारक्षित करून ते पद तात्पुरत्या स्वरुपात सेवा जेष्ठ उमेदवारांमधून पदोन्नतीने भरण्यात यावे,

सदर पदोन्नती ही केवळ ११ महिन्याकरिता किंवा ज्या मागास प्रवर्गासाठी पद आरक्षित आहे त्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध होईपर्यंत या पैकी जे अगोदर घडेल तो पर्यंत किंवा जास्तीत जास्त ३ वर्ष कालावधी पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात असेल.” अशी कार्यपद्धती नमूद केली आहे.

सद्यस्थितीत SC,ST संवर्गात उमेदवार उपलब्ध नाही.

सबब वरील बाबींचा विचार करता तात्पुरता पदभार दिलेल्या पदावर पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा जेष्ठता यादी दि.०८/०३/२०१९ नुसार सेवा जेष्ठ्तेमध्ये प्रथम असलेले श्री.सतीश इंगळे यांची सह शहर अभियंता स्थापत्य पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महापालिका सभा ठराव क्रमांक ८६६, दिनांक २०/०५/२०१६ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण हे अधिकारी/कर्मचारी यांच्या श्रेणी/ गट निहाय तयार करणेत आले होते. सदर आकृतीबंधास मान्यता देणेत आली. सदर मान्यतेमध्ये "मुख्य सुरक्षा अधिकारी" या गट "अ" मधील पदास वेतन श्रेणी १५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६००, या प्रमाणे मंजुरी देणेत आलेली आहे.

सुरक्षा विभागातील मुख्य सुरक्षा अधिकारी यांना मनपाचे सुरक्षा विषयक कामकाजासाठी सतत पोलिस आयुक्तालयातील वरिष्ठ पोलिस अधिका-यांशी समन्वय ठेवणे आवश्यक असते तसेच सैन्य दलातील वरिष्ठ अधिका-यांशी देखील समन्वय ठेवणे आवश्यक असते. सदर वरिष्ठ अधिका-यांशी समन्वय साधतांना मुख्य सुरक्षा अधिकारी या पदनामाने कामकाजात प्रभाव रहात नाही. तसेच सदरचे पद हे "उप आयुक्त" या पदाचे समकक्ष असून दोघांची वेतनश्रेणी समान असल्यामुळे फक्त पदनामात बदल आवश्यक आहे. तरी "मुख्य सुरक्षा अधिकारी" या पदनामा ऐवजी "उप आयुक्त (सुरक्षा)" असा पदनामात बदल करणेस मान्यता देणेत यावी तसेच सदर बाबतचा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेकामी पाठविणेस मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका वाहन व्यवहार विभागाचे कामकाज सुधारण्याचे दृष्टीने मा.महापौर, मा.आयुक्त स्थायी समिती सभापती बरोबर दि.१६-०६-२००१ व १८-०६-२००१ रोजी पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी संघटना यांच्या समवेत सविस्तर चर्चा करुन सध्यस्थितीत वाहन व्यवहार विभागाकडील मार्गावरील बसेसची संख्या विचारात घेता सध्या असलेले कर्मचारी मानांकापेक्षा जास्त असल्याने सदरचे वाहन व्यवहार विभागाची आर्थिक परिस्थिती विचारात घेता पुर्व पी.सी.एम.टी. कडील वर्ग-४ मधील अकुशल कर्मचारी तात्पुरत्या स्वरुपावर पिं.चिं. महानगरपालिकेकडे कामकाजासाठी आवश्यक असल्याने सदरचे कर्मचारी सोबत प्रपत्रामध्ये नमुद केलेल्या म.न.पा. कडील विविध विभागामध्ये या आदेशाच्या तारखेपासून (सन २००१) पासुन पुढील आदेश हाईपर्यंत मनपाकडे वर्ग करण्यात आले आहे.

सदरचे कर्मचारी हे पिं.चिं. मनपाकडे दि.१८-०६-२००१ पासून ते आजतागायत गेली २२ वर्षापासून पिं.चिं. मनपाच्या विविध अत्यावश्यक विभागामध्ये कामकाज करीत आहे. या सर्व कर्मचा-यांचा मासिक पगारापोटी लागणारी रक्कम ही पिं.चिं.मनपा कडुन अदा करणेत येत आहे. जा.क्र.पीसीएमटी कडील आदेश क्र.प्रशासन

क्र.२/७/२३६/२००१ दि.१८-०६-२००१ अन्वये २२१ कर्मचारी मनपाकडे वर्ग करणेत आलेले आहे. परंतू त्यापैकी काही कर्मचारी सेवानिवृत्त झाले, काही कर्मचारी स्वर्गवासी झालेले आहेत. तरी सध्या पिं.चिं. मनपाकडे १२४ कर्मचारी सेवेत विविध अत्यावश्यक विभागात कामकाज करीत आहे. सबब वरील कर्मचारी (सेवक) आपल्या आस्थापनेवर कायम स्वरुपी वर्ग करुन घेणेबाबत उचीत कार्यवाही करावी असे सह व्यवस्थापकीय संचालक परिवहन मंडळ यांनी कळविले आहे.

मा.अध्यक्ष पिं.चिं. मनपा कर्मचारी महासंघ यांचेकडील जावक क्र.महासंघ/कावि/११/२०१० दि.१६/०१/२०१० अन्वये पुणे महानगर परिवहन महामंडळाचे मा.सहव्यवस्थापकीय संचालक यांनी पुर्वी कामीचे २२१ कर्मचारी जे पिं.चिं. मनपा कडील वर्ग केलेले आहे. त्यांना कायमस्वरुपी वर्ग करण्यासाठी प्रस्ताव पाठविला आहे. या कर्मचा-यांची पिं.चिं. मनपास आवश्यकता असल्याने त्यांना पिं.चिं.मनपाकडे तत्वत: मान्य करण्यात आले आहे.

तरी सध्या पिं.चिं. मनपा कडे पुर्व पी.सी.एम.टी. कडील १२४ कर्मचारी मनपाकडे विविध अत्यावश्यक विभागात कार्यरत असल्याने या कर्मचा-यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी वर्ग करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.अंबरनाथ कांबळे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. विषय कुठे आहे आणि विषयाला किती उपसूचना दयाव्यात. त्या विषयाला सुसंगत उपसूचना आहेत का ते पहील्यांदा बघुन घ्यावे. त्यांनी आता मध्ये असा विषय वाचलेला आहे, अशा दोन लाईन वाचल्या की पुढे पुढे पुढे पुढे पुर्ण उपसूचना वाचावी जेणे करुन आम्हांल समजेल. म्हणजे जे काही करणार आहेत ते तरी नीट कळल पाहीजे. का उगीच उपसूचना दयायच्या म्हणून दयायच्या आम्ही काही म्हणत नाहीत तुम्ही उपसूचना देवू नका परंतु समोरच्या माणसाला कळल पण पाहीजेना. त्याच्यात आता असा एक विषय केलेला आहे की आता कोरोनाच्या काळामध्ये ज्या लोकांनी काम केलेल आहे त्यांना कायमस्वरुपी करण्यात याव. सभागृह दिशाभूल करतय का हा सुध्दा प्रश्न आहे. आज महीनाभर झाल लोक बाहेर मांडव घालून बसलेले आहेत की ज्यांनी कोरोनाच्या काळामध्ये काम करत होते त्या लोकांना कामावर घेतल नाही म्हणून आज ते कितीतरी दिवस इथे मांडव टाकून बसले होते गेटच्या समोर. त्याच्यामधली सगळी माणस घेतली का. कामगार नेत्यांनी उपसूचना वाचली त्यामध्ये तुम्ही हा पण कामगाराचा विचार केला गेला पाहीजे. जे डॉक्टर होते त्यातले डेन्टलचे पोस्ट मागच्या टाईमींगममध्ये भरले परंतु आज तीथे किती डेन्टल डॉक्टर आहेत त्याचा खुलासा करावा. त्या लोकांना परत कामावर घेतल नाही. कोरोनाच्या काळामध्ये त्यांनी स्वत:च क्लिनीक बंद केल आणि महापालिकेची कोरोना सेंटर आहेत तीथ काम केली. आजची परिस्थिती अशी आहे की आम्हांला आता वीस लोकांची गरज आहे उरलेल्यांची

गरज नाही आणि आम्ही घेणार नाहीत. मी एका डॉक्टरला का फोन केला होता आहो मी म्हणल या व्यक्तीनी कोरोनाच्या काळामध्ये स्वत:च क्लिनीक बंद ठेवून तुमच्याकडे काम केलं. मा.महापौर साहेब जेवढी डेन्टलची लोक घेतलेली नाहीत आज कोरोनाची परिस्थिती परत पुर्वीपेक्षा भयानक आहे तरी ती सुध्दा डेन्टलची लोक त्याच्यामध्ये घेण्यात यावी आणि त्यांचा सुध्दा कायमस्वरुपी करण्याचा विषय करावा. परत ही लोक दाराच्या समोर बसणार आता ते डॉक्टर लोक आहेत ते कसे बसणार बरं शेवटी कोणाचीना कोणाचीतरी प्रत्येकाला असतेना. त्या डेन्टल मुलांनी स्वत:ची ओपीडी बंद केली आणि खुशाल आपल्याकडे कोरोनाच्या काळामध्ये काम केलं. आज परत कोरोनाचा काळ सुरु झालेला आहे त्यांची घडी कशी बसायला कितीतरी वेळ जाणार आहे. ज्यांना इच्छा आहे त्यांना करु देतना. या विषयामध्ये जे उरलेले डॉक्टर्स आहेत त्यांना घेणेत याव ही विनंती आहे त्या शिवाय हा विषय मंजूर करु नका.

**मा.महापौर –** या विषयाला यांची उपसूचना घ्या.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, ऑलरेडी आपण २६ ऑगष्ट २०२० रोजीच्या महासभेमध्ये हे सर्व विषय सभागृहाने मंजूर केलेले आहेत. त्या व्यतीरीक्त ताईंच जे म्हणणं आहे आता जे अंदोलनामध्ये बाहेर बसलेले होते त्यातल्या मॅक्झीमम मंडळीना जॉईंट केलेल आहे. जे राहीलेले असतील त्यांनाही ते जॉईन करणार आहेत.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, आता मी तुम्हांला डेन्टल शब्द सांगीतला जे डेन्टलचे डॉक्टर्स होते की ज्यांनी स्वत:च ओपीडी बंद केलेल आहे आणि कोरोनामध्ये ते काम करत होते. डेन्टलचे लोक डेन्टल डॉक्टर असे त्यामध्ये शब्द तुम्ही घ्याना नाहीतर माझी उपसूचना घ्या.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, जे राहीलेले असतील त्यांना सुध्दा यामध्ये समाविष्ठ करावे.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. खरता या विषयामध्ये जगातप प्रशांत म्हणून अधिकारी आहे केमीस्ट यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये दाखल आहे आणि त्यांच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गातून चिफ केमिस्ट पदावरती वेतनश्रेणीमध्ये तुम्ही याठिकाणी पदोन्नती दयायची म्हणता एकतर एससीएसटीच्या जागेवरती एखादयाला खुल्या प्रवर्गातून पदोन्नती देणं आणि तेही सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका पेन्डींग असताना, म्हणजे खरतर हा विषय समजून सांगीतला पाहीजे. कारा की हायकोर्टात एखादी याचिका पेन्डींग आहे आणि याचिका पेन्डींग असतानी आपण त्याच्यावरती निर्णय घेणं, कोण याचिकाकर्ता आहे, कशासाठी कोर्टात गेला आहे आणि त्याच्याठिकाणी आपण पदोन्नती कोणाला देतो. आता ज्या उपसूचना वाचल्या गेल्यात त्यामध्ये सुध्दा एससीएसटीच्या प्रवर्गामध्ये योग्य उमेदवार नसल्यामुळे आपण तीन अधिका-यांना पदोन्नती देतो. एससीएसटीमध्ये योग्य उमेदवार नाही म्हणज शैक्षणिक अर्हता धारण

करत नाही काय नेमका प्रॉब्लेम आहे की ज्यामुळे तीन अधिका-यांना आपण इथे पदोन्नती देतो. माझ या तीघाशी काही भांडण नाही. ना सवणेशी भांडण नाही, ना तांबेशी भांडण नाही ना निकमशी भांडण नाही त्याच बरोबर प्रतिनियुक्तीवर आलेले भालकर साहेब आहेत त्यांच्याशीही माझ काही भांडण नाही. त्यामध्ये जे नाव आहेत त्या कुणाशीच माझ वैर नाही पण एससी एसटीमध्ये योग्य उमेदवार नाही म्हणजे काय. माझ काही म्हणण नाही परंतु ही भाषा कितीपत योग्य आहे. महापालिकेच्या रिक्रूटमेंट रुल नुसार सहशहर अभियंता स्थापत्य पदाची पाच पदे मंजूर आहेत त्यापैकी तीन खुल्या प्रवर्गासाठी असून दोन पदे एससीएसटी प्रवर्गासाठी आहेत सर्व पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. खुल्या प्रवर्गातून खालीलप्रमाणे अधिका-यांची नेमणुक करण्यात आलेली आहे. १. श्री.मकरंद निकम, २. श्री.श्रीकांत सवणे, ३. श्री.रामदास तांबे. SC,ST पदासाठी सुयोग्य उमेदवार नसल्यामुळे खालील अधिका-यांना तात्पुरता पदभार दिलेला आहे. १. श्री.अशोक भालकर ,२. श्री.प्रवीण लडकत. मा.महापौर ज्या प्रवर्गातून मी निवडून येते, मी निवडणूक लढते मला लागणार हे. त्याची शैक्षणिक अर्हता नसेलतर मी समजू शकते, तो पाञता धारण करत नसेलतर मी समजू शकते म्हणून अशोक भालकरांना आणि प्रविण लडकताना देणं मग यांची काय अर्हता आहे तेही आम्हांला कळू देत आणि खरच नाही का हा प्रशासनाने खुलासा करावा. खरच अर्हता धारण करत नाहीत का, काय आहे हे आम्हांलातरी कळू तरदेत. यांना देण्यास आमच दुमत नाही परंतु ज्यांच्यावर अन्याय करता त्यांना कळूतर देत ते काय लायकीचे नाहीत ते आणि या विषयाच्या संदर्भात खुलासा व्हायला पाहीजे आणि तो प्रशासनाने खुलासा करावा. उदया असे नाही व्हाव की एससीएसटीचे जे लोक आहेत त्यांनी आमच्याकडे झेंडे घेवून उभे रहाव. या सभागृहामध्ये निवडून येतो ज्या संविधानाने कायदे प्राप्त झालेत त्या कायदयानुसार आम्ही इथे निवडून येतो आणि मी शपथ घेतलेली आहे त्या शपथेचा मान ठेवून मला असं वाटत की या गोष्टींचा खुलासा झाला पाहीजे. माझ्यावर अन्याय होत असेलतर तो अन्याय का केला गेला त्याचा सुध्दा कुठेतरी खुलासा होणं गरजेच आहे. तुम्ही कोणाला पद इथ देता याच्याशी मला काहीही घेणंदेणं नाही. परंतु एखादयावर अन्याय होत असेलतर त्याला त्याचा आवाज इथ रेस करण्याचा अधिकार आहे. विषयाला खुलासा करावा या दोघाना देता तीघाला ऑलरेडी आपण दिलेलं आहे. जे दोन लोकांना देतो त्यांना का देतो ते सांगा आणि कुणावरती अन्याय होणार आहे म्हणजे आम्हांला सांगता येईल की तुम्ही शैक्षणिक अर्हता धारण करत नाहीत, तुमच्या सेवाजेष्ठते मध्ये तुम्ही कुठ बसत नाहीत अस जे काही येणार ते विषयाला आणि उपसूचनेला. मला अधिका-यांना विरोध नाही मला खुलासा एवढाच हवा आहे. खुलासा झाल्यानंतर एकच मिनीट बोलणार कारण की ज्या प्रवर्गामधुन आम्ही निवडून येतो मीतर त्यांच्यासाठी नाहीतर सगळयांच्यासाठी बोलते, तरी या विषयाचा खुलासा करावा.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. खर म्हणजे या संदर्भातील जो काही चिफ

केमिस्टच्या पदोन्नतीचा जो विषय आहे आणि न्यायालयात प्रलंबीत २०१७ च्या होणा-या अंतिम निर्णयाच्या आधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तो सेवाजेष्ठतेनुसार आहे त्यामुळे ते दयायच आहे. परंतु त्याच्या बरोबरीन याठिकाणी काही उपसूचना दिली गेली पाच सहशहर अभियंत्याच्या संदर्भात जी काही उपसूचना दिलेली आहे, तर मला असं वाटत की ही प्रशासकीय बाब आहे आणि प्रशासनाच्या संदर्भामध्ये त्यांची सेवाजेष्ठता असेल किंवा त्यांची काय प्रणाली आहे, कुठल्या प्रवर्गात घेतल पाहीजे काय अर्हता आहे या संदर्भात सविस्तर खुलासा आयुक्तांकडून घ्यावा. आता नवीन आरआर आपल्याकडे आलेला आहे आणि नवीन आर आर प्रमाणे जी काही पद मंजूर असतील ती सुध्दा प्रशासनाने सांगाव की हे हे पद नवीन आरआरमध्ये आलेले आहेत हे आपल्याला पदोन्नतीने दयावे लागणार आहेत, एवढी एवढी पद आपली खाली आहेत. आता सांगीतल आहे की त्याला विरोध नाही परंतु त्या संदर्भामध्ये आपण त्याला मान्यता दिल्यानंतर जस मागे एक विषय झाला की ऐवले नावाच्या अधिका-याला आपण जनरलबॉडीने दिल आणि नंतर तो तीथच राहीला असं पण होता कामा नये म्हणजे ताईंच म्हणण बरोबर आहे. एखादया अधिका-याला जीबीने मान्यता दिली आणि तो विषय नंतर प्रलंबीत राहू नये आणि त्या संदर्भामध्ये सविस्तर खुलासा करावा. आम्हांला सुध्दा माहीती आहे की आपल्याकडे मॅनपॉवर कमी आहे आपल्याकडे अधिकारी वर्ग कमी आहे त्यामुळे त्यांना पदोन्नती दिली पाहीजे खालचे लोक आले पाहीजे ते सुध्दा काम करतात त्याबद्दल या सभागृहात कुणाचही दुमत नाही. परंतु जी काही शैक्षणिक अर्हता आणि सेवाजेष्ठता आणि आरआरप्रमाणे कोणकोणते अधिकारी येतात त्या संदर्भामध्ये सविस्तर खुलासा करावा नंतर हा विषय मंजूर करावा.

**मा.ढाकणे (अति.आयुक्त (१)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. या विषयामध्ये असा एक नियम आहे की जस आपल्याला एक्झिक्युटीव्ह ईंजिनीअरला जॉईंट सिटी ईंजिनीअर करायच आहे त्यांना पदोन्नती दयायची आहे तर एक्झिक्युटीव्ह ईंजिनीअरमध्ये काही विशिष्ठ वर्षे सेवा त्या अधिका-याची झाली पाहीजे. ज्यावेळेस खुल्या प्रवर्गासाठी जे तीन पद होते ते भरलेले आहेत परंतु दोन पद जे आहेत ते कॅटेगरीसाठीचे रिझर्व्ह होते त्याच्यामध्ये त्यावेळेला कोणताही एक्झिक्यूटीव्ह ईंजिनीअर उपलब्ध नसल्यामुळे की ज्यांनी ती अर्हता धारण केलेली आहे. त्याची विशिष्ठ वर्षे सेवा झाली पाहीजे ते डॉक्युमेंट मी नंतर आपल्याला अव्हेलेबल करुन देतो.

**मा.इंगळे (उप आयुक्त प्रशासन)-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. आता जो विषय आहे तो चिफ केमिस्टचा आहे आणि ते रिक्त पद आहे शासनमान्यतेच्या पदावर त्यांना पदोन्नती देत आहे. कोर्टामध्ये राज्यशासन गेलेल आहे सुप्रिम कोर्टात ती केस गेलेली आहे, टोटल राज्याचा जो विषय आहे त्याच्या संदर्भात. मुंबई हायकोर्टामध्ये एक केस झालेली होती त्यामध्ये पदोन्नतीला आरक्षण नको म्हणून असा निर्णय झालेला होता आणि तो राज्यशासनाच्या विरोधात होता म्हणून राज्यशासन सुप्रिम कोर्टात गेलेल आहे त्याचा

निर्णय पेन्डींग आहे. राज्यशासन हायकोर्टाच्या विरोधात सुप्रिम कोर्टात गेलेल आहे. पदोन्नतीमध्ये आरक्षण नको म्हणून हाय कोर्टाचा निर्णय झालेला होता म्हणजे राज्यशासनाच्या विरोधात तो निर्णय झालेला आहे म्हणून राज्यशासन सुप्रिम कोर्टामध्ये गेलेल आहे. सह शहर अभियंत्याची पाच पद आहेत त्याच्यामध्ये ऑलरेडी तीघांना दिलेल आहे. त्याच्यामध्ये दोन पोस्ट राखीव रहायला पाहीजे त्याच्यावर आमचा स्टडी चालू आहे पाच पोस्ट आहेत त्यापैकी एक पोस्ट व्हेकण्ट आहे.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. आता जी मी उपसूचना वाचली त्यामध्ये अर्हता धारण करत नाहीत म्हणून असं आहे. अर्हता म्हणजे काय.

**मा.इंगळे (उप आयुक्त प्रशासन)-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. अर्हता म्हणजे त्या पदावर जाण्यासाठी जी अर्हता आहे ती डिग्री पाहीजे, तीन वर्षाची सेवा झाली पाहीजे.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. डिग्री/डिप्लोमाचा वाद हा गेली अनेक वर्षे पेन्डींग आहे. डिप्लोमा झालेली लोक आता आपल्याकडे सह शहर अभियंता आहेत. मा.महापौर साहेब, याठिकाणी संजय भोसले नावाचे अधिकारी आहेत जे की ही अर्हता धारण करतात मग ते राखीव मधुन आहेत मग त्यांना नको का तीथ प्रमोशन मिळायला, मिळाल पाहीजेना. मा.महापौर साहेब माझी आपणास विनंती आहे की ज्या तीन लोकांना ऑलरेडी आपण सहशहर अभियंता केलं त्यांच्याबद्दल माझ्या मनात काही वाद असण्याच कारणच नाही परंतु एससीएसटीमध्ये जे अधिकारी अर्हता धारण करतात त्याठिकाणी त्यांचीच नेमणुक व्हावी.

मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते - संजय भोसले यांना SC,ST प्रवर्गातून सहशहर अभियंतापदी बढती देण्यास मान्यता देणेत यावी. या पदासाठी ते योग्य ती अर्हता धारण करीत आहेत त्यामुळे त्यांना सहशहर अभियंता पदी बढती देण्यास मान्यता देणेत यावी. तसेच श्री.खाबडे संजय यांची SC,ST प्रवर्गातून सहशहर अभियंता पदाची अर्हता धारण करीत असल्यामुळे सहशहर अभियंता विदयूत/यांत्रीकी या पदावरती नेमणूक करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.उषा मुंढे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. आताच सिमाताईनी जे सांगीतल ते संजय भोसले नावाचे अधिकारी आपल्याकडे आहेत ते रिझर्व्ह कॅटेगरीत असताना सुध्दा त्यांच्यावर जाणुनबुजून प्रशासनाने अन्याय केलेला आहे. वास्तविक पाहता जी कटऑफ डेट होती त्या कटऑफ डेटच्या आदिच तो पात्र होता परंतु तो पात्र असताना सुध्दा त्यावेळेला त्याला घेतल गेलेल नाही. काही काळा नंतर नवीन नियम आले आणि नवीन नियमामुळ तो अडचणीमध्ये आला. परंतु त्याचा अर्ज पुर्वीचाच होता आपल्या

महापालिकेमध्ये त्यांनी एवढी सेवा केलेली आहे आणि शेडयूल कास्टमधला तो अधिकारी आहे. तरी त्यांना त्यावेळेला डावलण्यात आलेल आहे त्याच्यावर अन्याय केलेला आहे त्यामुळे अशा वेगवेगळया उपसूचना देत असू आणि आपण पुन्हा कुणावर अन्याय करतो का हे पण आपण पाहीला पाहीजे. ज्यावेळेला जागा रिक्त होती त्यावेळेला आपली डीपीसी लागली नाही आणि त्यानंतर ही डीपीसी लागलीतर त्यावेळेला दुसरा जीआर आला परंतु या महापालिकेमधला आपला इतीहास आहे की डिग्रीचा आणि डिप्लोमाच हे भांडण पुर्वीपासून आहे. परंतु याच महापालिकेमधले डिप्लोमाहोल्डर सिटी ईंजिनीअर म्हणून गराडे साहेब होते, एम.टी. कांबळे होते, वाडेकर होते असे अनेक अधिकारी आहेत की ते या महापालिकेमध्ये डिप्लोमा होल्डर म्हणून जॉईन झाले आणि सिटी ईंजिनीअर म्हणून ते रिटायर झालेले आहेत. त्यामुळ मा.महापौर साहेब संजय भोसले विषयी सुध्दा आपण प्रशासनाला आपल्या तर्फे सूचना दयाव्यात की त्यांच्यावर झालेला अन्याय प्रशासनाने दुर केला पाहीजे एवढीच माझी मागणी आहे, धन्यवाद.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. ख-या अर्थाने प्रशासनाने विषय ठेवला याठिकाणी तो आला की आम्ही सगळेजण गप्प बसतो असं वाटते की सगळ रितसर चालू आहे. योगायोगाने म्हणा किंवा अभ्यासपुर्वक सिमाताईनी विषय वाचला आणि त्यांच लक्ष गेल काही तरी चुकतय का. मा.महापौर साहेब, हे सगळे नवा गढी नव राज्य प्रशासनाचे माणस आपल्याकडे तीन तीन वर्षे येतात आणि आपल्या सगळया अधिका-यांना नुसत दाबून ठेवतात. मा.महापौर साहेब, या नावामध्ये आपले खाबडे साहेब आहेत विदयुतचे ते सुध्दा सहशहर अभियंता पदावर इलीजीबल आहेत ते सुध्दा मागासवर्गीय समाजात एससीएसटी कॅन्डीडेट मध्येच मोडतात. त्यांची शैक्षणिक अर्हता आहे त्यांची तीथ पोस्ट आहे ते इलीजीबल असताना सुध्दा आपाण जाणीवपुर्वक साहेब इतका घोळ आहे हा काही आताचा नाही परंपरेनी वर्षानुवर्षे आहे. जो कुणीतरी येतो तीथ बसला की यांच काय, यांच काय, यांच काय पटापट विषय घ्यायचे आणि करायचे सभागृहाच्या लक्षात येत नाही आपण सगळेजणाला वाटत की योग्य पध्दतीने चालू आहे. अनेक लोक येतात या सगळया प्रक्रीया घेवून की ताई आमच लायब्रेरीयन आहे, एक ग्रंथपाल आहेत ते अनेक वर्षे झाले कोर्टात जा हे करा ते करा तरीही त्यांना प्रमोशन दिल जात नाही. आपण या चुकाच्या दुरुस्ती करणं लागतो. मा.महापौर साहेब, श्री.खाबडे संजय यांची SC,ST प्रवर्गातून सहशहर अभियंता पदाची अर्हता धारण करीत असल्यामुळे सहशहर अभियंता विदयूत/यांत्रीकी या पदावरती नेमणूक करणेस मान्यता देणेत यावी.

**मा. अनुराधा गोफणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. चिफ केमिस्टचा विषय मंजूर करण्यासाठी आज याठिकाणी विषय आलेला आहे. परंतु मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० सुध्दा त्याच पध्दतीचा आहे. वि.क्र.९ व १० हे दोन्ही विषय विधी समितीमार्फत महासभेपुढे

आलेले आहेत. आपल्या महापालिकेच्या नियमानुसार पदोन्नतीचे सर्व विषय सर्वप्रथम विधी समितीसमोर येतात आणि नंतर महापालिका सभेसमोर येतात. आज याठिकाणी विधी समितीला डावलून उपसूचनाचा पाऊस महासभेकडे केलेला आहे. आज हे सर्व विषय विधी समितीमार्फत महासभेकडे यायला हवे होते अगदी चुकीच्या पध्दतीने हा कारभार याठिकाणी चाललेला आहे. मा.महापौर साहेब, माझी आपल्याला विनंती आहे की या सर्व उपसूचना किंवा विषय विधी समिती समोर येवून नंतर महासभे समोर यावेत अशी मी विनंती करते. चुकीच्या पध्दतीने अस सभागृह चालू नये अशी याठिकाणी विनंती करते, धन्यवाद.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. याठिकाणी पदोन्नतीच्या संदर्भामध्ये ज्या काही उपसूचना किंवा विषय याठिकाणी आलेला आहे मला अस वाटते की हा विषय प्रशासकीय यंत्रणेमधुन आता ताईनी सांगीतल की कुणावरती अन्याय न होता त्याची शैक्षणिक पात्रता असेल, अर्हता असेल ती तपासून मगच हा विषय होतो. आपण जरी विषय मंजूर केलातरी प्रशासन पुर्णपणे तपासून मगच पदोन्नती देणार आहे त्यामुळे हा विषय आपण मंजूर करावा.

**मा.विकास डोळस -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. मला हे विचारायच आहे की ही जी उपसूचना आहे ती प्रशासनाने आणली का आपल्या सदस्यांनी दिली. उपसूचना आणताना ती योग्य आहे का अयोग्य आहे याचा विचार करुन आपण सभागृहामध्ये आणावी. आज आरक्षणामुळे आमच्या सारखे नगरसेवक इथ सभागृहात आहेत आणि संविधानाने आरक्षण दिलेल आहे. केवळ अशा गोष्टी सभागृहात होतात त्यावेळेस पक्षाची, पक्षनेत्यांची, आमची पण प्रतिमा मलीन होते आज जर हा विषय मंजूर झाला असता आणि सिमाताईनी निदर्शनास आणुन दिला नसतातर बाहेर हे अधिकारी जे एससीएसटी मधुन येतात ते आमच्या विरुध्द उभे राहीले असते. पक्षनेते तुम्हांला मी विनंती करतो की हा जो शब्दप्रयोग आहे ईलीजीबल नाही आज प्रशासनाने खुलासा केला, ताईनी सांगीतल की उमेदवार आहे मग त्या एससीएसटीच्या उमेदवारावरती अन्याय नाही का. असा अन्याय होणार असेल मग तो पक्षाचा असू किंवा बाहेरचा असू आम्ही सहन करणार नाही हे ठामपणे सांगतो. मग अगदी पक्षनेता असेलतरी चालेल पण असे विषय खपवून घेणार नाही. ही उपसूचना आणलीच कशी.

**मा.उषा मुंढे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका.चिडण्याच कारण आम्हांला पण समजत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आरक्षण दिल आहे, आम्ही एवढे पण वेडे नाहीत की आम्हांला काही कळत नाही. समाजाचा प्रश्न असेलतर आम्हांलाही कुणीतरी विचारणार आहे. मी एक प्रश्न दिला होता आयुक्त साहेबांनी त्याच्यावर डॉकेट तयार केल. एसटीएससीच्या जागी जी घरकुल योजना झाली त्यावेळेस सत्तर लोकावर अन्याय केला आणि त्या अन्यायाला वाचा फोडावी म्हणून मी ते आयुक्तांच्या निदर्शनास आणुन दिलं होत त्यावेळेस आयुक्त

साहेब म्हणले होते हो अन्याय झाला त्यावेळेस प्रशासनाने ही चुक मान्य केली. मग आता आम्ही चुक होवून दयायची का आम्हांला काही कळत नाही का. कुठलीही उपसूचना असेलतर आयुक्तांनी आम्हांला कधीच विचारलेल नाही. आता मी घरकुलाच सांगीतल त्याचप्रमाणे पंतप्रधान आवास योजनेमध्ये पण अशीच तफावत आहे आणि असंच चालू आहे जीथे २०० ते २५० घरकुल असतीलतर तीथे फक्त २० ते २२ च लोक आहेत तेही तपासून घेणं गरजेच आहे, धन्यवाद.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. याठिकाणी जी समस्या व्यक्ती केली ती आपल्या लक्षात आलेली आहे. ताईनी, डोळसनी जो मुद्दा उपस्थित केला तो बरोबर आहे.

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, उपसूचनां स्विकारल्या आहेत.

**मा.महापौर -** उपसूचनांसहीत हा विषय मंजूर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ६१० विषय क्रमांक - ९

दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/२/कावि/६९२/२०२० दि.१५/१२/२०२०

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.१५ दि.१५/१/२०२१ अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'चिफ केमिस्ट' अभिनामाचे १ पद र.रु १५६०० - ३९१०० ग्रेड वेतन ६६०० (सहाव्या वेतन आयोगानुसार) मध्ये शासन मंजूर असून सदरचे पद रिक्त आहे. प्रस्तुतच्या पदाकरीता शासन निर्णयाप्रमाणे निर्धारीत केलेली अर्हता पुढीलप्रमाणे :- महाराष्ट्र शासन राजपत्र, दि.१८ फेब्रुवारी २०२० अधिसूचना पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार पुढीलप्रमाणे, पदोन्नतीने १००% - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील केमिस्ट या पदावरील किमान ३वर्ष सेवा पुर्ण झालेल्या अधिका-याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. 'चिफ केमिस्ट'रिक्त पद पदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्तसो यांच्या अध्यक्षतेखाली पदोन्नती समिती सभा दिनांक ०२/११/२०२० रोजी आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व 'चिफ केमिस्ट' पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, आरक्षण, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्व, संगणक अर्हता आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादि सेवाविषयक तपशिल पडताळून, श्री.जगताप प्रशांत अरुण, केमिस्ट यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित विशेष अनुज्ञायाचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम

निर्णयाचे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गातून 'चिफ केमिस्ट' पदावर र.रु १५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६०० (सहाव्या वेतन आयोगानुसार) या वेतनश्रेणीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार शासन मंजूरीच्या अधिन तसेच मा.महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे. सबब, श्री.जगताप प्रशांत अरुण यांना र.रु १५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६०० (सहाव्या वेतन आयोगानुसार) मध्ये 'चिफ केमिस्ट' पदावर, पदोन्नती मधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गाच्या रिक्त जागेवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.विधी समिती ठराव क्र.०९ दिनांक १४/१२/२०२० अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थापनेवर सह आयुक्त (Joint Commissioner) अभिनामाचे एक पद मंजूर असून रिक्त आहे. शासनाने महापालिकेतील विविध पदांच्या भरती प्रक्रीये करीता सेवा(सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२० मंजूर केले आहेत. त्यानुसार सह आयुक्त पदाची पदोन्नतीकामीची अर्हता पुढील प्रमाणे आहे.

| संवर्ग | पदनाम | नेमणूकीची पध्दत | नेमणूकीकरीता अर्हता |
|---|---|---|---|
| प्रशासकीय सेवा श्रेणी-१ | सह आयुक्त | पदोन्नती १००% | १)मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या कोणत्याही शाखेचा पदवीधर, सह आयुक्त पदाच्या कनिष्ठ पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक |

सह आयुक्त पदाकरिता शासनाने पदोन्नतीकामी निश्चित केलेल्या अर्हतेमध्ये स्पष्टता दिसून येत नाही. त्यामध्ये स्पष्टता आणणे आवश्यक आहे. सह आयुक्त पदावर पदोन्नतीने नेमणूकीकामी कनिष्ठ पदामध्ये (Feeder Cadre) उप आयुक्त आणि नगरसचिव या MMC Act Sec 45 अंतर्गत प्रशासकीय संवर्गातील समकक्ष पदांचा समावेश आहे. सबब, सह आयुक्त पदावर पदोन्नतीने नेमणूकीकामी सेवा नियम अधिक स्पष्ट होण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे अर्हता निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

पदोन्नतीकामी सुधारित अर्हता

| संवर्ग | पदनाम | नेमणूकीची पध्दती | नेमणुकीकरीता सुधारित अर्हता |
|---|---|---|---|
| प्रशासकीय सेवा श्रेणी- १ | सह आयुक्त (Joint Commissioner) | पदोन्नती १००% | १) मान्यता प्राप्त कोणत्याही विद्यापीठाचा पदवीधर<br>२)MMC Act Sec.45 अंतर्गत प्रशासकीय संवर्गातील उप आयुक्त अथवा नगरसचिव या गट-अ मधील पदावरील किमान ०३ वर्षांचा प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव आवश्यक<br>३)उपआयुक्त पदाचे समावेशनाचे तारखेपासून किमान ०३ वर्षाचा प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव आवश्यक |

'अतिरिक्त आयुक्त' या पदाकरिता शासनाने MMC Act Sec.45 अंतर्गत प्रशासकीय संवर्गातील उप आयुक्त अथवा नगरसचिव या पदांवर काम करणा-या सेवाज्येष्ठ अधिका-यांची नेमणूक करणेबाबतची अर्हता शासन निर्णयाद्वारे निश्चित केली आहे. सबब सह आयुक्त हे अतिरिक्त आयुक्त पदाचे कनिष्ठ पद असल्याने या पदाकरिताही उपरोक्त नमूद प्रमाणे अर्हता निश्चित करणे उचित होणार असल्याने MMC Act Sec.45 अंतर्गत महापालिका अस्थापनेवर प्रशासकीय संवर्गातील उप आयुक्त अथवा नगरसचिव या कनिष्ठ पदांवर (Feeder Cadre) काम करणा-या सेवा ज्येष्ठ अधिका-यांची पदोन्नतीने नेमणूक करणेकामी अर्हता निश्चित / स्वयंस्पष्ट करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच उपआयुक्त अथवा नगरसचिव या समकक्ष पदांवरील निवड समितीने विहीत पध्दतीने निवड केलेल्या सेवाज्येष्ठ अधिका-याची नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच मा.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली आयोजित दि.०२/११/२०२० रोजीच्या पदोन्नती सभेत महानगरपालिकेत वाहतूक नियोजन विभाग सुरु करणे व त्यामधील उपअभियंता पदनामाची २ पदे भरणेबाबत चर्चा झाली. त्यामध्ये संधीग्तता असल्यामुळे त्यास शासनाचे मार्गदर्शन घेणेचा निर्णय घेतला होता. त्यानुसार मनपाने शासनास पाठविलेल्या प्रस्तावास वाहतूक नियोजन व पर्यावरण विभागासाठी शासनाने सेवा नियम व कार्यकारी अभियंता (वाहतूक नियोजन) या पदास दि.१ फेब्रूवारी २०२१ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे मंजूरी दिलेली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील कायम आस्थापनेवर उपअभियंता (स्थापत्य) या पदावर बी.आर.टी.एस.विभागात कार्यरत असलेले श्री.बापू केरबा गायकवाड यांची २३ वर्ष ७ महिने इतकी सेवा झाली आहे. वाहतक नियोजन विभागास आवश्यक असलेल्या कार्यकारी अभियंता (वाहतूक नियोजन) पदासाठी नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणारे एकमेव श्री.बापू केरबा गायकवाड, उपअभियंता (स्थापत्य) यांना कार्यकारी अभियंता (वाहतूक नियोजन) या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर "उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी" या अभिनामाचे एक पद वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ५४०० मध्ये (सहाव्या वेतन आयोगानुसार) सदरचे पद रिक्त आहे. सदरचे पद महानगरपालिका आस्थापनेवरील सेवाजेष्ठ लेखाधिकारी पदामधून भरण्याची तरतूद असल्याने सदर पदावर लेखाधिकारी पदावरील सेवाजेष्ठ अधिकारी श्री.रमेशकुमार विठ्ठलराव जोशी हे "उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी" या पदावरील पदोन्नतीसाठी असलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव कालावधी धारण करीत असल्याने नियमानुसार त्यांना उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी या रिक्त पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास त्याचप्रमाणे श्री. जोशी हे मनपा सेवेतून दिनांक ३०/६/२०२१ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेनंतर त्यांचे रिक्त होणा-या पदावर पुढील सेवाजेष्ठ लेखाधिकारी श्री.प्रदिप बाबुराव बाराथे यांची "उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी" या पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महापालिका सभा ठराव क्रमांक ८६६ दिनांक २०/०५/२०१६ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण हे अधिकारी/कर्मचारी यांच्या श्रेणी/गट निहाय तयार करणेत आले होते. सदर आकृतीबंधास मान्यता देणेत आली. सदर मान्यतेमध्ये "विशेष अधिकारी" या प्रशासकीय सेवेतील गट अ मधील पदास ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी १५६००-३९१००, ग्रेड वेतन ६६०० या प्रमाणे मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच प्रशासकीय संवर्गातील विशेष अधिकारी या गट अ मधील पदाच्या सेवा प्रवेश नियमावलीस शासन निर्णय पीएमसी-२०२०/प्रक्र२०५/नवि-२२ दि. २७ ऑगस्ट २०२० नुसार मान्यता देणेत आली आहे.

मनपा आस्थापनेवर प्रशासकीय संवर्गातील गट अ मधील "विशेष अधिकारी" या अभिनामाचे पद शासन मंजुर असून या पदाचे सेवा प्रवेश नियमावलीनुसार या पदावर पदोन्नतीने नेमणुकीसाठी जनता संपर्क अधिकारी श्री. किरण देवेंद्र गायकवाड हे सेवाज्येष्ठता यादीमध्ये एकमेव अधिकारी असून पदोन्नती मिळणेस आवश्यक सर्व अर्हता ते धारण करीत असल्याने त्यांना प्रशासकीय संवर्गातील "विशेष अधिकारी" (वेतनश्रेणी –पे लेवल S-२०, ५६१००-१७७५००) या पदावर पदोन्नती/नेमणुक देणेस मान्यता देणेत येत आहे.

माहिती व जनसंपर्क विभागातील विशेष अधिकारी यांना विविध कामकाजासाठी महत्वाच्या कार्यालयांमध्ये जावे लागते तसेच मा. मंत्री महोदय, संसद सदस्य, विधीमंडळ सदस्य, उच्च पदस्थ अधिकारी, पदाधिकारी यांचेशी समन्वय ठेवावा लागणार आहे. विशेष अधिकारी हे पद उपआयुक्त या पदाचे समकक्ष असून दोन्ही पदांची वेतनश्रेणी समान असल्यामुळे फक्त "विशेष अधिकारी" पदनामात बदल आवश्यक आहे. तरी "विशेष अधिकारी" या पदनामाऐवजी "उपआयुक्त (माहिती व जनसंपर्क)" असा पदनामात बदल करणेस तसेच विशेष अधिकारी हे पद उपआयुक्त या पदामध्ये समायोजन करणेस मान्यता देणेत येत आहे. महापालिका सभा ठराव क्रमांक ८६६ दिनांक २०/०५/२०१६ अन्वये "विशेष अधिकारी" पदाची वेतनश्रेणी (६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी १५६००-

३९१००, ग्रेड वेतन ६६००) आणि “विशेष अधिकारी” या पदनामा ऐवजी “उपआयुक्त (माहिती व जनसंपर्क)” असा पदनामात बदल करणेस मान्यता देणे बाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

तसचे सद्यस्थितीत महानगर पालिकेच्या मंजूर Recruitment Rules नुसार सह शहर अभियंता स्थापत्य पदाची ५ पदे मंजूर आहेत, त्यापैकी ३ खुल्या प्रवर्गासाठी असून २ पदे SC,ST प्रवर्गासाठी आहेत. सर्व पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत.

खुल्या प्रवर्गातून खालील प्रमाणे अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

१. श्री.मकरंद निकम
२. श्री.श्रीकांत सवणे
३. श्री.रामदास तांबे

SC,ST पदासाठी सुयोग्य उमेदवार नसल्यामुळे खालील अधिका-यांना तात्पुरता पदभार दिलेला आहे.

१. श्री.अशोक भालकर – महाराष्ट्र शासनाकडुन प्रतिनियुक्तीवर
२. श्री.प्रवीण लडकत- मनपा आस्थापना

मंजूर Recruitment Rules नुसार ही पदे पदोन्नतीने महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी याचे सेवा जेष्ठतेनुसार भरवायची आहेत. तसेच शासनाकडुन प्रतिनियुक्ती वरुन हे पद भरावयाची कोणतीही तरतुद नाही. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. बीसीसी-२०१६/प्र क्र.२२८ A/ 16/ 16-ब दि. २९ मे २०१७ मधील कलम h नुसार “ज्या विभागास राखीव पद ३ वर्ष रिक्त ठेवणे प्रशासकीय कामकाज सुरळीत चालण्याच्या दृष्टीने शक्य नसेल, अशा वेळी मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेले पद ३ वर्ष तात्पुरत्या स्वरुपात अनारक्षित करून ते पद तात्पुरत्या स्वरुपात सेवा जेष्ठ उमेदवारांमधून पदोन्नतीने भरण्यात यावे,

सदर पदोन्नती ही केवळ ११ महिन्याकरिता किंवा ज्या मागास प्रवर्गासाठी पद आरक्षित आहे त्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध होईपर्यंत या पैकी जे अगोदर घडेल तो पर्यंत किंवा जास्तीत जास्त ३ वर्ष कालावधी पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात असेल.” अशी कार्यपद्धती नमूद केली आहे.

सद्यस्थितीत SC,ST संवर्गात उमेदवार उपलब्ध नाही.

सबब वरील बाबींचा विचार करता तात्पुरता पदभार दिलेल्या पदावर पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा जेष्ठता यादी दि.०८/०३/२०१९ नुसार सेवा जेष्ठ्तेमध्ये प्रथम असलेले श्री.सतीश इंगळे यांची सह शहर अभियंता स्थापत्य पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महापालिका सभा ठराव क्रमांक ८६६, दिनांक २०/०५/२०१६ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण हे अधिकारी/कर्मचारी यांच्या श्रेणी/ गट निहाय तयार करणेत आले होते. सदर आकृतीबंधास मान्यता देणेत आली. सदर मान्यतेमध्ये "मुख्य सुरक्षा अधिकारी" या गट "अ" मधील पदास वेतन श्रेणी १५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६००, या प्रमाणे मंजुरी देणेत आलेली आहे.

सुरक्षा विभागातील मुख्य सुरक्षा अधिकारी यांना मनपाचे सुरक्षा विषयक कामकाजासाठी सतत पोलिस आयुक्तालयातील वरिष्ठ पोलिस अधिका-यांशी समन्वय ठेवणे आवश्यक असते तसेच सैन्य दलातील वरिष्ठ अधिका-यांशी देखील समन्वय ठेवणे आवश्यक असते. सदर वरिष्ठ अधिका-यांशी समन्वय साधतांना मुख्य सुरक्षा अधिकारी या पदनामाने कामकाजात प्रभाव रहात नाही. तसेच सदरचे पद हे "उप आयुक्त" या पदाचे समकक्ष असून दोघांची वेतनश्रेणी समान असल्यामुळे फक्त पदनामात बदल आवश्यक आहे. तरी "मुख्य सुरक्षा अधिकारी" या पदनामा ऐवजी "उप आयुक्त (सुरक्षा)" असा पदनामात बदल करणेस मान्यता देणेत येत आहे तसेच सदर बाबतचा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेकामी पाठविणेस मान्यता देणेत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका वाहन व्यवहार विभागाचे कामकाज सुधारण्याचे दृष्टीने मा.महापौर, मा.आयुक्त स्थायी समिती सभापती बरोबर दि.१६-०६-२००१ व १८-०६-२००१ रोजी पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी संघटना यांच्या समवेत सविस्तर चर्चा करुन सध्यस्थितीत वाहन व्यवहार विभागाकडील मार्गावरील बसेसची संख्या विचारात घेता सध्या असलेले कर्मचारी मानांकापेक्षा जास्त असल्याने सदरचे वाहन व्यवहार विभागाची आर्थिक परिस्थिती विचारात घेता पुर्व पी.सी.एम.टी. कडील वर्ग-४ मधील अकुशल कर्मचारी तात्पुरत्या स्वरुपावर पिं.चिं. महानगरपालिकेकडे कामकाजासाठी आवश्यक असल्याने सदरचे कर्मचारी सोबत प्रपत्रामध्ये नमुद केलेल्या म.न.पा. कडील विविध विभागामध्ये या आदेशाच्या तारखेपासून (सन २००१) पासुन पुढील आदेश हाईपर्यंत मनपाकडे वर्ग करण्यात आले आहे.

सदरचे कर्मचारी हे पिं.चिं. मनपाकडे दि.१८-०६-२००१ पासून ते आजतागायत गेली २२ वर्षापासून पिं.चिं. मनपाच्या विविध अत्यावश्यक विभागामध्ये कामकाज करीत आहे. या सर्व कर्मचा-यांचा मासिक पगारापोटी लागणारी रक्कम ही पिं.चिं.मनपा कडुन अदा करणेत येत आहे. जा.क्र.पीसीएमटी कडील आदेश क्र.प्रशासन क्र.२/७/२३६/२००१ दि.१८-०६-२००१ अन्वये २२१ कर्मचारी मनपाकडे वर्ग करणेत आलेले आहे. परंतू त्यापैकी काही कर्मचारी सेवानिवृत्त झाले, काही कर्मचारी स्वर्गवासी झालेले आहेत. तरी सध्या पिं.चिं. मनपाकडे १२४ कर्मचारी सेवेत विविध अत्यावश्यक विभागात कामकाज करीत आहे. सबब वरील कर्मचारी (सेवक) आपल्या आस्थापनेवर

कायम स्वरुपी वर्ग करुन घेणेबाबत उचीत कार्यवाही करावी असे सह व्यवस्थापकीय संचालक परिवहन मंडळ यांनी कळविले आहे.

मा.अध्यक्ष पिं.चिं. मनपा कर्मचारी महासंघ यांचेकडील जावक क्र.महासंघ/कावि/११/२०१० दि.१६/०१/२०१० अन्वये पुणे महानगर परिवहन महामंडळाचे मा.सहव्यवस्थापकीय संचालक यांनी पुर्वी कामीचे २२१ कर्मचारी जे पिं.चिं. मनपा कडील वर्ग केलेले आहे. त्यांना कायमस्वरुपी वर्ग करण्यासाठी प्रस्ताव पाठविला आहे. या कर्मचा-यांची पिं.चिं. मनपास आवश्यकता असल्याने त्यांना पिं.चिं.मनपाकडे तत्वत: मान्य करण्यात आले आहे.

तरी सध्या पिं.चिं. मनपा कडे पुर्व पी.सी.एम.टी. कडील १२४ कर्मचारी मनपाकडे विविध अत्यावश्यक विभागात कार्यरत असल्याने या कर्मचा-यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच संजय भोसले यांना SC,ST प्रवर्गातून सहशहर अभियंतापदी बढती देण्यास मान्यता देणेत येत आहे. या पदासाठी ते योग्य ती अर्हता धारण करीत आहेत त्यामुळे त्यांना सहशहर अभियंता पदी बढती देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच श्री.खाबडे संजय यांची SC,ST प्रवर्गातून सहशहर अभियंता पदाची अर्हता धारण करीत असल्यामुळे सहशहर अभियंता विदयूत/यांत्रीकी या पदावरती नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ६११ विषय क्रमांक - १०

दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.सुजाता पालांडे, मा.सीमा चौगुले यांचा प्रस्ताव.

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.२१, दि.०५/०२/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर कार्यरत असलेले श्री.विजयकुमार चंद्रभान काळे यांची महानगरपालिकेत एकूण ३३ वर्षे सेवा पुर्ण झालेली असून त्यांची शैक्षणिक पात्रता व कामाचा अनुभव विचारात घेता त्यांना सह शहर अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.पंकज भालेकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. मला या विषयाला अनुसरुन एक विषय सांगायचा आहे सभागृहाला की आपल्याकडे पर्यावरण उपअभियंत्याचा असाच एक विषय होता त्या संदर्भात शासनाचे क्लेअरकट नोटीफिकेशन होते की शंभर टक्के पदोन्नतीने असलेल्या पर्यावरण उपअभियंत्यांना शंभर टक्के पदोन्नतीचा विषय होता. तो विषय मागचे आयुक्त मा. हार्डीकर साहेबांच्या निदर्शनास आणुन दिला तरी प्रशासनाने त्यावेळेस जाणीवपुर्वक तो विषय बाजूला ठेवला. आपण त्यावेळेस शासनाकडे मागणी केली होती शासनाने क्लेअरकट नोटीफिकेशन दिले असल्यानी पर्यावरण उपअभियंत्याच्या जागेकरीता शंभर टक्के पदोन्नतीने शासनाचा नियम आहे तरी तो जाणीवपुर्वक पुढे ढकलला आणि परत शासनाला विचारणा करण्यात आली आणि त्यामध्ये वेळकाढूपणा घेण्यात आला. प्रशासनाचे इंगळे साहेब असतील त्यांना विनंती आहे की त्या संदर्भात पुढे काय झाल याची महीती पाहीजे. कारण की शासनाने याच्या नोटीफिकेशनमध्ये सांगीतल की शंभर टक्के पदोन्नतीने पर्यावरण उपअभियंत्याला भरायच आहे त्याची शैक्षणिक अर्हता पण आपल्या इथल्या स्थानिक ईंजिनीअरची होती परंतु तरी पण तो विषय का थांबवला याची याठिकाणी मला माहीती मिळावी. माझ्या विषयाचा प्रशासनास खुलासा करायला सांगावे.

**मा.ढाकणे (अति.आयुक्त (१) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. पर्यावरण विभाग महत्वाचा आहे त्या विषयी मी नमुद करु इच्छितो की त्या विषयी प्रशासनाने ऑलरेडी जाहीरात काढलेली आहे ती सर्क्यूलाईट केलेली आहे पदोन्नतीमधुन पद भरण्या विषयी. आपल्याकडे अर्ज आलेले आहेत त्याची छाननी सुरु आहे आणि लवकरात लवकर ती प्रक्रीया नियमाप्रमाणे पुर्ण करुन पदोन्नती देण्यात येईल.

**मा.पंकज भालेकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. चारवेळा तुम्ही त्या लोकांना शासनाकडे जायला लावल आहे वर्षभर झाल चक्रा मारायला लावल्यात. या ठिकाणी उपआयुक्ताची ऑर्डर निघते समजा बारा तारखेला त्यांची नेमणुक लगेच तेरा तारखेला होते. ठिक आहे ते पण आमचे अधिकारी आहेत चांगले आहेत मग खालच्या ईंजिनीअरला, उपअभियंत्यांना त्यांची शैक्षणिक अर्हता, शासनाचा जीआर असताना वर्षभर का पळायला लावल त्यांना. उपआयुक्तांची लगेच दुस-या दिवशी ऑर्डर निघते. हे पण आपलेच आहेत त्यांच पण आम्ही अभिनंदन केल होतं. मा.महापौर साहेब, असं याठिकाणी जाणीवपुर्वक केल जातं यात आपण लक्ष घालून प्रशासनाला आपण सूचना दयाव्यात.

**मा.संदिप वाघेरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. हे दोन्ही विषय एकच आहेत विधी समिती दि.५/२/२०२१ आणि विधी समिती दि.१५/१/२१ असा आहे. सह शहर अभियंत्यांची

आपल्याकडे पाच पद आहेत. निकम साहेब, सवणे साहेब, तांबे साहेब, लडकत साहेब आणि भालकर साहेब. आता हे सहाव पद काळेसाठी आहे मग पाच जागा आहेत आणि हे सहा जण आहेत. मी कुणाच्या विरोधात बोलत नाही. ओपन कॅटेगरीतून तीन पद होते आणि दोन शेडयूल कास्टमधुन होते. ओपन कॅटेगरीतून निकम, सवणे आणि तांबे ही तीन पद भरली त्यावेळेला आणि आता भालकर आणि लडकत घेतो किंवा काळे असतील. आयुक्त साहेब मला काय म्हणायच आहे की समजा ओपन कॅटेगरीची तीन पद होती, शेडयूलची दोन पदा होती जो माणूस तीथ तो बसत होताना त्यावेळी तीथ तो घ्यायचा होतां. मी काही कुणाच्या विरोधात बोलत नाही पण मी जी सत्य परिस्थिती आहे ती मांडतो. निकम साहेब ओपन कॅटेगरीमधून येतात, सवणे, तांबे एससीएसटी कॅटेगरीमधून येतात, भालकर कुठून हे मला माहीत नाही, लडकत ओबीसीमधुन येतात आणि काळे यांची कॅटेगरी माहीत नाही. संजय भोसले ते पण शेडयूल कॅटेगरीमधुन येतात. ज्या माणसाला जीथून घ्यायचा तीथूनच घेतला असतातर ही ओरड किंवा बाकीच्या गोष्टी झाल्या नसत्या. पहील प्रशासन चुक करतय म्हणज ओपन कॅटेगरीच्यावेळेला काय मांडण्यात आल की ओपन कॅटेगरीच्या माणसाची शैक्षणिक अर्हता नाही. मग त्याच्यानंतर यांना बोलून घेतल त्याच्यानंतर मग ओपन गॅटेगरीवाल्यांची अर्हता आली. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब ज्या त्या माणसाला ज्या त्याठिकाणी योग्य ते दया वादविवाद होणार नाहीत कारण की १९५० मध्ये संविधान लागू झाल, संविधानामध्ये प्रत्येकाला प्रत्येकाचे अधिकार दिले गेले आहेत. त्या अधिकाराची मोडतोड करुन आपल्याला मनाला वाटतील तसे नियम आणि अटी करत जाऊ नका. त्याच्यामुळे कोर्टकेसेस, वाद या सगळया गोष्टी वाढत जातात. हे सभागृहात ठिक १३३ नगरसेवक आणि अधिकारी असे आहेत पण बाहेर त्याच वेगळ पडसाद उमटतात की हा माझा अधिकारी या नगरसेवकांनी माझी बाज मांडली मग याचच काम करायच यांनी नाही माझी बाजू मांडली मग याला खेटा मारायला लावायच्या हे आयुक्त साहेब थांबवा, एवढ बोलून थांबतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - ११

दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.आयुक्त

**संदर्भ –** १) मा.मा.वैशाली घोडेकर, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव.
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.५ दि.९/१२/२०२०
३)मा.महापालिका सभा ठराव क्र.५९१, दि.२०/०१/२०२१

पंतप्रधान आवास योजनेसाठी घटक क्र.१व PCSSIHDP अंतर्गत गांधीनगर झोपडपट्टीचे पुनर्वसन/पुननिर्माण करणेकामी मे. M.M.Project Consultants Pvt.Ltd.यांची नेमणूक करणेस मा.स्थायी समिती ठराव क्र.७१२२दि.२७/०५/२०२० मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन दि.०७/०९/२०२०रोजी मे. M.M.Project Consultants Pvt.Ltd. यांना विषयांकित काम करणेस कामाचे आदेश देण्यात आलेले आहे. सल्लागार यांनी दि.१४/०९/२०२० रोजीचे पत्रान्वये गांधीनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचे Draft Concept Report व Conceptual Design सादर केलेले आहे. सदर Draft Concept Report व Conceptual Design नुसार गांधीनगर पुनर्वसन प्रकल्पाची संक्षिप्त माहिती खालील प्रमाणेआहे.

- विषयांकित पुनर्वसन प्रकल्प SRA कडील नियमावली नुसार राबविण्यात येणार आहे.
- मशाल यांचे कडील२००२ चे सर्व्हेनुसार अस्तित्वात असलेल्या झोपडयांची संख्या – १४५०
- गांधी नगर झोपडपट्टीचे क्षेत्र - ६२७१४.३० चौ.मी.
- पुनर्वसनासाठी विचारात घेतलेल्या (Google Map व Land Potential नुसार)= २०३२ सदनिका
- विक्रीसाठी बांधावयाच्या सदनिकांची संख्या- रहिवाशी ४७६ सदनिका + ३४४ वाणिज्य सदनिका
- पुनर्वसनासाठी बांधकाम दर र.रु. ३३६० प्रति चौ. फुट चटई क्षेत्रावर व र.रु.२१००प्रति चौ. फुट Super Built up area
- विक्री साठीचा बांधकाम दर- र.रु.३५६० प्रति चौ. फुट चटई क्षेत्रावर व र.रु.२१००प्रति चौ. फुट Super Built Up Area
- पुनर्वसना साठी वापरण्यात येणारा F.S.I.-३.०
- बिल्डींगची उंची – ४० मी. पुनर्वसनासाठी, ७० मी. विक्रीसाठी

- पुनर्वसनाच्या जागा मालकांचा मोबदला- ५०% पर्यंत (Ready Reckoner)
- पुनर्वसनाच्या सदनिकेचे क्षेत्रफळ – ३००चौ. फुट चटई क्षेत्र
- विक्रीसाठी क्षेत्रफळ४५०चौ. फुट ते ६०० चौ.फुट चटई क्षेत्र
- प्रकल्पासाठी एकूण बांधकाम खर्च- र.रु.३८३.६१कोटी
- सद्य:स्थितीत प्रकल्प किंमत र.रु.५०७.९० कोटी (Encroached Area समाविष्ठ करुन)
- लाभार्थ्यांना ट्रान्झिट कॅम्प व त्यासाठीच्या सुविधा मोफत पुरविणेत येणार
- ट्रान्झिटसाठी स्थलांतरित करणेत येणा-या लाभार्थ्यांसाठी विकसका मार्फत घर भाडयाची लाईट, पाणीसह / तात्पुरत्या निवा-याची / पत्राशेडची अथवा रोख रकमे बाबतची सुविधा देणेत येणार आहेत.
- सुविधा क्षेत्र (HIKES) विकसकाने विकसित करावयाचे आहे.
- सदर प्रकल्पाची मुदत कामाचे आदेश झाल्यापासून ५ वर्ष राहील व सल्लागाराने विहीत मुदतीत प्रकल्प पूर्ण करणे बंधनकारक राहील.

**गांधी नगर झोपडपट्टी पुनर्वसन/पुर्ननिर्माण प्रकल्पातील सदनिकांची माहिती**

| अ क्र. | | इमारती | | | सदनिका | | | | सुविधा (चौ.फुट) | एकूणक्षेत्रफळ (चौ.फुट) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रकार | मजले | संख्या | रहिवाशी | क्षेत्रफळ (चौ.फुट) | वाणिज्य | बालवाडी, वेलफेयर सेंटर इ. | | |
| १ | पुनर्वसनासाठी बांधकाम | ३ | ११ | ५ | १८२९ | ३०० | २०३ | ९० | ४३०५६ | १०९३७५४ |
| २ | विक्री साठीचा बांधकाम | २ | २० | ३ | ४७६ | ४५० चौ.फुट ते ६०० चौ.फुट | ३४४ | | | ५७३५९२ |
| ३ | टी.डी.आर | | | | | | | | | २६१५७५० |
| | | | | ८ | २३०५ | | ५४७ | ९० | ४३०५६ | |

तरी गांधीनगर येथील झोपडपट्टीचे पुनर्वसन / पुननिर्माण करणेकामी येणा-या प्रकल्प किंमत र.रु. ५०७.९०कोटी व सदर प्रकल्प पंतप्रधान आवास योजना घटक क्र.१ अंतर्गत राबविणे करिता जागेवर मनपाचे विविध आरक्षण असलेमुळे जागामालकास जागा ताब्यात घेणे कामी मोबदला द्यावा लागणार आहे. त्यासाठी अंदाजे र.रु.१०० कोटी खर्च अपेक्षित आहे. तरी प्रकल्पाच्या Concept & Feasibility Report ला

मान्यता तसेच त्यानुसार विस्तृत प्रकल्प आराखडा (DPR) तयार करुन येणा-या खर्चास मान्यता देणेत यावी.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.निलेश बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. आयुक्त साहेब, अति.आयुक्त साहेब तुमच्याकडे पदभार भरपूर आहे आपण जर ठरवलना ही महापालिका विकायची तरी विकू शकतो. कारण की हा जो विषय आणलाना, हा विषय कसा आणला माहीत आहे,पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने गांधी नगर झोपडपट्टी एसआरए अंतर्गत ही जी बी समोर मान्यतेस आहे, त्यासाठी आपण कन्सलटंट नेमला, नेमणूक झाली स्थायी समितीने मंजूरी पण दिली. ७ सप्टेंबरला आपण त्याचा आदेश पण दिला. मा.महापौर साहेब, हा विषय ५०७ कोटीचा आहे. ९० लाख रुपये याच्यावर खर्च होणार आहेत. पण यापैकी बांधकामापोटी ३८३ कोटी ६१ लाख रु. खर्च होणार आहेत. याच्यामध्ये मेन विषय जागेचा मोबदला आपण यांना किती देणार आहेत हा विषय आपण त्याच्यामध्ये लिहीला आहे का. जाणीव पुर्वक आपण त्याच्यामध्ये हे लिहील नाही. मा.आयुक्त साहेब याची जर वजाबाकी केलीना तर १२४ कोटी २९ लाख रु. या जागामालकाला देणार आहेत. का, एसआरएची काय नियमावली आहे. एमआयडीसीचा प्लॉट असो, खाजगी प्लॉट असो त्याला २५ टक्के आपण रक्कम दिली जाते, हा बालअट्टहास का. १२४ कोटी हे आपले करदात्यांचे आहेतना का नुकसान करता. एकीकडे तीथे बाजूला गांधीनगर झोपडपट्टी ही प्रायव्हेट लोक करतात हा महापालिकेचा व्यावसाय आहे का एसआरए डेव्हलप करायचा, नाही, एसआरए डेव्हलप करायचा महापालिकेचा व्यावसाय नाही. याच्यातन टिडीआर जनरेट होणार तुम्ही आता काय रेट चालला आहे, तुम्ह काय रेटला विकणार हा सगळा नंतरचा भाग आहे, पण हे नाही केल पाहीजे. एकीकडे आपण यशवंतनगर झोपडपट्टी त्यांना दिली, जागा आदि महापालिकेची होती त्यावेळेस आपण त्यांना २५ टक्केनी पैसे दिले. २५ टक्केनी मोबदला करुन त्यांना तुम्ही जागा बदल केली आता काय चालल त्यांना ५० टक्के पैसे दिल्या गेले. यामुळ कुठतरी नियमावली चुकल तरी या गोष्टीला माझा वैयक्तिक विरोध असून हा विरोध नोंदवून घ्यावा ही माझी विनंती आहे, धन्यवाद.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. मा.महापौर साहेब, ही स्तुत्य कल्पना कोणत्या महाभागाची आहे. पिंपरी चिंचवड शहरातील करदात्यांच्या कडून हा कष्टाचा पैसा आहे, आता इथ म्हणल गेलं की कोरोना काळामध्ये तुम्ही हे कर घेवू नका, मदत करा, शाळांना मदत करा, लोकांना मदत करा हे सर्वजण तुम्हांला विनंती करत होते की महापालिकेच्या करदात्यांना तुम्ही मदत करा. ही भारतीय जनता पार्टीची स्तुत्य कल्पना आहे. याठिकाणी म्हणल गेलेलं आहे की प्रशासनाच्या नियमाप्रमाणे, पहीली गोष्ट मला सांगा महापौर साहेब या शहरामध्ये एवढया झोपडपटया आहेत मग हीच

झोपडपट्टी का निवडली. मी छातीठोकपणे म्हणलो होतो की माझा जो साडू आहे तो वायसीएममध्ये काम करतो मी बोललो होतो, कबुल केलं. तुमचे जे पदाधिकारी आहेत त्यांचे किती ठेकेदार महापालिकेत नातेवाइक आहेत, आहेतना का त्यांची नाव सांगू मी. मा.महापौर साहेब हा महापालिकेवर मोठा घाला आहे आणि संगनमताने पुन्हा भ्रष्टाचाराकडे चाललेले आहे आणि हा भ्रष्टाचार भारतीय जनता पार्टीचा आहे असे मी स्पष्ट सांगतो त्याच कारण असं आहे की आपण म्हणलेल आहे एसआरए. मा.आयुक्त साहेब मी आपल्याला एसआरएच बील पण दाखवतो पुण्यातपण काम करतो. आज विठ्ठलनगर झोपडपट्टी प्रायव्हेट बिल्डर करतो, कासारवाडीच काम प्रायव्हेट बिल्डर करतो. एसआरएचा कॉन्सेप्ट हा राज्यशासनाने मंजूर केलेला आहे २०१२ मध्ये. पिंपरी चिंचवडमध्ये हा नियम नव्हता जो अनुज्ञेय एफएसआय नव्हता तो आपल्याकडे ईलीजीबल नव्हता त्यामुळ आपाल्याकडे एसआरए डेव्हलप होत नव्हत. मागच्यावेळेस सरकारने या नियमामध्ये बदली आणली आणि तो बदल केल्यानंतर आता ३ एफएसआय, त्याच्यामध्ये टिडीआर हा सगळा कॉन्सेप्ट आला. म्हणून मी म्हणलो की ही संकल्पना कुणाची आहे. बारणे यांनी बरोबर सांगीतल की थोडक्यात महापालिका आपण विकायला काढली. जसं आता आत्मनिर्भय सगळया विकायला काढल्या गव्हमेंटच्या कंपन्या आपण वर्तमानपत्रातन वाचतो. मा.महापौर साहेब, एसआरएचा रुल नं.५१ लॅण्ड ऍक्वीझेशनची रिस्पॉन्सीबीलीटी त्याच्यावर आहे. त्या जागेच जे मुल्य आहे त्याचा जो एसआरए आहे त्याच्या २५ टक्के त्याला मोबदला दयायचा आहे. एखादा प्रायव्हेट जर माणूस असेलतर त्यांनी ते कन्सन्ट दयायच ७० टक्के लोकांचा. आता ही जमिन कुणाची, करतय कोण, जबाबदारी कोणाची म्हणून म्हणतो ही दुकानदारी कोण करणार आणि कोणासाठी करणार. ही महापालिकेची जबाबदारी आहे का. या शहरामध्ये एवढया झोपडपट्टया आहेत. आज मुंबई महापालिकेनी केल नाही, बहृन मुंबई करत नाही, नवी मुंबई करत नाही, पुणे महापालिकेनी केल नाही. उदया यशवंतनगरची माझी जागा असती त्यामध्ये झोपडया झाल्या असत्यातर महापालिका झोपडट्टया काढणार, महापालिका मला पैसे देणार ही जबाबदारी महापालिकेची आहे का. मा.महापौर साहेब, ५० टक्के एसआरएचा मोबदला दयायचा ही आपली जबाबदारी नाही. टिडीआर जनरेट होणार, त्याला मार्केट कोण देणार, त्याच्यावर कंट्रोल कोणाच असणार आहे. या सर्व गोष्टीचे आपण बारकावे बघायला पाहीजेत. उदया लोक कोर्टामध्ये गेली, उदया तीथ प्रॉब्लेम आले महापालिकेची एवढी मोठी गुंतवणूक तर याला जबाबदार कोण आहे. महापालिकेला का असं सुचल की हा प्रोजेक्ट करायचा, कारण काय त्याच. एवढे ५०७ कोटी रुपये एवढी मोठी रिस्क कोणी घ्यायची. उदया काही तीथ ऍक्सीडेंट झाला, कोण पडलतर याला जबाबदार कोण. टिडीआर विक्री झाला नाहीतर पैसे कसे निघणार, उदया टिडीआरचा भाव गडगडला तर काय होणार, टिडीआरची आजची परिस्थिती काय आहे. एकेकाळचा टिडीआर जो दुपटीने जायचा आज तीथ चाळीस टक्के, पंचेचाळीस टक्के मायनस जातो मायनस मग अशा परिस्थितीमध्ये ही आपली जबाबदारी आहे का. एसआरएच्या नियमामध्ये २५ टक्के

प्रमाणे दयायच आहे. परंतु माझ मुळ म्हणण असं आहे की हा महापालिकेचा व्यावसाय नाही, झोपडपट्टी डेव्हलप करणं महापालिकेचा काम नाही आणि करायच्या आहेतर बाकीच्या झोपडपट्या कराना. मा.महापौर साहेब, आपल्याकडे आज नगरपालिकेची कोणतीपण इमारत विकली जात नाही, नगरपालिकेचे शॉप केले जातात ते विकले जात नाही त्याच कारण असं आहे की आपल्याकडे टाऊन प्लॅनिंगला जर विचारलतर तर आपण काय म्हणतो बाजारमुल्यापेक्षा कमी विकता येतं का, विकता येत नाही, तुम्हांला दोन नंबरचे पैसे घेता येतात का, घेता येत नाही. बिल्डर दोन नंबरचे पैसे पण घेतो, तो विक्री करु शकतो, तुम्ही कसं काय करणार. तुम्हांला ही परवानगी कोण देणार, राज्यशासनाची याला तुम्ही परवानगी घेतली का आणि पंतप्रधान आवास योजना नाव याला लावायच कारण काय. पंतप्रधान आवास योजना हे नाव याला लावायच कारण नाही कारण स्लम डेव्हलमेंट करण्याच काम महापालिकेच नाही. राज्यशासनाने एसआरए का काढला, एसआरएच्या मार्फत प्रायव्हेट बिल्डर्स का काम करतात. लोकांचे कन्सेन्ट घेतात. मला आठवतय माझ्या प्रभागामध्ये लांडेवाडीमध्ये काही तरी प्रॉब्लेम झाला काही लोकांनी चाकू लावून लोकांच्या संमत्या घेतल्या, सिमाताईनी ते थांबायला लावल. आता आम्ही याच्यातन काम करत असताना विशीष्ठ प्रकारचा एक नेता असतो तो कुठेतरी आमक्याकडे जातो, तो कुठेतरी खालच्याकडे जातो तो उपोषणाला बसतो त्यावेळेला आम्हांला त्याला समजावून सांगाव लागत, त्याला पैसे दयावे लागतात, त्याची समज काढावी लागते मग हे महापालिका करणार आहे, पदाधिकारी करणार आहेत, हे काम करणार कोण आणि हे काम आपण का करायच, आपल्याकडे काम नाहीत का. या शहराचा विकास आपल्या समोर आहे, रस्ते सफाई आहे, पाण्याचे नियोजन आहे, शहर स्वच्छ करायच आहे, शिक्षण दयायच, कल्चरल ऍक्टीव्हीटी आहे, ही ऍक्टीव्ही का देतोय आपण हे सुप्त डोक कोणाच आहे, याच्यामागे कोण आहे आणि हे का करायच आणि तेच का करायच त्याच कारण सांगायला पाहीजेना. ज्या कोणी अधिका-याची हा विषय आणलेला आहे ज्या कोणी ही कल्पना दिलेली आहे त्याच नाव आम्हांला सांगा. जे कोणी हे मांडलेल आहे त्याची कन्सलटन्सी कोण आहे त्या कन्सलटन्सीला पण सांगा हा आम्हांला सगळा प्रोजेक्ट समजावून सांग. त्यात महापालिकेची काय जबाबदारी आहे, ठेकेदार कोण असणार आहे, पैसे कोण लावणार आहे, टिडीआर कोण विकणार आहे, महापालिकेला काय मिळणार आहे या सर्व गोष्टींचा लेखाजोखा आम्हांला पाहीजे. हा व्यावसाय महापालिकेचा नाही, चुकीच काम करु नका अन्यत: तुम्हांला भोगाव लागेल एवढ तुम्हांला सांगतो. महापालिकेच काम एसआरएच नाही, महापालिकेच काम शॉप विक्रीच नाही, महापालिकेच काम टिडीआर विक्रीच नाही, महापालिकेच काम झोपडपट्टी डेव्हलपमेंट करणं नाही, धन्यवाद.

**मा.संदिप वाघेरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. गांधीनगर येथील झोपडपट्टी पुनर्वसनाचा विषय आहे जीबी समोर मांडणेत आला आहे. मा.महापौर साहेब, हा विषय ५०७ कोटी ९० लाख. या प्रकल्पाला ३८३ कोटी ६१ लाख रुपये खर्च होणार आहे. प्रायव्हेट

जागामालक आहे त्यांना एसआरएच्या नियमापेक्षा दुप्पट रक्कम ५० टक्के देणार ती साधारणपणे १२४ कोटी २९ लाख. आपण ही रक्कम देवून गांधी नगर झोपडपट्टीची जागा घेणार ते डेव्हलप करणार त्याच्यामधन २६ लाख १५ हजार तो टिडीआर त्याच्यानंतर पुनर्वसनाचा १० लाख ९३ हजार टिडीआर जाणार त्यानंतर ५ लाख ७३ हजार ५६४ फुट टीडीआर जनरेट होणार त्याच्यानंतर ३. एफएसआय अस बरच काही काही सांगीतल आहे. मा.महापौर साहेब, यशवंतनगर झोपडपट्टी आपण ती खाजगी विकसकाला डेव्हलप करायला महापालिकेची जागा दिली त्याच्याकडन आपण मोबदला घेणारे २५ टक्के कशाच्या जागेच्या स्वरुपात घेतला, टिडीआरच्या स्वरुपात घेतला आणि आजपर्यंत तो आपल्याला मिळाला. ही गांधीनगरची झोपडपट्टीची जागा महापालिका म्हणते आम्ही स्वत: विकसीत करणार आहे. आयुक्त साहेब हे १२४ कोटी ४९ लाख रु. कुठलाही जागामालक कुणी ही रक्कम घेणार ताब्यात आणि नंतर आपल्याला ती जागा ताब्यात देणार आणि ती जागा ताब्यात दिल्यानंतर आपण तीथ जो काही उदयोग करायचा तो करणार. त्याच्यात टिडीआर जनरेट होईल. आयुक्त साहेब मला एक सांगा महापालिका व्यावसाय करु शकते का. आता ही गांधीनगरची जागा आपण घेतोय, विठ्ठलनगर झोपडपट्टी ती तीथ प्रायव्हेट विकसक डेव्हलप करतो, यशवंतनगर झोपडपट्टी खाजगी विकसकाला महापालिकेनी जागा दिली म्हणजे आपल स्वत:च दुस-याला दयायच आणि दुस-याच कमी रेटनी महापालिकेनी घ्यायच म्हणजे आपला इथ काही बिझनेस आहे का. बरं या जागा कुणाच्या आहेत काय आहेत. याच्यामागे कोण आहे आज सव्वासे कोटी रुपये कररुपाने जनतेचे पैसे आलेले आहेत आज ते पैसे आपण इथ तीथ घालायला नको त्यापेक्षा चांगले काम कराना, विधायक काम करा. जस आता योगेशभाईनी सांगीतल, नदीसुधार आहे, एन्व्हायरमेंट आहे, रस्ते आहेत, पुल आहे, शाळा, गार्डन, बागबगीचे आहेत. पिंपरी चिंचवडमध्ये ७१ झोपडपट्टया आहेत बिगर पैसे देता तुम्हांला भेटणार आहेत किंवा काय. तुम्ही त्या सगळया डेव्हलप करा आणि टिडीआर घ्या. आता तुमच तस बघायला गेलतर एलबीटी बंद, जकात बंद, महापालिकेच उत्पन्न थांबलेल आहे. महापालिकेनी पण टिडीआर वगैरे विकायचा आहे तुम्ही मला उत्तर दयायच महापालिका व्यावसाय करु शकते का आणि कुठल्या नियमान्वये. आयुक्त साहेब हे खुप मोठ गौडबंगाल आहे. पहील्या आयुक्तांनी पण खाजगी विकसकाला महापालिकेची स्वत:ची जागा दिली तीथ आता एक टीडीआर देतो म्हणले आपल्याला. म्हणजे मी पण महापालिकेच्या जागा आयटूआर मध्ये डेव्हलप करतो, पहील महापालिकेच बांधकाम पुर्ण करुन दयाव लागत तेव्हाच पुढच्या बांधकामाला परमिशन मिळते. आज महापालिकेनी काय केल महापालिकेची जागा दिली महापालिकेला एक रुपयाचा फायदा झालेला नाही, टिडीआर आलेला नाही. जागा जो विकसीत करतो त्याने तो टिडीआर रेडीरेकनरच्या आडीचपटाने विकला सुध्दा म्हणजे ही महापालिका ठरावीक लोकांच्या व्यावसायासाठी एजंटगीरीच काम करते का, तसे असेलतर तसही सांगा. आयुक्त साहेब याच्यावर खुलासा करावा मी परत बोलतो.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. या विषयावर योगेशजीन सांगीतल, निलेशनी सांगीतल, संदिपने सांगीतल, पोटतीडकीने ते बोलतात. खरच हा महापालिकेचा व्यावसाय आहे का. या प्रोजेक्टवरती कन्सलटंट आहेत. एमएम कन्सलटंट प्रा.लि. आम्ही महापालिकेत आल्यापासून दोनदा त्यांनी प्रेझेन्टेशन दिलं. पहील्यांदा त्यांनी दापोडीच प्रेझेन्टेशन दिलं होतं त्याच काय झाल. दोन महीन्यापुर्वी त्यांनी अचानक मिटींग कॉल केली होती आपण पण होता आणि गांधनीरगच प्रेझेन्टेशन त्यांनी दिलं. त्याठिकाणी मी पण त्यांना प्रश्न विचारला होता मी त्याठिकाणी त्या विषयाला विरोध पण केला होता. मी त्यांना प्रश्न विचारला होता की तुम्ही अग्रह का करताय महापालिकेनी डेव्हलप करायची, त्यांनी काय उत्तर दिलं होतं की काय होईल जर एसआरएला दिली तर तुम्हांला तीकडे जावे लागे, तुम्हांला मंत्रालयात जावे लागेल म्हणजे त्यांना एवढी काळजी होती जर हे तुम्ही केलतर तुमच्यावर लिमीटेशन येतात. शेवटी ही महापालिका आहे महापालिकेचा व्यावसाय करणं हा उद्देश नाही म्हणजे आता योगेशजीन सांगीतल या शहरातल्या नागरीकांसाठी राहण्यायोग्य शहर बनविन हे महापालिकेच प्रथम कर्तव्य आहे. काय केल तुम्ही रावेतला, तुम्ही रावेतच्या नागरीकांच्या भावनेशी खेळ खेळलात ती लोक काय करत असतील ती लोक अजून स्वप्न बघत असतील आमच घर कधी होणार. त्याठिकाणी मोकळा प्लॉट पाहत असतील आमच घर कधी होणार म्हणत असतील. ही हातावर काम करुन पोट भरणारी लोक आहेत आणि त्याच्या भावनेशी खेळ खेळण्याचा हा तुमचा आता आम्ही महापालिकेत आल्यापासून मला वाटते हा तीसरा उदयोग असेल. तुम्ही दापोडीच प्रेझेन्टेशन दिल, मोठमोठी स्वप्न दाखवली सक्सेस नाही झालं. आज याठिकाणी सगळयांनी सांगीतल यशवंतनगर झोपडपट्टीची जागा महापालिकेची होती त्याच काय झाल आणि एसआरए डेव्हलप करत असताना मगाशी जो क्लॉज सांगीतला तो सिंपल क्लॉज आहे की जी त्या प्लॉटची व्हॅल्यू आहे त्या व्हॅल्यूच्या २५ टक्के मोबदला हा मालकला दिला पाहीजे. जर एसआरएच्या नियमालीत आपण डेव्हप करायला गेलोतर आपल्याला त्याठिकाणी ठरावीक कन्सलटंट, पुढच्या कन्सलट साठी तुम्हांला राज्यशासनाची मदत घेता येते. परंतु याठिकाणी तुम्ही काय करणार, म्हणजे कुठलीही गॅरंटी नाही काही नाही. आज आपण त्याठिकाणच्या लॅण्डच रेकॉर्ड जर पाहीलतर टोटल लॅण्डच्या ६ हेक्टर २३ आर आहे त्यातली पीसीएमसीच्या ताब्यात मला वाटत २ हेक्टर १९ आर आहे आणि ४.४ हेक्टर आजही पेन्डींग आहे म्हणजे टिडीआरच्या ताब्यात एकूण क्षेत्र जर पाहीलतर २१२०७ स्क्वे.मी. आहे म्हणज जवळ जवळ २.१९ इतक आहे. याठिकाणी आपला उद्देश नक्की काय आहे. भारतीय जनता पार्टीच्या एका आमदारला १२५ कोटी रु. देण्यासाठी तुम्ही हा विषय याठिकाणी आणला. कोण आहे याचा जागामालक, ज्यावेळेस तुम्ही दुनियाच करताल त्यावेळेस याठिकाणी जागामालकाचा पण खुलासा झाला पाहीजे, कशासाठी तुम्ही अट्टहास करताय. का तुम्ही दापोडी अर्धवट सोडल, का तुम्ही यशवंतनगर अर्धवट सोडल काय अवस्था आहे यशवंतनगर झोपडपट्टीची. तुम्ही एसआरए केलाना त्याठिकाणी.

एसआरएमार्फत करा, परमीशन मिळणार आहे, सगळे नियम पाळले जाणार आहेत. अस असताना तुम्ही काय करता काहीतरी करायच, काहीतरी रेटायच, त्या कन्सलटंटला मी हा पण प्रश्न विचारला होता. त्यांची ती बोलण्याची पध्दत आहे मी जगात काम केल, मी याच्या बरोबर काम केलं, मी सीएम बरोबर काम केलं तुम्ही तुमच करा कशाला तुम्ही एसआरएच्या अंडर जाता, तुम्ही ज्यावेळस करताल त्यावेळेस तुम्ही तुमचे निर्णय घेताल, कशला तुम्ही एसआरएकड जायच, तुम्ही असं करा, तुम्ही तसं करा त्यावेळेस माई तुम्ही पण उपस्थित होता. त्यावेळेस माझी आणि त्यांची ब-याचवेळेस शाब्दीक चकमक पण झाली. असं असताना परत तुम्ही त्यातन पुढ जावून हा विषय जीबी पर्यंत पोहचविता. त्या सर्वसामान्य झोपडपट्टीतल्या नागरीकांना घर मिळण्यास आमचा कुठलाही विरोध नाही, आमचा प्राजेक्टला अजीबात विरोध नाही पण तुम्ही प्रोजेक्ट अशावेळेस आणता, आमच्याकड पण झोपडपटया आहेत माणूस काय करतो माझ झोपड आहेना माझ्या जागेत तीन मजल्याच इमल आहे तर मी कशाला तुमच तीनशे ते चारशे स्क्वे. फुट घेईन. मग तो काय करतो, त्याठिकाणी विरोध करायला सुरवात करतो. म्हणजे आज आपण एवढे प्रोजेक्ट पाहीलेले असतील ते अर्धवट अवस्थेमध्ये पडलेले आहेत. का नंतर कुणीतरी कोर्टात जातं. याठिकाणी शेतक-यांची जर लीस्ट आपण पाहीलतर आग्रवाल, शिंदे, असे विवीध लोक आहेत. याच्या पॉवर ऑफ ऍटर्नी कुणाकड आहे, याचे अधिकार कुणाकड आहेत. तुम्ही म्हणता तुमची जागा आहे मान्य आहेना आम्हांला तुम्ही तुमच्या जागेत काहीही कराना. आज तुमच्या जागेवर सुध्दा अतिक्रमण तीथ जागेवर गेल्यानंतर दिसतय, तुमच्या जागेत सुध्दा अतिक्रमण झालय जे २ हेक्टर ८ आर आहे. ते अतिक्रमण बाजूला काढायचा विषय दुरच राहीला परंतु हे होत असताना याच्यात एवढा टिडीआर मिळेल, त्याच्यात एवढ हे मिळेल. मी आयुक्त साहेबांना पण हेच सांगेल की हा प्रोजेक्ट झालातर आम्हांला पण अस वाटेल की तुम्ही पण हार्डीकर साहेबांसारखेच आहेत. म्हणजे हार्डीकर साहेब स्वत: कधी भ्रष्टाचारात सहभागी नाही झाले पण काही काम होत असताना गप्प बसले त्याचे वित्तीय अधिकार दुस-याला दिले. कामगारांचा विषय आमच्या सन्मा. सदस्यांनी घेतला की कामगाराना हे केल पाहीजे, कामगारांना ते केल पाहीजे अस असताना महापालिका स्मार्ट सिटी, प्रधानमंत्री आवास योजना याठिकाणी कंत्राटी कामगारांचा विमा उतरविण्यासाठी, विमा कुणाकडन उतरवायचा, तुम्ही काय करता कुठलाही चार कंपन्याचा विमा उतरवता. इंडीया इन्शुरन्स कंपनी, ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनी, नॅशनल इन्शुरन्स कंपनी अशा चार शासकीय कंपन्या आहेत यात कुणालाही घ्या तुमच्या अति.आयुक्तांनी खाली पत्र दिल की फक्त नॅशनल इन्शुरन्स कंपनीकडनच विमा घ्यायचा आणि त्वरीत कार्यवाही झाली पाहीजे. हे चाललय काय महापालिकेत भारतीय जनता पार्टीला एकतर अधिका-यावर कंट्रोल ठेवता येत नाही. म्हणजे अधिकारी काय करतात एका बाजुला मला चांगल वाटेल तो करेल. आज जर पाहीलतर आकडेची आकडे ही भरारी आहे. मला वाटत नवीन आयुक्त साहेबांना माहीत नाही शहराचे दोन भाग आहेत. आता काय झालेल आहे इलेक्शन जवळ आलेल आहे. आता ओडाताण चालली हा भाग

माझ्याकडे का हा भाग तुझ्याकडे पण हे होत असताना कुठतरी नागरीकाचा पण आपण कुठेतरी विचार केला पाहीजे. मला परत तुम्हांला सांगायच आहे एसआरए डेव्हलप करणे हे महापालिकेच काम नाही. त्यासाठी आज वरच्या लेवला सुध्दा परत परत नियमावलीवर बैठका होत्या, मला वाटत काल देखील मंत्रालयात मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे बैठक होती आपले आयुक्त साहेब पण त्याठिकाणी गेल होते. एसआरएच्या देखील नवीवनवीन नियमावली येतात. तरी तुम्ही घाई न करता खरच या शहरातील नागरीकांसाठी जे गरजेच असेलना त्याची सगळयांनाच काळजी आहे. मला अजुनही सांगायच आहे की त्या भागातील नागरीकांना घर मिळाव यासाठी आमचा कुणाचाही विरोध नाही परंतु आमचा या प्रकरणाला विरोध आहे. आयुक्त साहेब मला आपल्याला देखील विनंती आहे की आपण हे सर्व चेक करत असताना आपण देखील या सगळया गोष्टीकडे उघडया डोळयांनी पहाव जेणेकरुन आज आम्ही आरोप करतो पण हे कुठेतरी तथ्य आहे का नाही हे पाहण्याच काम तुमच आहे. मा.महापौर आमचा लोकांना घर मिळण्यास कुठेही विरोध नाही परंतु ज्या पध्दतीने हा विषय याठिकाणी पटलावर आला, आम्ही गटनेत्यांच्या बैठकीत देखील त्याला विरोध केला होता आणि आज देखील आम्ही या प्रकल्पाला विरोध करतो, धन्यवाद.

**मा.अजीत गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. मा.महापौर तुमच खुप आभार एवढया दिवसातल्या काळातली तुम्ही खरच खुप चांगली जीबी चालवली आहे. अशा पध्दतीने जीबी चाललीतर मला वाटत वादविवाद होणार नाहीत. हा जो काही स्लम डेव्हलपमेंटचा विषय आपण महापालिकेच्या माध्यमातून सभागृहामध्ये आणलेला आहे गेले अनेक दिवस हा विषय अजेंडयावर आहे परंतु तुम्ही प्रत्येकवेळी तो तहकूब केलेला आहे त्याच्या मागची कारण आम्हांला माहीत नाही परंतु याठिकाणी निलेश बारणे, संदीप वाघेरे, योगेशभाई, राहूल कलाटे या सगळयानी आपआपली मत मांडली. स्लम डेव्हलपमेंट निश्चितपणे महापालिकेनी अजून कधी केलेल नाही. हार्डीकर साहेबांनी मागे सांगीतल की दापोडीची स्लम डेव्हलप करायची आहे नंतर हा गांधीनगरचा विषय पुढे आला. आपण सगळेच विचार करतोत की आपल्या शहरातल्या स्लम झोपडपटय आहेत त्या झोपडपट्टीधारकांना चांगली घर मिळावी आणि शासनाचे आणि महापालिकेचे त्या अनुषंगाने प्रयत्न चालू राहीले. जवळपास ७१ स्लम आपल्या पिंपरी चिंचवड शहरात आहेत. त्या सगळया नागरीकांना साधारणत: २०११च्या जनगणनेप्रमाणे २ लाख ५५ हजार लोक स्लममध्ये राहतात त्याच्यामुळ त्याठिकाणी त्याना पक्क घर मिळाव ही भूमिका शासनाची आहे. परंतु हा विषय आणताना कुठेतरी चुका झाल्यात. आता या सगळयांच्या बोलण्यातन आपल्या लक्षात आल असेल की मुळात स्लमला जमिनमालकाला जो मोबदला दयायचा असतो तो २५ टक्के मोबदला दिला जातो. आपल्याही जमिनी जेव्हा आपण देतो त्याला २५ टक्के मोबदला दिला जातो. याठिकाणी तो ५० टक्के दिला असं दिसतय त्याच्यामुळ सगळयांच्या मनात शंका निर्माण झाली की अशा पध्दतीचा चुकीचा मोबदला का दिला जातो. आज परिस्थिती काय आहे

की ती बिल्डींग बांधताना ज्या काही अडचणी आहेत म्हणजे आपण घरकुल केल, पुनर्वसन प्रकल्प आपण करतो ही सगळी काम आपण का करतो की आपल्या शहरातल्या गरीब नागरीकांना त्याठिकाणी चांगल घर मिळाव ही महापालिकेची आणि शासनाची भुमिका त्याच्या पाठीमागची होती. हे करत असताना याठिकाणी आपण जे काही अवॉर्ड पण देतो ते अलौटमेंट देताना त्याच्यामध्ये कुठेही व्यवहार नाही म्हणजे त्यांचा जो थोडाफार शेअर आहे तो आपण त्यांच्याकडन घेतो. परंतु याठिकाणी ही डेव्हलपमेंट होत असताना होतय काय की जेव्हा इमारत बांधायची त्याच बांधकाम कोणी करायच नंतर ते बांधकाम झाल्यानंतर त्याच्यातन जो काही टिडीआर जनरेट होणार आहे तो टिडीआर जनरेट झाल्यानंतर टिडीआर कोणी विकायचा, त्याचा रेट किती असला पाहीजे आणि जो युज नाही झाला, ज्या एफएसआयचा युज नाही झालातर तो राहीलेला टिडीआर कोण विकणार आहे. मार्केट मध्ये अनेक लोक अशा पध्दतीची कामे करतात. आम्ही सुध्दा कन्सट्रक्शन्स लाईनमध्ये काम करतो. हे करत असताना रेट महापालिका कधी ठरवणार. याच्यामाग ज्या काही प्रॅक्टीकल अडचणी येणार आहेत त्या नेमकी महापालिका कशा पध्दतीने सोडवणार आहे. याचा माझा जो अभ्यास आहे त्याच्यातन मला असे दिसत की प्रॅक्टीकली काम करताना आपल्याला अनेक अडचणी येवू शकतात आणि म्हणून हे करत असताना जर तुम्हांला प्रॉपरली हा विषय आणला असता की त्याचा रेट जर प्रॉपर ठेवला असता नंतर जे काही जनरेशन याच्यातून होणार आहे किंवा जो काही फ्रिसेल होणार आहे तो फ्रिसेल कोण विकणार आहे, त्याचा रेट काय असणार आहे या सगळया ज्या काही प्रॅक्टीकल अडचणी आहेत त्या अडचणी कशा सोडवल्या जाणार आहेत याचा विचार केला गेला नाही आणि प्रशासनाने हा विषय आणताना कुठतरी अर्धवट पध्दतीने हा विषय सभागृहामध्ये आणलेला आहे. तरी याच्यावरती आपण पुर्नविचार करावा. येथे राहणा-या नागरीकांना पक्क घर हे मिळाल पाहीजे भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसची पण आहे आणि शिवसेनीची पण आणि भारतीय जनता पक्षाची पण आणि मनसेची सुध्दा आहे. सगळयाच पक्षाला वाटत की आमच्या परिसरात राहणारा जो गरीब नागरीक आहे जो झोपडपट्टीधारक आहे याला पक्क घर मिळाल पाहीजे अशा प्रकारची प्रत्येकाचीच भूमीका आहे. त्याच्यामुळे हे करत असताना कुठेतरी हा विषय व्यवस्थित मार्गी लागला पाहीजे. अन्यत: नुसतच आपण मंजू-या घेवू, कोटयावधी रुपयाचा खर्च करु आणि त्याच्यातुन हा प्रकल्प मार्गी लागला नाहीतर त्याच खापर आपल्यावर फुटेल. तरी माझी आपल्याला विनंती आहे की याच्यावरती आपाण चांगल्या पध्दतीने फेरविचार करावा आणि मग निर्णय घ्यावा.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. गांधीनगरच्या संदर्भामध्ये आज बरेच मुद्दे याठिकाणी उपस्थित केले आहेत. नेमका प्रोजेक्ट कसा असणार आहे या स्वरुपात याठिकाणी प्रस्तावामध्ये डिटेल असलतरी मी आपणास विनंती करतो की हा प्रोजेक्ट करत असताना महानगरपालिकेला याच्यामधुन किती पैसे मिळणार आहेत. किंवा महानगरपालिका या प्रोजेक्टसाठी किती पैसे देणार आहे. हा प्रोजेक्ट करत असाताना

महानगरपालिकेला काय राहणार आहे आणि त्यातन काय मिळणार आहे एवढया स्वरुपाच जरी भालकर साहेबांनी त्या संदर्भामध्ये खुलासा केलातर त्यानंतर मी परत बोलणार आहे. आपण भालकर साहेबांना याच्या संदर्भामधला कमर्शिअल खुलासा कराला सांगावा अशी मी विनंती करतो.

**मा.भालकर (सहशहर अभियंता)-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. गांधीनगर झोपडपट्टी पुनर्वसनाबाबत मी थोडक्यात प्रोजेक्टची बॅगराऊंड काय आहे ती सांगतो. सदरचा प्रोजेक्ट हा आपण ६.२७ हेक्टरवर करणार आहोत, ही पुर्ण लॅण्ड शंभर टक्के रिझर्व्हेशनच्या अंडर आहे आणि यासाठी आपण मुकेश मेहता कन्सलटंट यांची अपॉईंटमेंट केलेली आहे. मशालचा जो सर्व्हे झाला २००२ साली त्यानुसार जवळपास १४५० इतर झोपडपट्टया त्यावेळी होत्या. सध्या आपण १४५० कन्सीडर न करता त्याच्यामध्ये वाढ झालेली असं कन्सीडर करुन २१०० झोपडपट्टया ही आपण राहण्याची आज सोय करत आहे. यामध्ये दोन पार्ट आहेत एक म्हणज रिहॅबिलेटेशन म्हणजे जे लोक तीथे सध्या राहतात त्यांच्यासाठी आपण ज्या झोपडपट्टया बांधणार आहोत तो एक पार्ट आहे आणि दुसरा पार्ट म्हणजे विक्रीचा. विक्रचा पार्ट आहे त्याच्यामध्ये ४७६ सदनिका आपण बनवत आहोत आणि त्यातल्या ३४४ वाणिज्य आहेत आणि ४७६ या रेसिडेन्शिअल आहेत. रेसिडेन्शिअल ज्या सदनिका आहेत त्यांच क्षेत्र आहे ४५० आणि ६०० स्क्वे.फुटाच्या सदनिका आहेत आणि त्या झोपडपट्टीधारकांना आपण सदनिका देणार आहोत त्याच क्षेत्र आहे ३०० चौ.फुट चटई क्षेत्र आहे. बांधकामाचा जो अपेक्षीत खर्च आपण धरलेला आहे जो विक्रीसाठी आपण सदनिका बनवणार त्याचा २३०० रु. पर स्क्वे.फुट असा खर्च पकडलेला आहे आणि झोपडपट्टीधारकांना आपण ज्या सदनिका देणार आहेत त्याचा खर्च २१०० रु. स्क्वे.फुट पकडण्यात आलेला आहे. याच डिटेल इस्टीमेट आपल्याकड आहे याच सेप्रेट प्रेझेन्टेशन आपणा सर्वांना दाखवण्यात येईल. त्याची कमर्शिअल कॅन्सूलेशन देखील सर्व दाखवण्यात येईल. याच्यामध्ये आपण जी प्रोजेक्टची कन्सलटंटची कॉस्ट काढली ती ३८३ करोड आलेली आहे याच्यामध्ये ऍमेनीटी कॉस्ट आपण पकडलेली नाही. आपण ऍडीशनल ऍम्युनिटी कॉस्ट देत आहोत. याच्यामध्ये महापालिका ऍज ए डेव्हलपर म्हणून ऍक्ट होणार आहे आपण हा प्रोजेक्ट कुठल्याही बिल्डर्सकडे सोपवणार नाहीत. यामध्ये महत्वाची बाब आहे महापालिका स्वत: डेव्हलप करणार असल्यामुळे लॅण्डओनर जे आहेत किंवा सध्या जे तीथ झोपडीधारक आहेत त्यांच्याकडून कन्सेंट मिळायला आपल्याला अवघड जाणार नाही आणि त्याच्यापैकी आपल्याला २.२८ तर आपल्या ताब्यात आहे जी टिडीआर म्हणून आपण घेतलेली आहे आणि जवळपास ४ हेक्टर ही जागा आपण घ्यायची आहे. तरी यासाठी बरेचसे मॉडेल आपण तयार केलेले आहेत. जी लॅण्ड आपण ४ हेक्टर घेणार आहेत त्याच्यापैकी इक्वीटी शेअर मॉडेल म्हणजे जेवढी जागा लॅण्ड ओनरकडे आहे त्या परसेन्टेजमध्ये आपण त्यांना शेअर देवू शकतो हा एक पहीला कन्सेप्ट आहे दुसरी आहे ही जी लॅण्ड आहे ही थ्रू एसआरए करायची म्हणजे आपण ऍक्वीझेशनमध्ये एसआरएला जर इन्व्हॉल्व्ह केलतर ऍजपर एसआरए चे जे नियम

आहेत रेडीरेनेरच्या २५ टक्के आहे त्याप्रमाणे ही एक सेकण्ड कन्सेप्ट आहे की ही लॅण्ड आपण एसआरए थ्रू ऍक्वायर करु शकतो. आपल्याकड पर्याय उपलब्ध आहेत तर या पर्यायापैकी आपण कोणता पर्याय निवडायचा आहे त्याचे अधिकार आपण आयुक्त आणि स्टॅण्डींग कमिटीला देणार आहोत. आता जे ५० टक्के आपण म्हणलेले आहे हा आपला एक विचार आहे ती आपण फायनल केलेली नाही. याच्यामध्ये आपण सध्या तीन चार मॉडेल स्टडी करत आहोत कुठलही मॉडेलवर फायनान्शिअल मॉडेल आपण फायनल केलेल नाही. जे लॅण्ड ओनर आहेत यांना एकतर आपण जो स्लम टीडीआर तयार होईल ऍज ए कॉम्पेसेशन म्हणून देवू शकतो. दुसरा जो सेलकॉम्पोनंन्ट आहे त्यातला ऍजए कॉम्पेसेशन म्हणून पार्ट घेवू शकतो किंवा ऍजपर एसआरए रुल २५ टक्के किंवा जीबीचा जो काही निर्णय होईल त्याप्रमाणे आपण कॉम्पेसेशन घेवू शकतो. चौथा मुद्दा आहे फायनान्शिअल मॉडेल लॅण्ड ओनरच्या म्हणजे एवढी परसेन्टेजमध्ये लॅण्ड आहे त्या परसेण्टेजमध्ये आपण त्यांना आपण त्यांना इक्वीटीमध्ये पण घेवू शकतो. हे चार मॉडेल आहेत हे आपण अजून फायनल केलेले नाही.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. पंतप्रधान आवास योजनेच्या संदर्भामध्ये गांधीनगरचा प्रोजेक्ट एसआरएच्या माध्यमातून याठिकाणी आलेला आहे आणि मला असं वाटत अनेक सदस्यांनी याठिकाणी उल्लेख केला आता भालकर साहेबांनी सुध्दा याठिकाणी हा प्रोजेक्ट कसा असेल, काय असेल सांगीतला. मा.महापौर साहेब हा विषय याला फक्त प्रशासकीय मान्यता आहे. तरी सुध्दा मी याठिकाणी सभागृहाला सांगेल कारण सभागृहाच्या भावना सुध्दा एसआरएच्या झोपडपट्टीतल्या मुलांना सुविधा मिळाल्या पाहीजेत त्यांना चांगली शाळा मिळाली पाहीजे, ते मोठया बिल्डींगामध्ये आले पाहीजे या संदर्भात सभागृहाची कुठलीही भूमीका नाही. परंतु याठिकाणी जो काही आरोप केला जातो खर म्हणजे हा प्रोजेक्ट कुणाच्यासाठी वगैरे काही करायचा नाहीतर गरीबांच्या घरांच्यासाठी आहे आणि मगाशी साहेबांनी सांगीतल की हा आरक्षीत जागेवरती आपल्याला प्रोजेक्ट करायचा आहे. मा.महापौर साहेब, याठिकाणी योगेश बहल यांनी सांगीतल की खर म्हणजे भाई आम्ही व्यावसाय करणारे लोक नाहीत कामगार क्षेत्रामधले लोक आहोत, गरीबांच्यासाठी काम करायच आणि गरीबांच्यासाठी झोपडपट्टी पुर्नवसनाच्या माध्यमातून याठिकाणी हा विषय आला आहे आणि तो फक्त प्रशासकीय मान्यतेला आला आहे. त्यासंदर्भात कमर्शिअल काय, कसं त्यासंदर्भामधला विषय हा डिटेल स्थायी समितीकडे जाणार आहे त्याच प्रेझेन्टेशन होणार आहे तरी सुध्दा व्यावसायीक नसल्यामुळे आम्हांला माहीती आहे की गरीबांच्या घराचा हा विषय असल्यामुळे आम्ही हा विषय याठिकाणी आणलेला होता त्यावर चर्चा झाली सर्वांच याठिकाणी असं लक्षात आल की हो गांधीनगर झोपडपट्टीचा जो विषय आहे कुणीतरी म्हणल पण हा कुणालाही डोळयासमोर ठेवून हा विषय नक्कीच करायचा नाही आणि कुणा व्यक्तीसाठीतर नक्कीच करायचा नाही. हा गरीबांच्या घरासाठीचा विषय आपल्याला करायचा होता म्हणून हा विषय शहर सुधारणाच्या कडून याठिकाणी

आलेला आहे. यावरती चर्चा झाली चर्चेमधुन असं लक्षात आल की खर म्हणजे भालकर साहेब आम्हांला आपल्याकडून अस अपेक्षीत होत की हा प्रोजेक्ट जो आहे तो केला जाणार आहे महापालिकेला याचा भूर्दंड पडणार आहे का. महानगरपालिकेला याच्यामधुन पैसे मिळणार आहेत का बिल्डरच्याकडून यासंदर्भामध्ये आपण थोडासा खुलासा करायला पाहीजे होता की नेमक काय आहे. आपण यासंदर्भामध्ये काय करणार आहोत, महानगरपालिकेला किती पैसे मिळणार आहेत, तुम्हांला कमर्शिअल विचारल की कमर्शिअल सांगा. सभागृहाला कळेल की महानगरपालिकेला याच्यामधुन उत्पन्न मिळणार आहे, महानगरपालिकेला पैसे मिळणार आहे अशा स्वरुपाचा प्रोजेक्ट याठिकाणी आहे. तरी सुध्दा आपल्या सगळयाची भावना, भारतीय जनता पार्टी याठिकाणी काम करते मी मगाशी सांगीतल की सर्वसामान्य लोकांसाठी, गरीबांसाठी आम्ही काम करतो आणि गरीबांच्या घरासाठी त्याठिकाणी असणा-या लोकांना चांगल घर मिळाल पाहीजे जस सर्वसामान्य व्यक्ती मोठया फ्लॅट मध्ये राहतो, त्याला गार्डन असत त्याच्या मुलांना शिकण्यासाठी इंग्रजी माध्यमाची शाळा असते अशाप्रकारचा प्रोजेक्ट हा याठिकाणी आणलेला असताना सुध्दा एक चांगला प्रोजेक्ट असताना सुध्दा जर याच्यावरती कुठल्याहीप्रकारचा आरोप होत असेलतर आम्ही सांगतो की कुठल्याही व्यक्तीसाठी हा प्रोजेक्ट नसुन हा प्रोजेक्ट फक्त झोपडपट्टीवासीयांसाठी होता आणि म्हणून सन्मा.महापौर याठिकाणी मी सांगेल की आपण कुठल्याहीप्रकारे कुणाच्या व्यक्तीसाठी काम करीत नसुन आपण कार्यकर्ते सर्वसामान्यांच्यासाठी काम करणारे कार्यकर्ते आहोत आणि म्हणून हा जरी विषय शहर सुधारणाच्या माध्यमातून या सभागृहामध्ये आलेला असेल व याच्यावरती आरोप होत असतील, गरीबांच्या घरासाठी होत असेल, त्यांना शाळा देत असेल, त्यांना गार्डन देतो चांगल्या प्रतीच त्याठिकाणच झोपडपट्टी पुनर्वसन झाल पाहीजे, झोपडपट्टीविरहीत पिंपरी चिंचवड शहर झाल पाहीजे अशाप्रकारची भूमिका ही शहर सुधारणाच्या माध्यमातून याठिकाणी आलेली आहे. मी याठिकाणी विनंती करणार आहे आरोप करणा-यांनी कुठल्याही प्रकारचा आरोप करताना ज्यावेळेला सांगीतल जातं, कुणासाठी करतो, कुठला प्लॉट होल्डर आहे, कुणाचा प्लॉट आहे, या संदर्भामध्ये ज्यावेळेला आरोप केला जातो त्यावेळेला त्यांनी याठिकाणी बघीतल पाहीजे की खर म्हणज गरीबांच्यासाठीचा घराचा विषय आहे. जागा कुठ जाणार आहे जागामालकाची जागा त्या झोपडपट्टीवाल्यांना त्याचठिकाणी राहायला मिळणार आहे. त्यांना चांगल उच्च प्रतीच घर दयाव ही भूमिका याठिकाणी शहर सुधारणाच्या माध्यमातून आली म्हणून हा विषय याठिकाणी सभागृहामध्ये आला आहे. मा.महापौर साहेब, मी याठिकाणी आपल्याला सांगेल की हा जो काही विषय याठिकाणी आलेला आहे हा विषय आपण याठिकाणी दप्तरी दाखल करावा हा विषय आपण झोपडपट्टीवाल्यांच्या चांगल्या घरासाठी आणलेला होता आणि याच्यावरती जर कुणी वाकडया नजरेनी आमच्या वरती आरोप करणार असालतर आम्ही आरोप याठिकाणी खपवून घेणार नाहीत, हा विषय कुठल्याही व्यक्तीसाठी नसून हा

झोपडपट्टीवाल्यांसाठी होता. मा.महापौर साहेब हा विषय याठिकाणी दप्तरी दाखल करावा अशी मी सूचना मांडतो.

**मा.सुरेश भोईर –** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर -** विषय क्रमांक ११ हा दप्तरी दाखल करण्यात येत आहे. कोणाच्या नावाने ज्यांनी भाष्य केलेल आहे त्यांनी विचार करुन बोलाव. दिव्याखाली अंधार असतो हे आपल्या सगळयांना माहीती आहे. एखादया व्यक्तीच्या नावाने जे काही आरोप झाले असतीलतर ते प्रोसिडींगमधुन वगळण्यात यावे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ६१२ विषय क्रमांक - ११
दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.आयुक्त

**संदर्भ –** १) मा.मा.वैशाली घोडेकर, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव.
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.५ दि.९/१२/२०२०
३)मा.महापालिका सभा ठराव क्र.५९१, दि.२०/०१/२०२१

विषय क्रमांक ११ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल- ७२ प्रतिकुल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६१३ विषय क्रमांक - १२
दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.आयुक्त यांचेकडील जा.क्र.पअक/०३/कावि/०३/२०२१ दि.११/१/२०२१
२) मा.महापालिका सभा ठराव क्र.५९५ दि.२०/०१/२०२१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ६७(अ) अन्वये प्रत्येक महानगरपालिकेने लगतपूर्व शासकीय वर्षासंबंधिचा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल शासनाकडून वेळोवेळी विहीत करण्यात येईल, अशा पध्दतीने दरवर्षी ३१ जुलै पूर्वी मा.महापालिका सभेकडे सादर करणे आवश्यक आहे. तथापी यावर्षी मार्च २०२० पासून कोविड महामारीमुळे लागू झालेल्या लॉकडाऊन व त्यानंतरच्या प्रतिबंधामूळे सन २०१९-२० च्या पर्यावरण सद्यस्थितीत अहवालासाठी आवश्यक माहिती मनपाच्या व इतर शासकीय – निमशासकीय विभागाकडून वेळेत प्राप्त होऊ शकली नाही. सदरची माहिती प्राप्त करुन घेणेसाठी विलंब होत असल्याने सन २०१९-२० चा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तयार करुन मा.महापालिका सभेसमोर ठेवणेस मा.आयुक्त

यांचेकडील प्रस्तावानुसार मुदतवाढ घेणेत आली होती. त्यानुसार प्राप्त माहितीच्या आधारे सन २०१९-२० चा मनपाचा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे तयार केलेला असून सदरचा प्रारुप अहवाल मा.महापालिका सभेसमोर अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक आहे

सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सन २०१९-२० चा पर्यावरण सद्यस्थिती अहवालाचे अवलोकन करणेत आले.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाइन असलेले सर्व नगरसेवक नगरसेवीका. पर्यावरण सद्यस्थिती अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ सन २०१९-२० चा अहवाल हा आपल्या समोर अवलोकनार्थ आलेला आहे. पंकज भालेकर यांनी मगाशी एक मुद्दा उपस्थित केला तो म्हणजे निगडी असेल, तळवडे असेल, प्राधिकरण असेल, किंवळे असेल, देहूरोड असेल, रावेत असेल या बाजूला असणारी जी लोकवस्ती आहे देहूरोड कॅण्टोण्मेंटच्या बरोबर रस्त्यामध्ये ज्याठिकाणी ती जागा उपलब्ध आहे त्याठिकाणी देहूरोड कॅण्टोण्मेंटचा सगळा कचरा त्याठिकाणी आणला जातो आणि तो मोठया प्रमाणात जाळला जातो. याचा नाहक त्रास निगडी असेल, किंवळे असेल, देहूरोड असेल, रावेत असेल संबंधित सर्व नागरीकांना तो मोठया प्रमाणात त्रास सहन करावा लागतो. मा.महापौर साहेब, गेले सतत चार वर्षे या विषया घेवून आम्ही वेळोवेळी तुमच्या समोर आयुक्तांसमोर हा मुद्दा मांडला परंतु कोणत्याही प्रकारच गांभीर्य लक्षात न घेता आजही त्याठिकाणी सर्वसामान्य नागरीकांचे हाल चालू आहेत. त्याठिकाणी देहूरोड कॅण्टोण्मेटचा कचरा येतोच परंतु पिंपरी चिंचवड शहरातले काही हॉटेल व्यावसायीक आहेत ते रात्रीचे येवून त्याठिकाणी हॉटेलचे वेस्टेज तीथे टाकतात आणि रात्रीच्या रात्री ते पेटवून दिल्या जाते. मा.महापौर साहेब एवढा मोठा हा गंभीर प्रश्न आहे की हजारो नागरीकांचे जीव मुठीत आहेत. तुम्ही सहा वाजता, सात वाजता गेलेतर त्या धुरामुळे समोरचा व्यक्ती दिसत नाही, त्या धुरामुळे डोळयाला, श्वासनाला त्रास होतो, याच्यावर कुणाच लक्ष नाही. काल परवा आयुक्तांनी त्या संबंधित अधिका-यांना बोलून घेतलं परंतु आयुक्त काही कामानिमीत्त बाहेर गेले होते. मी मा.महापौर साहेब तुम्हांला एक विनंती करतो देहूरोड कॅण्टोण्मेंटचे जे सीईओ असतील त्यांची आणि आपली जी बैठक आहे ती लवकरात लवकर घेवून तीथल्या नागरीकांना सहकार्य कराव. आज पिंपरी चिंचवड शहरामध्ये कमीत कमी तुम्हांला सांगतो की दर महीन्याला साडेसात ते आठ हजार टू व्हिलर आणि त्याचप्रमाणे दर महीन्याला हजार ते दिड हजार दोन हजार फोर व्हिलर आरटीओ मध्ये रजिष्टर होवून रस्त्यावर येत आहेत. आपण दरवेळेस पालिकेमध्ये येत असताना किंवा बाहेर जाताना आपण आपल्या फोर व्हिलरनी प्रवास करत असतो. जर टू व्हिलरवाल्यांची तुम्ही व्यवस्था, अवस्था विचारलीतर सर्वसामान्य नागरीक एकदम घायाळ झालेला असतो आणि त्याला धुळीच प्रमाण मोठया प्रमाणात झालेल असतं, छोटेमोठे कण हे डोळयामध्ये गेलेले असतात. मोठया प्रमाणात धुळीच प्रमाण या पिंपरी चिंचवड

शहरामध्ये वाढलेल आहे. एकीकडे धुळीच प्रमाण, एकीकडे धुराच प्रमाण यामध्ये हावेची गुणवत्ता काय आहे, हावेची गुणवत्ता तपासता येते का नाही येते या सर्वांकडे अवर्जून लक्ष देण्याच काम आहे. मा.महापौर साहेब, सर्वात महत्वाची गोष्ट आज आपल्या पालीकेतील संबंधित एक नगरसेवक जलपर्णी घालून आतमध्ये येण्याचा प्रयत्न करत होता परंतु त्याला सुरक्षा रक्षाकानी आडवल, सुरक्षा रक्षाकानी आडवल्या नंतर गेले पंधरा ते वीस मिनीट तो त्याठिकाणी उभा होता. सांगायच तात्पर्य एवढच की वर्षानुवर्ष आपण जलपर्णीच्या विषयी टेंडर काढतो आणि आजही जर का त्याची अवस्था पाहीलीतर मोठयाप्रमाणात आता राहूल दादानी सांगीतल तस एखाद गार्डन झालेल आहे असं दिसत एवढया मोठया प्रमाणात ती जलपर्णी वाढलेली आहे. पवना आणि इंद्रायणी, मुळा २०१८-१९ ला आपण टेंडर काढल. निवीदा रक्कम ३९ लाख. त्याचप्रमाणे राजलक्ष्मी स्वयंरोजगार संस्था २०१८-१९ ला परत काढल ४१ लाख, देय रक्कम ३६ लाख. इंद्रायणी नदीच ३२ लाख, देय रक्कम १५ लाख. मे सावित्री महीला स्वयंरोजगार संस्था निवीदा रक्कम १७ लाख देय रक्कम ७ लाख. परत साईला काम दिल आपण २०१९-२०ला २ कोटी २९ लाख आणि बील आदा केल ८६ लाखाच. मा.महापौर साहेब, जर का आपण एवढया मोठया प्रमाणात बील देतो तर जलपर्णी ही निघाली पाहीजे परंतु कोणत्याही प्रकारच गांभीर्य त्याठिकाणी दिसताना दिसत नाही हे तुम्हांला खेदाने सांगू इच्छितो. दोन्ही नदयाच आपण पाहीलतर पात्र आता हाळूहाळू कमी होत चालल आहे. रोज दिवसाढवळया मोठया प्रमाणात त्याठिकाणी राडा आणला जातो तो टाकला जातो आणि एक प्रकारे भरीव खोदकाम या पध्दतीने केलेल आहे. मागच्या वर्षी आपण शंभर शंभर कोटीचे टेंडर काढले. त्याठिकाणी रासायनीक उदयोगांचा जो मैला आहे, सांडपाणी आहे ते व्यवस्थीतपणे ड्रेनेजलाईन थ्रू मलशुध्दीकरण केंद्राला आल पाहीजे त्या कामाच काय झाल ते अजून माहीती नाही. या सर्वांच आपण व्यवस्थीतपणे विचार करावा आणि व्यवस्थीतपणे माहीती मागवावी एवढ बोलून थांबतो, धन्यवाद.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६१४ विषय क्रमांक - १३
दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.नगरसचिव

मा.विधी समिती

अ) कार्यपत्रिका क्र.०२, दि.०६/११/२०२०, १०/१२/२०२० व १४/१२/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) कार्यपत्रिका क्र.०३, दि.१८/१२/२०२० व ०१/०१/२०२१ (दु.२.४५ वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
क) कार्यपत्रिका क्र.०४, दि.०१/०१/२०२१ (दु.३.०० वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ड) कार्यपत्रिका क्र.०५, दि.१५/०१/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६१५ विषय क्रमांक - १४
दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.नगरसचिव

मा.महिला व बालकल्याण समिती

अ) कार्यपत्रिका क्र.०३, दि.२४/१२/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६१६ विषय क्रमांक - १५
दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.नगरसचिव

मा.शहर सुधारणा समिती

अ) कार्यपत्रिका क्र.०४, दि.१५/१२/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) कार्यपत्रिका क्र.०५, दि.०५/०१/२०२१ व १२/०१/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
क) कार्यपत्रिका क्र.०६, दि.१९/०१/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६१७ विषय क्रमांक - १६
दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.नगरसचिव

मा.शिक्षण समिती सभा

अ) कार्यपत्रिका क्र.०२, दि.०५/११/२०२० व ११/१२/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) कार्यपत्रिका क्र.०३, दि.१७/१२/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
क)कार्यपत्रिका क्र.०४, दि.०७/०१/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ड) कार्यपत्रिका क्र.०५, दि.२१/०१/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.महापौर**– सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

**(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/६/कावि/३२/२०२१
दिनांक - १६/४/२०२१

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.